
सं. ठाणे.



RLI BK-0017314

# गांधी

# गौरव ग्रंथ

# म. गांधी-गौरव-ग्रंथ

गांधी-जन्म-शताब्दीनिमित्त प्रकाशन

(Mahatma Gandhi Gourav Granth)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

REFBK-0017314

: संपादक :

दा. न. शिखरे

महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे ४

प्रकाशक :

दा. न. शिखरे, संचालक
महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे ४.

मूल्य पंधरा रुपये

मुद्रक :

वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय प्रा. लि.
४०५ नारायण पेठ
पुणे ३०.

# प्रास्ताविक

म. गांधींच्या जन्मशताब्दीनिमित्त ' महाराष्ट्र गांधी स्मारक निधी 'तर्फे हा ग्रंथ प्रकाशित करण्यास आम्हांला अत्यंत आनंद होत आहे. म. गांधींच्या प्रथम शताब्दीकाळात जगातील किती भाषांत व किती राष्ट्रांत असे ग्रंथ, खास अंक व अन्य साहित्य प्रकाशित होईल, याची मोजदाद करणे जवळ जवळ अशक्य आहे. आज ज्या वार्ता वाचनात येत आहेत, त्यांवरून शताब्दीनिमित्त विपुल वाङ्मय प्रसिद्ध होणार आहे याबद्दल शंका नाही.

दिल्लीच्या मध्यवर्ती ' गांधी स्मारक निधीने ' गेल्या वर्षीच्या २ ऑक्टोबरला ' महात्मा ' नावाचा एक ग्रंथ इंग्रजीत प्रसिद्ध केला. त्यात बऱ्याच पाश्चात्यांचे लेख आहेत. मराठी भाषेत असाच ग्रंथ प्रसिद्ध करावा, ही इच्छा मनात बाळगून दीड-दोन वर्षांपूर्वीच ' महाराष्ट्र गांधी स्मारक निधीने ' हा संकल्प केला व अनेक महिने प्रयत्न करून तो संकल्प पुरा केला, याबद्दल समाधान वाटते.

म. गांधींच्याबद्दल हिंदुस्थानात जी कृतज्ञतेची बुद्धी आहे, ती त्यांनी आम्हांला ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून मुक्त केले याबद्दल आहे. जगातली किती तरी राष्ट्रे हिंदुस्थानच्या मागोमाग स्वतंत्र झाली ! आपल्या स्वातंत्र्याला म. गांधी कारण झाले, असे त्या त्या राष्ट्रांना वाटते; पण जी राष्ट्रे आधींपासून स्वतंत्र आहेत त्यांना गांधींच्या अहिंसात्मक प्रतिकारशक्तीबद्दल आदर, जिज्ञासा व उत्सुकता वाटत आहे. आपापल्या देशाच्या समस्या सोडविण्यास व जागतिक शांतता स्थापण्यास गांधीप्रणीत सत्याग्रहाचे साधन कसे परिणामक्षम करता येईल, याचे संशोधन व चिंतन तेथे चालू आहे. माणूस आधिभौतिक संशोधनाने अंतराळात जाऊ शकतो, चंद्रावरही तो पोहोचला; पण शेवटी त्याला पृथ्वीवरच रहावयाचे आहे. पृथ्वीवरील सर्व समस्या आधिभौतिक संशोधनाने सुटणार नाहीत; त्या सोडविण्यास मानवताच जागृत झाली पाहिजे. मानवाने येथील समस्या अन्य ग्रहावर नेता कामा नये. गांधीजींनी आपल्या जीवनात मानवतेची, श्रेष्ठ मानवतेची आराधना केली, तपस्या केली, क्लेश भोगले व हे सर्व करीत असता ईश्वरनिष्ठा विचलित होऊ दिली नाही. ईश्वरनिष्ठेला घट्ट बिलगून गांधीजींनी

स्वतःला 'देवाचा एक माणूस ' म्हणवून घेतले व त्याचे कार्य करणारे आपण एक माध्यम आहोत, या श्रद्धेने जीवन व्यतीत केले. ईश्वरी कार्य म्हणजे त्याने निर्माण केलेल्या सृष्टीचे कार्य. ते कार्य मंगल आहे; मानवी सुखाच्या, शांतीच्या, स्वास्थ्याच्या– कारुण्य, दया, प्रेम, सत्य, न्याय वगैरेच्या अभिवृद्धीचे आहे असे ते मानीत गेले. ईश्वरी सृष्टीत क्रौर्य, हिंसा, अन्याय, असत्य, परपीडा, मत्सर, द्वेष असू शकत नाही. मनुष्य हे सर्व विसरला व स्वार्थी बनला आणि त्याने जगात अनेक अनीश्वरी गोष्टींचा प्रचार केला. अशा या विमार्गगत मानवाला त्याच्या नैसर्गिक मार्गावर आणण्याची धडपड गांधींनी जन्मभर केली. त्यांच्या त्या प्रयत्नात अहंकार नव्हता, पण समर्पण-बुद्धी होती. समर्पण हे त्याग व क्लेश यांशिवाय होऊच शकत नाही. जगाच्या सुखाकरिता शरीर-वाचा-मनाने वागत राहणे हे अहिंसेचे लक्षण ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. तीच मानवी कल्याणाची, मांगल्याची बुद्धी गांधींच्यात होती.

गांधींच्यात इतर साधुसंतांपेक्षा काही एक आगळे होते. तत्त्व सांगून ते दूर बसले नाहीत. जगात महान तत्त्ववेत्ते झाले व होतीलही. त्या तत्त्ववेत्त्यांनी स्वतःला प्रतीत झालेली तत्त्वे आपापल्या आचरणात आणली; पण त्या तत्त्वांचा आचार समाजाने करावा म्हणून जन-सागरात उडी घेतली नाही. जग अपूर्ण आहे व ते पूर्णावस्थेला नेणे दुष्कर आहे, म्हणून कित्येक साधुसंतांनी निरुपायाने जग सुधारण्याच्या प्रयत्नांची परिसमाप्ती केली. गांधीजी त्या श्रेष्ठ कोटीला पोहोचलेले साक्षात्कारी नव्हते. ते एक श्रेष्ठ साधक होते. ते जगाच्या उद्धारात स्वतःचा उद्धार करू इच्छीत होते. माझा जितका उद्धार होईल तितका जगाचा होईल व जगाचा उद्धार होत नसेल तर माझ्यात उणिवा आहेत, असा दोषारोप ते स्वतःवर लादून घेत.

या दृष्टीने त्यांनी सर्व क्षेत्रात सत्याचे प्रयोग केले. सत्याचे प्रयोग याचा अर्थ ईश्वरप्राप्तीचे प्रयोग. तो ईश्वर किंवा ते सत्य या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इत्यादी प्रत्येक क्षेत्रात आहे. म्हणून जीवन हे समग्र आहे असे ते मानीत. त्या जीवनात उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, गोरा-काळा, शिक्षित-अशिक्षित, निर्बुद्ध-सुबुद्ध असा भेदाभेद ते करीत नव्हते. ' स्वे स्वे कर्मणि अभिरतः संसिद्धि लभते नरः ' हा गीतेचा उपदेश त्यांनी आत्मसात् केला होता. माणसाला शेवटी मोक्ष मिळवावयाचा आहे. त्या मोक्षाला

अधिकारी होण्याकरिता बुद्धीत समानता, कर्मात अनासक्ती व भक्तीत समर्पण हवे असते. ज्ञान, कर्म, उपासना ह्या श्रद्धा भिन्नभिन्न असू शकत नाहीत. तीनही मार्ग एकच आहेत, एकस्वरूपी आहेत. त्यांचा समन्वय जीवनात जीवन्मुक्तीकरिता केला पाहिजे.

गांधीजींनी आत्मसाक्षात्काराकरिता हिमालय पाहिला नाही. त्यांनी पाहिला तुरुंग, त्यांनी पाहिली हरिजन-गिरिजन-वस्ती, त्यांनी पाहिली रक्तपिपासू नोआखली. त्यांनी भीषण दारिद्र्यात हृदयाची तडफड अनुभवली, निष्ठेने कर्म केले व ईश्वराला ते कधी विसरले नाहीत.

गांधींचे तत्त्वज्ञान, गांधींचा आचार व गांधींचे सत्याग्रह हे काळाच्या उदरात गडप झाले नाहीत. ते होणे शक्यही नाही. शास्त्रज्ञाला जेव्हा अणु-बाँबच्या स्फोटामुळे जगाचा विनाश दिसेल, तेव्हा त्याला चिंतनशील बनावे लागेल. म्हणून गांधींचे विचार हे विशिष्ट काळाचे, विशिष्ट स्थळाचे किंवा विशिष्ट परिस्थितीचे निदर्शक आहेत, असे समजणे चूक होईल. तत्त्वे शाश्वत व सर्वव्यापी असतात; व्यक्तींना मर्यादा असतात. म्हणून गांधी ही व्यक्ती विसरली गेली, तरी त्यांचे विचार विसरले जाणे अशक्यच आहे. ते विसरणे म्हणजे स्वतःला, सुकाणूरहित अशा जहाजात बसून अगाध सागरात लोटून देण्यासारखे आहे. प्रत्येक व्यक्तीची शरीरशक्ती मर्यादित असते; पण बुद्धीची शक्ती अमर्याद असते. ती शक्ती संकुचित करण्याचा प्रयत्न होता कामा नये. गांधींनी आपल्याला नवे असे काही सांगितले नसले, तरी हे नव्याने सांगितले की, आचाराशिवाय विचार व विचाराशिवाय प्रचार हा उपयुक्त ठरत नाही; प्रभावी होत नाही. म्हणून ज्यांना जितका आचार करता येईल तितका श्रद्धेने, निष्ठेने केला पाहिजे. स्वल्पातून महान प्राप्त होते. एक वेळ गांधी-विचार विसरला तरी चालेल, पण आचार विसरला जाता कामा नये.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ...१००८७८... दि: ...१०/०४...
क्रमांक ......... नोंद दि ...

ह्या गौरव-ग्रंथात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील ५७ लेखकांचे लेख आहेत. लेखक विचारवंत आहेत. अनुभव हा त्यांचा साथी आहे. त्या सर्वांचे आभार किती मानावेत, हेच समजत नाही. भारतीय व महाराष्ट्रीय मन त्या लेखांत प्रतिबिंबित झाले आहे. लेखकांत तत्त्वज्ञ आहेत, राजकारणी पुरुष आहेत, आध्यात्मिक विचारवंत आहेत, आश्रमीय जीवनाचे परिचित आहेत, समाजवाद, लोकशाही, सत्याग्रह वगैरेंचे पुरस्कर्ते आहेत, विचारांना चालना देणारे साहित्यिक आहेत. काहींनी हृदय हलविणाऱ्या आठवणी सांगितल्या आहेत, काहींनी इतिहासकथन केले आहे. गांधींच्या जीवनातले सर्व पैलू लेखकांच्या लेखणीतून दृग्गोचर झाले आहेत.

आम्ही ज्यांना ज्यांना पत्रे लिहिली, त्यांनी त्यांनी लेख पाठविले. पण काहीजणांच्या बाबतीत आमची निराशा झाली. त्यांनी प्रामाणिकपणे लेख पाठविण्याचे कबूल केले; पण कामाच्या दडपणामुळे त्यांचा नाइलाज झाला, हे आम्हांला ठाऊक आहे. त्यांचा आमच्यावर किंवा आमचा त्यांच्यावर राग नाही.

हा गौरव-ग्रंथ मराठी वाङ्मयांत दीर्घकाल टिकेल अशी आशा आहे. त्यात गांधींचाच गौरव नसून लेखकांचा व जनतेचाही गौरव आहे.

'विश्वकर्मा मुद्रणालयाचे' चालक श्री. वि. ग. माटे यांनी, कामाची निकड असूनही, हा प्रचंड ग्रंथ लवकरात लवकर, सुबक रीतीने तयार करून दिला, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहो. श्री. ताटके यांनी मुखपृष्ठ चांगले तयार केले, याबद्दल त्यांचेही आभारी आहो.

या ग्रंथाची किंमत नाइलाजाने १५ रुपये ठेवावी लागली. जर जाहिरातींचा आश्रय घेतला असता, तर किंमत कमी करता आली असती. पण गांधी हे जाहिरातींच्या विरुद्ध होते; त्यांची शिकवण आम्ही पाळली आहे, यात संतोष आहे.

आमची जनतेला विनंती आहे की, तिने हा ग्रंथ संग्रही ठेवावा, वाचावा, वाचून दाखवावा व चिंतन करून आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा.

**त्र्यं. र. देवगिरीकर**
अध्यक्ष, गांधी स्मारक निधी
महाराष्ट्र, पुणे ४.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ माझे जीवन | म. गांधी | १ |
| २ गांधी-गौरवाची मीमांसा | लो. बा. गं. टिळक | ३ |
| ३ गांधीजींची महत्ता | आचार्य विनोबा भावे | १० |
| ४ गांधीजींचा जीवन-मार्ग | आचार्य कालेलकर | १२ |
| ५ गांधीजी व मानवाचे भवितव्य | ना. मोरारजी देसाई | २५ |
| ६ सर्वांभूती समभाव | रंगराव दिवाकर | ३१ |
| ७ गांधीधर्म—सत्याग्रह | डॉ. भवानीशंकर नियोगी | ३५ |
| ८ सत्यनिष्ठ "प्रयोगी" गांधीजी | आचार्य दादा धर्माधिकारी | ४७ |
| ९ कस्तुरबा स्मारक—नवसंस्करण | शंकरराव देव | ५२ |
| १० अहिंसेचा विकास | उ. न. ढेबर | ५६ |
| ११ बापूंचे पुण्यस्मरण | श्रीमन्नारायण | ६३ |
| १२ गांधी-युग व गांधी-युगांत | पु. ल. देशपांडे | ७० |
| १३ पौरस्त्य व पाश्चात्य संस्कृती | डॉ. रा. ना. दांडेकर | ९० |
| १४ गूढवादी म. गांधी | के. एम्. मुनशी | ११५ |
| १५ गांधीजी—संत आणि मुत्सद्दी | के. के. शहा | १२३ |
| १६ महात्मा गांधी व महाराष्ट्र | यशवंतराव चव्हाण | १२८ |
| १७ विश्व-शांतीचे तत्त्वज्ञान | स्वामी रामानंदतीर्थ | १३५ |
| १८ शांतिप्रवण भारत व म. गांधी | म. म. द. वा. पोतदार | १३९ |
| १९ अहिंसा व जागतिक शांतता | पां वा. गाडगीळ | १४६ |
| २० क्रांति-दर्शन : मार्क्सचे व गांधींचे | ना. ग. गोरे | १५४ |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | मार्क्सवाद व गांधीवाद | प्रा. दि. ब. केरूर | १६२ |
| २२ | गांधीजींच्या पाच निष्ठा | बाळकोबा भावे | १७४ |
| २३ | गांधीजींची आध्यात्मिक घडण | बाळूभाई मेहता | १८० |
| २४ | व्रतांचे व आश्रमांचे अधिष्ठान | मामा क्षीरसागर | १९० |
| २५ | गांधी–एक युगमुद्रा | बाबा आमटे | २०३ |
| २६ | अशांत मनाचे गांधीजी | दि. के. बेडेकर | २१० |
| २७ | गांधीजींची लोकशाहीची कल्पना | अच्युतभाई देशपांडे | २१५ |
| २८ | सर्वांगीण क्रांतीचे अग्रदूत | नरेन्द्र तिडके | २२५ |
| २९ | अहिंसा व लोकशाहीची मूल्ये | प्रा. डॉ. इंदु टिकेकर | २३० |
| ३० | सत्याग्रह-सामान्यांचे प्रभावी अस्त्र | द. का. कुंटे | २३४ |
| ३१ | सत्याग्रही लढ्यांचे स्वरूप व प्रयोग | ग. स. आळतेकर | २४२ |
| ३२ | जीवनातील आशास्थान | प्रेमा कंटक | २४९ |
| ३३ | गांधीजींची जीवन-मूल्ये | वि. स. पागे | २५५ |
| ३४ | म. गांधींची सर्वांगीण क्रांती | दा. न. शिखरे | २६१ |
| ३५ | गांधीजींचे शिक्षण-विचार | ए. रा. धोंगडे | २६६ |
| ३६ | मूलोद्योग शिक्षण–पुनर्मूल्यांकन | ग. वि. अकोलकर | २७५ |
| ३७ | स्त्री-शिक्षणांतील क्रांती | श्रीमती प्रेमलीला ठाकरसी | २८९ |
| ३८ | म. गांधी व राष्ट्रभाषा | गो. प. नेने | २९३ |
| ३९ | लो. टिळक व म. गांधी | द. कृ. गोसावी | ३०० |
| ४० | भारतीय संस्कृती आणि गांधीजी | डॉ. चिं. ग. काशीकर | ३०६ |
| ४१ | जागतिक राजकारण व गांधींची अहिंसा | अप्पासाहेब पंत | ३१५ |
| ४२ | गांधीजींचा वारसा | प्रा. प्र. रा. दामले | ३२२ |
| ४३ | पत्रकार गांधीजी | त्र्यं. वि. पर्वते | ३३१ |
| ४४ | गांधीजींची विश्वस्त-कल्पना | रिषभदास राका | ३४६ |
| ४५ | ग्रंथकार गांधींचे अलौकिकत्व | आचार्य भागवत | ३५० |
| ४६ | ग्रामोद्योगाचे भवितव्य | दीनदयाळ गुप्ता | ३५५ |
| ४७ | गांधीजी व ग्रामोद्योग | सौ. सावित्रीबाई मदन | ३६२ |
| ४८ | गांधीजींची आरोग्यविषयक दृष्टी | डॉ. रा. वि. साठ्ये | ३६७ |
| ४९ | गांधीजींची सूक्ष्म अहिंसा | शरयू धोत्रे | ३७६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | कुष्ठकार्याला चालना | डॉ. रा. वि. वारदेकर | ३८० |
| ५१ | गांधीजींचे रामराज्य | मनोहर दिवाण | ३८७ |
| ५२ | खिरस्ती मिशनरी व गांधीजी | प्राचार्य जे. डब्ल्यू. आयरन | ३९५ |
| ५३ | "ईश्वर अल्ला तेरे नाम" | भाई धोत्रे | ४०० |
| ५४ | गांधीजी आणि सामाजिक धर्मबुद्धी | वि. स. खांडेकर | ४०५ |
| ५५ | खादी-एक नवी जीवन-पद्धती | कमलनयन बजाज | ४११ |
| ५६ | प्रेमाने जिंकण्याचा महान प्रयोग | नारायणराव कुलकर्णी | ४२० |
| ५७ | गांधीजींचे अर्थशास्त्र | रा. कृ. पाटील | ४२७ |

# म. गांधी-गौरव-ग्रंथ

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
क्र. ९६३९८

१

# माझे जीवन

## - म. गांधी

मी भारताचा आणि मानवतेचा नम्र सेवक असल्याचा दावा करतो. अशी सेवा करीत असतानाच मला मरण आले, तर मला बरे वाटेल.

सत्याहून भिन्न असा कोणी परमेश्वर आहे, असा माझा अनुभव नाही. सत्यमय होण्यासाठी अहिंसा हाच एक मार्ग आहे. माझी अहिंसा सच्ची असली तरी कच्ची आहे– अपुरी आहे. मला सत्याचे जे काही अल्पसे दर्शन झाले आहे, ते म्हणजे सत्याच्या फक्त एका किरणाचेच दर्शन होय. सहस्त्रसूर्य एकवटले तरी त्यांना सत्याच्या तेजाची सर येणार नाही. त्यांचे संपूर्ण दर्शन संपूर्ण अहिंसेविना अशक्य आहे. एवढे मी, माझ्या आजपर्यंतच्या प्रयोगानंतर, निश्चित सांगू शकतो.

या दुनियेत मी एकच हुकूमशहा मानलेला आहे–आणि तो म्हणजे माझा "आतला आवाज." एकटा एक राहण्याची पाळी माझ्यावर आली तरी, तसे राहण्याचे धैर्य माझ्या अंगी आहे असे मला वाटते. एकतंत्री कारभाराचा मी तिटकारा करतो. माझ्या स्वातंत्र्याला मी जितके महत्त्व देतो, तितकेच दुसऱ्याच्या स्वातंत्र्यालाही देतो. ज्याच्या बुद्धीला माझी हाक जाऊन पोचत नसेल, अशा एकाही माणसाला माझ्याबरोबर नेण्याची मला इच्छा नाही. मी स्वतः अंतःप्रेरणेने आणि संस्कारांनी लोकशाहीवादी आहे, असा माझा दावा आहे.

अखिल मानव–जातीशी ऐक्य साधल्याविना मी आध्यात्मिक जीवन घालवू शकत नाही. आणि त्यामुळेच मला राजकारणात भाग घ्यावा लागला. माझ्या दृष्टीने धर्महीन राजकारण म्हणजे केवळ चिखल; तो

टाळला पाहिजे. राजकीय सत्ता हे काही परम साध्य नव्हे– लोकांना आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील स्थिती सुधारण्याचे ते एक साधन आहे. मी राजकारणात भाग घेताना दिसतो ह्याचे कारण इतकेच की, सापाच्या वेटोळ्याप्रमाणे राजकारणाने आजकाल आपल्याला वेढून टाकले आहे, आणि ते इतके करकचून की, त्यातून सुटण्याचा आपण कितीही प्रयत्न केला, तरी सुटका अशक्य होते. म्हणून त्या सापाशी झुंज खेळण्याची मला इच्छा आहे. राजकीय कार्यापेक्षा माझे सामाजिक कार्य कोणत्याही प्रकारे कमी दर्जाचे व कमी प्रमाणाचे नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, राजकारणाचे सहाय घेतल्याशिवाय माझे समाज–सुधारणेचे कार्य फारसे पुढे जाऊच शकत नाही असे मला आढळून आले–आणि म्हणून मी राजकारणात उतरतो–आणि तेही समाज–सुधारणेला पोषक ठरेल, इतक्या प्रमाणातच.

'गांधीवाद' नावाची कोणत्याही प्रकारची वस्तू नाही आणि माझ्या पाठीमागे कोणताही असा पंथ चालू व्हावा, अशी माझी इच्छा नाही. मी एखादे नवे तत्त्व किंवा एखादा नवा सिद्धान्त शोधून काढला, असा दावाही मला करावयाचा नाही. सत्य आणि अहिंसा पर्वताप्रमाणे प्राचीन आहेत. मी जर काही केले असेल, तर या दोन्ही बाबतीत व्यापक प्रमाणात प्रयोग करण्याचे प्रयत्न करून पाहिले.

माझ्या शूराची अहिंसा आहे का? माझा मृत्यूच ते दाखवून देईल मला जर कोणी ठार केले आणि मरताना माझ्या ओठावर माझ्या मारेकऱ्यासाठी मी परमेश्वराजवळ भाकलेली करुणा आणि परमेश्वराचे नामस्मरण असले, तरच माझ्यात शूराची अहिंसा होती, असे म्हणता येईल.

मला जे करावयाचे आहे, ज्याच्यासाठी आज तीस वर्षे माझी धडपड चालली आहे, ते आत्मदर्शन–ईश्वराचा साक्षात्कार–मोक्ष हेच होय. माझी सर्व हालचाल याच दृष्टीने होत असते, माझे सर्व लिखाण याच दृष्टीने चालते आणि राजकीय चळवळीतही मी मनोभावाने पडतो, तेही याच साठी.

२

# गांधी-गौरवाची मीमांसा

## लो. बा. गं. टिळक

लोकमान्य टिळक १९१८ साली इंग्लडला शिष्टमंडळ घेऊन निघाले असताना त्यांनी लिहिलेला लेख पुढे दिला आहे. मुंबईच्या सौ. अवंतिकाबाई गोखले यांनी गांधीजींचे जे मराठी चरित्र लिहिले, त्याला प्रस्तावना म्हणून लो. टिळकांनी हा लेख पुणे येथे ता. १६ मार्च १९१८ रोजी लिहिला आहे. सध्या हे चरित्र–आणि म्हणून हा लेख–दुर्मिळ आहे. या चरित्रग्रंथाचें पुनर्मुद्रण भारत सरकार करणार असल्याचें कळतें. या लेखात गांधीजींच्या माहात्म्याची मूलगामी मीमांसा लोकमान्यांनी केलेली आहे.

गेल्या साली म्हणजे १९१७ च्या डिसेंबर महिन्यात कलकत्त्यास काँग्रेस सभेस गेलो असताना तेथे सौ. अवंतिकाबाई गोखले ह्यांनी आपण महात्मा गांधींचे चरित्र लिहीत असल्याचे मला कळविले व त्यास प्रस्तावना लिहिण्यास मला विनंती केली. ही विनंती अर्थातच मला अमान्य करवेना. पण त्या वेळी हे पुस्तक इतक्या लौकर तयार होईल अशी मला कल्पना नव्हती. विशेषत: मी विलायतेस जाण्यास निघालो असता, त्या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचे काम घाईघाईने उरकावे लागेल असे तर मुळीच वाटले नव्हते. पण आता तशी स्थिती आल्यामुळे ही प्रस्तावना कशीवशी तरी पुरी करावी लागत आहे. महात्मा

गांधींच्या चरित्रास प्रस्तावना लिहिण्यास अधिक चांगली वेळ व फुरसत पाहिजे होती. ती मिळाली नाही याबद्दल मला वाईट वाटते. तथापि "अकरणान्मंदकरणं श्रेयः" ह्या न्यायाने मी ते काम करीत आहे. आणि या ग्रंथाचे वाचक वरील हकीकत लक्षात आणून त्याबद्दल मला माफी करतील अशी आशा आहे.

महात्मा गांधी यांचे नांव हिंदुस्थानात कोणास माहिती नाही असे नाही. अर्थात् त्यांच्याबद्दल थोडीबहुत माहिती करून घेण्याची इच्छाही सर्व लोकांस झालेली आहे असे म्हटले तरी चालेल. परंतु ही इच्छा पूर्ण होण्यास मराठी भाषेत आजपर्यन्त कोणताच ग्रंथ झालेला नव्हता. ती उणीव सौ. अवंतिकाबाई यांनी प्रस्तुतचा सोपा ग्रंथ लिहून भरून काढली याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करितो. सौ. अवंतिकाबाई म्हणतात त्याप्रमाणे, महात्मा गांधी यांचे चरित्र अद्याप वाढते आहे. आणि ह्याच विषयावर नवा ग्रंथ लिहिणारास दरवर्षी नवीन माहिती मिळण्यासारखी आहे. म्हणून हल्लींच्या ग्रंथाने पुढील लेखकांस कोणत्याही प्रकारचा अडथळा न येता, उलट त्या कार्याची प्रस्तावना करून, ह्या कट्टया देशभक्ताच्या चरित्राची महाराष्ट्र-वाचकांस ओळख करून देण्याची कामगिरी बजावल्याचे श्रेय मात्र सौ. अवंतिकाबाईस मिळणार आहे. सौ. अवंतिकाबाई ह्या हल्ली चंपारण्यात महात्मा गांधी ह्यांस मदत करण्यासाठी व त्यांच्या हाताखाली राहून काम करण्यासाठी गेलेल्या आहेत. तेव्हा केवळ पुस्तकावरूनच नव्हे, तर प्रत्यक्ष अवलोकनानेही त्यांच्या चरित्र-नायकाचे विचार, आचार, स्वभाव, राहणी, अनेक विषयांवरील त्यांची मते, त्यांच्या कुटुंबातील माणसांशी किंवा इतरांशी त्यांचे वर्तन, यांचा त्यांना पुरा परिचय झालेला आहे. ग्रंथ लिहिण्याच्या कामी ह्या प्रत्यक्ष अवलोकनाचा पुष्कळ उपयोग झालेला आहे असे वाचकांस सहज दिसून येईल.

महात्मा गांधी यांचे चरित्र बोधप्रद आणि अनुकरणीय का व्हावे याची कारणे शोधून काढण्यास, माझ्या मते, फारसे परिश्रम नको आहेत. गांधी हे ज्याप्रमाणे विलायतेहून बॅरिस्टरची परीक्षा पास होऊन आलेले आहेत, त्याप्रमाणे बॅरिस्टर झालेले पुष्कळ लोक आहेत. त्यांचे वडील दिवाणगिरीच्या कामावर होते तसेही पुष्कळांचे असतील. किंवा ह्यांचा स्वभाव जरा साधा व सरळ आहे तसा इतरांचाही असेल. त्यात काही विशेष नाही. इंग्रजी विद्येचा ह्या देशात प्रचार झाल्यापासून निष्णात पुष्कळ लोक हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेले आहेत. जगाचा इतिहास किंवा भूगोल सांगोपांग माहीत असणे, अथवा एखाद्या शास्त्रीय विषयावरील माहिती बिनचूक सांगणे, ही कामे केवळ बुद्धिगम्य असल्यामुळे ती आमच्यापैकी पुष्कळ बुद्धिवान् लोकांनी गेल्या शेदीडशे वर्षांत उत्तम रीतीने करून दाखविली आहेत. तसेच पाश्चात्य विचार, पाश्चात्य सामाजिक पद्धती, पाश्चात्य समजुती किंवा समाजरचना इत्यादी गोष्टींबद्दलही बौद्धिक किंवा तार्किक विचार

करण्यात आमच्या सुशिक्षित वर्गाने आपली बुद्धिमत्ता चांगल्या प्रकारे व्यक्त केली आहे. परंतु शील किंवा चारित्र्य—ज्यामुळे या कर्ममय भूमीत मनुष्याची सभोवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालू शकते, आणि ज्यामुळे निरनिराळ्या गोष्टींबद्दल केलेल्या प्रयत्नांस सिद्धी प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न होतो ते शील व चारित्र्य—ज्या उदाहरणावरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनाला येईल, अशी चरित्रे आमच्याकडे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात. गांधींच्या चरित्राचे जे काही वैशिष्टय आहे ते हेच होय. त्यांच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय किंवा इतर मतांपैकी काही मते कितीएकांस कदाचित् पसंत होणार नाहीत. विद्वत्तेने त्यांना मागे टाकणारे दुसरे पुष्कळ गृहस्थ असतील, पण शीलचारित्र्याची जी महती वर सांगितली त्या दृष्टीने विचार केला असता महात्मा गांधी यांचे चरित्र खरोखरच सामान्य मनुष्यास आदर्शभूत होण्यासारखे आहे, ह्याबद्दल काही मतभेद असेल किंवा होईल असे आम्हास वाटत नाही. आणि म्हणूनच मराठी भाषेत झालेल्या ह्यांच्या प्रस्तुतच्या चरित्राचा महाराष्ट्रातील लोकांनी नीट अभ्यास करावा अशी आमची त्यांस शिफारस आहे.

हिंदुस्थानातील लोक, मग ते हिंदुस्थानात रहाणारे असोत किंवा इंग्रजी साम्राज्याच्या इतर भागात राहणारे असोत, चोहोकडे विपन्न स्थितीत आहेत याबद्दल काही शंका नाही. तसेच ही विपन्नावस्था का आली, पूर्वीच्या स्थितीत कोणते अंतर पडले, हे अंतर न पडण्यास काय केले पाहिजे, इत्यादी गोष्टींची पुष्कळ चर्चा झाली असल्यामुळे त्याबद्दल या लहानशा प्रस्तावनेत आम्ही काही लिहू इच्छीत नाही- किंबहुना महात्मा गांधी यांच्या चरित्रापासून जो बोध घ्यावयाचा त्याचा हा महत्वाचा भाग नाही अशी आमची समजूत आहे. व्यक्तीच्या संसारात काय, किंवा देशाच्या संसारात काय, परिस्थिती ही प्रायः पूर्वपिढीच्या किंवा पूर्वकालीन कर्माच्या परिपाकाने निर्माण झालेली असते. ही स्थिती वाईट असल्यास त्याचा दोष त्या स्थितीत राहणाऱ्या मनुष्याकडे देता येत नाही, हे खरे आहे. पण ती जर वाईट असेल तर तिच्या कारणांचा योग्य ऊहापोह करून व ती दूर करण्यास कोणते उपाय केले पाहिजेत, ह्याचा शक्य तितका खोल विचारांती निर्णय करून तो निर्णय अंमलात आणण्याचे काम, म्हणजे अर्थात् ती स्थिती सुधारण्याचे काम, जर सदर स्थितीत सापडलेला पुरुष, विशेषतः देशातील कर्ता पुरुष करणार नाही, तर मात्र तो आपल्या कर्तव्यास जागला नाही असे म्हणावे लागेल. कारण परिस्थिती उत्पन्न होण्यास जरी आपण कारणीभूत नसलो, तरी ती सुधारण्यास आपल्या हातून शक्य तेवढे प्रयत्न करणे, हे प्रत्येक मनुष्याचे व्यक्तिदृष्ट्या आणि सार्वजनिक दृष्ट्या कर्तव्य आहे, पवित्र कर्तव्य आहे, असा शास्त्राचा आणि धर्माचाही सिद्धांत आहे. ज्या योगाने जगाचे धारणपोषण होते त्याला धर्म असे म्हणतात, आणि जगाचे धारण-पोषण म्हटले म्हणजे त्यांत सद्य:कालीन परिस्थिती सुधारून ज्यायोगे ती परिस्थिती

वरच्या पायरीला जाऊन अखेर पूर्णावस्थेला पोचेल त्या त्या सर्व गोष्टी करण, करविणे, स्वत: करणे आणि लोकांकडून करविणे याचा प्राधान्येकरून समावेश होतो. आपला जन्म कोणत्याही देशात झालेला असो, तो केवळ आपण त्या देशातील अन्न खाऊन आमरणांत आपल्या वायकामुलांसह चैनीत राहण्यासाठी नाही, यापेक्षा काही तरी उच्चतर ध्येय सिद्ध करण्याकरिता आहे, ही गोष्ट शास्त्रकार आणि धर्मकार या दोहोंसही पूर्णपणे मान्य आहे. या उच्चतर ध्येयाची मर्यादा इतकी श्रेष्ठ आहे की, मनुष्य या मार्गाने जाता जाता अखेर त्याला ह्या जगाचे पालनपोषण करणाऱ्या परमेश्वराचे तादात्म्य प्राप्त होते, म्हणजे तो देवपणा पावतो, असे शास्त्रांतून वर्णन आहे. परंतु शास्त्र आणि धर्म या दोहोंच्याही आज्ञा जरी अशा प्रकारच्या आहेत तरी ह्या ध्येयाकडे आमच्या देशांतील लोकांचे जितके लक्ष लागावे तितके लागले नव्हते, असे मोठ्या दु:खाने म्हणावे लागते. एरवी सध्याची परिस्थितीच उत्पन्न झाली नसती. पण पूर्वकाली ह्या गोष्टीकडे देशांतील कर्त्या पुरुषांचे जावे तितके लक्ष गेले नाही म्हणून प्रस्तुत काली आम्हीही तो मार्ग स्वीकारू नये असे होत नाही. देशाच्या उन्नतीसाठी जे काही प्रयत्न करावयाचे त्याला कालाची काही विशिष्ट मर्यादा असते असे नाही. पूर्वीच्यांनी असे प्रयत्न केले नसले तर पुढच्या लोकांनी करू नयेत असे नाही, आज केले नाहीत तर उद्या करू नयेत असे नाही आणि उद्या केले नाहीत तर परवा करू नयेत असेही होत नाही. अशा तऱ्हेचे प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे. आणि ही कर्तव्यजागृती ज्याच्या ज्याच्या मनात ज्या ज्या क्षणी होईल, त्या त्या क्षणी त्याने हे आपले कर्तव्य वजावण्यास, निरलसपणे स्वार्थत्याग करून आणि आपणांवर किंवा आपल्या कुटुंबांवर संकटे येणार किंवा येतील याची पर्वा न करता, परमेश्वरावर भरवसा ठेवून, निष्कामबुद्धीने लागले पाहिजे, हा ह्यांतील सारभूत सिद्धांत आहे. म. गांधींच्या चरित्रावरून जो काही बोध घ्यावयाचा, त्यापैकी मुख्य बोध हा होय.

अलीकडे दुसरी एक अशी समजूत होत चालली आहे की, हिंदुस्थान देशाची स्थिती सुधारण्यास प्रथमत: हिंदी समाजाची स्थिती सुधारली पाहिजे आणि ही सुधारेल तेव्हा मग पुढे राजकीय गोष्टींचा विचार करण्याची वेळ येईल. महात्मा गांधी यांच्या चरित्रावरून वरील मत किती अयथार्थ आहे हे वाचकांस सहज कळून येणार आहे. देशांतील सर्व काही सुधारणा घडवून आणण्यास "सर्वारंभास्तण्डुला: प्रस्थमूला:" या न्यायाने त्या देशातील सत्ता, पूर्ण नाही तरी बऱ्याच अंशाने, देशांतील कर्त्या आणि विचारी पुरुषांच्या हातात असावी लागते. सत्तेशिवाय शहाणपण फुकट जाते इतकेच नव्हे तर कर्तृत्वही निर्माल्यवत् होते. म्हणून देशाची स्थिती सुधारण्याचे, जे प्रयत्न करावयाचे ते विशेषेकरून प्रथमत: ह्या सर्व सुधारणांना अवश्य लागणाऱ्या मूलभूत बाबतीतच झाले पाहिजेत. महात्मा गांधींचे असे मत नसते तर ते राजकीय

सुधारणेत बिलकुल पडले नसते. आफ्रिकेतील वसाहतीत गेलेल्या हिंदी मजुरांच्या कल्याणार्थ त्यांनी जे प्रयत्न केले ते केवळ सामाजिकच होते असे नाही. आफ्रिकेतील जुलमी राज्यव्यवस्थेमुळेच तेथील हिंदी मजुरांवर हा प्रसंग ओढवलेला होता असे म्हटले तरी चालेल. ह्याचा गांधी यांच्या मनावर स्वभावतःच असा परिणाम झाला कीं, राज्यव्यवस्थेत सुधारणा झाल्याखेरीज आफ्रिकेतील हिंदी लोकांची स्थिति सुधारावयाची नाही. इंग्रजी साम्राज्याचे जर आम्ही भागीदार आहो तर ह्या साम्राज्यात गोऱ्या प्रजेस जे हक्क आहेत तेच हिंदी प्रजेसही असले पाहिजेत, हे न्यायदृष्टया अगदी उघड आहे. पण गोऱ्या लोकांच्या आज ज्या वसाहती झालेल्या आहेत त्या वसाहतवाल्यांनी केवळ आपल्याच फायद्याकरिता केल्या अशी स्वार्थमूलक समजूत असल्यामुळे साम्राज्याच्या इतर भागांतील लोकांस समबुद्धीने वागविण्यास ते तयार नाहीत. तथापि बाहेरच्या देशांतील लोक त्यांस अगदीच नको आहेत असेही नाही. कारण वसाहतींत नवीन किंवा खनिज द्रव्ये मुवलक असून ह्या संपत्तीचा पूर्ण उपयोग करण्यास वसाहतवाल्यांजवळ पुरेसे मनुष्यबळ नाही. हजारपाचशे किंवा दोनचार हजार गोरे वसाहतवाले दोहोंच्या ऐवजी चारचार हातांनी जरी काम करू लागले किंवा सहस्र बाहूंच्या शक्तीची कितीहीं यंत्रे त्यांनी उपयोगात आणिली, तरी वसाहतीतल्या मुलुखापासून द्रव्यदृष्टया जितका फायदा होणे शक्य होतें किंवा आहे, त्याच्या शतांशदेखील फायदा ह्या वसाहतवाल्यांस होणार नाही. तेव्हा आफ्रिकेत मागे नीग्रो लोकांस ज्याप्रमाणे ते वागवीत, त्याचप्रमाणे हिंदुस्थानांतील काळया लोकांस मजूर म्हणून तेथे नेऊन केवळ पशूंप्रमाणे त्यांस वागविणेची आणि त्यांच्या उद्योगावर आपण समृद्ध होण्याची वसाहतवाल्यांनी कल्पना काढली आणि आमच्या हिंदुस्थानांतील नोकरशाही वसाहतवाल्यांच्या बांधवांचीच असल्यामुळे वसाहतींतील हिंदी मजुरांच्या शोचनीय स्थितीकडे हिंदुस्थान सरकारचे लक्ष गेले नाही.

ही शोचनीय स्थितीं हिंदुस्थानांतील पुढारी लोकांच्या लक्षात येऊन गेल्यास पुष्कळ वर्षे झाली. पण गांधींसारखे पुरुष येईपर्यंत तिचे अल्प देखील निवारण झाले नाही. समजले होते पण उमजले नव्हते आणि उमजले तरी करवत नव्हते, असा प्रकार होता. या कुचंब्यातून लोकांना बाहेर काढून गांधींनी आपल्या उदाहरणाने सुधारणेचा मार्ग दाखविला, असे पुढील चरित्रावरून कोणासही कळून येईल. आफ्रिकेतील हिंदी लोकांस त्यांच्या विपन्नावस्थेतून सोडविण्यास गांधी यांनी काय केले याचेही जरा सूक्ष्म रीत्या अवलोकन केले पाहिजे एकाद्या ठिकाणची राज्यव्यवस्था अन्यायाची असली तरी ती सुधारण्याचा प्रयत्न करणे हा काही न्यायदृष्टया राजद्रोह होऊ शकत नाही. ह्याला राजद्रोह म्हणणे हे, राज्यकर्त्यांस न्याय नको, नीती नको, अन्यायाचा प्रतिकार करावयास नको, आपल्या प्रजेस समतेचे हक्क द्यावयास नकोत, असे म्हणण्यासारखे आहे. आम्ही असे समजतो

की, प्रजेचे कल्याण हेच राज्यसत्तेचे खरे ध्येय व सामर्थ्य आहे. हा सिद्धांत एकदा पत्करला म्हणजे मग ज्या ठिकाणी अन्याय आहे तेथे त्याचा प्रतिकार करून तो दूर करणे म्हणजे एक प्रकारे राज्यसत्तेच्या ध्येयाची अमलबजावणी करण्यास मदत करणे होय, असा त्यापासून सहजच दुसरा सिद्धांत निघतो. पण पूर्वसंचितामुळे आलेले दुराग्रह अगर स्वार्थबुद्धी यामुळे प्रजाजनांपैकी काही विशिष्ट व्यक्ती, जातीं किंवा वर्ग कधी कधी इतके पछाडले जातात की, त्यांना ही न्यायाची तत्त्वे दिसेनाशी होतात; अर्थात अशा वर्गाचा इतर लोकांवर एक प्रकारे जुलूम होऊ शकतो. अशा वेळी राज्यकर्त्यांनी त्यांत एकदम हात घालून अन्यायाच्या गोष्टी बंद केल्यास ह्या दुराग्रही व स्वार्थी पण परंपरागत वजनाने प्रतिष्ठित बनलेल्या वर्गास दुखवावे लागते व त्यामुळे शांततेची चालत आलेली घडी विस्कळीत होते. यास्तव अशा प्रकारच्या स्थितीत ज्यांच्यावर जुलूम होतो त्यांच्याकडून निकराचे प्रयत्न झाल्याखेरीज राज्यकर्ते प्राय: त्यांत मन घालीत नाहीत. सारांश, चालते मूल ज्याप्रमाणे कोणीही कडेवर घेत नाहीत, ठेच लागून पडले तर गोष्ट निराळी, अशातलाच प्रकार राजकीय बावतींतही घडून येतो. जोपर्यंत राज्यकारभार चालण्यात काही अडथळा येत नाही, तोपर्यंत राज्याची सूत्रे चालविणाऱ्या लोकांनी तरी तिकडे काय म्हणून लक्ष द्यावे? मनुष्यस्वभावच असा आहे की, चालत्या गोष्टीत विनाकारण कोणी ढवळाढवळ करू इच्छीत नाही. त्यापासून दुष्परिणाम होतात असे प्रत्यक्ष अनुभवाला येईल, इतकेच नाही तर त्यामुळे अडेल, तेव्हाच कोणीही मुत्सद्दी मनुष्य त्यात सुधारणा करण्यास प्रवृत्त होत असतो, एरवी नाही. अर्थात प्रजेच्या दु:खाची किंवा गाऱ्हाण्यांची किंवा त्यावर होणाऱ्या जुलुमांची स्थिती अशा मजलेपर्यंत आणून ठेवणे आणि शेवटी राज्यकर्त्यांकडूनच ती सुधारणा घडवून आणणे हे प्रत्येक देशभक्ताचे हरएक प्रसंगी कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य गांधी यांनी उत्तम प्रकारे बजावले, त्यामुळेच ते सर्व लोकांच्या स्तुतीस व आदरास पात्र झालेले आहेत.

परंतु गांधींच्या ह्या अडवणुकीच्या मार्गाचे खरे रहस्य सांगण्यास आणखीही दोन शब्द सांगितले पाहिजेत.देशात शांतता राखण्यासाठी जे कायदे केलेले असतात, त्यांत राज्यकर्त्या अमलदारांशी दांडगाई करणे अगर त्यांचा हुकूम तोडून बंड करणे ह्या गोष्टी कितीही सद्बुद्धीने केलेल्या असल्या तरी स्वभावत:च बेकायदेशीर मानल्या जातात. अशा वेळी ज्या देशभक्तास आपली इच्छित सुधारणा कायदेशीर रीतीने अंमलात आणावयाची असेल त्याच्या मार्गात अनेक अडचणी उत्पन्न होतात. मन जळत असते, सुधारणा करण्याची उत्कट इच्छा असते, कायद्याच्या मर्यादेचे उल्लंघन करणे गैरशिस्त होय, अशी खात्री असते; पण उपाय सुचत नाही. गांधी यांनी स्वीकारलेला नि:शस्त्र प्रतिकाराचा, अडवणुकीचा किंवा त्यांच्या भाषेत बोलावयाचे तर, सत्याग्रहाचा मार्ग अशा प्रकारच्या अडचणीतच त्यांस सुचलेला असून त्यांनी अनेक

अडचणी सोसून त्या मार्गाचा अवलंब केल्यामुळे तो आता शास्त्रपूत झाला आहे. हा मार्ग सर्व प्रसंगी , सर्व काळी अवलंबिण्यासारखा असला तरी तो हरएक प्रसंगी उपयोगात आणावाच किंवा नाही अगर सर्व प्रसंगी तितकाच फलद्रूप होईल किंवा नाही हे निश्चयाने सांगणे कठीण आहे. तथापि त्या मार्गाची योग्यता मोठी आहे. हे सर्वांस कबूल करावे लागेल. राजाने केलेल्या कायद्याप्रमाणे सर्व प्रजेने वागावे म्हणूनच प्रत्येक कायद्याच्या मागे तो उल्लंघन करणारास शासन सांगितलेले असते. हे शासन प्रायः अशा प्रकारचे असते की, त्यामुळे मनुष्यमात्राची प्रवृत्ती नीतीने वागण्याकडे व्हावी. नीतीचा मार्ग सुखाचा, समाधानाचा आणि शांततेचा असतो. आणि त्या मार्गाने जाण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीत जर स्वार्थामुळे थोडी चलविचल होण्याचा संभव असला, तर हे कायद्याचे शासन ती चलविचल काढून टाकून मनुष्याची सन्मार्गाकडे असलेली स्वाभाविक निष्ठा दृढ करण्यास कारणीभूत होते. पण त्याच्या उलट स्थितीत, म्हणजे जेव्हा कायद्याने ठरविलेली मर्यादा धर्ममूलक अगर न्यायमूलक नसून केवळ कायद्यात सांगितलेल्या शासनामुळेच ती अंमलात यावी असा प्रचलित कायद्यांचा परिणाम होऊ लागतो, तेव्हा कायद्याने दिलेले शासन भोगून धर्मतत्त्वावरची किंवा न्यायतत्त्वावरची आपली सत्यनिष्ठा कसोटीला लावावी अथवा कृत्रिम कायद्यातील शासनाच्या भीतीने ईश्वरनिर्मित न्यायतत्त्वाचा अव्हेर करण्यास प्रवृत्त व्हावे असा शहाण्यासुरत्या मनुष्याच्या डोळ्यापुढेही एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. सत्यनिष्ठ माणसे कायद्याचा कृत्रिम निर्बंध पाळणे अशा वेळी युक्त नाही असे सांगतात. पण हे सांगणे अमलात येण्यास सत्यावरील निष्ठा इतकी तीव्र असावी लागते की, स्वतःच्या किंवा आपल्या वायकामुलांच्या सुखासुखाचा, बलाबलतेचा विचारही मनात न आणता मनुष्य आपले कर्तव्य करण्यास झटदिशी प्रवृत्त होईल. ज्याला मानसिक धैर्य, खरी सत्यनिष्ठा किंवा सात्त्विक शील आणि दानत म्हणतात ते हेच होय. हा गुण केवळ विद्वत्तेने येत नाही, केवळ चांगल्या कुलात उत्पन्न झाल्याने येत नाही, आणि केवळ बुद्धिमत्तेनेही येत नाही. खरे आत्मबल हेच होय. आणि उपनिषदांतील "नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन'' हे तत्त्व नीट लक्षात ठेवले पाहिजे.

पण अशा प्रकारचे आत्मबल नुसत्या विद्वत्तेने अगर बुद्धिमत्तेने प्राप्त होण्यासारखे नसून ते नैसर्गिकच पाहिजे,हा सिद्धांत जरी खरा असला तरी,निश्चयी मनुष्यास हा गुण, गीतेत म्हटल्याप्रमाणे,अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगाने,क्रमाक्रमाने नेहमीच प्राप्त होण्यासारखा असतो, हेही विसरता कामा नये. थोर व उदार पुरुषांची चरित्रे शील-चरित्र-वर्धनास उपयोगी पडतात, यातील बीज हेच होय.

३

# गांधीजींची महत्ता

## आचार्य विनोबा भावे

गांधीजींचे निर्याण झाल्यानंतर आचार्य विनोबाजींनी तेरा दिवस त्यांच्यासंबंधी जी भाषणे केली, त्यांतील काही प्रस्तुत भाग येथे दिला आहे.

ईश्वराने या जगात नेहमी सत्पुरुषांची मालिका पाठविली, ही त्याची अपार कृपा आहे. एक गेला की त्याच्या पाठोपाठ दुसरा येतो आणि जो येतो तो आधी आलेल्याला मागे टाकून पुढे जातो. असाच एक महापुरुष आला आणि गेला आणि आम्हांला वारस बनवून गेला. पित्याच्या इस्टेटीचे वारस तर त्यांची मुले, काही न करता, केवळ जन्म घेण्याच्या हक्कानेच, होऊन जातात. परंतु आपल्याला मिळालेल्या इस्टेटीचे आपण खरे वारस होण्यासाठी आपल्याला महान प्रयत्न करावा लागेल. सर्व संतांनी आपल्याला तीन प्रकारची शिकवण दिली. पहिली शिकवण ही की, आपल्या शेजाऱ्यांवर प्रेम करा. दुसरी ही की, जे स्वतःला तुमचे शत्रु म्हणवीत असतील त्यांच्यावर प्रेम करा. आणि तिसरी शिकवण ही की, वैष्णवांवर, सज्जनांवर, भक्तांवर प्रेम करा. आणि या तिन्ही शिकवणींसाठी आपण आत्म्यावर प्रेम करण्यास शिकणे जरूर आहे. जो म्हणून भेटायला आला, दर्शन द्यायला आला, तो परमात्म-स्वरूपच आहे अशी भावना व्यवहारात सतत ठेवावी. या शेवटच्या वस्तूशिवाय संतांच्या शिकवणीचे पालन नीट होणार नाही.

गांधीजींच्या मागे आपले मार्गदर्शक चौकीदार म्हणजे आमची एकादश व्रते आहेत. गांधीजी असतानाही हेच आपले चौकीदार होते. सर्वत्र परमेश्वर पाहण्याचा जर प्रयत्न केला तर सत्य स्वयंसिद्धच होते. मग लपविण्याजोगे काही उरतच नाही. तसेच, हिंसा, क्रोध वगैरे अशक्य होतील. सगळीकडे जर परमेश्वरच आहे, तर आपण हिंसा कोणाची करणार? कोणावर रागावणार ? मग कसल्याही विकाराला किंवा पापबुद्धीला अवकाशच राहत नाही. "जहाँ जहाँ देख धरे धनुवाना" असे तुलसीदासजींचे वचन आहे. म्हणजे सर्वत्र धनुर्धारी रामचंद्र जागृत आहे असे भक्त पाहतो. मग त्या धनुष्यबाणांपुढे चित्तांत काही विकारच टिकू शकत नाहीत.

या व्रतांच्या पालनासाठी आपल्याला स्वतंत्र प्रयत्न केला पाहिजे. कारण आपल्या विकारांना जर ओळखलेच नाही तर कसे होणार ? म्हणून बारकाईने चित्त तपासले पाहिजे. चित्तात विकार कितपत राहिले त्यावरून आपली सर्वत्र प्रभु-भावना झाली की नाही ते कळून येते. याचसाठी आपण हे अकरा चौकीदार ठेवले आहेत. ज्या अर्थी व्रतांच्या नावाने आश्रम चालतो, त्या अर्थी जग हीच अपेक्षा राखील की, आश्रमात इतर काही असो वा नसो, पण या व्रतांच्या पालनाचा पूर्ण प्रयत्न तर असलाच पाहिजे. इथे येणारे दर्शक पुष्कळसे श्रद्धेनेच येणार. ते विचारे आमची काय परीक्षा करणार ? परंतु आमच्या व्रतपालनाचा सूक्ष्म परिणाम येथील हवेत पसरेल व प्रत्येकाला त्याचा स्पर्श होईल असे असले पाहिजे. म्हणून आपण जागृत राहिले पाहिजे व येथील ( म्हणजे आपल्या चित्तातील ) वातावरण पूर्ण शांत ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

येथे कोणत्याही प्रकारे कठोर वचन बोलले जाऊ नये. मिथ्या भाषण तर राहोच, पण मिथ्या विचारही असता कामा नये. दुसऱ्याची चूक दिसतच नाही अशी मनोवृत्ती असली पाहिजे. कोणी स्वतःची चूक आपल्याला सांगत असला तर ती आपल्याला नगण्य वाटली पाहिजे आणि जगाच्या दृष्टीने छोटीशी वाटणारी आपली चूक आपल्याला डोंगराएवढी वाटली पाहिजे. आपल्या आसपास कोठे विवाद चालला असेल, तर आपल्या उपस्थितीने स्नेहनाचे काम व्हावे. यंत्रात घर्षण-स्थाने अनेक असतात, तेथे तेल दिल्याने घर्षण कमी होते, तसे आपल्या हातून व्हावे.

४

# गांधीजींचा जीवन-मार्ग

आचार्य कालेलकर.

सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य इत्यादी जुन्या व्रतांमध्ये गांधीजींनी नवा आशय कसा ओतला आणि त्यांचे पालन कसे केले, याचे विवेचन प्रस्तुत लेखात केलेले आहे, तसेच विश्वस्तपणाच्या तत्त्वाचेही विवरण त्यात आलेले आहे. गांधीजींची वर्णाश्रम-व्यवस्थेविषयी काय कल्पना होती, हे काकासाहेबांनी आपल्या-त्यांच्या प्रत्यक्ष संवादातून येथे स्पष्ट केले आहे.

आपण ज्यांना 'संत' म्हणतो त्या लोकांत किती तरी निरनिराळे प्रकार असतात! एकाच्या वृत्तीवरून, विचारावरून किंवा जीवनावरून दुसऱ्याची कल्पना करणे चुकीचे होईल. सगळेच संत खरे, पण प्रकार निरनिराळा. अशा स्थितीत सर्वांविषयी सामान्य कल्पना करणे किंवा एखादे विधान करणे फार धोक्याचे असते.

येथे आपण खऱ्या संतांचा विचार करीत आहोत. संत असण्याचा दावा करणाऱ्या भोंदू लोकांचे जगच निराळे आहे. त्यांचा विचार आपल्याला येथे कर्तव्य नाही. कित्येक लोकांना संत-जीवनाची चीड असते. त्यांना बहुतेक संत भोंदूच वाटतात आणि बाकीचे भोळसट मंदबुद्धीचे वाटतात. अशा रीतीने सर्व संतांचा निकाल लावणाऱ्या उथळ लोकांच्या दृष्टीनेही आपल्याला विचार करावयाचा नाही.

गांधी हे एक सामान्य सज्जन, सत्पुरुष; हळू हळू संत झाले. तुमच्या-आमच्या-सारखेच, सामान्य जगात वाढलेले, सामान्यपणेच जगू पाहणारे, माता-पित्याविषयी आदर, धार्मिक जीवनाविषयी आस्था आणि परंपरागत मध्यमवर्गीय संस्कृतीचे वळण एवढेच त्यांच्या वाटेल आले होते. त्यांच्यामध्ये परम-धार्मिकता असेल तर ती एवढीच की, खरेपणाने वागावे. त्यांना लहानपणापासून खोटेपणाची चीड होती. दंभ त्यांना आवडतही नव्हता आणि साधतही नव्हता. खरेपणाने वागण्याच्या प्रयत्नात थोडेबहुत सोसावे लागले तर तसे सोसण्याची त्यांची तयारी मात्र प्रथमपासून, आणि भक्कमपणे, होती. हट्टी मुलगा ज्याप्रमाणे हट्टाला पेटून वाटेल ते सहन करण्यास तयार होतो, त्याप्रमाणे जी गोष्ट स्वत:ला पटली, ती अंमलांत आणण्यासाठी वाटेल ते नुकसान सहन करण्याची आणि स्वत:वर कष्ट ओढून घेण्याची त्यांची तयारी होती. यालाच आपण उत्कट सत्यनिष्ठा म्हणू.

**सत्याग्रहाचा उगम**

गांधी-जीवन म्हणज सत्यनिष्ठेचे प्रयोग. त्यांनी आपल्या आत्मकथेला हे जे पारदर्शक नाव दिले, त्यांत गांधी-जीवनाचे सर्व रहस्य येऊन जाते. " जे मला जसे जसे पटले त्याप्रमाणेच मी वागणार. मी तरी काय करू ? मी लाचार आहे. जसे पटले तसे वागत असताना, सज्जनता आणि खरेपणा जर सोडून द्यावयाचे नाहीत, तर सहन करण्याची शक्ती परमावधीपर्यन्त पोचवलीच पाहिजे. '' हा त्यांचा बाणा.

हा आहे गांधीजींच्या सत्याग्रहाचा उगम.

यातूनच त्यांचे जीवन-तत्त्वज्ञान फलित झाले आहे. जे सत्य स्वत:ला जसे पटले त्याप्रमाणे स्वत: चालण्यावाचून गत्यंतर नाही, पण जर दुसऱ्याला दुसऱ्या रीतीने सत्य पटले असेल तर त्याला त्याप्रमाणे वागण्याचा हक्क आपण मान्य केलाच पाहिजे. ' दुसऱ्यांनी स्वत:चे सत्य माझ्यावर लादण्याचा प्रयत्न केला तर मी ते सहन करणार नाही. मी त्याला कसून विरोध करीन. ' हा जर माझा हक्क आहे, तर तसाच हक्क दुसऱ्याचादेखील आहे हे मी स्वीकारलेच पाहिजे. ' माझेच म्हणणे खरे. माझ्याशी जो सहमत होत नाही तो खोटा. ' असे मानणारे, म्हणणारे आणि त्याप्रमाणे वागणारे लोक जगात यथेच्छ आहेत. पण त्यांचा तो आडमुठेपणा आहे; आंधळेपणा आहे; त्यात दौर्जन्य आहे; हे पटावयाला जड जाऊ नये.

( व्यवहारात मनुष्याला ही गोष्ट जशी सहज पटते तशी ती धर्माच्या बाबतीत पटत नाही, हे एक मोठे आश्चर्य आणि दुर्दैव आहे. स्वार्थी आणि लबाड मनुष्य सरळपणे वागणार नाही हे खरे; पण दुसऱ्याचा हक्क त्याला पटत नाही असे सहसा होत नाही. धर्माग्रही लोक मात्र किती आडमुठे होतील याचा हिशेब काढणे कठीण. )

**अहिंसेचा व्यापक अर्थ**

दुसऱ्याच्या बाजूने विचार करण्याची सवय झाली आणि दुसऱ्याचाही विचार करण्यातच न्याय आहे हे पटले म्हणजे त्यातूनच व्यापक अहिंसेचा उदय होतो. दुसऱ्याचे दुःख पाहून कळवळा वाटणे ही अहिंसेची प्राथमिक स्थिती आहे. यातूनच जीव-दयेचा उदय होतो. कित्येक धर्मांनी जीव-दयेच्या कळवळ्यावाचूनच अहिंसेचा स्वीकार आणि प्रचार केला आहे. पण ते वर सांगितलेल्या व्यापक अहिंसेपर्यंन्त कधी कधी पोहोचलेले नसतात. सत्य-निष्ठ मनुष्याच्या शुद्ध आणि न्यायी निष्ठेतूनच व्यापक अहिंसेचा उदय झालेला असतो. आणि म्हणूनच ते सत्य आणि अहिंसा यांची सांगड घालतात. जीवदयेचा कळवळा एवढेच ज्यांच्या चारित्र्याचे भांडवल असते, त्यांना व्यापक सार्वभौम अहिंसा समजायला आणि पटायला वेळ लागतो.

आपल्या देशातील सामान्य लोकांना दुःख-कातर कळवळ्याची अहिंसाच समजलेली असते. आणि असलीच अहिंसा वापरून संतलोक जीवनांतील धकाधकीचा मामला टाळतात, असा सामान्य लोकांचा अभिप्राय असतो. आणि म्हणून गांधीजींची अहिंसा त्यांना समजत नाही. जी गोष्ट समजलीच नाही, ती पटण्याचा प्रश्नच कसा उठावा ?

स्वतःच्या उत्कट सत्यनिष्ठेमुळे दुसऱ्याच्या सत्य-निष्ठेची कदर करण्याची तयारी होणे हीच गोष्ट येथे मुख्य आहे. 'स्वतःचे सत्य सापेक्ष आहे, तरीही त्याला स्वतःच्या जीवनात जगण्याचा पूर्ण अधिकार आहे,' असे म्हटल्यानंतर दुसऱ्यालाही तसला अधिकार, त्याच्या सापेक्ष सत्याच्या बाबतीत, दिल्यावाचून गत्यंतर नाही. एवढी गोष्ट पटल्यानंतरच मनुष्य गांधींच्या अहिंसेचा विचार करू शकतो. माझ्या सत्यनिष्ठेसाठी मी सहन करणे जसे स्वाभाविक आणि योग्य आहे, तसे माझे सापेक्ष सत्य दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करणे यात खरी सत्य-निष्ठा नाही, माणुसकी नाही, ही गोष्ट पटायला वेळ लागू नये. पण तितका तटस्थपणा पुष्कळ लोकांत नसतो.

सत्य आणि अहिंसा ही दोन्ही जीवनतत्त्वे अगदी स्वतंत्र असली तरी त्यांचा परस्पर-संबंध घनिष्ठ आहे. गांधींनीच स्वतः एके ठिकाणीं ( श्री. जमनालालजींना लिहिलेल्या पत्रात असावे ) स्पष्ट केले आहे की, सत्य हे मनुष्यासाठी स्वयंभू स्वतःसिद्ध आहे, अहिंसा ही कमवावी लागते. (त्यांचे नेमके शब्द मी येथे वापरले नाहीत, भावना व्यक्त केली आहे. )

**ब्रह्मचर्याची व्याप्ती**

सत्य आणि अहिंसा या दोन तत्त्वांवर अधिकाधिक भार देऊन गांधींनी त्यांचेबरोबर आणखी दोन तत्त्वे जोडली आहेत. ती म्हणजे संयम आणि निःस्वार्थ

सेवा. गांधी-विचारांत संयमाचे अंतिम स्वरूप आहे ब्रह्मचर्य. पण गांधीजींचा ब्रह्मचर्याचा अर्थ वराच व्यापक आणि सार्वभौम आहे.

ज्याप्रमाणे गांधीजींनी 'अहिंसा' हा रूढ आणि सर्वमान्य शब्द स्वीकारून त्या शब्दात आपला विशेष आणि व्यापक अर्थ दाखल केला, त्याचप्रमाणे 'ब्रह्मचर्य' हा संस्कृतिमान्य शब्द घेऊन त्यात त्यांनी संयममूलक आपले सर्व विचार भरले आहेत.

'ब्रह्मचर्य' या शब्दाचा मूळ अर्थ अगदीच निराळा होता. ब्रह्म म्हणजे वेद. त्याचे अध्ययन सुरू करण्यासाठी उपनयन-संस्कार करीत असत. त्यानंतर वेद घोकण्यासाठी आणि त्यांचा अर्थ समजून तदनुरूप जीवन-साधना सुरू करण्यासाठी रहाणी-करणीचे जे नियम घालून दिले गेले, त्याला नाव दिले ब्रह्मचर्य. वेदाध्ययनासाठी विद्यार्थी–जीवन कसे असले पाहिजे, याची कल्पना ब्रह्मचर्य शब्दावरून होते.

हा झाला मूळ अर्थ. पण पुढे ब्रह्मचर्याचा अर्थ झाला 'लग्न होण्यापूर्वीचा विद्यार्थी–जीवनाचा काळ'. या काळात आणि या वयात काम-विकाराला मनात थारा न देणे, काम-विकाराला मनात उगवूच न देणे आणि काम-विकाराला पोषक असे जीवन टाळणे हा झाला ब्रह्मचर्याचा अर्थ.

पुढे पुढे ब्रह्मचर्याचा अर्थ कित्येक लोकांनी अगदीच ढिला करून टाकला. 'स्वयोषिति रतिः' –स्वतःच्या स्त्रीला सोडून अन्यत्र रममाण न होणे, हेही ब्रह्मचर्यच आहे, असा सोईस्कर अर्थ कित्येकांनी केला.

याच्या उलट, कित्येकांनी काम-विकाराचा संयम कसा करावयाचा, याचे नियम वाढवता वाढवता कल्पनेची पराकाष्ठा केली. ब्रह्मचाऱ्याने गुरुगृही रहावे आणि तेथे किंवा इतरत्र 'स्त्रियांकडें पाहूदेखील नये.' असे नियम केल्यानंतर कित्येक शास्त्रकार म्हणतात की, ब्रह्मचाऱ्यांनी स्त्रियांचे दर्शनसुद्धा घेता कामा नये. इतके सांगून पुढे म्हणतात, लाकडाची, मातीची किंवा दगडाची वनविलेली स्त्रीदेखील ब्रह्मचाऱ्याने वघता कामा नये. स्त्रीचा स्पर्श तर निषिद्ध आहे, पण ब्रह्मचाऱ्याने गुरूच्या घरी असताना वाहेर-गावाहून येताच गुरूचा आणि गुरुपत्नीचा चरणस्पर्श केला पाहिजे, हा नियम असला तरी गुरुपत्नी तरुण असली तर शिष्याने गुरुपत्नीच्या समोरील भूमीला स्पर्श करावा, प्रत्यक्ष पायाला हात लावू नये, ब्रह्मचाऱ्याने गाणे ऐकू नये, वगैरे वगैरे पुष्कळ नियम त्या वेळच्या धर्मनेत्यांनी केले होते. जैन लोकांनीं तर अशा नियमांचा अतिरेक केला. आपल्या लोकांना आदर्शाचे वर्णन करताना सुमारच रहात नाहीं. अतिरेक केल्यावाचून त्यांना संतोषच होत नाही. गांधींना असले अतिरेक मान्य नव्हते. सामान्य संस्कारी कुटुंबात स्त्री–पुरुष जसे खेळीमेळीनें एकत्र मिसळून रहातात, तसेच ब्रह्मचारी स्त्री-पुरुषांना रहाता आले पाहिजे. घरची कामे मिळून करणे, मिळून फिरायला जाणे वगैरे स्वाभाविक आणि संस्कारी रिवाजांना ब्रह्मचाऱ्यांनी बुजण्याचे कारण नाही.

मिळून काम करीत असताना हाताला हात लागला तर काय बिघडले ? मनुष्यांनी विकारी स्पर्श टाळावा. स्त्री-पुरुषांनी एकांतात एकमेकांच्या गाठी घेण्याचा प्रयत्न करू नये, हे बरोबर आहे. कामोत्तेजक संभाषण टाळावे, पण सामान्य विनोदाचा बहिष्कार काय म्हणून करावा ? सर्व प्रकारचा शुद्ध सामाजिक व्यवहार निर्विकारी मनाने करणे ब्रह्मचाऱ्याला काय म्हणून जड वाटावे ? नेहमीच्या संस्कारी सामाजिक जीवनात राहूनदेखील ज्याचे मन विचलित होत नाही, तोच खरा ब्रह्मचारी. हा आदर्श गांधींनी समाजापुढे ठेवला.

पण गांधीजींचा ब्रह्मचर्याचा आदर्श केवळ स्त्रीपुरुष-संबंधाइतका मर्यादित नव्हता. आवश्यकतेपेक्षा अधिक बोलणे, लिहिणे किंवा वाचणे हे देखील गांधीजींच्या मते ब्रह्मचर्याच्या विरुद्ध होते. गांधीजींनी आपल्या समृद्ध जीवनांत हजारो पत्रे लिहिली, लेख लिहिले, भाषणे केली, स्नेहाची देवघेव केली, पण त्यांनी आवश्यकतेपेक्षा एक शब्दही अधिक न वापरण्याचे व्रत कसोशीने पाळले.

व्यापक अर्थाचे हे ब्रह्मचर्य मानवी जीवनाला शुद्ध, समर्थ आणि समृद्ध करते असा गांधीजींचा विश्वास होता. ब्रह्मचर्याविषयी लिहिताना असले शब्द त्यांनी कधीही वापरले नसले, तरी त्यांची खरीखुरी कल्पनाच मी येथे, मांडली आहे यात मला शंका नाही. असल्या विषयावर अनेकदा खाजगी संभाषणात त बोलले आहेत आणि त्यांचे विचार मी विस्तारपूर्वक समजून घेतले आहेत आणि आपलेसे करण्याचा प्रयत्नही केला आहे.

त्यांचे विचार केवळ अक्षरशः समजून घेऊन आंधळेपणाने किंवा जडपणे ते वापरावेत हे त्यांना मान्य नव्हते. ते स्पष्ट शब्दांत सांगत की, "एखादी कल्पना किंवा नीती तुम्ही मजकडून घेतली असेल, पण ती तुम्हांला पटली तर ती तुमची झाली. मग ती तुमच्या स्वतःच्या अनुभवाप्रमाणे व आदर्शाप्रमाणे अमलांत आणू लागा. तिचा विकास तुमच्या जीवनात कदाचित भिन्न दिशेने, भिन्न प्रकारे होईल; त्याला हरकत नाही. अनुभवाने तुमच्या वागण्यात सुधारणा होईल. पण तुमचे जीवन आणि तुमची साधना तुमचीच झाली पाहिजे."

गांधीजींच्या या सूचनेप्रमाणे जगण्याचा मी प्रयत्न केला आहे. तसे करीत असता पुष्कळदा स्वतःच्या चुका समजून घेऊन मी माझा जुना मार्ग सोडला आणि गांधीजींची विशिष्ट साधना नव्याने समजून आल्याने त्यांच्या मार्गाने जाणे मला अपरिहार्य झाले—आणि मगच त्या साधनेचा फायदा मला मिळू लागला. पण केव्हा केव्हा मला माझा मार्गच अधिक हितकारक आणि फलदायी वाटला आहे. अशा वेळी स्वतःच्या अनुभवाला आणि मार्गाला चिकटून रहाण्याची हिंमत गांधीजींच्या वरील सूचनेवरून मला मिळाली आहे.

विश्वस्त कल्पनेचा आशय

मला वाटते, अस्तेय आणि अपरिग्रह ही व्रते समजायला सोपी नाहीत– आणि आचरण्यासाठी तर त्याहून अधिक कठिण आहेत. सामाजिक जीवन या दोन व्रतांशीं जुळवून घेणे सोपे नाहीं. एक-दोन वेळां जीवनविषयक निर्णय करून गांधीजींचा सल्ला घेत असताना त्यांनी कठोरपणे म्हटले, 'असे करण्यात चोरी होत आहे हे तुला पटले पाहिजे. पण जसे ठरवले आहेस त्याप्रमाणे चाल, हरकत नाही पण विचार-शुद्धीच्या दृष्टीने स्वतःच्या आचरणात सूक्ष्मपणे चोरीचा दोष येत आहे, हे तू समजून घेतलेच पाहिजेस. ''

मला वाटते, या वावतींत तेव्हापासून मीं अधिक सावध झालो आहे. पण परिग्रहाच्या वावतीत निर्णय करणे फारच कठीण जाते. सामाजिक जीवन जगावयाचे तर थोडावहुत परिग्रह वाळगावाच लागतो आणि स्वतः जवळील संपत्ती किंवा साधने कसोशीने लोकहितासाठी वापरावीं लागतात. यालाच गांधीजींनी ट्रस्टीशिपचे रूप दिले आहे. जी संपत्ती अथवा जी साधने आपल्या हाती आलीं आणि कायद्याने जिचे आपण मालक झालो, ती संपत्तीदेखील आपली स्वतःची नाही.आपण तिचे ट्रस्टी–म्हणजे विश्वस्त–आहोत हे न विसरता लोकहितासाठी ती साधनें वापरावयाची हा सिद्धांत ठीक आहे. या वावतीत गांधीजींचा ट्रस्टीशिपचा सिद्धांत आपल्याला यथेच्छ अधिकार देतो. शेवटचा निर्णय आपल्याच हाती असतो हे खरे. तरीही साधन-संपत्तीचा आपण योग्य उपयोग करीत आहोत, स्वार्थ किंवा पक्षपात त्यात शिरला नाही अशी खात्री देता येत नाही. गांधीजींचा सिद्धांत आपल्याला अशा वावतीत समाजाच्या सासूपणापासून मुक्त करतो हे खरे. अंतिम निर्णय करण्याची सत्ता आपल्याकडेच असते हेही खरे. पण त्यामुळेच समाजाच्या ऐवजी स्वतःच्या धर्मबुद्धीचे, सदसद्विवेकबुद्धीचे सासूपण स्वीकारावे लागते. आणि सगळी अडचण तिथेच उत्पन्न होते. समाज केव्हा केव्हा कठोर वनतो, अन्यायही करतो, तर याच्या उलट केव्हा केव्हा उदासीन उपेक्षाही दाखवू शकतो. समाजाचा स्वतःचा आदर्श ढिला असल्यामुळे समाज केव्हा केव्हा राजीखुशीने एखादी सूट देतो,पण ती आपल्या विवेक-बुद्धीला घेणे जड जाते.

आणि म्हणूनच सर्व संपत्ती समाजाच्या ताब्यात देण्यापेक्षा गांधीजींची विश्वस्तपणाची कल्पनाच मानव-कल्याणाच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे. व्यक्तिगत मालकीच्या विश्वासामुळे संपत्ती वाढविण्याच्या वावतीत जो लाभ मिळतो तो सर्व विश्वस्तपणाच्या आदर्शाला लाभतो. आणि समाजाची धर्मबुद्धी इतकी सूक्ष्म आणि इतकी शुद्ध कुठे आहे की, समाजाला व्यक्तीच्या डोक्यावर वसणे नेहमी न्यायाचे आणि समाजाच्या हिताचेच असेल. सामाजिक हिताची कामे असंख्य असतात. त्यापैकी अमुक संपत्ती कोणत्या कामासाठी वापरावी, याचा निर्णय संपत्ती मिळविणाऱ्या विश्वस्ताच्या

मिळून काम करीत असताना हाताला हात लागला तर काय बिघडले ? मनुष्यांनी विकारी स्पर्श टाळावा. स्त्री-पुरुषांनी एकांतात एकमेकांच्या गाठी घेण्याचा प्रयत्न करू नये, हे बरोबर आहे. कामोत्तेजक संभाषण टाळावे, पण सामान्य विनोदाचा बहिष्कार काय म्हणून करावा ? सर्व प्रकारचा शुद्ध सामाजिक व्यवहार निर्विकारी मनाने करणे ब्रह्मचाऱ्याला काय म्हणून जड वाटावे ? नेहमीच्या संस्कारी सामाजिक जीवनात राहूनदेखील ज्याचे मन विचलित होत नाही, तोच खरा ब्रह्मचारी. हा आदर्श गांधींनी समाजापुढे ठेवला.

पण गांधीजींचा ब्रह्मचर्याचा आदर्श केवळ स्त्रीपुरुष-संबंधाइतका मर्यादित नव्हता. आवश्यकतेपेक्षा अधिक बोलणे, लिहिणे किंवा वाचणे हे देखील गांधीजींच्या मते ब्रह्मचर्याच्या विरुद्ध होते. गांधीजींनी आपल्या समृद्ध जीवनांत हजारो पत्रे लिहिली, लेख लिहिले, भाषणे केली, स्नेहाची देवघेव केली, पण त्यांनी आवश्यकते-पेक्षा एक शब्दही अधिक न वापरण्याचे व्रत कसोशीने पाळले.

व्यापक अर्थाचे हे ब्रह्मचर्य मानवी जीवनाला शुद्ध, समर्थ आणि समृद्ध करते असा गांधीजींचा विश्वास होता. ब्रह्मचर्याविषयी लिहिताना असले शब्द त्यांनी कधीही वापरले नसले, तरी त्यांची खरीखुरी कल्पनाच मी येथे, मांडली आहे यात मला शंका नाही. असल्या विषयावर अनेकदा खाजगी संभाषणात त बोलले आहेत आणि त्यांचे विचार मी विस्तारपूर्वक समजून घेतले आहेत आणि आपलेसे करण्याचा प्रयत्नही केला आहे.

त्यांचे विचार केवळ अक्षरश: समजून घेऊन आंधळेपणाने किंवा जडपणे ते वापरावेत हे त्यांना मान्य नव्हते. ते स्पष्ट शब्दांत सांगत की, "एखादी कल्पना किंवा नीती तुम्ही मजकडून घेतली असेल, पण ती तुम्हांला पटली तर ती तुमची झाली. मग ती तुमच्या स्वत:च्या अनुभवाप्रमाणे व आदर्शाप्रमाणे अमलांत आणू लागा. तिचा विकास तुमच्या जीवनात कदाचित भिन्न दिशेने, भिन्न प्रकारे होईल; त्याला हरकत नाही. अनुभवाने तुमच्या वागण्यात सुधारणा होईल. पण तुमचे जीवन आणि तुमची साधना तुमचीच झाली पाहिजे."

गांधीजींच्या या सूचनेप्रमाणे जगण्याचा मी प्रयत्न केला आहे. तसे करीत असता पुष्कळदा स्वत:च्या चुका समजून घेऊन मी माझा जुना मार्ग सोडला आणि गांधीजींची विशिष्ट साधना नव्याने समजून आल्याने त्यांच्या मार्गाने जाणे मला अपरिहार्य झाले–आणि मगच त्या साधनेचा फायदा मला मिळू लागला. पण केव्हा केव्हा मला माझा मार्गच अधिक हितकारक आणि फलदायी वाटला आहे. अशा वेळी स्वत:च्या अनुभवाला आणि मार्गाला चिकटून रहाण्याची हिंमत गांधीजींच्या वरील सूचनेवरून मला मिळाली आहे.

**विश्वस्त कल्पनेचा आशय**

मला वाटते, अस्तेय आणि अपरिग्रह ही व्रते समजायला सोपी नाहीत– आणि आचरण्यासाठी तर त्याहून अधिक कठिण आहेत. सामाजिक जीवन या दोन व्रतांशीं जुळवून घेणे सोपे नाहीं. एक-दोन वेळां जीवनविषयक निर्णय करून गांधीजींचा सल्ला घेत असताना त्यांनीं कठोरपणे म्हटले, 'असे करण्यात चोरी होत आहे हे तुला पटले पाहिजे. पण जसे ठरवले आहेस त्याप्रमाणे चाल, हरकत नाही पण विचार-शुद्धीच्या दृष्टीने स्वतःच्या आचरणात सूक्ष्मपणे चोरीचा दोष येत आहे, हे तू समजून घेतलेच पाहिजेस.'

मला वाटते, या बावतींत तेव्हापासून मीं अधिक सावध झालो आहे. पण परिग्रहाच्या बावतीत निर्णय करणे फारच कठीण जाते. सामाजिक जीवन जगावयाचे तर थोडावहुत परिग्रह बाळगावाच लागतो आणि स्वतः जवळील संपत्ती किंवा साधने कसोशीने लोकहितासाठी वापरावीं लागतात. यालाच गांधीजींनी ट्रस्टीशिपचे रूप दिले आहे. जी संपत्ती अथवा जी साधने आपल्या हाती आलीं आणि कायद्यानें जिचे आपण मालक झालो, ती संपत्तीदेखील आपली स्वतःची नाही.आपण तिचे ट्रस्टी-म्हणजे विश्वस्त–आहोत हे न विसरता लोकहितासाठी ती साधनें वापरावयाचीं हा सिद्धांत ठीक आहे. या बावतीत गांधीजींचा ट्रस्टीशिपचा सिद्धांत आपल्याला यथेच्छ अधिकार देतो. शेवटचा निर्णय आपल्याच हाती असतो हे खरे. तरीही साधन-संपत्तीचा आपण योग्य उपयोग करीत आहोत, स्वार्थ किंवा पक्षपात त्यात शिरला नाही अशी खात्री देता येत नाही. गांधीजींचा सिद्धांत आपल्याला अशा बावतीत समाजाच्या सासूपणापासून मुक्त करतो हे खरे. अंतिम निर्णय करण्याची सत्ता आपल्याकडेच असते हेही खरे. पण त्यामुळेच समाजाच्या ऐवजी स्वतःच्या धर्मबुद्धीचे, सदसद्विवेकबुद्धीचे सासूपण स्वीकारावे लागते. आणि सगळी अडचण तिथेच उत्पन्न होते. समाज केव्हा केव्हा कठोर वनतो, अन्यायही करतो, तर याच्या उलट केव्हा केव्हा उदासीन उपेक्षाही दाखवू शकतो. समाजाचा स्वतःचा आदर्श ढिला असल्यामुळे समाज केव्हा केव्हा राजीखुशीने एखादी सूट देतो, पण ती आपल्या विवेक-बुद्धीला घेणे जड जाते.

आणि म्हणूनच सर्व संपत्ती समाजाच्या ताब्यात देण्यापेक्षा गांधीजींची विश्वस्तपणाची कल्पनाच मानव-कल्याणाच्या दृष्टीने श्रेष्ठ आहे. व्यक्तिगत मालकीच्या विश्वासामुळे संपत्ती वाढविण्याच्या वावतीत जो लाभ मिळतो तो सर्व विश्वस्तपणाच्या आदर्शाला लाभतो. आणि समाजाची धर्मबुद्धी इतकी सूक्ष्म आणि इतकी शुद्ध कुठे आहे की, समाजाला व्यक्तीच्या डोक्यावर वसणे नेहमी न्यायाचे आणि समाजाच्या हिताचेच असेल. सामाजिक हिताची कामे असंख्य असतात. त्यापैकी अमुक संपत्ती कोणत्या कामासाठी वापरावी, याचा निर्णय संपत्ती मिळविणाऱ्या विश्वस्ताच्या

ह्याती असणे यात एक प्रकारचे औचित्य आहे.

गांधीजींनी एकदोनदा स्पष्ट म्हटले आहे की, 'सर्व संपत्तीचा मालक समाज.' या सिद्धान्ताला श्रेष्ठ समजूनही, फक्त पुंजीपतींना राजी ठेवण्यासाठी विश्वस्तपणाचा दुय्यम प्रकारचा सिद्धान्त मी काढला नाही. माझा स्पष्ट अभिप्राय आहे की, विश्वस्तपणाचा सिद्धान्त तत्त्वत: श्रेष्ठ आहे आणि शेवटी तोच अंमलात आणला पाहिजे. व्यक्तिगत संपत्ती कायद्याने सामाजिक करणे यात जी हिंसा आहे ती उद्या समाजमान्य ठरली तरी तीतील हिंसेचा दोष दूर होत नाही. विश्वस्तपणाचा सिद्धान्त मानवस्वभावाला अधिक धरून आहे. समाज स्वत: धर्म-परायण ( न्याय-परायण ) झाला म्हणजे व्यक्तीच्या स्वभावातदेखील तितकी सुधारणा होतेच. आज व्यक्तीच्या मनावर आंधळ्या स्वार्थाचा पगडा आहे हे खरे, पण समाजावर जेव्हा खऱ्या धर्म-संस्कृतीचा प्रभाव पसरेल, तेव्हा विश्वस्तपणा हादेखील प्रामाणिकपणाइतकाच व्यापक होऊ शकेल.

**स्वदेशीबद्दल गैरसमज**

आश्रमाच्या अकरा व्रतांमध्ये स्वदेशीला स्थान आहे. लहानपणापासून मी स्वदेशीचा विचार करीत आलो आहे. अगदी लहानपणी 'स्वदेशी म्हणजे गावठी कापड ' अशी मी चेष्टा करीत होतो. तेव्हा माझे वडील बंधू दु:खी स्वराने मला म्हणाले होते, "दत्तू, तू अजून लहान आहेस. स्वदेशी म्हणजे काय हे तुला समजत नाही. मोठा होशील तेव्हा तूच स्वदेशीचा भक्त होशील." बाबाच्या ( वडील बंधूंना आम्ही 'बाबा' म्हणत असू.) म्हणण्याचा भाव मी समजलो नव्हतो. तरी त्याचा प्रभाव माझ्या मनावर पडू शकला आणि खरोखर मी ' सार्वजनिक काकां'—इतकाच स्वदेशीचा पुरस्कर्ता बनलो. ' स्वदेशी धर्म ' हाच ईश्वराचा नवा अवतार आहे, असे जाहीर करणारे मी एक लहानसे पुस्तक लिहिले. महात्माजींकडून त्या पुस्तकासाठी एक लहानशी प्रस्तावना घेऊन स्वामी आनंदांनी ते छापले. महात्माजींची प्रस्तावना हेच माझ्या पुस्तकाचे भाग्य. मद्रासच्या एका प्रकाशकाने त्याचे इंग्रजी भाषांतर करून छापले. एका बंगाल्याने माझ्या त्या पुस्तकाची टवाळी केली. त्याच इंग्रजी पुस्तकावर रोमाँ रोलाँसारख्या विश्व-विख्यात फ्रेंच लेखकाने कडक टीका केली. त्यामुळे एक क्षणभर का होईना, जगात मी खूप प्रसिद्ध झालो. श्री. अँड्र्यूझनी सर्व प्रकार महात्माजींच्या नजरेला आणला. महात्माजींनी मला सुचविले की, सर्व टीका ध्यानात घेऊन सगळे पुस्तक पुन्हा लिही. मी म्हणालो, " स्वदेशीचा प्रचार आपण उत्तम प्रकारे करीत आहात. माझ्या पुस्तकाची भाषा आपल्या लोकांसाठी लिहिली होती. तिचे इंग्रजी व्हायलाच नको होते. आता पुन्हा कुठे लिहायला बसू? टीका व्हायची ती होऊन गेली. मी लहान माणूस, लोक मला विसरून जातील. "

यानंतर अँड्र्यूझच्या आग्रहामुळे महात्माजींनी स्वदेशी धर्मावर एक लेख लिहिला आणि त्यात म्हटले की, काका माझे एक चांगले साथी आहेत, म्हणून त्यांच्या पुस्तकाला मी एक सामान्य प्रस्तावना लिहून दिली इतकेच.

हा लेख वाचून अँड्र्यूझनी जाहीर केले की, महात्माजींनी स्वतःची प्रस्तावना मागे घेतली आहे. प्रकरण तेवढयावर थांबले नाही. इंग्लंडच्या दर्यासारंग व्हाईस ॲडमिरल मि. स्लेडची कन्या मिस् स्लेड रोमाँ रोलाँची भक्त होती. ती एकदा भक्तिभावाने गेली रोमाँ रोलाँजवळ. त्यांनी तिला सांगितले, "तुझे गुरू होण्याची योग्यता महात्मा गांधीजींची आहे, माझी नव्हे. म्हणून तू त्यांचेकडे जा''. मिस् स्लेडने गांधी–साहित्य मागविले, हिंदुस्थानची माहिती मिळविली, वर्षभर अध्ययन केले. मग गांधींकडे ती आली. गांधीजींकडून तिने स्वतःसाठी एक भारतीय नाव मिळविले––मीरा. प्रारंभी मीरेची आणि माझी उत्तम दोस्ती झाली. तिने स्वदेशी धर्मावरील माझे पुस्तक, महात्माजींची प्रस्तावना आणि रोमाँ रोलाँची टीका वाचली होती. ती म्हणाली, "तुमची भूमिका मला समजते. युरोपच्या एका थोर चिंतकाच्या मनात तुमच्याविषयी गैरसमज असणे इष्ट नाही: तुमची बाजू थोडक्यात मला इंग्रजीत लिहून द्या. रोमाँ रोलाँना युरोपच्या पाच भाषा येतात, पण इंग्रजी येत नाही. तेव्हा तुमच्या पत्राचे फ्रेंच करून मी त्यांना लिहीन.''

मुळीच इच्छा नसता, मला हे सर्व करावे लागले. रोमाँ रोलाँनी मला फ्रेंच-मध्ये उत्तर लिहिले. स्वतः गैरसमज करून घेतल्याबद्दल त्यांनी खेद प्रदर्शित केला, आणि त्याप्रमाणे आपल्या एका नंतरच्या पुस्तकात जाहीरही केले.

ॲन्ड्र्यूझचे म्हणणे होते की, "मानवतावादी आंतरराष्ट्रीय एकतेचा पुरस्कार करणारे तुम्ही लोक स्वदेशीचा आग्रह कसे धरता हे मी समजू शकत नाही. काय तुम्हाला सगळ्या परदेशी वस्तूंचा आणि परदेशी संस्कृतीचा बहिष्कारच करावयाचा आहे ? जगापासून वेगळेच रहायचे आहे ?'' गांधीजींनी आपली भूमिका अँन्ड्र्यूझना समजावण्याचा पुरा प्रयत्न केला. पण आमची 'पूर्ण स्वदेशी' त्यांना काही केल्या मान्य होईना. शेवटी बापूजींनी विचार केला असेल की, अॅन्ड्र्यूझसारखादेखील जेथे 'सर्वदेशी स्वदेशी', समजू शकत नाही, तेथे इतरांची काय कथा ?

या प्रकरणानंतर गांधीजींनी स्वदेशीचे स्वरूपच बदलून टाकले. यंत्रोद्योगी मालाच्या विरुद्ध हस्तोद्योगाचा पुरस्कार चालविला आणि शहरांच्या प्राणघेण्या आक्रमणाविरुद्ध ग्रामोद्योगांना वाचविण्याचा कार्यक्रम देशापुढे मांडला. अशा रीतीने स्वदेशी शब्दापासून होणारा गैरसमज टाळून गांधीजींनी स्वदेशीचे हार्द पकडले.

गांधीजींच्या कार्य-पद्धतीचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून मी इतक्या विस्ताराने लिहिले आहे. यात स्वतःसंबंधाने लिहिणे अपरिहार्य झाले.

गांधीजी स्वभावाने सुधारक होते, पण त्यांना सनातनी समाजापासून फटकून राहावयाचे नव्हते. तसे ते स्वभावाने आणि मनाने सनातनीच होते, पण सर्वोच्च सत्याचे व न्यायाचे उपासक असल्यामुळे त्यांना सनातन धर्माचा व्यापक आणि शुद्ध अर्थ लावता आला.

**वर्णाश्रम-व्यवस्थेचा अर्थ काय ?**

'सनातन धर्म म्हणजे वर्णाश्रम-व्यवस्था.' हे सामान्य समीकरण गांधीजींना ठाऊक होते. वर्ण आणि आश्रम या निरनिराळ्या संस्था आहेत, त्यांचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे, हे गांधीजींना पुष्कळ काळपर्यन्त उमगले नव्हते. दोन्ही संस्थांविषयी त्यांच्या मनात आदर होता. तरीही भगवा कपडा धारण करणाऱ्या संन्यास-आश्रमाचा ते पुरस्कार करणारे नव्हते. याविषयींचे एक प्रकरण महत्त्वाचे आहे. ते मी पूर्वीच प्रसिद्ध केल्यामुळे येथे देत नाही.

गांधीजींचे म्हणणे होते की, गीतेने संन्यस्त वृत्तीचा पुरस्कार केला आहे तो मला पूर्णपणे मान्य आहे. पण आपला सत्याग्रहाश्रम हा सेवाश्रम आहे. हिंदू समाज भगवा कपडा धारण करणाऱ्या संन्याशांच्या हातून सेवा घेण्यात पाप मानतो. "संन्याशाकडून धर्मोपदेश ऐकावा पण त्याची सेवा कशी घ्यावी ?" असे म्हणणाऱ्या समाजाची आपल्याला सेवा करावयाची आहे. आपण मनाने संन्यासी बनलो आणि विवाहित असलो, तरी अविवाहित ब्रह्मचर्याचे पालन केले तर आपल्याला कोण अडवतो ? संयमाने रहावे, साधेल त्याप्रमाणे मनाला पूर्ण ब्रह्मचर्याकडे खेचत न्यावे, हाच आपला आश्रम-धर्म आहे. भगवा कपडा सेवा-धर्माच्या आड येतो म्हणून आपण भगव्या कपड्याचादेखील संन्यास म्हणजे त्याग करणे इष्ट आहे."

मला स्वतःला गांधीजींची ही दृष्टी मान्य असली तरी रामकृष्ण परमहंसांची आणि स्वामी विवेकानंदांची दृष्टीही मान्य होती—आणि आजही आहे. मी लोकांना सांगतो की, गीताकार श्रीकृष्णाने चातुर्वर्ण्याचा जोराने पुरस्कार केला आहे. जनकाची संन्यस्त वृत्ती गीताकारांना मान्य आहे. अर्जुनाने संन्यास घेऊन भिक्षान्न खाण्याची तयारी दाखविली, तरी गीतेने संन्यासाश्रमाविषयी मौनच धारण केले आहे. जेथे मोघम उल्लेख येतो तेथे संन्यासाश्रमाविषयी अनादरच आहे. ( न निरग्निर् न चाऽक्रियः ) सबंध गीतेमध्ये आश्रम शब्द नाही ! गांधीजींची भूमिका आणि गीताकारांची भूमिका एकच असावी असे वाटते.

वर्ण-व्यवस्थेविषयी गांधीजींची भूमिका प्रयत्नपूर्वक समजून घेतली पाहिजे.

सनातनी लोकांच्या धर्मभावनांचा सामान्यपणे स्वीकार, करून चालण्याची त्यांची मनोवृत्ती होती. गीतेत सांगितलेली वर्णव्यवस्था त्यांना मान्य होती. आजचे हिंदू ज्याप्रमाणे प्रत्येक मनुष्याचा वर्ण जन्मावरच ठरवितात, त्याचप्रमाणे

गांधीजीदेखील मानत होते. चालू असलेल्या व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याची त्यांची वृत्ती नव्हती. ज्या वस्तू बाधक असतील त्यांनाच कमर कसून विरोध करणे आणि ज्या वस्तू इष्ट असतील त्यांचा पुरस्कार करणे, आणि बाकीच्या बाबतीत आदरयुक्त तटस्थपणा धारण करणे, हा गांधीजींचा स्वभाव होता.

मी एकदा त्यांना सरळ विचारले की, "जी वर्णव्यवस्था आपल्याला जशी मान्य आहे तशी का होईना ती अंमलात आणण्यासाठी किंवा चालविण्यासाठी आपण काय करायला तयार आहात ?" त्यांना तसे करण्याचा मुळीच उत्साह दिसला नाही. त्यांच्या मते वर्ण-व्यवस्थेचा आजीविकेशी संबंध आहे, रोटी-बेटी-व्यवहाराशी नाही.

पुष्कळ लोकांनी गांधींच्या दखत त्यांना म्हटले आहे की, "आपल्यामध्ये चारही वर्ण सामावले आहेत." मला वाटते, गांधींना हेच अभीष्ट होते. स्वत: सनातनी राहून गांधींनी स्वत:च्या आश्रमामार्फत हिंदू समाजात जितकी आणि जशी सुधारणा केली, तशी सुधारणा दुसऱ्या कोणी केली असल्यास आम्हाला ठाऊक नाही.

सर्वच गोष्टींत गांधीजी विज्ञानवादी होते. महत्त्वाचे मुख्य फेरफार केले म्हणजे बाकीचे फेरफारआपोआप विनबोभाट होऊन जातात, हा त्यांचा अनुभव होता.

प्रारंभी हिंदुधर्मातील जातिव्यवस्थेविषयी गांधीजींच्या मनात विरोध नव्हता. एकदा ते म्हणाले — "जातिभेदात जो संयम आहे तो मला आवडतो. लग्न करायचे म्हणजे विकारी दृष्टीने जगातल्या मुलींकडे पाहून, स्वत:ची पत्नी होण्याला लायक कोण आहे हे शोधायचे असते. जातिभेदांमुळे 'ज्या मुली स्वत:च्या जातीच्या नाहीत, त्यांच्याकडे तशा दृष्टीने पहावयाचेच नाही' असा निश्चय आपोआप होतो. मनाच्या संयमाला केवढी मोठी मदत ! जी काही पसंती करायची ती स्वत:च्या जातीच्या मुलींमधूनच. हा स्वाभाविक संयम मला आवडतो." याहून जातिभेदाविषयी ते कधी बोलल्याचे मी ऐकले किंवा वाचले नव्हते. पुढे समाजाचे निरीक्षण मुबलक झाल्याने जातिभेद आणि वर्णभेद निरनिराळे आहेत, यावर ते भर देऊ लागले आणि एकदा त्यांनी लिहिले "Caste Killeth Varna Saveth" वर्णव्यवस्था सामाजिक सुस्थितीच्या दृष्टीने गुणकर्मविभागाप्रमाणे ठरविली आहे हे त्यांना मान्य होते. पण आज वर्णव्यवस्था जन्मावर आधारित आहे, तिच्या वाटेला जा कशाला ? प्रत्येकाने आपल्या वर्णाला अनुरूप असाच धंदा करावा आणि आजीविका मिळवावी असे ते म्हणत. वर्णभेदानुसार रोटीबेटी-मर्यादा स्वीकारावी, हे त्यांना कधीच मान्य नव्हते. "आहारात संयम असावा मांसाहारापेक्षा शाकाहार श्रेष्ठ, आपल्या लोकांनी तरतऱ्हेची मिष्टान्ने तयार करून आणि मसाला वापरून स्वत:चे अकल्याण केले आहे, जिभेचे चोचले वाढविले

आहेत आणि पोटावर अत्याचार चालवला आहे.'' हे विचार ते लोकांना आग्रहाने समजावीत असत. दुग्धाहार पवित्र आहे, हा सामान्य हिंदू विचार त्यांना मान्य नव्हता. दुग्धाहार ब्रह्मचर्याला पोषक आहे, हाही विचार त्यांना मान्य नव्हता. 'शाकाहारी' या नात्याने दुधाचा त्याग करण्याचा त्यांनी जबरदस्त प्रयत्न केला. दुधावाचून जगणेच अशक्य आहे, असा स्वत:पुरता अनुभव झाल्यानंतर त्यांनी बकरीचे दूध घ्यायला सुरवात केली. (गाई-म्हशींवर दुधासाठी जो अत्याचार होतो त्याची चीड येऊन गाई–म्हशींचे दूध आपण वापरणार नाही, असा त्यांनी निश्चय केला होता. तेव्हा राहता राहिली शेळी. तिचे दूध ते लाचारीने घेऊ लागले.)

पुढे पुढे गांधीजींनी भिन्न जातीच्या विवाहांनाच अधिक प्रोत्साहन दिले, भिन्नधर्मी विवाहही मान्य केले.

वर्णव्यवस्थेविषयी बोलताना ते एकदा म्हणाले की, "ज्ञानाची उपासना आणि ज्ञानाचा प्रचार, अध्ययन आणि अध्यापन फक्त ब्राह्मणांनीच करावे, असे कसे म्हणता येईल ? तो मार्ग सर्वांनाच मोकळा असला पाहिजे.''

याचप्रमाणे, देशाचे रक्षण करणे, जीवित-वित्ताचे रक्षण करणे हे फक्त क्षत्रियाचे काम असेही म्हणून कसे चालेल? त्यांचे असे वचन ऐकून मी एक पुस्ती जोडली–– "ज्याला म्हणून पती किंवा पिता व्हावयाचे असेल, त्याने बायकामुलांचे आणि देशाचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे. लग्न करीन मी आणि पत्नीच्या व अपत्याच्या रक्षणाची जबाबदारी दुसऱ्यांची, असे मनात आणताना देखील मनुष्याने लाजले पाहिजे. हे रक्षण शरीराने करा, शस्त्राने करा किंवा सत्याग्रहाने करा. पण स्वकीयांच्या रक्षणाची जबाबदारी कुणालाच टाळता येणार नाही. अशी जबाबदारी टाळणे नामर्दपणाचे लक्षण आहे.''

समाजोपयोगी कोणतेही पदार्थ तयार करून ते विकणे आणि पोट भरणे हे वैश्य वर्णाचे काम आहे. चामड्याचे जोडे करून विकणारा चांभार असो किंवा दुसरा कोणीही असो, त्याचा वर्ण वैश्य.

आणि जो लोकांची शारीरिक सेवा करून पोट भरतो तो शूद्र. झाड-लोट करणे, घरात पाणी भरणे, मंदिरातील मूर्तीला आंघोळ घालणे, कपडे चढविणे वगैरे षोडशोपचार पूजा करणे हे शूद्राचे काम आहे. मंदिरातील पुजारी वर्णाने शूद्र ठरतो, हे माझे भाष्य गांधींना स्वीकारावे लागले होते.

म्हणून मी म्हटले आहे की, गांधींना वर्णव्यवस्था तत्त्वत: मान्य होती, पण त्या बाबतीत आपण काही केले पाहिजे, समाजव्यवस्था वर्णांच्या आदर्शा-प्रमाणे चालवण्याचा आग्रह धरला पाहिजे, हे त्यांनी कधीच मान्य केले नव्हते'

गांधीजी जेव्हा १९१५ साली भारतात कायमचे राहण्यासाठी स्वदेशी आले.

तेव्हा 'हा धर्मनिष्ठ तेजस्वी देशभक्त पूर्ण हिंदू झाला तर चांगले,' अशा विचाराने एका संन्याशाने त्यांना आग्रह केला की, 'तुम्ही शिखा-सूत्र धारण करा, डोक्या-वर शेंडी ठेवा आणि जानवे घाला.' तेव्हा त्यांनी शेंडी ठेवण्याचे कबूल केले पण जानवे मुळीच घालणार नाही, असे निक्षून सांगितले. यातून चर्चा निघाली. तेव्हा ते म्हणाले, "मला हिंदू समाजातील किती तरी चुकीच्या रूढी मोडायच्या आहेत. अशा वेळी हिंदू समाजाशी माझी आत्मीयता मला लोकांना पटविली पाहिजे. सर्व हिंदूंना एकत्र आणणारी गोष्ट ही शिखा ( शेंडी ) आहे, तिचा स्वीकार करणे मला इष्ट वाटते. दक्षिण आफ्रिकेत मी शेंडी ठेवली नव्हती, यापुढे ठेवीन."

जानव्याविषयी ते म्हणाले, "हे जानवे हिंदू समाजात एक निष्कारण भेद उत्पन्न करते. अमुकाला जानव्याचा अधिकार आहे, अमुकाला नाही, ही कटकट मी कशाला स्वीकारू ? वैष्णव लोक जाति-भेदाचा विचार न करता ब्राह्मणा-पासून अंत्यजापर्यंत सर्वांना 'तुळशीची कंठी' देतात, ती लहानपणी मी वापरत असे, तीही मी सोडली. आता हे जानव्याचे बंधन कशाला स्वीकारू ?"

गांधीजींची ही 'दलील' ऐकून मी म्हणालो, "कित्येक आर्यसमाजी आणि इतर लोक पक्षपातरहित सर्व हिंदूंना जानवे देण्याला तयार आहेत, तसा ते जोराचा प्रचार करीत आहेत, त्या प्रचारात आपण सामील का होऊ नये ?"

उत्तरादाखल ते म्हणाले, "जानव्याचा उपयोग काय ? हे विनाकारणाचे ओझे 'केवळ समानतेसाठी' सगळ्यांच्या खांद्यावर आपण काय म्हणून लादावे ?"

इतके म्हणून त्यांनी पुस्ती जोडली. "जानव्याची उपयोगिता पुढेमागे जर सिद्ध झाली, तर त्याचा प्रचार करायला अडचण कोणती ? सूत कातून जानवी तयार करणे मुळीच कठीण नाही, पण सध्या जानव्याचा प्रचार करून एक भूत उठविणे मला इष्ट वाटत नाही."

### जातिभेदाला विरोध

येथे एक प्रसंग नोंदण्याजोगा आहे. सरदार वल्लभभाई पटेल जातीने पाटीदार—महाराष्ट्रांत ज्यांना अस्सल मराठे म्हणतात, त्यांच्यासारखीच गुजरात-मधली ही एक अभिमानी जात आहे.—यांचा पिढीजात धंदा शेतकऱ्याचा. एकदा गुजरातमध्ये एक चर्चा माजली. 'पाटीदारांना क्षत्रिय म्हणावे की वैश्य ?" दोन्ही बाजूंनी जोराची चर्चा चालली. पुढे, का कुणाला ठाऊक, हे प्रकरण कोर्टात पोहोचले. तेव्हा अभिमानी लोकांनी कोर्टात सरदार वल्लभभाईंना साक्षी म्हणून बोलवण्याचे ठरविले. एवढ्या थोर माणसाची साक्ष चांगलीच उपयोगी पडेल असे ठरवून साक्षीदारांत त्यांनी वल्लभभाईंचे नाव घातले आणि पाटीदार

लोकांतील हे ज्ञातिभूषण वल्लभभाईंना गळ घालायला आले की, 'तुम्ही साक्ष द्यायला कोर्टात आलेच पाहिजे आणि आम्ही क्षत्रिय आहोत, अशी साक्ष दिली पाहिजे.'

वल्लभभाईंना या सगळ्या प्रकरणाची मनात पुष्कळ चीड होती, पण चेहरा अगदी साळसूद ठेवून त्यांनी उत्तर दिले, "हो हो. माझी साक्ष जरूर काढा. मी कोर्टाला स्पष्ट सांगेन की, माझ्या मते आम्ही पाटीदार जातीने किंवा वर्णाने शूद्र आहोत. माझे स्पष्ट मत आहे की, शूद्राची हीच एक जात इमानदार आहे. स्वत:ला शूद्र म्हणवून घेण्यात मला मोठा अभिमान वाटतो. आपण मेहनत करून पोट भरत नाही का ?'

आलेले ज्ञातिभूषण गार झाले आणि त्यांनी साक्षीच्या यादीतून वल्लभभाईंचे नाव गाळले, हे सांगायला नकोच.

स्वत: सरदार वल्लभभाईंच्या तोंडूनच मी हा किस्सा ऐकला होता, गांधीदेखील म्हणत, "आपण सर्व जन्माने शूद्र आहोत, ती योग्यता मिळविली म्हणजे मग इतर वर्णाचा विचार करता येईल."

गांधींच्या आश्रमात आम्ही जेवढे ब्राह्मण होतो ते सर्वच, सगळ्या प्रकारची शारीरिक कामे करीत असू. शौचकूप साफ करणे, भांडी घासणे ही सर्व कामे आम्ही पाळीपाळीने करीत असू आणि आश्रमात आम्हाला ब्राह्मण म्हणून विशेष मान कधीच नव्हता. प्रत्येकाच्या विद्वत्तेप्रमाणे, बुद्धिमत्तेप्रमाणे, वयाप्रमाणे आणि संयमाप्रमाणे किंवा तपश्चर्येप्रमाणे कमीअधिक आदर असे. पण त्यात जातीचा विचार कधीच नसे.

मला एकदा कुणी विचारले--"तुम्हाला कुणाच्या हातचा स्वयंपाक चालतो?" मी म्हणालो, "कोणीही जिवंत माणसाने शिजविलेले मला चालते, फक्त माझ्या आहारात मांस, मासळी, अंडी वगैरे नसावे, उष्टे किंवा बुरसलेले नसावे."

परवा एकाने मला मुद्दाम विचारले, "समजा, तुम्हाला दोन घरचे आमंत्रण आले. एक आहे मांसाहारी, दुसरा आहे शाकाहारी. तर तुम्ही कोणते स्वीकाराल ?"

प्रश्नातील खोच मी समजलो आणि तावडतोब ठासून उत्तर दिले – "मी आहे शुद्ध शाकाहाराचा प्रचारक. शाकाहारी यजमानाच्या घरी जाऊन मला काय संधी मिळणार ? आरामाने भोजन करणे हे आळशाचे काम. मी सरळ जाईन मांसाहारी यजमानाच्या घरी आणि त्यांना सांगेन की, मी शाकाहारी आहे हे जाणून तुम्ही मला बोलावले आहे. तेव्हा मी आज तुमच्याच घरी जेवणार."

ही आहे गांधीत्राद्याची धर्मनिष्ठा. आशा आहे की, आजच्या युगाला या गोष्टी थोड्या विचारांनी जरूर पटतील.

५

# गांधीजी व मानवाचें भवितव्य

मा. मोरारजी देसाई

सर्वांचे जास्तीत जास्त हित करणारी सर्वोदयवादी समाज-व्यवस्था गांधीजींना का हवी होती ? गांधीजींचा यंत्र-शक्तीला विरोध का व कोठवर होता ? इत्यादी प्रश्नांचो उत्तरे या लेखात दिलेली असून विश्वस्त-तत्त्व, साधन-शुचिता वगैरे गांधीजींच्या जीवन-मूल्याचे विवेचनही यात केलेले आहे.

गांधीजींच्या निर्वाणाला उणीपुरी दोन तपे उलटली नाहीत तोंच, जीवनांत आदर्शवाद असला पाहिजे, याबद्दल अनेकांचा उत्साह मावळला आहे. त्यांच्या शिकवणीला पूर्वी जेवढे महत्त्व होते तेवढे आता अनेकजण देत नाहीत. काही जणांची तर अशी भावना बनली आहे की, गांधीजींनी दाखवून दिलेल्या मार्गापासून आपण बाजूला झालो आहोत, तर नजिकच्या भवितव्यात काळाचा लंबक नेमका विरुद्ध दिशेने झोका घेऊ लागेल, अशीही भीती काहींना वाटते. जीवनाची मूलभूत मूल्ये जर सामान्य माणसांकडूनही स्वीकारली जावी असे वाटत असेल, तर त्या मूल्याचा आधार काय ते पाहणे अत्यावश्यक आहे. या मूल्यांच्या आचरणातून काही भौतिक लाभ पदरात पडतील हीच बहुतेकांची दृष्टी असते; परंतु

काहीजण केवळ या मूल्यांसाठीच त्यांचे आचरण करतात. गांधीजींचे जीवन आणि शिकवण ही एवढी उदात्त आहेत, आपल्या जीवनसरणीला ती इतकी आधारभूत आहेत की, स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घ्यायचा नसेल तर ती विसरून चालणार नाही, अशी श्रद्धा असलेल्यांपैकी मी एक आहे.

गांधीजींची शिकवण केवळ एकाच काळासाठी किंवा केवळ भारतीयांसाठीच नव्हती. त्यांचा संदेश हा सर्वकालीन व मानवजातीसाठी आहे. देशाच्या इतिहासात एखाद्या शतकाने फारशी भर पडत नसते. परंतु भारतीय इतिहासात मात्र गेल्या शतकाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. शतकानुशतकांच्या बंधनानंतर स्वातंत्र्याचा मंगलकलश संपादणाऱ्या भारतीय राष्ट्रवादाचा उदय या काळात झाला म्हणूनच केवळ हे महत्त्व नाही, तर मानवजातीच्या आशांना काही अर्थ येईल, त्याबद्दल विश्वास निर्माण होईल, अशा तऱ्हेने या राष्ट्रवादासाठी गांधीजींनी आपले जीवन वेचले, म्हणूनही हे महत्त्व आहे.

**तत्कालीन भारत**

सन १८६९ मध्ये गांधीजींचा जन्म झाला. त्या वेळी भारत हा एक दरिद्री व पिळला जाणारा देश होता. भारतीय नागरिक दुर्बळ, गुलामवृत्तीचा, भावडा व भित्रा होता आणि भारतीय समाज संकुचित, देशभक्तीचा मागमूसही नसलेला व अत्यत दुभंगलेला होता. गांधीजींनी १८८८ मध्ये इंग्लंडला प्रयाण केले त्या वेळी विद्यापीठ-शिक्षणाचा हळूहळू प्रसार होत होता. सामाजिक सुधारणांची चळवळ लोकप्रिय होत होती आणि नागरी भागात राजकीय जागृती वाढत होती. सन १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या अन्यायाविरुद्ध यशस्वी लढा देऊन महात्माजी १९१५ साली मायदेशी परतले त्या वेळी त्यांना असे दिसून आले की, राजकीय विचार-जागृती खूपच झाली आहे. मवाळ, अराजकवादी असे पक्षोपपक्ष राजकीय आखाड्यात त्या वेळी उतरले होते, परंतु सर्वसाधारण भारतीय नागरिक, भारतीय समाज किंवा देश हा मात्र पूर्वीसारखाच राहिला होता, हेही त्यांच्या लक्षात आले.

गांधीजींच्या असे दृष्टोत्पत्तीस आले की, भारताची समस्या ही काही केवळ राजकीय किंवा आर्थिक नाही तर बहुविध आहे. शतकानुशतकांच्या बंधनातून निर्माण झालेल्या गुलामी वृत्तीच्या कोषातून बाहेर पडण्यासाठी धैर्य हवे, स्वाभिमानाची भावना हवी. ही परिस्थिती बदलावयाची असेल तर शिक्षण, सामाजिक सुधारणा, अर्थव्यवस्था, राजकारण ही या देशाच्या भूमीत रुजतील अशी हवीत, ही त्यांची खात्री पटली आणि पुढील तीस वर्षे अविश्रांतपणे त्यांनी त्यासाठी परिश्रम घेतले व देशात एक मूक क्रांती घडवून आणली. तोपर्यंत चालू असलेल्या दह-

शतवादी मार्गाऐवजी स्वराज्य मिळविण्याचा एक व्यवहारी मार्ग त्यांनी दाखवून दिला आणि त्यामुळे राजकीय जागृती खेड्यापाड्यापर्यंत पोहोचली आणि स्वातंत्र्यसंग्रामाला एक विस्तृत पाया मिळाला–शिक्षणाला एक नवीन अर्थ व उद्दिष्ट आले, सामाजिक जीवन अधिक मुक्त झाले. एक प्रकारच्या नैतिक उत्साहाने वातावरण भरून गेले. धुळीतून त्यांनी आम्हाला उचलले व मानव बनविले. स्वराज्याची इच्छा तोपर्यंत दिवसेंदिवस तीव्रतर होत होती. परंतु ते मिळवावे कसे, हा मार्ग मात्र कोणी दाखविला नव्हता. दक्षिण आफ्रिकेच्या लढ्यासाठी असहकार व सक्रिय कायदेभंगाचे नवीन अमोघ हत्यार गांधीजींनी तयार केले होते. काँग्रेसच्या मार्फत स्वराज्यप्राप्तीचे हे साधन त्यानी देशाला अर्पण केले.

**सत्य-अहिंसेचा मंत्र**

या काळात गांधीजी एका उदात्त नैतिक व आध्यात्मिक उंचीवर पोहोचले. मानवाला पोहोचता येईल अशा या नैतिक पातळीवर ते पोहोचले. एका भीरु, सामान्य मुलातून त्या युगातील एक महान विभूती साकार झाली. आपल्या देशबांधवांची सेवा करण्याच्या त्यांच्या निष्ठेतून काही नवे तत्त्वज्ञान त्यांनी संशोधले. पहिले म्हणजे सत्य. सत्‌चा अर्थ आहे 'अस्तित्व'. सत्य म्हणजे 'जे अस्तित्वात आहे ते,' म्हणजेच सत्याखेरीज काही अस्तित्वातच नसते, हे तर्कशास्त्रदृष्ट्या ओघानेच येते. लहान वयातच प्रथम आईच्या उपदेशातून आणि नंतर तत्त्वचिंतनातून सर्व कर्मांचे अधिष्ठान सत्य हेच असले पाहिजे, हे ते शिकले.

अहिंसा किंवा सर्वभूती प्रेम हे त्यांचे दुसरे 'संशोधन'. मानवामानवातील क्रियाप्रतिक्रियांची एकमेव प्रभावी पद्धती म्हणजे अहिंसा होय. मानवी संबंधातील बहुतेक सर्व समस्यांना त्यांत उत्तर आहे. अहिंसा हे एक सक्रिय तत्त्वज्ञान आहे; त्याचे सामर्थ्य हिंसेच्या सामर्थ्यापेक्षा उच्चतर आहे. सर्वभूती प्रेम व आदर, सर्वांना समाज दर्जा हा अर्थ त्यांत अभिप्रेत आहे. सत्य-अहिंसेचे हे तत्त्वज्ञान सर्व परिस्थितीसाठी वापरून द्वेष व संशय यांना जिंकण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे त्यांचे जीवन त्यांच्या अनुयायांना जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्फूर्तिदायक ठरेल.

बहुजनसमाजाच्या भाषेत गांधीजी बोलत, त्यामुळे त्याला त्यांचे विचार चटकन समजत. गांधीजींची राहणी सामान्य जनांसारखीच, अत्यंत साधी होती आणि त्यामुळेच स्वातंत्र्यसंग्रामात त्यांचे सहकार्य त्यांना मिळू शकले. आपल्या भोवती कार्यकर्ते गोळा करून त्यांतून त्यांनी नेते निर्माण केले आणि त्याचा प्रभाव त्यांच्या स्वतःवरही झाला. या सुसंवादातूनच स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी, पूर्वी अस्तित्वात नसलेले व्यापक ऐक्य त्यांनी प्रस्थापित केले.

स्वातंत्र्यासाठी देशाच्या विभाजनाची किंमत आपल्याला द्यावी लागली हे खरे. हे विभाजन त्यांच्या इच्छेविरुद्ध आपण मान्य केले, कारण प्राप्त परिस्थितीत

दुसरा उपायच नव्हता, असे आम्हाला वाटले. आपण स्वतंत्र झालो त्यावेळी ते व्यथित झाले. हिंदूवर व शिखांवर पाकिस्तानने जे अत्याचार केले व भारतातील काही भागात त्याला जे उत्तर देण्यांत आले ते, ते सहन करू शकले नाहीत. त्यांचे कोमल हृदय घायाळ झाले. या अत्याचारांना अहिंसात्मक मार्गानेच तोंड दिले पाहिजे, अशी त्यांची इच्छा होती. परंतु तेवढे नैतिक धैर्य आमच्यात नव्हते.

स्वातंत्र्य-संपादन हे केवळ त्यांच्या यशाचे बाह्यरूप होते. आमच्यात नैतिक धैर्य निर्माण करून आमचे जीवन व मानसमंदिर प्रकाशित करणे हे त्यांचे खरेखुरे यश होते. आपली भौतिक प्रगती आपण करू शकू. परंतु जर त्यामुळे नैतिक उत्साह कुंठित होणार असेल, तर काय अर्थ ठरतो ? संपन्न समाज आपल्याला खूप दिसू शकतील, परंतु सुखी समाज मात्र क्वचितच आढळतात. भौतिक सुखे म्हणजे काही केवळ सुख नव्हे, तर आंतरिक समाधानातून स्फुरण पावते ते खरे सुख आणि त्यासाठी अनासक्त व्हावे लागते, जीवनाला नैतिक मूल्यांच आधार द्यावा लागतो व आत्मिक शोधासाठी जीवन व्यतीत करावे लागते.

मानवाची प्रगती हीच त्याच्या सुखाचा मानदंड, असे गांधीजी मानीत. जास्तीत जास्त समाजाचे जास्तीत जास्त भले व्हावे ही उपयुक्ततावादी विचारसरणी किंवा प्रगतीचा एकमेव निष्कर्ष म्हणजे भौतिक विकास ही संपन्न समाजाची आधुनिक विचारसरणी, या दोन्हीही गांधीजींना मान्य नव्हत्या. सर्वोदय–सर्वांचेच जास्तीत जास्त चांगले–करणारी राज्यव्यवस्था त्यांना हवी होती. व्यक्तिमात्राला समान दर्जा व विकासाची समान संधी आणि स्वातंत्र्य असलेला समाज त्यांना हवा होता. आर्थिक प्रगती व सामाजिक न्याय दोन्ही एकत्र असतील असा साधा समाज त्यांना हवा होता. इंद्रियगम्य सुखांना ना अंत ना मर्यादा; म्हणून त्या बाबतीत संयम बाळगावा, असे त्यांचे मत होते.

**आत्मिक सामर्थ्याची प्रचीती**

मानवाच्या आत्मिक सामर्थ्याची प्रचीती त्यांनी जगाला आणून दिली. शारीरिक किंवा लष्करी सामर्थ्यापुढेदेखील आत्मा अजिंक्य असतो. भौतिक मूल्यांपेक्षा नैतिक मूल्ये श्रेष्ठ असतात. स्वार्थ-अभिलाषेपेक्षा सेवा व त्याग उच्च आहेत, हे त्यांनी दाखवून दिले. सत्याचे अनुपमेय सौंदर्य आणि आत्म्याची उदारता त्यांनी प्रत्यक्षात आणून दिली.

गांधीजी भौतिक उन्नतीचे विरोधक होते किंवा सर्वच परिस्थितीत यंत्राचा त्यांनी त्याग केला असे नाही. यंत्रांनी परिश्रम व वेळ वाचावा, परंतु तो काही थोड्या लोकांचा नव्हे, तर अखिल मानवजातीचा, ही त्यांची भावना होती. यंत्राचे गुलाम बनून माणसाने आपली अस्मिताच हरवून बसू नये, असे त्यांना वाटे. यंत्रे ही माणसासाठी असतात, माणूस यंत्रासाठी नव्हे, असे त्यांचे मत होते.

**' विश्वस्त ' सिद्धांत**

गांधीजींच्या सामाजिक न्यायाच्या भावनेत सत्ता-संपत्तीच्या केंद्रीकरणास थारा नव्हता. परंतु सत्ता-संपत्तीचे समान वाटप होऊ शकणार नाही, हे पण त्यांना माहीत होते. म्हणूनच आर्थिक विषमता कमी व्हावी व राजकीय असमर्थता दूर व्हावी यासाठी समान वाटपाचा त्यांनी पुरस्कार केला. भांडवलशाही समाजाचे समाजवादी समाजात परिवर्तन करण्यासाठी संपत्ती ही धनिकांकडे ठेवलेली ठेव आहे, हा ' विश्वस्त ' सिद्धान्त त्यांनी मांडला. या सिद्धांतात भांडवलशाही मान्य नव्हती, परंतु भांडवलदारांना चिरडून टाकण्याऐवजी आपल्या दृष्टिकोनात बदल करण्याची संधी त्यामुळे भांडवलदारांना मिळावी, हा त्यांचा हेतू होता. समाजाची ठेव म्हणून खाजगी ऐषआरामाऐवजी सामाजिक कल्याणासाठी संपत्तीचा उपयोग व्हावां, अशी गांधीजींची इच्छा होती.

समृद्धी व दारिद्र्य ही परस्पर-विसंगत आहेत असे मानले जाते. त्याचप्रमाणे जीवनातील यशापयशाचे मोजमाप कमावलेल्यासंपत्तीतून करण्यात येत असल्यामुळे जीवन यशस्वी व्हावे म्हणून कोणत्याही प्रकारे का होईना पैसा कमावणे हीच माणसाची प्रवृत्ती बनते, हेही दाखवून देता येईल. हाच निकष लावला तर बहुतेक प्रगत देशांची प्रगती निश्चितच झाली आहे. परंतु या संपन्नतेने माणसाच्या सुखात काही भर पडली आहे काय ? उलट, मानवजातीच्या अस्तित्वालाच आज जेवढा धोका आहे, तेवढा पूर्वी कधी नव्हता. अण्वस्त्रांच्या निर्मितीमुळे मानवजात संपूर्ण नष्ट होण्याची भीतीही निर्माण झाली आहे. फार मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण झाल्यामुळे आर्थिक सत्ता काही थोड्यांच्या हातात केन्द्रित होण्याचा आणि त्यातून मानव म्हणजे एक क्षुद्र आर्थिक साधन बनण्याचा धोका आहे. एकीकडे मानवी अस्तित्वच धोक्यात आहे, तर दुसरीकडे त्याची अस्मिता नष्ट होणार, असे संकट आहे. मानवी सुखासाठी हे संकट टळले पाहिजे. अंधारातच चाचपडत राहून आपल्याला चालणार नाही. हा अंधार घालविण्यासाठी मिळतील ती प्रकाशाची साधने आपण वापरली पाहिजेत.

**भौतिक सुखातून जीवनाविषयी निरुत्साह**

भौतिक सुखाची तृप्ती केव्हा ना केव्हा होतेच ! सुख हे साधने वाढूनही उत्तेजित झाले नाही की ही सीमा पोहोचते. पाश्चिमात्य देशांत अशी अवस्था आली आहे. विलासाची नवी नवी साधने व यांत्रिक क्लृप्ती निर्माण होऊनही त्यात विशेष असे काही तेथे वाटतच नाही. जीवनाविषयी एक प्रकारचा उत्साह त्यामुळे कमी होतो. जीवन उदास, कंटाळवाणे बनते. केवळ भौतिक सुखांच्या मागे लागून त्या पायी अस्मिता गमावण्याची पाळी येऊ नये, ही काळजी आपण घेतली पाहिजे. गुंतागुंतीच्या औद्योगिक जीवनाशी निगडित असलेले धोके आपण टाळले पाहिजेत. मानवी सुखासाठी अंतर्बाह्य शांती हवी, केवळ प्रतीक म्हणून नव्हे तर जीवनपद्धती म्हणून ही

शांती हवी. आधुनिक जीवनातील ही गुंतागुंत सोडविणे किंवा तिच्याशी समन्वय करणे आधुनिक समाजाला कठीण जाण्याचा संभव आहे, परंतु विकसित देश म्हणून आपण पुन्हा तीच चूक करून चालणार नाही. आपले भवितव्य आखताना गांधीजींची सुखाविषयीची कल्पना आपण दृष्टीपुढे ठेवली पाहिजे.

**साधन-शुचिता**

आंतरिक समाधान हवे असेल तर मानवाने सत्य-अहिंसेचा मार्ग स्वीकारला पाहिजे, असे गांधीजींनी सांगितले आहे. कोणताही मार्ग कितीही उपयुक्त असला तरी त्याचे नैतिक समर्थन करता येत नसेल तर तो त्यांनी कधी स्वीकारला नाही. यशाचा निकष ध्येयसिद्धी नाही; तर ध्येयाच्या इष्टानिष्टतेहूनही ध्येयसिद्धीची साधने अधिक महत्त्वाची आहेत, ही त्यांची श्रद्धा होती. दुर्दैवाने, ध्येय चांगले असेल, तर कोणतेही साधन वापरता येईल ही भावना कायमच राहिली व साधनशुचितेवर भर देणारे गांधीजीच एकटे उरले ! साधनशुचितेचे हे महत्त्व त्यांना जीवनाच्या आरंभीच दक्षिण आफ्रिकेच्या लढ्यात उमगले होते व पुढे त्यावरील श्रद्धा दृढतर होत गेली. स्वातंत्र्य-संग्रामातही त्यावर त्यांनी भर दिला. साधनशुचितेचा परिणाम तावडतोब दिसून येणार नाही, परंतु अखेर खरे सुख केवळ शुद्ध साधानांतून मिळू शकते. अनैतिक साधनांतून नैतिक फळ कधीच पदरात पडणार नाही. ध्येय साकार होवो वा न होवो, शुद्ध साधनांमुळेच केवळ मानव उदात्त बनू शकतो, त्याला समाधान मिळते. साधने शुद्ध असतील तर ध्येयसिद्धी होणारच, ही त्यांची श्रद्धा होती.

लोकशाही परंपरा आणि सार्वजनिक जीवनाची निरोगी आचारसंहिता बनवीत असताना सर्व उदयोन्मुख लोकशाही राष्ट्रांना गांधीजींची शिकवणच सामर्थ्य देईल. नैतिक पायावर नवी समाजरचना त्यांना उभारता येईल.

गांधीवादाचे काही ठरीव सिद्धान्त गांधीजींनी मांडलेले नाहीत, परंतु त्यांच्या जीवनातूनच त्यांचे तत्त्वज्ञान प्रतिबिंबित झाले आहे. ते इतके मूलभूत आहे की, व्यक्तीला त्याची भुरळ पडते. नागरी विचारवंतांना त्यांचे आर्थिक तत्त्वज्ञान किंवा सक्रिय कार्यक्रम पटतीलच असे नाही. परंतु सर्वसामान्य जनतेने त्यांच्या जीवनातून व विचारांतून स्फूर्ती घेतली घेतली आहे. या तत्त्वज्ञानाची कोट्यवधींनी मानस-पूजा केली आहे. स्थलकालाच्या मर्यादा त्याने उल्लंघिल्या आहेत.

माझ्या मताने या तत्त्वज्ञानाला दुसरा चांगला पर्याय नाही. अण्वस्त्रांमुळे मानवाला दहशत बसली आहे आणि सृजनशील अभिव्यक्तीला वाव नसल्यामुळे त्याच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे, म्हणूनच स्वतःच्या अस्तित्वासाठी गांधीजींचा आदर्श त्याने समोर ठेवला पाहिजे.

६

# सर्वांभूतीं समभाव

रंगराव दिवाकर

गांधीजींची प्रेमभावना केवळ मानवापुरतीच मर्यादित नसून प्रत्येक सचेतन प्राण्यावरही होती. सर्वांभूतीं समभाव ठेवल्यानेच मानवी जीवनांत सत्याचा साक्षात्कार होतो. गांधीजींच्या विश्वस्त कल्पनेचाही उगम याच तत्त्वातून कसा झाला, याची मीमांसा पुढे केलेली आहे.

गांधींविषयी एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवावयाची म्हणजे, त्यांचा विकास होण्याचे व आत्मज्ञानी मानवाच्या उच्च ध्येयाकडे उत्क्रांत होण्याचे कार्य कधीच थांवले नाही. दुसरी एक गोष्ट तितकीच महत्त्वाची आहे की, लेखन आणि भाषण यांच्या द्वारे आपले विचार जनतेला विदित करण्याची त्यांची सदैव तयारी असे, इतकेच नव्हे तर त्यांना प्रतीत होणाऱ्या सत्यानुरूप ते वेळोवेळी कृतीच्या द्वारे जनतेला आपला संदेश पोचवीत. ते परमोच्च कोटीचे ध्येयवादी होते यांत शंका नाही; पण मानव, मानवेतर व त्यांचे परस्पर-संबंध यांना मूर्त स्वरूप देण्यानेच ज्याचे ध्येय साध्य होईल, अशा वृत्तीचे ते ध्येयवादी होते. त्यांचे जीवन आध्यात्मिक होते, पण त्यांच्या अध्यात्मात अदृश्य, गूढ कल्पनांना थारा नव्हता; आपल्या परमार्थमार्गाचे रूपांतर ऐहिक व्यवहारात करण्याचा ते पराकाष्ठेचा प्रयत्न करीत—मग ही ऐहिकता धार्मिक, आर्थिक, राजकीय किंवा नैतिक अशा कोणत्याही क्षेत्रांतील असो.

या विश्वाच्या मुळाशी कोणती तरी सर्वश्रेष्ठ, अपार, अनंत शक्ती आहे, अशी

त्यांची दृढ श्रद्धा होती आणि या पृथ्वीतलावर अस्तित्वात असलेली प्रत्येक वस्तू म्हणजे त्या शक्तीचे अत्यंत क्षुद्र रूप आहे, असे ते मानीत. ते स्वत:लाही क्षुद्राति-क्षुद्र समजत. या सर्वोच्च सत्यतत्त्वाचे ते जसे शोधक होते, तसे उपासकही होते. ते तत्त्व ओळखणे, त्याचे ज्ञान करून घेणे व ते प्रस्थापित करणे ही त्यांची साधना होती. त्या दिव्य शक्तीच्या अनंत स्वरूपाचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी प्रार्थना व ध्यानधारणा ही साधने उपलब्ध असतानाही, सर्व जीवमात्रांशी ऐक्य, प्रेम, सेवा, क्लेश, त्याग या साधनांचा त्यांनी त्याच ध्येयासाठी अंगीकार केला.

त्यांच्या दृष्टीने सार्वभौम शक्ती म्हणजे सत्य, प्रकाश, प्रेम आणि न्याय ही होय. ही शक्ती सभोवतालच्या वस्तुमात्राशी योग्य संबंध ठेवण्यानेच प्राप्त होणारी आहे, विचार, भावना व कृती यांच्या द्वारे तिचा लाभ होणार आहे. कारण, प्रत्येक सचेतन आणि अचेतन वस्तू त्या सर्वोच्च शक्तीचे प्रतिबिंब आहे.

सत्य आणि अहिंसा हे दोन तेजस्वी तारे आपल्याला सतत मार्गदर्शन करतात, असे पुन्हा पुन्हा सांगण्याचा गांधींनी कधी कंटाळा केला नाही. ही दोन तत्त्वे म्हणजे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, असे ते म्हणत. म्हणून मला असे म्हणावेसे वाटते की, 'अहिंसेच्या द्वारेच सत्य' हाच त्यांचा धर्ममार्ग होता. अहिंसा, प्रेम, समभाव या साधनांच्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही साधनांनी त्यांनी सत्याचा शोध केला नाही. भारताच्या कल्याणासाठीच नव्हे, तर इंग्लंडच्या हितासाठीही त्यांनी निकराचा अहिंसक लढा दिला. तो ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध होता, ब्रिटिश जनतेविरुद्ध नव्हता. ज्या ब्रिटिश सत्तेने आपले साम्राज्य पिळवणुकीवर व जुलमावर उभारले होते, त्याचा जर ब्रिटनने त्याग केला, तर त्या राष्ट्राचे शुद्धीकरण होईलच, शिवाय ते अधिक उदात्त व चारित्र्यसंपन्न होईल, असा त्यांना विश्वास वाटत होता.

भारताच्या प्राचीन परंपरेनुसार गांधींची अशी श्रद्धा होती की, पृथ्वीतला-वरील सचेतन जीवसृष्टी एकात्म आहे. जे जे जीवमान व चैतन्यमय आहे त्याच्याशी ते एकरूप होत. चराचराशी एकरूप होणे हा दिव्य शक्तीच्या साक्षात्काराचा मार्ग आहे, असा त्यांचा विश्वास होता. मला ईश्वराचे साक्षात् दर्शन घ्यावयाचे आहे, असे ते म्हणत. आणि त्यांचे हे प्रयत्न, ज्याला ते अर्थपूर्णतेने व व्यापकपणे 'अहिंसा' म्हणत, त्या मार्गाने फलद्रूप झाले. त्यांच्या दृष्टीने अहिंसा हे 'हिंसेचा अभाव' या दृष्टीने केवळ नकारात्मक तत्त्व नव्हते, तर ते प्रेम, सर्वसमभाव व समतेची भावना यांच्या स्वरूपाचे प्रत्यक्ष क्रियाशील तत्त्व होते. दलितांतले दलित, गरीबांतले गरीब बांधव यांच्याविषयी समतेची व सेवेची भावना, त्यांच्या कल्याणासाठी करावा लागणारा त्यागच नव्हे, तर वेळप्रसंगी सर्वस्वाचे बलिदान करण्याची तयारी, या रूपाने ते प्रेम प्रगट झाले नाही, तर ते दुसऱ्या कोणत्या स्वरूपात प्रगट होणार ?

निर्भेळ सत्य, सर्वोच्च प्रतीचे सत्य, मूलभूत वास्तवता व क्रांतदर्शी अस्तित्व

याचा त्यांना साक्षात्कार होत होता, यात शंका नाही. मानवी जीवनांत हे सत्य उतरावयाचे तर सर्वांभूतांठायी समभाव या वृत्तीनेच ते प्रत्ययास येणार. परमोच्च सत्यतत्त्वाचे हेच महत्त्वाचे अंग आहे. सचेतन सृष्टीत प्राणी आणि प्राणिमात्रात सर्वांत निकटचा असा मानव हाच सर्व वस्तूंचा मानदंड होय, असे ते मानीत असत. सर्व दृष्टीने मानवाची बंधमुक्तता हे सर्वोच्च ध्येय आहे असे ते समजत. त्यांच्या मते, हे ध्येय गाठण्यासाठी अहिंसा आणि प्रेम हे दोनच मार्ग असल्यामुळे, आपली सर्व शक्ती पणाला लावून, त्यावर ते आपले लक्ष केन्द्रित करीत. प्रेमाने, नि:स्वार्थी वृत्तीने, त्यागाने, देहदंड-यातना सहन करून, सर्वांच्या हितांत आपले हित आहे, अशा भावनेनेच मानवाची मुक्तता होईल, असे ते मानीत.

गांधीजी हे केवळ ध्येयवादी नव्हते अगर शुष्क तर्कवादी नव्हते. जीवसृष्टीत मोठ्या प्रमाणावर सतत हिंसा चालू असते, हे जाणण्याइतके ते खास व्यवहारी व वास्तववादी होते. प्राणी आपल्या उपजत वृत्तीनुसार वागतात. सहेतुक अशी त्यांची कृती नसते. उत्क्रांतीच्या श्रेणीत मानवाने उच्च स्थान संपादन केले आहे आणि त्याला याहीपेक्षा उच्च स्थान गाठावयाचे असेल, तर त्याने ह्यापेक्षा श्रेष्ठ तत्त्वांचा अवलंब केला पाहिजे. हे तत्त्व म्हणजे प्रेम. प्रेम हा मानवी जगाचा कायदा आहे आणि पाशवी शक्ती हा जंगली जगाचा आहे. सत्याच्या प्रतिष्ठेसाठी अन्यायाचा आणि पापाचा प्रतिकार करणे, हे अहिंसेच्या स्वीकृतीचे आणखी एक कारण आहे, असे त्यांनी सांगितले.

सत्याचे ज्ञान करून घेण्याची आपली शक्ती व मार्ग हीच अंतिम आहेत आणि त्याव्यतिरिक्त सत्याचे ज्ञान करून घेण्याचा दुसरा कोणताच दृष्टिकोन असू शकणार नाही, असे मानवाला कधीच सांगता येणार नाही. म्हणून हिंसेने आणि वळजबरीने ते त्याला सिद्ध करता येणार नाही. त्याला भासमान झालेले सत्य, कोणत्याही पाशवी शक्तीच्या जोरावर, इतरांवर लादण्यापेक्षा तो ते सिद्ध करण्यासाठी स्वत: कष्ट सोसण्यास तयार होईल.

या सर्व प्रश्नांचे सार शेवटी एकाच सिद्धांतात ग्रथित होते—आणि तेच या प्रश्नाचे उत्तरही ठरते. तो प्रश्न म्हणजे आपण व आपल्या संपर्कात येणारे इतर, या दोघांतील संबंध कोणते आणि कसे असावेत, मग ते कोणत्याही कारणासाठी, विरोधासाठी का असेनात. हे अन्योन्य-संबंध निर्भेळ प्रेमाचे, सर्वांचे हित साधणारे, सेवा आणि त्याग यांवर आधारलेले पाहिजेत. आपला इतरांशी संबंध आल्याबरोबर आपल्या अंत:करणात ज्या ज्या भावना अगर विचार उद्भवतात, ते सर्व एकाच उत्कट प्रेमाच्या निर्झरांत मिसळून जावेत आणि इतरांशी वागताना जीवनाला अमृत–स्पर्श देणाऱ्या सहृदयतेने आणि सार्वजनिक हिताच्या सद्भावनेने ओथंबून जावेत. गांधीजी ही प्रेमभावना केवळ मानवापुरतीच मर्यादित न ठेवता प्रत्येक सचेतन प्राणिमात्रावरही तिचा वर्षाव करीत.

गांधीजींच्या या मौलिक विचारानुसार त्यांचा संपत्तिविषयक दृष्टिकोन कसा आहे तो पाहू. मालमत्ता किंवा संपत्ती हा शब्द योजण्यात माझा हेतू त्यांत प्रत्येक चराचर वस्तू, स्वत:चे शरीर, बुद्धिकौशल्य या सर्वांचा अंतर्भाव होतो. 'अहिंसेच्या द्वारेच सत्य' या तत्त्वानुसार व त्यांच्या विशिष्ट विचारप्रणालीप्रमाणे, गांधीजींनी मालमत्तेबाबत आपला दृष्टिकोन बनविला होता. विश्वस्ताची कल्पना त्यांना पूर्णपणे विकसित करता आली नाही, तरी मालमत्तेकडे विश्वस्त म्हणून पहाण्याचा एक नवा दृष्टिकोन त्यांनी उपलब्ध करून दिला. मालमत्तेकडे विश्वस्त म्हणून पाहण्याची कल्पना आजकालच्या जीवनाला अपरिचित अशी नाही. खरे म्हणजे मातापिता हे आपल्या मुलांचे अनेक अर्थाने विश्वस्तच नव्हेत काय ? सार्वजनिक हितासाठी कांही विशिष्ट उद्देशाने खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेचे विश्वस्त-निधी केले जातात. याच कल्पनेचा विस्तार संपूर्ण मानवी जीवनाशी—आणि वरील अर्थाने सार्वजनिक मालमत्तेशी—करणे हाच गांधीजींचा अभिप्रेत हेतू आहे. सार्वजनिक हितसंरक्षणासाठी एकाद्या पंचांची किंवा कमिटीची नेमणूक होणे आवश्यक असते, ही कल्पना त्यांनी अमान्य केली नाही; पण वंशपरंपरेने विश्वस्त म्हणून राहणे किंवा मालमत्तेचा विनियोग वैयक्तिक फायद्यासाठी करणे ही कल्पना त्यांना स्वप्नातही पटण्याजोगी नव्हती.

मानव आणि मालमत्ता यांचा विस्तार व संबंध म्हणजे अखिल मानवजात व तिची शारीरिक, मानसिक व बौद्धिक शक्ती असा केला तर त्या शब्दांना विशेष अर्थ प्राप्त होतो. विश्वस्त मंडळी मालमत्तेचे संरक्षक व संवर्धक होतील तरच या कल्पनेला विशेष सामर्थ्य प्राप्त होईल. मालमत्तेच्या विनियोगाचा जेव्हा प्रश्न उद्भवेल, तेव्हा विश्वस्तांनी स्वार्थासाठी तिचा विनियोग न करता, सार्वजनिक कल्याणासाठीच केला पाहिजे. असे केले तरच ते विश्वस्त, गांधीजींच्या मते, विश्वस्तपणाला लायक ठरतील.

अशा प्रकारे गांधीजी मानव आणि मानवतेर प्राणी यांच्यात असे अन्योन्य प्रेमसंबंध, आपुलकीची भावना, आत्मौपम्यबुद्धी प्रस्थापित करू इच्छितात. एवढेच नव्हे तर मानवाला याहीपेक्षा विशेष असे काही करून दाखविता येईल. उदाहरणार्थ, तो दुसऱ्यांकरिता सर्वस्वाचे बलिदान करू शकेल. असा त्याग करू शकेल की, तो त्याला स्वत:च्या हितासाठीही करता येणार नाही. आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्याचा एक प्रकारे हा फायदाच आहे. या ठिकाणी प्रेम म्हणजे केवळ अहिंसाच नव्हे, तर प्रगतीला विघातक, अन्याय्य, पापमूलक आणि मानवाला कलंक लावणाऱ्या सर्व अनिष्ट गोष्टींचा त्याग करून सार्वजनिक हितासाठी जे जे करणे शक्य असेल ते ते सतत करीत रहाणे म्हणजे प्रेम. हे प्रेम प्रत्यक्ष व वास्तवदर्शी आहे. गांधीजींच्या मते मालमत्ता हे समाजाचे कल्याण करण्याचे एक साधन आहे. स्वार्थ सोडून व्यक्तीचे कल्याण साधण्याने सामाजिक कल्याण साधते. यावरून, गांधीजींना अभिप्रेत असलेली विश्वस्त कल्पना वाचकांना कळून येईल.

७

# गांधीधर्म – सत्याग्रह

## डॉ. भवानीशंकर नियोगी

गांधीजींच्या धर्मबुद्धीचा विकास कसकसा होत गेला, याचा मागोवा घेऊन लेखकाने पुढील लेखात गांधीजींच्या सत्याग्रहाची मीमांसा केली आहे, आणि म्हटले आहे, " गांधीधर्म हा अंत:शुद्धी व लोककल्याण घडविणारा आहे. " बुध्द व गांधी यांच्या तत्त्वज्ञानाची तुलना लेखाच्या प्रारंभापासून शेवटपर्यंत अनुस्यूत आहे.

१९ व्या शतकाच्या ३ ऱ्या दशकांत जर्मनीतील सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता हेगेल याने आपल्या 'इतिहासाचे तत्त्वज्ञान' या विषयावरील व्याख्यानामध्ये भारतातील ज्ञानभांडार( treasures of wisdom)व निसर्गदत्त संपत्ती ( treasures of nature) पश्चिमेकडे गेली याचा स्तुतिपर उल्लेख करून, "भारताने जगाच्या इतिहासांत कोठेही व केव्हाही बाहुबलाने पराक्रम गाजविला असे एकही उदाहरण नाही; पण याच्या उलट, परकीय आक्रमणाला वाव देऊन तो सदैव पारतंत्र्यांतच गुरफटत राहिलेला आढळतो. सध्या भारतावर इंग्रजांची सत्ता आहे व लवकरच चीन देशाचीही तीच गती होणार आहे. आशियातील सर्व साम्राज्ये गौरवर्णीय शौर्यापुढे ढासळून पडतील, हे विधिलिखित सत्य आहे''–असे विधान केले.

ही गोष्ट खरी की, त्या काळी आशियांतील देशांची बरीच अवनत स्थिती होती. तथापि पाश्चात्य संस्कृतीच्या लाटेला अडविणारा राजा राममोहन राय तेव्हा निघाला. गेल्या शतकाच्या ६ व्या दशकामध्ये लोकमान्य टिळकांचा जन्म झाला व

ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याचा सशस्त्र प्रयत्नही झाला. त्यानंतर ७ व्या दशकामध्ये मोहनदास गांधींचा जन्म झाला, २० व्या शतकाच्या सुरवातीस लोकमान्य टिळक हे भारतीय असंतोषाचे जनक झाले व त्याच्या मध्यामध्ये गांधीजींनी ब्रिटिशांना आपखुशीने सत्तात्याग करण्यास भाग पाडले.

संसाराची गती कशी "चक्रनेमिक्रमेण" चालत असते, त्याचे हे प्रत्यक्ष उदाहरण आहे. "चरखा चला चलाके लेंगे स्वराज्य लेंगे" या पदामध्ये अभिप्रेत असलेल्या सत्याचा जेव्हा विजय झाला, तेव्हा चरख्याचा पुरस्कर्ता 'राष्ट्रपिता' झाला व चरख्याला धर्मचक्राचे रूप प्राप्त होऊन ते नवोदित भारत–राष्ट्राचे बोधचिन्ह झाले.

निर्जीव चरख्याला भारताच्या सुप्तशक्तीचा स्फोट करण्याचे सामर्थ्य जेथून आले, त्याला मी 'गांधी-धर्म' ऊर्फ सत्याग्रह असे म्हणतो.

साधारणपणे धर्म म्हणजे परंपरागत निष्ठा, समजुती व चाली यांचा बोध होतो. परंतु धर्म हा फार व्यापक शब्द आहे. या ठिकाणी 'स्वलक्षणधारणात् धर्मः' या यशोमित्राच्या व्याख्येप्रमाणे विशिष्ट अर्थाने वापरला आहे. उदाहरणार्थ, अग्नीचा स्वभाव उष्णता व त्याचा धर्म दाहकत्व, या दृष्टिकोनातून गांधीधर्म हा सत्याग्रह कसा होतो, हे दर्शविण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे. ज्या अर्थाने समर्थ रामदासस्वामींनीं " मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्रधर्म वाढवावा " या वचनांत "धर्म" हा शब्द वापरला होता, तो लक्षात आणल्यास 'गांधीधर्मा'चे मर्म सहज स्पष्ट होईल.

हा 'गांधीधर्म' दोन प्रकारांनी प्रकट होतो. पहिला प्रकार म्हणजे भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे अशोकचक्र आपले राष्ट्रचिन्ह म्हणून स्वीकारले तो. या सांकेतिक चिन्हांत ३ गोष्टी अभिप्रेत आहेत:–

(१) जंबुद्वीपाची (भारतवर्षाची) राष्ट्रीय एकात्मता

(२) विश्वधर्माची प्रेरणा व प्रसार

(३) सर्वधर्म समानत्व

१. अशोक साम्राज्याचा विस्तार काश्मीर ते म्हैसूर, अफगाणिस्तान–बलुचिस्तान ते बंगाल इतका होता. " महालोको हि विजितो" असे शिलालेख १४ मध्ये नमूद केले आहे. " समुद्रपर्यन्ताया एकराट्" करण्याचा हा पहिला उपक्रम होता.

२. शिलालेख १३ मध्ये " तमेव विजयं मन्यतां यो धर्मविजयः " असे आपले ब्रीद सांगून अशोकाने आपले भिक्षू पश्चिमेकडे पाठविले. याची संपूर्ण हकीकत 'महावंशा"त आढळते. याचा दाखला अलेक्झांड्रियाचा धर्मगुरु क्लेमंट याने ख्रिस्ती सनाच्या दुसऱ्या शतकाच्या अखेरीस लिहिलेल्या आपल्या धर्माच्या इतिहासात मिळतो. त्यात त्याने बुद्ध व बुद्धधर्माचा उल्लेख केला आहे. ('Life of Buddha,' by E. J. Thomas, p. XIII.)

३. सर्व-धर्म-समानत्वाचा पुरस्कार "देवानां प्रियः प्रियदर्शी राजा सर्वान् पाषंडान् प्रव्रजितान् गृहस्थांश्च पूजयति. . . . सारवृद्धिः स्यात् इति. . . " (शिलालेख १२) "समवाय एव साधु".

याच 'धर्मचक्रा'चा प्रभाव गांधीजींच्या शिकवणीत व त्यांच्या जन्मशताब्दी समारंभाला जे जागतिक महत्त्व प्राप्त झाले, त्यात असंदिग्धपणे दिसतो.

'गांधीधर्म' जाणण्याचा प्रकार म्हणजे, "यो मां पस्सति सो धम्मं पस्सति, यो धम्मं पस्सति सो मां पस्सति।" हे जसे भगवान बुद्धाचे वचन तसेच गांधीजींनी आपला "धर्म" व्यक्त केला तो असा:– You must watch my life, how I live, eat, sit, talk, behave in general. The sum total of all these in me is my religion. ( Mahatma Gandhi, Last Phase )

अर्थातच गांधीजींच्या 'धर्मा'चे शुद्ध स्वरूप त्यांचे चरित्र व चारित्र्यातच प्रतिबिंबित झालेले दिसेल. त्याकडे आपण प्रथमतः वळू.

गांधीजींचा जन्म १८६९ साली २ ऑक्टोबर रोजी झाला. चातुर्वर्ण्याच्या चौकटीत ते वैश्य व परंपरागत धर्मदृष्टचा ते वैष्णव होते. त्यांच्या तीन पिढ्या राज्यकारभारांत गुंतून त्यांचे वडील पोरबंदर व राजकोटचे दिवाण झाल्यामुळे त्यांना त्या वातावरणाची बाल्यावस्थेतच झळ लागणे स्वाभाविक होते.

शाळेत कोठेही त्यांना धर्मशिक्षण मिळाले नाही. त्यांच्या १४व्या वर्षीच त्यांचा विवाह झाला. त्यांचे विष्णुमंदिरात (हवेलीत) जाणे-येणे होई, परंतु त्यातून त्यांना जी प्रेरणा मिळाली नाही ती त्यांच्या रंभा नामक दाईकडून रामनामाच्या जपाच्या द्वारे मिळाली. त्या जपात काही अमोघ शक्ती आहे अशी शेवटपर्यंत त्यांची श्रद्धा होती. रामायणांतील व वडिलांच्या परिचित मंडळींपैकी कांही जैन, मुसलमान व पार्शी होते त्यांनी आपापल्या धर्माबद्दल सांगितलेल्या गोष्टी कानावर पडून या सर्व धर्मांबद्दल समान भाव त्यांच्यामध्ये उत्पन्न झाला. परंतु ख्रिस्ती धर्म मात्र त्या वेळेस त्यांना तिरस्करणीय वाटला. ख्रिस्ती धर्मप्रचारक हिंदुधर्माची व देवतांची नालस्ती करीत असत व धर्मांतरानंतर बाटविलेल्या माणसाला गोमांस खावयास व दारू पिण्यास, व इंग्रजी पोशाख चढवून आपल्या पूर्वजांच्या धर्माची टवाळी करण्यास उत्तेजन देत असत, हे त्या तिरस्काराचे कारण होते.

१८८७ साली गांधीजी मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. या देशात पुढे अभ्यासक्रम न चालविता त्यांनी इंग्लंडला बॅरिस्टरच्या परीक्षेला बसावे असा विचार ठरला, पण हे त्यांच्या मोट वाणिया जातिबांधवांना न पटल्यामुळे त्यांना जाति-बहिष्कृत व्हावे लागले. तथापि, त्यांनी इंग्लंडला जाण्याचा निश्चय कायम केला, पण त्यांच्या मातुःश्रीला मात्र त्यांच्या परदेशगमनाबद्दल धर्मदृष्टचा भीती वाटणे स्वाभाविक होते. तिचे निराकरण करण्यासाठी त्यांनी परदेशात गेल्यावरही

मांस, मदिरा व महिला यांपासून अलिप्त राहण्याचे अभिवचन दिले. त्यामुळे मातु:श्रीचेही समाधान झाले.

अशा रीतीने ते स्वदेशातून बाहेर पडले तेव्हा त्यांच्याजवळ वर निर्दिष्ट केलेल्या धर्मसमजुती मातु:श्रीला दिलेल्या प्रतिज्ञेच्या गाठीने बांधलेल्या पुरचुंडीत साठवून ठेवलेल्या होत्या. बाह्यत: यात काही विशेष नव्हते, परंतु "मातृदेवो भव" हा उपनिषदातील आदेश त्यांच्या अंतकरणावर कोरला गेला.

मुंबईच्या बंदरात ते बोटीवर चढले तेव्हा त्यांच्यापुढे पोशाख, खाद्यपेय, इंग्रजी बोलभाषा इत्यादी बाबतीत अडचणी उत्पन्न झाल्या. पण ते मांसाहार, मद्य-प्राशन यांपासून अलिप्त राहिले. इंग्लंडमध्ये असताना ते एका अन्नाहारी (vegetarian) संस्थेचे सदस्य झाले व नंतर त्यांनी एका अन्नाहारी मंडळाची स्थापनाही केली. Dr. Oldfield हे अध्यक्ष व Sir Edwin Arnold हे उपाध्यक्ष व हे स्वत: मंत्री झाले. हा त्यांच्या संस्थास्थापनेच्या उपक्रमाचा श्रीगणेशा होता.

त्यांच्या थियॉसफिस्ट मित्रांकडून त्यांच्या हातांत Sir Edwin Arnold यांनी लिहिलेले भगवद्गीतेचे इंग्रजी भाषांतर व भगवान बुद्धाचे Light of Asia नामक चरित्र अशी दोन पुस्तके पडली. गीतेच्या तत्त्वज्ञानाचा त्यांच्या मनावर प्रभाव पडला, पण बुद्धचरित्राने तर त्यांना मोहूनच टाकले. एका ख्रिस्ती गृहस्थाच्या आग्रहावरून त्यांनी बायबल वाचले. पण जुन्या कराराचा, विशेषत: नंबर्स (Numbers) चा तर त्यांना तिटकाराच आला. तथापि नव्या करारातील येशूच्या गिरि-प्रवचनाचा (Sermon on the Mount) मात्र फार अनुकूल ग्रह झाला. गीता-बुद्ध-येशूप्रणीत धर्माचा गाभा म्हणजे "त्यागबुद्धी" आहे, हे त्यांच्या हृदयात रुजले.

कायद्याच्या अभ्यासामध्ये त्यांनी रोमन-डच कायद्यांचाही परिचय झाला. १८९१ च्या जून महिन्यात त्यांना बॅरिस्टरीची सनद मिळवून व इंग्लंडच्या हायकोर्टात २।। शिलिंग भरून आपले नांव नोंदून घेतले, व ते भारतात परत आले.

काठेवाडात व मुंबईत जे कोर्टाभोवती वातावरण होते, ते त्यांना विषमय वाटले. पुढे काय करावे असे प्रश्नचिन्ह डोळ्यासमोर उभे राहिले व भावी काळावर अंधकाराचा पडदा पडलेला दिसला. अशा निराशाजनक अवस्थेत एक प्रकाशाचा किरण प्रकट झाला. पोरबंदरच्या एका मेमन पेढीकडून अनपेक्षितपणे काम चालून आले. दक्षिण आफ्रिकेतील एका कोर्टात दावा चालू होता, त्यातील वकिलांना अशीलाची बाजू समजावून देण्याचे ते काम होते.

१८९२ साली ते नाताळला पोहोचले. तेथे त्यांच्या नाट्यपूर्ण जीवनाची नांदी झडली. हे नाताळचे बंदर होते. तेथे उतरल्याबरोबर हिंदी लोकांना तेथे किती तुच्छतेने वागविण्यात येते, याची त्यांना जाणीव झाली. हिंदी लोकांमध्ये तट पडले होते. मुसलमान अरब म्हणून व पारशी पर्शियाचे म्हणून वावरत असत. त्यांना

त्या त्या देशाची पगडी वापरण्यास मुभा होती, परंतु गांधीजींना मात्र बंगाली घाटाची पगडी घालून वावरणे शक्य नव्हते. कारण ते हिंदू होते, व हिंदुस्थानांतून मजुरीच्या करारावर गेलेले तामीळ, तेलगू व उत्तरप्रांताचे लोक "कूली" म्हणून ओळखले जात. तदनुसार गांधीजी हे "कूली" बॅरिस्टर म्हणून पहिल्या वर्गाच्या डब्यातून त्यांना धक्का मारून बाहेर ढकलण्यात आले. असे अनेक उपमर्दकारक प्रसंग त्यांच्यावर आले. ते ब्रिटिश नागरिक व बॅरिस्टर असताना त्यांच्यावर असा दुर्धर प्रसंग यावा, याचे मूळ कारण "वर्णविद्वेष" आहे हे स्पष्ट झाले. या वर्णविद्वेषाच्या आव्हानाचा प्रहार त्यांच्या तीन अंगांवर पडला : ती ब्रिटिश बॅरिस्टर, हिंदी नागरिक व मानव अशी अंगे होती. पर्यायाने तात्त्विक दृष्टचा हा मानवी हक्काचा ( Human Right ) यक्षप्रश्नच उद्भवला.

त्या वेळेस काही रे. कीट्स्सारखे ख्रिस्ती पाद्री त्यांना येशूची प्रार्थना करून त्यातून मुक्ती मिळविण्यास गळ घालीत होते. येशू हा मनुष्य व ईश्वर यांत मध्यस्थ असल्यामुळे त्याच्या कृपेने हा प्रश्न सुटेल, अशी त्यांना आशा दाखविली जात असे. याशिवाय त्यांच्या गळ्यातील मातु:श्रीने दिलेली कंठी काढून टाकण्याचा सल्ला दिला जात असे. यामुळे तर त्यांना अशा ख्रिस्ती धर्मप्रसाराचा अधिकच तिटकारा आला.

गांधीजींच्या मनावर गीतेच्या तत्त्वज्ञानाचा व भगवान बुद्धाच्या चरित्राचा परिणाम झाला होता, हे वर सांगितलेच आहे. त्यांचा आदेश केवळ प्रार्थनेचा नव्हता, तर "कुरु कर्मैव तस्मात् त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम्।" "माम् अनुस्मर युध्य च" "तुम्हे हि किच्चमातप्पम्, कम्मना वत्तति लोको" अशा शब्दांत स्वप्रयत्नावर होता व त्या दोहोंचेही मूळ जे उपनिषद त्यांतही "सत्येन लभ्यस्तपसा" असा पौरुष जागृत करणारा संदेश होता. तदनुसार गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत "निसर्गसिद्ध मानवी हक्कांच्या ( Natural Human Rights ) प्रतिज्ञापूर्वक प्रतिपादनाच्या रूपाने अहिंसक युद्धाची आघाडी सुरू केली. त्यांत त्यांनी अखेरीस जे यश मिळविले, त्यायोगे त्यांनी मानवजातीतील सर्व दलित वर्गांच्या उद्धाराचा मार्ग खुला केला.

प्रथमत: गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती व मद्रासी, पंजाबी, सिंधी, कच्छी, सुरती यांचे एक मंडळ स्थापन केले. यांत गांधीजींचे जे पहिले भाषण झाले त्यांत हिंदी लोकांत ठळकपणे जे दोन दोष दिसत होते त्यांचे परिमार्जन करणे अवश्य आहे, असा त्यांनी आत्मशुद्धीचा पहिला धडा शिकविला. ते दोष म्हणजे व्यवहारामधील असत्य वागणूक व राहणीतील गलिच्छपणा हे होते. याच काळी त्यांच्या वाचनामध्ये टॉलस्टॉयचे Kingdom of heaven is within you ( वैकुंठ तुमच्या हृदयात आहे ) व रस्किनचे Unto This Lost ही पुस्तके आली, व त्यांनी हिंदी लोकांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्यांचा अभ्यास

केला. सुरुवातीस अमलदारांच्या भेटी घेणे, अर्ज करणे इत्यादी कायदेशीर मार्गाने आपल्या हालअपेष्टेवर इलाज करण्याचे ठरले.

१८९४ साली हिंदी मताधिकार प्रतिबंधक ( Disfranchisement Bilc ) कायद्याचा मसुदा तयार करण्यात आला. त्याला विरोध करण्याकरिता Natal Indian Congress ची स्थापना झाली. Indian Opinion नावाचे वर्तमानपत्र सुरू करून ते फीनिक्स आश्रमास जोडले गेले. त्याच्या द्वारे हिंदी लोकांच्या व्यथा वेशीवर टांगण्याचा प्रयत्न चालू असतानाच १९०७ मध्ये Registration (नोंदणी) चा कायदा झाला. त्याच्या विरोधार्थ जो लढा सुरू झाला, त्याला Passive Resistance (निशस्त्र प्रतिकार) हे नाव मिळाले. हा लढा फार निकराने १९१४ पर्यंत चालवून Indian Relief Act अमलात आल्यावर मिटला. तो लढा चालू होता तोपर्यंत हजारो सत्याग्रहींची त्यांच्या कुटुंबांच्या पोषणाकरिता टॉलस्टॉय फार्ममध्ये व्यवस्था करण्यात आली. तेथे ते सर्व हिंदी लोकांचे जाति-धर्म-भाषा-प्रदेश-निरपेक्ष असे एकमेव नेते बनले. अप्रत्यक्षपणे ते तेथे भारतीयांशी एकरूप झाले होते.

१९१४ साली गांधीजींना दक्षिण आफ्रिकेमध्ये जे यश मिळाले त्याचा लाभ सर्व मानवजातीला मिळावा हेच त्यांच्या "सत्याग्रह" युद्धाचे रहस्य होते. ते १९१५ च्या जानेवारी महिन्याच्या ६ तारखेस भारतात परत आले. १८९४ पासून ते १९१४ पर्यंत म्हणजे २० वर्षांत गांधीजींची आध्यात्मिक परिणती कशी होत गेली, याचे संक्षिप्त वर्णन असे करता येईल. दक्षिण आफ्रिकेमध्ये जो 'लघुभारत ' होता, त्याला जगामध्ये जे हीन स्थान प्राप्त झाले होते, त्याचा त्यांनी चिकित्सक अभ्यास केला, इतकेच नव्हे तर अप्रत्यक्षपणे तेथे भारतीय नागरिकाचे ब्रिटिश नागरिक म्हणून व मानवी प्राणी म्हणून जे स्वभावसिद्ध हक्क होते, त्यांना विधिपूर्वक मान्यता मिळविण्याकरिता "सत्याग्रहा"च्या रूपाने त्यांनी लढा सुरू केला व तो यशस्वी केला.त्या लढ्याची ३ अंगे होती, ती त्याचा प्रणेता (गांधी), त्याने निश्चित केलेला मार्ग धर्म व त्या मार्गाचा अंगीकार करून त्या धर्माला साकार करणारा एकनिष्ठ समुदाय, ही होत. असे विश्लेषण केले म्हणजे त्यांत बुद्ध, धर्म, संघ या त्रिरत्नाचे प्रतिबिंब दिसते.

गांधीजींनी "सत्याग्रह इन साऊथ आफ्रिका" हे पुस्तक लिहून त्यांत त्यांनी चालविलेल्या अहिंसक लढ्याला Passive Resistance न म्हणता सत्याग्रह या शब्दाचा प्रयोग का केला, याचे प्रयोजन सांगितले. १९०६ साली त्यांनी ब्रह्मचर्य व्रताचा अंगीकार केला.त्याद्वारे त्यांना जी नवीन दृष्टी प्राप्त झाली त्याचेच "सत्याग्रह" हे द्योतक आहे. Passive Resistance चा अर्थ Non-violent use of force (बलाचा अहिंसक उपयोग), Weapon of the weak (निर्बलांचे शस्त्र) असा लावला जाई, याची उदाहरणे १८९०-९७ या कालखंडात हंगेरीने ऑस्ट्रियाच्या विरुद्ध केलेला प्रतिकार, व अलीकडे इजिप्त, नॉर्वे, रशियन सफ्रेजेट्स् स्त्रिया, तसेच Non-

conformists नी केलेल्या चळवळी म्हणून पुढे करीत व करणे शक्य होते. या सगळ्याचे सार Conquest by suffering is conquest by force असे एका अमेरिकन ग्रंथकर्त्याने काढले. गांधीजींनी आपल्या लढ्याचे स्वरूप मूलत: भिन्न आहे हे दर्शविण्याकरिता सत्याग्रह शब्दाची योजना केली. आपण सत्तेकरिता लढत नसून सत्याकरिता लढत आहोत, सत्य हेच बल, आमच्या मनात शत्रुभावाला थारा नाही, हे त्यांना स्पष्ट करणे जरूर वाटले.

यातील सूक्ष्मतत्त्व लक्षात येण्यास 'धर्म' शब्दाचे दोन अर्थ होतात हे समजले पाहिजे. "नास्ति सत्यसमो धर्म:" हा एक धर्मराजाचा पक्ष तर "अतिधर्मात् बलं मन्ये, बलात् धर्मो प्रवर्तते" हा भीमाचा दुसरा पक्ष. धर्म म्हणजे कायदा हा सत्य व न्यायाला धरून असतोच असे नाही, तर जसा दक्षिण आफ्रिकेमधील लोकांच्या विरुद्ध कायदा करण्यात आला, तो तर केवळ दंडेलीचा प्रदर्शक होता. आम्ही सशस्त्र बलाचा विरोध नि:शस्त्र बलाने (प्रतिकाराने) करतो, असे नसून आम्ही सत्यानेच करतो. खरा लढा तुमचे बल व आमचे सत्य यांमध्ये आहे हे त्यांनी प्रकट केले. १९३१ साली गांधीजींनी स्विट्झर्लंडचा शांतिदूत ( Pacifist) Pierre Ceresoleयाला जी कल्पना दिली ती अशी :–Truth is God. The way to find Him is non-violence. Anger must be banished, so fear and falsehood. You must love yourself – purified you get power. It is not your own, it is God's.

" My relision is based on Truth & Nonviolene. Truth is my God & Nonviolenece is the means of reaching life. " Young India 8-11-65, Also " Truth is God " by R. K. Prabhu, Navajeevan Publishing House Ahemadabad, 1947.

या ठिकाणी असंगाचे "बुद्धा: शुद्धात्मलाभित्वात् गता: आत्ममहात्मताम्" हे शब्द आठवतात. याच अर्थाने गांधी "महात्मा" झाले. Geoffrey Ashe म्हणतो, Gandhi, British–conditioned, believed in the reign of law as a moral concept: Christian view of a fellow–lawyeer Thomas More–King's good servant but God's more.याच तत्त्वानुसार गांधीजींनी आपल्या लढ्याच्या प्रारंभी जी घोषणापत्रके फडकाविली, त्यांत Loyalty to king demands loyalty to King of kings असे शब्द घातले. गांधीजींनी जेव्हा " सत्याग्रह " आंदोलनाचे नेतृत्व दक्षिण आफ्रिकेत केले, तेव्हा (१)ते तेथील हिंदी लोकांशी जाति-धर्म-भाषा-वर्ण-प्रदेश-निरपेक्ष, सारांश भारताशी समरस झाले होते व (२) गीता, बुद्धचरित्र, बायबल, टॉलस्टॉय, थोरो, सॉक्रेटीस यांतील विचाराने प्रभावित होऊन त्यांची धर्मकल्पना विश्वव्यापक झाली. ते सांप्रदायिक वैष्णवाचे "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेदभ्रम अमंगळ" अशा तुकारामाच्या विश्वधर्माच्या क्षेत्रांत प्रविष्ट होऊन " वसुधैव कुटुंबकम्"

अशी त्यांची वृत्ती वनली. याचा प्रभाव जो तेथील लोकांवर पडला त्याची अभिव्यक्ती If he says, go to prison, we go या एका फेरीवाल्याच्या शब्दावरून होते. त्यांची यात्रा New Jerusalem म्हणजे Whose Jates are open to all nations जाणारी होती, असे Rev. Doke यांनी त्यांच्या उपक्रमाचे यथार्थ वर्णन केले.

गांधीजी १९१५ च्या सुरुवातीस भारतात परतले. ते दक्षिण आफ्रिकेत ज्या भारताशी एकरूप झाले होते तो "कूली" वर्ग होता. हाच कामगार व कृषिक नावाने ओळखला, जाणारा, दैन्यावस्थेत खितपत पडून राहिलेला लोकसमुदाय. याच भारता-वद्दल त्यांना जो जिव्हाळा वाटत होता तो त्यांनी १९१६ साली वनारस विद्यापीठा-तील पदवीदान समारंभाच्या भाषणात तेथे जमलेले भपकेदार पोषाख केलेले व मोती-रत्नहाराने सुशोभित वनलेले राजे महाराजे व जमीनदार, जहागीरदार आणि धनाढ्य पुंजीपती या सर्वांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडेल असे विचार निर्भीडपणे प्रकट केला : Thinking loudly before you, youngmen, I am turning search-light on ourselves. असे वजावून If we want Self Govt. we shall have to take it. Govt. will not be a party to give freedom to people who will not take it themselves. त्यांना हे कठोर भाषण मध्येच बंद करावे लागले.

या प्रकारच्या भाषणाची स्फूर्ती त्यांना कोठून मिळाली ? त्यांच्या गुरुस्थानी असलेले नामदार गोखले यांच्या सल्ल्याप्रमाणे त्यांनी शांतिनिकेतन, आर्यसमाज, ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज इत्यादी सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रांत कार्य करणाऱ्या संस्थांचे निरीक्षण केले, परंतु कांगडी येथे स्वामी श्रद्धानंद यांनी स्थापन केलेल्या "गुरुकुलांत" त्यांनी जे भाषण केले, त्यांत I am frankly a sanatanist, for me Hinduism is all sufficient या शब्दांत त्यांनी आपले मत स्पष्ट केले. अथर्व वेदामध्ये "सनातनमेनमाहु: उत अद्य: पुनर्नव:" म्हणजे नित्यनूतन होत राहणे हेच सनातनत्वाचे लक्षण आहे. हा त्यांचा वाणा त्यांच्या दूरदृष्टीचा द्योतक होता. असे सांगतात की, ना. गोखले यांनी गांधीजींना We look in Indian character. We want religious zeal in political field असे म्हटले. हे तर गांधीजींच्या ब्रीदाला उत्तेजन देणारेच होते. तदनुसार १९१६ साली त्यांनी अहमदाबादजवळ "सत्याग्रहाश्रम" स्थापन केला. त्याचा उद्देश मातृभूमीची सेवा कशी करावी हे शिकणे व त्याप्रमाणे मातृभूमीची सेवा करणे, निष्ठापूर्वक सेवा करणे. हे सच्छीलाशिवाय शक्य नाही, म्हणून त्यांनी जे कडक नियम घातले ते सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, अस्वाद, स्वदेशी, भयवर्जन, शरीरश्रम, सर्वधर्मसमानत्व व स्पर्शभावना हे होते. यांपैकी पहिली पाच ही बुद्धाच्या पंचशीलातील होती. पातंजलयोगसूत्रांमध्ये यांना 'सार्वभौममहाव्रतम्' म्हटले आहे.

येथे मुख्यत: 'सत्याग्रह' या शब्दात अभिप्रेत असलेला अर्थ काय, हे पाहू. सत्याग्रह म्हणजे नि:शस्त्र प्रतिकार ( Passive Resistance ) नाही, असे

वर स्पष्ट केलेच आहे. शुद्ध आध्यात्मिक सामर्थ्याचा ( Soul-force ) उपयोग करणे हा त्याचा अर्थ होता. सत्य म्हणजे स्थूल वाचिक किंवा आपण कल्पिलेले नसून ते चिरंतन सत्य, अर्थात् परमेश्वरच, असे त्यांचे म्हणणे होते. परमेश्वर म्हणजे कोणी मानवरूपधारी पुरुष आहे ही कल्पना वेदामध्येच धिक्कारली गेली, हे "एकम् सत् विप्रा: बहुधा वदन्ति" यावरून स्पष्ट होते. येशूचे I am the way, the Truth. to You shall know the truth and it shall make you free हे शब्दही तेच सुचवितात. वेदामध्ये देवतांचे वर्णन सत्यनिष्ठ, सत्यस्वरूप, सत्यसूनु, सत्यधर्मा असे आढळते. यज्ञामध्ये यजमानाला जी दीक्षा दिली जात असे ती "सत्यदीक्षा ऋतम् दीक्षा." "तस्मात् दीक्षितेन सत्यमेव वदितव्यम्, नानृतम्, सत्यसंहिता हि देवा: ' इ. ब्रह्माचे लक्षण 'सत्यम् ज्ञानम् अनंतम्' असून त्याला "सत्यधर्मा"असे उपनिषदांत म्हटले आहे.

गांधीजींच्या सत्याग्रहाच्या कल्पनेत प्रथमत: आत्मशुद्धी करणे हा दंडक होता. माणसाने स्वत:ची अंत:शुद्धी करणे, समाजातील परंपरागत दोष नाहीसे करणे, न्याय्य तत्त्वांवर समाजाची आर्थिक व राजकीय घडी बसविणे अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव त्या शब्दात साठला होता.

याचे स्पष्टीकरण गांधीजींच्या पुढील वचनात होते: Truth is that which you believe to be true and that is your God. If a man worships the truth, he is sure to obtain the absolute Truth i. e. God. येथे सत्याचे दोन प्रकार म्हणजे एक केवल निरपेक्ष सत्य व दुसरे सापेक्ष सत्य, असेच उपनिषदातून "सत्यस्यसत्यम्" या वचनाने व्यक्त केले आहे. भगवान बुद्धाच्या शिकवणीसंबंधाने सुद्धा "द्वैसत्ये समुपाश्रित्य बुद्धानां धर्मदेशना, लोकसंवृत्तिसत्यं च सत्यं च परमार्थत:" असे वर्णन आढळते.श्रीशंकराचार्य यांनाच व्यावहारिक व पारमार्थिक सत्य म्हणतात. "एकरूपेण स्थितोऽर्थ: परमार्थ:" याचा समानार्थक शब्द तथता, तथात्वम् हा आहे. " सर्वकालम् तथाभावात् " म्हणून बुद्धाला तथागत ही संज्ञा आहे. असा पुरुष "यथावादी तथाचारी, यथाचारी तथावादी" असतो. जो माझा जीवनक्रम पाहतो तो धर्म पाहतो, अशा आशयाची जी बुद्ध व गांधीजी यांची वचने वर उद्धृत केली आहेत, त्यांचे रहस्य हेच आहे. केवल सत्य इंद्रियातीत (transcendental) असल्यामुळे त्याचे स्वरूप कळणे सामान्य माणसाला शक्य नाही. जो त्याच्या समर्थनाकरिता प्राणत्यागही करण्यास तयार असतो त्यालाच ते कळते. धर्मवीर किंवा शहीद यांच्या स्वार्थत्यागाचा लाभ मात्र सामान्य मनुष्य घेत असतो.

गांधीजींनी सत्याचे तादात्म्य परमेश्वराशी केले याचे मर्म त्यांनी पुढील शब्दांत सांगितले– If I found myself in the service of the Commumity the reason behind it was my desire for self-realisation. The only way to find God is to see Him in the creation & be one with it. This can only be done by

service of all. I am a part and parcel of the whole & I cannot find Him apart from the rest of humanity.

हीच कल्पना "बोधिचित्ता" संबंधाने आढळते. "शून्यता करुणागर्भं बोधिचित्तं इति स्मृतम्" या वचनांत शून्याचा अर्थ प्रज्ञापारमिता आहे. शून्यता अद्वयलक्षणा आहे, प्रज्ञापारमिता ज्ञानम् अवयम् असेच आहे. ही अद्वयतेची अवस्था "एकात्मप्रत्ययसारम्, प्रपंचोपशमम्" याहून भिन्न नाही.त्याचे स्वरूप "शिवम् करुणामयम्" असते. "दु:खात् दु:खितस्य समुद्धरणकामना" म्हणजेच करुणा, हीच केवळ सत्याची अभिव्यक्ती ही गोष्ट नारदाने गालवाला "सत्यस्य वचनं श्रेय: सत्यज्ञानं तु दुष्करम्" (म. भा. १२, २८७, २०) "यद्भूतहितमत्यंतं एतत्सत्यम् ब्रवीम्यहम्" (सत्य बोलणे चांगले खरे, पण सत्याचे निभ्रांत ज्ञान होणे मोठे कठीण, ज्याच्या योगाने जीवाचे अत्यंत कल्याण होते त्यालाच मी सत्य म्हणतो. हेच सत्य "परोपकार: पुण्याय, परोपकृतिरेव बुद्धपूजा, अभिन्न अत्यम् चरति अत्तस्यच परस्य च, सर्वभूतहितेरत:" इत्यादि वचनांतून ग्रथित केलेले आढळते. लंकावतारसूत्रामध्ये जो बोधिसत्वाच्या दशनिष्ठांचा उल्लेख आहे त्यांत सर्वभूतहित हे नवव्या निष्ठेत गोवले गेले.

हाच सर्वोदय मार्ग आहे. समंतभद्राच्या एका श्लोकात याचे वर्णन असे केले आहे : "सर्वापदामंतकरं निरंतम् । सर्वोदयं तीर्थमिदं तवैव ।।"

कोणत्याही धर्माचा प्रसार हा त्यातील गूढ तत्त्वज्ञान किंवा हटवाद व इतर काल्पनिक समजुती यांत नसून त्या धर्माच्या विद्यमाने जे समाजसेवेचे, लोकहिताचे व कालानुसार मार्गदर्शनाचे कार्य होते, त्यावर अवलंबून असतो. हीच गोष्ट सर चार्लस ईलियट हा ख्रिस्ती धर्माच्या संबंधाने प्रामुख्याने पुढे करतो.

सारांश, गांधीधर्म ऊर्फ सत्याग्रह हा अंत:शुद्धी व लोककल्याण घडविणारा धर्म आहे. त्यांनी आपल्या सत्याग्रहाश्रमाचे जे अकरा नियम ठरविले त्याला उद्देशून एक वर्ग हा आश्रम राजकीय स्वातंत्र्याकडे नेणारा नसून तो एक सद्गुणसंवर्धक किंवा नीतिवर्धक समाज आहे असे म्हणून हिणविणारा होता, परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जी assassination of character ची ( शीलाची हत्या ) सार्वत्रिक ओरड आहे, तीच या क्षुद्र आक्षेपाला सडेतोड उत्तर देते. आजच्या शीलभ्रष्टतेसारखीच दारुण परिस्थिति भगवान बुद्धाच्या हयातीत उत्पन्न झाली होती. तिला उद्देशून एका मध्यरात्री एक यक्ष बुद्धासमोर प्रगट झाला व त्या दोघांमध्ये जो संवाद झाला तो किती अर्थपूर्ण होता, हे पुढील श्लोकावरून स्पष्ट होते.

प्रश्न:– "अंतो जटा बही जटा, जटाय जटिता पजा ।
तं तं गौतम पृच्छामि को इमं विजटये जटम् ।।१।।
उत्तर:– शीले प्रतिष्ठाय नरो सपञ्जो, शीलं पच्चंच भावयन् ।
आतापि, निपको भिक्खु सो इमं विजटये जटम् ।।

प्रश्न:– सध्या सर्वत्र आत व बाहेर स्वार्थाची जळमटे पसरली आहेत, ती कोण झाडून टाकील ?

उत्तर:– जो सच्छील व प्रज्ञावान उद्योगी, ज्ञानेच्छू व पापभीरू असेल, तोच ही जळमटे झाडून टाकू शकतो.

भगवान बुद्धाप्रमाणे गांधीजींनीसुद्धा शीलावर भर देऊन सत्याग्रहाश्रमाची स्थापना केली हे स्पष्टच आहे. या दोन थोर महापुरुषांच्या चरित्रांत जे स्थूलपणे साम्य दिसते ते असे:––

जन्म–दोघांचाही जन्म "शुचीनाम् श्रीमताम् गेहे" झाला; दोघांचीही घराणी सनातनी होती. वर निर्देशिलेल्याप्रमाणे गांधीजींनी आर्यसमाजाच्या गुरुकुलामध्ये "मी स्वत: सनातनी आहे" असे जाहीर केले, तसेच भगवान बुद्धाने "नगर-सूत्रांत" विधान केले (संयुक्तविकाय व बुद्धचरित्र. ११–६४). महाभिनिष्क्रमण : बुद्धाचे २९ व्या वर्षी; गांधीजी-दक्षिण आफ्रिकेस प्रयाण, २३ व्या वर्षी. तपश्चर्या–बुद्धाची वनवासात; गांधीजींची दक्षिण आफ्रिकेत. संबोधी : बुद्धाच्या ३५ व्या वर्षी; गांधींचे ब्रह्मचर्यग्रहण ३६ वे वर्षी (१९०६), त्रिरत्न : बुद्ध, धर्म, संघ; गांधी, सत्याग्रह, काँग्रेस पक्ष. भाषा : बुद्धाची लोकभाषा (चुल्लवर्ग, विनयपीटक); गांधीजींचीही लोकभाषा. हित कोणते : बहुजनहिताय, बहुजनसुखाय. दोघांचाही उद्देश एकच. बुद्धाचे जसे श्रीमंत अनुयायी : अनाथपिंडिक, बिंबिसार, विशाखा, अंबपालिका, तसेच गांधीजींचे टाटा, बिर्ला, जमनालाल बजाज, सरोजिनी इ.

स्त्री अनुयायी : बुद्धाच्या भिक्षुणी. गांधीजींच्या सत्याग्रही महिला. मैत्री करुणा–बुद्ध (तेविज्जसूत्र–दीघनिकाय), गांधीजींचा तोच आदेश.

जातिसंस्था : बुद्धाचा विरोध (वासेहुसूत्र, अस्सलायनसूत्र) तसाच गांधीजींचा.

अपमृत्यु : बुद्ध–वय ८०, गांधी–वय ७९.

पितृतुल्यता : बुद्ध–जगत्पिता (वराहमिहिर); गांधीजी–राष्ट्रपिता.

विचारसामर्थ्य : दोघांचेही जगद्व्यापक.

सर्वोदय : सब्बेसत्ता सुखिनो होंतु (बुद्ध), सर्वे सुखिन: सन्तु (रामराज्य)-गांधीजी. "यथाभूतम् ज्ञानदर्शनम्" व तुम्हेही किच्चम् आतजम्" या भगवान बुद्धाच्या आदेशा-प्रमाणे गांधीजींनीसुद्धा वस्तुनिष्ठज्ञान व "स्वप्रयत्न" यांच्याद्वारेच लोकजागृती करून देशाला स्वातंत्र्ययुद्धास प्रवृत्त केले.

सरतेशेवटी गांधीजींच्या सत्याग्रहाचा आशय ध्यानात बाळगणे अवश्य आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती ही समाजाचे अभिन्न अंग असते व तिचा समावेश कोणत्या तरी एका क्षेत्रात होत असतो. त्यातून जे कार्य चालते ते सापेक्ष व सोपाधिक (Relative) सत्य असते. ते सत्य-स्वरूप कार्य स्वार्थनिरपेक्ष व एकनिष्ठपणे करणे म्हणजे केवल (absolute) सत्य. व्यावहारिक दृष्टीने या सत्याचे स्वरूप

" यद्भूतहितमत्यंतम् " असे असते. परिणामतः समाजकल्याण संपन्न करणे हेच व्यक्तीचे कर्तव्य ठरते. "स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धि विन्दन्ति मानवाः" याचा आधुनिक अर्थ असा : समाजात व्यक्तीवर पडलेले जे कर्तव्य ते यथायोग्य पार पाडणे म्हणजेच आपल्या अधिकारां (rights) ची सिद्धी करणे आहे.

आता गांधीशताब्दि समारंभ–समयी एक यक्षप्रश्न उद्भवतो तो हा :– गांधीजींना राष्ट्रपिता मानून अशोक (धर्म) चक्राला राष्ट्रचिन्ह करून व सत्यमेव जयते याला राष्ट्रीय ब्रीद वाक्य ठरवून गांधी-निर्मित नव-भारत आपल्या राष्ट्र-पित्याच्या ऋणातून मुक्त झाला काय ?

# ८

# सत्यनिष्ठ "प्रयोगी" गांधीजी

## आचार्य दादा धर्माधिकारी

'सत्याचे प्रयोग' करणाऱ्या गांधीजींचे जीवन गतिमान होते. सत्याशिवाय दुसऱ्या कशाचाच— सुसंगतपणाचाही— आग्रह त्यांनी कधी धरला नाही. 'सर्व धर्म सत्य आहेत' या गांधीजींच्या मताची मीमांसा पुढील लेखात केलेली आढळेल.

गांधींचे विभूतिमत्त्व सर्वदा अनाकलनीय असेच वाटते. ते एकविध किंवा स्थिर कधीच नव्हते. सतत प्रगतिपरायण व विकासोन्मुख होते. त्यात जडतेचे स्थैर्य किंवा पूर्णतेची परिणती कधीच आली नाही. पुण्यसलिला गंगामाईच्या पवित्र प्रवाहाप्रमाणे त्यात अखंड जिवंतपणा व नित्यनूतनता होती. गंगेच्या प्रवाहात जे सातत्य आहे, ते अखंड जिवंतपणाचे सातत्य त्यात आहे. प्रतिक्षणी तो प्रवाह नूतन होत असतो. जीवनाच्या या निरंतर गतिशीलतेतच त्याची निर्मलता आहे. गांधींचे विभूतिमत्त्व या निर्मलतेने ओथंबलेले आहे. या निर्मलतेचेच दुसरे नाव तटस्थता किंवा विनय आहे. जो तटस्थ व विनयशील नसेल तो जिज्ञासू होऊच शकत नाही. अखंड जिज्ञासा हेच धार्मिक व्यक्तीचे शील आहे. जेथे जिज्ञासा नसेल तेथे अभिनिवेश आणि आग्रह यांचा अंमल असतो. अभिनिवेश आपल्या अनुभवाचा, आग्रह आपल्या तत्त्वांचा ! अशा प्रकारच्या आग्रहाची बाधा गांधींच्या मनाला अजिबात झालेली नव्हती. म्हणूनच त्यांना सत्याच्या आग्रहाचा अंगीकार करता आला. जेथे इतर

कुठल्याही आग्रहाला वाव असेल, तेथे सत्याच्या आग्रहाला अवकाशच राहू शकत नाही. म्हणूनच गांधींच्या जीवनात कुठल्याही सिद्धांताच्या, विचारसरणीच्या किंवा धर्म-पंथाच्या आग्रहाला थारा नव्हता. त्यांच्या सत्यनिष्ठेपुढे ग्रंथनिष्ठा, विभूतिनिष्ठा व संप्रदायनिष्ठा टिकत नाही. त्यांच्या जीवनात गतिशीलता आहे, अखंड व अकुंठित प्रयोगशीलता आहे आणि गंगेच्या प्रवाहाप्रमाणे एक निश्चित दिशाही आहे. अतिनिश्चित दिशा आहे, सत्याच्या शोधाची. गंगा सागरोन्मुख आहे, गांधी सत्याभिमुख आहेत.

अनेक विचारवंत टीकाकारांनी गांधींवर विसंगतीचा आरोप केला आहे. वस्तुतः हा आरोप हे त्यांचे भूषण आहे. सत्यनिष्ठेचे स्वरूप असेच असते. सत्यनिष्ठ व्यक्तीला सुसंगतपणाचा वाऊ वाटत नाही. किंवहुना सुसंगतता अनेक प्रसंगी सत्यनिष्ठेत प्रत्यवायभूत ठरते. जे सत्य असेल ते सुसंगत असलेच पाहिजे, असे म्हणता येणार नाही. म्हणूनच, गांधींच्या जीवनात, त्यांच्या लेखांत किंवा भाषणात सुसंगतपणाचा आग्रह दिसून येत नाही. सत्यपरायण व्यक्तीच्या जीवनात सुसंगतपणा हे एक मिथ्या दैवत आहे. पुष्कळदा ते सत्याच्या शोधात अंतराय निर्माण करते. म्हणून गांधींनी सांगून टाकले की, कुठल्याही विषयाच्या वावतीत मी शेवटी जे म्हटले असेल, तेच माझे खरे मत समजा; त्याच्या अगोदर त्या वावतीत मी जे म्हटले असेल ते चुकीचे माना. याचेच नाव प्रांजलपणा. येशूने जिचा "इन्नोसेन्स" अथवा निरागसता म्हणून उल्लेख केला, तीच ही वालसुलभ प्रांजलता. हा प्रांजलपणा म्हणजे सहज सत्यनिष्ठेचे सत्त्व. ही निरागसता किंवा नम्रता काही विशिष्ट गुण नव्हे ! त्याची गणना व्रतांतही होऊ शकत नाही. 'मंगलप्रभात' पुस्तिकेत व्रतविचाराच्या संदर्भात गांधींनी ही गोष्ट विशद केली आहे. म्हणूनच गांधींच्या जीवनात आणि त्यांच्या भाषेत सत्यनिष्ठेची अनलंकृत सुषमा आहे.

सत्याच्या शोधात जो गढून गेला असेल त्याच्या दृष्टीने जीवनाच्या इतर महनीय विभूती गौण ठरतात. गांधींनी नीती, धर्म आणि तत्त्वज्ञान या विषयाच्या काही अंगोपांगांसंबंधी क्वचित परस्परविरोधी व अत्यंत भिन्न स्वरूपाचे विचार व्यक्त केले आहेत. पण त्यांत सत्यनिष्ठेचे सूत्र मात्र अनुस्यूत आहे. सनातन धर्म, इस्लाम, ख्रिस्ती धर्म, वेद-उपनिषदे, महाभारत-रामायण, कुराण-गीता किंवा बायवल यांच्याविषयी त्यांनी वेळोवेळी जे म्हटले आहे, त्यात त्यांचा पारमार्थिक विचार प्रकट झालेला नाही. गांधींच्या विभूतीचे ते उपादान नाही. म्हणून इतर दृष्टीने त्यांच्या त्या उक्तींचे कितीही महत्त्व असले तरी त्यांच्या अध्यात्मात त्या उक्तींचे स्थान गौण आहे. म्हणूनच गांधींच्या धर्मविषयक कल्पना व व्याख्या भिन्न आहेत. सारेच धर्म सत्य आहेत असे जेव्हा गांधी म्हणतात तेव्हा त्यांचा जोर सत्यावर असतो, धर्मावर नसतो. गांधींच्या म्हणण्याचा आशय असा की, शेवटी ईश्वरनिष्ठा,

सत्यनिष्ठा, सदाचार व प्राणिमात्राविषयी आत्मीयतेची भावना हेच तर साऱ्या धर्मांच्या शिकवणीचे सार आहे. म्हणून सारेच धर्म सारखेच अनुष्ठेय व पूजनीय आहेत. परंतु वस्तुस्थिती अगदीच निराळी आहे. ईश्वरपरायणता, नीतिनिष्ठा व बंधुत्व सगळ्याच धर्मांना समान आहेत. त्यामुळे विशिष्ट धर्माचे अनुयायी या गुणांना आपला स्वधर्म मानीत नाहीत. स्वत:ला जे आपल्या विशिष्ट धर्माचे कट्टे अनुयायी मानतात ते असे म्हणतात की, धार्मिक दृष्टीने एक सामान्य मुसलमान-देखील महात्मा गांधींपेक्षा श्रेष्ठ आहे. त्याचप्रमाणे दरेक वर्णाश्रमवादी सनातनी ब्राह्मणाचे दृष्टीने सदाचारी अस्पृश्यापेक्षा दुराचारी ब्राह्मणसुद्धा अधिक पवित्र व सामाजिक व्यवहाराकरिता अधिक योग्य आहे. सारांश, रूढ अर्थाने धर्म ही संज्ञा ईश्वर, नीती व बंधुत्व वाद केल्यानंतर जो क्रियाकलाप व संस्कारकलाप उरतो, त्याला लागू आहे. उलट हे विशिष्ट क्रियाकलाप व संस्कारकलाप वगळल्यानंतर जे सत्त्व शेष राहते, त्याला अनुलक्षून गांधींनी धर्म शब्दाचा प्रयोग केला आहे. गांधींच्या भूमिकेप्रमाणे सत्य हाच धर्म आहे. आणि म्हणून धर्म एकच असू शकतो.

समन्वय शब्दाचाही गांधींनी नवीनच अर्थ केला. जो धर्मग्रंथ, कर्मकांड व व्यवहार सत्याच्या शोधाला पोषक असेल तोच प्रशस्त व आदरणीय आहे, हे गांधींच्या समन्वयाचे मुख्य सूत्र होय. धर्माच्या क्षेत्रात परधर्मसहिष्णुतेपासून तो सर्वधर्म-समन्वयापर्यंत आणि सर्वधर्मसमादरापर्यंत अत्यंत उदात्त भावनांचे प्रतिपादन राजा राममोहन राय व श्रीरामकृष्ण परमहंस देव इत्यादि पूर्वसूरींनी केले. परंतु समन्वयाच्या या यथार्थ भूमिकेचा अंगीकार गांधींच्या जीवननिष्ठेचा अनन्य विशेष म्हणता येईल.

ईश्वरपरायणतादेखील भिन्न भिन्न धार्मिक गटांना एकमेकांच्या जवळ आणू शकली नाही. सगळेच म्हणतात की, ईश्वर एकच आहे आणि तो सर्वांचा आहे. परंतु, दरेकाचा आग्रह असा की, जो एकच ईश्वर आहे तो माझा आहे; आणि तोच सर्वांचा झाला पाहिजे. तदितर सगळे ईश्वर सैतान नसले तरी निदान अनीश्वर तरी आहेत. अशा प्रकारची धर्मनिष्ठा हीच धर्मकलहांची जननी होय. गांधींसारखा सत्यनिष्ठ पुरुष साहजिकच ईश्वराच्या या स्वरूपापासून विमुख झाला. त्यांच्या लक्षात आले की, ज्याने माणसाला जन्म दिला तो ईश्वर हा खास नव्हे. हा माणसाने निर्माण केलेला ईश्वर आहे. माणसाची जशी भावना, आकांक्षा अगर वासना असेल, तिच्या अनुरूप तो आपला देव घडवितो. गांधींनी म्हटले, ही सगळी निरनिराळी स्वरूपे एका ईश्वराचीच आहेत. कारण, तोच अवघ्या चराचरात भरलेला आहे. अर्थात, सारीच नामरूपे ईश्वराची आहेत. म्हणजे यच्चयावत् संज्ञा ईश्वरवाचक आहेत म्हणा–किंवा कुठलीही संज्ञा त्याला लागू नाही म्हणा ! तो अनाम आहे. म्हणूनच सर्वनाम आहे. सर्वनामच विश्वरूप आहे. तरी पण काही संज्ञा व काही रूपे अशी आहेत की, ज्यांच्यावर विशिष्ट मानवसमुदायांची नि:सीम निष्ठा आहे.

आणि असे असूनही त्या संज्ञा व ती रूपे ईश्वराला शोभण्यासारखी नाहीत. म्हणून अखेरीस गांधींनी असा निष्कर्ष काढला की, सत्य हाच ईश्वर आहे. सत्याची जिज्ञासा हीच मुमुक्षा आणि सत्याचा शोध हीच साधना.

गांधींचे सत्य म्हणजे एकादे अनाकलनीय किंवा परोक्ष तत्त्व नव्हे. भूतमात्राच्या व जीवमात्राच्या अस्तित्वाचे अधिष्ठान म्हणजेच परम सत्य. मनुष्याचा इतर मानवांशी संबंध व मनुष्याचा मनुष्येतर प्राण्यांशी संबंध हेच या सत्याच्या आविष्काराचे क्षेत्र होय. अनवधानाने, प्रमादाने अथवा मोहवशतेने या धर्मक्षेत्राचे कुरुक्षेत्र होऊ नये, याची काळजी त्यांनी सतत वाहिली. ही सावधानताच त्यांच्या अहिंसेच्या रूपाने परिणत झाली. या दृष्टीने गांधी हा ज्ञानयोगी नव्हे, कर्मयोगी नव्हे किंवा भक्तियोगी नव्हे. तो सत्यनिष्ठ 'प्रयोगी' आहे. माणसामाणसात आणि मनुष्य व मनुष्येतर प्राण्यांत पारस्परिकतेच्या विकासाला जे आचरण उपकारक ठरते, त्याचे नाव सदाचार. या पारस्परिकतेला जी बाधक असेल, ती अनीती. विशिष्ट परंपरेत व निरनिराळ्या समाजांत रूढ झालेले जे आचार व व्यवहार या पारस्परिकतेला अनुकूल वाटले, त्यांचा गांधींनी नैतिक म्हणून स्वीकार केला. आणि त्याच भूमिकेवरून वर्णभेद (रंगभेद), वर्गभेद, जातिभेद व अस्पृश्यता यांना निकराने विरोध केला. फार काय, गांधींनी अनीश्वरवाद्यांच्या सत्यनिष्ठेला प्रणाम केला. त्यांनी तर असे म्हणायलादेखील कमी केले नाही की, अनीश्वरवाद्याची प्रामाणिक नास्तिकतादेखील ईश्वराचेच स्वरूप आहे. अनीश्वरवादी जवाहरलालांना आणि प्रो. गोरांसारख्या निष्ठावान नास्तिकांनासुद्धा त्यांनी सत्याग्रहाचे अधिकारी मानले. ही सत्यनिष्ठा इतकी व्यापक असते की, तेथे व्यावर्तकतेला थाराच उरत नाही.

सत्यनिष्ठ गांधींनी जीवनाच्या अधिष्ठात्री दोन पृथक् सत्ता मानल्या नाहीत. त्यांनी असत्याचे किंवा असत्चे स्वतंत्र अस्तित्व कधीच मान्य केले नाही. कारण, असत्याचे किंवा अमंगळाचे निराकारण शक्य आहे आणि इष्टही आहे. दुष्टता किंवा असत्य मनुष्याचा स्वभाव नाही. म्हणून गांधींच्या धर्मकोषात प्रतियोगी व प्रतिपक्षी तर आहे, पण विपक्षी किंवा शत्रू कोणीच नाही. जो प्रतिपक्षी असेल त्याच्याविषयीही प्रेम आहे आणि जो स्वतःला विपक्षीय मानीत असेल, त्याच्याविषयीही प्रेमच आहे. शेवटी विपक्षीदेखील प्रतिवेशी किंवा शेजारीच आहे. स्वदेशीचा गांधींनी केलेला हा विशिष्ट अर्थ होय.

ज्याला शत्रू म्हणून नाहीच तो खरा विश्वसुहृत्. त्याला ज्याप्रमाणे दुसऱ्याची सुखदुःखे स्वतःच्या सुखदुःखांप्रमाणे आहेत, त्याचप्रमाणे दुसऱ्यांचे दोष, अपराध व प्रमादही स्वतःचे दोष, स्वतःचे अपराध व स्वतःचे प्रमादयाप्रमाणे आहेत. कुसंस्कारामुळे व कुशिक्षणामुळे मनुष्य बहुतेक स्वतःच्या अपराधांकरिता क्षमा इच्छितो आणि इतरांच्या अपराधांकरिता शिक्षेची मागणी करतो. ही नैतिकता

तर नव्हेच, पण न्यायनिष्ठाही नव्हे. गांधींनी आजन्म या वृत्तीच्या विरुद्ध अभ्यास केला. स्वत:करिता शिक्षा, इतरांकरिता क्षमा असे त्यांच्या सदाचाराचे सूत्र होते. अनासक्तियोगात त्यांनी ' ये यथा मां प्रपद्यन्ते. . . . ' या श्लोकावर जी संक्षिप्त टिप्पणी लिहिली आहे, तिच्यावरून त्यांची भूमिका लक्षात येईल.

गांधींचा पिंड मुळात धार्मिक होता. त्यांनी राजकीय क्षेत्रात नैतिकतेचे व सभ्यतेचे बीज पेरण्याकरिता प्रवेश केला.परांपरागत राजकारणाचे व्यवहारवादी सूत्र होते.' आजचा मित्र उद्याचा शत्रू असू शकतो, म्हणून आजच्या मित्रापासून सावध रहा. गांधींनी म्हटले, सदाराचाराचे सूत्र याच्या अगदी उलट आहे. आजचा शत्रू उद्याचा मित्र असू शकतो, म्हणून आजपासून विश्वास ठेवायला सुरवात करा. ही विश्वास-परायणताच मानवी व्यवहारातील वीरतेचे तत्त्व होय. हिचेच नाव वास्तविक वीरता अथवा वास्तविक आस्तिकता. या आस्तिकतेचा विनियोग गांधींनी राजकारणात केला. या दृष्टीने त्यांना गोखल्यांचे शिष्य म्हणता येईल. प्रत्यक्ष राजकीय व्यवहाराच्या बाबतीत गांधींचे आध्यात्मिक शौर्य अपूर्व होते. राजकारणातील अद्भुत आत्मवान व्यक्ती, असे त्यांचे वर्णन यथार्थतेने करता येईल.

९६३९८

१

# कस्तुरबा स्मारक -नवसंस्करण

शंकरराव देव

सांप्रत भारतामध्ये नवे ग्रामीण नेतृत्व निर्माण होत आहे. त्याला संस्कृतीची जोड देण्याचे कार्य स्त्रियांनी यापुढे करणे अवश्य आहे व शक्यही आहे. त्या दृष्टीने कस्तुरबा स्मारक निधीच्या कार्याचे संस्करण करण्याची वेळ आता आली आहे. हे पुढील लेखात विशद केले आहे.

रचनात्मक कार्यक्रमाची पूर्ती म्हणजे स्वराज्य, असा गांधीजींनी स्वराज्य व रचनात्मक कार्य यांचा साध्य-साधन-संबंध सांगितलेला आहे. गांधीजींच्या जीवनसृष्टीत बीज-वृक्षासारखा हा संबंध आहे. रचनात्मक कार्यक्रमातून निर्माण होणारे स्वराज्य हे दंड-नीति-आधारित स्वराज्य नसून, अहिंसेच्या नैतिक बलावर अधिष्ठित असे स्वयंशासित स्वराज्य आहे.

गांधी शासनमुक्त समाजावर श्रद्धा ठेवणारे एक अराजकवादी होते. पण ते शासनसंस्था तोडली म्हणजे शासनमुक्त समाज निर्माण होईल असे मानणाऱ्या तोडफोडी अराजकवाद्यांपैकी नव्हते. त्यांनी स्वतःला तत्त्वज्ञ अराजकवादी म्हटले आहे. शासनमुक्त समाज हा आदर्श जरी गांधीजींनी आपल्या डोळ्यापुढे ठेवला होता, तरी हा आदर्श संपूर्णपणे मानवी समाजाला प्राप्त होईल असा त्यांचा दावा नव्हता.

कारण, मनुष्य व त्याचा समाज हा नेहमीच अपूर्णावस्थेत राहणार. अपूर्ण असूनही पूर्णाची प्राप्ती करण्याच्या प्रयत्नातून मानव व त्याचा समाज वाढत्या पुरुषार्थाची सिद्धी करतो. म्हणून ज्या प्रमाणात मानव व त्याचा समाज यांच्यातील संबंध अहिंसेने नियमित होतील, त्या मानाने शासनमुक्त समाजाचा आदर्श जवळ येईल असे त्यांचे तर्कशुद्ध म्हणणे होते. ज्याप्रमाणे एका विटेवर दुसरी वीट ठेवीत ठेवीत, मनुष्य इमारत उभी करतो, त्याप्रमाणे अगदी पायापासून शेवटच्या मजल्यापर्यंत रचनात्मक कार्याच्या साधनांनी अहिंसात्मक समाज मानवाला निर्माण करावा लागेल. हे लक्षात घेतले म्हणजे अहिंसेचा व्यवहार म्हणजे रचनात्मक कार्यक्रम, हे गांधींचे विधान किती सार्थ होते, हे कोणाच्याही ध्यानात येईल.

गांधीजींनी आपल्या 'हिंद स्वराज्या'त याच शासनमुक्त समाजाची कल्पना मांडलेली आहे. दक्षिण आफ्रिकेतील त्यांचा सारा जीवन-व्यापार याच स्वराज्याच्या प्राप्तीसाठी झाला. भारतात आल्यावर, भारतातील परिस्थितीमुळे त्यांना भारताचे राजकीय नेतृत्व स्वीकारावे लागले—गांधींच्याच शब्दांत बोलावयाचे तर —ते त्याच्याकडे सहज चालत आले. गांधीजींनी म्हटले आहे, सत्याग्रही सत्याग्रहाच्या शोधात जात नाही, इतकेच नव्हे तर, सत्प्रवृत्तीच्याही शोधात जात नाही. तो आपली जीवन-साधना करीत असतो. आणि ज्याप्रमाणे माणसाची दोन फुपफुसे प्राणवायूचा पुरवठा सहज करतात, त्याप्रमाणे सहजप्रवृत्ती व सत्याग्रह ही दोन अंगे त्याच्या जीवन-साधनेस पोषक ठरतात. ही व्यापक अध्यात्म्याची सहजप्रवृत्ती आहे. त्यासाठी गांधींची जीवनसाधना होती. म्हणून भारताचे नेतृत्व हेही आपल्या साधनेचे एक अंग बनावे, असा गांधीजींचा प्रयत्न होता. आणि यासाठीच त्यांनी काँग्रेसच्या राजकीय स्वराज्याचे साधन रचनात्मक कार्यक्रम व सत्याग्रह हा केला. हेतू हा की, या साधनेतून जे राजकीय स्वराज्य मिळेल, तेही स्वयंशासित स्वराज्याचा एक टप्पा व्हावे.

म्हणून, गांधींनी ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन, अ. भा. ग्रामोद्योग संघ, हरिजन सेवक संघ, हिंदुस्तानी प्रचार सभा, तालिमी संघ—अशा एकामागून एक भारतीय स्वरूपाच्या रचनात्मक संस्था स्थापन केल्या आणि यांतील प्रमुख संस्थांना त्यांनी काँग्रेसची संमती मिळविली. भारताच्या त्या वेळच्या राष्ट्रीय नेत्यांनीही ही गोष्ट मान्य केली की, सत्याग्रहाची शक्ती निर्माण करण्याचे मुख्य साधन गांधींचा रचनात्मक कार्यक्रम हेच आहे. पण दैवदुर्विलास असा की, शासनमुक्त समाज निर्माण करण्याचा ज्या रचनात्मक कार्याचा हेतू, तो रचनात्मक कार्यक्रम स्वातंत्र्योत्तर कालात शासनसंस्थेच्या सहाय्याशिवाय चालू शकत नाही.

श्रीमती कस्तुरबांच्या निधनानंतर टाटा-बिर्लासारख्या उद्योगपतींच्या साह्याने 'कस्तुरबा-गांधी-स्मारक-निधी स्थापन झाला. त्याला गांधीजींनी जे मार्गदर्शन केले, त्यात मुख्य गोष्ट ही होती की——

समाजातील स्त्री-शक्ती जागृत, संघटित व क्रियाशीलतेने प्रतिष्ठित व्हावी, यासाठी या निधीची व्यवस्था मुख्यतः स्त्रियांकडे असावी. निधीने सेविकांचे शिक्षण व संघटन करावे आणि त्यांच्या द्वारे २००० वस्तीच्या खालच्या खेड्यांतील स्त्रियांची व मुलांची सेवा करावी.

गांधीजींचा खेड्यांवर जो इतका भर होता, याचे कारण, सत्य आणि अहिंसा यांचे पालन ग्रामीण संस्कृतीतील साधेपणात शक्य आहे, अशी त्यांची अटळ श्रद्धा होती. आणि म्हणूनच, काँग्रेसच्या राजकीय स्वराज्याला रचनात्मक कार्यक्रमाचा आधार देऊन, ते ग्राम-स्वराज्यात परिणत करावे, अशी त्यांची मनीषा होती–व तसा प्रयत्नही करण्यासाठी त्यांनी आपल्या उतारवयातही आपल्या सर्व शक्ती उपयोगात आणल्या असत्या–आणि त्याचा त्यांनी प्रारंभही केला होता; आणि याच हेतूने त्यांनी काँग्रेसला 'लोकसेवकसंघ' बनण्याचा सल्ला दिला होता.

जोपर्यंत गांधी हयात होते तोपर्यंत–आणि त्यानंतर काही थोडा काल–कस्तुरबा निधीने या दिशेने प्रशंसनीय प्रगती केली. कस्तुरबा निधी हा एक भारतीय समाजातील स्त्रीशक्तीचे प्रतीक बनला. पण त्यानंतर गांधीजींनी स्थापन केलेल्या अन्य अखिल-भारतीय रचनात्मक संस्थांप्रमाणे, कस्तुरबा निधीही क्रमाक्रमाने शासन-आधारित व शासनाच्या लोककल्याणकारी कार्यक्रम अंमलात आणण्याचे साधन बनला. परिणाम असा झाला की, हळूहळू निधीचे मूळ स्वरूप पालटत गेले व शासन-मुक्त समाज निर्माण करण्याची तयारी म्हणून ग्रामीण संस्कृतीची बांधणी करण्याऐवजी तो देशाच्या विकास-योजनेच्या प्रवाहामध्ये एक पतित म्हणून वाहू लागला. असे होणे अपरिहार्य होते. उगमाचे ठिकाणी पर्जन्य-वृष्टी झाली नाही, तर नदीचे पात्र कोरडे पडते, तशी गांधीजींच्या पश्चात् त्यांच्या सर्व रचनात्मक संस्थांची स्थिती झाल्यासारखी दिसते.

वरील विश्लेषण परखड वाटले, तरी सत्य-दर्शनासाठी ते अवश्य आहे, असे मला नम्रपणे म्हणावयाचे आहे.

मानवाने, संस्थेने किंवा समाजाने असे कधीही मानू नये की, जीवनाचे साफल्य कायमचे नष्ट झाले आहे. नदीच्या स्रोताप्रमाणे, मानवी जीवनही मुळाशी सदा शुद्ध असते. त्या शुद्धतेकडे परत जाणे मानवाला केव्हाही अशक्य नाही. फक्त प्रवाहाच्या उलट, शुद्धावस्थेकडे परत जाण्याचे धैर्य व प्रयत्न त्यांनी केले पाहिजेत. हाच न्याय गांधींच्या संस्थांनाही लागू आहे. सर्वस्व बुडालेले नाही. कारण, त्यांच्यामध्ये गांधींनी पेटविलेली ज्योत अद्यापही आहे–ज्योतीवर आलेली काजळी झाडून टाकावयाची आहे. हा न्याय इतर संस्थांप्रमाणे, कस्तुरबा–निधीलाही लागू आहे. ग्रामीण संस्कृती Rural civilization ) निर्माण करण्याचा मूळचा शुद्ध हेतू लक्षात घेऊन परिस्थितीतला अनुरूप असा या कार्याचा 'पुनश्च हरिः' त्यांनी सुरू करावा. हे कार्य करण्याला गांधींच्या सर्व संस्थांमध्ये कस्तुरबा–निधी ही सर्वांत अधिकारी

आहे–कारण, आजही ती स्त्रियांची संस्था आहे. संस्कृती म्हणजे सौजन्य, सौहार्द व साधेपणा. हे गुण स्त्रियांमध्ये प्रकर्षाने असतात. कारण, त्यांची प्रकृती व त्यांची जीवन-परिस्थिती या गुणांना सहज निसर्गतः पोषक असते. म्हणून गांधीजी म्हणत की, माझ्या अहिंसेच्या कार्यात स्त्रिया सर्वांत अधिक मदत करू शकतील. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास गांधींच्या या विधानाच्या सत्यतेस साक्ष आहे.

आज ग्रामीण भारताकडे पाहिले तर, विकासाच्या वाटचालीत, ग्रामीण भागात ज्याच्याकडे सत्ता व संपत्ती जात आहे, असा एक क्रमाने वाढणारा वर्ग निर्माण होत आहे. त्याला संस्कृतिसंपन्न करणे हे आजचे निकडीचे काम आहे. सत्ता व संपत्ती यांचा सदुपयोग संस्कृतीनेच होतो. कोणताही समाज त्याच्यातील स्त्रीच्या संस्कृतीनेच स्थिर व संपन्न होतो. म्हणूनच म्हटले आहे आहे की, कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे मापन त्यातील स्त्रियांच्या स्थानावरून केले जाते. म्हणून कस्तुरबा–निधीने आपल्या ध्येयास अनुरूप असा ग्रामीण भारतातील स्त्री-संस्कृतीचा कार्यक्रम हाती घ्यावा व त्यासाठी अवश्य ते सर्व उपाय योजावे. निधी असे करील तर त्याचे कार्य, गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे, खऱ्या अर्थाने, ग्रामाभिमुख होईल आणि निधीच्या सेविकांच्या सेवेत तेज निर्माण होईल व सेविकांना कृतार्थतेची प्रचीती येईल.

ग्रंथालय ... स्थळ ...
अनुक्रम ........ दि: ........
१ ........ नों. दि ........

# अहिंसेचा विकास

**उ. न. ढेबर**

भारताला अहिंसा प्राचीन काळापासून परिचित होती. पण त्या अहिंसेत निर्भय प्रतिकाराचा आशय भरून गांधीजींनी ती व्यापक केली, आणि सर्व देशाकडून तिचे पालन यथाशक्य करविले. या अभूतपूर्व क्रांतीचे महत्त्व इतिहासकार श्री. टॉयनबी यांनीही मान्य केले आहे.

स्वभावत: मी संघटनात्मक काम करणारा माणूस. प्रत्येक व्यक्तीच्या मागे काही ना काही तत्त्वज्ञानाचा आधार असतो व त्याच आधारावर त्या व्यक्तीचा जीवनक्रम चालू असतो. अनुभव त्यामध्ये वाढ करीत असतो आणि त्याची श्रद्धा मजबूत होत असते. विश्वास वाढत जातो आणि त्याचबरोबर समजूतही वाढत जाते. सामान्यपणे गांधीनिष्ठेतही हीच प्रक्रिया काम करीत आहे. गांधीजींना संपूर्ण ओळखल्याचा दावा कोणताही मनुष्य करू शकणार नाही. तो फक्त एवढेच म्हणू शकेल की, मी गांधीजींचा जीवनसंदेश जाणण्याचा प्रयत्न केला आहे, व त्यापैकी इतके मला समजले आहे.

काही दिवसांपूर्वी राहुल सांस्कृत्यायन ह्यांचे 'व्होलगा ते गंगा' हे पुस्तक मी वाचीत होतो. मानवी जीवनाची ही कथा अतिशय सुंदर आहे. गुहेत राहून अणकुचीदार दगडाने आपल्या शिकारीला घायाळ करणारा तो माणूस कोठे आणि आजचा मानवसमाज कोठे !

काही लोक म्हणतात की, अहिंसेचा उदय गांधीजींपासून झाला. त्याबद्दल असे म्हणावे लागेल की, मानवजातीच्या विकासक्रमात मानवाने केलेली अहिंसे-

बद्दलची तपश्चर्या त्याला माहीत नाही. निसर्ग हिंसेने भरलेला आहे, हे निर्विवाद सत्य आहे आणि मनुष्य निसर्गाचाच एक भाग आहे. हिंसेच्या आधाराशिवाय तो जगू शकत नाही. परंतु त्याच्या लांबलचक विकासयात्रेच्या साधनेत अहिंसा हेच माध्यम आहे. मानवविकासाचा इतिहास बारकाईने पाहिल्यास लक्षात येईल की, अहिंसेशिवाय मनुष्याचे कौटुंबिक जीवन अशक्य आहे. कौटुंबिक जीवनाच्या पूर्णत्वाची कल्पना, अहिंसेच्या क्रांतिकारक स्वरूपाची द्योतक आहे. कुटुंबात राहात असताना स्त्री व पुरुष ह्या दोघांच्या संबंधात किंवा आईवडील आणि मुलामुलींच्या संबंधात अहिंसेला दूर केले, तर कुटुंब म्हणून ज्याला म्हणतात तेच अशक्य होईल. ह्याप्रमाणे मानवसमाज आणि त्याच्याशी संबंधित असणाऱ्या निरनिराळ्या प्रकारांच्या तंत्रात अहिंसेचा भास असतोच.

मनुष्य निसर्गाची अद्‌भुत कलाकृती आहे. त्यात पशुता नाही असे नाही. पण मनुष्यात तीनचार अशा गोष्टी आहेत की, त्या त्याला पशुजगतापासून दूर करतात. मनुष्यात विवेक आणि निर्माण ह्या दोन शक्ती आहेत. तसेच सर्व वस्तूंच्या गुणधर्माचा आणि ज्ञानाचा संग्रह करण्याची शक्ती आहे. मनुष्य प्रेमाचा भुकेला आहे व त्याच्या ठायी उत्कर्ष करण्याची वृत्ती आहे. ही वृत्ती एखाद्या धर्मग्रंथाचा परिणाम नसून सहजप्रवृत्ती आहे. उलट धर्मग्रंथच त्याचा परिणाम आहे असे म्हणावे लागेल. सहजप्रवृत्तीचे बीज मनुष्याच्या स्वभावातच आहे. त्याकरिता प्रेरणा, प्रोत्साहन आणि संधी प्राप्त होण्याचा प्रश्न आहे. ह्या बीजाला प्रेरणारूपी खत, प्रोत्साहनरूपी पाणी आणि अवसररूपी साधना मिळेल, तर हे बीज बहरल्याशिवाय राहणार नाही. कौटुंबिक जीवनाची क्रांतिकारक कल्पना किंवा समाजजीवनाची कल्पना, सभ्यता आणि संस्कृती ह्या सर्वांचा विकास मानवाच्या सहजप्रवृत्तीमुळेच झाला आहे.

व्यास, मनू आणि याज्ञवल्क्य, बुद्ध आणि महावीर, येशू आणि गांधी मानवाच्या सहजप्रवृत्तीला प्रेरणा, प्रोत्साहन आणि अवसर देणाऱ्या शक्ती आहेत. मनुष्य मनुष्याला खात होता त्या अवस्थेतून तो बाहेर आला, तोही अशाच कोणत्या तरी शक्तीच्या जोरावर. अशाच एखाद्या शक्तीच्या आधारावर मनुष्य समूहाच्या (समाजाच्या) हिताकरीता स्वार्थत्यागपूर्वक विचार करू लागला. आणि अशाच एखाद्या शक्तीच्या आधारावर मनुष्य संस्कृतीचा आणि सभ्यतेचा पुजारी बनला. गांधींचे जीवन बुद्ध आणि महावीर ह्यांच्या जीवनाप्रमाणे ह्या उत्क्रांतिमय मानवी यात्रेचा एक 'मैलाचा दगड' किंवा दीपस्तंभ आहे.

१९१५ साली पण्णीकरांनी ज्याला "पहिले महायुद्ध" संबोधिले, आणि ब्रिटनशी असलेल्या आपल्या संबंधामुळे आपण ज्याला जागतिक युद्ध म्हणतो, त्या युद्धात गांधी रेडक्रॉसचे स्वयंसेवक म्हणून साम्राज्याशी आपली निष्ठा

दाखवीत होते; तेसुद्धा अस्वस्थ होऊन भारतात परतले. शांतिनिकेतनमध्ये प्रवास करून ते पोरबंदरमध्ये येऊन राहिले. तेव्हाचा हिंदुस्थान आणि पन्नास पंचावन्न वर्षांनंतरचा हिंदुस्थान ह्यांमध्ये किती फरक पडला आहे, ते आपण पाहात आहोत. हिंदुस्थानच्या ह्या दोन्ही अवस्थांची चित्रे पाहणाऱ्या माणसांची संख्या कमी कमी होत आहे, पण अजून ती अजिबात नाहीशी झालेली नाही. त्यांपैकीच एक व्यक्ती म्हणून मी ह्या दोन्ही हिंदुस्थानचा मेळ वसविण्याचा पुष्कळ वेळा प्रयत्न करीत आहे.

ज्या ठिकाणी आज राष्ट्रपतिभवन आहे तेथे व्हाईसराय लॉज होते. ज्या स्थानाला विवेकमूर्ती राजेंद्रबाबू आणि ज्ञानमूर्ती डॉ. राधाकृष्णन् व डॉ. जाकिर हुसेन यांनी भूषविले, त्याच स्थानावर वसून पंचम जॉर्जचा प्रतिनिधी हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवीत होता. हिंदुस्थानच्या एक-चतुर्थांश भागावर संस्थानिकांची राजवट होती. हिंदुस्थान ब्रिटिश साम्राज्याच्या मुकुटातला हिरा म्हणून चमकत होता, पण हिंदुस्थानच्या सुजला-सुफला भूमीचे शोषण होत असलेल्या प्रजेचा तो प्रतीक नव्हता. हिंदुस्थानची प्रजा पूर्ण दरिद्री होती. हरिजन हा शब्द नव्हता, अस्पृश्यांचा तर कोणीच वाली नव्हता. हिंदुस्थानची स्त्रीशक्ती तर हजारो वर्षांच्या रूढींच्या आणि परंपरेच्या ओझ्याखाली पार दबून गेली होती. सर्व हिंदुस्थानात स्मशानशांतता होती.

तेथे पुन्हा नवजीवनाचा संचार होतो. कल्पनाही करता येणार नाही अशा शोषणाखाली दबून गेलेले चम्पारण्यातील नीलवागेचे शेतकरी जागृत होतात. अतिशय संत्रस्त अशा एका मनुष्याच्या छातीवर वज्राच्या ढालीचे दर्शन होते आणि तेथेच अहिंसक युद्धाचा आरंभ होतो.

भारताला अहिंसा पूर्ण परिचित होती. गाईला आश्रय मिळावा, कबुतराला दाणा मिळावा, चिमणी-पाखरांना त्यांचे अन्न मिळावे, याकडे त्याचे लक्ष आहे. परंतु ह्या भूमीवरच्या मनुष्यहृदयात नवीन आत्मविश्वास उत्पन्न होईल, अन्यायापुढे सामान्य माणूससुद्धा डोके ताठ करून उभा राहण्याचा निश्चय करील, आणि तीस वर्षे थांवत-थवकत लढाई करून आपल्या स्वराज्याचे ध्येय सिद्ध करण्याकरिता ह्या अहिंसेचा उपयोग होईल, अशी कल्पना कोणीही कधीही केली नव्हती. भारताच्या शेतकऱ्यांत अशी जाणीव जागी झाली की, मीही मनुष्य आहे, मलाही जगण्याचा अधिकार आहे. भारतीय स्त्री पण जागृत झाली. तिलाही समजले की, निर्बल पुरुषांनी विनाकरण आपल्यावर अवलत्वाचे आवरण चढविले आहे, तीसुद्धा पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून लढू शकते. भारतातील अस्पृश्याला समजले की, मालकाच्या शोधात आपण स्वतःलाच विसरला आहो. मनुष्य स्वतःच मनुष्याचा मालक असतो. भारतातील प्रजेलाही समजले की, आमच्या तीस कोटी प्रजेचा भित्रेपणा आणि आपसातील फूट हीच ब्रिटिशांची मोठी शक्ती आहे; व भारतीय लोक स्वतःच

आपल्या पायात पारतंत्र्याच्या बेड्या घालून बसले आहेत. आपण जर एक झालो, तर आपणावर अधिकार गाजविण्याची कोणाचीही छाती नाही.

चंपारण्य सत्याग्रह म्हणजे साम्राज्यवादी शोषणवृत्तीवर सरळ प्रहार होता. त्यानंतर खेडा, जालियनवाला बाग, बारडोली नंतर संपूर्ण भारतच अहिंसक युद्धाचे मैदान बनणार होते.

चंपारण्याने साम्राज्यशाहीच्या शोषणवृत्तीचे स्वरूप उघडे केले व त्यावर उपायही दाखविला. जालीयनवाला बागेत तर साम्राज्यवादी क्रूरतेचे उघडेनागडे प्रदर्शनच झाले. 'खूश होवो तुम हिंदुस्थान' अशा प्रकारची गाणी गाणाऱ्या लोकांच्या हृदयातील इंग्रजांच्यावरील विश्वासाचा पायाच उखडला गेला. कविवर्य रवींद्रनाथ ठाकुरांनी 'नाईटहूड' पदवीचा त्याग केला.

अहिंसक युवक आपल्या पायावर उभे राहिले. अर्जविनंत्यांचे युग संपले आणि असहयोगाचे युग सुरू झाले. असहयोगाचा परिणाम होत नाही, असे दिसताच शांततापूर्ण विरोध सुरू झाला. करबंदी आणि सविनय कायदेभंगाचे पर्व सुरू झाले आणि शेवटी 'करू किंवा मरू' या भावनेने शेवटचा संग्राम लढला गेला.

परंतु असे कोणीही समजू नये की, हिंदुस्थानच्या सर्व प्रजेमध्ये अहिंसेविषयी श्रद्धा होती, त्यांच्यात गांधीनिष्ठा होती. गांधींच्या वचनावर संपूर्ण विश्वास होता. अहिंसाशास्त्रावर विश्वास आणि श्रद्धा, आणि गांधीसारख्या व्यक्तीवर विश्वास ह्या दोन गोष्टींमध्ये फरक आहे. त्यामुळे अहिंसेचे मूल्य कमी होत नाही. एखाद्या माणसाची श्रद्धा, युगानुयुगे पीडलेल्या, पराजित, पतित झालेल्या कोटचवधी माणसांच्या मनात काही प्रमाणात का होईना निर्भयता आणू शकली, तर ही अहिंसक शक्तीसुद्धा एक प्रकारची शक्ती आहे, ह्याची कबुली दिल्याशिवाय सुटका नाही. एखादा माणूस आपल्या अमर्याद श्रद्धेच्या आधारावर निश्चेष्ट आणि निष्क्रिय बनलेल्या हजारो-लाखो लोकांना कर्तव्याच्या भूमिकेवर आणीत असेल आणि प्रसंगविशेषी संघर्षातसुद्धा ओढू शकत असेल, तर ते अहिंसेचे मूल्य नाही, असे म्हणणे म्हणजे सत्याचा अपलाप करणे होय.

हिंदुस्थानच्या स्वराज्यप्राप्तीला काही अंशी आंतरराष्ट्रीय परिस्थितीसुद्धा कारणीभूत झाली असेल. ब्रिटिश सत्ता वर्षानुवर्षे चालू असलेल्या जागतिक युद्धाच्या शेवटी शेवटी थकलेली होती. सुभाषबाबूंच्या प्रयत्नामुळे सैन्यात झालेला असंतोषसुद्धा थोडाबहुत कारण असू शकेल. परंतु गांधींच्या अहिंसक आंदोलनामुळे जागृत झालेल्या लोकांनी फार मोठ्या प्रमाणावर केलेल्या बंडामुळे आणि सविनय कायदेभंगाच्या भावनेमुळे हिंदुस्थानला स्वराज्य प्राप्त झाले, हे कबूल करावेच लागेल. हे कबूल केल्यावर एका व्यक्तीवर नसेल पण अहिंसक साधनशक्तीवरील श्रद्धा वाढेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळ

भारतीय लोकांनी गांधीएवढी अहिंसक साधनशक्तीवर श्रद्धा ठेवली नाही हे सत्य असले, तरी हेही खरे आहे की, गांधींच्या सत्य आणि अहिंसेच्या अचल श्रद्धेने लोकांना गांधीभक्त बनविले. हजारो तरुणांनी शाळा-कॉलेजे सोडली. मोठमोठ्या वकिलांनी आणि डॉक्टरांनी आपले धंदे सोडले. स्त्रियांनी पडदा फेकून देऊन विलायती कापडाच्या दुकानांवर आणि गुंडांचे अड्डे बनलेल्या दारूच्या दुकानांवर निरोधन केले लाखो लोकांनी लाठ्यांचे प्रहार सहन केले आणि हजारो लोक तुरुंगात गेले. कित्येक-जण बंदुकीच्या गोळ्यांना बळी पडले आणि कित्येक जण फासावर चढले. शांत समुद्रावर वादळ व्हावे आणि समुद्र खवळून जावा, त्याप्रमाणे हिंदुस्थानच्या शांत आणि स्थिर अशा जनसागरावर अहिंसक सत्याग्रहाच्या वादळाने एक मोठी खळबळजनक परिस्थिती निर्माण केली आणि ब्रिटिश सत्तेला शांततेने राज्य करणे अशक्य करून टाकले.

अहिंसक युद्ध आणि हिंसक युद्ध या युद्धप्रकारांत अंतर आहे. त्यांच्या प्रक्रियेत पण अंतर आहे. परंतु ती काही शक्तिहीन वस्तू नाही. दोष दूर करण्याच्या हेतूने केलेल्या संहारात काही वावगे आहे, असे हिंसात्मक युद्ध मानीत नाही. अहिंसा, दोष आणि दोषी यांमध्ये फरक करते. दोष करणाऱ्यावरोबर टक्कर घेत नाही. गांधीजींना कोणी तरी विचारले की, तुमच्या विचारसरणीत आणि नेहरूंच्या विचारसरणीत काय अंतर आहे ? गांधीजी म्हणाले की, जवाहरलाल इंग्रजांना काढण्याची इच्छा धरतात आणि मी इंग्रज वृत्तीला काढण्याची इच्छा करतो. जवाहरलालांच्या विचारसरणीत इंग्रजवृत्तीला स्थान आहे आणि माझ्या विचारसरणीत इंग्रजाला स्थान आहे. इंग्रज-वृत्तीला नाही.

हिंसात्मक युद्ध तिरस्काराला व द्वेषाला पोषक असते. तोफांच्या मागे उभे असलेले सैनिक, त्यांच्यामागे त्यांना युद्धसामुग्री पुरविणारी रांग आणि त्यामागे युद्धसाहित्य निर्माण करणारी यंत्रणा द्वेषाचे विष पसरविते आणि एक महाभयंकर वातावरण निर्माण होते. उलट अहिंसा विरोधकाचेही कल्याण इच्छिते. हेच अहिंसेच्या विजयाचे चिन्ह आहे.

बावीस-बावीस संस्कृतींची उत्पत्ती, स्थिती आणि लय यांचा इतिहास लिहिणारा इंग्रज इतिहासकार आर्नोल्ड टॉयनबी राजघाटावर गांधीसमाधीला पुष्पचक्र अर्पण करावयाला जातो आणि स्वतःला प्रश्न करतो की, " जर पुन्हा इतिहास लिहिण्याचा प्रसंग आला तर, समाधिस्थ गांधीजींना इतिहासात मी कोणते स्थान देऊ ? " आणि स्वतःच तो उत्तर देतो की, " देशभक्तापेक्षाही मोठे, हुतात्म्यापेक्षाही मोठे. ' गांधीजींनी असे सिद्ध केले आहे की, त्यांनी आपला देश स्वतंत्र तर केलाच, पण माझ्या देशालाही साम्राज्यवादी दुष्ट नीतीपासून वाचविले.'' हे शब्द माझे आहेत, पण त्यातील भाव मात्र इंग्रज इतिहासकार आर्नोल्ड टॉयनबीचे आहेत.

जमिनीच्या अगदी लहान तुकड्याकरिता जिवाचे रान करणाऱ्या संस्थानिकांनी आपली राज्ये सोडली (विलीन केली), ह्याला इंग्रजी सत्तेचे विलीनीकरण कारणीभूत होते, तसेच केन्द्रीय सरकारही लोकप्रतिनिधींच्या मागे उभे राहिले. परंतु जितक्या शांततेने आणि सहज रीतीने इतक्या जुन्या संस्थानांचे विलीनीकरण झाले, त्यामागे गांधीजींनी अहिंसामार्गाने जागृत केलेल्या संस्थानी प्रजेची जबर इच्छाशक्ती होती, हे कबूल करावेच लागेल.

ह्याच पद्धतीने जमीनदारी नष्ट झाली, आणि रचनात्मक कार्यामागेही हीच शक्ती हीच प्रेरणा देत होती.

धर्म आणि संस्कृतीच्या नावावर सवर्ण हिंदूंच्या मनात शेकडो वर्षांपासून दृढ-मूल झालेली अस्पृश्यतेची भावना दूर करण्याचे पूर्वीही पुष्कळ प्रयत्न झाले होते. परंतु अस्पृश्यतेच्या भावनेला नष्ट करण्याकरिता आंदोलनाचे स्वरूप न देणे, व घटनेत कायद्याने अस्पृश्यता गुन्हा ठरविणे हा अहिंसेच्या वातावरणाचा परिणाम होता.

भारतीय स्त्रीवर्ग जणू अर्धांगवायू झाल्यासारखा पूर्ण जड झालेला होता. पुरूषांनी स्त्रियांना अवला म्हणून गौरविले होते आणि स्त्रियांनीसुद्धा त्याचा मोठ्या भक्तिभावाने स्वीकार केला होता. ह्या भयानक अज्ञानाच्या समजुतीचा परिणाम म्हणजे समाजाचे निम्मे अंग एकदम निकामी झाले; इतकेच काय, भावी प्रजेच्या स्फूर्तीचे प्रवाहच आटून गेले. अहिंसक शक्ती नसली तर दुसरा एखादा मार्ग असेल की नाही हे सांगणे कठीण आहे. परंतु ज्या पद्धतीने भारतीय स्त्रीसमाजाने बुरखा फेकून दिला आणि पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून स्वराज्याच्या लढाईच्या आघाडीवर आणि गुंडांचे अड्डे असलेल्या दारूच्या दुकानांवर निरोधन केले, तसे दृश्य पुन्हा कधीही पहावयास मिळणार नाही.

इतिहासाने हिंदुस्थानाला मुसलमानांची ओळख दुर्दैवाने महंमद गझनीसारख्या लुटारू लोकांच्या द्वारा करून दिली. स्वाभाविकच त्याचा अतिशय वाईट परिणाम हिंदू जनमनावर झाला. त्यामुळे हिंदु मुसलमान–संबंधात पुष्कळच विकृती निर्माण झाली. ती विकृती दूर करण्यात अहिंसेला यश आले नाही, असे म्हटले जाते.

परंतु अहिंसेने नौखालीत बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले ते निराशाजनक होते, असेही म्हणता येत नाही. लॉर्ड माउंटबॅटन दिल्लीत बसून पंजाब आणि बंगाल यांच्या वातावरणाची तुलना करीत असताना म्हणाले की, पंजाबात मोठे सैन्य जे काम करू शकले नाही, ते काम बंगालमध्ये एका मनुष्याची सेना करीत होती. गांधीजींची अहिंसा जातीय विद्वेषाच्या महापुराविरुद्ध काम करीत होती. ती फळी तोडण्याचा प्रयत्न मूठभर लोकांनी केला, परंतु गांधीजींच्या अहिंसक शक्तीपुढे या मंडळींचे काही न चालल्यामुळे गांधींच्या अहिंसक तत्त्वास थोडीफार यशाची आशा वाटू लागली व विनाशाच्या या प्रश्नाचा शेवट सुखद होईल असे वाटू लागले.

हिंदुस्थान पराकोटीच्या दारिद्र्यातून आपला काळ कंठीत असताना सहस्र शेतकऱ्यांना आणि शेतमजुरी करणाऱ्या स्त्रीपुरुषांना खादी आणि ग्रामोद्योग हेच उपाय उद्धारक होते. ग्रामोद्योगांच्या संयुक्त आणि सारख्या प्रमाणात होणाऱ्या विकासाशिवाय ह्या देशाचा आर्थिक प्रश्न सुटणार नाही, ही गोष्ट आता लक्षात येऊ लागली आहे.

परंतु ह्याहीपेक्षा जास्त विकेन्द्रित अशा उद्योगधंद्यांचा विकास मानवी जीवनाला विशेष अनुकूल आहे, हेही लक्षात येऊ लागले आहे. हिंदुस्थानची जमीन पडिक भूमीमुळे कमी आहे, तोपर्यंत विकेंद्रित राहील. गरज पूर्ण करण्याची साधने उपलब्ध होईपर्यंत पशुपालन आणि ग्रामोद्योग राहतील.

गेली वीस वर्षे भारत अहिंसक क्रांतीमुळे उत्पन्न झालेल्या नवजागृतीच्या व मानव-विश्वासाच्या भांडवलावर लोकशाहीचा प्रयोग करीत आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही शक्तीच्या विकासाबरोबर आणि मानवसमाजाच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या भुकेबरोबरच हिंदुस्थानचे काही जुने प्रश्नही सुटले. परंतु भविष्यकाळातील प्रश्न सुटतील की नाही, हे सांगणे कठीण आहे. परंतु ऐंशी टक्के निरक्षरता, भयानक गरीबी, भयंकर विषमता, आणि अनेक भेदाभेद असताना सार्वत्रिक मताधिकाराच्या सिद्धांतावर चार निवडणुकी पार पडल्या. ह्यामागे गांधीनिष्ठेची शक्ती आहे–आणि गांधीनिष्ठेच्या शक्तीमागे ह्या महापुरुषाची अहिंसेवरची अपार श्रद्धा उभी आहे.

मानवामध्ये असणारे दौर्बल्य, कमतरता, शंकाकुशंका ह्यांच्या प्रवाहात काम करणाऱ्या अहिंसेचे दर्शन गेली तीस चाळीस वर्षे भारताने घेतले. आणि पुन्हा ती अदृश्य झाली, असे समजून कोणी कदाचित असे मानीत असेल की, अहिंसा असफल झाली, तिचे युग संपले. पण असे समजण्यात त्यांची मोठी चूक आहे. कारण मानवाच्या अंत:करणात जोपर्यंत विकासाची भावना जागृत आहे., तोपर्यंत अहिंसेला शरण गेल्याशिवाय चालणार नाही, असा मानवाच्या विकासाचा इतिहास आहे. जेव्हा पुन्हा तिचा आश्रय घेण्याचा प्रसंग येईल, त्या वेळी गांधीयुगातील त्या तीस वर्षांचा हिंदुस्थानच्या अहिंसक क्रांतीचा इतिहास तिला प्रेरणा देत राहील.

११

# बापूंचें पुण्यस्मरण

## श्रीमन्नारायण

पुढील लेखांत गांधीजींच्या आठवणी दिल्या आहेत. पण त्या अशा पद्धतीने की, त्यांच्याजीवनांतील तत्त्वांचे दर्शन त्यांतून व्हावे. विशेषतः देशाच्या फाळणीसंबंधी गांधीजींनी जे उद्‌गार लेखकांजवळ काढले ते त्या विषयावर स्वच्छ प्रकाश टाकणारे आहेत. लेखक जसे अर्थशास्त्रज्ञ व राजनीतिज्ञ आहेत, तसेच ते कवि आहेत, हे लेंखाच्या शेवटावरून लक्षात येतें.

एप्रिल १९३६ मधली गोष्ट. हिंदी, साहित्य संमेलनाचे अधिवेशन नागपूरला भरले होतें. तेथील काम आटपून मी श्रद्धेय श्री. जमनालालजी बजाज ह्यांच्या आग्रहामुळे पहिल्यांदाच वर्ध्याला गेलो होतो. तेथे पोचल्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी मला मगनवाडीस बापूजींच्या भेटीसाठी नेण्यात आले. त्या वेळी मालिश आटोपून बापूजी स्नानाच्या तयारीत होतें. महात्माजींचा बहुमोल वेळ माझ्यासारख्या एका तुटपुंज्या माणसाने घेणे बरे काय, अशा विचारात मी गढून गेलो होतो. पूज्य जमनालालजींनी माझी ओळख करून दिली. तेंव्हा बापूजींनी सस्मित मुद्रेने मजकडे पाहून विचारले,

"माझं काम करणार का ?"

त्यांच्या डोळ्यात वात्सल्यपूर्ण प्रेमाची जी झाक होती, त्याने भारावून जाऊन न कळताच मी बोलून गेलो की,

"वापूजी, आपण सांगाल ती कामगिरी पुरी पाडण्याचा मी आटोकाट प्रयत्न करीन."

त्यांना इतक्या जवळून पहाण्याची माझ्या आयुष्यातील पहिल्यांदाच लाभलेली पर्वणी होती. पहताक्षणीच वाटले की, त्यांची तर फार जुनीच ओळख आहे; इतकेच नव्हे तर ते आपल्याच कुटुंबातले एक वडीलधारे थोर पुरूष होत.

त्या दिवशी पूज्य वापूजींशी फारसे वोलणे झाले नाही. वापूजींना अभिवादन करून मी त्यांचा निरोप घेतला.

पुढे त्यांच्या आदेशानुसार मी वर्ध्यास राष्ट्रभाषा प्रचार समितीचा सरचिटणीस ह्या नात्याने काम करू लागलो. काही काळ मी वापूजींच्या इंग्रजी 'हरिजन' मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या लेखांचे हिंदी भाषांतरही करीत असे.

गांधीजींनी मगनवाडी सोडली आणि ते सेवाग्रामला राहू लागले. त्या गावचे आधीचे नाव होते सेगाव. त्याचेच पुढे सेवाग्राम झाले. मे महिन्यातील कडाक्याच्या उन्हाने जीव हैराण होत होता. उन्हाच्या झळांनी अंग भाजून निघून होते. तरी देखील वापूंनी त्या खेड्यात रहावयाचा निर्धार केला होता. वर्धा शहरात यापुढे रहावयाचे नाही, असे त्यांनी पक्के ठरवले होते. सेवाग्राम हे जमनालालजींच्या मालगुजारी अखत्यारातले गाव होते. वर्ध्यापासून ते चारच मैलांवर होते. म्हणून गांधीजींनी ते गाव निवडले.

गांधीजी मगनवाडीहून सेवाग्रामला निघाले तेव्हा श्री. महादेवभाई देसाई व श्री. जमनालालजी ह्यांच्यासमवेत मीही पायी निघालो. आम्ही सारे जण चालत त्या गावी पोचलो. गांधीजींच्या रहाण्याच्या सोयीचे ठिकाण त्या वेळी गावात नव्हते.

संतऱ्याच्या वगीचात जमनालालजींनी तात्पुरती सोय म्हणून तट्ट्याची एक छोटीशी झोपडी उभारली. पूज्य वापूजी त्या झोपडीत राहू लागले. हळूहळू गावानजिक एक आश्रम उभा झाला.

प्रारंभी पूज्य वापूजी सेवाग्रामच्या 'आदिनिवासा'च्या एका कोपऱ्यात रहात. एकदा त्यांनी मला पाचारण केले. त्यांनी मला विचारले,

" शिक्षण किती झालंय तुमचं ?"

मी म्हटले, " इंग्रजी विषय घेऊन एम. ए झालोय मी."

मग त्यांनी दुसरा प्रश्न विचारला, " चरख्यावर सूत कातायला येतं का ?

मी म्हटले, " येत नाही, पण शिकून घेईन."

वापूजी स्मित करून म्हणाले, " आपल्या राष्ट्रीय जीवनाचं प्रतीक म्हणजे चरखा, देशातल्या गोरगरीव जनतेची सेवा त्याच साधनानं आपण करू शकू. अजून तुम्ही चरखाशास्त्राचा अभ्यास केला नाही. म्हणजे धूळ चिवडण्यात काल घालवला, असंच नाही का ?"

मग अंमळ थांबून ते म्हणाले,

" ठीक आहे. मी तुम्हांला खरेच माती चाळण्याचे काम देणार आहे."

आश्रमवासी श्री. मुन्नालाल शहा ह्यांना बोलावून घेऊन बापूजींनी सांगितले, " हे पहा, आश्रमातील संडासासाठी माती चाळून घेण्याच्या कामात श्रीमनजींना पण मदतीला घेत चला, उद्यापासून."

पहिल्यांदा मला कसेसेच वाटले. पण मी लागलीच हसत हसत उत्तर दिले,

"बापूजी, उद्यापासून हे काम मी अगदी मजेनं करीत जाईन. घरी मी बागेत फावड्यानं माती उकरून चहूकडे पसरायचं काम खूप केलंय."

ह्याप्रमाणे मी आठवड्यातून दोनदा वर्ध्याहून सेवाग्राम आश्रमात जाई व निमूटपणाने माती चाळण्याचे काम करी. हा क्रम कित्येक महिने चालला. पुढे काही दिवसांनी 'हरिजन-सेवक' ह्या हिंदी साप्ताहिकासाठी इंग्रजी लेखांचे हिंदी भाषांतर करण्याची कामगिरी बापूंनी मजवर सोपवली. बापूजींची इच्छा होती की, भाषांतर सोप्या हिंदी किंवा हिंदुस्तानी भाषेत करावे. मी हे काम मोठ्या आवडीने केले. मला वाटते की, माझी भाषा-शैली गांधीजींना पसंत होती.

सन १९३७ मध्ये ऑक्टोबर महिन्यात वर्ध्याच्या शिक्षण मंडळाचा रौप्य महोत्सव साजरा करावयाचे ठरले होते. बंगालचे प्रसिद्ध पुढारी आचार्य प्रफुल्लचंद्र राय ह्यांना समारंभाच्या उद्घाटनासाठी पाचारण केलेले होते. त्या सुमारास गांधीजी हरिजनपत्रात शिक्षण स्वावलंबी करण्याबाबतची आपली मते लेखातून व्यक्त करीत होते.

एकदा मी त्यांना म्हटले, " शिक्षण मंडळाच्या रौप्य महोत्सवाच्या प्रसंगी शिक्षणासंबंधीच्या आपल्या त्या विचारांची चर्चा करण्यासाठी छोटेसे शिक्षण संमेलन भरवणे उचित होईल. नाही का ?" ही कल्पना गांधीजींना रूचली. ते लगेच म्हणाले, अशा संमेलनासाठी कोणाकोणा शिक्षणतज्ज्ञांना बोलवावयाचे,त्यांची यादी मीच तयार करीन."

काही दिवसांनी बापूजींनी मला एक यादी दिली. प्रांताप्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळातील शिक्षणमंत्री आणि गांधीजींच्या शैक्षणिक विधायक कार्यातील आठदहा कार्यकर्ते त्यांचा त्या यादीत समावेश होता. मी यादी पाहिली. आणि सहज विचारले,

" दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामियांचे संचालक डॉक्टर जाकिर हुसेन ह्यांनाही बोलावणं योग्य होईल, नाही का ?"

किंचित् विचार करून बापूजी म्हणाले,

" हां, त्यांनाही अवश्य बोलवा."

आणि मग मला त्यांनी सूचना दिली,

" हे पहा, यांना तुम्ही स्वतः उर्दूत पत्र लिहा."

मी त्याप्रमाणे केले. डॉ. जाकिर हुसेन ह्यांचे लागलीच उत्तर आले की, 'मी अवश्य येईन.'

आणखीही काही प्रमुख शिक्षणतज्ज्ञांची, आपण संमेलनासाठी येणार असल्याची पत्रे आली. तेव्हा मी एके दिवशी सेवाग्रामला गेलो. आणि बापूजींना म्हटले की, "आपणच ह्या संमेलनाचे अध्यक्ष व्हावे हे चांगले."

बापूजींनी ही सूचना आनंदाने मान्य केली. त्या गोष्टीचा आम्हा सर्वांना मोठा हर्ष झाला. शिक्षणमंडळाचे अध्यक्ष जमनालालजी होते. त्यांना फार समाधान वाटले.

ऐन संमेलनाच्या वेळी मी एकाएकी आजारी पडलो. डॉक्टरांनी आजाराचे निदान करून सांगितले, की, विषमज्वर आहे. गांधीजींना फार काळजी वाटू लागली. ते मला पहायला आले. म्हणाले,

"हे काय बरं झालं ? तुमच्यावर विसंबून तर मी हे संमेलन भरवण्याला अनुमती दिली होती. पण आता संमेलन तहकूब करण्याविना गत्यंतर दिसत नाही.'

मी सावकाशीने उत्तर दिले,

"बापूजी, आपणांस योग्य वाटेल ते करावं, पण मला मात्र वाटतं की, हे संमेलन आताच झालं पाहिजे. शिक्षणाबाबतच्या आपल्या विचारांसंबंधी सर्व दृष्टींनी चर्चा व्हावी, हे बरे."

त्यावर बापूजी अंमळ स्वस्थ बसले, व मग म्हणाले,

"बरंय, मी त्याबद्दल जमनालालजी आणि आर्यनायकम् यांच्याशी बोलणं करीन."

भारतीय शिक्षण-पद्धती स्वावलंबी झाली पाहिजे, ह्या दृष्टीने गांधीजी मोठ्या गंभीरपणाने विचार करीत होते. म्हणून मग त्यांनी ठरवून टाकले की, संमेलन तहकूब न करता आताच भरवावयाचे. त्याप्रमाणे संमेलन तारीख २२।२३ ऑक्टोबरला भारतीय विद्यालयाच्या पटांगणात भरले.

मी आजारी असल्यामुळे संमेलनास हजर राहू शकलो नाही. संमेलनातील चर्चा देशाच्या दृष्टीने मोठी उपयुक्त होती.त्या संमेलनातच 'मूलगामी शिक्षणा'च्या योजनेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

ह्या संमेलनात एक मजेदार पण मार्मिक घटना घडून आली. मी वर सांगितल्याप्रमाणे माझ्या सूचनेवरून डॉ. जाकिर हुसेन ह्यांना संमेलनाचे निमंत्रण देण्यात आलेले होते. पण त्यांनी संमेलनात बापूजींच्या मतांना कडाडून विरोध केला. ते म्हणाले की, कामातून शिक्षण देण्याचा अखेर परिणाम असा होईल की, शिक्षकांचा पगार वसूल करण्यासाठी विद्यार्थ्यांना गुलामासारखे राबवून घेतले जाईल.

डॉ. हुसेन यांच्या ह्या विचारांमुळे संमेलनात काहीसे चिंतेचे वातावरण पसरले. कित्येक शिक्षणतज्ज्ञांनाही चमत्कारिक वाटले. पण बापूजींमध्ये काम करून घेण्याची

विलक्षण हातोटी होती. त्यांनी डॉ. हुसेन यांच्या टीकेचे स्वागत केले व स्वतःचे विचार जास्त सविस्तर समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; कसलाही गैरसमज राहू नये, असा त्यांचा इरादा होता. संमेलनाच्या वतीने एक समिती नेमण्याचे ठरले. 'मूलगामी शिक्षणा'चा अभ्यासक्रम वनवण्यासाठी नेमलेल्या ह्या समितीचे अध्यक्षपद गांधीजींनी डॉ. जाकिर हुसेन यांच्याकडेच सोपवले. ह्या समितीच्या बऱ्याच बैठकी झाल्या. शेवटी एक वृत्तांत वनवण्यात आला. 'जाकिर हुसेन समितीचा अहवाल' ह्या नावाने देशभर त्याची प्रसिद्धी झाली.

पुढे मूलगामी शिक्षण-पद्धतीचा देशभर प्रसार करण्यासाठी डॉ. जाकिर हुसेन ह्यांनी मोठ्या उत्साहाने, हिरीरीने व निष्ठेने प्रयत्न केला. डॉक्टरसाहेव राष्ट्रपती वनले. तथापि मूलगामी शिक्षण पद्धतीवद्दल त्यांना नित्य चिंता वाटे. गांधीजींचे सिद्धांत देशाच्या शिक्षणपद्धतीत कसे मूर्त स्वरूपास आणता येतील, ह्याची त्यांना काळजी वाटे. वापूजींच्या उदार अंतःकरणाचाच हा प्रभाव म्हटला पाहिजे की, प्रारंभी त्यांच्या योजनेला जोराचा विरोध करणारे डॉ. जाकिर हुसेनसारखे शिक्षण शास्त्रज्ञ पुढे त्यांच्या विचारप्रणालीचे प्रभावशाली प्रचारक वनले.

ऑगस्ट १९४२ च्या 'चले जाव' चळवळीत मला पकडण्यात आले. त्या वेळी मी वर्ध्याच्या कॉमर्स कॉलेजचा प्राचार्य होतो. माझ्या व्यतिरिक्त काही अध्यापकांना व विद्यार्थ्यांना तुरुंगात डांवण्यात आले. कॉलेजच्या इमारतीला सरकारी मोहर ठोकण्यात आली. मी अठरा महिने तुरुंगात होतो, त्या काळात अर्थशास्त्राचे सखोल अध्ययन केले.

त्या सुमारासच भारतीय कारखानदारांनी स्वतःची एक विकास योजना प्रसिद्ध केली. इंग्रजी कारखानदारांच्या मदतीने देशाचे झपाट्याने उद्योगीकरण कसे करता येईल, ते त्या योजनेत दाखवून दिलेले होते. मी बुलढाणा तुरुंगात ती वातमी वाचली. तेव्हा मला फार दुःख झाले.

देशाचे सारे राष्ट्रीय पुढारी तुरुंगात खितपत पडले होते. इंग्रजांशी जीवन-मरणाचा संघर्ष चालू होता. अशा वेळी कारखानदार मंडळींनी गांधीजींच्या विचा-राशी कसलाच ताळमेळ नसलेली योजना देशापुढे ठेवण्यास प्रवृत्त व्हावे, ही गोष्ट चमत्कारिक होती. म्हणून मी गांधीजींच्या विचारांचा पूर्णपणे समावेश असलेली योजना वनवण्याचे ठरवले. त्या दृष्टीने भारतीय अर्थशास्त्राचा जास्तच सखोल अभ्यास चालवला. बुलढाणा तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी मला सर्व प्रकारची पुस्तके मागव-ण्याची व वाचण्याची मुभा दिली. सुमारे चौदा महिन्यांनी तेथून माझी वदली जबल-पूर तुरुंगात झाली. तेथेही माझा अभ्यास चालूच होता.

मार्च १९४४ मध्ये एके दिवशी जवलपूर तुरूंगातून अचानक माझी सुटका झाली. मी मग थोड्याच दिवसांत 'गांधीवादी अर्थयोजना' हे पुस्तक तयार केले.

त्यानंतर दोन महिन्यांनी गांधीजींचीही सुटका झाली. मी पुण्याजवळ पाचगणी येथे जाऊन त्यांना भेटलो. मी आर्थिक योजनेबाबतच्या माझ्या पुस्तकाचा हेतू त्यांना सांगितला. तो त्यांना फार पसंत पडला. योजनेच्या कित्येक पैलूंसंबंधी मी काही दिवस त्यांच्याशी विस्ताराने चर्चा केली. कित्येक आर्थिक विषयांसंबंधी बापूजींनी यंग इंडिया किंवा 'हरिजन' पत्रात कधीच काही लिहिले नव्हते. अशा विषयांबाबतही या चर्चेमध्ये खुलासा करून घेता आला.

समग्र पुस्तक वाचून बापूजींनी काही सूचना केल्या व मग पुस्तकाच्या हस्तलिखितावर लिहिले, "साधी रहाणी, उच्च विचारसरणी". बापूजींच्या अर्थशास्त्राचे खरे सारसर्वस्व त्या विचारात साठवलेले आहे हे, तर उघड होय.

वर्तमानपत्रात मी जून १९४७ मध्ये वाचले की, काँग्रेस कार्यकारिणीचे बहुतेक सभासद देशाची फाळणी मान्य करणार आहेत. तेव्हा माझ्याच्याने रहावले नाही. मी तडक दिल्लीस गेलो, व बापूजी भंगी कॉलनीत रहात होते तेथे जाऊन पोचलो. त्यांच्यापाशी तीन-चार दिवस राहिलो. ज्या ज्या वेळी सवड मिळाली तेव्हा बापूजींना आग्रहाची विनंती केली की, काही झाले तरी देशाची फाळणी मान्य करू नका.त्या सुमारास मी हिंदुस्तानी प्रचार सभेचा चिटणीस होतो. देवनागरी व उर्दू ह्या दोन्ही लिप्यांत लिहिल्या जाणाऱ्या हिंदुस्तानी भाषेचा राष्ट्रभाषा म्हणून प्रसार करावा,असा गांधीजींचा आग्रह होता. मी बापूजींना उद्वेगाने म्हटले,

" बापूजी,देशाची फाळणी झाली तर आधी हिंदुस्तानी प्रचाराच्या चळवळीचा निकाल लागेल. निदान मला तरी चिटणीसपदाचा राजीनामा द्यावा लागेल."

बापूजींनी गंभीरपणे उत्तर दिले,

"तुम्हांला किती तीव्र वेदना होतात, ते माझ्या पुरते ध्यानात आले आहे. पण करणार काय ? आज देशाच्या साऱ्याच पुढाऱ्यांनी फाळणी मान्य केली आहे. फक्त अब्दुल गफारखां माझ्या मताचे आहेत. म्हातारपणी मी नवे पुढारी कसे बरं तयार करू तुम्हीच सांगा."

अंमळ थांबून ते पुढे म्हणाले,

"देशाच्या फाळणीची कल्पनाही मला सहन होत नाही. पण मी आता फाळणीला विरोध केला तर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या बैठकीत काँग्रेस कार्यकारिणीचा ठराव नामंजूर होईल त्याचा परिणाम काय होईल, तर देशात अराजक माजेल. ह्या वेळी देशात दुसरा असा कोणताही पक्ष नाही की,जो काँग्रेसचे स्थान घेऊ शकेल. म्हणून माझा काँग्रेसजनांना असा सल्ला आहे की, एकंदर परिस्थितीचा विचार करून कार्यकारिणीचे म्हणणे मान्य करावे हे मरणप्राय आहे."

देशाची फाळणी झाली. सर्वत्र रक्तपात झाला. बिहार व नौखाली येथून कत्तलीची आग विझवीत विझवीत गांधीजी दिल्लीला परत आले. भंगी कॉलनी

निर्वासितांनी भरून गेली होती. म्हणून बापूजींचा मुक्काम बिर्ला भवनात होता, तेथे रोज प्रार्थनासभा होत. शेकडो निर्वासित आपली दु:खाची कर्मकहाणी सांगून तेथे ढळाढळा रडत.

तो दिवस होता १२ जानेवारी. मी देखील त्या दिवशी वर्ध्याहून दिल्लीस आलो. सायंकाळी बापूजींना भेटण्यासाठी बिर्ला भवनात गेलो. प्रार्थना झाल्यावर बापूजींनी मला आत खोलीत बोलावले. ते खोलीतल्या खोलीत येरझारा घालीत होते. त्यांचा चेहरा विलक्षण गंभीर दिसत होता. काहीसा काळवंडला होता. एकदा बापू मला म्हणाले होते की, " ज्या दिवशी माझा हास्यविनोद नष्ट होईल त्या दिवशी माझा मृत्यू ओढवणार हे नक्की समजावे.'

त्यांच्या ह्या वाक्याची मला त्या वेळी सहज आठवण झाली. ३० जानेवारीला तर ते ईश्वराच्या मांडीवर कायमचे झोपी गेले.

आज गांधीजींना महात्मा व युगपुरुष मानून सारे जग त्यांचा आदर करते. खरोखरीच ते एक क्रांतिकारी द्रष्टे पुरुष होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने स्वराज्य संपादन केले. भारत स्वतंत्र झाल्यावर आशिया व आफ्रिका खंडांतील कित्येक राष्ट्रे परकीय साम्राज्यापासून मुक्त झाली.

मी मात्र गांधीजींना महामानव समजतो. सर्वात आधी ते एक माणूस होते. त्यांच्या सहृदय मानवतेने हजारो, लाखो माणसांना स्वत:कडे खेचून घेतले.पितृतुल्य वात्सल्याच्या आकर्षणामुळेच मीही त्यांच्याकडे खेचलो गेलो. राष्ट्रसेवेसाठी केवळ एखाद्या ' महात्म्या 'च्या सान्निध्यात मी क्वचितच गेलो असतो. १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीच्या काळात तुरुंगात मी खालील पद्यपंक्ती लिहिल्या होत्या –

**विमल प्रेम-जल से तुमने नित,**
**मनुजहृदय को सींचा है,**
**संत, तुम्हारी मानवताने**
**ही मुझको तो खींचा है ।।**

१२

# गांधी-युग व गांधी-युगांत

## पु. ल. देशपांडे

परतंत्र भारतातील जनतेमध्ये भय, दारिद्र्य, आलस्य, अविश्वास इत्यादि जे दोष निर्माण झाले होते, ते नष्ट करण्यासाठी गांधीजींनी हिन्दी जनतेच्या हाती अहिंसक प्रतिकाराची समर्थ आयुधें कशी दिली, याची मीमांसा पुढील लेखात केली आहे. त्याचप्रमाणे, स्वातंत्र्य-कालात गांधीय मूल्यांचा लोप भारतामध्ये झालेला कोठे कोठे दिसतो, हेही त्यात विवेचिले आहे.

गांधीजींनी एके ठिकाणी म्हटले आहे की, " गांधीवाद नावाची कोणत्याही प्रकारची वस्तू नाही. आणि माझ्यामागे कोणताही असा पंथ चालू व्हावा अशी माझी इच्छा नाही. मी एखादे नवे तत्त्व किंवा एखादा नवा सिद्धान्त शोधून काढला, असा दावाही मला करावयाचा नाही.'' गांधीजींच्या या उद्गारावरून मला तुकोबांच्या अभंगातील ओळ आठवली:–

" आम्ही वैकुंठवासी। आलो याचि कारणासी ।
बोलिले जे ऋषि । साच भावे वर्ताया ।।''.

ऋषींनी शोधलेली आणि माणसामाणसाला निरामय, सुंदर जीवनाचा आनंद देणारी सनातन तत्त्वे संतांनी आचरून दाखविली. ज्ञानेश्वरांनी ह्या अशा शुद्ध, निर्भय आचरणालाच उद्देशून म्हटले आहे, "जयांच्या लीळांमाजी नीति जियाली

दिसे.'' त्यांचे आचरण पाहणे म्हणजेच नीतितत्त्वांचा विकास पाहणे आहे. गांधीजींचा शोध हा त्यांच्या लेखनांतून किंवा वक्तृत्वातून घेण्यापेक्षा आचरणातूनच घ्यायला हवा. वक्तृत्वापेक्षा कर्तृत्वातून त्यांना शोधायला हवे. त्यांच्या शब्दापेक्षा त्यांचे मौन अधिक बोलके असे आणि उपदेशापेक्षा उपोषणातून अधिक सामर्थ्य प्रकट होई. म्हणूनच गांधीवाद गांधींना मंजूर नव्हता. वादात प्रतिपक्षावर मात करण्याचा अभिनिवेश असतो. तिथे वहुधा जो तो बुद्धीच सांगतो आणि उरते ते करंटेपण. वाचाळतेला क्रियेचा आधार नसला तर 'शब्द वापुडे केवळ वारा' होऊन जातात. गांधींचे तत्त्वज्ञान त्यांच्या प्रत्येक क्रियेतून दर्शन देत गेले. ईश्वर आणि प्रार्थना ह्यांवर नितान्त श्रद्धा ठेवणारे गांधीजी त्या ईश्वराचे दर्शन भारतातल्या वहुसंख्यांना भाकरीतूनच घडवावे लागेल हे ओळखून होते. त्यांना भरल्या पोटातला वेदान्त नको होता आणि उपाशी पोटोबांना विठोवाची भक्ती सांगायची नव्हती. म्हणूनच त्यांच्या अध्यात्माचा टाळकुटेपणा झाला नाही. भगवन्ताचे अधिष्ठान आणि चळवळीचे सामर्थ्य ह्यांचा संगम झाला पाहिजे. नुसत्या भगवन्ताच्या अधिष्ठानाच्या जयजयकारातून आळसाला आणि भोंदूपणाला उत्तेजन मिळते. आणि सात्त्विक अधिष्ठानाशिवाय होणाऱ्या सामाजिक वा राजकीय चळवळीतून द्वेषाचे विषारी वातावरण तयार होते, तत्त्वच्युती होते, अविश्वास निर्माण होतात. अविश्वासातून भय आणि भयातून हिंसा जन्माला येते. दुर्बलांचे दुर्बलत्व वाढते आणि सवलांचे दानवीकरण होते.

गांधीजींनी सत्य, अहिंसा यांसारख्या सनातन मूल्यांचे स्वरूप कृतींतून प्रकट करण्यात आयुष्याचा प्रत्येक क्षण वेचला. सामान्य माणसाला हवा असतो तो त्याच्या डोळ्यांना दिसणारा आचरणाचा धर्म. आणि हा धर्म सांगणारा माणूस आपल्यांतच आहे, आपल्या वेदना जाणणारा आहे, त्या वेदना भोगलेला आहे, हा विश्वास ऐकणाराच्यात निर्माण व्हावा लागतो. गांधीजींचे हे लौकिकत्व अत्यंत अलौकिक होते. म्हणूनच त्यांचे अनुयायी त्यांच्यासमवेत पुढारी आणि अनुयायी ह्या नात्याने न चालता त्यांचे कुटुंबीय म्हणून चालले. ते महात्माजी होते, पण त्याहूनही अधिक ते 'वापू' होते. सरदार वल्लभभाई म्हणजे नखशिखान्त विलायती वालिष्टर. पण वापूंच्या सहवासांत आले आणि हा पोलादी पुरूष वापूंची दात घासण्याची लिंवाची काडी तयार करणे, फळे कापणे, मधपाण्याचे मिश्रण करणे ही कामे मागून घेऊन करू लागला. असामान्य बुद्धिमत्ता आणि प्रखर पांडित्य असलेले विनोवा आश्रमात गांधीजींच्या जोडीला वसून धान्य निवडीत, दळण दळीत. जनावाई दळिता कांडिता विठ्ठलाचे गीत गात होती, कबीर शेले विणताना माणसांच्या वेदना पाहून रडत होता, चोखामेळा रस्ता झाडत देवाचे नाव घेत होता, सावता माळी मळ्यातल्या कांद्यामुळ्यांच्या लागवडीत विठ्ठलाचे रूप पाहत होता. महात्माजींच्या आश्रमांत ही सारे कामे देशाच्या स्वातंत्र्याचा ध्यास घेऊन चालली होती. व्यासपीठावरून भाषणे करणारे, सरकारशी

शाब्दिक किंवा शस्त्र धारण करून चकमकी करणारे पुढारी जनतेला ठाऊक होते. ते वंद्यही होते. ते तुरूंगवासही सहन करीत. त्यांच्या शौर्याविषयी लोकांना आदरही होता. परंतु पुढ्यात चरखा घेऊन सूत काढणारा आणि आपल्यासारखेच दळणटिपण करणारा आणि आपल्यासारखेच गरीबीचे जिणे जगणारा, तसाच अर्धनग्न असणारा हा माणूस आपल्या दु:खाशी सर्वस्वी परिचित असणारा आपला तारक आहे ही जाणीव गांधींना विलक्षण जवळीक देऊन गेली. गांधींच्या काळात भारत हा एक विशाल कुटुंब बनला तो गांधींच्या ह्या लोकविलक्षण लौकिकत्वामुळे. भारतातल्याच नव्हे, तर जगातल्या कुठल्याही माणसाला सर्वसंगपरित्यागी माणसाकडे सदैव जिव्हाळा आणि आदर अशा संमिश्र भावनेनेच पहायला आवडते. भारतात तर त्याचे विशेषच कौतुक. म्हणूनच गांधीजींच्या सार्वजनिक जीवनातल्या उदयावरोवर गांधीवादाचा जन्म न होता गांधीयुगाचा जन्म झाला. वैयक्तिक, सामाजिक आणि राजकीय जीवनांत मानवी समाजाच्या धारणेला अत्यावश्यक असणाऱ्या सनातन मूल्यांचा आधार असलेले नवे विचार गांधींनी दिले. गांधींनी नवा धर्म दिला नाही, नवी व्रते गांधींच्या आचाराधिष्ठित विचारांना गांधीवाद न म्हणता गांधीयोगच म्हणायला हवे. योगात जोडण्याची कल्पना येते, आणि जोडायला दुवा लागतो. भारतातला 'दारिद्र्य' हा दुवा गांधींनी सर्वात महत्त्वाचा मानला. साऱ्या व्यथांचे मूळ दारिद्र्यात आहे, हे सनातन सत्य आहे.

ह्या देशात गांधीजींच्या काळात आणि आजच्याही काळात जास्तीत जास्त लोकांची समान व्यथा म्हणजे दारिद्र्य. विवेकानंदांनीहि लक्ष्मीनारायणापेक्षा दरिद्री-नारायणाच्या उपासनेलाच महत्त्व अधिक दिले. भारतात आर्थिक दारिद्र्याइतकेच भयानक आध्यात्मिक दारिद्र्य आहे. ईशावास्याची घोषणा ज्या देशात झाली त्या ह्या देशाइतका अध्यात्मदृष्टचा दरिद्री देश भौतिकवादी म्हटल्या गेलेल्या यरोपखंडातही नसेल. सर्वाभूती एकच ईश्वर असल्याचा आपण गजरच अधिक करतो. साक्षात् त्या देवाच्या दारातच आम्ही स्पृश्याला घडविणारा ईश्वर आणि अस्पृश्याला घडवणारा ईश्वर असे त्या ईश्वराचेच दोन तुकडे केले. आम्हाला दारिद्र्यामुळे माणुसकी परवडत नाही की माणुसकी नाही म्हणून आम्ही दरिद्री, कोण जाणे. दारिद्र्याच्या खातेऱ्यात लोळणाऱ्या माणसांकडे आपण चांगल्या कोरड्या डोळ्यांनी आणि त्याहून कोरड्या मनाने पाहू शकतो. रोटीबंदी, बेटीबंदी, स्पर्शबंदी यांसारख्या अमानुष आचरणपद्धतीत भारताला अग्रमान मिळावा, असला हा देश राजकीयच काय पण धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक किंवा वैचारिक पारतंत्र्यात न पडता तरच आश्चर्य. गांधीजींनी पहिले बोट ठेवले ते ह्या आध्यात्मिक आणि आर्थिक दारिद्र्यावर. ह्या आध्यात्मिक दारिद्र्याविरुद्ध आणि त्यातूनच निर्माण होणाऱ्या सहानुभूतिशून्य जगण्यावर अत्यंत तीव्रतेने आघात करणारा गांधींच्याही आधीचा महात्मा ज्योतिवा

फुले. उपास, दैन्य, उपेक्षा ह्यांच्या संगतीत नांदणारा आणि भिक्षुकशाहीने निर्माण केलेल्या भगवन्ताच्या भुताला देव मानणारा शेतकरी आणि त्याच भिक्षुकशाहीला बळी दिलेल्या विधवा आणि अस्पृश्य, ह्यांच्याविषयींच्या कळवळयाने, अत्यंत तीव्रतेने जीवनातील सत्याचा शोध घ्यायला निघालेले ज्योतिबा फुले मला इतर कुठल्याही पुढाऱ्यापेक्षा गांधीजींचे खरे पूर्वसूरी वाटतात. फुल्यांची वाणी कठोर होती, पण अंतःकरण माणुसकीने ओथंबलेले होते. गांधींचे अंतःकरण आणि वाणी दोन्हीही मृदू असली तरी निर्धार वज्राला भेदणाराच होता. महात्मा फुल्यांच्या कार्याची मर्यादा महाराष्ट्रापुरतीच राहिल्यामुळे भारतीय पातळीवर त्यांच्या कार्याचे कौतुक झाले नाही. पण त्यांनी जी चळवळ सुरू केली ती सत्यशोधनाचीच होती. गांधींनीही प्रथम सुरू केले ते सत्याचेच प्रयोग. प्राचीन भारतीय ऋषी हे प्रयोग करणारे वैज्ञानिक होते. गांधींच्यात सामान्य आणि असामान्य दोघांनाही प्रयोग करणारा ऋषी आढळला. फरक इतकाच की, हा ऋषी सामान्यांच्यात वावरणारा सन्त होता. हिमालयांत जाऊन वसणारा योगीराज नव्हता. हा आपल्यात राहणारा, आपल्यासारखाच, आपल्याला समजणारी भाषा बोलणारा आणि आपल्या दुःखांना वाचा फोडणारा, ती दुःखे हलकी करण्याच्या कृती शोधून काढणारा आहे, ह्याची जाणीव, जिथे प्रकाशाचा कसलाही किरण पोहोचू शकत नव्हता, असल्या खेड्यांतल्या सामान्यांतल्या सामान्य माणसाला झाली.

स्मृतिकारांनी 'ज्ञानी' माणसाच्या वागण्याचे मोठे मार्मिक वर्णन केले आहे.:—

यं न सन्तं न चासन्तं
नाश्रुतं न वहुश्रुतं ।
न सुवृत्तं न दुर्वृत्तं
वेद कश्चित्स ब्राह्मणः ।।

जो सन्तांसारखा असामान्य नाही किंवा जो सन्तपणाला पारखाही नाही, जो अविद्वान नाही आणि विद्याभ्यासजडही नाही, जो सदाचाराचा वडेजाव करणारा नाही किंवा दुराचारीही नाही, असा लौकिकांत लौकिक आणि अलौकिकांत अलौकिक असणारा माणूस पोथीनिष्ठांना बुचकळ्यात पाडीत असला तरी सामान्यांना आपल्याहून थोर असल्याची जाणीव असूनही आपला वाटतो. म्हणूनच राजकारणातील पंडितांना गांधीजींची जी 'फॅड्स्' आहेत असे वाटत होते, ती सामान्य जनांना अहिंसामय प्रतिकाराची समर्थ आयुधे वाटली. गांधी पंचा नेसून उघडे राहिले. वस्त्राधिष्ठित संस्कारांना सुधारणा समजणाऱ्या लोकांना त्यांत ढोंग दिसले, परंतु कोट्यवधी अर्धनग्न भारतीयांना त्यात हा माणूस आपल्यासारखा वाटला. गांधींच्या आधी हा वेडेपणा (?) फक्त ज्योतिबांनी इंग्रजांच्या मुंबईत भरलेल्या दरबारी जातांना केला होता. गांधीजींच्या उदयापूर्वी 'स्वराज्य' हा भारतीय बुद्धिमंतांचा आणि

शस्त्रवन्तांचा इंग्रज बुद्धिवन्तांशी आणि शस्त्रवन्तांशी चाललेला झगडा होता. गांधीजींनी तो न्यायाचा अन्यायाविरुद्ध चाललेला, माणुसकीचा अमानुषत्वाशी चाललेला झगडा केला. हा झगडा केवळ राष्ट्रीय नव्हता. जगातल्या दलितांचा त्यांना दलितावस्थेत ठेवणारांशी चाललेला हा झगडा होता. गांधींनी राजकारणाचे अध्यात्मीकरण केले ते सायंप्रार्थनेने नव्हे, तर जात, धर्म, राष्ट्र, वेश ह्या कृत्रिम तटबंदीविरुद्ध पुकारलेल्या पवित्र शंखनादाने. डॉ. मार्टिन ल्यूथर किंगच्या बलिदानामुळे गांधींच्या आंतरराष्ट्रीय प्रभावाची जाणीव जगाला अधिक झाली, तरी एकोणीसशे एकोणतीस साली म्हणजे डॉ. किंग ज्या साली जन्माला आले आणि वयाने अवघे सात महिन्यांचे होते, त्या वर्षी गांधींनी निग्रोंच्या दास्यमुक्तीच्या चळवळीला त्यांच्या 'क्रायसिस' नावाच्या मासिकासाठी संदेश पाठविला होता. त्यात त्यांनी म्हटले होते--"गुलाम असणे यात कोणताच कलंक नव्हता. गुलामांचे मालक असणे यात खरा कलंक होता. परंतु ते जाऊ द्या. गतकाळाचा हा संदर्भ उकरून काढणे आता बरोबर होणार नाही. भविष्यकाळाकडे आपण नजर ठेवू. जे लोक सत्य, पावित्र्य व प्रेम यांचा आग्रह धरतील तेच आगामी काळाची घडण करू शकतील." इतकेच नव्हे तर त्यानंतर सहाच वर्षांनी म्हणजे १९३५ साली गांधींच्या भेटीला निग्रो कार्यकर्त्यांचे एक पथक भारतात आले होते. त्या पथकाला गांधींनी सांगितले, "अखेरीस अहिंसेचा पवित्र संदेश जगाला पोहोचविण्याचे ऐतिहासिक कार्य निग्रोंच्याच द्वारा होणार आहे." गांधीजींना अभिप्रेत होते ते साऱ्या मानवी समाजाचे स्वातंत्र्य. लिंकनने म्हटले आहे, "मी कुणाचा जसा गुलाम होणार नाही, तसाच कुणाचा मालकही होणार नाही."

स्वातंत्र्य ह्याचा अर्थच मुळी भयशून्य होणे हा आहे. भारतीय तत्त्वज्ञानात चित्त भयशून्य करणे हा गीताप्रणीत अंतिम आदर्श आहे. लोकमान्य आणि गांधी ह्यांची गीतेवरची अपार निष्ठा ह्या भयशून्य होण्याच्या साधनेतूनच आली. "आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन।" भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात बहुतेक साऱ्या क्रांतिकारकांना गीतेचे आकर्षण भयशून्य होण्याच्या तत्त्वज्ञानाचा मार्गदर्शक ग्रंथ म्हणूनच होते. भयशून्यता ही स्वातंत्र्याचीच नव्हे, तर जीवनातल्या साऱ्या थोर कर्तृत्वाला आवश्यक असणारी अटच आहे. याच संपूर्ण मुक्तीच्या कल्पनेमुळे गांधींना इंग्रज मालक जाऊन देशी मालक यावा, हे अभिप्रेतच नव्हते. म्हणूनच त्यांनी सारी शक्ती माणसामाणसांतल्या उच्चनीचतेच्या कल्पना नष्ट करण्याकडे लावली. मानवी इतिहासातला हा काही पहिलाच प्रयत्न नव्हे. परंतु विसाव्या शतकात इतक्या निकराचा प्रयत्न गांधीजींनीच केला. गांधीजींच्या लेखी एखादा वैज्ञानिक आणि केवळ अंगमेहनत करणारा भंगी ही दोन टोके नव्हती. समाजपुरुषाच्या शरीरातील समान महत्त्वाची घटके होती. शौचकूप गलिच्छ

झाल्यावर मायस्कोक्रोपऐवजी झाडू हवा आणि मलरोग तपासायला मायक्रोस्कोप वापरता यायला हवा. त्या त्या वेळी ती कामे समान महत्त्वाची. म्हणूनच गांधींनी लेखणी, टकळी आणि झाडू एकाच तोलाने वापरली. गांधीजी खरे कर्मयोगी होते. कारण हाती असलेल्या प्रत्येक कर्मातल्या "कौशल्याला" ते अतिशय महत्त्व देत. प्रार्थनेची जागा आणि शौचाचा संडास ह्या दोन्ही स्थानांविषयी त्यांनी तितक्याच उत्कटतेने विचार केला. गांधीजींच्या निकट सहवासाचे भाग्य लाभलेले एक गृहस्थ मला सांगत होते की, सकाळी उठल्यापासून झोपेपर्यंत गांधीजी जे जे काही करीत असत ते पाहणाऱ्याला असे वाटे कीं, गांधीजींना तेवढेच काम आहे. नुसते स्नान करीत असले तरी एखाद्याला वाटावे की, ह्यांना स्नानाचाच षोक आहे आणि मैला साफ करीत असताना वाटावे की,गांधीजींना मैला साफ करणे एवढेच सर्वांत महत्त्वाचे वाटते. हिशेबाबद्दलची दक्षता पाहून त्यांना कोणी पक्का वनिया समजावे, तर मुलांशी खेळतांना पाहून असला रिकामा आजोवा आपल्याही घरात असावा असे वाटावे. नुसते झोपले तरी इतके गाढ झोपायचे की, ही झोप चांगली पाचसहा तास चालणार असा अंदाज करावा, तर विसाव्या मिनिटाला त्या गाढ निद्रेतून त्यांना जाग येत असे. गांधीजी पंचाच नेसत. पण त्या पंचाची काळजी एखाद्या रेशमी वस्त्रासारखी घेत. सूत काढताना बोटभर सूत फुकट जाऊ देत नसत. उघडे असत, पण अजागळा-सारखे उघडे नसत. त्यांनी शरीराचे चोचले पुरविले नाहीत, पण एखाद्या तलवार-बहाद्दराने आपली तलवार लखलखीत आणि धारदार ठेवावी तसे आपले शरीरही लखलखीत ठेवले. शरीर हे जीवित-कार्यातल्या साधनासारखे वापरले. ते गंजू दिले नाही. साधे पत्र लिहिताना कागदाचा एक कपटा वाया घालवू दिला नाही. शब्दांचा वापरदेखील असाच काटेकोरपणाने केला. गांधीजींची शब्दयोजना हा तर साहित्यिकांनाही हेवा वाटावा असा विषय आहे. ते मितभाषी नव्हते की अमितभाषी नव्हते. यथार्थभाषी होते. गंभीरातला गंभीर प्रसंग देखील एखाद्या प्रासंगिक विनोदी उद्‌गाराने ते सुसह्य करून टाकीत. विनोद हा तर गांधीजींच्या अहिंसक भात्यातला रामबाण होता. अश्रू आणि हास्य हे माणसाला जोडणारे केवढे वळकट दुवे आहेत ! भयग्रस्त माणूस हसू शकत नाही आणि अमानुषाच्या डोळ्यात सहानुभूतीचे अश्रू उभे राहात नाहीत. असला हा लौकिकातला लौकिक आणि अलौकिकातला अलौकिक माणूस आपल्या देशात ज्या काळी आपल्या आचरणाने नवे चैतन्य निर्माण करीत होता तो काळ म्हणजे गांधीयुग. युगाचा हिशोब तारीखवार करता येत नाही. परंतु एक ऑगस्ट एकोणीसशे वीस रोजी त्यांनी असहकारितेचे पर्व सुरू केल्यापासून ते भारत दुभंगला जाऊन पाकिस्तान आणि भारत अशी दोन शकले होऊन मिळालेल्या स्वातंत्र्यापर्यंतचा काळ हे गांधीयुग, असे मला वाटते.

ह्या युगात देशातल्या लहानापासून थोरांपर्यंत सर्वांना कुठल्याही विषयावर

महात्मा गांधी काय म्हणतात ते जाणून घेण्याची ओढ होती. आमची दु:खे समजणार हा नेता आहे, असा विश्वास अनुयायांना वाटल्याखेरीज त्या नेतृत्वाला काहीच अर्थ नसतो. मग ते दु:ख वैयक्तिक असो वा सामाजिक. माझ्या मुलांच्या शिक्षणापासून ते माझ्या आरोग्यापर्यन्त गांधी माझी चिन्ता करताहेत असे वाटे. समाजातल्या प्रत्येक माणसासाठी गांधीजींनी कार्यक्षेत्र निर्माण केले होते. देशभक्ती व्यासपीठावरून उठून थेट स्वयंपाकघरापर्यंत जाऊन पोहोचली. शांतिमय लढाईची दैनंदिन तालीम केल्याशिवाय ह्या लढ्यांतला सैनिक होता येत नाही, हे लोकांना उमजले. त्यासाठी गांधींनी लोकांना कितीतरी प्रकारची व्रते दिली. व्रताशिवाय शिस्त येत नसते. शिस्त ह्याचा अर्थ मनाला तालात पावले टाकायला शिकवणे. मिलिटरी किंवा एन्. सी. सी. तली शिस्त ही प्रासंगिक असते. परेड ग्राउंडवरून निघालेली एन्. सी. सी. तील मुले किंवा सुट्ट्यांच्या दिवशी हिंडणारे लष्करी जवान सार्वजनिक जीवनातली शिस्त पाळतातच असे नाही. त्यांची शिस्त वरिष्ठांच्या हुकुमातून पाळली जाते. स्वत:च्या मनाला हुकूम द्यायची त्यांना सवय नसते. सत्याग्रही सैनिकाचा अधिकारीही तोच आणि साधा सैनिकही तोच. व्रताला हृदयपरिवर्तन व्हावे लागते. वेषपरिवर्तन नव्हे. हृदयपरिवर्तनापेक्षाही बुद्धीने घासून घेऊन स्वीकारलेले व्रत अधिक कसोशीने पाळले जाते. गांधीजींनी हृदयपरिवर्तन म्हटले, तरी केले ते विचारपरिवर्तन. ते झाल्यावर परदेशी कापड अंगाला लावणार नाही म्हणणाऱ्या सामान्यातल्या सामान्य माणसाला निर्भयतेचा दिव्य स्पर्श होऊन गेलेला असे. "गांधीजी तुरुंगात आहेत ना ? मग आपण दिवाळीचे फक्त स्नान करायचे, फराळ करायचा नाही., अंगाला उटणी लावायची नाहीत, विलायती सावण लावायचा नाही." एवढे साधे व्रत करणाऱ्या कुटुंबालाही केवढ्या धन्यतेचा साक्षात्कार होत असे. हे सारे निर्णय सचिवालयातून आलेले नसत की भडक प्रचाराचीही साधने वापरली जात नसत. ज्या ब्राह्मण कुटुंबात शिवाशिवीचा सैतान धुमाकूळ घालायचा, त्या कुटुंबातल्या वयोवृद्ध कर्मठ बायका देखील सत्याग्रही म्हणून तुरुंगात गेल्या आणि तुरुंगातील विटाळ कालवलेली (?) भाकरी खाऊन धर्माच्या खऱ्या साक्षात्काराचे नवे पुण्य संपादून परतल्या. ज्या गुजरातेत पुरुषांपुढे येताना बायकांना तोंडासमोर हातभर लांब घुंगट घेऊन यावे लागे, त्या गुजराती स्त्रिया हजारोंच्या संख्येने सत्याग्रहात दाखल झाल्या. पदराखालच्या पित्या पोराला म्हाताऱ्या सासूच्या हवाली करून नि:सस्त्र प्रतिकाराला निघालेल्या भारतीय बायका, दारूबाजांचे अश्लील वरळणे आणि पोलिसांच्या लाठ्या ह्यांना न जुमानता दारूच्या अड्ड्यावर पिकेटिंगला उभ्या राहिलेल्या सत्याग्रही स्त्रिया, ज्यांच्या सुकुमार तळव्यांना दिवाणखान्यांतला गालिचा देखील टोचावा असल्या तरुणींनी भर उन्हात मिठाच्या सत्याग्रहासाठी केलेली पायपीट आणि पोलिसाहाती खाल्लेला मार ह्यांच्या स्मरणाने

देखील आजच्या सर्वस्वी विपरीत परिस्थितीत, माझ्या बालपणी मी पाहिली होती ती स्वप्ने होती की सत्य होते असा संदेह निर्माण होतो. मुंबईच्या लॅमिंग्टन रोड पोलिस स्टेशनपुढे सत्याग्रह्यांवर लाठीहल्ला चालू होता. बघ्यांचीही गर्दी होती. त्यातच एक स्त्री होती. अंगावर दागिने होते. तिने ते दृश्य पाहिले. अंगावरचे दागिने उतरले. शेजारी एक अनोळखी माणूस उभा होता, त्याच्या हाती ते दागिने दिले. त्याला आपल्या घरचा पत्ता दिला आणि सांगितले, "हे दागिने माझ्या घरी पोहोचव आणि घरच्या माणसांना सांग की, मी सत्याग्रहांत दाखल झाले." तो माणूस म्हणाला, "पण बाई, मी अनोळखी माणूस. कुठल्या विश्वासाने हे दागिने तुम्ही माझ्या हाती देता ? " बाई म्हणाली, " तुमच्या अंगावर खादी आहे ना ? तेवढा विश्वास मला पुष्कळ आहे. "

आज त्याच खादीच्या संदर्भात ही कथा " अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी"सारखी वाटेल. कृष्ण गेल्यावर युद्धविजेत्या अर्जुनाला चोरांनी बदडावे आणि गांधी गेल्यावर पांढऱ्या खादीला स्वार्थाने बरबटलेल्या अभद्र वस्त्राचे, कोड फुटल्यासारखे पांढरेपण लाभावे हा काय भयानक दुर्विलास आहे ! गांधीयुग एखाद्या स्वप्नासारखे संपले आणि वास्तवांत गांधीयुगान्त सुरू झाला. यंदा साजरा होत असलेला गांधीजन्मशताब्दीचा उत्सव मला तरी सुतकातल्या सणासारखा वाटतो आहे. गांधींचे आम्ही काय ठेवले आहे म्हणून आम्ही त्यांच्या जन्मशताब्दीच्या उत्सवाचा अधिकार सांगावा ? सद्गुणी बापाच्या दुर्गुणी पोराने कुठल्या आधारावर पितृश्राद्ध करावे ? केवळ रूढी म्हणून ! नाही केले तर लोक नावे ठेवतील म्हणून ! सत्ताधीशांनी तर खादी पांघरून आपले लांडगेपण दडवलेच, परंतु गांधीयोगाचा गांधीवाद करणारांनी आणि असल्या सत्ताधीशांना सदैव आधार घेऊन जगणारांनी तर खादीचे धर्मांधासारखे सोवळे केले. सोवळ्यातला अहंकारी ब्राह्मण आणि खादीचा पंचा नेसून स्वतःला चारचौघांपेक्षा श्रेष्ठ मानणारा गांधीवादी ह्यांत मला तरी फरक वाटत नाही. एकाने खादीचे कवच केले, दुसऱ्याने सामान्यांना दूर लोटणारे सोवळे केले.

आता तर काय ? सारी सृष्टीच बदलली. पिकेटिंग करणाऱ्या बायकांनी पोलिसांच्या लाठ्यांतून फुटलेल्या रक्ताला कुंकू मानून दारूबाजांना परावृत्त केले होते. व्यसनमुक्ती लाभली नाही तरी आपण पोराबाळांना उपाशी टाकून ताडीचे मडके पोटांत रिचवतो, ह्याची लाज निर्माण होत होती. नुकतीच मी मुंबईत दादरच्या भरवस्तीत पाटी वाचली. 'सरकारमान्य ताडी-माडी विक्री केन्द्र.' आत डोकावलो असतो, तर तिथे सुताचा हार घातलेला राष्ट्रपिता महात्मा गांधींचा फोटोही आढळला असता. एका बाजूला गांधीजींच्या जन्मशताब्दीचा सोहोळा, तर दुसरीकडे ताडीमाडी-विक्री केन्द्राची उद्घाटने. आपल्या सार्वजनिक जीवनाची भयंकर परवड आहे ही ! आपल्या देशाने दारूबंदी हे एक व्रत म्हणून स्वीकारले होते.

व्रताच्या पालनासाठी प्राण पणाला लावावे लागतात. जीवनातली प्रत्येक गोष्ट तर्कावर घासता येत नाही. राष्ट्रीय निशाण हेही एक फडकेच असते. पण त्याच्या इज्जतीसाठी माणसे प्राण देतात. जुन्या राष्ट्रीय निशाणाचा, बूट पुसायचे फडके म्हणून, आपण वापर करीत नाही. निरनिराळ्या भावनेमुळे हिंदू गोमांस खात नाही आणि मुसलमान सूकर भक्षण करीत नाही. प्रत्येक धर्माने टिकावासाठी अशी व्रते दिली आहेत. स्वातंत्र्याच्या लढ्यात गांधीजींनीही अशी व्रते दिली होती. राष्ट्रभाषा शिकण्यापासून ते रस्ते झाडण्यापर्यंत अनेक व्रते होती. आणि सर्वदेव-नमस्कार केशवाप्रत जातात, तशी ही सर्व व्रते अखेर स्वराज्याप्रत जाताहेत, अशी गांधीयुगांत लोकांची श्रद्धाही होती. फार मोठ्या प्रमाणावर आपल्या देशांत ह्या व्रतांचे पालन होत होते. मात्र जसजसे स्वराज्य दृष्टिपथात येऊ लागले आणि सत्तेच्या सिंहासनांच्या अंधुक आकृत्या दिसू लागल्या, तसतसा एक एक चिरा ढासळू लागला आपण केलेल्या त्यागाचे आता आपल्याला सामुदायिक नव्हे तर व्यक्तिगत मोल मिळायला हवे, अशी वासना होऊ लागली. चातुर्मास संपत यावा आणि अभक्ष्य-भक्षणाची खायखाय सुटावी तसे झाले.

असल्या सत्तेच्या सिंहासनाची स्वप्ने पडत नव्हती फक्त गांधीजींना. त्यांना स्वतंत्र भारतात राज्यकर्ते नको होते. त्यांना हवे होते राज्यकारभार करणारे जनतेचे विश्वस्त. सत्ताधीशांना विश्वस्त म्हणणारे गांधी सत्ताधीशांकडूनही तीच अपेक्षा करीत होते. त्यांचे सत्याचे प्रयोग संपले नव्हते. पण आता सत्तेचे प्रयोग सुरू होतील, ह्याची चिन्हे त्यांना दिसू लागली होती. आणि म्हणूनच त्यांनी काँग्रेसच्या विसर्जनाची सूचना केली होती. हंगामी मंत्रिमंडळाच्या काळांत काँग्रेसमधल्या पुढाऱ्यांना सत्तेच्या रक्ताचे काही थेंब चाटायला मिळाले होते. सत्तेच्या तुकड्यांसाठी चाललेले ते जिभल्या चाटणे गांधींनी पाहिले होते. सत्ता आली की ती गाजवण्याचा मोह आलाच. म्हणूनच गांधीजी म्हणाले होते की, ज्याला म्हणून चांगले राहायचे आहे आणि कुठल्याही परिस्थितीत चांगले असेल तेच करायचे आहे, त्याने सत्ताधीश होता कामा नये. डॉ. झाकीरहुसेन यांना लिहिलेल्या उत्तरात गांधीजींनी स्पष्ट म्हटले आहे–"राजकीय सत्तेची प्राप्ती झाल्यावर आपल्या कामाचे बक्षिस म्हणून जर आपण सत्ता धरून बसू लागलो तर त्यात आपला अध:पात होईल."

व्हिन्सेंट शीन ह्या त्यांच्या चरित्रकाराने त्यांना स्पष्ट विचारले होते, "आपलं काय मत की, सत्ता नेहमीच अध:पाताला कारणीभूत असते?" गांधींनी एका शब्दांत तितक्याच स्पष्टपणे सांगितले, " होय ! "

आणि सत्तेचा मोह काँग्रेसच्या पुढाऱ्यांना सुटला नाही. भयानक रक्तपाताने भिजलेल्या दिल्लीमध्ये दुभंगलेल्या भारताचा स्वातंत्र्योत्सव साजरा होत होता

आणि मुस्लीमि लीगच्या रक्तपिपासू लांडगतोडीने छिन्नविच्छिन्न झालेल्या, पाशवी अत्याचारांनी धाय मोकलणाऱ्या मायमाऊल्यांच्या वेदनांनी व्याकुळलेली गांधीजींची वृद्ध पावले तिथे "एकला चालो रे" करीत निघाली होती. गांधीयुगान्ताचे भेसूर शिंग स्वातंत्र्यदिनीच फुंकले गेले. ज्या मुसलमानांच्या प्रेमाने गांधींनी हिंदूंचे शाप फुलांसारखे झेलले त्या मुसलमानांनी त्यांचे मानले नाही आणि भरतखंडाची शकले झाल्यामुळे हिंदूंचा संताप अनावार झाला. ज्यांना गांधींनी आपले अनुयायी मानले होते, कालपर्यंत जे त्यांचे वाक्य वेदवाक्याइतके पवित्र मानीत असल्याचे दाखवीत होते, त्यांनीही आपला मार्ग वदलला. ते नव्या राजप्रसादांच्या दिशेला गेले आणि गांधीजींचा वनवास चालूच राहिला. गांधींना हवा होता तो भारतीय आदर्शातला 'जगाचा उपभोगशून्य स्वामी असणारा राजा.' प्रत्यक्षात गोरे राज्यकर्ते गेले आणि काळे राज्यकर्ते आले. गोऱ्यांच्या राजवटीत कागदी घोडे नाचवणाऱ्या नोकरशाहीने तिकडले मुजरे इकडे केले. मुजोरी न सोडता ! पुन्हा एकदा राजा आणि गुलाम हे नाते सुरू झाले. काल लोकांच्या जोडीने अनवाणी चालणारे नेते सत्तेवर येताच अलीशान बंगल्यांत राहू लागले. दारावरचा उर्मट दरवान हलला नाही. गरीबांचे राज्य आल्याची दवंडी झाली. राज्यावर वसलेला गरीब मात्र दिसेना. लोकशाहीत लोक होते तिथेच राहिले. तसेच आशाळभूत. तसेच भयग्रस्त. तसेच अडाणी तसेच उपाशी. साहेबांच्या राज्यांत अगम्य इंग्रजीत कारभार चाले. स्वराज्याचा कारभारही त्याच भाषेत आणि त्याच लालफितांच्या दिरंगाईचा गुण घेऊन चालला ब्रिटिश नोकरशाहीची लोखंडी चौकट अभंग राहिली. गांधीजींची जीवनस्पर्शी व्रते आता केवळ प्रतीकात्मक राहिली, सणासुदीला सूतकताई होऊ लागली. रस्त्यांची नावे वदलली. कडेच्या फूटपाथनिवासीयांचे निवासस्थान बदलले नाही. साहेबांचे पुतळे गेले पण नव्या पुतळ्यांच्या पायऱ्यांवर तेच दळिद्र रात्रीच्या विसाव्याला पडत होते. निधर्मी राज्याची घोषणा झाली. परंतु निवडणुकीचे उमेदवार निवडताना काँग्रेसने देखील सत्पक्षाचे यश न मानता आपल्या पक्षाच्या यशावर डोळा ठेवून जात हाच विचार महत्त्वाचा मानला. संस्थाने खालसा झाली, पण करोडो रुपयांची खाजगी मालमत्ता असणाऱ्या संस्थानिकांना आम्हीं गलेलठ्ठ तनखे दिले. कसायांना गाईंनी सुरे मोडल्याची नुकसानभरपाई दिली. काही संस्थानिकांनी तर अंगावर खादीही पांघरून नव्या अधिकाराच्या जागा मिळवल्या. गांधींनी विधायक कार्य करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या साऱ्या संस्थांची संस्थाने झाली आणि प्रत्येक ठिकाणी, बावा आमटयांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे फक्त 'मतपेटीशी प्रणयाराधन' सुरू झाले. प्रणयात आणि समरात सारेच साजून दिसते. तेव्हा तत्त्वाशी तडजोडी आल्याच ! समाजोपयोगी कार्याला महत्त्व न राहता राज्यकर्त्यांचे प्रत्येक पाऊल

निवडणुकांचे कौल आपल्या वाजूने कसे पडतील ह्याचाच फक्त विचार करूनटाकण्यात येऊ लागले. कार्यसिद्धीपेक्षा कार्यप्रसिद्धीला महत्त्व आले. गांधी सामाजिक जीवनात नीती हा निरपवाद नियम म्हणून मानीत होते. आता नीती हा एक अपवाद ठरला आहे. राजसत्तेला ठाऊक असलेली नीती एकच ! वारांगनेची ! गांधीयुगामध्ये खरोखरीच त्यागाला मागेपुढे न पाहाणाऱ्या नेत्यांनी सत्तेवर येताच तो त्याग जणू काय भावी भोगाच्या आशेने चढवलेला मुखवटा होता की काय अशी शंका येण्यासारखे अभद्र व्यवहार सुरू केले. लोकराज्यातही लोक आणि राज्यकर्ते असे तट पडले. आणि दिल्ली ही लोकधानी न होता राजधानीच झाली. निष्ठावन्त विधायक कार्यकर्त्यांनाही आश्रितांचे जिणे जगावे लागले. माधुकऱ्याच्या चौपदरीत सणासुदीला एखादी जिलेबी टाकावी तसली अनुदाने त्यांना मिळू लागली. त्यांतल्या धूर्तांनी निरनिराळ्या अखिल भारतीय बोर्डांत आपली वर्णी लावली आणि दरिद्रीनारायणाच्या सेवेला भल्याभक्कम लांबलचक अमेरिकन् मोटारीत वसून हे महन्त हिंडू लागले. सत्याचा आणि सेवेचा धर्म खरोखरीच मानणारा एखादा गांधीयोगी कुठे तरी संडास साफ करीत, नाहीतर खादीच्या चिंध्या फाडीत वसला एखाद्या म्हाताऱ्या बेकार नटाने उगीचच आपल्या तरुणपणीच्या भूमिकांतली भाषणे आपल्या चाळीतल्या एका खोलीच्या विन्हाडी पाव्हण्यांना म्हणून दाखवावीत, तशी ह्या जुन्या निष्ठावान विधायक कार्यकर्त्यांच्या कार्याची आणि त्यांच्या प्रवचनांची स्थिती आहे. फक्त केविलवाणी !

गांधीजींच्या चळवळीत सामान्यापासून असामान्यापर्यंत सर्वांचे सहकारित्व असे. दिवाळीलासुद्धा गोडधोड न खाणाऱ्या लहानशा गांधीभक्त कुटुंवापासून ते प्रत्यक्ष तुरुंगवास भोगणाऱ्या सत्याग्रह्यांपर्यंत आणि गरीव चांभारापासून ते धनवंत व्यापाऱ्यापर्यंत प्रत्येकाला ह्या महान् यज्ञात आपण छोटामोठा हविर्भाग अर्पण करू शकतो असा विश्वास वाटत असे. नेहरूंनी उद्धाराचे काम सरकारी केले. लोककल्याणाची कामे नोकरशाहीच्या सहानुभूतिशून्य हाती गेली. नव्या सत्ताधीशाला होणारा डोळे दिपवणाऱ्या प्रचंडपणाचा मोह नेहरूंनाही सुटला नाही. देशांत विज्ञाननिष्ठा जागवण्यासाठी कुठेही तडजोड न करता भिक्षुकशाहीचा, मुल्लामौलवींचा आणि पाद्र्याविद्र्यांचा पगडा उडवून लावायला हवा होता. नेहरूंचा जातीयतेला दूषणे देण्याचा सपाटा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जनसंघापुरताच राहिला. त्यांना मुल्लामौलवींच्या अडाणीपणाला किंवा पाद्र्यांच्या देशद्रोही प्रचाराला कडाडून विरोध करण्याचे धैर्य आंतरराष्ट्रीय इज्जतीच्या भलत्या कल्पनेमुळे झाले नाही. लेनिनला हे धैर्य होते. त्याने मुस्लिम रूढीही ख्रिस्ती रूढीइतक्याच निकराने मोडल्या. पंतप्रधान नेहरूंचे मापही मुसलमानांच्या बावतीत झुकतेच पडले. साऱ्या देशाला एकच दिवाणी कायदा लावायचे धैर्य त्यांनाही झाले नाही. सत्ता आली

की माणूस 'पतित' होतो, हे गांधींचे भविष्य अगदी नेहरूंपासून सर्वांच्या बाबतीत खरे ठरले. व्यक्तिशः ते आदरणीय राहिले. परंतु सत्ताधीश म्हणून तडजोडवादीच आणि म्हणूनच दुबळे ठरले. सत्तेचा दिमाख दाखवण्याचा मोह त्यांनाही आवरला नाही. विज्ञाननिष्ठा निकराने जागवण्यापूर्वीच दिल्लीत प्रचंड विज्ञान-भवन बांधले गेले. चक्रवर्ती राजगोपालाचारी त्या वेळी तिथेच दिलेल्या भाषणांत म्हणाले होते. ''लाँग लिव्ह द कॉन्ट्रॅक्टर्स–ठेकेदार चिरायू होवोत!''क्रांती चिरायू होण्यापूर्वी ठेकेदार चिरायू झाले. (आजही होत आहेत.) ह्या अर्धपोटी देशातल्या राजदूतांनी आणि राजदूतींनी वैयक्तिक षौक आणि दिमाखापोटी परराष्ट्रांत भारतीय दूतावास सजवण्यासाठी अमाप खर्च केला. वास्तविक आमचे दारिद्रय जगापुढे उघडे पडले होते. ताकासाठी भीक मागताना भांडे लपवण्याची गरज नव्हती. आम्ही भिकेसाठी रत्नजडित नरोटया नेऊ लागलो. आणि भिकारी ज्याप्रमाणे आज न देणारा उद्या देईल ह्या आशेने 'जो दे उसका भला, न दे उसका भी भला' म्हणतो, त्याच चालीवर आम्ही सर्वांनाच भले म्हणत राहण्याला परराष्ट्रीय धोरण मानू लागलो.

गांधीजींनी समाजाला नवी संवेदनशीलता दिली होती. स्वातंत्र्यानंतर पुन्हा एकदा समाज निबर बनू लागला. आधीच दुसऱ्या महायुद्धाने साऱ्या सुंदर मूल्यांचा संपूर्ण विध्वंस केला होता. त्यात पुन्हा एकदा 'प्रॅग्मॅटिझम्' ह्या गोंडस नावाखाली वेळ मारून नेण्याचे तत्त्वज्ञान उदयाला आले. तत्त्वाशी तडजोडी सुरू झाल्या की, अधःपाताकडेच जाण्याची गती वाढतच जाते. कुठल्याही मूल्याचा आधार नसल्यामुळे आम्हांला एकही प्रश्न धसाला लावता आला नाही. मतपेटीच्या धसक्याने सदैव भयभीत असणारे राज्यकर्ते सत्य किंवा न्याय्य असली तरी अप्रिय गोष्ट कशी करतील ? आमच्या राष्ट्रभाषेचा, प्रांतपुनर्रचनेचा, सुवर्णनियंत्रणाचा, दारूबंदीचा, शिक्षणाचा, राष्ट्रीयीकरणाचा, सरकारी पातळीवर जे जे हाती घेतले त्या त्या गोष्टींचा नुसता खेळखंडोबा झाला, ह्याचे कारण केवळ एकच म्हणजे मतपेटीचा आणि पर्यायाने हातची सत्ता गमावली जाईल याचा धसका ! मंत्रिपद गेले म्हणजे इंद्रपद गेले, अशी भीती ! मग कोणी सत्प्रवृत्त तपस्वी तप करीत असला तर त्या तपाची मीमांसा करून सत्य शोधण्याऐवजी सरकारी प्रलोभनांच्या अप्सरा पाठवून आधी असल्या तपस्व्यांचा तपोभंग करायचा ! ही युगानुयुगे चालत आलेली सत्तेची वारनीती आहे ! अहिंसात्मक सत्याग्रहांत चौरीचौऱ्याला सत्याग्रह्याकडून हिंसा घडली तेव्हा गांधींनी साऱ्या देशबांधवांचा रोष पत्करून कायदेभंगाची चळवळ थांबवून पाच दिवसांच्या उपोषणाचे प्रायश्चित्त घेतले. पुरी पन्नास वर्षे नाही झाली ह्या घटनेला. आजच्य-परिस्थितीत राजकारणी माणसाचे असले वागणे हे कुठल्या तरी द्वापर किंवा सत्या युगातले वाटेल. आज डोळ्यादेखत धडाधड अन्याय घडताहेत. धर्माच्या जोडीला प्रांत आणि भाषा ही रक्तपाताची कारणे होऊ लागली आहेत. नौखालींत अत्याचाराचा

आगडोंब उसळला तेव्हा त्या खाईत गांधीजींनी उडी मारली होती. आज एखाद्या शहरात जातीय किंवा प्रांतीय वैमनस्याची आग भडकते आणि लोकनियुक्त सत्ताधीश रेडिओमागे लपून 'हात रे काऊ' च्या सुरात भाषण करतात. ह्या जनतेच्या सेवकांना रस्त्यातून जाताना दुतर्फा पोलिसांच्या सलाम्या लागतात.

गांधीयुगात डोळ्यापुढे आकार घेत होते ते काय हे स्वराज्य ? एका अज्ञात बिहारी लोककवीने स्वराज्याच्या मिरवणुकीचे वर्णन करताना म्हटले आहे:—

स्वराज्याचा कलश हत्तीवरून मिरवीत आला,
कलश धरून राजेन्द्रबाबू बसले होते
पुढे घोड्यावर स्वार होते जवाहरलाल
आणि बापू ?
बापूगर्दीत आमच्याबरोबर चालत होते.

बापू तनाने आणि मनाने सामान्यांच्या बरोबर चालत होते. राज्यकर्त्यांना असे कसे चालता येईल ? ते चालणे गांधींबरोबरच संपले. बापूंच्या बरोबर लोक 'चालो वाटे आम्हा तुझाची आधार' म्हणत चालत होते. बापू त्यांच्याचसारखे अर्धनग्न , देहधारणेपुरते खाणारे, त्यांना कळेल अशा भाषेत बोलणारे, त्यांच्या अन्ननिवाऱ्याची चिन्ता करणारे, महाजनापासून बहुजनाला दूर ठेवणाऱ्या विचार-सरणीऐवजी सगळ्यांना एकमेकांच्या आधाराने जगायला शिकवणारे सोपे अर्थशास्त्र सांगणारे, त्याला व्यसनमुक्त करणारे, अंधारातल्या त्याच्या आयाबहिणींना प्रकाशाचा आनंद देणारे बापूजी हा त्यांचा आधार होता. गांधीबाबांचे स्वराज्य येईल ते देखील सारी माणसे जोडीने चालतील असले वातावरण घेऊन येईल, अशी त्यांची कल्पना. आज जीवनातली चांगली मूल्ये टिकवून जपणाऱ्या माणसाला निराधार वाटू लागले आहे. गांधीयुगातली सगळीच माणसे काही मोठी धर्मराजासारखी नव्हती. परंतु 'सत्याला वाली असतो,'असली श्रद्धा टिकवणारे वातावरण होते. साऱ्या मानवी संस्कृतीची धडपड आपल्यातले प्राणीपण मर्यादेत ठेवण्याची आहे. कायद्याने संयम लादले जातात. पण लादलेल्या कुठल्याही गोष्टीचे ओझे होते. पशूला आवेग आवरता येत नाही, माणसाला काही मर्यादेपर्यंत येतो. बैल कुठेही मूत्रविसर्जन करतो, माणूस आडोसा शोधतो. आरोग्याच्या नियमांचे स्मरण करतो. स्वराज्यात सत्ताधीशांना स्वार्थाचा आवेगच आवरता येईनासा झाला आहे. आणि "राजा कालस्य कारणम्'' ह्या न्यायाने प्रजाही तशीच होत चालली आहे. 'मी' आणि 'माझे यांपलीकडे दृष्टीच जाऊ शकत नाही.

महात्मा गांधींच्या जीवनातले अखेरचे पर्व वाचतानाच त्या युगान्ताची चाहूल लागते. 'जग जालिया वन्ही सन्तमुखे व्हावे पाणी ' ह्या तत्त्वाला धरून चालणारे गांधीजी आणि पेटत्या आगीत स्वतःची पोळी भाजून घेणारे आजचे नेतृत्व.

रोजचे वर्तमानपत्र उघडले की, यादवीखेरीज काहीच दिसत नाही. मला तर आजच्या भारताकडे पाहताना महाभारताचे अखेरचे पर्व सुरू झाल्यासारखे वाटते. भारतीय युद्ध संपले. पांडवांचा विजय झाला. वनवासी आणि अज्ञातवासी पांडव हस्तिनापूरचे राज्यकर्ते झाले. आणि लगेच यादवीही सुरू झाली. आधुनिक भारतीय स्वातंत्र्ययुद्धपर्व संपले आणि अधिकारप्राप्ती होताक्षणीच यादवी सुरू झाली. गांधीजींच्या प्रेमापेक्षाही जनतेतील त्यांच्या अपरंपार लोकप्रियतेला भिऊन गांधींना न दुखवणारे पुढारी एकत्र नांदत होते. गांधींना सोडून जाणारांच्या नशिबी राजकीय जीवनाची समाप्ती आहे, हे त्यांनी अनुभवले होते. जिथे भगवान् श्रीकृष्णाला ममत्व सुटले नाही. आणि धर्मयुद्धातही त्याने अधर्माचरणाकडे पांडवावरच्या आपुलकीने डोळेझाक केली तिथे गांधींचे काय ? त्यांनाही थोडाफार जवळचा लांबचा विचार होता. नागपूरच्या डॉ. ना. भा. खऱ्यांच्या बाबतीत गांधींनी सर्वस्वी सत्याची कसोटी पाळली होती, असे दिसत नाही. धर्मराजासारखा त्यांचाही रथ जमिनीला लागला होता. परंतु जमेची बाजू अतिप्रचंड होती. मात्र गांधींमुळे काँग्रेस पुढाऱ्यांतल्या दुहीवर झाकण पडले होते. सत्ता येताच ते उडाले. महाभारतात वरपांगी एकसंध दिसणारी यादवांची फळी जशी भंगली तशीच स्थिती काँग्रेसमधल्या ज्येष्ठ पुढाऱ्यांची झाली. नेहरूनिष्ठा की पटेलनिष्ठा असे सवाल उठू लागले आणि सत्यनिष्ठा नौखालीत हिंडू लागली. पाकिस्तानच्या निर्मितीने लाखो हिंदूंच्या अंतःकरणाला घरे पडली. हे दुःख असह्य होते. डोळ्यादेखत आपल्या घरादारांची राखरांगोळी, ज्या मातीतून त्यांच्या हजारो पिढ्या उगवल्या त्या मातीशी ताटातूट आणि सर्वात भयानक म्हणजे डोळ्यादेखत आयाबहिणींवर होणारे पाकिस्तानच्या निर्मात्यांनी चालविलेले अत्याचार ह्या आगडोंबात शांतिपाठांना अर्थ उरला नाही. एवढेच नव्हेतर ते शांतिपाठ म्हणणाऱ्यांविषयी चीड उत्पन्न झाली. अशा भयानक वातावरणात नेहरू सत्तेच्या चक्रावर बसले. 'भ्रामयन् सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया' असे ते, डॉ. इरावती बाई कर्वे म्हणतात त्याप्रमाणे 'अनाकलनीय व अटळ चक्र' ! त्या चक्राच्या फेऱ्यात देश गरगरू लागला. आता कुठल्या दिशेला जायचे, हा निर्णय चक्रावर बसलेल्यांच्या हाती राहिला नाही. ह्या चक्राच्या तडाख्यातून खुद्द गांधीजीही सुटले नाहीत. त्यांचा त्या शांतियज्ञाच्या वेदीवर बळी गेला. बाकीचे पुन्हा 'काय करावे ? कसे करावे ?' ह्या संमोहचक्रात सापडले. गांधीयुगाचे हे तेजस्वी नाटक शेवटी शोकान्त ठरले. निसर्गाने लादलेल्या प्राणीपणातून सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर सुटका करून विशुद्ध मानवत्वाकडे नेण्याचा एका महात्म्याचा आणि त्याच्या मागून श्रद्धेने जाणाऱ्यांचा एक महान् प्रयत्न अवघ्या पंचवीस-तीस वर्षांतच संपुष्टात आला.

ह्या साऱ्याचा अर्थ काय समजायचा ? गांधीजी ही एक आम्ही तात्पुरती

सोय म्हणून स्वीकारलेली देवता होती का ? साडेसातीत जसे मारुतीला तल घालतात आणि शंकराला घटकाभर बाजूला ठेवतात, तसे आम्ही विशिष्ट विपरीत परिस्थिती-पुरतेच गांधीजींना मानले असावे. राजकारणी धूर्तांनी त्यांची फॅडस् ( ? ) तोडग्या-सारखी स्वीकारली असावी. अहिंसेवर आमची गांधींच्या मानाने एक-शतांशही श्रद्धा नव्हती. त्यांच्या अहिंसावादी सैन्यानेच त्यांचे सेनापतित्व झुगारून दिले होते. श्री. पी. सी. जोशी ह्या कम्युनिस्ट पुढाऱ्यांशी झालेल्या चर्चेत गांधीजी म्हणाले होते, "सेनाहीन सेनापतीसारखी माझी अवस्था आहे. मी चाल करून जाण्याचे हुकूम सोडू कुणाला ? . . . . .मी आता केवळ घटका मोजतो आहे. . .माझ्यात खूप धीर आहे पण तो धीर देखील आता संपत चालला आहे." गांधीजींच्या अखेरच्या दिवसांतल्या ह्या गांधीजींच्याच तोंडच्या उद्‌गारांवर निराळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. गांधींनंतर नेहरूंनी पंचशीलाचे स्तोत्र गायिले. चीनच्या एका हल्ल्याने त्या स्वप्नांचा चुराडा केला. आणि इतर कुठल्याही देशाप्रमाणेच आम्हीही 'शस्त्राघाता शस्त्रचि उत्तर' देऊन 'जिंकू किंवा मरू' म्हणायला लागलो.

एक सत्यात उतरत आल्यासारखे वाटणारे स्वप्न भंगत गेले. स्वातंत्र्यानंतर यक्षिणीची कांडी फिरेल असे वाटत होते. पण प्रत्यक्षात, सत्तापिपासू ब्रह्मसंमंधांचे आणि चेटक्यांचे थैमान सुरू झाले. गांधींचे अहिंसातत्त्व सामान्यांच्या आवाक्याच्या फार वरचे म्हणून हवे तर सोडून देऊ. अस्पृश्यतेचे काय झाले ? भंगीमुक्ती तर जाऊ द्या. भंग्याच्या डोक्यावरची मैल्याची टोपली खांद्यापर्यंतदेखील आली नाही. असंख्य हरिजनांनी धर्मांतर केले. त्यात केवढा प्रखर तिटकारा दाखवण्याची ताकद होती. सवर्ण हिन्दूंनी पश्चातापाने स्वतःचे तोंड फाडून घ्यावे इतक्या शरमेची गोष्ट. हरिजनांनी बौद्ध धर्म स्वीकारला किंवा आणखी कुठला पंथ स्वीकारला, ह्याला माझ्या मते किंमत नाही. त्यातला नाते तोडून देण्याचा भाग किती क्लेशदायक होता ! गांधींच्या एकाही चरखाधारी शिष्याने 'आम्ही तुम्हांला आमच्यापासून निराळे जाऊ देणार नाही,' ह्या निर्धाराने उपोषण केले नाही की हरिजनांच्या दारी धरणे धरून आपल्या हाताने त्यांना जवळ ओढले नाही. आम्ही राजकीय पातळी-वरून वाटाघाटी केल्या, आणि उलट हरिजनांचे नवबौद्ध झाल्यावर त्यांना मिळणाऱ्या पूर्वाश्रमींच्या सरकारी सवलती रद्द कशा करता येतील, याचे कायदेबाज विचार खुद्द काँग्रेसमध्ये झाले. हा प्रश्न गांधीप्रणीत माणुसकीच्या पातळीवरून हाताळलाच गेला नाही. कारण त्या हरिजनांकडे पाहण्याचा दृष्टिकोण आता सत्यनिष्ठ नव्हता, पक्षनिष्ठ होता. ते हरिजन आता माणुसकीच्या साध्या हक्कांना वंचित केलेले सवर्ण हिंदूंच्या निर्घृण धर्मांधतेचे बळी न होता काँग्रेसविरोधी राजकीय पक्षांतील डॉ. आंबेडकरांचे अनुयायी ठरवले गेले. पक्षनिष्ठेसाठी सत्याला ठोकरण्याचे पाप पंडित नेहरूंपासून प्रत्येकाने केले आहे. अमेरिकेतल्या निग्रोंच्या दुःखाने कळवळणार

गांधी कुठे आणि आपल्याच देशात ज्यांना पशूहून वाईट वागवले त्या अस्पृश्यांच्या धर्मान्तरानेही ज्यांच्या अंत:करणाला पाझर फुटला नाही ते आम्ही सवर्ण म्हणवणारे हिंदू आणि त्यांचे निधर्मी म्हणवणारे पुढारी कुठे ? 'तुम्ही हवं तर राज्य करा पण आमच्यापासून द्वेषभावनेने निराळे होऊ नका' हे सांगण्याचे धैर्य आणि खुर्च्या सोडायची ताकद जिथे नेहरूंना झाली नाही, तिथे इतरांची काय कथा ?

आज तर प्रत्येक धार्मिक गट ही निवडणुकीतल्या सौदेबाजीचीच सोय आहे. अस्पृश्यता हा वरवरचा कलंक नसून ती हिंदू म्हणविणाऱ्या समाजपुरुषाच्या अंगावरची वाहती जखम आहे, हीन अस्पृश्य नसून त्यांना हीन मानणारे आम्ही हीनाहून हीन आहो, याची जाणीव झालेले सेनापति बापट, एखादे सावरकर किंवा सानेगुरुजी सोडले तर, बाकीच्यांनी हा प्रश्न केवळ राजकीय पातळीवरून पाहिला.

स्वातंत्र्यानंतर दलितांच्या उद्धाराच्या शब्दांना तोटा नव्हता. कृती मात्र दिखाऊ होती. आजही खेड्यांतून हरिजनवस्ती जीव मुठीतच धरून जगते. त्यांच्यावरच्या अत्याचारांच्या कथा अंगावर शहारे आणतात. जरा कुठे हरिजनांना विशेष सवलती मिळालेल्या दिसल्या की आमचे पित्त खवळते. वंशवर्चस्वाचे हिटलरचे वेड आणि सवर्ण हिंदूचे वेड ह्यांत तत्त्वश: काहीही फरक नाही. नेहरूंना देशाचे अंतर्बाह्य औद्योगिकरण आणि पाश्चात्यीकरण प्रिय होते. त्यांना चरख्याचे काव्य प्रिय होते. त्या काव्याला वास्तवाची जोड देणे आधुनिक जगात अशक्य आहे, अशी त्यांची खात्री होती. पण त्यांना लोकांची गांधींविषयी असणारी अपार श्रद्धाही ठाऊक होती. त्यामुळे देवावर श्रद्धा नसलेल्या मुलाने बापाच्या देव्हाऱ्यातल्या देवांची पूजा परस्पर भटजी नेमून चालू ठेवावी, तशी गांधींची ग्रामोद्योगांची 'वेडे' चालू ठेवली. परंतु विराट यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देणारी त्यांची प्रत्येक पंचवर्षीय योजना त्या वेडांची मुळेच उपटीत गेली. देशाचे नेतृत्व आणि पक्षाचे नेतृत्व ह्या कातरीत त्यांचेही व्यक्तिमत्त्व कातरले जात होते. हळूहळू पक्षनेतृत्वाची पात जास्त धारदार ठरली. काळाबाजारवाल्यांना फाशी देण्याची घोषणा त्यांनी मनापासून केली होती. पण मग पक्षनिष्ठभूमिकेवरून चालणाऱ्या निवडणुकांना लागणारा अफाट पैसा कुठून आणायचा ? नेहरूंच्या जीवनाच्या महावस्त्राची पक्षाच्या प्रतिष्ठेवर पांघरूण घालता घालता नुसती लक्तरे होऊन गेली. नेहरूंच्या विषयी ब्रिटनचे पंतप्रधान अॅट्ली ह्यांनी म्हटले होते, 'नेहरू कविमनाचे आहेत-परंतु जिथे काव्य संपते तिथून राजकारणाला सुरवात होते, हे त्यांना ठाऊक नाही. राजकारणाच्या संदर्भातच बर्ट्रंड रसेल्चे उद्गार चिंतनीय आहेत. रसेल म्हणतात, 'शेवटी मला तर वाटते की, साऱ्या राजकारणाची अधिष्ठात्री देवता म्हणजे फिदीफिदी-हसणारा सैतान. ही राक्षसदेवता उत्साही आणि चतुर लोकांना, स्वत:च्या तुंबडी' साठी, सत्तेसाठी किंवा 'वादा'साठी दीनदुबळ्या जनतेला तुडवून कसे छळावे एवढेच

शिकवते.' स्वातंत्र्यानंतर देखील पोलिशी इंगा तसाच राहिला. भले भरडले गेले खोटे कंठी धरले गेले. स्वतःच्या हुकुमाने ज्यांना गोळ्या घालून मारले, त्यांच्या स्मरणार्थ हुतात्मा-स्मारक उभे राहिल्यावर, त्या समारंभाला अध्यक्ष म्हणून जायचं अमानुष खिलाडूपणा राजकारणातल्या त्या अधिष्ठात्या सैतानाच्याच प्रसादामुळे लाभतो. आज हिंदुस्थानातच नव्हे, साऱ्या जगात हीच परिस्थिती आहे.गांधीयुगात फक्त आपल्या राजकारणाला असल्या विषाची वाहोधाणारच नाही असा भावडा समज धरून आपण वसलो होतो,म्हणून आपला भ्रमनिरास जरा अधिक तीव्र आहे एवढेच. शेवटी आपण सारे अपूर्णच आहोत. 'पूर्णात पूर्णमिदम्' असे वेदान्ताने कितीही आक्रोश करून सांगितले, तरी सारा मानवी प्रवाह अपूर्णाचा अपूर्णाकडून अपूर्णाकडे आहे, असेच सार इतिहास सांगतो.संस्कृतीचा उदय होता होता त्यातच ऱ्हासाची बीजे असतात. महाभारतकालीन भारताचे तेच झाले, बॅबिलोनियाचे तेच झाले, रोमचे तेच झाले. इतकेच कशाला ? ज्या मार्क्सच्या तत्त्वज्ञानामुळे माणसातल्या समानत्वाचा नवा साक्षात्कार घडत होता,त्या मार्क्सवादाचे आज जगातल्या निरनिराळ्या कम्युनिस्ट देशांतून जे दर्शन घडते आहे,त्यांतून जॉर्ज ऑर्वेलचे 'सर्व समान पण काही अधिक समान' हे विनोदाखाली खपणारे सूत्रच एक अप्रिय सत्य सांगून गेले आहे ! गांधींनी निरामय जीवनाचे एक स्वप्न डोळ्यापुढे उभे केले होते. मार्क्सनेही केले होते. ख्रिस्त आणि बुद्धानेही केले होते. असल्या स्वप्नांमागून मानवसमाज काही काळ धावतो. त्याच्यातले मनुष्यत्व प्राणीपणाला काही काळ काबूत ठेवते. पण काही काळच.गांधींचे सर्वोदयी समाजाचे स्वप्न गांधींबरोबरच संपले. नेहरूंनी पंचवार्षिक योजना दिल्या. पण सारा समाज हा तंत्रामागून धावत नाही. समाजाला कसला तरी मंत्र द्यावा लागतो. मंत्र देणाऱ्याने तो आचरणाच्या तपांतून सिद्ध करावा लागतो. नेहरूंची त्यागमय जीवनाची पुण्याई त्यांना वैयक्तिक थोरवी देण्याच्या कामी आली. पंतप्रधान नेहरू ही एक शासनातल्या प्रत्येकाच्या शुद्धाचरणांतून सिद्ध होणाऱ्या तपाची मूर्ती झाली असती,तर त्यांचा 'आराम हराम है हा मंत्र देशाला जागवून गेला असता. परंतु मंत्रिपदाच्या अनेक गाद्यांवर आराम करणारे सहकारी आणि पदोपदी 'हरामी' करणारी नोकरशाही ह्यांचा लवाजमा घेऊन जगणाऱ्या नेहरूंच्या त्या मंत्राची चेष्टा झाली. लाकडी तलवार घेऊन शाळकरी विद्यार्थ्याने 'शत्रूचा शिलच्छेद कलीन' म्हटल्यासारखे झाले. चिनी हल्ला झाल्यावर तर त्यांची केविलवाणी अवस्था झाली. ज्या देशाकडे शस्त्रबलही नाही आणि तपोबलही नाही असल्या देशाचे शांतिपाठ हे नपुसकाच्या ब्रह्मचर्याच्या घोषणेसारखे हास्यास्पद आणि केविलवाणे ठरतात. नेहरूंचे अखेरचे दिवस ग्रीक शोकांतिकांसारखे उदात्तही नाहीत. फक्त केविलवाणे. त्यांच्यामागून तर एकमेकांच्या डोक्यावर मुसळे मारणाऱ्या सांबांनी आणि यादवपुत्रांनी सर्वत्रभीतीचे राज्य पसरविले

आहे. भारतात सध्या मौसलपर्व चालू आहे. कामरूप देशांतल्या लोकांना वंगांचे भय, वंगांत चीनसारख्या शत्रुराष्ट्रांचे प्रेम, द्रविडांना उत्तरदेशीयांची चीड. उत्तर-भारतीयांना द्रविडांचे दु:ख समजून घेण्याचीही इच्छा नाही. बुद्धिमन्त अगतिक. प्रांत, भाषा, धर्म, वृत्ती सगळयांची मुसळे झाली आहेत. आणि पुन्हा एकदा मुळातच आलस्यप्रिय भारतीयांना रुचणाऱ्या निराशासूक्ताचे आणि दैववादाचे पाठ सुरू झाले आहेत. नारळउदवत्त्यांची, ऊदअंगाऱ्यांची किंवा फुलामेणबत्त्यांची लाच हाती धरून तासन् तास देवळे, मशिदी आणि चर्चेस्पुढे लागलेल्या हताश लोकांच्या प्रचंड रांगा पाहिल्या, देशात भलती उतू चाललेली बुवाबाजी पाहिली, हवेतून आंगठ्या काढून देणाऱ्या गारुड्यांना मिळणाऱ्या गुरुपदाचे स्थान आणि सरकारी आश्रय पाहिली की आमच्या राष्ट्रीय आणि वैयक्तिक जीवनातला पुरुषार्थ नष्ट झाल्याचे स्पष्ट दिसते. ही घसरण देशाला आणखी किती खोल नेणार आहे, ह्याचा अंदाजच येत नाही. किती लवकर हा देश नासला–नासला! गांधीजींचे स्मरण अशा वेळी मनाला असंख्य यातना देऊन जाते : रस्त्यांतून जाताना एखाद्या नाक्यावर गांधीजींचा पुतळा दिसतो आणि मान खाली जाते.

ह्या देवाघरच्या माणसाच्या पार्थिव देहाला मारेकऱ्यांच्या गोळयांनी नष्ट केले. त्या मारेकऱ्याचा पार्थिव देह शासनाने फासावर टांगून त्यालाही नष्ट केले. खुनाचा वदला कायदेशीर खुनाने घेतला. हिंसा-अहिंसेच्या विवेकाचा हिशेब तिथेच पुरा झाला. गांधींवर अपार श्रद्धा असणारांनी तो खूनी, ब्राह्मण जातीत जन्माला आला होता म्हणून त्यांची घरे जाळून न कळत त्या खुनी माणसाच्याच धर्माचे पालन केले.एका मुसलमानाने हिंदूंचा खून केला तर आपण दुसऱ्या कुठल्या तरी मुसलमानाचा खून करावा, हे त्याचे तत्त्वज्ञान होते. एका ब्राह्मणाने गांधींना मारले तर आपण इतर ब्राह्मणांची घरे जाळावी, हे त्या तत्त्वज्ञानाला साजेसे आचरण झाले. फिटंफाट झाली. फक्त 'महात्मा गांधी की जय' म्हणण्याचा अधिकार आम्ही गमवला. मेरी माग्डालिनवर दगड मारण्याचा अधिकार जो कायावाचामनेकरून निष्पाप आहे त्यालाच आहे, असे येशू ख्रिस्त म्हणाला होता. त्याच्या अनुयायांनी त्याच्या नावावर क्रुसेड्मध्ये रक्ताच्या नद्या वाहायला लावल्या आणि बळजबरीने, प्राणभयाने येशूचा प्रेममय संदेश हीदन् लोकांची नाके दाबून तोंडातून कोंबला. इस्लाम म्हणजे तर साक्षात् शांती . ती शांती देखील एका हाती तलवार धरून औरंगझेवासारख्या त्याच्या अनुयायांनी वाढवली ! तात्पर्य हेच की, आम्हांला ख्रिस्त, महमद, बुद्ध, गांधी वगैरे कसोटीच्या क्षणांपर्यंत पटलेले असतात. त्या तत्त्वज्ञानाचे आचरण दैनंदिन जीवनात करण्याचे प्रसंग आले की पाय लटपटतात. देवावर शंभर टक्के श्रद्धा आहे म्हणणारे लोकही देवाने पाठविलेल्या आजारातून देव मुक्त करील ह्या भावनेने त्याला शरण जाऊन स्वस्थ पडत नाहीत. वैद्याला तातडीचे बोलावणे

पाठवतात. गांधीयुगात गांधीजी साऱ्या कसोटीच्या क्षणातून तारतील असा विश्वास होता. काही घसरलेच तर खापर फोडायला गांधीजी होतेच. अपयशाचे धनीपण गांधीजी स्वत:कडे घेत असत. 'मी चुकलो' अशी जाहीर कबुली देत. प्रायश्चित्ताचे उपाय करीत. राज्यकर्त्यांना चुका कबूल करून भागत नाही. चुकांवर सारवण घालावे लागते. मखलाश्या कराव्या लागतात. कालहरण करून विस्मरणावर श्रद्धा ठेवावी लागते. कारण सत्तेच्या खुर्चीवरून आपण बाहेर आलो की आपले हाल कुत्रा खाणार नाही, हे त्यांना ठाऊक असते. सत्याच्या शोधकाला हे भय नसते. 'निंदा जनी त्रास अपमान उपहास' ही तर त्याच्या अंगावर सदैव चढणारी आभूषणे आणि सरते शेवटी काटेरी मुकुट !

कारण प्रेमाचा मार्ग हा युद्धाच्या मार्गाहूनही खडतर आहे. तो मार्ग सोडणार नाही म्हणणाऱ्याला एक तर भयंकर निराशेचा झटका येऊन सानेगुरुजींसारखी झोपेच्या गोळ्या घेऊन काळझोप घ्यावी लागते. किंवा गांधी, मार्टिन ल्यूथर किंग ह्यांच्याप्रमाणे बंदुकीच्या गोळ्या खाव्या लागतात. हे पूर्वापार चालत आलेले आहे. प्रेमाच्या निशाणापेक्षा द्वेषाच्या झेंड्याखाली माणसे पटकन् जमतात. भारतीय ऐक्याचा फार मोठा देखावा चिनी किंवा पाकिस्तानी आक्रमणाच्या वेळी पाह्यला मिळाला. तिथे म्हणजे आपण जगतो का मरतो हा एकच सवाल होता. कारण डोक्यावर पडणारा बॉम्ब काही हा ब्राह्मण हा मुसलमान, हे तान्हे मूल ही बाई, हा विद्वान् हा निरक्षर–असले विचार करीत नाही. मृत्यूने जबडा पसरलेला असतो. त्यात आपण ढकलले जाता कामा नये हा एवढा एकच विचार ! पण युद्ध संपले रे संपले की पुन्हा सारे पूर्ववत ! मग जातपात, धर्मप्रांत सारी खुराडी पुन्हा उघडली जातात. माणसाला माणसापासून दूर ठेवणारे केवळ लोखंडीच नाहीत तर अनेक पडदे आहेत. अनेक भिंती आहेत. त्या भिंती ठेवण्यातच सत्तापिपासू लोकांचे हित असते. ह्या भिंती केवळ माणुसकीच्याच पायावर उभे रहाणारे तत्त्वज्ञान आणि त्या तत्त्वज्ञानाबरहुकूम होणारे आचरण नाहींशा करू शकते. परंतु राजकारणाचा कर्करोग माणसाला माणूस म्हणून जगूच देत नाही. गांधींसारखी काही माणसे येतात आणि त्या कर्करोगातून माणसाची मुक्तता करण्याचा प्रयत्न करतात. गीतेतून कुणी दिलासा शोधतो. "संभवामि युगे युगे".—दीन-दुबळे असल्या अवताराची वाट पहातात. भावडे लोक कुणाकुणाला, तो स्वत:च स्वत:ला अवतार म्हणत असल्यामुळे, हाच अवतार आहे असे समजतातही ! राज-कारणी अजगरांचा विळखा मात्र घट्टच होत जातो. ह्यातून मार्ग काय ? धूर्त लोक स्वत:च राजकारणी होतात. बहुजनसमाज मरण्याचे धैर्य नाही म्हणून एक बेचव कलाहीन जीवन मद्दडपणे जगत रहातो. ज्याची हारतुऱ्यांची मिरवणूक निघते त्याच्या नावापुढला 'की' ऐकला की 'जय' ओरडून निर्धास्त होतो. आणि काही

वेडे ह्याही परिस्थितीतल्या अंधारात लहानशी पणती पेटवून बाबा आमटयांसारखे किंवा हेलेन केलरसारखे प्रेममार्गाची वाट आपल्या अश्रूंनी आणि घामाने भिजवीत चालत असतात. ख्रिस्त, बुद्ध, गांधी ह्यांचे नाव घेण्याचा किंवा त्यांची जयंती साजरी करण्याचा हक्क फक्त त्यांचा ! इतरांचा नव्हे ! गांधीशताब्दीच्या या पर्वकाळात हा अधिकार आपल्याला आहे की नाही ह्याचे उत्तर ज्याने त्याने आपल्याच ‘ आतल्या आवाजातून घ्यावे ! राजकारणी लोक तर जे जे मिळेल ते ते लाटावे म्हणताहेत– सर्वसामान्य माणसे दैनंदिन चिन्तांचे वाढते भार वाहात जे जे होईल ते ते पहावे असे म्हणून त्याला आला दिवस ढकलताहेत. अशा परिस्थितीतही ज्यांना गांधींचा– सन्मूल्यावरच श्रद्धा ठेवून जगण्याचा–मार्ग पटतो, तडजोड न करता आचरण न करण्याचा आग्रह धरून तसे आचरण करता येते, त्यांना मात्र भोवतालच्या अंधारातून चालताना महात्मा गांधींचे स्मरण धीर देत असते. गांधीजन्मशताब्दी हा सण फक्त त्या प्रेमधर्मी कर्मयोग्यांचा आहे. मग त्यांचा वेश कुठलाही असो किंवा देश कुठलाही असो !

ठाणे.

१३

# पौरस्त्य व पाश्चात्य संस्कृति

डॉ. रा. ना. दांडेकर

पौरस्त्य व पाश्चात्य संस्कृतीतील साम्य-वैषम्य कोठे कोठे प्रतीत होते आणि या बाबतीत गांधीजींची भूमिका काय होती, याचे विवरण पुढील लेखात केले आहे.

## भारतीय परंपरेचे काही गुणविशेष

संस्कृतीच्या संबंधात पौरस्त्य संस्कृती आणि पाश्चात्त्य संस्कृती असे अन्योन्यापवर्जक प्रवर्गीकरण करणे शास्त्रपूत नाही, हे आता सर्वसाधारणपणे मान्य करण्यात आले आहे. भौगोलिक दृष्टया ज्याला 'पूर्व' असे म्हटले जाते, त्या भू-विभागात निर्माण झालेल्या व विकास पावलेल्या विविध विचारसरणींत आणि जीवनपद्धतींत परस्परापेक्षया मोठे व मौलिक भेद आहेत, हे सहज दिसून येते. चीन, जपान, इंडोनेशिया, भारत व आशियान्तर्गत रशिया या देशांतील संस्कृतिसंकुले (culture. complexes) एकरूप आहेत व त्या दृष्टीने त्यांचे विश्लेषण व अभ्यास करणे शक्य आहे, असे समजणे प्रामादिक ठरेल. तसेच, पश्चिमेकडील लॅटिन आणि जर्मानिक देशांतील संस्कृतींमधील भेद किंवा युरोपातील देश आणि अमेरिका यांतील संस्कृतींमधील भेद दृष्टीआड करता येण्यासारखे नाहीत. शिवाय, हेही वारंवार स्पष्ट करण्यात आले आहे की, तथाकथित पौरस्त्य विचारात असे काही क्वचितच असेल की, जे पाश्चात्त्य विचाराच्या विस्तृत कक्षेत प्रादुर्भूत झालेले आढळून येणार

नाही; आणि, याच्या उलट, पारंपरिक पाश्चात्त्य विचारातही असे काही क्वचितच असेल की, ज्याचा आविष्कार पूर्वेत या ना त्या रूपाने झालेला नाही. असे असले तरी, लोकांची विचारसरणी आणि जीवनपद्धती त्या लोकांच्या विशिष्ट मानवशास्त्रीय, भौगोलिक परिस्थितीने आणि इतिहासक्रमाने अपरिहार्यपणे अवच्छेदित होत असल्यामुळे, तसेच तौलनिक अभ्यासाचा एक सोयीस्कर प्रारंभबिन्दू म्हणूनही, मानवी संस्कृतीचा, पौरस्त्य परंपरा व पाश्चात्त्य परंपरा या स्थूल संज्ञा उपयोजून, विचार करण्यास प्रत्यवाय नसावा. अर्थात या बाबतीत एका गोष्टीचे अवधान राखणे अवश्य आहे. ती गोष्ट म्हणजे ही की, विभाजन करण्याच्या हेतूने विशिष्टीकरण करणे इष्ट नाही, पण विशिष्टीकरण करण्याचा एक मार्ग म्हणून विभाजन करावयास हरकत नाही.

प्रस्तुत संदर्भात पौरस्त्य परंपरा व पाश्चात्त्य परंपरा हे शब्द मी हेतुपूर्वक वापरले आहेत. अलीकडील काळात, जगाचा देशकालदृष्ट्या बऱ्याचशा मोठ्या प्रमाणात संकोच झालेला आहे. याचा परिणाम पूर्व आणि पश्चिम या दोन्ही भूप्रदेशात मानवी जीवन,सामाजिक वातावरण, राष्ट्रीय समस्या, त्या समस्या सोडविण्यासाठी उपयोजिण्यात येणारे मार्ग, इत्यादी बाबतींत एका प्रकारची एकरूपता निर्माण होण्यात झाला आहे. म्हणजेच, पूर्वेकडील संस्कृती व पश्चिमेकडील संस्कृती यांची अन्यव्यावर्तक म्हणून समजली जाणारी वैशिष्टये आता हळूहळू पण निश्चितपणे लोप पावत आहेत. पारंपरिक विचारसरणी आणि जीवनपद्धती या संबंधातच फार तर पौरस्त्य व पाश्चात्त्य असा भेद करणे आता शक्य आहे.

या लेखाच्या संदर्भात आणखी एका गोष्टीचा खुलासा करणे मला इष्ट वाटते. पौरस्त्य परंपरा या शब्दप्रयोगाचा अर्थ मी या ठिकाणी भारतीय परंपरा ( त्यातही विशेषत: हिंदू परंपरा) असाच बव्हंशी सीमित केलेला आहे. याचे कारण म्हणजे भारतीयेतर पौरस्त्य परंपरेचे ( आणि हिंद्वितर भारतीय परंपरेचे) माझे स्वत:चे ज्ञान सीमित आहे. तरी पण मला असा दावा करता येईल की, भारतीय परंपरा ही अनेक अर्थांनी पौरस्त्य परंपरांची प्रातिनिधिक आहे. पौरस्त्य परंपरेचे तीन मुख्य प्रवाह आहेत, असे स्थूलपणे मानता येईल : नजीकच्या पूर्वेकडील ( Near East मधील) किंवा पश्चिम आशियातील इस्लामी परंपरा, भारतीय परंपरा, आणि सुदूर पूर्वेकडील किंवा पूर्व आशियातील संस्कृति-परंपरा. बेकर आणि डिकिन्सन या विद्वानांनी असे दाखविले आहे की, वृत्ती आणि विचार या बाबतीत नजीकची पूर्व ही पश्चिमेशीच अधिक सजातीय आहे. तेथील संस्कृती भारतीय संस्कृतीपेक्षा किंवा सुदूर पूर्वेकडील संस्कृतीपेक्षा पारंपरिक ख्रिस्तधर्म आणि पाश्चात्त्य संस्कृती यांच्याशी अधिक निकटची आहे. याच्या उलट, सुदूर पूर्वेकडील परंपरा—निदान तिच्या काही स्तरांत तरी—भारतीय परंपरेचाच विस्तार प्रतिबिंबित करते. शिवाय, आपल्या

दीर्घ इतिहासात, भारतीय परंपरेने पूर्वेकडील निरनिराळ्या भूप्रदेशांतील विविध मानववंशीय आणि सांस्कृतिक अंश आपल्यात सामावून घेतले असल्यामुळे तिच्यात पौरस्त्य परंपरांचे बहुतेक गुणविशेष सामूहिक रीतीने प्रदर्शित झालेले आहेत. लक्षणीय सातत्य आणि अतिप्राचीन कालापासून चालत आलेल्या साक्षात् संस्कृति-रिक्थाचे दृढ अवस्थान ही भारतीय परंपरेची वैशिष्टचेही या ठिकाणी विसरून चालणार नाहीत. आर्थर ल्यालने म्हटल्याप्रमाणे, आजही नवीन परिस्थितीच्या–आध्यात्मिक आणि भौतिक परिस्थितीच्या–आघाताखाली, भारतीय परंपरेचा नाश नियतिनिश्चित असल्यासारखा वाटत असला, तरी त्या परंपरेने जिवंत राहण्याचा निकराचा निर्धार केलेला दिसतो. अशा रीतीने, सद्य:कालीन विश्व-अरिष्टापासून ( world- crisis पासून) स्वत:चे परिरक्षण करण्यासाठी पौरस्त्य परंपरा करीत असलेल्या लढ्याचे प्रतीक म्हणजे भारत, असे सामान्यपणे समजण्यास हरकत नाही.

परंपरेचे निदर्शक म्हणून वर मी विचारसरणी आणि जीवनपद्धती हे शब्द एकत्र वापरले आहेत. परंतु पश्चिमेकडे या दोहोंमध्ये पुष्कळदा ठळक सीमांकन करण्यात आले आहे. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या पुढे सांगितलेल्या तीन प्रमुख वैशिष्टचांचा नेहमी उल्लेख करण्यात येतो :–(१)त्या तत्त्वज्ञानाची प्रेरणा केवळ जिज्ञासा ही आहे, अनुबुभूषा नाही; (२)त्याचा विचारस्वातंत्र्यावर भर असतो; आणि (३) बुद्धिप्रामाण्य ही त्याची शेवटची कसोटी आहे. काही वेळा तर असेही आवर्जून सांगण्यात आले आहे की, पाश्चात्त्य विचारसरणीचे गुणविशेष आणि पाश्चात्त्य जीवनाचे गुणविशेष यांमध्ये गफलत करता कामा नये. आणि बरोबर या वृत्तीतच आपल्याला भारतीय परंपरा आणि पाश्चात्त्य परंपरा यांच्यामधील एक मूलभूत विभेद दृष्टोत्पत्तीस येतो. धर्म ( religion ), तत्त्वज्ञान ( philosophy ), आणि संस्कृती ( culture ) या तीन अन्योन्यव्यावर्तक अशा संकल्पना आहेत, असे भारतीयांनी सामान्यत: कधीच मानले नाही. त्यांच्या मते या तीन संकल्पना एकच एकात्म साकल्य प्रस्थापित करतात. आपले विचार, ज्ञान, आणि श्रद्धा जास्तीत जास्त प्रमाणात आपल्या प्रत्यक्ष जीवनात उतरविणे-त्यांना जीवनरूप देणे-हे त्यांचे मुख्य साध्य होते. भारतीय संस्कृतीत विचार आणि जीवन, तत्त्वज्ञान आणि धर्म, या दोहोंच्या द्वैताला थारा दिलेला नाही, हे सहज दिसून येईल. खरे पाहिले तर, भारतीय तत्त्वज्ञान हे उपयोजित तत्त्वज्ञान ( applied philosophy ) आहे. आणि गांधीजींनी मानल्याप्रमाणे, मानवी जीवन म्हणजे आपल्या स्वत:ला प्रतीत झालेल्या सत्यासंबंधीचे प्रत्यक्ष प्रयोग करण्यासाठी उपलब्ध झालेली प्रयोगशाळा आहे.

संस्कृती ही फार व्यापक संकल्पना असल्यामुळे, या लेखाच्या अनुषंगात, मी फक्त जिला भारताची धार्मिक-तात्त्वज्ञानिक संस्कृती किंवा आध्यात्मिक परंपरा म्हणता येईल तिचाच प्राधान्याने विचार करणार आहे. भारताच्या धार्मिक-तात्त्वज्ञानिक

संस्कृति-साकल्यांत विविध प्रकारांचे आणि श्रणींचे विचार आणि आचार समाविष्ट झालेले आहेत. परंतु त्यांपैकी ज्यांना अनन्यसाधारण, मूलभूत, वर्चस्वी, स्थिर, व व्यापक मानता येईल, असेच विचार आणि आचार आपल्याला प्रस्तुत संदर्भांत लक्षात घ्यावयाचे आहेत. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे भारतीय परंपरेचा आत्मा तिच्या ज्या गुणविशेषांत विशेषत्वाने प्रतिबिंबित झाला आहे,त्यांचा आपल्याला शोध घ्यावयाचा आहे. या संबंधात सामान्यपणे असे विधान करता येईल की, भारतीय परंपरेची वाह्य रूपे वदलत गेली असली, तरी तिचा आत्मा (किंवा सार) वव्हंशी स्थिर राहिला आहे. याच्या उलट, पाश्चात्त्य परंपरेचे सर्वसाधारण रूप स्थिर राहिले असले तरी तिचा आत्मा (किंवा सार) सारखा परिर्वातित होत आला आहे. भारतीय संस्कृतीच्या आपातिक अभ्यासकासही त्या संस्कृतीच्या धर्मनिर्देशितत्वाचा तीव्रपणे प्रत्यय आल्यावाचून राहणार नाही. यासंबंधी इलियटने म्हटले आहे की, कोणत्याही इतर देशांपेक्षा भारतांत धर्म हाच तेथील राष्ट्रीय मनाचा ( national mind चा) आवडता उद्योग समजला गेला आहे, आणि त्याच विषयात भारताच्या राष्ट्रीय मनाची संपूर्णतया अभिव्यक्ती झाली आहे. सौन्दर्यदृष्टिनिर्देशित ग्रीक संस्कृतीशी किंवा यन्त्रनिर्देशित आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीशी भारतीय संस्कृतीची तुलना केल्यास तिचे धर्मनिर्देशितत्व विशेष उठावदारपणे प्रतीत होईल. भारतीय परंपरेचे हे धर्मनिर्देशितत्व–किंवा भारतीयांची आध्यात्मिक वृत्ती–भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रधान प्रेरणेत स्पष्टपणे अभिव्यक्त झाली आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचा उगम आत्म्याच्या अस्वस्थतेत शोधावा लागेल, सत्ताशास्त्रीय (metaphysical ) जिज्ञासेत नाही. पश्चिमेत तत्त्वज्ञानाकडे एक विद्वत्तात्मक व्यवसाय, किंवहुना एक ज्ञानक्रीडा, या दृष्टीने पाहिले जाते. तेथे तत्त्वज्ञानाचे मानवी जीवनापासून विविक्तीकरण करण्यात आले आहे; तत्त्वज्ञान म्हणजे केवळ औपपत्तिक परिकल्पनांनी वनलेली विचारपद्धती एवढेच त्याचे स्वरूप सीमित करण्यात आले आहे. याच्या उलट, भारतीयांनी आपल्या तात्त्वज्ञानिक विचारांस प्रत्यक्ष प्रायोगिक निदेशन दिले आहे. बुद्धीला जे प्रतीत झाले त्याचा आध्यात्मिक अनुभव घेणे हे त्यांच्या सर्व तत्त्वज्ञानीय उद्योगांचे साध्य मानले गेले आहे. सत्यशोधनपथावरील आपल्या प्रगतीतील पहिल्या-म्हणजे श्रवण,मनन, आणि निदिध्यास या–तीन मुख्य टप्प्यांवरच ते थांवले नाहीत. त्यांच्या पलीकडील साक्षात्कार या अन्तिम उद्देश्याचा त्यांनी नेहमीच कटाक्षाने उल्लेख केलेला आहे. 'ज्ञाना चे पर्यवसान 'दर्शना'त होत नसेल, तर ते ज्ञान वन्ध्यच समजले पाहिजे, असा भारतीयांचा आग्रह आहे. तत्त्वज्ञानाकडे या फलवादी ( pragmatic ) दृष्टीने पाहण्याचा परिणाम असा झाला की, भारतीय तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या संप्रदायांनी आपले सैद्धान्तिक मतभेद आपल्या अन्तिम आध्यात्मिक किंवा धार्मिक ध्येयापुढे गौण मानले. अन्तत , तत्त्वज्ञान हे एक साधनच आहे, ते साध्य

होऊ शकत नाही, ही जाणीव भारतीय विचारवंतांनी नेहमीच मनात बाळगली.

या जाणिवेनेच भारतीयांच्या दुसऱ्या एका महत्त्वपूर्ण वृत्तीस जन्म दिला आहे. ती वृत्ती म्हणजे त्यांच्या विचार-आचारांच्या क्षेत्रातील लक्षणीय सहिष्णुता. तत्त्वज्ञान किंवा धर्म यांना साध्य न मानण्यात आल्यामुळे , भारतात तात्त्वज्ञानिक किंवा धार्मिक अत्याग्रही मताला फारसा अवकाश राहिला नाही. आध्यात्मिक अनुभवाच्या अन्तिम ध्येयाकडे नेणारे मार्ग निरनिराळे असू शकतात, असा भारतीयांचा विश्वास आहे. म्हणून त्या बाबतीतील अन्यव्यावर्तकतेची किंवा केवलतेची भाषा त्यांच्या मनाला घृणास्पद वाटते. आपल्या दीर्घ इतिहासात, भारताने निरनिराळ्या वंशांचे आणि धर्मपंथांचे—त्यांच्यावर, आक्रमक रीतीने, कोणत्याही एका विशिष्ट विचार-सरणीची किंवा जीवनपद्धतीची वळजवरी न करता —स्वागतच केले आहे. हे वैचारिक आतिथ्य—आध्यात्मिक जीवनातील हा प्राथमिक स्वरूपाचा शिष्टाचार-शतकानुशतके भारतीय परंपरेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होऊन राहिला आहे.

परंतु, अ-व्यक्तिवादी ( non-individualistic) प्रवृत्ती हीच भारतीयांची सर्वांत मूलभूत प्रवृत्ती मानवी लागेल. भारतीयांची धार्मिक-तात्त्वज्ञानिक जीवनदृष्टी मूलतःच वैश्विक ( cosmic ) आहे. पाश्चात्त्य विचार सारतः मानवकेन्द्री ( anthropocentric ) आहे. ' मानव हाच सर्व वस्तूंचा मानदण्ड आहे ' या प्रोटॅ-गोरसच्या वचनानुसारच पाश्चात्त्यांची जीवनदृष्टी सामान्यपणे निश्चित केली गेली आहे. याच्या उलट, भारतीय विचारवंतांनी असे मानले आहे की, पशुवृक्षादिकां-प्रमाणे मानव हाही या वैश्विक साकल्याचा केवळ एक घटक आहे. या संदर्भात, दक्षिण अमेरिकेतील प्रख्यात तत्त्वचिन्तक रोमेरो यांचे एक वचन लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात की, पाश्चात्त्य, चिनी व भारतीय या तीन प्रधान संस्कृतींचे तीन परवलीचे शब्द आहेत—पाश्चात्त्य संस्कृतीचा ' अहम् ', चिनी संस्कृतीचा ' वयम् '. आणि भारतीय संस्कृतीचा 'विश्वम्'. परम सत्य या जगात ज्या निरनिराळ्या असंख्य रूपांनी आविर्भूत झाले असल्यासारखे भासते, त्या रूपांपैकी मानव हेएक आहे असे भारतीय मानतात. बृहदारण्यक-उपनिषदात (१.३.२२) म्हटले आहे : यद् वेव समः प्लुषिणा, समो मशकेन, समो नागेन, सम एभिस्त्रिभिर्लोकैः, समोऽनेन सर्वेण । सृष्टीतील निरनिराळ्या भावविशेषांचे परस्परसंबंध समकक्षतेच्या ( co-ordination च्या ) तत्त्वाने शासित झाले आहेत, प्रधानगौणभावाने नव्हे.[१]

१. या ठिकाणी असा आक्षेप घेतला जाण्याचा संभव आहे की, तात्त्वज्ञानिक दृष्टीने हे विधान स्वीकार्य असले, तरी भारतीयांच्या (हिंदूंच्या) सामाजिक संघटनेच्या संबंधात ते तसे मानता येणार नाही. अशा प्रकारे, भारतीयांची तात्त्वज्ञानिक विचारसरणी आणि सामाजिक वास्तविकता या दोहोंमध्ये एक प्रकारचे द्वैत आहे. या विषयाची सविस्तर चर्चा करणे येथे प्रस्तुत नाही. तरी पण एवढे सुचविणे मात्र अवश्य आहे की, भारतीयांचा वर्णधर्म हा मुळात समकक्षतेच्या— नैतिक परस्परावलंबित्वाच्या— तत्त्वावर आधारलेला होता, असेच अन्तिम विश्लेषणात आढळून येईल.

वैश्विक योजनेत मानवाला काही विशिष्ट आणि अनन्यसाधारण असे स्थान देण्यात आलेले नाही. त्यामुळे वैश्विक जीवनात आपण वर्चस्वी आहोत, असे मानण्याची भारतीय मानवाची सामान्यत: प्रवृत्ती नसते. एवढेच नव्हे तर वैश्विक साकल्यात आपले व्यक्तित्व विलीन करण्यासच तो अधिक उत्सुक असतो. ही वृत्तीची शालीनता–परम सत्यापुढे आत्मप्रत्यर्पण करण्याची ही मानसिक तत्परता–भारतीय मानवाच्या बाबतीत जणू काही स्वभावसिद्ध असते. जिला व्यक्तिजीवन असे नाव दिले जाते, ती एक अल्पकालिक आणि अन्तिम दृष्टीने केवळ भासमान अशी विघटितत्वाची–अलगपणाची ( disintegration ची )–स्थिती आहे, याची त्याला जाणीव असते, आणि म्हणून योग-गूढानुभवादी साधनांनी पुनरैकात्म्य प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नात तो असतो.

भारतीयांच्या या अ-व्यक्तिवादी प्रवृत्तीमुळेच आज आपण ज्याला इतिहास असे नाव देतो, त्या विषयासंबंधी असे खास ग्रंथ भारतात निर्माण झालेले नाहीत. कालातीत सत्याप्रीत्यर्थ भारतीयांनी कालिकता आणि ऐतिहासिकता यांचा अपह्नव केला आहे, तर पाश्चात्त्यांनी आपले सर्व जीवनच काल आणि इतिहास यांच्या चौकटीत घडवले आहे. भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांतही व्यक्तिश: तत्त्वचिन्तकांविषयी फारसे बोलले जात नाही, तत्त्वज्ञानीय दर्शनांसंबंधीच सामान्यपणे भाषा केली जाते. भारतीयांना खरी आस्था वाटली ती विचारांबद्दल, विचारवंतांबद्दल नव्हे–तत्त्वांबद्दल, व्यक्तींबद्दल नव्हे. किंबहुना असेही म्हणता येईल की, व्यक्तित्व ही जिच्यासंबंधी मुद्दाम गंभीरपणे विचार करावयास पाहिजे अशी एखादी समस्या आहे, असे भारतीयांनी क्वचितच मानले आहे. याच्या उलट, पाश्चात्त्यांनी व्यक्तित्वापलापाच्या कल्पनेला सतत विरोधच दर्शविला आहे. अर्थात, अलीकडच्या काळात, समूहवाद ( collectivism ) आणि सामाजिकीकरण ( socialization ) या नव्या आदर्शांनी पाश्चात्त्य व्यक्तिवादाला मोठेच आव्हान दिले अहे. पाश्चात्त्य जीवनातील विद्यमान अरिष्टाच्या ( crisis च्या ) एका रूपाचे बीज या आव्हानात आपल्याला सापडू शकेल.

भारतीय अ-व्यक्तिवादाचा एक नैसर्गिक परिणाम म्हणजे अ-क्रियापद ( non-activism ). व्यक्तिवादी पश्चिम आक्रमक स्वरूपात क्रियावादी आहे. निसर्गाचे सर्वांगीण ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या बाबतीत पाश्चात्त्य लोक नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत, याचे कारण म्हणजे अन्तत: त्यांना निसर्गाच्या शक्तींचे नियन्त्रण आणि निदेशन करण्याची क्षमता प्राप्त करून घ्यावयाची आहे. आणि या प्रयत्नात त्यांना जे लक्षणीय यश मिळत गेले आहे त्यामुळे त्यांचा मूळचा क्रियावाद अधिकाधिक वर्धिष्णूच होत आहे. याच्या उलट, अलिप्तता हा भारतीय जीवनातील परवलीचा

२. योग म्हणजे reintegration अशी एक समर्पक व्याख्या सुचविण्यात आली आहे.

शब्द बनला आहे. यासंबंधी काहीशा चेष्टेने असे म्हटले गेले आहे की, भारतीय लोक जीवनाविषयीची आपली अलिप्तता इतक्या पराकोटीस नेतात की, परिणामत: जीवनापलापाविषयी त्यांच्या मनात आसक्ती निर्माण होते. पाश्चात्त्य मानव आपल्या जीवनात प्राणभूतपणे रस घेत आहे, आणि आपले ऐहिक जीवन अधिकाधिक सुखी व सफल करण्याच्या मागे लागला आहे. भारतीयांची वृत्ती ऐहिक मूल्यांच्या अतीत होण्याची आहे. ऐहिक मूल्ये ही दुसऱ्या एका इष्टतर अशा अस्तित्वातील मूल्यांची केवळ अनुसेवी आहेत, असे ते मानतात. पाश्चात्त्यांच्या केवल-मानवतावादी आदर्शात–मानवी समाजाची पुनर्घटना करण्याच्या किंवा राज्यसंस्थांची सुधारणा करण्याच्या त्यांच्या औत्सुक्यात–भारतीयांना मुक्तीचा मार्ग दिसत नाही. जर काही निर्दोष व परिपूर्ण करावयास पाहिजे असेल तर ते म्हणजे हे ऐहिक जीवन आणि हे संकुल जग हेच आहे असा पाश्चात्त्यांचा विश्वास आहे, तर या कालावच्छिन्न जगात काहीच स्थायी किंवा अविसर्गी नाही आणि म्हणून हे जग किंवा ऐहिक जीवन बदलण्याचा प्रयत्न करण्याऐवजी मनुष्याने दुसऱ्या अधिक श्रेयस्कर अशा अस्तित्वाबद्दल चिंता करणे अधिक इष्ट आहे, अशी भारतीयांची धारणा आहे.

अ-क्रियावादी व सारत: चिन्तनशील असे भारतीय शास्त्रीय ज्ञान व भौतिक प्रगती या बाबतीत, अर्थातच, पाश्चात्त्यांच्या पुष्कळच मागे राहिले आहेत. पण त्यामुळे पाश्चात्त्य लोकांच्या पुढे हल्ली उपस्थित झालेल्या अरिष्टाच्या दुसऱ्या एका रूपापासून भारत बऱ्याच अंशी अबाधित राहिला आहे. एका बाजूस, आपल्याला उपलब्ध झालेल्या सर्व ज्ञान-विज्ञान-तंत्रवादी साधनांनीही आपण या जगात शांती व खरा उत्कर्ष प्रस्थापित करण्यात यशस्वी झालो नाही, एवढेच नव्हे तर आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात दिवसानुदिवस तंग वातावरणच निर्माण होत आहे, या विचाराने पाश्चात्त्यांत वैफल्याची तीव्र भावना उत्पन्न झाली आहे; आणि, दुसऱ्या बाजूस, आपल्या क्रियावादी आवेगावर प्रभुत्व मिळविण्याऐवजी ते त्या आवेगाचे गुलाम बनत चालले आहेत. उदाहरणार्थ, उत्पादन-साधने व उत्पादित वस्तू यांनी उत्पादक मानवांवर एक प्रकारचे वर्चस्व स्थापित केले आहे. अशाच लोकांना उद्देशून, रोमाँ रोलाँ यांनी "पाश्चात्त्य जीवनादर्शाची असंतुष्ट लेकरे' असे उद्‌गार काढले आहेत. उत्पादन वाढविण्याऐवजी आपल्या गरजा कमी करणे अनेक वेळा इष्ट ठरते, असे अ-क्रियावादी भारताचे अर्थशास्त्र शिकविते.

अलिप्तता आणि धार्मिकता हे भारतीय विचारसरणीचे व जीवनपद्धतीचे प्रमुख गुणविशेष आहेत, असे मी वर म्हटले आहे. पण भारतीय परंपरेतील विरोधाभास हा की, त्या परंपरेत विमुक्त वैषयिक बेभानपणाने लक्षित असे वाङ्‌मय आणि उच्छृंखल नैशोत्सवी ( orgiastic ) धर्मपंथ यांचा अभाव आहे, असे मुळीच म्हणता येणार नाही. खरे पाहिले तर, ही ध्रौविकताच( polarity च ) भारतीय

प्रवृत्तीचे एक महत्त्वाचे वैशिष्टय आहे, असे म्हणावयास हरकत नाही. भारतीय विचारप्रणाली मुळात आदिम स्वरूपाची ( primitive ) पण विकासाच्या क्रमात अतिशय सुसंस्कृत झालेली अशी आहे, व याचाच परिणाम म्हणजे भारतीय परंपरेची ध्रौविकता हा आहे, असे कधी कधी सुचविण्यात आले आहे. पण ते प्रमाणसिद्ध ठरण्यासारखे नाही. वास्तविकतया आसक्ती व अलिप्तता, बेभानपणा व संन्यस्तवृत्ती, हे दोन ध्रुव भारतीयांच्या वैश्विकयात्वात्मक जीवन-दृष्टीतूनच नैसर्गिकपणे निर्माण झाले आहेत. आपण विश्वप्रक्रियेचे एक सारभूत घटक आहोत असे जेव्हा मानव मानतो, तेव्हा त्याच्या मनात आत्मगौरवाची भावना निर्माण होते; याच्या उलट, इतर भावविशेषांप्रमाणेच आपणही वैश्विक साकल्याचे एक सामान्य अंश आहोत असे जेव्हा त्याला प्रतीत होते तेव्हा आपले स्थान विशेष महत्त्वाचे नसल्याची जाणीव त्याच्या मनात निर्माण होते. वैश्विकयात्वात्मक विचारप्रणालीत ही दोन टोके अनेकदा एकत्र आल्यासारखी भासतात. योगीश्वर संन्यासी शिव आणि तान्त्रिक धर्मपंथाच्या नैशोत्सवांचे केन्द्र झालेली शक्ती या दोहोंचे संपृक्तस्वरूप हे उपर्युल्लिखित विचारप्रणालीचेच दैवतशास्त्रीय प्रतीक आहे.

जीवन आणि अन्तिम सत्य यांविषयीच्या प्रश्नाकडे पाहण्याच्या दृष्टिकोना-संबंधी विचार केल्यास स्थूलपणे असे म्हणता येईल की, पाश्चात्यांचा दृष्टिकोन बुद्धिवादी, विश्लेषणात्मक, व विनियामक ( regulative ) आहे, तर भारतीयांचा दृष्टिकोन अन्त:स्फुरणात्मक (intuitive), सारसंकलक, व चिन्तनप्रधान आहे. शाब्दिक आणि तर्कशास्त्रीय प्रतीकांच्या द्वारा अभिव्यक्त केले जाऊ शकणार नाही असे ज्ञानच असू शकत नाही, असा पाश्चात्त्यांचा दावा आहे. त्यांच्या मते, ज्ञान म्हणजे एक काटेकोर संकल्पनांचा निकाय आहे, आणि सत्याचे प्रकार ( categories) व तद्विषयक बुद्धिजन्य ज्ञानाचे प्रकार हे अवश्यतया एकरूपच असतात. सर्व ज्ञान एखाद्या व्यवस्थित बुद्धि-मूलक चौकटीत बसविण्याची त्यांना मोठी हौस असते. पाश्चात्त्यांच्या दृष्टीने बुद्धी हीच सत्याची एकटी एक कसोटी आहे; आकारिक तर्कशास्त्र हे त्यांचे एकमेव श्रद्धा-स्थान आहे. याच्या उलट, आपल्या सर्वसाधारण वृत्तीस अनुरूप अशा रीतीने, न्याय-दर्शन (किंवा logic ) हे धर्माचे अनुसेवी आहे, असेच भारतीय मानतात. न्याय-दर्शनाचे उद्देश्य ज्ञानशास्त्रीय असण्यापेक्षा वरीयस्त्वाने धार्मिक स्वरूपाचे आहे, असेच अन्तिम विश्लेषणात आढळून येईल. तसेच, तर्कशास्त्राच्या मर्यादांची भारतीयांना पूर्ण जाणीव झाली आहे. ते तर्कशास्त्राचे प्रामाण्य स्वीकारतात यात शंका नाही, पण अन्तिम सत्य हे ऊहात्मक ( discursive) व निर्देशक (demonstrative) तर्कशास्त्राच्या कक्षेच्या अतीत आहे, असा त्यांना प्रत्यय आलेला आहे. कोणत्याही विचारप्रणालीचे निरपवाद प्रामाण्य स्वीकारावयास ते सहसा उद्युक्त असत नाहीत; कारण, त्यांच्या दृष्टीने, सत्य अनेक रीतींनी अभिव्यक्त होऊ शकते. एकाग्रही मत म्हणजे बौद्धिक

अहंकाराचेच प्रतिबिंब आहे, असे भारतीय मानतात. त्यांना असाही प्रत्यय आलेला आहे की, सर्व तर्कशास्त्रीय पद्धती, अन्तिम विश्लेषणात, मानवी अनुभवाच्या सापेक्षतेवर आणि अनिश्चिततेवरच उभारलेल्या आहेत.

पाश्चात्त्यांच्या व्यक्तिवाद-क्रियावादांप्रमाणे त्यांच्या हठवादी बुद्धिवादानेही त्यांच्या जीवनात एक मोठे अरिष्ट निर्माण केले आहे. सापेक्षतावादापुढे तार्किक अनुभवसत्तावाद ( logical positivism ) निष्प्रभ ठरला आहे, आणि मानवी जीवनातील ‘अबुद्धिशासिता’च्या ( irrational च्या ) प्रभावाविषयी आधुनिक मानसशास्त्राने उपस्थित केलेल्या अप्रत्याख्येय पुराव्याने केवल तर्कबुद्धीला आपल्या उच्च स्थानावरून खाली ओढले आहे. अशा अपरिहार्य बौद्धिक अनिश्चिततावादावर मात करण्यासाठी भारतीय विचारवंतांनी, प्रत्यक्ष व अनुमान या प्रमाणांच्या व्यतिरिक्त, शब्दप्रमाणाचा उपन्यास केलेला आहे. श्रुतिग्रंथांवर भारतीयांची गाढ श्रद्धा आहे, कारण, त्यांच्या मते, प्राचीन ऋषींच्या बुद्ध्यतीत दर्शनाचा व अन्तःस्फूर्त अनुभवांचा परिपाक श्रुतीत शब्दरूप झालेला आहे.[3] मानवी इन्द्रिये व मानवी बुद्धी यांची शक्ती व कक्षा मर्यादित असल्यामुळे साहजिकपणेच इन्द्रियजन्य ज्ञान व तर्कानुमेय ज्ञान यांची व्याप्तीही अवश्यतया मर्यादित असते. अनन्त सत्याचे संपूर्ण आकलन सान्त इन्द्रियांना व बुद्धीला केवळ अशक्य आहे. पण भारतीय विचारवंतांनी आपले ज्ञानशास्त्र या नकारात्मक स्वरावर थांबविलेले नाही. या ठिकाणी त्यांनी एका प्रकारचा लक्षणीय ज्ञानशास्त्रीय आशावाद प्रकट केला आहे. त्यांनी असा विश्वास व्यक्त केला आहे की, ज्या विरळ प्रसंगी केवल बुद्धिवाद अयशस्वी ठरतो, तेथे श्रद्धा परिणामकारक रीतीने फलदायी ठरते. श्रद्धेत बुद्धिवादाचा त्याग अभिप्रेत नाही, तर बुद्धिवादाच्या पलिकडे जाणे अभिप्रेत आहे. बुद्धिवाद प्रौढ झाला की श्रद्धेचे रूप धारण करतो. बुद्धिवादापेक्षा श्रद्धा अधिक सर्जनशील असते, असा अनुभव आहे. या संदर्भात आणखी एका गोष्टीचा उल्लेख करावयास हवा ! परम सत्याचा साक्षात् अनुभव प्राप्त करून घेण्याच्या मार्गावरील आपल्या प्रगतीसाठी भारतीय साधकांनी योगासारख्या अ-बुद्धिसंबद्ध साधनांचे साहाय्य घेतलेले आहे. पाश्चात्त्य विचारवंत मात्र प्रत्येक गोष्टीविषयी जादा चिकित्सक असतात, कोणत्याही गोष्टीविषयी श्रद्धा दर्शविण्याच्या

---

३ या ठिकाणी जाता जाता एका गोष्टीचा खुलासा करणे अवश्य आहे असे मला वाटते. हिंदूंनी शब्द हे अन्तिम प्रमाण मानले असले तरी त्यामुळे त्यांचे धार्मिक विचार व आचार स्थितिशील व कुण्ठितगती राहिले नाहीत. किंबहुना, इतर अनेक प्रधान धर्मांच्या उलट, हिंदुधर्माचा उगम आणि विकास धर्मप्रवर्तक (Prophet), धर्मग्रंथ (Book) आणि धर्मसंस्था (Church) यांच्या निरपेक्षतेने झाला असेच म्हणावे लागेल. वास्तविकतया वेदप्रामाण्याची कल्पना धार्मिक दृष्टीने महत्त्वाची ठरली गेली नसून ऐतिहासिक व ज्ञानशास्त्रीय दृष्टीने महत्त्वाची ठरली गेली आहे.

बाबतीत ते साशंक असतात; त्यांच्या दृष्टीने कोणतीही गोष्ट स्वभावत:च पवित्र किंवा अबाध्य नसते. परिणामत:, पाश्चात्त्य विचारवंतांना एक प्रकारची भयानक अशी बौद्धिक वैफल्याची भावना सहन करावी लागते.

भारतीयांच्या प्रवृत्ती आणि जीवन व परम सत्य यांच्यासंबंधीच्या समस्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन यांचा त्यांच्या विचार-आचारांवर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. उदाहरणार्थ, भारतीय विश्व-सृष्टि-शास्त्राचा एक अभ्युपगम असा आहे की, अस्तित्वात असणाऱ्या सर्व भावविशेषांत एक प्रकारची सारभूत एकता वास करीत आहे. वैदिक विचारप्रणालीच्या एका प्रथमकालीन अवस्थेत असे मानले जात होते की, देव, मनुष्य, पशू, वृक्ष, इत्यादी सृष्टीच्या विविध रूपांत एकच यातुशक्ती अन्तर्निविष्ट झाली आहे. या विविध रूपांत जो भेद दिसून येतो तो गुणमूलक किंवा सारमूलक नाही, तर बव्हंशी परिमाणमूलक आहे.[४] उत्तरकालीन अद्वैत सिद्धान्त म्हणजे केवळ या मूळच्या वैश्विक-यात्वात्मक अभ्युपगमाचे सत्ताशास्त्रीय रूपान्तर आहे. भारतीयांनी असा विश्वासही वारंवार व्यक्त केला आहे की, हे विश्व अफाट आणि संकुल स्वरूपाचे असले, तरी कोणत्याही अर्थाने अस्ताव्यस्त ( chaotic) नाही. ते chaos नसून cosmos आहे. एका सर्वव्यापी वैश्विक अनुशासनाने–ज्याला 'ऋत' हे नाव देण्यात आले आहे त्याने-त्याचे सर्व व्यवहार शासित आणि विनियमित केले गेले आहेत. या वैश्विक अनुशासनापेक्षा उच्चतर आणि श्रेष्ठतर दुसरे काहीही नाही. प्रत्यक्ष देवही या अनुशासनाचे अनुसेवी आहेत; ते कोणत्याही परिस्थितीत त्याचे उल्लंघन करू शकत नाहीत.

चिद्वाद, भौतिकतावाद, किंवा वास्तववाद अशा कोणत्याही साचेबंद परिभाषेने भारतीय सत्ताशास्त्राचे विशिष्टीकरण करणे शक्य होणार नाही. बहुविध घाटनिक आविष्कार हे आभासात्मक, अशाश्वत, आणि आपातिक आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाने त्यांचा संपूर्ण निरास कल्पिलेला नाही; पण त्याचबरोबर त्यांना सत्ताशास्त्रीय वास्तवता मूलत:च नाही असा दावा मात्र जरूर केला आहे. भारतीय तत्त्व-चिन्तकांच्या मते, अन्तिम सत्य एक आणि अविभाज्य आहे. ते कोणत्याही प्रकारच्या बुद्धिवादी अन्वेषणाच्या अधीन नाही; ते तर्कशास्त्रदृष्टचा अनिर्धार्य आणि गुणदृष्टचा अ-विशिष्टीकरणीय आहे. परम सत्य हे केवळ अन्त:प्रज्ञाग्राह्य आहे, आणि साधकाने त्या सत्याशी असलेल्या आपल्या अभिन्नतेची अन्त:प्रतीती गूढानुभवाच्या मार्गाने घ्यावयाची असते.

भारतीय नीतिशास्त्र हे बन्धन आणि मोक्ष या संकल्पनांच्या पायावर उभारले गेले आहे. वर उल्लेखिलेला 'ऋत' हा शब्द 'बांधणे' या अर्थाच्या एका धातूपासूनच

४. इतरत्र याला मी "असुवाद" असे नाव दिलेले आहे (पहा : "हिंदुधर्म इतिहास आणि आशय", नागपूर विद्यापीठ, १९६९, पृ. ८०–८१.)

साधलेला आहे. वैश्विक साकल्याच्या सर्व घटकांना ऋत एकत्र बांधून ठेवते, आणि, अशा रीतीने, त्या सर्व घटकांना विश्वप्रक्रियेच्या योग्य व्यापारणाच्या कामी नियोजित करते. विश्वाबाहेर विविक्तपणे राहणाऱ्या ईश्वराच्या आज्ञेचे पालन किंवा मानव-निर्मित आचारसंहितेचे अनुवर्तन हा भारतीय परंपरेने आपला नैतिक आदर्श मानलेला नाही. भगवद्गीतेच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे खरा नैतिक आदर्श यज्ञचक्रप्रवर्तन, म्हणजेच वैश्विक आणि सामाजिक परस्परावलंबित्वाची जाणीव व जोपासना—हा आहे. हिंदु—किंवहुना, भारतीय, विचारप्रणालीचे एक वैशिष्टच म्हणून समजला गेलेला कर्मसिद्धान्त म्हणजे ऋतकल्पनेचेच एक वेगळे रूप आहे. कर्मसिद्धान्त म्हणजे, एका अर्थी, सर्वत्र लागू पडणारा नैतिक कार्यकारणभावाचा निरनुरोध नियम. धर्माचे मुख्य उद्दिष्ट विश्वाला तसेच समाजाला एकत्र धरून ठेवणे-आध्यात्मिक व भौतिक, व्यक्ती व समाज, आदर्श व वास्तव, अंश व अंशिन्, इत्यादी द्वंद्वांमध्ये समतोल राखून व त्या द्वंद्वांचे योग्य समायोजन करून विश्वाचे व समाजाचे धारण करणे—हे आहे. परंतु जेव्हा व्यक्तीचे व्यष्टित्व वैश्विक समष्टीत विलीन होते, तेव्हा ती व्यक्ती धर्म, कर्म, ऋत, या सर्वांच्या कक्षेच्या पलीकडे जाते आणि तिला मोक्ष प्राप्त होतो. नास्ति अकृतं कृतेन। परम सत्याचा साक्षात् अनुभव हा ज्याप्रमाणे केवल बौद्धिकतेच्या अतीत आहे; त्याप्रमाणे तो केवल नैतिकतेच्याही अतीत आहे.

भारतीय विश्व-सृष्टि-स्थितिशास्त्रातील, सत्ताशास्त्रातील, किंवा नीतिशास्त्रातील ईश्वराची भूमिका खरोखर फारशी क्रियाशील नाही. मानवी आणि वैश्विक व्यव-हाराच्या अतीत राहूनही त्या व्यवहारांत हस्तक्षेप करणारा ईश्वर भारतीय परंपरेला मान्य नाही. तसेच ईश्वर हा ऋत किंवा कर्मनियम यांना उत्पन्नही करीत नाही किंवा त्यांचे नियंत्रणही करीत नाही, असेही ती परंपरा ठामपणे प्रपादन करते. म्हणजेच, भारतीय परंपरा सारतः अनीश्वरवादी आहे असे म्हणता येईल. धर्माचा ( religionचा ) ओघ पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहला असेल, पण ईश्वरवादाचा (theism) चा ओघ मात्र पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहात आल्यासारखा दिसतो. इतर धर्मांत सामान्यपणे दिसून येते त्याप्रमाणे, स्रष्टा आणि सृष्टी, पुरुषविशेष आणि प्रकृती, ईश्वर आणि मानव, अशा प्रकारच्या द्वैधीभावावर भारतीय धार्मिक-तात्त्वज्ञानिक संस्कृतीने फारसा भर दिलेला नाही. या निबंधाच्या प्रारंभीच्या भागात उल्लेखिलेले भारतीय परंपरेचे धर्मनिदेशितत्व ईश्वर आणि सृष्टी या द्वैधीभावाने सिद्ध झालेले नाही. त्या परंपरेची सारभूत धार्मिकता सिद्ध होते ती तिच्या या वैशिष्ट्यामुळे की, भारतीयांची समग्र-विचारसरणी आणि जीवनपद्धती आध्यात्मिक उत्कण्ठेने निदेशित केली गेली आहे, बौद्धिक कुतूहलाने किंवा शारीरिक गरजांनी नव्हे.

### भारत-पश्चिम-संपर्क

माझ्या निबंधाच्या या भागाची व्याप्ती अगदी मर्यादित आहे. भारत आणि

पाश्चात्त्य जग यांच्यामधील संपर्काचे थोडक्यात व वस्तुनिष्ठ रीतीने ऐतिहासिक सर्वेक्षण करणे, आणि भारतीय जीवनाच्या काही अंगांवर पडलेल्या पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाचे दिग्दर्शन करणे एवढेच मला येथे अभिप्रेत आहे.५

या विषयासंबंधी सामान्यत: दोन आत्यंतिक मते पुढे मांडली गेली आहेत. एका बाजूला असे सुचविले गेले आहे की, आपल्या इतिहासाच्या क्रमात भारतीय लोक बव्हंशी विविक्त अवस्थेत राहिले व त्याच अवस्थेत त्यांनी आपली सभ्यता ( civilisation ) विकसित केली. भारत आणि परकीय देश यांच्यामध्ये भरीव स्वरूपाचे संबंध निर्माण झाले नाहीत, आणि जे काही संबंध निर्माण झाले त्यांचा भारताच्या सांस्कृतिक विकासावर फारसा अर्थपूर्ण प्रभाव पडला नाही. त्याच्या उलट, असेही मत पुढे मांडले गेले आहे की, भारताची मूळची देश्य संस्कृती निकृष्ट व आदिम स्वरूपाची होती, आणि तथाकथित भारतीय संस्कृतीत जे जे काही उत्कृष्ट, उदात्त, व उन्नत आहे ते सर्व पश्चिमेचे ऋण आहे. भारताची खरी सभ्यता म्हणजे भारताशी झालेल्या मॅसिडोनियन आणि अॅकेमिनियन संपर्काची केवळ उपनिर्मिती आहे. अर्थात, ही दोन्ही मते उघड उघड अस्वीकार्य आहेत.इतिहासाने हे स्पष्टपणे दाखविले आहे की, भारत आणि पाश्चात्त्य जग यांच्यामध्ये कमीअधिक प्रमाणात अखंडित असा संपर्क फार प्राचीन कालापासून अस्तित्वात आहे, आणि भारतीय संस्कृती व पाश्चात्त्य संस्कृती यांनी परस्परांवर निरनिराळ्या रीतींनी चांगला-वाईट परिणाम घडविलेला आहे. संस्कृती म्हणजे एक जिवंत रचना आहे, आणि दोन किंवा अधिक संस्कृतींचा जेव्हां संपर्क घडून येतो,त्या वेळी त्यांची परस्परांवर अर्थपूर्ण रीतीने क्रिया-प्रतिक्रिया झाल्यावाचून राहात नाही.'अपरिवर्तनशील पूर्व (Unchanging East) ही कल्पना पुराणकथास्वरूपी आहे. वरवर पाहणारास पौरस्त्य संस्कृतिसंकुल स्थितिशील असल्यासारखे वाटत असेल, पण खोलवर विचार केल्यास ते लक्षणीय रीतीने गतिशील आहे, असेच आढळून येईल. वर उल्लेखिलेले दुसरे मत पक्षपाती आणि विशिष्टहेतुप्रवण आहे. अनेक युरोपीय इतिहासकारांचा, आणि त्यांच्या प्रभावाखाली आलेल्या विद्वानांचा, असा विश्वास होता की, युरोप हेच खऱ्या संस्कृतीच्या उद्गमाचे आणि विकासाचे स्थल आहे आणि म्हणून युरोप हाच एक इतिहासाचा योग्य विषय होऊ शकतो. परिणामत:, त्या इतिहासकारांनी पौरस्त्य संस्कृतीच्या इतिहासाचे परिशीलन करण्याचे समजून-उमजून टाळले. भारतीय नाट्य, कला, वैद्यक, इत्यादिकांचा उगम ग्रीक विचारस्त्रोतात शोधावयास पाहिजे, हे काही काळापूर्वी विद्वानांत प्रसृत असलेले मत म्हणज पाश्चात्य मनाने निर्मिलेला अहंकेन्द्री आभास होता. खरे पाहिले तर, इतिहासाच्या क्रमात, भारतीय संस्कृती

५. प्रस्तुत संदर्भात 'पाश्चात्त्य संस्कृती' हे शब्दयुग्म युरोपियन संस्कृती या अर्थीच वापरण्यात आले आहे. अरब देश किंवा इस्लाम यांचा येथे विचार केलेला नाही.



१०३९४

व पाश्चात्त्य सस्कृती यांचा परस्परांवर अनक रीतींनी प्रभाव पडला आहे, असेच दिसून येईल.

एखाद्या संस्कृतीच्या दुसऱ्या संस्कृतीवर झालेल्या परिणामाची वस्तुस्थिती, स्वरूप, आणि व्याप्ती कशी निश्चित करता येते ? यासंबंधी साक्षात्, सुविनिर्दिष्ट, आणि असंदिग्ध पुरावा उपलब्ध होणे हे नेहमीच शक्य नसते. पुष्कळदा आपल्याला परिस्थितिजन्य आणि आनुमानिक पुराव्यावरच अवलंबून राहावे लागते. तसेच, एखाद्या संस्कृतीच्या दुसऱ्या संस्कृतीवर होणाऱ्या परिणामाचे विविध पैलू निश्चित शब्दांत पुढे मांडणे हे नेहमी शक्य होतेच असे नाही. या संबंधात एका गोष्टीचा कटाक्षाने उल्लेख करणे अवश्य आहे. दोन संस्कृतींमधील सादृश्ये किंवा साम्ये कितीही ठळक असली, तरी ती एका संस्कृतीच्या दुसऱ्या संस्कृतीवरील परिणामाची निश्चित कसोटी म्हणून नेहमीच समजता येणार नाहीत. सादृश्ये अभावित असू शकतात. दोन वेगळ्या बुंध्यांपासून फुटणाऱ्या उपशाखा अनेकदा आकस्मिकतया एकमेकांच्या अगदी जवळ आल्याचे आपण पाहतो. एकमेकांशी सदृश अशा विचारप्रणाली व आचारपद्धती स्वतंत्रपणे दोन वेगळ्या क्षेत्रांत विकास पावणे असंभवनीय नाही. सारख्या पृष्ठभूमीवर मानवी बुद्धीला सोडवाव्या लागणाऱ्या सारख्या समस्या स्वतंत्रपणे सारखे परिणाम घडवू शकतात. असे सदृश दिसणारे सांस्कृतिक विकासक्रम वास्तविकतया समांतर असतात. शिवाय, अशा अनेक सादृश्यांचे कारण दोन संस्कृतींचा साक्षात् संबंध हे नसून त्या दोन्ही संस्कृतींवर झालेला तिसऱ्या एका संस्कृतीचा परिणाम, हेही असू शकते. येथे हेही लक्षात घ्यावयास पाहिजे की, काही सादृश्ये केवळ भासमान व वरवरची असतात. सदृश अशी भासणारी संकल्पने वास्तविकतया अगदी विभिन्न संदर्भात आणि विभिन्न पातळींवर निर्माण झालेली असतात. उदाहरणार्थ, भारताचा वैश्विक अ-व्यक्तिवाद हा पाश्चात्त्य देशांतील आधुनिक समूहवादी किंवा समाजवादी अ-व्यक्तिवादाशी खरोखर सदृश आहे असे मुळीच मानता येणार नाही. तसेच, प्राचीन भारतीय ऋषींनी आपल्या परिकल्पनांत आधुनिक विज्ञानाची काही प्रमेये–उदाहरणार्थ, सृष्टीच्या प्रारंभापासून हल्लीच्या युगापर्यंतची असंख्य वर्षे, मानवाच्या जगाच्या बाहेर अस्तित्वात असलेली अनंत जगे, अणूयेवढ्या अवकाशांतील अनंत विश्वे–प्रत्याशित केली होती, असे म्हणणे असमर्थनीय ठरेल. शेवटी हेही सांगावयास पाहिजे की, आंशिक सादृश्य नेहमीच फसवे असते.

तरी पण आपल्या प्रस्तुतच्या प्रयोजनासाठी काही व्यवहार्य अभिलक्षणे ( criteria ) आपल्याला पुढे मांडता येतील. भारतीय विचारसरणी व जीवनपद्धती सारत पारंपरिक स्वरूपाची आहे. मौलिक विचार असलेल्या भारतीय विचारवंतांना देखील आपल्या विचारांच्या मौलिकतेचे विमर्शपूर्वक प्रपादन करावयास

संकोच वाटत आलेला आहे. आपले विचार मौलिक असले तरी ते पारंपरिक विचारांच्या आकृतिबंधात वसविण्याकडेच त्यांची सामान्यतः प्रवृत्ती होती. म्हणून, भारताच्या पारंपरिक विचार-आचारांच्या आकृतिबंधाशी जे जे कांही अनुरूप किंवा अनुगुण नाही असे भासते, ते ते परकीय संस्कृतीच्या परिणामाचे निदर्शक आहे असे अनुमान करण्यास हरकत नाही. तसेच, एखाद्या विशिष्ट लेखकाचा किंवा संप्रदायाचा विशेष किंवा अनन्यसाधारण असा विचार–जो इतिहासाच्या क्रमात त्या लेखकाच्या किंवा संप्रदायाच्या पूर्वी सामान्यपणे अज्ञात किंवा अस्वीकृत होता आणि त्याच्यानंतरही जो तसाच राहिला–तोही परकीय संस्कृतीच्या परिणामाचा निदर्शक असण्याचा बराच संभव आहे. आणखी असेही गृहीत धरावयास हरकत नाही की, जीवनाच्या व विचाराच्या ज्या क्षेत्रात भारताने पुरेशी प्रगती केली नव्हती, त्याच क्षेत्रात त्याने परकीय संस्कृतीकडून ऋण घेतलेले असणार. तत्त्वज्ञान, धर्म, साहित्य, इत्यादी क्षेत्रांत असे ऋण घेतले असणे फारसे अपेक्षित नाही. या ठिकाणी आणखी एक गोष्ट लक्षात घेणे अवश्य आहे. एका संस्कृतीचा दुसऱ्या संस्कृतीवर झालेला परिणाम हा सामान्य स्वरूपाचा असेल, किंवा कमीअधिक प्रमाणात कायम स्वरूपाचा असेल, किंवा जीवनाच्या एखाद्या विशिष्ट अंगापुरता किंवा इतिहासाच्या एखाद्या कालखंडापुरता मर्यादित असेल. पाश्चात्त्य विचार आणि आदर्श विदेशीय असल्यामुळे परंपराशासित भारतात पुष्कळदा मूळ धरू शकले नाहीत, हेही विसरून चालणार नाही. पण, प्रस्तुत संस्कृति-ऋणाच्या संबंधात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय संस्कृतीवर दुसऱ्या संस्कृतींनी केलेल्या परिणामाच्या घटनेचे भारताच्या इतिहासाशी व सांस्कृतिक विकासाशी अनुरूप अशा रीतीने व तर्कशुद्ध पद्धतीने स्पष्टीकरण करता आले पाहिजे.

भारत आणि पश्चिम यांच्यामधील संपर्काच्या इतिहासातील पहिला महत्त्वाचा टप्पा म्हणजे सिन्धु-संस्कृतीचा (जिला हल्ली हराप्पा-संस्कृती असे नामाभिधान सामान्यतः देण्यात येते तिचा) पश्चिम आशियातील समकालीन संस्कृतीशी असलेला सुव्यक्त संबंध. ख्रिस्तपूर्व चवथ्या व तिसऱ्या सहस्रकांत भूमध्यसमुद्रापासून सिंधुनदापर्यंत अनेक दृष्टींनी एकरूप असलेले असे एक संस्कृति-संकुल पसरलेले होते, असे मानावयास बराच पुरावा आता उपलब्ध झाला आहे. काही कालानंतर, युरो-भारतीय भाषा बोलणाऱ्या मानवांच्या काही टोळ्यांनी–ज्यांना लौकिक रीत्या वैदिक आर्य ही संज्ञा देण्यात येते त्यांनी–पश्चिमेकडून व उत्तरेकडून भारताच्या वायव्य प्रदेशात प्रवेश केला. या वैदिक आर्यांनी आपली विशिष्ट भाषा, धर्म, आणि संस्कृती आपल्याबरोबर आणली होती. आणि ही तिन्ही उत्तरकालीन भारतीय संस्कृतीच्या घडणीत व विकासात अतिशय मूलभूतपणे क्रियान्वित झाली आहेत. वेदात आढळून येणारे बॅबिलोनियन व खाल्डियन भाषांतील शब्द अगदी

विरळ असले तरी भारत आणि बॅबिलोन व खाल्डिया यांमधील कसल्या तरी प्रकारच्या संबंधाचे द्योतक आहेत असेच म्हणावे लागते. प्राचीन द्राविड भाषा व संस्कृती अनातोलिया, आर्मेनिया, व इराण येथील इतिहासपूर्व संस्कृतीशी संशयातीत सजातीयता दर्शवितात, असेही मत आता पुढे मांडण्यात आले आहे. काही कालापूर्वी ज्या प्रदेशास आशिया मायनर असे म्हणत असत, त्या प्रदेशातील लिसियन लोकांनी आपल्या कोरीव लेखांत स्वतःला उद्देशून त्रिम्‌लाई हा शब्द उपयोजिला आहे. तो शब्द द्रामिल किंवा तमिल या शब्दाशी संवद्ध आहे, असे धृष्टानुमान करणे शक्य आहे. त्या प्रदेशांतील अनेक प्राचीन स्थलनामे द्राविड भाषांतील रूपांची आठवण करून देतात. तसेच, हुरियन व कासाइट या त्या प्रदेशांतील प्राचीन भाषाही पूर्वद्राविड भाषांशी संबद्ध आहेत. पश्चिम आशिया व दक्षिण भारत यांमधील या भाषिक साम्यास त्या भूविभागातील सांस्कृतिक संबंधाच्या इतर प्रत्यक्ष पुराव्याने पुष्टीच मिळते. आणखीही एक अधिक साक्षात् पुरावा उपलब्ध आहे. तो म्हणजे भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्यावरील लेव्हांट प्रदेशातील फोनिशियन लोक आणि दक्षिण व पश्चिम भारतातील व्यापारी यांच्यामध्ये ख्रिस्तपूर्व ९७५ च्या सुमारास जोरात चालू असलेला व्यापार.

परंतु, भारत आणि ग्रीस या दोन देशांमधील संपर्काचा कालखंड प्रस्तुत निबंधाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा मानावयास पाहिजे. या संदर्भात मी ग्रीस हा शब्द प्रत्यक्ष ग्रीस आणि आशिया मायनर, इजिप्त, इटली, व सिसिली येथील ग्रीक वसाहती या व्यापक अर्थाने वापरला आहे, तर भारत हा शब्द सिन्धुमातृक प्रदेश या मर्यादित अर्थाने वापरला आहे. भारत-ग्रीस-संपर्काच्या इतिहासाच्या पहिल्या भागात पर्शियन साम्राज्य हा भारत आणि ग्रीस यांमधील संबंधक दुवा होता. ख्रिस्तपूर्व ५१० च्या सुमारास पर्शियन सम्राट दरायस याने स्कायलाक्स नावाच्या एका ग्रीक भाडोत्याची सिन्धुनदातून त्या नदाच्या मुखापर्यंत जाण्यासाठी योजना केली होती, असा ऐतिहासिक उल्लेख उपलब्ध आहे. प्रख्यात ग्रीक इतिहासकार हेरोडोटस (जन्म : ख्रिस्तपूर्व ४८४) याने भारताविषयी जी महत्त्वाची माहिती आपल्या ग्रंथात दिली आहे ती स्कायलाक्सच्या साहसी प्रवासाच्या वृतान्तावर आधारली असणे असंभवनीय नाही. ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकाच्या प्रारंभी क्तेसिआस या दुसऱ्या एका ग्रीकाने भारतात प्रवास केला, आणि त्या देशाबद्दल पुष्कळसे लिखाणही केले. पण ते सर्व लिखाण सामान्यपणे अचिकित्सक आहे, असे म्हणावयास पाहिजे. दरायसच्या कालापूर्वीही भारताचा ग्रीकांशी परिचय असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, ख्रिस्तपूर्व सातव्या शतकाच्या सुमारास पाणिनीने यवनांच्या, म्हणजेच आयोनियन ग्रीकांच्या, लिपीचा उल्लेख केलेला आहे. अरिस्टोक्सेनुस (ख्रिस्तपूर्व ३३०) याच्याकडून प्रवर्तित झालेली पुढील ऐतिहासिक परंपरा युसेबियस याने निवेदिली आहे. एक भारतीय

पण्डित अथेन्सला गेला होता व तेथे त्याचे सॉक्रेटिसशी प्रत्यक्ष संभाषणही झाले होते. "आपण हल्ली कोणत्या कामात व्यापृत आहात," असे त्या पण्डिताने सॉक्रेटिसास विचारले. मानवी जीवनाविषयी अन्वेषण करणे हे आपले प्रधान कार्य आहे, असे सॉक्रेटिसाने उत्तर दिल्यावर तो भारतीय पण्डित थोडे स्मित करून उद्गारला "ईश्वरी घटनांचे नीट आकलन झाल्याखेरीज मानवी घटनांचे आकलन कुणाला आणि कसे होणार ?" भारत आणि पाश्चात्त्य जग यांमधील संबंध अधिक खोल व व्यापक होण्यास अलेक्झांडरचा सिन्धुप्रदेशांतील हल्ला कारणीभूत ठरला, असे सामान्यपणे मानले जाते. पण, भारताच्या सांस्कृतिक इतिहासावर मात्र त्या हल्ल्याने फारशी अर्थपूर्ण निशाणी उमटविल्याचे दिसून येत नाही. बॅक्ट्रियाचा ग्रीक राजा डेमिट्रियस याने ख्रिस्तपूर्व १९० साली हिंदुकुश ओलांडला, आणि तेव्हापासूनच ग्रीकांच्या भारतांतील अनधिप्रवेशास खरा प्रारंभ झाला. आणि, त्या प्रदेशातील ग्रीक संस्थानांची सत्ता संपुष्टात आल्यावरही, ग्रीक-संस्कृति-प्रभावित शक, पार्थियन, आणि कुषाण (ख्रिस्तपूर्व दुसरे शतक ते ख्रिस्तशकाचे पहिले शतक) यांच्या द्वारा भारतावर होणारा ग्रीक संस्कृतीचा परिणाम चालूच राहिला.

ख्रिस्ती शकाच्या पहिल्या काही शतकांत, अलेक्झांड्रिया हे एक सार्वराष्ट्रीय संस्कृति-केंद्र बनले होते. अशी एक वाङ्मयीन परंपरा आहे की, अलेक्झांड्रियाच्या नागरिकांनी भृगुकच्छ (भडोच) येथील एका बौद्ध भिक्षूचा फार मोठा सन्मान केला होता व ज्या निष्ठेने त्यांनी सेंट पॉलचे प्रवचन श्रवण केले असते त्याच निष्ठेने त्यांनी त्या भिक्षूचेही प्रवचन श्रवण केले होते. रोमन साम्राज्य व दक्षिण भारत यांमधील द्रुत व्यापारी व इतर संबंधांविषयीही स्पष्ट पुरावा उपलब्ध आहे.[६] काही भारतीय राजांनी रोमच्या दरबारात आपले दूत पाठविले होते. आणि कन्नानोर, मदुरा, इत्यादी ठिकाणी रोमन लोकांच्या वेगळ्या वसाहतीही स्थापन झाल्या होत्या. याच कालखंडात ख्रिस्तीधर्माने भारतात चंचुप्रवेश केला, पण त्या धर्माचा भारतीय विचारसरणीवर आणि जीवनपद्धतीवर फारसा मूलगामी प्रभाव पडला असल्याचे दिसून येत नाही. मार्को पोलोचे आपल्या भारतीय प्रवासाचे वृत्तांत ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे आहेत यांत शंका नाही. पण स्थूलपणे असे म्हणता येईल की, मध्ययुगात भारत आणि पश्चिम यांमधील सांस्कृतिक संपर्कास काही अंशी ओहोटीच लागली होती.

२० मे १४९८ रोजी पोर्तुगीज साहसी वास्को डी गामा जलमार्गाने कालिकत येथे पोचला, आणि तेव्हापासून भारत आणि पश्चिम यांमधील संपर्काच्या इतिहासाचा आधुनिक कालखंड सुरू झाला. अर्थात, या कालखंडातील भारत-इंग्लंड-संबंधाचा

६. अलीकडील काही वर्षांत दक्षिण भारतातील अरिकमेडु इत्यादी ठिकाणी करण्यात आलेल्या पुरातत्त्वशास्त्रीय उत्खननांचा या संदर्भात उल्लेख करता येईल.

.विचारच आपल्याला विशेषत्वाने अभिप्रेत आहे.

भारत-पश्चिम-संपर्काच्या इतिहासाचे चार मुख्य कालखंड मी वर नमूद केले आहेत. पण या निबंधात फक्त शेवटच्या तीन कालखंडांचाच मी विचार करणार आहे. भारत आणि ग्रीस यांच्या संबंधाचा विचार केल्यास असे म्हणता येईल की, अलेक्झांडरच्या मोहिमेपूर्वी विचारांचा प्रवाह पूर्वेकडून वाहात आला होता. भारतीय विचारसरणीचा ग्रीक तत्त्वचिन्तकांवर बराच प्रभाव पडला होता, असे निश्चित विधान करता येण्याइतपत प्रत्यक्ष पुरावा जरी आज मिळत नसला, तरी तो तसा पडला असण्याची संभवनीयता मात्र फार मोठी आहे. कालगणना आणि ऐतिहासिक दृष्टचा निदर्शनीय असे संबंध वर उल्लेखिलेल्या प्रभावाच्या अभ्युपगमाला पुष्टीच देतात. विश्वाचे मूलतत्त्व पाणी आहे असा सिद्धान्त ग्रीक तत्त्वज्ञानाचा जनक थेल्स याने पुढे मांडला आहे. या सिद्धान्ताच्या बाबतीत त्याच्यावर आद्यजलासंबंधीच्या वैदिक संकल्पनाचा प्रभाव पडला असणे अगदीच असंभवनीय नाही. तसेच, एक आणि अद्वितीय सत् हेच घाटनिक बहुत्वाच्या मुळाशी आहे, या उपनिषदांच्या शिकवणीतून एलिआटिक तत्त्वज्ञान-संप्रदायाच्या परिकल्पनांचा उद्‌गम झाला, असेही धृष्टानुमान करता येण्यासारखे आहे. पिथॅगोरसने पुढे मांडलेल्या धार्मिक-तात्त्वज्ञानिक आणि गणितशास्त्रीय उपपत्ती ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या सुमारास अगोदरच भारतात-ज्ञात होत्या. पिथॅगोरसने खूप प्रवास केला होता व त्यामुळे त्याचा इतर विचार. प्रणालींबरोबर ब्राह्मणांच्या (म्हणजेच भारतीय विद्वानांच्या) विचारप्रणालीशीही परिचय झाला होता, असे त्याच्या चरित्रकाराने नमूद केलेले आहे. ऑर्फिक संप्रदायाची भारताच्या सर्वातीतवादी तत्त्वज्ञानाशी ( transcendental philosophy शी) असलेली सजातीयता स्वत:सिद्ध आहे, आणि या बाबतीत ग्रीसच भारताचा ऋणी होता, याविषयी शंकेला जागा नाही. एका बाजूला नवप्लेटोवाद आणि दुसऱ्या बाजूल वेदान्त, योग, व बौद्धदर्शन, यांच्यामधील संबंधाविषयीही असेच म्हणता येईल अलेक्झांड्रियाच्या क्लेमंटने तर असे स्पष्ट विधान केले आहे की, ग्रीकांनी आपले तत्त्वज्ञान रानटी लोकांकडून (म्हणजेच भारतीयांकडून) चोरले आहे. तत्त्वज्ञानाची मशागत प्रथम भारतात करण्यात आली आणि नंतर ते ग्रीसमध्ये आणले गेले, असा निर्वाळा देऊन लुसिअ.नुस (खिस्तीशकाचे दुसरे शतक) यानेही क्लेमंटच्या म्हणण्यास पुष्टी दिली आहे. 'नॉस्टिकांचा संप्रदाय म्हणजे ग्रीक मुखवटा चढविलेली प्राच्यविद्या आहे' असे नेहमी म्हटले जाते, त्याचाही प्रस्तुत संदर्भात उल्लेख करावयास हवा.

मी वर सुचविलेच आहे की, अलेक्झांडरच्या कालानंतर संस्कृतीच्या प्रवाहाची दिशा निश्चितपणे बदलली, असे दिसून येते. आता पाश्चात्त्य विचारप्रणाली व संस्कृती यांचा प्रभाव पूर्वेवर पडू लागला. भारताच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने, या

प्रभावाच्या काही पैलूंचे दिग्दर्शन येथे करावयाचे आहे.

'कौटिलीय अर्थशास्त्रा'त प्रतिबिंबित झालेल्या मौर्ययुगीन (ख्रिस्तपूर्व चवथे शतक) राज्यतंत्राचे काही गुणविशेष भारताच्या पारंपरिक राज्यशास्त्रीय विचारांशी विसदृश आहेत. पारंपरिक विचारानुसार, सामाजिक व राजकीय बाबतींतील उच्चतम अनुशास्ती ( sanction )'धर्म'कल्पनेत निहित झालेली होती. अन्तिम विश्लेषणांत 'ब्रह्म' किंवा आध्यात्मिक प्राधिकार (spiritual authority, ज्याचा प्रतिनिधी सामान्यत: ब्राह्मण पुरोहित होता)आणि 'क्षत्र'किंवा ऐहिक शक्ती (temporal power, जिचा प्रतिनिधी सामान्यत: क्षत्रिय राजा होता)ही दोन्ही धर्माची अनुसेवी असल्याचे- sacerdotium आणि regnum ही दोन्ही धर्माची केवळ उपकरणे असल्याचे– मानले जात होते. याच्या उलट, धर्म, दिवाणी व फौजदारी कायदा, रूढी, आणि राजानुशासन या प्राधिकाराच्या चार अधिकरणांपैकी प्रत्येक उत्तरवर्ती अधिकरण प्रत्येक पूर्ववर्ती अधिकरणापेक्षा बलवत्तर आहे, असे 'कौटिलीय अर्थशास्त्रा'ने प्रपादन केले आहे. राजाच्या प्राधिकाराचे असले निरुपाधिक उन्नयन प्राचीन भारतीय परंपरेला अपरिचित होते. तसेच, मौर्योत्तर कालखंडांत या कल्पनेचा सामान्यपणे स्वीकार करण्यात आला होता,असेही म्हणता येण्यासारखे नाही. ही कल्पना म्हणजे भारताच्या वैश्विक अ-व्यक्तिवादापासून एक प्रकारचे उत्पथगमनच आहे. म्हणून असे धृष्टानुमान करणे शक्य आहे की, कौटिल्याने निरपवाद राजसत्तेची आपली कल्पना ग्रीकांच्या आणि पर्शियनांच्या राज्यतंत्रीय कल्पनांपासून व आदर्शांपासून घेतली असावी. अलेक्झांडरच्या भारतातील मोहिमेनंतरच्या लगतच्या कालखंडात भारत पश्चिम-संपर्क अधिक निकटचा झाला होता, व त्यामुळे परस्परांमधील कल्पनांची देवाणघेवाण अधिक क्रियाशील व जोमदार झाली होती. आपण आपले राज्यशास्त्रीय-मंत्र व तंत्र पारंपरिक विचार (शास्त्र) आणि प्रत्यक्ष व्यवहारांत असलेल्या प्रथा (प्रयोग) यांवर आधारले आहेत, असे जेव्हा कौटिल्य म्हणतो तेव्हा त्याला अभिप्रेत असलेले प्रयोग म्हणजे ग्रीक व पर्शियन साम्राज्यांत प्रत्यक्ष व्यवहारात आणल्या गेलेल्या राजकीय प्रथाच होत्या, असे मानणे इतिहासदृष्ट्या अवास्तव ठरणार नाही.[७]

भारताच्या पारंपरिक राज्यशास्त्रीय आकृतिबंधाशी अनुरूप नसलेले कौटिल्याचे दुसरे एक प्रतिपादन म्हणजे केंद्रीकृत नियंत्रणाखालील अवाढव्य शासकीय नोकरशाहीच्या यंत्रणेविषयीचे. यासंबंधीची कौटिल्याची शिकवण मौर्य सम्राटांनी प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचा प्रयत्न केला होता. देशाच्या संपूर्ण सामाजिक व आर्थिक जीवनाचे नियोजन, नियंत्रण, व निदेशन करू पाहणारी मौर्य शासनसंस्था

७. या संदर्भात, आनुषंगिक रीत्या, स्टाइनच्या एका मताचा उल्लेख करावयास हरकत नाही. स्टाइनने असे सूचित केले आहे की, वर उल्लेखिलेल्या विषयावरील 'कौटिलीय अर्थशास्त्रा'-तील प्रकरण मिश्र स्वरूपाचे आहे आणि ते उत्तरकालीन रोमनसाम्राज्यविषयक पत्रव्यवहाराच्या अनुरोधाने पुनर्रचित करण्यात आले आहे.

लोकांच्या दैनंदिन व्यवहारात प्रत्यक्षपणे हस्तक्षेप करण्याच्या विरुद्ध असलेल्या पारंपरिक राजकीय प्रथेहून मूलभूतपणे विभिन्न होती. या बाबतीत कौटिल्याला ग्रीकांच्या प्रशासनविषयक संकल्पनांपासून स्फूर्ती मिळाली असली पाहिजे. रोस्टोव्हझेपने म्हटल्याप्रमाणे, प्रशासनाच्या अशा परमावधीच्या केन्द्रीकरणाच्या द्वारा चन्द्रगुप्त व कौटिल्य यांनी भारताचे जितके 'ग्रीकीकरण' केले होते, तितके डेमेट्रियस आणि मिनांडर यांनीही केले नाही.

ज्यात ग्रीक संस्कृतीचा प्रभाव अगदी स्पष्टपणे दिसतो, असे दुसरे क्षेत्र म्हणजे कला. गांधारकलेचे–जिला ग्रीक-बौद्ध ( Greaco-Buddhist ) कला असे अर्थपूर्ण नाव देण्यात आले आहे तिचे–विषय बौद्ध आहेत, पण तिची निष्पादनशैली निःसंशय ग्रीक आहे. या कलेचा पुरस्कार झाला तो वायव्य प्रदेशातील ग्रीकांचे प्रत्यक्ष वर्चस्व संपुष्टात आल्यावर; पण या कलेला खरा आश्रय मिळाला तो आपल्या ग्रीक पूर्वाधिकाऱ्यांची परंपरा ज्यांनी पुढे चालू ठेविली होती, त्या शक-कुषाण राजांकडून. भारतीयांची वैश्विक अ-व्यक्तिवादी वृत्ती व्यक्तींच्या विविक्त शिल्पांना फारशी पोषक नव्हती. भारतीयांची धर्मनिदेशित परंपरा आणि ग्रीकांची सौन्दर्यदृष्टिनिदेशित परंपरा या दोहींच्या संगमातून कलेचा हा अत्यंत उदात्त व सर्जनशील संप्रदाय उद्भूत झाला, असे म्हणावयास पाहिजे. अर्थात, येथे हेही सांगितले पाहिजे की, गांधारकलेचे नंतरचे नमुने सहानुभूती, प्रामाणिकता, व उत्स्फूर्ती यांचा अभावच दर्शवितात. शिल्पकृतींचे यांत्रिक पुंज-उत्पादन करण्याकडे कलाकार अधिक प्रवृत्त झाले. अशा प्रकारची यांत्रिक प्रवृत्ती व दृष्टिकोन हेही पाश्चात्यांच्या प्रभावाच्या परिणामाचेच एक रूप असावे.

प्राचीन भारतीय नाण्यांवर झालेला पाश्चात्य जगाचा प्रभावही अगदी डोळ्यात भरण्यासारखा आहे. भारताला पूर्वी अपरिचित असलेल्या नाण्यांचा एक प्रकार बॅक्ट्रियातील ग्रीकांनी प्रचारात आणला. या नाण्यांवर राजांची नावे व आकृती कोरली होती. अर्थात, हा पश्चिमेच्या मानवकेन्द्री विचारसरणीचाच परिणाम होता. ही नवीन नाणी ग्रीक-संस्कृति-प्रभावित होती, हे दोन गोष्टींवरून स्पष्ट होते. पहिली गोष्ट म्हणजे, यांपैकी काही नाण्यांवर राजांच्या प्रतिकृतींऐवजी ग्रीक देवतांच्या प्रतिकृती उत्कीर्ण केलेल्या आहेत; आणि दुसरी गोष्ट म्हणजे, यांपैकी काही नाण्यांना दिलेली दीनार आणि दम्म ही नावे म्हणजे Dinarius आणि Drachma या ग्रीक शब्दांची उघड रूपान्तरे आहेत. नवीन नाण्यांचे आकार, रूप, व वजन या बाबतींतील मानकीकरण–जे आधीच्या कालखंडांत भारतात जवळजवळ अज्ञात होते–हाही परकीय प्रभावाचा परिणाम असला पाहिजे.

ग्रीक व रोमन विचारप्रणालींनी प्रभावित झालेले भारतीय ज्ञानाचे आणखी एक अंग म्हणजे ज्योतिषशास्त्र. या संबंधात वराहमिहिराने व्यक्त केलेले मत विशेष-

त्वाने अर्थपूर्ण आहे. ख्रिस्ती शकाच्या पाचव्या-सहाव्या शतकातील हा ग्रंथकार म्हणतो :–

> म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम् ।
> ऋषिवत्तेऽपि पूज्याः स्युः किं पुनर्दैवविद्द्विजाः ।। [८]

वराहमिहिराच्या पूर्वीच्या एका ज्योतिर्विदानेही ग्रीक विद्वानांची तोंड भरून प्रशंसा केली असल्याचे अल्बेरुणीने नमूद केले आहे. वास्तविक, ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या शतकातच निरनिराळ्या शास्त्रांतील ग्रीक व रोमन ज्ञानाचा प्रभाव भारतातील विद्वन्मंडळात परिणामकारक रीतीने जाणवू लागला होता. भारतीय ज्योतिषशास्त्राच्या पाच प्रमुख संप्रदायांपैकी दोहोंची नांवे, रोमशी संबद्ध असे 'रोमक' आणि अलेक्झांड्रियाच्या पॉलशी (ख्रिस्ती शक ३७८) संबद्ध असलेले 'पौलिश', अशी असावीत यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

अगोदरच्या कालखंडांत त्रोटक व प्रासंगिक स्वरूपाचे असलेले भारत-पश्चिम-संबंध अलीकडील काळात निश्चितपणे स्थिर आणि स्थायी झाले आहेत. त्यामुळे, अर्थातच, भारतीय विचारसरणीवरील व जीवनपद्धतीवरील पाश्चात्त्य जगाचा प्रभावही आधुनिक कालात अधिक व्यापक व खोल ठरला गेला आहे. या संदर्भात, गेल्या दोन-अडीचशे वर्षांत निष्पन्न झालेल्या भारत-ब्रिटन-संपर्काचा विचारच आपल्याला येथे मुख्यतः अभिप्रेत आहे. या संपर्काचे काही गुणविशेष पुढीलप्रमाणे निर्देशित करता येतील. प्रारंभीच हे सांगावयास पाहिजे की, भारतातील ब्रिटिश प्रभावाचे व्यापारण वरून खाली असे झाले आहे. सर्वसाधारण भारतीय जनता, निदान भारत-ब्रिटन-संपर्काच्या सुरवातीच्या अवस्थांत तरी, त्या प्रभावाने जवळ जवळ अस्पृष्ट अशीच राहिली. त्यामुळे तो प्रभाव वरवरचा असाच ठरला गेला. भारतात पहिल्या पहिल्यांदा आलेल्या युरोपियनांच्या वृत्तीकडेही या संबंधात लक्ष वेधावयास हवे. त्या लोकांची प्रवृत्ती प्राधान्याने भाडोत्री व साहसी स्वरूपाची होती.भारताकडे ते पाहात असत ते केवळ पिळवणूक करण्यास योग्य अशी वसाहत (colonie d' exploitation) या दृष्टीने, कायम वसती करण्यास योग्य असा देश (colonie de penplement) या दृष्टीने नव्हे. या बाबतीत ते लोक, प्राचीन काळी आग्नेय आशियातील निरनिराळ्या प्रदेशांत ज्यांनी वसाहती केल्या होत्या त्या भारतीयांहून, अत्यंत भिन्न होते. एक तर, प्राचीन भारतीयांच्या या वसाहतींचा मूळ भारताशी राजकीय दृष्ट्या जवळ जवळ काहीच संबंध नव्हता; आणि दुसरे असे की, त्या भारतीय वसाहतकारांनी आपल्या मूळच्या देशाप्रीत्यर्थ या निरनिराळ्या प्रदेशांचे आर्थिक शोषण करण्याची कल्पना मनात कधीच बाळगली नाही. उलटपक्षी, या वसाहती स्वतःच भारताच्या स्वतंत्र लघू प्रतिकृती बनल्या.

---

८. बृहत्संहिता २.१४

प्रथमकालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांची भारतीयांबद्दलची वृत्ती वांशिक श्रेष्ठतेच्या आणि सर्व भारतीय गोष्टींविषयीच्या तुच्छतेच्या भावनांनी शासित झाली होती. भारताच्या किंबहुना–समग्र पूर्वेच्या–सांस्कृतिक रिक्थासंबंधीचे त्यांचे अज्ञान दयनीय होते. अशा प्रकारच्या वांशिक व सांस्कृतिक औद्धत्याचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणजे मेकॉले ! अर्थात, अशा परिस्थितीत सांस्कृतिक देवाण-घेवाणाची प्रक्रिया निरोधित होणे साहजिकच होते. तरी पण, या ठिकाणी, पाश्चात्त्य प्राच्यविद्याविशारदांना कृतज्ञतापूर्वक आदरांजली वाहणे अवश्य आहे. आपल्या विविध प्रकारच्या संशोधनाच्या द्वारा, भारताची कला, तत्त्वज्ञान, व साहित्य यांविषयी खोल, व्यापक, आणि सहानुभूतिपूर्ण ज्ञान उपलब्ध करून देऊन त्यांनी प्रशंसनीय कामगिरी बजावली आहे प्रत्यक्ष व्यवहारात मात्र या प्राच्यविद्याविशारदांचा प्रभाव सामान्यपणे मर्यादित स्वरूपाचाच ठरला. एवंच, स्थूलपणे असे म्हणता येईल की, भारतीय लोक व इंग्रज यांच्यामधील संपर्काच्या पहिल्या-पहिल्या वर्षात अर्थपूर्ण फलनिष्पत्ती जवळजवळ काहीच झाली नाही. खरे पाहिले तर, त्या काळात, किंवा नंतरही, इंग्रज लोकांनी–त्यांना तशी संधी प्राप्त झाली असतानाही–एखादी नवीन संस्कृती, एक प्रकारची आंग्लभारती सभ्यता, विकसित करण्याचा कधी प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. त्या काळात भारताने पश्चिमेकडून जे जे प्राप्त करून घेतले ते सर्व आपल्या स्वत:च्या उपक्रमशीलतेने-

भारतीय संस्कृतीवरील इंग्रजांच्या प्रभावाचा विचार करताना एक गोष्ट विशेषत्वाने लक्षात घ्यावयास पाहिजे. ती ही की, भारतीय परंपरेची स्वधा (ethos) पाश्चात्त्य परंपरेच्या स्वधेहून मूलत:च भिन्न आहे. भारतीयांची वृत्ती व जीवनाच्या निरनिराळ्या समस्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन आणि पाश्चात्त्यांची वृत्ती व जीवनाच्या समस्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन यांमधील वैधर्म्याचे विवेचन मी वर केलेलेच आहे. या मूलभूत वैधर्म्यामुळे पाश्चात्त्य सभ्यतेच्या अनेक गुणविशेषांचे यथार्थ आकलन भारतीय मनाला होऊ शकले नाही. पाश्चात्त्य सभ्यता सारत: विदेश्यच राहिली–ती भारताच्या भूमीत मूळ धरू शकली नाही.

आधुनिक काळातील पाश्चात्त्य संस्कृतीच्या आघातासंबंधीची भारतीयांची प्रतिक्रिया मुख्यत: चार रीतींनी अभिव्यक्त झाली आहे. काही भारतीय पाश्चात्त्य विचारसरणीने व जीवनपद्धतीने अक्षरश: दिपून गेले. त्यांच्या संपूर्ण जीवनदृष्टीचे जणू काही पाश्चात्त्यीकरण झाले–इतके की, त्या लोकांच्या मनात भारतीय परंपरेविषयी घृणा, किंबहुना विद्रोहवृत्ती, निर्माण झाली. नवीन धर्मान्तरितांप्रमाणे, पाश्चात्त्य विचार व जीवन यांकडे नव्याने परिवर्तित झालेले हे भारतीय खुद्द पाश्चात्त्यांपेक्षाही अधिक पश्चिमवेडे झाले. ही एक पराकोटी झाली. दुसरी पराकोटी म्हणजे जे जे काही परकीय आहे ते ते सर्वथैव त्याज्य आहे असे अट्टाहासाने प्रतिपादन करणारांची. या लोकांचा असा दृढ विश्वास होता की, पारंपरिक भारतीय संस्कृती-

पेक्षा अधिक संपन्न व अधिक उदात्त अशी दुसरी संस्कृतीच अस्तित्वात नव्हती व नाही. त्यांच्या मते, पाश्चात्त्य विचारसरणीचा व जीवनपद्धतीचा स्वीकार करण्याकडे ज्यांचा थोडासा का होईना कल आहे, ते भारतीय आपल्या देशाच्या प्रणाशाचीच पूर्वतयारी करीत आहेत. ही त्यांची प्रतिक्रिया म्हणजे विकासविरोधाचेच एक रूप होते. परकीयत्वाच्या अगदी पुसटशा वासानेही हे विकासविरोधी लोक स्वत:ला आपल्या प्राचीन परंपरेच्या कोशात गुरफटून घेण्यास उद्युक्त होत असत. पाश्चात्त्य संस्कृतीच्या भारतावरील आघाताची तिसरी प्रतिक्रिया प्राप्त परिस्थितीपुढे स्वत्व-निवृत्तीची ( resignation ची ) होती. लोकांचा असा एक वर्ग होता– आणि बहुसंख्य भारतीय याच वर्गात मोडत असत, असे म्हणावयास हरकत नाही–की, जो या बाबतीत जवळ जवळ उदासीन होता. जशा घटना घडून येतील तसा त्यांचा क्रियाशून्यतेने स्वीकार करावयाचा, अशी या वर्गाची वृत्ती होती. त्या घटनांना काही भावरूप निदेशन द्यावयाचे किंवा त्यांना विरोध करावयाचा यांपैकी कोणत्याच गोष्टीने या वर्गातील लोकांनी आपल्या डोक्यांस त्रास करून घेतला नाही. नूतन-शिक्षित मध्यमवर्गीयांपैकी काही विचारवंतांना मात्र पौरस्त्य आणि पाश्चात्त्य संस्कृतींच्या फलदायी समन्वयाच्या शक्यतेची तीव्र जाणीव झाली. या समन्वयात दोहींपैकी कोणत्या संस्कृतीवर विशेष भर द्यावयाचा, याविषयी या विचारवंतांमध्ये मतभेद होते यात शंका नाही. पण सामान्यपणे असे म्हणता येईल की, जिचा आत्मा भारतीय आहे पण रूप आणि अभिव्यक्ती पाश्चात्य आहेत अशी एक नवीन संस्कृती विकसित करण्याबद्दल त्यांच्यांत मतैक्य होते. त्यांना अशीही आशा वाटू लागली होती की, या जिवंत व गतिशील समन्वयाचे फलित म्हणून पाश्चात्त्य जेत्यांनी उपलब्ध करून दिलेल्या वैचारिक आणि भौतिक साधनोपकरणांनीच आपल्याला त्यांच्यावर मात करता येईल.

भारतीय जीवनावरील इंग्रजांच्या प्रभावाच्या प्रत्यक्ष परिणामांपैकी काहींचा येथे उल्लेख करणे प्रस्तुत ठरेल. इंग्रजांच्या आमदानीत, १८५७ साली, कलकत्ता, मुंबई, आणि मद्रास येथे विद्यापीठांची स्थापना झाली, व, अशा रीतीने, भारतात प्रथमच लिंग, जाती, व धर्मपंथ यांच्या निरपेक्षतेने सर्व भारतीयांना ज्ञानाची द्वारे खुली केली गेली. उदाहरणार्थ, भारतीय संस्कृतीची खरी भाषा जी संस्कृत तिच्या अध्ययनाची संधी तेव्हापर्यंत काही विशिष्ट वर्गांपुरतीच सामान्यत: मर्यादित होती; ती आता माध्यमिक पाठशाळांत व विद्यापीठांत सर्वांना सहजप्राप्य झाली. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हा, खरोखरच, भारतात एक अपूर्व प्रयोग होता. नवीन शिक्षणाचे विषय व पद्धती हीही इंग्रजांकडूनच घेतलेली होती. पारंपरिक स्वीकार-वृत्तीच्या ( attitude of acceptance च्या ) ऐवजी विद्यार्थ्यांत परिप्रश्नवृत्ती (attitude of inquiry) निर्माण करावयाची, हे शिक्षणाचे ध्येय आता मान्य करण्यात आले होते. प्राचीन

ग्रंथांचा पांक्त अभ्यास कितीही सखोल झाला तरी तो परिणामी स्थितिशील आणि अनुत्पादकच ठरतो. म्हणून, पाश्चात्त्यांकडून घेतलेल्या त्यांच्या चिकित्सक, तौलनिक, व ऐतिहासिक अध्ययनपद्धतीच्या द्वारा निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासास व्यापक, गतिशील, व फलदायी स्वरूप देण्याचे प्रयत्न करण्यात आले. परिणामतः, नवीन निर्माण होणारे शास्त्रीय साहित्य केवळ निर्वचनात्मक असणार नाही, तर ते सर्जनशीलही होईल, याकडे कटाक्षाने लक्ष पुरविण्यात येऊ लागले. शिक्षणाचे ध्येय, आतापर्यंत सामान्यपणे समजण्यात येत होते त्याप्रमाणे, केवळ क्षेमप्रधान म्हणजे परंपरागत ज्ञानाचे परिरक्षण करणे एवढेच असून चालणार नाही, तर ते योगप्रधानही म्हणजे अप्राप्त ज्ञानाची प्राप्ती आणि नवीन ज्ञानाची उत्पत्ती हेही असले पाहिजे, या गोष्टीचा वारंवार पुनरुच्चार करण्यात येऊ लागला. आणि या दृष्टीने पाठशालांच्या व विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत अनेक नवीन विषयांची भर घालण्यात आली.

लोकप्रशासनाच्या क्षेत्रात, मौर्यांच्यानंतर अनेक शतकांनी, ब्रिटिशांनी केन्द्रीकृत नियंत्रणाच्या अवाढव्य नोकरशाहीचा पुन्हा एकदा पुरस्कार केला. तरी पण या क्षेत्रातील ब्रिटिशांची सर्वांत लक्षणीय देन म्हणजे अखिल भारतीय सेवांची स्थापना आणि कायद्याच्या निरपवाद प्राधिकारावर व सार्वत्रिकतेवर दिला गेलेला भर. भारतास राजकीय दृष्ट्या एकजिनसीपणा प्राप्त करून देण्याच्या कामी या दोन गोष्टींचे फार मोठे साहाय्य झाले.

भारताची अर्थव्यवस्था मुख्यतः कृषिमूलक होती व आहेही. पण अलीकडील काही वर्षांत या देशात जी औद्योगिक क्रांती घडून आली आहे, तिचे कारण, निःसंशय, या देशाशी झालेल्या पाश्चात्त्य जगाच्या संपर्कातच शोधावे लागेल. पाश्चात्त्य जगाचा संपर्क आणि एकूण जागतिक परिस्थिती यांमुळे भारत आपल्या पारंपरिक अक्रियावादाच्या तन्द्रेतून आता खडबडून जागा झाला आहे. भारतीयांनी हे आता पुरेपूर जाणले आहे की, आपल्या देशाचे औद्योगिकीकरण झाल्याखेरीज राष्ट्रीय अस्तित्वासाठी करावयास लागणाऱ्या या नवीन जागतिक झगड्यात आपण टिकून राहू शकणार नाही, आणि पाश्चात्त्यांचे विज्ञान व तन्त्रविद्या आत्मसात केल्याशिवाय आपण आपल्या देशाचे औद्योगिकीकरण करू शकणार नाही. आपल्या पारंपरिक वृत्तीशी विधर्मी अशा रीतीने, भारताने आता आपल्या जनतेचे भौतिक जीवनमान उंचविण्याचा चंग बांधला आहे.

धर्माच्या क्षेत्रातील पाश्चात्त्यांच्या प्रभावाविषयी विचार करताना, भारतातील ख्रिस्ती धर्मप्रचारकांच्या धर्मान्तराच्या कार्याविषयी मी येथे चर्चा करणार नाही. तसेच, एका प्रकारची ख्रिस्ती-भारतीय सभ्यता निर्माण करण्यासाठी पोर्तुगिझांनी कळत न कळत केलेल्या पण अंती निष्फळ ठरलेल्या प्रयत्नांविषयीही मी येथे काही

लिहिणार नाही. या प्रभावाच्या दुसऱ्याच एका पैलूचा मला येथे उल्लेख करावयाचा आहे. पाश्चात्त्य जगाच्या आघाताने भारताचे पारंपरिक धार्मिक जीवन सामान्यपणे बाधित झाले नव्हते ही गोष्ट खरी. पण आधुनिक भारताच्या धार्मिक विचारप्रणालीवर, निदान काही स्तरांत तरी, पाश्चात्त्य विचारांचा प्रभाव सूक्ष्मपणे, पण निश्चितपणे, पडला असल्याचे आढळून येते. हा प्रभाव मुख्यत: तर्कसंगतीकरण, उदारीकरण, सार्वत्रिकीकरण, आणि क्रियाशीलीकरण या चार रूपांनी परिणामित झाला, असे म्हणता येईल. आधुनिक भारतीय विचारवंतांनी भारताच्या परंपरागत धार्मिक-तात्त्वज्ञानिक विचारांचा आणि आदर्शांचा, आधुनिक ज्ञान, विज्ञान, व आकांक्षा यांच्या अनुरोधाने, अभिनवाविष्कार करण्याचा, व अशा रीतीने पाश्चात्त्य बुद्धिमंतांच्या तसेच पाश्चात्त्यविद्याविभूषित भारतीय बुद्धिमंतांच्या बुद्धिवादी वृत्तीला आवाहन करण्याचा प्रयत्न केला. भारतीय धर्म म्हणजे अंधश्रद्धा व आदिम आचार यांचे असंस्कृत निकाय आहेत, ही सर्वसाधारण गैरसमजूत त्यांनी प्रथम दूर केली. एवढेच नव्हे तर, भारताची धार्मिक-तात्त्वज्ञानिक विचारप्रणाली आधुनिक जगाची सत्ताशास्त्रीय जिज्ञासा आणि आध्यात्मिक आर्तता या दोहींचे पर्याप्त समाधान करू शकेल, असाही दावा त्यांनी पुढे मांडला. स्वामी विवेकानंदांनी हेच केले; अर्थात, पाश्चात्त्यांकडून मिळालेल्या प्रेरणेमुळे. आणि राधाकृष्णन्‌ही हल्ली हेच करीत आहेत; आणि ते देखील, अर्थात, पाश्चात्त्यांकडूनच मिळालेल्या स्फूर्तीने. पाश्चात्त्य विचारांचा दुसरा परिणाम म्हणजे, भारतीय धर्मांना, विशेषत: हिंदुधर्माला, त्याच्या अन्यव्यावर्तकत्वापासून मुक्त करण्याचे, त्याच्या उदारीकरणाचे, प्रयत्न करण्यात आले, हा होय. जातिभेद व विशिष्टदेवतापूजन ही या अन्यव्यावर्तकत्वाची मुख्य लक्षणे होती. त्यांचा निरास करून, जाती, लिंग, व धर्मपंथ यांच्या निरपेक्षतेने सर्व मानवसमाजाला वैश्विक ईश्वरत्वविषयक भक्तीच्या बृहत्तर सौभ्रात्रात एकत्रित करण्यासाठी ब्राह्मसमाजादी चळवळींचा उपक्रम करण्यात आला. काही बाबतींत तर भारतीय ईश्वरशास्त्र ख्रिस्ती ईश्वरशास्त्राच्या अगदी निकट आणले गेले. भारतीयांची पारंपरिक विचार-आचार-सहिष्णुता लोकविश्रुत आहे. अन्तिम आध्यात्मिक ध्येयाच्या वेदीवर धार्मिक श्रद्धा आणि आचार यांसंबंधीच्या किरकोळ व वरवरच्या भेदांची आहुती देण्याची त्यांची नेहमीच तयारी होती. त्यामुळे, नवीन परिस्थितीस अनुरूप अशा रीतीने हिंदुधर्माच्या उदार जीवनदृष्टीवर आणि जागतिक आवाहनावर भर देणे आधुनिक विचारवंतांना अवघड गेले नाही. पण भारताच्या धार्मिक जीवनात पाश्चात्त्य विचारांनी घडवून आणलेला सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे धर्माच्या सामाजिक मूल्याचे उन्नयन हा होय. मानवाचा वैयक्तिक मोक्ष एवढेच धर्माचे साध्य असता कामा नये, असे आग्रहाने प्रपादन करण्यात येऊ लागले. ईश्वराच्या सेवेइतकेच समाजाची सेवा हेही मानवाचे श्रेष्ठ धार्मिक कर्तव्य आहे–किंबहुना

धर्माचे मानवतावादी रूप त्याच्या सांप्रदायिक रूपापेक्षा श्रेष्ठतर आहे—या सिद्धान्तावर विशेषत्वाने भर देण्यात येऊ लागला. आणि या सर्वांचे पर्यवसान भारतीय धर्म अधिक क्रियान्वित व अधिक चैतन्यपूर्ण होण्यात झाले.

अलीकडच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात भारतीयांना मिळालेल्या स्फूर्तीचे खरे उगमस्थानही पश्चिमेतच होते, असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. एक तर, पश्चिमेशी झालेल्या संपर्कामुळेच भारताला आपल्या नष्टप्राय अस्मितेची पुन्हा जाणीव झाली. भारतीय जनतेत नव्याने निर्माण झालेल्या एकराष्ट्रीयत्वाच्या आणि सामाजिक दृढैक्याच्या भावनेने तिला आपल्या स्वातंत्र्यसंगरात वारंवार प्रोत्साहित केले. भारतीय स्वातंत्र्याच्या या लढ्याने घेतलेले रूप सनदशीर चळवळीचे असो, गुप्त क्रान्तिकारी उठावाचे असो, किंवा नैतिक अहिंसात्मक प्रतिकाराचे असो, त्या त्या प्रकारच्या लढ्याच्या नेत्यांना स्फूर्ती व गती प्राप्त झाली ती प्राधान्याने रूसो, मिल्, मॅझिनी, टॉलस्टॉय, थोरो, रस्किन, इत्यादी पाश्चात्त्यांच्या लिखाणापासून आणि कर्तृत्वापासून ! अर्थात ही गोष्ट खरी की, आपल्या अनुयायांच्या देशभक्तीच्या भावनेला परिणामकारक रीतीने आवाहन करण्यासाठी भारतीय नेत्यांना भगवद्गीतेची व बुद्धाची शिकवण आणि महाभारतादी महाकाव्यांत व ऐतिहासिक बखरींत वर्णिलेली वीरकृत्ये यांचाच वारंवार आधार घ्यावा लागला.

अलीकडील काळात भारतात क्रियान्वित होत असलेल्या पाश्चात्त्य जगाच्या प्रभावाचा आशय काय आहे ? मागे सूचित केल्याप्रमाणे, पाश्चात्त्य संस्कृतीच्या भारतावरील या आघातातून सामाजिक तडजोडीचे एक नवे रूप विकसित होत असल्यासारखे दिसून येत आहे. पाश्चात्त्यांच्या विविध आर्थिक, राजकीय व सामाजिक पद्धतींचे आणि वैचारिक आकृतिबंधांचे प्रयोग भारतीय विचारवंत व नेते हल्ली मोठ्या अपेक्षापूर्ण कुतूहलाने करीत आहेत. पण त्याचबरोबर व्यक्तिवादी, बुद्धिवादी व क्रियावादी पश्चिमेला ज्या गंभीर अरिष्टांना आज तोंड द्यावे लागत आहे, त्या अरिष्टांची तीव्र जाणीवही त्यांना आता झाली आहे. त्यांना आता असा प्रत्यय, येऊ लागला आहे की, जर आपण भारतीयत्वाच्या आत्म्यापासून वंचित झालो नाही तर ती अरिष्टे आपण अजूनही टाळू शकू. पाश्चात्त्य साधनोपकरणादींनी संपन्न असा नवा समाज भारतात निर्माण होणे अपरिहार्य आहे. पण आधुनिक युगातील आध्यात्मिक व भौतिक अरिष्टांपुढे जर त्या समाजाला टिकाव धरावयाचा असेल, तर त्याने आपल्या भारतीय आत्म्याची उपेक्षा करता कामा नये.

१४

# गूढवादी म. गांधी

## के. एम्. मुनशी

गांधीजींची ईश्वरनिष्ठा निःसीम होती. त्यांनी आपले जीवन ईश्वरार्पण केले होते व गूढ सामर्थ्याने ते ईश्वराशी एकरूप झाले होते. संतांच्या मालिकेत त्यांचा समावेश कोणीही करील, हे सांगून प्रार्थना व उपोषण यांवर ते भर का देत, याचा ऊहापोह प्रस्तुत लेखात केला आहे.

गांधींसंबंधी बोलणे मला थोडे अवघड वाटते. कारण ते आपल्या नजीकच्या काळात होऊन गेले आणि त्यांच्या जीवनाशी माझा अगदी निकटचा संबंध आला होता.

गांधी हे शरीराने 'लहान माणूस' होते. ते अशक्त प्रकृतीचे व दिसावयाला दुबळे होते. पण त्यांच्या अंगी जो पहाडासारखा कणखरपणा होता, त्यामुळे उद्दाम शक्तीपुढे ते कधी वाकले नाहीत किंवा नमले नाहीत.

त्यांचे थोर समकालीन, जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि सत्याचे उपासक अल्बर्ट आईन्स्टाईन गांधींसंबंधी म्हणाले, "त्यांच्यासारखा हाडामांसाचा मानव ह्या पृथ्वीवर एके काळी वावरत होता, हे भावी पिढ्यांना एकादे वेळी खरेसुद्धा वाटणार नाही!"

ह्या 'अर्धनग्न फकिरा'च्या अक्षय्य सामर्थ्याचे, आश्चर्यजनक उत्साहशक्तीचे व अनुपम वशीकरणविद्येचे रहस्य कशात आहे? त्यांच्याशी सहमत असणाऱ्या सहकाऱ्यांवर त्यांचे जसे वजन होते त्याप्रमाणे त्यांच्या मतांवर, विचारांवर टीका

करणाऱ्या प्रतिपक्षांनाही त्यांच्याबद्दल एक प्रकारचा आदर वाटत असे. त्यांचे सहकारी व अनुयायी तर त्यांना मित्र, मार्गदर्शक व विचारप्रणेते मानीत असत.

गांधीजी इतक्या अलीकडच्या काळांत होऊन गेले की, इतिहासाच्या दृष्टीकोणातून त्यांचे यथार्थ मूल्यमापन करता येणार नाही. गांधीजी हा एक अपूर्व चमत्कार होता, या विधानाचे प. जवाहरलाल नेहरूंनी आपल्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी जे उत्कृष्ट विवेचन केले ते पहाण्यासारखे आहे : " कोटयवधी हिंदी लोकांना ज्यांनी आपल्या असामान्य व्यक्तित्वाने भारून टाकले त्यांचे वर्णन एखाद्या पुस्तकात संपूर्णपणे करणे कसे शक्य आहे ? द्वेष, हिंसा व अणुबाँब यांच्या जगात हा शांततावादी व बंधुभावनेचा प्रणेता विरोधामुळे जगाच्या नजरेत भरतो व तो जणू जगाला आव्हान देत आहे ! त्याच्या ह्या सामर्थ्याचे मूळ कशात आहे ? त्याची आत्मशक्ती व वर्चस्वबुद्धी ही कोठून आली ? हजारो वर्षांच्या काळात भारताला ज्यामुळे सामर्थ्य प्राप्त झाले, त्या सामर्थ्याचा मूळ झराच त्याच्या हाती लागला काय ? "

' सेवाग्राम येथील तो संस्मरणीय दिवस ' या मथळ्याखाली मी १९४८ साली लिहिले होते : " विश्रांती आणि करमणूक, नियमित व्यायाम व आहार, झोप, प्रार्थना व ध्यानधारणा– या सर्वांना गांधींच्या दररोजच्या जीवनात जसे महत्त्वाचे स्थान आहे, त्याचप्रमाणे त्यांच्या सार्वजनिक जीवनाशी या गोष्टी निगडित आहेत. पहाटे चार वाजता ते ब्राह्म मुहूर्तावर उठतात आणि लगेच त्यांची प्रार्थना सुरू होते. नंतर ते फिरावयाला बाहेर पडतात. त्यांच्या ह्या सकाळच्या व्यायामाच्या वेळी त्यांच्याबरोबर त्यांचा एकादा सहकारी, एकादा अनुयायी, एकादा चिंताग्रस्त राजकारणी पुरुष किंवा एकादी संसारग्रस्त महिला असू शकते. अलीकडे त्यांची प्रकृती थोडी ढासळल्यामुळे ते सूर्योदयानंतर फिरावयाला जातात. त्यामुळे पुष्कळदा त्यांच्याबद्दलच्या आदराने अनेक लोक त्यांच्या मागे मागे जातात. अर्थात् योग्य ते अंतर ठेवून हा जमाव चालत असतो.

परत आल्यावर त्यांच्या दैनंदिन कार्यक्रमाला सुरवात होते. त्यांचे मालिश चालू असतांनाच मुलाखती चालू असतात. त्या वेळी त्यांना पत्रे वाचून दाखविण्यात येतात. ही पत्रे जशी अमेरिकन व ब्रिटिश चाहत्यांकडून व भक्तांकडून आलेली असतात, त्याचप्रमाणे त्यांच्याकडे पैशांच्या मदतीसाठी विनंतीपत्रे येतात. तसेच कधी कधी धमकीची व विषारी टीकेचीही पत्रे असतात.

" ह्या पत्रांतील कोऱ्या कागदाचा भाग काळजीपूर्वक कापून तो चिठ्याचपाट्यांसाठी जपून ठेवण्यात येतो. त्यांचा सबंध दिवस हास्यविनोदात जातो. ते लहान मुलांशी खेळतात आणि त्यांच्याबरोबर मनमुराद हसतात. कुणाचे काही घरगुती प्रश्न असले, तर त्यांत मन घालून ते सोडवितात; कोणी बाटलीत घालून साप आणलेला असला, तर त्याच्याकडे पहात बसतात व त्याचा अभ्यास करतात; ताडी

पासून गूळ करण्याच्या शोधाचे त्यांना मोठे कौतुक वाटते आणि त्याचा जितका प्रसार व प्रचार करता येईल तितका करतात; पण त्यांना सर्वांत जास्त मानसिक त्रास कशाने होत असेल, तर तो त्यांच्या अनुयायांतील भांडणांमुळे होतो. त्यांच्या मधील हेवेदावे त्यांना उबग आणतात.

"त्यांच्या ह्या विविध कार्यांच्या गर्दीतही त्यांना अनेक अखिल भारतीय संघटनांकडे लक्ष पुरवावे लागत असे. हिंदुस्थानातील प्रमुख काँग्रेस कार्यकर्त्यांच्या कार्याचे नियंत्रण करणे हे जसे त्यांचे एक काम होते, त्याप्रमाणे काँग्रेससारख्या सर्वांच्या मोठ्या संघटनेचे सूत्रचालकत्व त्यांच्याच हाती होते. जातीय ऐक्य व अस्पृश्यता, निवारण हे प्रश्नही त्यांना सोडवावयाचे होते. ब्रिटिश मुत्सद्द्यांबरोबर त्यांचा मध्यस्थांमार्फत किंवा स्वतंत्र पत्रव्यवहार चालू होता.

अहिंसेच्या तत्त्वाचा कधी कधी फेरविचार करावा लागतो व दैनंदिन जीवनातल्या विविध अनुभवांशी त्याची सांगड घालावी लागते. स्वतंत्र्याच्या दृष्टीने सत्याग्रहाचे तत्त्व आणि तंत्र यांचा नव्याने विचार करणे जरूर आहे. त्याचप्रमाणे प्रार्थना व ध्यानधारणा यांच्या योगे योग्याची अलिप्तता व त्यागवृत्ती ही साधली पाहिजेत. आणि दिवसेंदिवस शक्ती क्षीण होत असता आणि रक्तदाब वाढत असता गांधीजी या गोष्टी रेल्वे आणि तार-कचेरी नसलेल्या एका खेड्यात राहून अखंडपणे करीत होते."

गांधीजींना साक्षात्कारी संतांच्या किंवा गूढवादी योग्यांच्या मालिकेत समाविष्ट करता येईल. जात, धर्म, देश किंवा काल यांचा यत्किंचितही विचार न करता त्यांनी आपले जीवन ईश्वरार्पण केले व गूढ सामर्थ्याने ते ईश्वराशी एकरूपच झाले. भगवद्गीतेत असल्या साक्षात्कार वाद्यांचे पुढीलप्रमाणे वर्णन आहे :

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।। (२-६९)

["सर्वसामान्य लोक जेव्हा जागे असतात त्या वेळी ज्ञानेंद्रियांच्या जगात हे झोपी गेलेले असतात. जेव्हा सामान्य लोक झोपलेले असतात, तेव्हा हे ज्ञानाच्या विश्वात जागृत असतात."]

हा साक्षात्काराचा मार्ग जगातल्या सर्व योग्यांच्या बाबतीत सर्वकाळ सारखाच असतो. मग ते हिंदू असोत, ख्रिस्ती असोत, मुसलमान असोत, अगर बौद्ध असोत.

या मार्गाने यशस्वी झालेल्यांचे वर्णन भगवान श्रीकृष्ण भगवद्गीतेत पुढीलप्रमाणे करतात :

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ।। (१८-५३)
ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।

समः सवषु भूतषु मद्‌भक्ति लभते पराम् ।। ( १८-५४ )

[ " अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध व परिग्रह म्हणजे पाप सोडून शांत व ममत्वरहित झालेला, ब्रह्मभूत होण्यास समर्थ होतो. ब्रह्मभूत झाला म्हणजे प्रसन्नचित्त होऊन तो कशाची आकांक्षा धरीत नाही व कशाचा द्वेषही करीत नाही; आणि सर्वांभूती सम होऊन माझी परमभक्ती प्राप्त करून घेतो. " ]

गूढवादी योग्याचे जे धर्माचरण ते असते भक्तापेक्षा अगदी वेगळे असते. मृत्यू-नंतर तावडतोब सायुज्यमुक्ती मिळावी अशी त्याची तीव्र इच्छा आणि धडपड असते. धर्माच्या ठराविक मार्गापेक्षा त्याचा हा मार्ग उच्चतर असतो. ईश्वराशी एकरूप होणे, त्याच्याशी सायुज्यता पावणे हेच त्याचे एकमेव ध्येय असते. हे ध्येय साध्य झाल्यावर योग्याला सर्व चराचरसृष्टीत ईश्‍वर दिसतो आणि ईश्वरात सबंध विश्व भासमान होते. याप्रमाणे, मानवी यंत्रणेतील प्रगट व अप्रगट शक्तींवर विजय मिळवून तो ईश्वराच्या हातातील एक साधन बनतो.

' हरिजन 'मध्ये गांधीजी लिहितात :

" ईश्वराची प्राप्ती हे मनुष्याचे अंतिम साध्य आहे आणि त्याच्या सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक चळवळी ईश्वरप्राप्तीच्या अंतिम उद्दिष्टाने चालल्या पाहिजेत. "

आपल्या स्वतःच्या जीवनाचे ध्यय काय आहे, हे प्रतिपादन कारताना गांधीजी म्हणतात :

" मला जे मिळवायचे आहे, गेली तीस वर्षे जे मिळविण्यासाठी धडपड करीत आहे, ते माझे साध्य म्हणजे ईश्वरप्राप्ती हे आहे. प्रत्यक्ष ईश्वरापर्यंत पोचणे, मोक्ष संपादन करणे हे माझे उदिष्ट आहे. हे उद्दिष्ट लेखन, भाषण व राजकीय चळवळी यांच्या द्वारे साधण्याचा मी प्रयत्न करतो आणि माझ्या सर्व जीवनकार्याचे हे अंतिम ध्येय आहे . "

आणि कधी कधी गांधीजी ईश्वराच्या सन्निध पोचलेही आहेत. त्यांनी जेव्हा आत्मशुद्धीसाठी २१ दिवसांचे प्रायोपवेशन सुरू केले त्या वेळी सहाव्या किंवा सातव्या दिवशी ते मृत्यूच्या दारापर्यंत जाऊन पोचले होते आणि त्याच वेळी त्यांना ईश्वरी साक्षात्कार झाला होता. सातव्या दिवशी त्यांची मुक्तता झाल्यामुळे त्यांचे उपोषण थांबले.

पेशावर येथील इस्लामिया कॉलेजच्या एका प्राध्यापकाने विचारल्यावरून त्या प्रायोपवेशनाच्या वेळी प्रत्यक्ष ईश्वर आपल्याशी कसा बोलला, याचे त्यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले :

" तुरुंगात असताना मी जेव्हा २१ दिवसांचा उपवास जाहीर केला तेव्हा मी त्याचा यत्किंचितही पूर्वविचार केला नव्हता. आधल्या रात्री झोपताना मी उद्या

सकाळी २१ दिवसांचे उपोषण जाहीर करणार आहे, याची मला कल्पना नव्हती. पण मध्यरात्री मला एकएकी एक आवाज ऐकू आला व तो म्हणाला, ' उपवास सुरू कर. मी विचारले, ' किती दिवसांचा ? ' ' २१ दिवसांचा ' असे मला उत्तर मिळाले. आता मला हे सांगितले पाहिजे की, त्या वेळी माझ्या मनाची उपोषणाला मुळीच तयारी नव्हती. तसला विचार सुद्धा माझ्या मनात उद्‌भवला नव्हता. पण जणू काय मला प्रत्यक्ष ईश्वरी साक्षात्कार झाला आणि मी उपोषणाचा निर्णय घेतला. ''

ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन कसे घडून येते याची मीमांसा करताना ते दुसऱ्या एका ठिकाणी म्हणतात : " विश्वव्यापी सत्याचे साक्षात् दर्शन घ्यावयाचे असेल तर त्याला आपल्या स्वतःसारख्या क्षुद्रातल्या क्षुद्र माणसावर प्रेम करता आले पाहिजे. आणि जो माणूस ईश्वरदर्शनाची आकांक्षा बाळगीत असेल, त्याला जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रापासून ( राजकारण धरून ) दूर राहता येणार नाही. ''

गांधीजींनी ' अहिंसा ' हा संस्कृत शब्द ' हिंसेचा अभाव ' या अर्थी नकारात्मक स्वरूपात कधीही वापरला नाही. अहिंसा म्हणजे प्रेम या अर्थीच ते त्याचा उपयोग करीत.

गूढयोगाचे आचरण करीत असता त्यांनी असा निष्कर्ष काढला की, ' सत्य हाच ईश्वर आहे आणि सत्याकडे जाण्याचा मार्ग प्रेम आहे. असे प्रेम सम्राटाच्या शब्दापेक्षा अधिक वजनदार असते व ते जनतेवर जास्त प्रभाव गाजवते. ' बुद्ध, कृष्ण, चैतन्य, रामकृष्ण, रमण, अरविंद, गांधी यांसारख्या गूढवादी योग्यांनी जनतेची मने जितकी जिंकली व त्यांना आपलेसे केले, तितके सीझर, अलेक्झांडर यांसारख्या जगज्जेत्यांना व सम्राटांना करता आले नाही.

गांधीजींची ईश्वरावरील प्रेमभक्ती श्रद्धेवर आधारलेली होती. तिला उच्च ' परा श्रद्धा ' म्हणता येईल.

१९४४ साली आगाखान प्रासादातून गांधीजींची मुक्तता झाल्यावर पुण्यात त्यांची जी भेट झाली, ती मला विसरता येण्याजोगी नाही. त्या वेळी त्यांची प्रकृती अतिशय खालावलेली होती व त्यांच्या मनाची नेहमींची तरतरी व हुशारी गेली होती. त्यांची भेट झाल्यावर त्यांनी प्रथम जे शब्द उच्चारले त्यावरून पूर्वीचे गांधी आज राहिले नाहीत असे मला दिसले. ते म्हणाले, 'मुनशी, ईश्वराने मला कशासाठी जिवंत ठेवले आहे ते कळत नाही. ' ते अशा भावपूर्ण स्वरात म्हणाले की, जणू काय ते प्रार्थनाच करीत आहेत. त्या क्षणी मला असे कळून चुकले की, गांधीजी हे ईश्वराचे साधन बनले आहेत. त्यांनी दिल्लीस केलेल्या अखेरच्या उपोषणाच्या वेळी ते म्हणाले होते, " ईश्वरासारखा माझा एकमेव व सर्वश्रेष्ठ सल्लागार असताना मी दुसऱ्या कोणाच्याही सल्लामसलतीची अपेक्षा करू नये व मनाला वाटेल तो निर्णय घ्यावा असे मला वाटले. ''

" मी कोण आहे ? ' असा प्रश्न गांधीजींनी एकदा विचारला व त्यांनीच

पुढीलप्रमाणे उत्तर दिले : " ईश्वर मला जे सामर्थ्य देतो त्याखेरीज माझ्या अंगी दुसरे सामर्थ्य नाही. शांततेचेच काय, पण दुसरे कोणतेही कार्य ईश्वराच्या हाती आहे. ईश्वराच्या इच्छेशिवाय काहीही घडत नाही. ईश्वरी कायदा अविनाशी, अटळ व शाश्वत आहे. " येशू ख्रिस्ताप्रमाणे त्यांना हुतात्म्याचे मरण आले व मरताना ' हे राम ' हे शब्द त्यांच्या मुखातून बाहेर पडले.

ज्यांना प्रत्यक्ष सत्याचे ज्ञान झाले आहे अशा थोर साक्षात्कारी संतांप्रमाणे गांधीजी आत्मानुभवापेक्षा बुद्धिवादाला श्रेष्ठ मानावयास तयार नव्हते. ते म्हणतात, " जो नुसत्या बुद्धीचे समाधान करतो तो माझ्या मते ईश्वर नव्हे. ईश्वराचा अंत:करणावर ठसा उमटला पाहिजे व काही प्रमाणात साक्षात्कार झाला पाहिजे. इंद्रियगोचर भाव किंवा विकार आपल्याला खरे वाटत असले, तरी ते पुष्कळदा खोटे व भ्रामक असतात. इंद्रियातीत असे जे ज्ञान असते, ते मात्र अमोघ व अचूक असते. "

गांधीजी पुढे म्हणतात : " इंद्रियांच्या द्वारे ईश्वराला पहाण्याचा किंवा जाणण्याचा प्रयत्न करणे कदापीही शक्य होणार नाही. कारण तो इंद्रियातीत आहे. आपली तितकीच तीव्र इच्छा असेल, तर आपल्याला स्पर्शज्ञानाने त्याचा बोध होईल; पण आपण आपल्या सगळ्या संवेदना नष्ट केल्या पाहिजेत. आतल्या अंत:करणात दैवी संगीत सतत चालू आहे, पण इंद्रियांच्या बाहेरच्या आवाजामुळे हे सूक्ष्म संगीत आतल्या आत मारले जाते. हे दैवी संगीत इंद्रियगम्य संगीतापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ, अगदी भिन्न स्वरूपाचे व अवर्णनीय असे असते. "

गांधीजींनी सत्य आणि प्रेम यांच्याशी ईश्वराचे समीकरण केले आहे. " माझ्या दृष्टीने ईश्वर म्हणजे सत्य व प्रेम. ईश्वर म्हणजे नीती व सदाचरण; ईश्वर म्हणजे निर्भयता. प्रकाशाचे व जीवनाचे उगमस्थान म्हणजे ईश्वर. तथापि तो या सर्वांच्या वर व सर्वांपलीकडे आहे. ईश्वर म्हणजे सद्सद्विवेकशक्ती. "

गांधीजींची ईश्वरावर इतकी नितांत व पवित्र श्रद्धा होती की, त्यांच्यावर कितीही कठीण प्रसंग आले, तरी त्या संकटांना निर्भयतेने तोंड देण्याची शक्ती त्यांच्या अंगी होती. तिच्यात उपयुक्ततावाद किंवा केवलसुखवाद यांचा अंशही नव्हता. गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे श्रद्धेतील पावित्र्याची व एकनिष्ठेची परीक्षा आपले सर्वस्व आनंदाने ईश्वरार्पण करण्यात आहे. अर्पणभाव हे सर्व धर्मांचे सारसर्वस्व आहे. सर्व भूतांविषयी प्रेम म्हणजे ईश्वरावर प्रेम. हे प्रेम करण्यास भक्ताला सांगावे लागत नाही. तो ते आपले कर्तव्यच समजतो.

साक्षात्कारी व्यक्तीला ईश्वराविषयी वाटणाऱ्या प्रेमाचे वर्णन डोस्टोव्हस्की या रशियन लेखकाने पुढील काव्यपूर्ण भाषेत केले आहे : " ईश्वराने निर्माण केलेल्या सर्व वस्तुजातावर प्रेम करा. समुद्रातल्या वाळूच्या प्रत्येक कणावर प्रेम करा. झाडाचे पान, सूर्यप्रकाशाचा किरण, वनस्पती, प्राणी इत्यादि जी जी वस्तू ह्या पृथ्वीवर आहे,

त्या प्रत्येक वस्तूवर प्रेम करावयास शिका. तुम्ही जर प्रत्येक वस्तूवर प्रेम केलेत, तर त्या वस्तूतील अंतर्गत सौंदर्याचा तुम्हांला प्रत्यय येईल. या वस्तूतील दैवी रहस्याचे जसजसे तुम्हांला दर्शन होत जाईल, तसतसे तुमचे ज्ञान वाढत जाईल आणि तुम्ही अखेर सर्व मानवजातीवर निरतिशय प्रेम करावयास लागाल. ''

गांधीजींचे प्रमुख सहकारी त्यांच्याकडे जे आकर्षित झाले होते त्याच्या मुळाशी गांधींची प्रेमभावना होती आणि सहकाऱ्यांची सद्‌भावना होती. गांधींच्या निधनानंतर त्यांच्यावरील प्रेमाची व आदराची भावना अधिक प्रमाणात दिसून आली आहे.

जे साक्षात्कारी पुरुष असतात ते मोह, क्रोध व भय यांचा संपर्क स्वत:ला लागू देत नाहीत. त्यापासून ते सदैव दूर असतात. या विकारांचा वारा लागू नये, त्यांचे शुद्धीकरण व्हावे, म्हणून गांधीजी सार्वजनिक व खाजगी प्रार्थनेवर भर देत असत. आपल्या आत्मचरित्रात गांधीजींनी प्रार्थनेसंबंधी पुढील उद्‌गार काढेले आहेत :

" पूजा, प्रार्थना, ध्यानधारणा या गोष्टी अंधश्रद्धेच्या किंवा भोळेपणाच्या निदर्शक नाहीत. खाणे, पिणे, चालणे, बसणे या क्रियांपेक्षा त्या क्रिया अधिक सत्य आहेत. प्रार्थना ही नुसती शाब्दिक वडबड नाही. ती अंत:करणाच्या गाभाऱ्यातून उत्पन्न होते. प्रार्थनेला शब्दांची जरूरी लागत नाही. विकारांपासून अंत:करणाची शुद्धी करायची असेल, तर प्रार्थना हा अचूक व खात्रीचा मार्ग आहे, यात मला तिळमात्रही शंका वाटत नाही. पण ह्या मार्गाचा अवलंब करताना अत्यंत नम्रता यवाळगली पाहिजे. ''

" ईश्वराची पूजा म्हणजे ईश्वराचे गुणगान करण्यासारखे आहे. आपली स्वत:ची अपात्रता व दुबळेपणा या दोहोंचे सारसंकलन म्हणजे प्रार्थना होय. साक्षात्कारी व्यक्तीला एकान्ताची जरूरी असते. योगी हा 'विविक्तसेवी' म्हणजे जनतेपासून दूर राहणारा असतो. '' गांधीजी हे जरी जनसमुदायात वावरत असले तरी त्यांनी एकांतवासात जाण्याचा स्वत:चा स्वतंत्र मार्ग शोधून काढला होता. मौन हा त्यांचा विशिष्ट मार्ग होय. मौन धारण केल्यामुळे ते जनसमुदायात राहूनही तपस्वी किंवा वानप्रस्थ वनले होते.

गांधींच्या वावतीत उपोषण हा सक्तीचा किंवा आत्मक्लेशाचा प्रकार नव्हता. ईश्वराची करुणा भाकण्याचा प्रार्थना हा जसा एक प्रकार आहे, त्याप्रमाणे उपोषण हा दुसरा प्रकार आहे. प्रायोपवेशन हे अहिंसेच्या शस्त्रागारातील अखेरचे शस्त्र आहे. जेव्हा मानवी युक्तिवाद पंगू ठरतो तेव्हा उपासक उपोषणाचा अवलंब करतो. प्रार्थनेची शक्ती ह्या उपवासाने वाढते. ती ईश्वराला उद्देशून केलेली अध्यात्मिक करूण वाणी आहे.

प्रायोपवेशन ही अनादिकालापासून चालत आलेली संस्था आहे व आत्मशुद्धीसाठी मुख्यत: तिचा उपयोग केला जातो. येशू ख्रिस्त व महंमद यांनी प्रत्यक्ष ईश्वराच्या

दर्शनासाठी प्रायोपवेशन केले होते. पार्वतीने शंकरासाठी उपोषणाच्या द्वारे कडक तपश्चर्या केली होती. गांधीजी म्हणतात, "मी जेव्हा रोज रोज पहातो की, माझ्या सभोवतालचे जग सतत वदलत आहे, सतत लय पावत आहे, तेव्हा या अदलाबदलीच्या मागे कधीही न बदलणारी अशी एक जिवंत शक्ती आहे असा मला विश्वास वाटतो. उत्पत्ती, स्थिती व लय हे तिचे कार्य आहे. ही शक्ती किंवा चैतन्य म्हणजेच ईश्वर होय."

१५

# गांधीजी-संत आणि मुत्सद्दी

के. के. शहा

ईश्वरप्राप्ती हे गांधीजींच्या जीवनाचे ध्येय होते आणि जनसेवा हे त्यांचे साधन होते. राजनीतिज्ञ म्हणून त्यांनी राजकारणाच्या कल्पनेंत क्रांती केली. संत व मुत्सद्दी या दोन्ही नात्यांनी गांधीजींना 'रामराज्य' आदर्श वाटत असे आणि ते रामराज्य नैतिक मूल्यांशिवाय टिकणार नाही व व्यावहारिक राजकारणाशिवाय चालणार नाही असे ते का मानीत, याचे विवरण पुढील लेखात आढळेल.

गांधीजींकडे पाहण्याची माझी दृष्टी अगदी वेगळी आहे. केवळ राजकारणी मुत्सद्दी या नात्यानेच नव्हे तर मानवी मूल्यांचे प्रवक्ते व मानवजातीच्या प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पहाणारे विचारवंत, असे मी त्यांना मानत आलो आहे. खरोखर पाहिले तर गांधीजींच्या या तत्त्वज्ञानामुळे मानवी विकासाच्या संपूर्ण इतिहासाला एक नवाच दृष्टिकोण लाभला आहे. अनादिकाळापासून न्याय, समता व नीती यांच्या कल्पना पाशवी शक्तीवर आधारलेल्या होत्या. दंडुकेशाहीच्या जोरावर मिळविलेला विजय हाच खरा विजय, असे मानले जाते होते. पाशवी सामर्थ्यावर युद्धे खेळली जात होती. विशिष्ट विचारांचा प्रचार करण्यात येत होता व प्रतिपक्षावर आपली मते लादली जात होती. वर्षानुवर्षे चालत आलेल्या या रिवाजाविरुद्ध जर कोणी निधडेपणाने

बोलण्याचे धाडस केले असेल, तर ते गांधीजींनी केले आणि न्यायनीतीच्या कल्पना प्रखर व सूक्ष्म केल्या. हिंसेशिवाय न्याय नाही, या तत्त्वाचा स्वीकार करण्याचे त्यांनी नाकारले. केवळ भारतालाच नव्हे, तर सबंध जगाला त्यांनी आंतरिक शक्तीचा एक नवा उन्मेष दाखविला, एक नवी जागृती आणून दिली व एक नवे तत्त्वज्ञान जगापुढे मांडले. समतेच्या भूमिकेवरून हरिजनांना न्याय मिळाला पाहिजे, या तत्त्वासाठी गांधीजी झगडले नसते, तर हिंदी स्वातंत्र्यासाठी त्यांना कसा लढा देता आला असता ? यावरून हे दिसून येईल की, ते तात्पुरत्या लाभासाठी किंवा क्षणिक यशासाठी झगडत नव्हते. मानवांमधील परस्परसंबंध ग्रथित करणारी शाश्वत मूल्ये स्थापन व्हावीत, यासाठी ते जन्मभर लढा देत होते. कितीही काळ लोटला तरी ही तत्त्वे नाहीशी होणार नाहीत. ती चिरंतन व शाश्वत आहेत. मानवी अपूर्णतेची गांधीजींना जाणीव नव्हती म्हणून त्यांनी लोकशाहीचा अंगीकार केला असे नव्हे, तर लोकशाहीतील सद्‌गुण व दुर्गुण यांचा सदैव संघर्ष चालू असतो हे त्यांना पूर्ण माहीत होते. आणि त्यांना अशीही खात्री वाटत होती की, पाशवी शक्तीपुढे अखेर लोकशाहीच विजयी होईल.

गांधीजींच्या या विचारसरणीच्या समर्थनार्थ जर कोणाला पुरावा हवा असेल, तर तो 'यंग इंडिया' साप्ताहिकाच्या १९२५ जानेवारीच्या अंकात पहावयास सापडेल. त्या अंकात गांधीजी लिहितात :

"सत्य हाच माझा ईश्वर आहे. अहिंसा हा त्याच्या प्राप्तीचा मार्ग आहे."

गांधीजी हे मुख्यत: धार्मिक वृत्तीचे होते आणि मागाहून योगायोगाने राजकारणी पुरुष झाले, किंवा आधी ते राजकारणी होते आणि मागाहून धार्मिक झाले, हे सांगणे कठिण आहे राजनीतिज्ञ या नात्याने त्यांनी मुत्सद्देगिरीच्या कल्पनेत क्रांती घडवून आणली. संताच्या भूमिकेत वावरणारे ते मुत्सद्दी नव्हते किंवा राजकारणात ढवळाढवळ करणारे ते साधुपुरुषही नव्हते.

गांधीजी हे सत्याचे शोधक होते, सत्यरूपी ईश्वराचे अनुगामी होते. राजकारणात त्यांनी मुत्सद्देगिरीला पावन करून घेतले. १९२७ सालच्या जानेवारीत 'यंग इंडिया' मध्ये त्यांनी लिहिले होते :–

"संताचा वेष पांघरणारा मी राजकारणी नाही. पण सत्य हे सर्वोच्च ज्ञान असल्यामुळे माझ्या कृती कधी कधी उच्च दर्जाच्या मुत्सद्देगिरीशी सुसंगत अशा भासतात. पण सत्य आणि अहिंसा यांशिवाय माझी दुसरी कोणतीच व्यवहारनीती नाही, असे मी समजतो."

विश्वदर्शी व सर्वसाक्षी सत्याशी मुकाबला करावयाचा असेल, तर मनुष्याने स्वत:सारख्या क्षुद्रातल्या क्षुद्र जीवावर प्रेम करण्यास शिकले पाहिजे. सत्य शोधण्याची व ईश्वरप्राप्ती करून घेण्याची त्याची तीव्र आकांक्षा असेल, तर त्याला जीवनाच्या

कोणत्याही क्षेत्रापासून अलिप्त राहून चालणार नाही. नीतिनियमांनुसार कडक आचरण आणि विवेकबुद्धी ही गांधीजींच्या जीवनाची मुख्य घटक द्रव्ये आहेत. त्याचप्रमाणे दीनदु:खितांची व पददलितांची सेवा हा त्यांचा धर्म आणि व्यवसाय आहे. जीवनाचा असा कोणताही विभाग किंवा कप्पा नसेल की, ज्याला गांधीजींनी स्पर्श केला नाही व ज्याच्याकडे त्यांनी तातडीने लक्ष पुरविले नाही. स्वत:च्या हातांनी महारोग्याची सेवा करण्यापासून तो व्हाईसरायबरोबर राजकारणाची चर्चा करण्या-पर्यंत, खेड्यातल्या लोकांना आरोग्याचे व स्वच्छतेचे धडे देण्यापासून तो सर्वसामान्य जनतेसाठी नवीन शिक्षणप्रणाली तयार करण्यापर्यंत, अनैतिक वर्तनाबद्दल अनु-यायांची हजेरी घेण्यापासून तो दुसऱ्यांच्या चुकांबद्दल उपोषण करून आत्मक्लेश सहन करण्यापर्यंत – गांधीजींच्या जीवनात असा क्वचितच एखादा विभाग असेल की, ज्यासाठी त्यांनी निकडीने सर्वस्व अर्पण केले नाही. ' त्याचे कारण हे आहे ' असे गांधीजी पुढील शब्दांत कथन करतात :

> " मी अत्यंत नम्रपणे व विनदिक्कत म्हणू शकतो की, धर्माचा राजकारणाशी यत्किंचितही संबंध नाही असे जे म्हणतात, त्यांना धर्माचा अर्थ कळलेला नसतो. "

धर्माशिवाय राजकारण नाही अशी गांधीजींची धारणा होती आणि त्यांचा धर्म अंधश्रद्धेवर, द्वेषावर व हिंसेवर आधारलेला नव्हता, तर तो बंधुभाव, सहिष्णुता व प्रेम यांचा परिपाक होता. गांधीजी हे प्रामुख्याने नैतिक व आध्यात्मिक सुधारणावादी होते. त्यांना जेव्हा असे आढळून आले की, सामाजिक क्षेत्रात आध्यात्मिक व नैतिक मूल्यांची खरी जरूरी आहे, तेव्हाच त्यांनी सामाजिक व राजकीय कार्ये हाती घेतली. नीतीची मूलतत्त्वे, जनतेची धारणाशक्ती, ऐतिहासिक पार्श्वभूमी व देशातील प्रचलित परिस्थिती यांच्या निष्कर्षावर त्यांनी महत्त्वाचे बिकट प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. गांधीजींची अशी मनोमन श्रद्धा होती की, केवळ उच्च साधनांच्या योगेच उच्च ध्येय साध्य होऊ शकेल. गांधीजींचे राजकारण कोणत्याही अशुद्ध साधनांनी कलंकित झालेले नव्हते. सत्याचे बलिदान करून स्वातंत्र्य मिळविण्यापेक्षा भारताचा नाश झाला तरी चालेल, असे गांधीजींनी अनेकवार म्हटले आहे. गांधीजी म्हणतात, " काहींच्या मते साधने ही नुसती साधने आहेत. पण मी म्हणेन, साधने हेच सर्वस्व आहे; जशी साधने तसा शेवट. हिंसात्मक साधने म्हणजे हिंसात्मक स्वराज्य. साधने आणि ध्येय यांच्यामध्ये केसाइतकाही फरक नाही. ती एकमेकांपासून अलग केली जात नाहीत. जी साधने पूर्णपणे शांततामय, सनदशीर व न्याय्य आहेत, त्या साधनांचा मी सतत पुरस्कार करीत आलो आहे. " गांधीजींना कोणत्याही प्रकारचा दुटप्पी-पणा माहीत नव्हता. मग त्यांचे स्वत:चे आचरण असो, अगर त्यांच्या अनुयायांचे असो किंवा प्रतीपक्षीयांचे असो. ज्या गोष्टी ते प्रत्यक्ष आचरणात आणीत किंवा

आचरण्यास तयार असत, त्याच गोष्टींचा ते उपदेश करीत. आधी कृती मग उपदेश, हे त्यांचे सूत्र होते. त्यांचे विचार आणि आचार यांच्यामध्ये ज्याप्रमाणे द्वैत नव्हते, त्याप्रमाणे खाजगी आणि सार्वजनिक यातही भेदभाव नव्हता. गांधीजी आपल्या दैनंदिन जीवनात अत्यंत काटेकोर शिस्त पाळीत, सबंध दिवसभर काम करीत व जनतेच्या आशा-आकांक्षांशी एकरूप होण्याचा प्रयत्न करीत. याप्रमाणे, हिंदी राजकारणात गांधींचा उदय म्हणजे जीवनाकडे पहाण्याची नवी दृष्टी, नवी जीवनमूल्ये व नव्या कल्पना यांच्या कालखंडाची सुरवातच होय. १९२० सालानंतर गांधीजींच्या राजकारणाला जे क्रांतिकारक वळण मिळाले, त्यामुळे काँग्रेसचे रूपांतर सामुदायिक चळवळीत होऊन जनतेत एक प्रकारचे अभूतपूर्व चैतन्य उत्पन्न झाले. सर्वसामान्य जनतेला माहीत असलेल्या राजकारणाला नवा रंग चढला, त्याप्रमाणे नवा अर्थ प्राप्त झाला. जगाच्या विचारसंपदेत गांधीजींनी ही जी भर घातली ती अपूर्व आहे. गांधीजींनी जगाला दिलेली ती सर्वात मोठी देणगी म्हटली पाहिजे. गांधीजींसंबंधी रोमेन रोलाँड म्हणतात :

> " आशियातील ह्या आस्तिक माणसाने रस्किन व प्लेटो यांचे भाषांतर केले आहे, तो थोरोची वचने सुद्धा उद्धृत करतो, मॅझिनीचा गौरव करतो, एडवर्ड कार्पेंटरचे ग्रंथ वाचतो, हे विसरता कामा नये. आणि थोडक्यात सांगावयाचे म्हणजे युरोप व अमेरिका या देशांनी जे जे उत्कृष्ट निर्माण केले आहे, त्याच्याशी याचा परिचय आहे. ''

भारताला स्वातंत्र्य देण्याच्या योजनेसंबंधी हाऊस ऑफ कॉमन्समध्ये भाषण करताना ब्रिटिश पार्लमेंटचा एक सभासद म्हणाला की, जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारी ही घटना आहे. जगातील सत्य व शांतता यांची चिरंतन प्रेरकशक्ती या नात्याने भारताचा उत्कर्ष होवो, अशी मी प्रार्थना करतो. भाषणाच्या अखेरीस त्याने स्वतंत्र भारताला अभिवादन केले.

गांधीजींचा गुणगौरव करतांना लुई फिशरने पुढील उद्गार काढले :

> गांधीजी ही एक अद्वितीय व्यक्ती होऊन गेली. ते थोर पुरुष होते; इतके की, गेल्या एकोणीसशे वर्षांत झालेल्या थोरपुरुषांत ते सर्वांत श्रेष्ठ होते.''

गांधीजी हे मोठे परिणामकारक व वरिष्ठ दर्जाचे वक्ते होते. हा वक्तृत्वाचा गुण संत व मुत्सद्दी या दोघांना सारखाच आवश्यक आहे. त्यांनी विधायक कार्याच्या योगे सर्वसामान्य जनतेशी सामुदायिक संबंध जोडण्याची योजना अंमलात आणली.

चाणाक्ष व बुद्धिमान राजकारणी मुत्सद्दी या नात्याने त्यांच्या निकट आलेल्या व्यक्तींकडून त्यांनी जास्तीत जास्त ग्रहण केले व त्यांच्या दोषांकडे सहानुभूतीने पाहिले. त्यांची प्रवृत्ती , त्यांचे गुणविशेष, त्यांची हुशारी व त्यांची आकलनशक्ती पाहून त्यांना योग्य अशा कामावर नियुक्त केले. विविध मनोवृत्तींच्या व विरुद्ध गुणधर्मांच्या

लोकांशी कसे वागावे, याची कला त्यांना अवगत होती. बुद्धिवादी व टीकाकार, धर्मोपदेशक व मुत्सद्दी–अशा लोकांना कामाला जुंपण्याची व त्यांच्याकडून काम करून घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. मानवतेच्या विकासाच्या दृष्टीने स्वातंत्र्य ही अत्यंत आवश्यक व प्राथमिक स्वरूपाची पहिली गरज आहे, असे ते मानीत होते. मानवी हितसंबंधांचा पाया ज्यावर उभारला जाईल, असे आधारस्तंभ म्हणजे सत्य व अहिंसा हे होत. संत आणि मुत्सद्दी या दोन्ही नात्यांनी त्यांना रामराज्य आदर्श वाटत असे. नैतिक मूल्यांशिवाय रामराज्य टिकणार नाही आणि व्यावहारिक राजकारणाशिवाय ते चालणार नाही. आजच्यासारख्या आणीबाणीच्या काळात जे आपल्याला मार्गदर्शन करतील, असे ते महान संत व मुत्सद्दी होते. त्यांच्यापासून सबंध राष्ट्राने स्फूर्ती व प्रेरणा मिळविण्याचे कार्य सतत चालू ठेवले पाहिजे. त्यायोगे भारतातीलच नव्हे, तर सबंध मानवजातीच्या उत्कर्षाचा व विकासाचा मार्ग प्रज्वलित केला जाईल, अशी आपण आशा करू या.

१६

# महात्मा गांधी व महाराष्ट्र

## यशवंतराव चव्हाण

गांधीजींचे वास्तव्य महाराष्ट्रात जेवढे झाले, तेवढे इतर कोणत्याच प्रांताच्या वाटयाला आलेले नाही. परसत्तेशी झगडण्याचा मूलभूत दृष्टिकोन गांधीजींनी देशापुढे ठेवला आणि नवा माणूस व नवा समाज भारतामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आजही गांधी-विचारांतील क्रांतिकारक आशय हिंसाग्रस्त जगाला नवी प्रेरणा देण्यास समर्थ कसा आहे, याचे विवेचन पुढील लेखात केलेले आहे. ते करताना " गांधींच्या रूपाने एक चमत्कारच भारतीय राजकारणात घडला," असे लेखकाने म्हटले आहे.

महात्मा गांधींच्या जीवनाचा व विचारांचा परिणाम महाराष्ट्रावर किती झाला, असा प्रश्न काही वेळा विचारण्यात येतो. परप्रांतीय मित्रमंडळी किंवा परदेशी अभ्यासक जेव्हा हा प्रश्न विचारतात, तेव्हा त्यांच्या मनात तुलनात्मक दृष्टी असण्याचा संभव असतो. भारताच्या इतर प्रदेशांवर गांधीजीवन व गांधीविचार यांचा परिणाम किती कमीअधिक प्रमाणात झाला, याचा संदर्भ त्यांच्या मनामध्ये असण्याची शक्यता असते. परंतु अशी तुलना करून पहाणे फारसे इष्टही नाही व शक्यही नाही, असे माझे

मत आहे. कारण महात्मा गांधी जेव्हा भारतीय राजकारणाच्या क्षितिजा-वर अवतरले, तेव्हा प्रत्येक प्रांताची पार्श्वभूमी वेगवेगळी होती. त्या संदर्भातच त्या त्या प्रांतावर गांधीयुगाचा किती व कसा परिणाम झाला हे अजमवावे लागेल. ही गोष्ट सोपी नाही. म्हणूनच, महाराष्ट्राच्या बाहेरच्या किंवा महाराष्ट्रातील मंडळींनी 'गांधी व महाराष्ट्र' असा प्रश्न उपस्थित केला की मी त्यासंबंधी, तुलनेचा विचार सोडून देऊन, महाराष्ट्रापुरते मला काय वाटते, काय जाणवते, तेवढेच सांगतो. प्रस्तुत लेखातही एवढाच मर्यादित विषय घेण्याचे मी योजिले आहे.

लोकमान्य टिळकांच्या निधनाच्या सुमारे पाच वर्षे आधी गांधीजींनी भारतातील आपल्या कार्याची सुरुवात केली. तो काळ असा होता की, टिळक हेच भारताचे सर्वमान्य, लोकमान्य दैवत होते. मंडालेच्या सहा वर्षांच्या कारावासानंतर ते नुकतेच परत आले होते. बदललेल्या परिस्थितीचा शोध घेत होते. जगात एक महायुद्ध सुरू झाले होते. जागतिक स्वरूपाचे असे हे पहिलेच युद्ध होते. युद्ध सुरू होऊन दोन-तीन महिने होतात तोच गांधी आफ्रिकेहून भारतात येऊन पोचले. आफ्रिकेत बावीस वर्षे राहून आणि जगातील विचारवंतांचे व मुत्सद्द्यांचे लक्ष खेचून घेईल अशा अभिनव स्वरूपाचे क्रांतिकारक कार्य करून, गांधी भारतामध्ये कायमचे राहण्यासाठी आले होते. नामदार गोखले यांच्या सूचनेवरून, काहीशा आग्रहावरून, त्यांनी आफ्रिकेतील कार्याची अखेरी केली होती. यापुढे भारत हीच आपली कर्मभूमी करावयाची, असा संकल्प त्यांनीं केला होता. मात्र, ज्या गोखल्यांच्या सूचनेवरून ते भारतामध्ये आले, त्यांच्या निधनाची वार्ता त्यांना महिना–दीड महिन्यात ऐकावी लागली. 'गांधी व महाराष्ट्र' यांच्यात जो एक दुवा नियतीने निर्माण केला होता, तो गोखले यांच्या निधनामुळे एकाएकी निखळला.

१९१५ ते १९२० हा भारतीय राजकारणातला फार महत्त्वपूर्ण घडा-मोडींचा काळ आहे. गांधीजींचा उदय या काळात व्हावा, ही गोष्टही फार अर्थपूर्ण आहे. लोकमान्य टिळकांनी स्वराज्यप्राप्तीचा जो रस्ता दाखविला होता व जो वर्ग जागृत केला होता, त्यापेक्षाही पुढचे पाऊल टाकण्यासाठी गांधीजी सिद्ध होत होते. १९१७ मधील चंपारण्याचा लढा हे एक उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. हा लढा देण्यासाठी गांधीजींशिवाय कोणताही नेता त्या काळात पुढे येणे अशक्य होते. एका सामान्य शेतकऱ्याच्या निमंत्रणावरून गांधीजी तेथे गेले, खेडुतांमध्ये मिसळले, आफ्रिकेत आपणाला ज्या तंत्राचा शोध लागला होता त्या सत्याग्रहाच्या अस्त्राचा त्यांनी वापर करण्याची तयारी केली इंग्रज अधिकाऱ्यांजवळ व गोऱ्या शेतमालकांजवळ बोलणी केली, आत्मक्लेशाची सारी सिद्धता केली अन् काही तरी चमत्कार झाला. इंग्रज कलेक्टराने माघार घेतली व गांधीजींचा

विजय झाला. परंतु त्यातूनच गांधीजींच्या विधायक कार्याची सुरवात झाली. आपल्या आश्रमातील अनेक मंडळी ते तेथे घेऊन गेले. कस्तुरबा गेल्या, इतर स्त्रिया गेल्या. गावकऱ्यांच्या शिक्षणासाठी, सेवेसाठी, प्रगतीसाठी नव्या तऱ्हेच्या चळवळींची मुहूर्तमेढ रचण्यात आली.

गांधीजींच्या कार्याची व व्यक्तिमत्त्वाची एक नवी झलक भारताला त्या वेळी दिसून आली. राजकीय नेता कसा असावा याची विवक्षित कल्पना त्या वेळी लोकांपुढे होती. ' लोक ' असा शब्द जो मी वापरला त्यात तत्कालीन शिक्षित वर्गाचा समावेश मला प्रामुख्याने करावयाचा आहे. त्या वेळचे राजकारण हे बहुतांशी शिक्षित वर्गाचेच राजकारण होते. या शिक्षित वर्गामधन दोन प्रकारचे नेतृत्व देशभर निर्माण झाले होते. एका नेतृत्वाचा घाट लोकमान्य टिळकांच्या विचारांचा होता, दुसऱ्या नेतृत्वाचा घाट नामदार गोखल्यांच्या विचारांचा होता. योगायोगाने हे दोन्ही सर्वमान्य, देशमान्य नेते मराठीच होते. परंतु या दोन्ही प्रकारांपेक्षा वेगळ्या व तिसऱ्या प्रकारचे नेतृत्व वर येईल, अशी अपेक्षा त्या काळातही कोणी केली असेल, असे वाटत नाही.

म्हणून गांधींच्या रूपाने एक चमत्कारच भारतीय राजकारणात घडला, असे म्हणावे लागेल. गांधीजींच्या मृत्यूनंतर आईन्स्टीन म्हणाला की, " गांधींसारखा माणूस या अवनीतलावर होऊन गेला यावर आगामी पिढ्यांचा विश्वासही कदाचित बसणार नाही. '' आईन्स्टीनला जर असे वाटले, तर गांधींचा उदय ज्या पिढीने पाहिला त्या पिढीला काय वाटले असेल, याचा विचारच केलेला बरा !

युगपुरुष जेव्हा आपल्या युगप्रवर्तक कार्याची सुरुवात करतो तेव्हा असेच काहीतरी होणे स्वाभाविक मानले पाहिजे. व्याकरणाचे जुने नियम तो जणू फेकून देतो. जुनी फूटपट्टी तो तोडून टाकतो. स्वतःच्या गायकीला साजतील असे नवीन स्वर अन् ताल बसवितो आणि नवे स्वर आळवू लागतो. गांधीजी प्रथम जेव्हा भारतात कार्य करू लागले तेव्हा ते नेमके कोणत्या क्षेत्रात उतरणार, याबद्दल जाणकारांनी वेगवेगळे अंदाज केले असणे शक्य आहे. कोणाला वाटले असेल की, गांधीजी सामाजिक कार्याला वाहून घेतील. कोणाला वाटले असेल की, ते राजकीय कार्याला प्राधान्य देतील. " आधी सामाजिक सुधारणा की आधी राजकीय चळवळ ? '' असा एक मोठा वाद महाराष्ट्रात त्यापूर्वी रंगून गेला होता व त्याचे खोल परिणाम महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या सार्वजनिक जीवनावर उमटले होते.

परंतु गांधीजींनी जो मार्ग स्वीकारला तो अगदी वेगळा. सामाजिक, राजकीय, आर्थिक इतकेच काय परंतु धार्मिक, शैक्षणिक अशी वेगवेगळी क्षेत्रे त्यांनी अलग मानली नाहीत. त्यांनी असा काही तरी संकलित, मूलभूत व मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारला की ज्यामुळे सर्वजण विस्मयचकित झाले.

टिळक व गांधी यांच्या विचारांमध्ये व कार्यपद्धतीमध्ये एक प्रचंड तफावत लोकांना भासू लागली असल्यास नवल नाही. गोखले यांना गांधीजी आपले 'राजकीय गुरु' मानीत होते. परंतु या बाबतीतही मला असे वाटते की, जर का गोखले आणखी जगले असते तर अगदी थोड्या वर्षातच गुरुशिष्यांच्या विचारधारांमध्ये कमालीचा फरक दिसू लागला असता. असो.

गांधींच्या रूपाने जेव्हा एक नवे, नव्या घाटाचे नेतृत्व उभे राहिले, तेव्हा गोखलेवादी किंवा टिळकवादी मंडळी गोंधळून जाणे स्वाभाविकच होते. कारण तोपर्यंत राजकारणाचा व्याप हीच मंडळी सांभाळीत होती. गोखलेपंथीयांपेक्षा टिळकपंथीय जनतेच्या अधिक जवळ होते हे जरी खरे असले, तरी त्यांच्या चळवळीची रीतभात बरीचशी शहरी होती. त्यात शब्दांना, भाषेला व भाषणांना प्राधान्य होते. लोकमान्यांच्या हयातीत त्यांनी जे तेजस्वी स्वरूप राजकारणाला दिले होते, त्याचा साक्षात्कार टिळकपंथीयांच्या कार्यात येत नव्हता.

गांधीजींनी चळवळीच्या तंत्रांमध्येच क्रांती केली. त्यांनी प्रत्येकाकडून कृतीची अपेक्षा केली व प्रत्येकाला जमेल साधेल अशी कृतीची साधना त्याला सांगितली. त्यामुळे गांधीजींच्या चळवळीत शिक्षित-अशिक्षित हा भेदच नष्ट झाला. किंबहुना, शिक्षित व्यक्तीने कोणताही अहंगंड बाळगू नये यावर गांधींनी भर द्यायला सुरुवात केली. पोषाखात थाट, इंग्रजी भाषेचा वापर, राहणीमानाचा दर्जा इत्यादी ज्या गोष्टी सुधारणेची लक्षणे बनत होती, त्यांना गांधीजींनी कटाक्षाने रजा दिली. स्वतः ते इतका साधा पोषाख घालू लागले की, स्वतः बॅरिस्टर असून ते एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे पोषाख घालतात, या गोष्टीने गांधी व बहुजनसमाज यांच्यातील अंतर एकदम कमी झाले. पुढे तर ते पंचाच नेसू लागले व त्यामुळे, रवींद्रनाथ टागोर यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे; 'भारतातील कोट्यवधी दरिद्री बांधवांच्या हृदयाचे दार त्यांना सताड उघडले गेले.' बहुजनसमाजात व तत्कालीन राजकारणी माणसांत जी दुर्लंघ्य दरी होती ती एकदम बुजवली गेली. १९२२ साली त्यांच्यावर अहमदाबादच्या कोर्टात जो खटला झाला त्या वेळी त्यांनी आपला व्यवसाय कोणता हे सांगताना 'मी शेतकरी व विणकरी आहे' असे उत्तर दिले. त्या वेळी सारा भारत या उत्तराने त्यांच्याकडे खेचला गेला. भारतात परतल्यापासून गांधीजी कधीही शहरात एखादे घर घेऊन व ऑफिस थाटून राहिले नाहीत. 'माझा भारत खेड्यात राहतो व खेड्यात राहणार,' असे ते म्हणाले. या साऱ्या गोष्टींचा बहुजनसमाजावर फार खोल परिणाम झाला, असे मला निश्चितपणे वाटते. त्यांच्या चळवळीमुळे महाराष्ट्राचा ग्रामीण भाग ढवळून निघाला यात मुळीच शंका नाही.

गांधींच्या विचारांचा स्वीकार करण्यासंबंधी महाराष्ट्रातील शिक्षित समाजात त्या वेळी गट पडले होते असे दिसून येते. टिळकांच्या पक्षातील काही मंडळी गांधीं-

कडे खेचली गेली. शिवरामपंत परांजपे, काकासाहेव खाडीलकर, गंगाधरतपं देशपांडे इत्यादि मंडळींनी असे मानले की, गांधीजींचे नेतृत्व हे टिळकांच्या कार्याची पूर्तता आहे. परंतु, सर्वसामान्यपणे असे चित्र दिसते की, १९२० ते १९३० या दशकात गांधीजींना महाराष्ट्रात विरोध करणारी पिढीच शिक्षित समाजात अग्रभागी होती. काकासाहेव गाडगीळ, शंकरराव देव, आप्पासाहेव पटवर्धन इत्यादि मंडळींना फार प्रतिकूल परिस्थितीत कार्य करावे लागत होते.

१९३० च्या दांडीयात्रेनंतर मात्र हे चित्र वदलू लागल्याचे दिसते. अशी एक नवी पिढी महाराष्ट्रात वर येत होती की, जिचे मन गांधीजींच्या क्रांतिकारक कल्पनांनी भारावले होते. या पिढीला गांधीविचारांचे व तत्त्वज्ञानाचे मर्म उलगडून सांगण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या वेळी विनोवा भावे, आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, काकासाहेव कालेलकर, दादासाहेव धर्माधिकारी आदि मंडळी करीत होती व त्यात त्यांना वरेच यश आले असे म्हणावे लागेल.

१९२९–३० नंतरच्या प्रत्येक सत्याग्रहात महाराष्ट्रात जे चैतन्य संचरत होते, ते कल्पनातीत होते. भारतातील इतर प्रांतांत गांधीजींसंबंधी जेवढे प्रेम, आदर असेल, तेवढाच त्या काळात महाराष्ट्रात निर्माण झाला होता, असे मी निश्चितपणे म्हणू शकतो. ज्या उत्कटतेने सारा देश त्यांच्या कार्यक्रमांत व चळवळींमध्ये सामील होत होता, तीच उत्कटता महाराष्ट्रात दिसत होती. विशेषतः महाराष्ट्रातील वहुजनसमाजावर गांधीजींचा जो परिणाम झाला तो अभूतपूर्वच होता. मी प्रत्यक्ष या गोष्टी पाहिल्या आहेत. 'महात्मा गांधी की जय' या गजराने गावेच्या गावे स्वातंत्र्याच्या भावनेने उद्दीपित होत असत. जात, धर्म, गरीबी–श्रीमंती इत्यादि भेद लुप्त होऊन जात असत. गांधी हा एक सर्वश्रेष्ठ संतपुरुष आहे, अशी भावना सर्वांमध्ये निर्माण होत असे. गांधीजी ज्या प्रकारच्या त्यागाची अपेक्षा करतील, तो त्याग करण्यास हजारो माणसे पुढे येत असत.

आता हे खरे आहे की, माझ्या पिढीतल्या अनेक तरुणांना गांधीजींचे टकळीचे तंत्र किंवा रामनामावरचा त्यांचा जोर पटत नव्हता. परंतु हा मतभेद किरकोळ होता. परदेशी सत्तेशी झगडण्याचा जो मूलभूत दृष्टिकोण गांधीजींनी देशापुढे ठेवला होता, तो आम्हांला आकर्षित करीत होता. परकीय सत्तेशी सामना देता देता एका नव्या धर्तीचा माणूस व समाज भारतामध्ये निर्माण व्हावा, ही गांधीजींची दृष्टी होती. शतकानुशतकांमध्ये भारतात असे मूलगामी कार्य झाले नव्हते. तसे हे कार्य होते. भारताच्या जागृतीचा एक नवा रस्ता प्रकाशमान केला जात होता.

सामाजिक समतेचा जो विचार गांधीजींनी मांडला, त्यामुळे तर वहुजनसमाज त्यांच्याकडे फार वेगाने आकर्षित होत गेला. माझ्या समजुतीने बुद्धानंतर एवढा क्रांतिकारक समतावादी विचार मांडणारा व त्याप्रमाणे प्रत्यक्ष कृती करणारा गांधीं-

शिवाय कोणीच झाला नाही. समाजक्रांतीचा नुसता विचार मांडणारे अनेकजण होऊन गेले. परंतु सामाजिक समतेसाठी एवढा जबरदस्त सामूहिक प्रयत्न करणारे आधुनिक काळात फक्त गांधीजीच होऊन गेले, हे मान्य करावे लागेल.

वयाने वृद्धत्व आल्यानंतरही नव्या पिढीला आकर्षित करण्याची अपूर्व शक्ती गांधींमध्ये होती. त्यामुळेच १९३० नंतर वर येणारी देशातील व महाराष्ट्रातील नवी पिढी जेव्हा समाजवादाकडे वळू लागली, तेव्हा त्यांच्या विचारांना मार्गदर्शन करण्याचे महत्त्वाचे कार्य गांधीजींनी केले, असे म्हटले तर ते अवास्तव ठरणार नाही. त्यामुळेच, टिळक व गोखले यांचे अनुयायित्व सांगणारी पिढी सोडली तर ; त्यानंतर गांधीजींच्या जीवनकार्याने प्रभावित झालेली पिढीच– शहरातली व ग्रामीण भागातली– महाराष्ट्रातही वर आलेली दिसत आहे.

गांधीजींचा व महाराष्ट्राचा संबंध केवळ संस्कारांच्या पातळीवर राहिलेला नाही; तर प्रत्यक्ष सहवासाच्या रूपानेही त्यांनी हजारो कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले आहे, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. गांधीजींचे वास्तव्य जेवढे महाराष्ट्रात झाले तेवढे इतर कोणत्याच प्रांताच्या वाट्याला आलेले नाही. गांधीजीवनदृष्टीचा व गांधीविचारांचा स्वीकार करीत असताना मराठी मनाला, महाराष्ट्राच्या संत–पुरुषांच्या परंपरेचे साहाय्य झाले असावे, असे म्हणण्यास मुळीच हरकत नाही. रक्त व तलवार या शब्दांऐवजी सत्य व अहिंसा या शस्त्रांचा स्वीकार भारतीय जीवनात व्हावा, ही गांधीजींची तळमळ होती. त्यात त्यांना यश किती आले हा प्रश्न वेगळा. परंतु त्यांची धडपड अपूर्व होती व सर्वसामान्य माणूस त्या धडपडीमध्ये रंगून जाऊ शकत होता, हे विसरता येणार नाही. दांडीयात्रेनंतर पराकाष्ठेचे आत्मक्लेश सहन करण्याचे जे अभूतपूर्व वातावरण देशभर तयार झाले, त्यात मराठी माणूस कोठेही मागे पडला नाही.

गांधी व महाराष्ट्र यांच्या संबंधाचा विचार करताना एक शेवटचा मुद्दा मनात येऊन जातो. तो असा की, आज गांधीविचारांचा परिणाम कितपत उरला आहे. या प्रश्नाचे उत्तर प्रत्येक माणूस आपापल्या अनुभवातूनच देऊ शकेल. मी मात्र असे निश्चितपणे म्हणेन की, महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनावर, अनेक सामाजिक संस्थांवर, शेकडो-हजारो लहानमोठ्या कार्यकर्त्यांवर गांधी-विचारांचा व गांधी-जीवनाचा ठसा आजही जाणवतो. अर्थात, जुन्या पिढीचे प्रतिनिधी ह्यात आहेत म्हणून हे जाणवत असावे. परंतु त्यानंतर काय होईल हे सांगणे कठीण आहे.

मात्र, एक आशा व्यक्त करणे अस्थानी ठरणार नाही. गांधीजीवन व गांधीविचार यांमध्ये जो क्रांतिकारक आशय आहे तो समजून घ्यावा, अशी एक प्रेरणा जगात पुन्हा निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. हिंसा व सांप्रदायिक राजकीय आचार याआधारे मानवाचे प्रश्न सुटत नाहीत, ही जाणीव बद्धमूल होऊ

लागली आहे. जन्मशताब्दीच्या निमित्ताने गांधींच्या विचारांची उजळणी घडू लागली आहे, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. गांधीजींनी जे विचार दिले आहेत ते युगायुगांना पुरणारे विचार आहेत. एका देशासाठी, एका पिढीसाठी किंवा एका विशिष्ट समाजासाठी गांधीजी जगले नाहीत. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांपैकी प्रत्येक गोष्ट आंधळेपणाने आपण स्वीकारावी, अशी त्यांचीही अपेक्षा नव्हती. राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीशी संबंधित नसणाऱ्या अशा किती तरी मूलभूत विषयांवर गांधीजींनी मौलिक विचार प्रदर्शित केले आहेत. त्या विचारांचा अभ्यास, वदललेल्या काळात व नव्या दृष्टिकोनातून, या पिढीत चालू व्हावा आणि स्वत:ला पटणारे विचार प्रत्यक्ष कृतीत आणणारे धाडसी प्रयोगवीर निर्माण व्हावेत, एवढीच अपेक्षा आहे. गांधीजींच्या जीवनकार्याचे यथार्थ मूल्यमापन कर-ण्याची शक्ती त्यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षीही आपल्यात आहे असे समजणे धाडसाचे होईल. परंतु काळ जसजसा उलटत जाईल, तसतसा गांधीविचारांचा आशय अधिक स्पष्ट होऊन मानवजातीचा एक अलौकिक ठेवा म्हणून त्याची महती वाढत जाईल, अशी माझी अपेक्षा आहे.

१७

# विश्व-शांतीचें तत्वज्ञान

## स्वामी रामानंदतीर्थ

गांधीजींनी मानवी जीवनाचे समग्र दर्शन घडविले. नीतिहीन अर्थ-व्यवस्था त्याज्य होय, असे त्यांनी निक्षून सांगितले व समाजातील शोषण कसे थांबेल, याचे मार्ग शोधून काढले. विज्ञान व आत्मज्ञान यांच्या संयोगातूनच विश्वशांती कशी निर्माण होऊं शकेल, याची मीमांसा पुढील लेखात वाचावयास सापडते.

महात्मा गांधी–जन्मशताब्दीच्या निमित्ताने भारतात व बाहेरही गांधी-विचारांचे मंथन होणे स्वाभाविक आहे. तसे एक युगपुरुष म्हणूनच नव्हे तर, मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याचे विचार पुढे मांडणारे एक द्रष्टे, म्हणूनही त्यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी जे काही सांगितले ते अखिल मानवजातीसाठी होते. त्यास देशकालाची मर्यादा नव्हती. म्हणूनच त्यांचे विचार हे जागतिक पातळीवरून तपासावे लागतात व कोणत्याही बदलत्या परिस्थितीत ते लागू होतात हे त्यांचे वैशिष्टय आहे. आजच्या परिस्थितीत तर त्यांची अत्यंत निकड आहे, हे थोडेफार विचार करणाऱ्यालासुद्धा सहज पटेल.

आजची जागतिक परिस्थिती कशी आहे याची यथायोग्य कल्पना येणे आवश्यक आहे. कोणत्याही देशाच्या नागरिकाला'आज तुला कशाची गरज भासते? ' असा प्रश्न केला तर तो हेच उत्तर देईल की, ' मला शांती पाहिजे, युद्ध नको.' दोन महायुद्धांच्या

अनुभवांतून त्याला जे भान झाले आहे ते या दोन शब्दांत सामावलेले आहे. युद्धाची भीषणता ही आजही त्याच्या जीवनात प्रतीत होते. काही युरोपीय राष्ट्रांत असे एकही कुटुंब नाही की, ज्यातील कोणा ना कोणा पुरुषाची युद्धामध्ये आहुती पडली नसेल. मानवतेचे रणक्रंदन चालू आहे. मानवजात भयग्रस्त आहे. जिच्यायोगे मानवी जीवन समृद्ध व्हावे ती अणुशक्ती मानवी जीवनाच्या संपूर्ण विनाशास कारणीभूत होते आहे. निसर्गाने दिलेली एक कल्याणकारी शक्ती संहारात्मक कार्यात वेचली जाईल, हे जगाचे दुर्दैव आहे. जेवढे राष्ट्र मोठे व जेवढी महान युद्धसंपदा तेवढी त्याला वाटणारी भीती अधिक आहे. हे विचित्र दृश्य आणि त्या भीतीमुळे आपला बचाव करण्याच्या हेतूने अधिक शस्त्रास्त्रे वाढविण्याकडे प्रवृत्ती हे विकृत मानवी विचारांचे दर्शन घडवते. अन्यथा रशिया व अमेरिका या दोन तुल्यबल राष्ट्रांना एकमेकांची भीती का वाटावी ? ह्या भीतीतून शस्त्रविसर्जनाची भाषा सुटलेली आहे व सरकारी पातळीवरून शस्त्रसंन्यासासंबंधी वाटाघाटी केल्या जातात, पण फलनिष्पत्ती मात्र फार कमी झालेली आहे. विज्ञानाच्या वेगवान धावेतून चंद्रावर स्वारी करण्याचेही प्रयत्न आज सफल होत असलेले दिसतात, पण ते मानवी कल्याणाच्या दृष्टीने टाकलेले पाऊल आहे असा विश्वास वाटत नाही. चंद्रावर पाऊल ठेवण्यापूर्वीच हे लढाऊ साधन म्हणून न वापरले जावे असे करारमदार करण्याच्या दृष्टीने वाचा फुटत आहे, ही विचारणीय बाब होय. अशा परिस्थितीत विश्वशांती कशी प्रस्थापित होऊ शकेल हा यक्षप्रश्न आहे; परंतु तो निकडीचा आहे व युद्धपिपासू वृत्तीचे संपूर्ण शमन करणे ही गोष्ट सर्वांनाच पटलेली आहे. जगाची परिस्थिती शांतिस्थापनेला अद्याप संपूर्ण अनुकूल झालेली कदाचित नसेलही, हे मान्य करूनही युद्धापासून निवृत्तीकडे मानवी अंतःकरणाचा कल आहे हे निःसंशय होय. मग अद्याप विश्वशांतीची जाणीव का होत नाही ? या प्रश्नाचा अधिक खोलवर विचार केला असता असे आढळून येईल की, जे प्रयत्न सरकारी पातळीवर केले जातात, ते जुजबी व वरवरचे आहेत. बाह्य परिस्थितीच्या आघातप्रत्याघाताचे जीवनाला जे चटके बसत असतात, त्यांचे शमन करण्याच्या दृष्टीनेच हे प्रयत्न होत आहेत. पण बाह्य परिस्थितीत ही दुय्यम बाब आहे. भीतीतून केलेले विश्वशांतीचे प्रयत्न निरोधात्मक (Negative) आहेत. सत्य, प्रेम करुणा ही जीवनाची महान मूल्ये आहेत. आज होत असलेले प्रयत्न या निष्ठेतून निर्माण झालेले नाहीत. मनुष्य हा पिंडाने चांगलाच आहे व मानवी जीवन एक आहे. त्याला राष्ट्र, भाषा, धर्म, यांच्या मर्यादा असू शकत नाहीत, हा विश्वास सर्वत्र दृढ होणे जरूर आहे. मानवी जीवनच एक आहे याचा अर्थ नीट समजावून घेण्याची आवश्यकता आहे. मानवी जीवनाचा खंडतुल्य विचार करता येत नाही; ते समग्र आहे. व्यक्ती व्यक्तीमधील, गटागटातील, एक समाज व दुसऱ्या समाजामधील, राष्ट्राराष्ट्रातील असमानता ह्या आज समाजात संघर्ष व ताण निर्माण करीत आहेत.

कारण भिन्नतेची भावना मूळ धरून वसली आहे. जेथे भिन्नता आली तेथे भीती ही ठेवलेली आहे. मग आपण वलवान व्हावे, शस्त्रसज्ज व्हावे व शक्य असेल तर अण्वस्त्रांची निर्मिती करावी, हा पर्याय शिल्लक राहतो. मग विश्वशांतीची भाषा कशी शोभेल? तेव्हा समाजव्यवस्था ही बंधुभाव, सहकार व एकमेकांना सांभाळण्याची प्रवृत्ती ह्याच आधारावर निर्मिली जावी. असे झाले तरच समाजात शांती नांदू शकेल व विश्वशांतीच्या प्रकाशाचे दर्शन होऊ शकेल.

विज्ञानाने मानवी समूहांस जवळ जवळ आणले आहे. राष्ट्रराष्ट्रातील अंतर तुटत आहे. इच्छा असो वा नसो, हजारो मैल अंतरावर घडणाऱ्या घटनांचे परिणाम सर्वत्र होत असलेले आढळतात. अमेरिकेच्या प्रेसिडेंटची निवडणूक ही जगाच्या कुतूहलाची वाब होऊन जाते, हे कशाचे गमक आहे ? टेलिव्हिजनच्या साह्याने दूर असलेल्या माणसाचे भाषणच आपण ऐकू शकतो असे नाही, तर त्यास आपण पाहूही शकतो. ही केवळ किमया नव्हे. हे विज्ञानाने घडविले आहे. अशा परिस्थितीत मानवी अंत:करण जवळ येणे अपरिहार्य आहे. ज्याला नीतीचा आधार नाही ते विज्ञान भस्मासूर होऊन मानवजातीचा संपूर्ण विनाश करील. विज्ञानाला आत्मज्ञानाची जोड मिळणे नितांत आवश्यक आहे. विज्ञान ही एक प्रचंड शक्ती आहे. त्याला दिशा नाही व निमित्तही नाही. ह्या दोन्ही गोष्टी त्यास उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत. विज्ञान व आत्मज्ञान यांच्या संयोगातूनच मानवजीवनाचे शुभ ईप्सित साध्य होऊ शकते.

म्हणूनच गांधीजींनी मूलग्राही असा विचार मांडला तो असा की, मनुष्या-मनुष्यातील संबंध हे विश्वासाचे व्हावेत; भीतीवर ते आधारलेले नसावेत. कारण गांधीजींची मूळ निष्ठा ही की, मनुष्य हा स्वभावत:च चांगला आहे. मानवी अंत:करणातील निसर्गदत्त चांगूलपणा ही त्याच्या विचारांची मूळ शिला आहे. जो आज विकृत आहे. तो सुध्दा सुसंस्कृत होऊ शकतो, हा मानवी प्रगतीचा क्रम आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. अमर्याद गरजा हे संघर्षाचे मूळ आहे. संयमित जीवन हे सुखाचे साधन आहे. परिश्रम करून जगणे यातच मानवता साठवलेली आहे. इतरांचे शोषण हे संघर्षाचे मूळ होय, असे ते सांगत आले आहेत. शोषणरहित समाजरचना हा त्यांचा आदर्श आहे व मानवी अंत:करणांतील स्वाभाविक सत्प्रवृत्ती जागृत करणे हा त्यांच्या विचाराचा मूळ हेतू आहे. समाजातून शोषणप्रवृत्ती नष्ट करावयाची असेल तर केन्द्रित उत्पादन-व्यवस्थेचा त्याग करून विकेन्द्रित व्यवस्था करावी, हा त्यांच्या आर्थिक विचारांचा गाभा आहे. म्हणूनच छोटे छोटे उद्योग व विशेषत: खादी व ग्रामोद्योग यांवर त्यांनी भर दिला. त्यांचा तपशील येथे देण्याचा मानस नाही. तो सर्वांना विदित आहे.

गांधीजींनी मानवी जीवनाचे समग्र दर्शन घडविले आहे. ज्या अर्थव्यवस्थेला नीतिमत्तेचा पाया नाही, ती अर्थव्यवस्था सर्वस्वी त्याज्य आहे, असे नि:संदिग्धपणे

त्यांनी घोषित केले आहे. शोषण हे अनीतिमान आहे. प्रत्येकाला श्रम करण्यास संधी असावी व स्वत:च्या कष्टावर जगता यावे. हे सर्व लोक शिकले तर, समाजव्यवस्था स्थिर राहू शकेल, सर्वांचे कल्याण होऊ शकेल. अन्यथा जीवनात नित्य घडणाऱ्या लहानसहान संघर्षांतूनच विश्वयुद्धाची ठिणगी उडेल. हे त्यांचे बोल किती सत्य आहेत हे आपण आज अनुभवीतच आहोत. गांधीजींच्या या जीवनदृष्टीला स्वतंत्र भारत पारखा झाला आहे. ज्या भूमीत गांधी जन्मले त्या भूमीत त्यांचे विस्मरण अती वेगाने व्हावे, यातही काही ईश्वरी संकेत असेल. सर्वत्र भ्रष्टाचार हीच भाषा आज ऐकू येते. यावर काही उपाय आहे काय ?

प्रवाह-पतित होऊन भारतीय नागरिक अशाच दिशाहीन अवस्थेत वहावत जाणार आहे का ? पण मनाला तसे वाटत नाही. देशातील सामान्य माणसाचे अंतःकरण अद्यापि सुव्यवस्थित आहे. याचे भान वेळोवेळी होत राहिले आहे. पं. नेहरूंनाही अखेरच्या क्षणी गांधींच्या मार्गाने जाण्यातच भारताचे कल्याण आहे, अशी जाणीव झाल्याचे त्यांचे निकटवर्ती सांगतात. गांधी–जन्मशताब्दीच्या निमित्त गांधीजींच्या विचारांचा विचार व्हावा. Unto This Last चे तत्त्व कार्यान्वित करण्याचे सामर्थ्य आपण संपादन करू या. आज हिंसक प्रवृत्ती वर उफाळून निघत आहे, तिचे शमन कसे होईल ? जुजबी उपायाने ते शक्य नाही. गांधीविचारांवर आधारलेली समाजरचना प्रस्थापित करण्यात आपणांस यश मिळवता आले तरच विश्वशांतीची स्थापना होऊ शकेल. अन्यथा आपणास मानवजातीचे नष्टचर्य संपले नाही असेच म्हणावे लागेल. पण अंतर्मन सांगते की, ईश्वराने मानवजातीस विनाशाकडे नेण्यासाठी निर्माण केले नाही. मार्टिन ल्यूथर किंगसारखे ज्योतिर्मय जीवन जगणारे व त्यातच विलीन होणारे हे आत्मे हे आमचे आशास्थान होय. ते नवीन जीवन प्राप्त करून देतील व त्याग, सेवा ह्यांची ज्योत सतत तेवत ठेवतील, अशी आशा आपण बाळगू या. गांधीजन्मशताब्दीच्या कालांत भारतात या गोष्टीचे योग्य असे भान होवो, ही प्रार्थना.

## १८

# शांतिप्रवण भारत व म. गांधी

म.म. द.वा. पोतदार

' आपली अहिंसा वीराची आहे—भीरूची नव्हे, ' असे गांधीजी म्हणत. त्यांच्या शांततेच्या तत्त्वज्ञानाचे वाहन होण्यास भारत पात्र कसा होता, भारत अन्य देशांचे भय-स्थान कधीच का झाला नाही, तो प्रधानतः शांतिप्रवण का राहिला, याची चर्चा पुढील लेखात केलेली आहे.

माणसे तेवढी सारखी, या म्हणण्याचा अर्थ एवढाच की, आपण सर्व माणसांना माणसे म्हणून समजून वागावे. पण जसजसा आपल्याशी संबंध येणाऱ्या माणसांचा परिचय वाढेल, तसतसे आपल्या अनुभवाची सर्वच माणसे सारखी नसतात; म्हणजे दोन हात, दोन पाय असे सर्व सर्वांना सारखेच असतात, पण इतर पुष्कळ प्रकारचा फरक ध्यानात येतो. माणसांचा परिचय त्यांना न बघताही होऊ शकतो, लेखनामुळे व अन्य प्रकारामुळे. आणि तेवढ्या-वरूनही त्यांची ओळख होऊ शकते.

महात्मा गांधींना प्रत्यक्ष पाहण्यापूर्वी त्यांच्याबद्दल मला अशीच लेखामुळे व अन्य रीतीने काही तरी माहिती झालेली होती. त्यांचे भाषण मी ना. गोखले यांच्या-विषयीच्या शोकसभेत पहिले ऐकले. त्यांची कृश मूर्ती उभी राहिली तेव्हा

अत्यंत हळू आवाजात त्यांनी सुरवात केली आणि मला क्षणभर वाटले की, हा कसला वक्ता ? पुढे त्यांचा आवाज चढत चालला आणि शांतपणाने त्यांनी सर्व श्रोते जिंकले. तसा त्यांचा चढलेला आवाजही फार मोठा नसे. दूरध्वनीच्या यंत्राचे साहाय्य तर नव्हतेच. तरीही श्रोत्यांची अंत:करणे आपल्याकडे ओढून घेण्याचे काही एक अपूर्व सामर्थ्य या वक्त्याच्या ठिकाणी आहे, असा प्रत्यय मला येऊन गेला. यापूर्वीही एक लहान भाषण गायकवाड-वाड्यातील स्वदेशी प्रदर्शनाच्या निमित्ताने लहानशा दिवाणखान्यात झालेले मी ऐकले होते. हिंदी आणि इंग्रजी ह्या दोन भाषांत मी त्यांची एकदोन भाषणे ऐकली. त्यांतल्या त्यांत इंग्रजी शब्दरचना ते फार सोपी, परंतु परिणाम-कारक करीत.

एकदा मी मुंबई-अहमदाबाद आगगाडीचा प्रवास करीत असता सुरतेच्या स्टेशनावर सूर्योदय होता होताच पोहोचलो होतो. पाय मोकळे करण्याकरिता खाली उतरलो, तोच शेजारच्या डब्यात म. गांधींची मूर्ती वाकवलेल्या गुडघ्याच्या आधाराने लिखाण करीत होती. बहुधा लोकांना माहीत नसावे, म्हणून स्टेशनावर त्यांच्या डब्यासमोर विशेष गर्दी नव्हती. माझ्या लक्षात आले की, गांधी एक क्षणही फुकट दवडीत नाहीत. म्हणूनच त्यांच्या हातून अनेक खंड भरतील, एवढे लिखाण झाले. तत्परतेने त्यांच्याकडून स्वदस्तुर उत्तरे येत. असे एक, त्यांचे छोटेसे उत्तर मलाही आलेले मी जपून ठेवले आहे. माझ्या पत्रातील विषयावर त्यांनी रीतीप्रमाणे विषयाचे महत्त्व पाहून अग्रलेखच लिहिला होता. इंग्रजी भाषेत बायबलच्या इंग्रजी भाषांतराची भाषा सर्वोत्तम आणि नमुनेदार गणली जाते. ' बिब्लिकल् इंग्लिश ' ह्या नावाने ती सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्या वळणाची अतिशय सोपी अशी भाषा लिहिणे अत्यंत कठीण समजले जाते. अशा या परकीय इंग्रजी भाषेत बिब्लिकल् वळणाचे इंग्रजी लिहिणारा गांधींसारखा कोणीही आढळला नाही. आपल्या भाषेच्या आणि त्यातील विचाराच्या सौंदर्याने गांधींनी सारे इंग्रजी विश्व मोहून टाकले.

असा गांधींनी इंग्रजी भाषेचा वापर केला. आपल्या देशांत, तरी त्या त्या विभागांतील देशी भाषांतून सर्व व्यवहार व्हावा आणि अखिल भारतीय व्यवहारा-साठी हिन्दी-हिंदुस्थानी भाषेचा उपयोग करावा, असा प्रचार ते अहोरात्र करीत. असा त्यांच्याइतक्या निष्ठेने या प्रकरणी प्रचार केलेला दुसरा कोणीही थोर पुढारी त्यांच्या बरोबरीला येणार नाही.

गांधींनी आरोग्य, भाषा, लिपी, दलितोद्धार, स्वदेशी, खादी, हिंदु-मुसलमान-ऐक्य, मजूरप्रश्न वगैरे सर्व समस्यांवर लेखन केले आणि आंदोलने उभारली. त्यांनी स्वराज्याची चळवळ केली. " छोडो भारत ''म्हणून इंग्रजांना बजावले आणि "करा किंवा मरा'' असा जनतेला संदेश दिला. प्रभात-फेऱ्यांची योजना काढून लहान

मुलांनाही स्वराज्योन्मुख केले. आपल्या विनम्र परंतु निश्चयी वागण्याने मोठे मोठे इंग्रज मुत्सद्दी त्यांनी नामोहरम केले. एका लहान पत्रांत गांधीजींनी इंग्रजांच्या राज्यप्रतिनिधीला लिहिले की, "मी मागितली भाकरी (ब्रेड) म्हणजे स्वराज्य. आणि आपण माझ्या पदरी टाकले, भाकरीऐवजी दगड (स्टोन्स)." एवढ्या दोन शब्दांत केवढा मोठा आशय गांधीजींनी नितान्त आर्ततेने मांडला. पुरुषांच्या बरोबरीला स्त्रियांनाही त्यांनी हजारोंच्या संख्येने आपल्यामागे आणले.

आपली सर्व चळवळ नुसत्या शांततेवर नव्हे, तर अहिंसेच्या तत्त्वांवर उभारली आहे, असा त्यांचा दावा होता. इंग्रजांनी गुप्त, प्रगट, उलटसुलट अनेक प्रकारची चौकशी ठेवली. परंतु स्वत: गांधी हे खरेखुरे अहिंसावादी आहेत यात काही खोट निघाली नाही. पूर्वीचे अनेक शस्त्रधारी क्रांतिकारी गांधींच्या चरणी लागले. "माझा अहिंसात्मक मार्ग ज्यांना पसंत नाही. त्यांनी आपल्या मार्गाने उघड उद्योग करावा. परंतु परक्या इंग्रजांची सत्ता नष्ट करण्यासाठी झेंडा उभारावा. मी त्या मार्गाला विरोध करीन. परंतु सशस्त्रांच्या देशभक्तीवद्दल मी कसलीही शंका प्रगट करणार नाही. अशा गुलामगिरीपेक्षा हिंसा बरी." अशा प्रकारचा युक्तिवाद ते करीत. अशस्त्रांची अहिंसा म्हणजे पलायनवाद नव्हे, तर ठासून उभे राहून अशस्त्र-पणे मृत्यूशी ठाम झुंज देणे होय. अशस्त्रांची अहिंसा म्हणजे दुवळेपणा नव्हे, ते वीरांचे निर्भयपण होय. माझ्या मते, सत्ताधारी इंग्रज नि:शस्त्र सत्याग्रहींचा पाडाव करण्या-साठी वहुतांशी पोलिसी दंडालाठीचाच उपयोग करीत, गोळीवारहि कधीकधी करीत. परंतु गोळीबाराची लढाई म्हणता येईल असे युद्ध ते इंग्रज खेळले नाहीत. तशा नाझी तंत्राचा अवलंव करून, गोळीवार आणि तोफखाना, जाळपोळ आणि बेचिराखी यांचा मारा इंग्रजांनी केला असता, तर ब्रेनगन्च्या मारापुढे छात्या पुढे करून एक पाऊलभरही मागे न हाटता पाय रोवून उभे रहाणारे, एकटादुसरा सत्याग्रही नव्हे, तर सत्याग्रहींचे हजारोंचे–लाखोंचे थवे हिंदुस्थानात किंवा जगात कोठेही आढळले नसते !

ते गांधींना उमजले नसेल, असे नाही. परंतु ते जातीचे मोडवाणी होते आणि काठेवाडांत एक म्हण आहे– 'कपाळे होय कोड पण पडोसे न होय मोड !' या बनिया परंपरेत गांधींचे जीवन विकसित झाले होते. त्यांच्या तरुणपणी इंग्लंडमध्ये त्यांना इंग्रजांचा स्वभाव अगदी जवळून पारखता आला होता. इंग्रज हे सुद्धा वनियागिरीत मुरलेले आणि वनियागिरीवरोबरच वीरवृत्ती आणि व्यवहार यांतही मुरलेले होते. वनियागिरीत कमालीचा हिशेबीपणा असावा लागतो. इंग्रज राजकीय हिशेबीपणांतही फार निष्णात होते. हिंदुस्थान आता शक्तीच्या जोरावर फार दिवस ताब्यात ठेवता येणार नाही, इतका असंतोष हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या, वयांच्या, धर्मांच्या स्त्री-पुरुषांत, वालापासून वृद्धांपर्यंत इतका मुरला होता की, ज्या काळचा सैन्याच्या जोरावर

आपली सत्ता आपण टिकवली, ते काळे सैन्यही आपल्या पाठीशी रहाणार नाही; मुसलमानही आपल्या पाठीशी रहाणार नाहीत. अशा आतून पेटलेल्या निखाऱ्यांवर वसून सुखाचे राज्य आपणांस कधीच करता येणार नाही, तेव्हा राणीच्या जाहीर-नाम्यापासून आपण दिलेली वचने पूर्ण करून शक्य तितके स्वराज्याचे दान भारतीय प्रजांच्या पदरी उदारपणे टाकावे ही मुत्सद्देगिरी इंग्रज खेळले. मग आपल्या हजारो वर्षांच्या परंपरेला अनुसरून भारतीय प्रजा त्यांना राज्य परत दिल्यावर सर्व विरोध विसरून आपल्याला धन्यवाद देतील, आपल्याशी मित्रता ठेवतील. जागतिक भूमिकेवर शक्यतोवर आपल्यावद्दल सहानुभूती वाळगतील. पूर्वी आपण व्यापारी म्हणून आलो. तसेच, "स्वतंत्र भारतातही आपण पुन व्यापार करून द्रव्य मिळवू. कायमचा द्वेष आणि शत्रुत्व पदरी पाडून घेण्यापेक्षा माघार घेऊन स्वराज्याचे दान करण्याचा आणि मागल्या दाराने व्यापारासाठी आत शिरण्याचा मार्ग आपल्या घसरत्या जागतिक क्रमांकाकडे लक्ष देऊन अधिक लाभदायक ठरेल.'' असा अगदी चक्क, रोखठोक धूर्त व्यापारी हिशेव इंग्रजांनी केला असला पाहिजे. लिहिले, बोलले नाही तरी त्यांचा पिंडच तसेच स्फुरण त्यांना देत राहिला असेल, –पण मेकॉले एकदा तशी भविष्यवाणी बोलून गेला होता–इंग्रज वनिया पिंडाचे हे स्फुरण आणि गांधी वनियाचे आंतरिक, पारंपरिक, आध्यात्मिक स्फुरण यांचा मेळ पडून भारतीय स्वातंत्र्याची निर्मिती झाली. आणि या निर्मितीत शेवटचा डाव गांधींच्या वनिया पिंडाने जिंकला. या जयाचे बीज रानडे, टिळक, अरविंद, सावरकर, भगतसिंग यांच्यापासून तो त्या-पूर्वीच्या वासुदेव वळवंत आणि १८५७ चे क्रांतिकारक किंवा मॅडम् कामापर्यंतचे स्वाभिमानी वीर या सर्वांनी आधीच रोवून ठेवलेले होते. त्यांतून जे यज्ञकुंड पेटत राहिले त्याची शांती गांधींच्या सत्याग्रही आहुतीने झाली. म. गांधी हे एक अलौकिक, मानवतावादी, क्रांतिकारक युगपुरुष होऊन गेले यात शंका नाही.

"गांधीच्या अहिंसेमुळे देश दुवळा बनला, देशाचे पौरुष गांधींनी खच्ची केले,'' असा एक आक्षेप मोठ्या त्वेषाने केलेला आढळतो. परंतु या आक्षेपात विशेष राम नाही. गांधी जे तत्त्वज्ञान मानीत होते, त्या तत्त्वज्ञानात लढाऊ, शस्त्रधारी सैन्याची योजना नव्हती. इंग्लंडमध्ये वर्तुळ-परिषदेकरिता गेले असताना हिंदुस्थानचे एकमेव प्रतिनिधी म्हणून त्यांनी हिंदी स्वातंत्र्याची मागणी खणखणीतपणे मांडली.

गांधींच्या वायवल–प्रेमामुळे इंग्लंडमधील चतुर पाद्री त्यांना अधूनमधून शनिवार–रविवारी वर्तुळ-परिषदेची सुट्टी पाहून, ख्रिस्ती मंदिरांत (चर्चमध्ये) प्रवचनासाठी बोलावीत. प्रवचनोत्तर प्रश्नोत्तरे होत. अशा प्रसंगी एका प्रश्निकाने गांधींना विचारले, "तुमच्या स्वराज्यात शस्त्रधारी सैन्य तुम्ही ठेवाल की नाही ?'' तेव्हा "नाही'' असे गांधी बोलून गेले. आणि अर्ध्या तासांत लंडनमधील वृत्तपत्रांनी नावडतोव मोठ्या अक्षरांनी ही वातमी ठळक अक्षरांनी सर्वत्र फैलावली.

ही गोष्ट कै. बॅरिस्टर मुकुंदराव जयकर यांनी स्वत: मला सांगितली होती. जयकर म्हणाले, " मी, श्रीनिवासशास्त्री, बॅरिस्टर तेजबहाद्दूर सप्रु वगैरे वर्तुळ परिषदेचे सभासद या प्रकाराने पेचात आलो. इंग्लंडचे मुख्यप्रधान रॅम्से मॅग्डोनॉल्ड यांनी मला तावडतोब बोलावून विचारले, " पाहिले का हा तुमचा गांधी काय म्हणतो? '' मग आम्ही गांधींची भेट घेतली. " हे काय संकट तुम्ही आमच्यावर आणले ?'' म्हणून त्यांच्याशी चर्चा करून एक गुळमुळीत पत्र गांधींकडून खुलासा म्हणून प्रसिद्ध करविले.

विचार करता गांधींनी पृच्छकाला दिलेले उत्तर हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे तर्कशुद्ध पर्यवसान होते. व्यावहारिक भूमिकेवरून अशी गोष्ट तावडतोब अमलात आणावी, असा गांधींचा हेतू नव्हता. मानवी व्यवहारातून शस्त्राचा संपूर्णत: लोप व्हावा म्हणजे मनुष्य पूर्णावस्थेच्या मार्गाला लागेल. अशी गांधींची तात्त्विक भूमिका होती. आपल्या 'सत्याच्या प्रयोगा'च्या गुजराती आवृत्तीत आपण राजकारणात का पडलो, याचा खुलासा गांधींनी असा केला आहे की, "मी सत्याचा शोधक आहे. सत्य म्हणजेच परमेश्वर आहे. सत्याने व्यापला नाही असा मानवी व्यापारच असू शकत नाही. राजकारण हे मानवी व्यापाराचेच एक अंग असल्याने त्या अंगानेही सत्याचा शोध करणे मला प्राप्त होते. इतके करूनही मला सत्याचा एक किरण सुद्धा हाती लागला आहे, असे दिसत नाही.'' ही गांधींची तात्त्विक भूमिका. पण राजकारण आणि इतर गोष्टी हा सर्व मानवी व्यापार केवळ सत्यपूर्ण होणे किंवा करणे, ही एक ब्रह्मसाधनेसारखी तात्त्विक गोष्ट होती. न जाणो लाखो वर्षेही त्याला लागतील. गांधी सत्याच्या शोधाच्या मार्गावरील पथिक होते आणि आपले प्रयोग भारतात करीत होते. आपण पुष्कळच अपूर्ण आहोत, हे ते ओळखून होते.

'एक वर्षांत स्वराज्य,' 'मला स्वराज्य मिळालेच आहे' इत्यादी घोषणा गांधीजी करीत. त्या व्यवहारवादाला धरून समजावून घेतल्या पाहिजेत. म्हणूनच " काश्मिरात मी फौजा पाठवीन,'' असे एका प्रसंगी गांधी उद्गारले. कोठे तरी क्षितिजाच्या कडेला किंवा त्या पलिकडे असलेले तात्त्विक पर्यवसान आणि व्यवहाराने लिडबिडलेल्या, राजकीय भूमिकेवरून, दूरवरच्या तत्त्वाच्या ध्रुवताऱ्याकडे बघत, जमीन न सोडता करावयाची वाटचाल. सैन्य ठेवावयाचेच नाही हे एक तात्त्विक टोक, तर आजच्या विकट प्रसंगात सैन्य चालवावयाचे, ही विद्यमान क्षणाची गरज. असा मेळ बसविला, म्हणजे गांधींना समजावून घेण्याचा यत्न सफल होईल. आपली अहिंसा भीरूची नव्हे, वीराची आहे, असे म्हणून अहिंसक वीरवृत्तीचे पोषण करावयाचे; पण एकाएकीच व्यवहार सोडावयाचा नाही. म्हणून त्यांनी शेवटी 'छोडो भारत,' 'करा किंवा मरा' असे लढाऊ संदेश दिले.

मी वर गांधींच्या आणि इंग्रजांच्या वनिया पिंडांचे महत्त्व विशद केले आहे.

आमच्याइकडील साधु-संतांच्या वचनांतून संसार ही माया आहे' 'संसार सोडा', 'झडझडोनी वाहला निघ', 'संसाराच्या नावे घालनिया शून्य, वाढता हा पुण्यधर्म केला,' पुन्हा 'आम्ही भाग्याचे भाग्याचे! आम्हां तांबे भोपळ्याचे' अशी लक्षावधी संत-वचने आमच्या कानी-कपाळी अहोरात्र पडत असतात. पण म्हणून संतांचे काळी किंवा आता किंवा त्यापूर्वी कोणी लाखो कोटींनी लग्ने करण्याचे सोडले, गावे सोडली आणि अरण्यांच्या वाटा धरल्या, अंगाला राख फासून गावोगाव फिरू लागले काय ? शेती सोडली, मळे सोडले, ना पोरे ना बाळे, खायला काय गवत आणि पाला--अशा अवस्थेत भारतातील कोटयवधी प्रजा गेल्या आणि तुकारामा-दिसारख्यांच्या विमानाला लटकून स्वर्गाच्या वाटेला लागल्या, असा वैराग्याचा देखावा या देशात एक दिवसही दिसला नाही. उलट, 'काशीस जावे, नित्य वदावे',' आवा चालली पंढरपुरा, वेशीपासून फिरली घरा' हाच प्रकार चालू राहिलेला दिसतो. संसारच धुमधडाक्याने चालले, लग्नमुंजीचे चौघडे वाजतच राहिले आणि कमलपत्राप्रमाणे पाण्यात राहून अलिप्तपणा साधण्याच्या किमया लोक करून पाहू लागले. लोक जमिनीवरच राहिले, पोराबाळांना खेळवीत बसले, दागदागिने घालून फिरवले, मारामाऱ्या आणि लढाया यात गुंतून राहिले, तरीही ते कीर्तने आणि पुराणे ऐकत राहिले, पंढरीच्या वाऱ्या करीत राहिले, टाळ-दिंडयांचे गजर चालत राहिले, संसारातच राहून मोक्षाच्या वाटा शोधीत राहिले. असे भारतीय समाजाचे चमत्कारिक परंतु मनोज्ञ दर्शन आहे.

संत आणि संतांचा उपदेश आम्ही शिरोधार्यच म्हणत राहिलो. पण तसे काही केले नाही, म्हणजे आपण संतास ठकवले किंवा आपण आपल्यास ठकविले, असा पक्ष स्वीकारावा लागतो. खऱ्या कर्मयोगाची वाट अशा गोंधळात पुष्कळ वेळा सुटते. पण मग जे आपत्तीत सापडतात ते दास्यात खितपत पडतात, लाचारीचे जीवन जगू लागतात. अशा वेळी त्यांना कोणी 'प्रबोधकारी' संत भेटतो. त्यांच्यापुढे कोणी 'गीतारहस्य' फुलवितो. मग चुकलेली वाट सोडून समाज खऱ्या वाटेवर येऊ लागतो, चतुर्विध पुरूषार्थ साधू लागतो. पराक्रम गाजवतो. आणि पराक्रमाच्या गाथा गातो. लोक स्वतंत्र होतात आणि स्वराज्याचा उपभोग घेतात. अधोगतीच्या वाटेने चाललेल्या समाजाला पाहून संतांचा 'संताळे' म्हणून चिडीने कित्येक उज्ज्वल देशभक्त धिक्कार करू लागतात. तो त्यांचा धिक्कारही सार्थ असतो. संतांचा उपदेशही बरोबर असतो. चूक होते ती ग्रंथ नीट लावण्याची—सम्यक् बोध करून घेण्याची.

असा सम्यक् बोध करून घेण्याच्या दृष्टीने भारतीय इतिहासाचे मनन केले असतां असा एक प्रश्न विचारावासा वाटतो की, भारतीय लोक, भारतीय समाज आणि भारतीय जीवन, शेकडो दोषांनी व्याप्त असेल. परंतु भारत हे आपल्याला भयस्थान आहे, असे भारताच्या शेजारी किंवा दूरस्थ अशा एखाद्या भारतेतर राष्ट्रास वाटल्याचा

दाखला आहे काय ? दाखले आहेत, ते भारतातील संपत्ती, वैभव यांवर लुब्ध होऊन भारतावर आक्रमण करणारांचेच आहेत. भारत भयस्थान आहे, या बाजूचा एकही दाखला नाही. हे जर मान्य असेल आणि हा सिद्धांत जर निर्दोष असेल, तर मग असे कां घडले ?

याला माझे उत्तर असे की, ही जी ऋषीमुनींची, साधुसंतांची, शिकवण पिढ्यान्-पिढ्या आम्ही ऐकत आलो, त्यामुळे आमच्यातील राजस-तामस वृत्तीची टोके काही अंशी तरी झिजून जाऊन त्यांना एक प्रकारचा शाळिग्रामी गुळगुळीतपणा आलेला आहे, एक प्रकारची मवाळी आलेली आहे, एक प्रकारचा नेमस्तपणा आणि करुणा आलेली आहे. म्हणजेच दिव्य मानवतेचा अगदी अल्पसा का होईना, साक्षात्कार येथील प्रजांना झालेला आहे. त्यामुळे येथील कोटचवधी जनता, इतर कोणत्याही प्रजांपेक्षा अधिक शांतिप्रवण आहे. ही त्यांची शांतिप्रवणता दुबळेपणातून उद्‌भवलेली नसून संत-महात्मे यांच्या उपदेशामृताच्या सतत वर्षावानेच उद्‌भवली आहे. भारतीयांची वाट पुष्कळदा चुकलेली आहे. मूर्खपणाचा लक्षणीय आविष्कार त्यांच्या चरित्रात चीड येण्याइतका झालेला आहे. हे सर्व जमेला धरूनही त्यांच्या शांतिप्रवणतेच्या आंतरिक स्पंदनांची जाणीव आपण करून घेतली पाहिजे.

अशा शांतिप्रवण भारतामध्ये शांतिवादी गांधींचे भारतमुक्तीचे कार्य आपल्याला शांतपणानेच समजावून घेता येईल. भारतमुक्तीचे वाटेकरी केवळ गांधी नाहीत, कदाचित फार मोठा वाटा इंग्रजांच्याकडेही जाईल. सुभाषबाबू, सावरकर प्रभृतींचाही वाटा कोणीही न्यायी माणूस केव्हाही नाकारणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम.... दि....
क्रमांक.... नों. दि....

## १९

# अहिंसा व जागतिक शांतता

पां. वा. गाडगीळ

अहिंसायुक्त असहकाराचे तत्त्व हिंस्र स्वभावाच्या जनतेवर गांधीजींनी कसे सोपविले? या प्रश्नाचे उत्तर व त्याला अमेरिकन तत्त्वज्ञ जॉर्ज केन्नान यांचा पाठिंबा हे पुढील लेखांत पहावयास मिळेल. गांधीजींनी भारतीय जनतेकडून अहिंसक असहकाराचा जो प्रयोग केला, त्याचा दुहेरी फायदा कोणता झाला, याची चिकित्सा पुढे केलेली आहे.

गांधीजींनी १९२०-२१ साली आपल्या असहकार तत्त्वाचा पुरस्कार जेव्हा केला व एक वर्षांत स्वराज्य मिळविण्याची प्रतिज्ञा जेव्हा जाहीर केली, तेव्हा आपल्या अनुयायांना आपली शिकवण किती समजली, ते ती आचरणात कितीशी आणतील, यासंबंधाने गांधीजींचे अंदाज जे असतील ते पुराव्याने सांगणे कठीण आहे. लोकमनाची वस्तुस्थिती तरी काय होती? गांधीजींच्या असहकार-तत्त्वाच्या पुकाऱ्याने देशांत राष्ट्रैक्यभावनेची जी जागृती झाली व स्वातंत्र्यप्राप्तीची जी आच जनतेच्या मनाला लागली, ती इतिहासात अद्वितीय होती. पण असहकाराचा अर्थ गांधीजींच्या मनात जो होता तो लोकांनी व गांधीजींपासून घोषणा आणि प्रेरणा घेणाऱ्या पुढाऱ्यांनी कितपत समजून घेतला होता?

**गांधींचे अगांधीयन अनुयायी**

कोणीच गांधीजींचा अर्थ समजून घेतला नव्हता व ज्यांना समजला असेल त्यांनी

तो प्रामाणिकपणे अमलात आणण्याचे ठरविले नव्हते, असेच घडलेल्या इतिहासावरून दिसते. जाहीर सभांतून पुढारी बोलत की --

"गांधीजींनी आम्हांला अहिंसायुक्त असहकार करायला सांगितला याचे कारण आमच्या अंगी अजून पुरेशी ताकद नाही; ती ताकद आणण्याचा मार्ग अहिंसा हा आहे; आजारातून बरे होत असताना डॉक्टर लोक हलके अन्न खायला सांगतात तशी ही अहिंसा आपल्या दुर्बल स्थितीत साम्राज्यशाहीशी लढण्याचा उपाय आहे. जनतेच्या अंगात ताकद भरली की, आपण शस्त्र वापरू. गांधीजीच आपल्या हाती शस्त्र देतील."

अशी भाषणे करणारी ही माणसे प्रामाणिक असत, त्यागी असत, ती वीरा-प्रवृत्तीची, राष्ट्रासाठी प्राणार्पण करणारी होती. उलट गांधींच्या असहकाराचा आत्मा शुद्ध, सात्त्विक, अद्वेष, निर्वैर, सद्भावपूर्ण अहिंसा हा आहे, अशी माझी त्या काळा-पासूनची खात्री आहे. पण आपल्या प्रचंड बहुसंख्य अनुयायांची अशी श्रद्धा नाही, हे गांधीजींना कळत असले पाहिजे. तरीही त्यांनी ही अहिंसायुक्त असहकारिता अशी अश्रद्ध अनुयायांच्या हाती कशी सोपविली, याचे मला आश्चर्य वाटे.

या अश्रद्ध अनुयायांचा गांधीजींच्या शिकवणीबाबत गैरसमज होता, यात त्यांचीही काही चूक नव्हती. अहिंसायुक्त असहकाराच्या एक वर्षाच्या आचरणाने लक्षावधी जनता स्वातंत्र्य मिळवू शकेल, इतकेच नव्हे, तर तात्त्विक दृष्ट्या अथवा व्यावहारिक दृष्ट्या अहिंसेवर कधीच श्रद्धा न ठेवलेली जनता एक वर्षपर्यंत प्रामाणिक अहिंसाचरणाला समर्थ ठरेल असे गांधीजींना वाटले असावे, असे मुळीच मानता येणार नाही. सरकारी शाळाकॉलेजे, कोर्टकचेऱ्या यांवरील बहिष्काराची मोहीम सुरुवाती-पासून बारगळत चालली होती. द्वेष, तिरस्कार वगैरे जे विकार गांधीजींना त्याज्य वाटत त्यांचा तर धुमाकूळ प्रचारात माजला होता. पुढे कायदेमंडळावरील बहिष्काराचे चळवळ फोल ठरली; सत्याग्रहाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीने काय-देमंडळांवरील बहिष्कार रद्द ठरविला आणि चौरीचौऱ्यात क्षुब्ध जनतेने पोलिसांना जाळून मारले. या सर्व घटनांवरून अहिंसायुक्त व निर्वैर अशा असहकाराला पुढारी व जनता अपात्र आहेत, हे गांधीजींना कळले होते. तरीही पुढे आमरण अठ्ठावीस वर्षेपर्यंत जनतेला अहिंसा-मार्गावर नेण्यासाठी भारतीय जनतेचे नेतृत्व गांधीजींनी का केले ?

**स्वतः गांधीही अगांधीयन**

गांधीजींच्या स्वतःच्या शिकवणीवरून चारित्र्याची जी कसोटी ठरते तिला ते स्वतः उतरले, असेही वाटत नाही. उदाहरणार्थ, पिळवणूक थांबविणे हा नवसमाज-बांधणीचा पाया होय, असे गांधीजी मानीत. पण शेतकऱ्याच्या मालाला कमी भाव देऊन व्यापारी शेतकऱ्याला लुटतो, तेव्हा शेतीमालाला योग्य किंमत मिळावी यासाठी

संघटित चळवळ करावी,अशी सूचना गांधीजींपुढे अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांनी मांडली असता गांधीजींनी तिची उपेक्षा केली. त्रिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षपदावर सुभाषबाबू रीतसर निवडून आले असता गांधीजींनी राजकोटप्रकरण कृत्रिम रीतीने उत्पन्न करून व तेथे आपले प्राण पणास लावून साऱ्या जगाचे लक्ष त्रिपुरा काँग्रेसकडून स्वत:कडे ओढून घेतले. पुढे काँग्रेस-पुढाऱ्यांनी ज्या प्रकारे सुभाषचंद्रांना वागविले व काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले ते सर्व राजकारण अन्याय्यच झाले. ' राजकारणात टिळक न्यायअन्याय पाहात नाहीत, 'असे गांधीजी बोलले होते. पण सुरत काँग्रेसला रासविहारी घोष यांचे नाव अध्यक्षपदासाठी आले असता टिळकांनी अगदी नियमास धरून त्यांना विरोध केला. त्या मानाने गांधीजींचे सुभाषचंद्रांबद्दलचे वर्तन अन्याय्य ठरते. मोपल्यांच्या बंडात धार्मिकता माजून हिंदूंची कत्तल झाली, तरी गांधीजींनी मोपल्यांचा निषेध केला नाही. मला अशी उदाहरणे वाढवावयाची नाहीत. अहिंसायुक्त व निर्वैर अशी असहकारिता हे गांधीजींचे महान तत्त्व असून मानवी जीवनातील तत्त्वज्ञानात त्यांनी ही नवी भर घातली. जे दुष्ट व पापमय असेल त्याचा लोप करण्याचा अविध्वंसक मार्ग हाच आहे; अशी माझी या चळवळीच्या आरंभापासून खात्री आहे. " यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वापि स इमाँल्लोकान्न हन्ति न निबध्यते ।।'' या गीतेच्या अठराव्या अध्यायातील श्लोकातला विचार काल्पनिक आहे, असे गांधींनी गीतेवरील आपल्या टीकेत म्हटले असून मला ते पटलेले आहे. शुद्ध बुद्धीने केवढेही क्रूर कर्म केले तरी ते पाप नव्हे, हा विचार मला कधीच पटलेला नाही. दुष्कर्माची सवय लागू शकते व मग बुद्धीचा विशुद्धपणा लोपून जाऊन बुद्धी मलिन होते. म्हणून बुद्धी व कृती या दोन्ही विशुद्ध असल्या पाहिजेत, असे गांधीजी मानीत व ते खरे आहे. अशा गांधीजींनी आपले अहिंसायुक्त व निर्वैर असहकाराचे तत्त्व आमलात आणण्याचे काम हिंस्र स्वभावाच्या, तात्कालिक स्वार्थामागे लागलेल्या नैतिक व विवेकशून्य अशा जनतेवर कसे सोपविले ?

**जॉर्ज केन्नान व अहिंसा**

मला हा प्रश्न कित्येक वर्षे डाचत होता. हे तत्त्व हा जगातील वाढत्या हिंसेवर तोडगा आहे, याबद्दल माझ्या मनात शंका नव्हती. पण अडाणी अथवा अप्रामाणिक, अथवा हे दोन्ही अवगुण अंगी असणाऱ्यांच्या हातून श्रेष्ठ तत्त्वाची बदनामी व पिछेहाट होणार नाही का, अशी शंका माझ्या मनात येई. १९५८ च्या आरंभी केव्हा तरी प्रसिद्ध अमेरिकन राजकीय तत्त्वज्ञ व मुत्सद्दी जॉर्ज केन्नान यांची बी. बी. सी. वर झालेली व्याख्याने मला वाचायला मिळाली. तीत मला या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर सापडले. म्हणजे केन्नानने हा प्रश्न उपस्थित करून त्याचे उत्तर दिले असे नव्हे. अहिंसात्मक असहकाराचा त्याने त्या व्याख्यानमालेतील एका व्याख्यानात

स्वतःच मोठ्या आग्रहाने पुरस्कार केला. पश्चिम युरोपावर कम्युनिझम्चे आक्रमण होईल, अशी त्या वेळी भीती होती. रशियाजवळ जसा सर्वसंहारक बॉम्ब आहे, तसाच तो अमेरिकेजवळ असून अमेरिका पश्चिम युरोपच्या रक्षणाला वचनबद्ध आहे, हे जगजाहीर होते. त्यामुळे रशिया आक्रमण करणार नाही असा संभव होता. पण त्या त्या देशातील कम्युनिस्ट उठाव करतील व मग रशियाने त्यांना मदत केल्यास अमेरिका अॅटमबॉम्ब घेऊन येईल, अॅटॉमिक युद्ध माजेल व दोन्ही पक्षांकडील जनतेचा संहार होईल , असा संभव दृढ होता. केन्नान याने हे सर्व आपल्या व्याख्यानात सूचित केले आणि " अशा वेळी पश्चिम युरोपीय जनतेने आत्मक्लेश व आत्मार्पण यासाठी तयार होऊन कम्युनिस्ट आक्रमकांशी अहिंसात्मक असहकार करावा,'' (आशय) असे मत मांडले. हे मत केन्नान यांनी गांधीजींपासून घेतले, असे उघड दिसत होते.

केन्नान यांनी त्या व्याख्यानात असे म्हटले नाही. पण केन्नान हे तत्त्वज्ञ असले तरी त्यांच्या वैचारिक पार्श्वभूमीत पश्चिम युरोपात रूढ असलेली लोकशाहीनिष्ठा आहे. या लोकशाहीने शस्त्रबलाने आत्मरक्षण करावे हाच विचार त्या लोकशाहीत आधारभूत व परंपरागत आहे. म्हणून अहिंसात्मक असहकार हे केन्नान यांनी युरोपला उद्देशून मांडलेले मत त्या व्याख्यानात अचानक वाटते. ते त्यांनी तेथे सोपपत्तिकपणे मांडलेलेही नाही. पश्चिम युरोपात कोणी ते व्यवहार्य मानील, अशी परिस्थिती केन्नान यांना दिसत नव्हती हे उघड होते. फक्त एक चांगली कल्पना, फारशी चर्चा न करता, पश्चिम युरोपच्या भवितव्याविषयी हताश झालेल्या मनःस्थितीत केन्नान यांनी मांडली. यावरून त्यांनी ती कोणाकडून तरी घेतली होती असे मानता येते. ती त्यांनी गांधीजींकडून घेतली असली पाहिजे. हे माझ्या लक्षात येण्यास फारसा वेळ लागला नाही.

### गांधीजींची कामगिरी

आणि मग अहिंसात्मक असहकारितेच्या प्रयोगासाठी वरीच कमी पात्रता असलेल्या भारतीयांना या प्रयोगासाठी गांधीजींनी का निवडले असावे, याचा मला उलगडा झाला. आत्म्याला त्याचे जे काही उद्दिष्ट असेल ते साध्य करण्यासाठी जड शरीराचा आश्रय करावा लागतो; मग त्या जड शरीराचे गुणावगुण व त्याच्या मर्यादा स्वीकारून उद्दिष्टसिद्धी करावी लागते.त्याप्रमाणे गांधीजींना आपल्या तत्त्वाच्या सिद्धयर्थ (व प्रथम प्रसिद्धयर्थ) भारतीय जनता हे 'वाहन' म्हणून पत्करावे लागले. स्वतःचे मानवतासहज दोष असलेले व्यक्तित्वही याच कामासाठी त्यांनी वापरले. विज्ञानाचा प्राध्यापक ज्याप्रमाणे टेबलावर विज्ञानाचे प्रयोग करून श्रोत्यांना समजून देत असतो, त्याप्रमाणे गांधीजींनी प्रथम आफ्रिकेतील भारतीयांमार्फत व नंतर भारतीय जनतेमार्फत अहिंसात्मक असहकारितेचा प्रयोग करून त्याचे विवेचन भाषणात व लिखाणात

सतत चाळीसपन्नास वर्षे केले व जनतेपुढे आचरणाचा आग्रह धरला. विज्ञानाच्या प्रयोगातील साहित्य व वातावरण प्रयोगास योग्य असे नसले म्हणजे प्रयोग पूर्ण यशस्वी होत नाही, पण जेवढे यश येते तेवढ्यावरून प्रमेयाची सत्यता पटते व विवेचन ऐकून श्रोते स्वतः प्रयोग करण्याला प्रवृत्त होतात. असेच गांधींनी केले. आफ्रिकेत व भारतात अहिंसात्मक असहकाराचा जो प्रयोग गांधीजींनी केला व ज्याचे त्यांनी प्रसंगाप्रसंगाने सतत केलेले विवेचन जगभर वाचले गेले, तो प्रयोग एखाद्या मोठ्या जनतेला हाताशी धरून गांधीजींनी केला नसता व नुसतेच लेख लिहिले असते, तर जगात व भारतात त्याकडे कुणी ढुंकूनही पाहिले नसते.

गांधीजींनी दीर्घकाल भारतीय जनतेला हाताशी धरून प्रयोग केला याचा दुहेरी फायदा झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यामुळे थोडा तरी संयम आला, शिस्त आली व दुसऱ्या कोणत्याही आवाहनाने जी राष्ट्रीय एकजूट होऊ शकली नसती, ती अहिंसात्मक आवाहनानेच घडवून आणली. जगाचे व ब्रिटिश जनतेचे सहानुभूतिपूर्ण लक्ष भारताच्या प्रश्नाकडे वेधण्यालाही गांधींचा अहिंसा व निर्वैर याबद्दलचा आग्रह हाच कारण झाला. हा सारा भारताच्या दृष्टीने झालेला फायदा महत्त्वाचा आहेच. शिवाय अहिंसायुक्त असहकार व्यवहारात आणण्याचा आग्रह व त्याचा सतत दीर्घकाल प्रचार गांधींनी केला व ब्रिटिश सत्तेला या शिकवणीने हादरा दिला, त्यामुळे जगाचे लक्ष या उपायाकडे वेधले, हा दुसरा मोठा फायदा झाला.

**'मी चेक असतो तर'**

हा दुसरा परिणाम केवळ पर्यायाने झाला असेही नव्हे. गांधीजींनी युरोपीयांपुढे त्यांच्याही स्वातंत्र्य-रक्षणासाठी हा उपाय मांडला, त्यामुळे युरोपीयांचे लक्ष त्याकडे वेधले गेले. माझ्या समजुतीने गांधींनी म्युनिच करारानंतर १५ ऑक्टोबर १९३८ रोजी 'हरिजन' मध्ये 'मी चेक असतो तर' (If I were a Czech) हा जो लेख लिहिला व जो त्या वेळच्या जगात सर्वत्र गाजला, त्याचा परिणाम केन्नान यांच्या मनावर खोलवर झाला असावा, असे केन्नान यांच्या बी. बी. सी. वरील व्याख्यानावरून वाटते. गांधीजींचा लेख प्रसिद्ध झाला, तेव्हा फॅसिस्ट आक्रमणाचा प्रतिकार शस्त्राने करावा की अहिंसेने करावा, हा प्रश्न वादग्रस्त होता किंवहुना तो प्रश्न वादग्रस्तही नव्हता. सशस्त्र प्रतिकार अथवा शरणागती एवढेच दोन मार्ग सर्वांना दिसत होते. अहिंसात्मक असहकाराचा मार्ग एकट्या गांधींनी सुचविला. त्या काळी वादाची एक बाजू म्हणूनही कोणी गांधींच्या त्या सूचनेचा स्वीकार केला नाही. पण गांधींच्या त्या लेखाची 'अव्यवहार्य' म्हणून परदेशात हेटाळणी झाली, तरी उपेक्षा झाली नाही. त्यानंतर वीस वर्षांनी म्हणजे दुसऱ्या महायुद्धाने पश्चिमी विचारवंतांना अंतर्मुख केल्यानंतर केन्नान यांना कम्युनिस्टांचे आक्रमण युरोपात होईल अशी जेव्हा भीती वाटली, तेव्हा हिंसात्मक मार्ग अव्यवहार्य म्हणून केन्नान यांनी बाजूला सारला व

गांधीजींचे नाव न घेता, 'मी चेक असतो तर' या लेखात गांधींनी सांगितलेलाच उपाय पश्चिम युरोपपुढे मांडला.

पुढे ५ नोव्हेंवर १९३८ च्या लेखात चेक प्रकरणाचाच विषय पुढे चालवून गांधीजी म्हणतात–

"एक गोष्ट निश्चित आहे की, केवळ माथेफिरूपणातून जन्मलेली शस्त्रास्त्र-संवर्धनाची शर्यत जर अशीच पुढे चालू राहील तर परिणामी इतिहासात कधीही झाली नाही, एवढी हत्या त्यामुळे झाल्याशिवाय राहणार नाही. अशा युद्धात एखादे राष्ट्र जर विजयी होऊन जिवंत राहिले, तर त्याचा तो विजय हा जिवंतपणीच मृत्यू होय, असा अनुभव त्या विजयी राष्ट्राला येईल."

**केन्नान यांची प्रेरणा**

आज अण्वस्त्रबंदीसाठी रशिया व अमेरिका प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत, त्याचे कारण गांधीजींनी तीस वर्षांपूर्वी व्यक्त केलेल्या भीतीनेच त्यांना ग्रासले आहे हे होय. अहिंसात्मक असहकारिता हा विचार युरोपियांना अजून फार दूरचा असला, तरी केन्नान यांनी १० वर्षांपूर्वी तो विचार मांडला आहे आणि त्या उपायाची प्रेरणा गांधीजींनी भारतात केलेल्या प्रयोगातून व गांधींच्या 'मी चेक असतो तर' या लेखातून केन्नान यांना मिळाली असेल, हे उघड आहे.

'अहिंसात्मक असहकारिता हा विचार युरोपीयांना अजून फार दूरचा आहे' असे मी आताच म्हटले, ते युरोपीयांच्या मनात अजून तो विचार येत नाही एवढ्याच-पुरते खरे आहे. त्यातही मॉर्टिन ल्यूथर किंग यांनी, अपवादात्मक रीतीने का होईना, अमेरिकन निग्रोंना गोऱ्या लोकांत बरोबरीच्या नात्याने मिसळता येईल अशी परिस्थिती निर्मिली जाण्याचा मार्ग अहिंसात्मक असहकार हाच आहे असे म्हटले. यावरून पश्चिमी विचारवंतांना हा उपाय इष्ट व अपरिहार्य आहे असे वाटू लागले, ही या विचाराची फार मोठी प्रगती होय. पण हा विचार पश्चिमी विचारवंतांना आता अथवा उशीरा केव्हाही पटो, त्या विचाराची, त्या उपायाची अपरिहार्यता पुन्हा चेकोस्लोव्हाकियाबाबतच निर्माण झाली आहे, ही महत्त्वाची गोष्ट होय. १९६८ च्या ऑगस्टमध्ये रशियाने चेकोस्लोव्हाकियावर जे सशस्त्र आक्रमण केले, त्यामुळे आपण गुलाम झालो व ही गुलामगिरी तोडली पाहिजे असे जर चेक जनतेस वाटत असेल, तर तिने गांधींचा अहिंसात्मक व निर्वैर असहकार हाच मार्ग वापरला पाहिजे, अशी अनिवार परिस्थिती आज उत्पन्न झाली आहे.

**नवे चेक प्रकरण**

आज गांधीजी असते तर त्यांनी असे लिहिलेच असते. आजची परिस्थिती १९३८ हून फार वेगळी आहे. त्या वेळी गांधींनी 'मी चेक असतो तर' या लेखात लिहिले होते की, "चेकोस्लोव्हाकियाने आपल्या स्वातंत्र्यासाठी जागतिक युद्ध व्हावे

ही इच्छा वाळगू नये; उलट फ्रान्सला व ब्रिटनला आपल्या रक्षणाच्या जबाबदारीतून मुक्त करावे व स्वत: चेक जनतेने अहिंसायुक्त असहकाराचा मार्ग परकी सत्ताधाऱ्यांविरुद्ध वापरावा.'' पुढे एक वर्षाने पोलंडप्रकरणी दुसरे महायुद्ध झाले. त्यात पूर्व युरोपीय राष्ट्रे दोन्ही बाजूंनी उध्वस्त झाली. शेवटी चेकोस्लोव्हाकिया स्वतंत्र झाला. पण तेथली लोकशाही कम्युनिस्टांनी बुडविली व आता रशियाने चेकोस्लोव्हाकियाचे स्वातंत्र्यही बुडविले आहे. या वेळी तिसरे महायुद्ध होऊन चेकोस्लोव्हाकिया पुन्हा मुक्त होईल ही आशा राहिलेली नाही; ही या वेळी अगदी नवी परिस्थिती आहे. कारण, रशियाच्या आक्रमणानंतर जगातील बड्या राष्ट्रांनी या प्रकरणातून युद्ध उद्भवू नये यासाठी प्रयत्नांची शिकस्त चालविली असून, चेकोस्लोव्हाकियाला त्यांनी असे स्पष्ट-अस्पष्ट कळविलेही आहे. सारांश, केन्नान यांनी १९५८ सालच्या भाषणात ज्या संभाव्य परिस्थितीचे चित्र रेखाटले व अहिंसायुक्त असहकाराचा उपाय सुचविला, ती परिस्थिती अगदी त्या चित्रातल्यासारखी आज चेकोस्लोव्हाकियात आली आहे.

**निर्वैर नसलेले बलिदान**

चेकोस्लोव्हाकियात याची थोडीशी जाणीव झाली आहे. पण अहिंसात्मक असहकार याचा नेमका अर्थ काय, हे तेथल्या लोकांना माहीत नसावेसे दिसते. रशियाच्या आक्रमणास विरोध दर्शविण्यासाठी पलाश नावाच्या विद्यार्थ्याने स्वत:ला जाळून घेतले, हा अहिंसात्मक प्रतिकार होय असे मत भारतात व परदेशांतही काही टीकाकारांनी व्यक्त केले आहे. पण ते बरोबर नाही. पलाशची वृत्ती, त्याने स्वत:लाच जाळले असले तरी, हिंसेत व अविचारात जमा होईल. कारण त्याच्या भयानक व क्लेशकारक आत्महत्येतून हाडवैर, हिंसा व दडपशाही उत्पन्न होणारच हे ठरते. गांधीजींच्या असहकारात प्रतिपक्षाचे हृदयपरिवर्तन हे अपेक्षित असते. त्यात कोणत्याही पक्षी अतिक्लेश हे अपेक्षित नाहीत. परकी राज्यकर्त्यांची राज्यसत्ता ज्या हजारो स्वकीय लोकांनी चालवायची, त्यांनी ते चालविण्याचे नाकारून शक्य तर प्रतिस्पर्धी राज्य स्थापायचे व त्यासाठी होईल ते शासन भोगायचे, अशी ती कल्पना आहे. या वर्तनात कठोर अशी सामुदायिक शिस्त व संयम अपेक्षित आहे. पश्चिमी राष्ट्रांत आधुनिक औद्योगिक जीवनाने ही शिस्त आलेली असून चेक-प्रकरणी लिहिताना गांधीजींनी "अहिंसात्मक असहकार आचरणांत आणताना पश्चिमी राष्ट्रांत व खुद्द चेकोस्लोव्हाकियातही अनुकूल परिस्थिती आहे,'' असे मत व्यक्त केले आहे. इतकेच नव्हे तर "ज्या पश्चिमी राष्ट्रांत लोकशाही आहे त्यांची ती लोकशाही शस्त्रास्त्र-शर्यतीत टिकणार नसून त्यांना लोकशाही टिकविण्यासाठी अहिंसात्मक मार्गाचाच अंती अवलंब करावा लागेल,'' असे गांधींनी म्हटले आहे.

**'बैलाचिये पाठी साखरेच्या गोण्या'**

भारतीय स्वातंत्र्य-लढ्यांत अपूर्णपणे व सदोषपणे वापरला गेलेला हा उपाय

त्या लढ्याने जगापुढे मांडला व जगाचे लक्ष त्याकडे वेधले, ही त्या लढ्याची व तो लढा लढविणाऱ्या भारतीय जनतेची ऐतिहासिक महती होय. भारतीय जनतेचे दुर्दैव हे की, स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर या उपायाचा भारतास आत्यंतिक विसर पडला असून येथे सर्वत्र आसुरी संपत्ती उसळली आहे व भारताने जी कामगिरी केली असे वर म्हटले ती, "बैलाचिये पाठी साखरेच्या गोण्या" यासारखी झाली आहे. पण तरीही पश्चिमी जनतेला या 'साखरेच्या गोण्या' पश्चिमी जनतेच्या गरजेच्या काळी भारताने पोचविल्या, ही भारताची ऐतिहासिक कामगिरी मोठी आहेच. आता काळ वेगाने वदलत आहे. वैचारिक आंदोलनांत वेग व डोळसपणा येत आहे. शस्त्रांची निरुपयोगिता सिद्ध होत असून इतर मार्ग पश्चिमी विचारवंत शोधीत आहेत. केन्नान, किंग यांच्यासारख्यांना गांधींचा मार्ग आठवत आहे, सुचत आहे. पश्चिमी राष्ट्रांतच त्याचे अधिक संशोधन व आचरण होऊन अहिंसेचा विचार व आचार अधिक सुधारलेल्या स्वरूपात भारतात परत येईलही. भारतातून कच्चा माल युरोपात पाठवून त्याचा पक्का माल आयात करण्याच्या इतिहासातून आपण गेलो. तात्त्विक आचारविचारांतही असा इतिहास पुन्हा घडणारसे दिसते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 10767 ६ वि:
क्रमांक 9602 नों. दि. 30/11/६

२०

# क्रांति-दर्शन : मार्क्सचें व गांधींचें

ना. ग. गोरे.

मार्क्सप्रमाणेच गांधीजींनीही आदर्श समाजव्यवस्थेचे चित्र आपल्या डोळ्यांपुढे ठेवले होते. पण मार्क्सची अनेक स्वप्ने धुळीस मिळाली. गांधीजींच्या आदर्शाचे भवितव्य काय आहे, याचा विचार करणे सर्व लोकशाही-प्रेमी विचारवंतांना आवश्यक आहे.

कॉलेजात मी होतो त्या वेळी सर्व कालचे तरुण समजतात त्याप्रमाणे आम्ही स्वतःला क्रांतिकारक समजत असू. त्या वेळी मार्क्सवादाचा प्रचार भारतामध्ये विशेष जोमाने सुरू झालेला होता. व्हिक्टर गोलांझकडून प्रसिद्ध होणारी पिवळ्या वेष्टनांतील मार्क्सवादी विचारसरणीची पुस्तके दृष्टीस पडू लागली होती आणि आम्ही त्यांच्यावर तुटून पडत होतो.

ज्यांची मते स्वतःच्या मताशी मिळती नाहीत, त्यांना निकालात काढण्यासाठी मार्क्सने व त्याच्या शिष्यांनी वेगवेगळ्या तीव्रतेच्या शिव्या शोधून काढलेल्या आहेत. प्रतिक्रियावादी ( Reactionary ), पंथभ्रष्ट ( Renegade ), हातमिळव्या ( Collaborationist ) इत्यादि इत्यादि. त्यांतली स्वप्नाळू अथवा स्वप्नवादी ( utopian ) ही शिवी सर्वात सौम्य म्हटली पाहिजे. आपल्यापूर्वीचे ओवेन वगैरे समाजवादी स्वप्नाळू किंवा स्वप्नवादी होते, आपला समाजवाद शास्त्रीय आहे असा दावा मार्क्सवादी करीत असतात, म्हणजे ते एक प्रकारे त्यांचा गौरवच करतात,

असे म्हटले तरी चालेल. आपण आपल्या एखाद्या नातेवाइकाला नाही म्हणत का, की तो भावडा, व्यवहार कमी समजणारा आहे म्हणून. तरीही आपण त्याला आपल्या कुटुंबापैकी मानतोच. त्याचप्रमाणे स्वप्नवादी समाजवादी देखील समाजवाद्यांच्या गोतावळ्यातलेच, पण जगाचा व्यवहार न समजणारे, भावडे, वेंधळे, कार्यकारण-भावाची साखळी न जाणणारे आहेत, असे मार्क्सवाद्यांचे म्हणणे असते. गांधीजींची गणना आम्ही आमच्या कुटुंबात करीत होतो, नव्हे त्यांना कुटुंबामधील पित्याचे स्थान देत होतो, पण त्यांना समजत होतो मात्र स्वप्नवादी.

विवाहोत्तर ब्रह्मचर्यपालन, वर्णाश्रमधर्मावर विश्वास, विश्वस्ताची कल्पना इत्यादि गांधीजींचे विचार मला अजूनही स्वप्नवादीच वाटतात. पण त्याचबरोबर त्यांच्या काही विचारांचे पुन्हा मूल्यमापन करणे आवश्यक झालेले आहे असेही मला वाटते. उलट ज्या मार्क्सला आम्ही शास्त्रशुद्ध विचारक समजत होतो, त्याचेच काही विचार स्वप्नवादी होते, असे आता अनुभवाने म्हणावेसे वाटते. १९१७ साली रशियातील झारशाही नष्ट होऊन कम्युनिस्ट राजवट सुरू झाल्याला आता बावन वर्षे म्हणजे अर्ध्या शतकापेक्षा अधिक काळ लोटलेला आहे. त्यामुळे मी येथे उपस्थित करीत असलेले मुद्दे मार्क्सवादाला पुरेसा मी अवधी न देता करीत आहे असे म्हणता येणार नाही. अंतिम उद्दिष्ट साध्य होण्यास पन्नास वर्षांचा अवधी पुरेसा नाही असे मानले, आणि तसे मानण्यास माझी हरकत नाही—तरी शासनारूढ मार्क्सवादाची वाटचाल कोणत्या दिशेने होत होत आहे, ते समजण्यास एवढा अवधी पुरेसा मानण्यास हरकत नसावी.

प्रथम आपण मार्क्सचा कामगारवर्गाच्या एकाधिपत्याचा सिद्धांत घेऊ. मार्क्सने (आणि त्यानंतरच्या कम्युनिस्ट नेत्यांनी) हे वारंवार निक्षून सांगितले आहे की, युरोपातील कामगारांचे पूर्वीचे क्रांतिप्रयत्न फसण्याचे कारण हे होते की, पूर्वीची शासनव्यवस्था कोलमडून टाकल्यानंतर आपली वर्गीय हुकमत स्थापण्याची काळजी त्यांनी घेतली नाही. कामगारवर्गाचे एकाधिपत्य हा मार्क्सवादी विचारसंहितेचा आणि आचारसंहितेचा कळस अथवा सारसर्वस्व असल्याकारणाने त्याबाबत कम्युनिस्ट वाङ्मयात त्या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त व्हावे हे योग्यच म्हटले पाहिजे. रशियामध्ये १९१७ साली जर कामगारवर्गाच्या हाती सत्तासूत्रे आली नसती व त्या वेळी प्रस्थापित झालेले शासन आजपावेतो जर टिकून राहिले नसते तर कम्मुनिझमचा गंभीरपणे विचार करण्याची गरजही भासली नसती. सांप्रत फॅशिझमची चर्चा जसे कोणी करताना दिसत नाही तसे. कारण फॅशिझम सत्ताधिष्ठित असेपर्यंत त्या वादाला महत्त्व होते, हे लक्षात घेतल्यास सत्ता काबीज करण्याला व त्याहीपेक्षा ती स्वतःच्या हाती टिकवून ठेवण्याला काही दर्शनामधून एवढे महत्त्व का असते, ते समजेल.

मार्क्सवादांतर्गत राजनीतीने सत्ताग्रहणाबद्दलचा हा आपला सिद्धान्त शास्त्र-शुद्ध असून तद्विरुद्ध आचार करून कामगारवर्गाचे एकाधिपत्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे अशास्त्रीय मार्गाचा अवलंब करण्याप्रमाणे किंवा क्रांतीचा घात करण्याप्रमाणे होईल, असे प्रतिपादन केलेले आहे. कामगार वर्गाच्या एकाधिपत्याला विचाराने अथवा आचाराने विरोध करणारे जे वर्ग अथवा गट असतील-मग ते उद्योग-व्यवसायांतील असोत, अथवा शासन यंत्रणेमधील असोत–त्यांचे खंबीर-पणे (म्हणजे निष्ठुरपणे) निर्दालन केले पाहिजे, हा वरील मुख्य सिद्धांताचाच उप-सिद्धांत म्हणून मार्क्सीय वाङ्मयात आग्रहाने मांडलेला असून त्यांतील 'निर्दालन' (अॅनिहिलेशन) या शब्दावर त्यामध्ये बुद्धिपुरस्सर जोर दिलेला आढळतो.

क्रांति म्हणजे सत्ताग्रहणपूर्वक एकाधिपत्य असे समीकरण मांडल्यावर मार्क्सवादी क्रांतिशास्त्र आपाततः निर्दोष दिसते असे म्हटले पाहिजे. पण मग लगेच असे प्रश्न उपस्थित होतात की, मार्क्सवादाचे दंडहीन समाज हे जे अंतिम ध्येय व राज-सत्तेचे क्रमशः क्षयीकरण हा जो त्याच्याकडे जाण्याचा मार्ग–त्याचे काय ? कामगार-वर्गाचे एकाधिपत्य या शब्द-समूहामधील कामगार म्हणजे नेमके कोण ? आणि ज्यांचे निर्दालन करावयाचे ते प्रतिक्रांतिकारक वर्ग अथवा गट कोणते ? गेल्या पन्नास वर्षांच्या सोव्हिएट रशियाचा इतिहास ह्या प्रश्नांची उत्तरे अशी देत आहे की, आज जगामधील कोणतीही आधुनिक शासनपद्धती घेतली, तर तीमध्ये जास्तीत जास्त वळकट, अनियंत्रित व अल्पसंख्य-शासित शासन जर कोणी असेल तर ते सोव्हिएट रशियाचे आहे. ह्या शासनातर्फे केवळ प्रत्यक्ष कम्युनिस्ट विरोधकांवर व संभाव्य कम्युनिस्ट-विरोधकांवरच नव्हे तर स्टॅलिनला ह्या ना त्या कारणास्तव नापसंत झालेल्या उत्तमोत्तम कम्युनिस्टांवर देखील कसा वरवंटा फिरविण्यात आला, त्या अपकृत्याची कबुली गेल्या महिन्यांत बेलग्रेड येथील युगोस्लाव कम्युनिस्ट पक्षाच्या काँग्रेसमधील भाषणात मार्शल टिटोने नावनिशीवार जशी सादर केली, त्याचप्रमाणे ती १९५६ साली ख्रुश्चेव्हनेही सादर केलेली होती. त्याचा अर्थ काय ?

याचे अनेक अर्थ होतात. विरोधकांचे निर्दालन व कामगारवर्गाचे एकाधिपत्य या सिद्धांतांचा व्यवहारात अर्थ असा ठरतो की, विरोधक म्हणजे आपल्याला कोणत्याही कारणास्तव कोणत्याही मार्गाने जे आज विरोध करीत असतील अथवा उद्या विरोध करतील अशी शंका शासकांना येईल, त्या सर्वांचे निर्दालन. त्याचबरोबर शासन म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचे शासन, कम्युनिस्ट पक्ष म्हणजे त्या क्षणी जे कोणी पक्षाचे सूत्रधार असतील त्यांचे शासन आणि परत शासन म्हणजे त्या वेळच्या अनेक सूत्र-धारांची किंवा एका सूत्रधाराची लहर, असाही त्याचा अर्थ होतो. कामगारवर्गाच्या एकाधिपत्याच्या कल्पनेमधून निर्माण होणारा शासनाचा वर निमुळता होणारा हा पिरॅमिड डोळ्यांसमोर आणला की, सत्तेचे क्रमशः क्षयीकरण, प्रतिक्रांतिकारक

वर्गाचे निर्दालन व समतेची प्रतिष्ठापना इत्यादिक अवांतर मार्क्सवादी कल्पनांची आपोआपच वाट लागते. झेकोस्लावियामध्ये अगदी अलिकडे घडलेल्या प्रकरणामुळे तर समाजांतील व्यक्तिगत समानता बाजूला राहिली, पण राष्ट्राराष्ट्रांतील समानतादेखील मार्क्सवाद मान्य करू शकत नाही, हे स्पष्ट होत आहे.

मार्क्सवादी विचार व व्यवहार यांमध्ये ही आकाशपाताळाची तफावत पडण्याचे कारण इतकेच की, मार्क्सने ज्या वेळी कामगारवर्गाच्या एकाधिपत्याची आवश्यकता प्रतिपादन केली, त्या वेळी एकाधिपत्याचे गतिशास्त्र त्याला समजलेलेच नव्हते. लोकशाहीची घोषणा करून, विचार, उच्चार, आचार व संघटना आदि नागरिक स्वातंत्र्ये अबाधित राखून, उद्योगव्यवसाय व्यक्तिगत मालकीचे राहू देऊन व न्यायालयाचे स्वातंत्र्य शाबूत ठेवूनदेखील ज्यांच्या हाती उत्पादनसाधने असतात तो वर्ग लोकशासनाच्या बुरख्याआड आपली सत्ता प्रस्थापित करीत जातो, असा सिद्धांत मांडून व्हिक्टोरियाच्या काळांतील लोकशाही फसवी आहे, असा युक्तिवाद करणाऱ्या मार्क्सने ज्या राजवटीत नागरिकस्वातंत्र्याचा मागमूस उरणार नाही, न्यायालये व शासन एकरूप झालेली असतील, जमिनीपासून कारखानदारीपर्यंतची उत्पादनसाधने व शिक्षणापासून वृत्तवितरणापर्यंतची प्रचारसाधने शासनाच्या हाती एकवटलेली असतील,तेथे सत्तेचे क्षयीकरण होत होत दण्डविहीन समाजव्यवस्था निर्माण होऊ शकेल हा विनबुडाचा सिद्धांत कशाच्या आधारे मांडला असावा ? धनिकवर्गप्रधान लोकशासनांतील सत्तेचे गतिशास्त्र इतक्या बारकाईने पाहणारी मार्क्सची दृष्टि कामगारवर्गाच्या एकाधिपत्याची वाटचाल पाहताना ठार आंधळी कशी बनली ?

याचे उत्तर इतकेच की, तोसुद्धा या ठिकाणी स्वप्नवादीच बनलेला होता तर्कशास्त्राचे त्याचे हत्यार लुळे पडले होते. परंतु मार्क्सचा हा आंधळेपणा आपण स्वीकारण्याचे कारण नाही. मार्क्सला व लेनिनला भांडवलशाही इंग्लंडने कधी तुरुंगांत टाकले नाही, पण रशिया सोडून ट्रॉट्स्कीला जीव घेऊन पळावे लागले, जिलासला टिटोच्या तुरुंगात पडावे लागले व लिऊ शाव चीला मूर्खाची टोपी माओवाद्यांनी आपल्या डोक्यावर ठेवलेली स्वत: डोळ्यांनी पाहावी लागली. या घटनांवरून आपणाला हे समजण्यास हरकत नसावी की, मार्क्सच्या स्वप्नवादाला एकवर्गीय एकाधिपत्याच्या दगडावर चांगलीच ठोकर बसलेली आहे.

कामगारवर्गाच्या नावाने जिंकलेली सत्ता कम्युनिस्ट पक्ष व पक्षाच्या नावाखाली त्यांतील मुखंड लाटून बसतील, हा हिशोब तर मार्क्सला समजला नाहीच, पण त्याने असेही चुकीचे गणित मांडले की, कामगारांच्या एकाधिपत्यामधून वर्गविहीन समाजवादाचा विकास होईल. विरोधविकासवादाची मार्क्सवाद्यांची शास्त्रीय श्रद्धा (!) कोणत्या कोटीची स्वप्ने रंगवू शकते, त्याचे याहून ढळढळीत उदाहरण शोधून सापडणार नाही. एकवर्गीय सत्तेकडून वर्गहीन समाजाची उत्पत्ति कशी होणार ? वंध्येला

पुत्र होतो तशी ? मार्क्सची भाबडी कल्पना अशी दिसते की, कामगारसत्ता म्हणजे वस्तुत: सर्व जनतेची सर्व जनतेवर सत्ता. कारण ज्या परोपजीवी गटाचे उच्चाटन करून कामगारवर्ग सत्तेवर येतो तो समाजाचा अत्यंत अल्पसंख्याक गट असतो. उरलेला सगळा समाज श्रमजीवीच असतो. अतएव कामगारसत्ता जेव्हा स्वत:वर शासन करते तेव्हा तिच्या शासनाचे स्वरूप पराभूत परजीवी वर्गाने पुनश्च बळ करून शासनावर कबजा करू नये एवढ्यापुरतेच मर्यादित राहील आणि त्या वर्गाचे विषारी दात एकदा ठेचले की, शासनाचे हे मर्यादित कामही संपुष्टात येऊन दंडशक्तीची गरजच न राहिल्याने दंडाचा लोप होईल. हे झाले की झालाच दंडविहीन, विश्वकुटुंबवादी समाज निर्माण ! मार्क्सवादी समाजाची ही चरम अवस्था होय.

पण ह्या मार्गाने कामगारांची हुकूमशाही मुळी जातच नाही, जाऊ शकत नाही व जाऊ इच्छीत नाही, हे मिलोवेन जिलासने स्वानुभवावरून सांगितले आहे. येथे असा प्रतिसिद्धांत मांडता येईल की, हाती आलेल्या निरंकुश व सर्वंकष सत्तेची जपणूक करणारा एक नवा सत्ताधारी वर्ग निर्माण होऊन तो स्वत:च्या हातांतील दंड कधीच सोडावा लागू नये म्हणून, 'देशांतील प्रतिगामी पक्षाचे डोके अजून पुरे ठेचले गेलेले नाही; स्वदेशांतून नाही तर परदेशातून तो कामगारसत्तेला गोत्यात आणण्याची कारस्थाने रचीत आहे, असल्या हुली उठवीत राहातो. ही हूल आता केवळ भांडवलदारी राष्ट्रांपुरती सीमित राहिलेली नसून रशियासारख्या राष्ट्राला युगोस्लाविया किंवा चेकोस्लोवाकिया किंवा चीनसारख्या मार्क्सवादी राष्ट्राकडे बोट दाखवून देखील ही हूल उठवता येण्याची सोय झालेली असल्यामुळे सर्व जगावर एकाच कम्युनिस्ट पक्षाचे एकाधिपत्य स्थापन झाल्यावाचून दंडसत्ता नाइलाजाने कायम ठेवणे मार्क्सवाद्यांना भाग पडणार असे दिसते ! दुसऱ्या शब्दांत, एकपक्षीय एकाधिपत्यापासून दण्डविहीन समाजाकडे नेणारी ही माळावरची रखरखीत वाट कधी संपेल, अशी आशाच करावयाला नको. मार्क्सच्या दुसऱ्या स्वप्नाचा निकाल येणेप्रमाणे लागतो.

ज्या इंग्लंड देशांतील व्यक्तिस्वातंत्र्य पुरेपूर उपभोगून मार्क्सने आपले विश्वविख्यात प्रबंध लिहिले, त्या देशातील परिस्थितीशी मार्क्स पूर्णपणे बेइमान होऊ शकला नाही, असे त्याने, इंग्लंडसारख्या देशात शांततेच्या मार्गानेही समाजवादी क्रांती घडून येऊ शकेल असे जे विधान केले, त्यावरून दिसून येते. पण पाठोपाठ सवाल असा निर्माण होतो की, शांततेने घडून आलेली क्रांती व शस्त्राचाराने घडून आलेली क्रांती; यांमधील, म्हणजे त्यामधून निर्माण होणारा शासनसंस्था, समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था यांतील फरक, मार्क्सच्या ध्यानांतच आला नाही की काय ? क्रांती ज्या साधनांनी घडून येईल त्यांचा परिणाम क्रांत्युत्तर सामाजिक, आर्थिक व राजनैतिक रचनेवर व्हावा, हे क्रमप्राप्तच ठरते, एकदा शांततेच्या मार्गाने–म्हणजे

निवडणुकीच्या मार्गाने—हाती सत्ता आली म्हणजे मग ती निवडणूक अखेरची समजून कामगारांनी आपल्या विरोधी लोकांचे निर्दालन करण्याचा कार्यक्रम सुरू करावा, अशी मार्क्सची कपटनीती होती काय ? मार्क्सला कपटीपणाचा दोष चिकटविण्यापेक्षा मी असेच म्हणेन की, सत्ताप्राप्तीनंतरच्या राजकीय स्थित्यंतरांचा वेध काळे मार्क्सची आर्ष दृष्टीसुद्धा घेऊ शकली नव्हती. जे दृष्टिगम्य झाले नाही, त्याची जागा रिती सोडण्याऐवजी मार्क्सने तेथे आपल्या कल्पनेने मनोज्ञ रंग चढवून ती जागा भरून काढली !

गांधीजींची रामराज्याची व अहिंसात्मक समाजाची कल्पना मार्क्सच्या कल्पनेपेक्षा मी कमी स्वप्नाळू समजत नाही. कारण मानवी समाजात दंडाची आवश्यकताच उरलेली नाही असा कालखंड कधी अवतरेल, असे मानण्यास मी तयार नाही. परंतु गांधीजींनी आपल्या कल्पनेमधील रामराज्य काँग्रेसच्या हाती सत्तासूत्रे गेल्यानंतर त्यामधून अवतरेल, असे प्रतिपादण्याचा भाबडेपणा कधी केला नसल्यामुळे, इतकेच नव्हे तर, सत्तासंपादनानंतर काँग्रेसची इतिहाससदत्त भूमिका संपली म्हणून ती बरखास्त करावी, असे सुचवण्याइतका मानवी मनाच्या राजकीय गतिशास्त्राचा परिचय स्वत:ला असल्याचा पुरावा त्यांनी दिल्यामुळे, त्यांना मार्क्सपेक्षा अधिक व्यवहारज्ञ किंवा शास्त्रशुद्ध राजनीतिज्ञ मानावे, असे मला म्हणावेसे वाटते.गांधीजींनी सत्तारूढ काँग्रेसशी तर नाहीच, पण ती सत्ताकांक्षी होती त्या काळातही तिच्याशी एकरूप होण्याचे टाळले. 'विरोधकांना चिरडा,त्यांचे निर्दालन करा,' असा सिद्धांत न मांडता, शासनारूढ पक्षाला विरोध करणारे असले पाहिजेत, आणि सत्याग्रहासारखे शासनावर दडपण आणणारे व आवश्यक तर त्याला नामोहरम करणारे साधनही विरोधकांना उपलब्ध असले पाहिजे, असा आग्रह धरला. याहीपेक्षा एक पाऊल पुढे टाकून शासनावर जनतेने आपल्या शिक्षणासाठी, आर्थिक विकासासाठी व सुसंस्कारांसाठी सर्वथा अवलंबून राहण्याचे धोरण सोडून दिले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. पक्ष, शासन व जनता अथवा समाज यांना गांधीजींनी कधी एकरूप मानले नाही-समकक्षी मानले नाही.

गांधीजींनी अहिंसेबद्दल जो इतका आग्रह धरला,त्याची प्रेरणा त्यांच्या धार्मिक वृत्तीमधून निर्माण झालेली होती, हे उघड आहे. गीतेमधील 'अहिंसासत्यमस्तेया'चा प्रभाव गांधीजींच्या मनावर पडलेला होता, नव्हे आपली समग्र जीवनदृष्टी त्याच्याशी संवादी राखण्याचा त्यांचा प्रयत्न होता, यातही शंका नाही. पण त्याचबरोबर हिंसाचारी क्रांती, बंदुकीच्या नळीतून सत्ता जन्मते असे सांगणारी क्रांती, ही बहुजनांची क्रांती कधीच होऊ शकणार नाही, आणि जे शस्त्रधारी व शस्त्राचारी अल्पजन क्रांती घडवून आणतात ते आपल्या कवजात आलेली सत्ता बहुजनांच्या हवाली कधीच करणार नाही,हे राजकीय नीतिसार गांधीजींना अवगत असल्यामुळेच तर त्यांचा शस्त्राचाराला

असणारा विरोध साग्रही बनला नसेल ना, असा प्रश्न मला उपस्थित करावासा वाटतो. पुढील दोन उत्तरे वाचल्यानंतर गांधीजींची ह्या प्रश्नाकडे पाहण्याची दृष्टी केवळ धार्मिक होती की राजनैतिक होती, याविषयी केवळ कयास करण्याचेही कारण उरणार नाही. हे दोन्ही उतारे श्री. निर्मलकुमार बोस यांनी संग्रहीत केलेल्या गांधीजींच्या निवडक वेच्यांमधून घेतलेले आहेत.

' True democracy or the swaraj of the masses can never come through untruthful or violent means, for the simple reason that the natural corollary to their use would be to remove all opposition through the suppression or extermination of the antogonist. That does not make for individual freedom. Individual freedom can have the fullest play only under a regime of unadulterated ahimsa.

" I hope to demonstrate that real swaraj will come not by the acquisition of authority by a few but by the acquisition of the capacity by all to resist authority when abused. In other words, swaraj is to be attained by educating the masses to a sense of their capacity to regulate and control authority."

मार्क्सवादी दर्शनामध्ये मला आणखी एका गोष्टीची उणीव भासली. ती अशी की, उत्पादनसाधने समाजाच्या मालकीची झाल्यावर उपभोग्य वस्तूंच्या वाटपामध्ये न्याय व समानता आणता येईल हे आपण समजू शकतो, पण उपभोगावर काही नियंत्रण असणार काय ? हा प्रश्न भारतासारख्या देशात या वेळी उपस्थित करणे अप्रस्तुत ठरेल. कारण येथे लक्षावधी माणसांना दोन वेळा भाकर मिळणेसुद्धा आज मुष्किलीचे आहे. पण ज्यांना आपण समृद्ध म्हणतो त्या देशांत हा प्रश्न आजच उत्पन्न झालेला आहे. आणि तेथील सुखाला विटलेले लोक चरसगांजाचे पर्याय एस् एस् डी मध्ये शोधीत आहेत. प्रत्येकाला शिक्षण, प्रत्येकाला नोकरी, प्रत्येकाला घर, प्रत्येकाला मोटार, घरातल्या प्रत्येक खोलीत दूरचित्र व दूरध्वनि. तरीही ततः किम् ? हे उरतेच. आपल्या समृद्धीमधील काही वाटा कमी समृद्धांना द्यावा हा मार्ग किती अप्रिय आहे ते UNCTAD च्या दिल्ली अधिवेशनात गतवर्षी दिसून आले. आजचा रशिया, किंवा दुसरा कम्युनिस्ट देश, अमुकतमुक वर्षी आम्ही अमेरिकेच्या बरोबरीची अथवा त्याहून अधिक समृद्धी भोगू, यापलीकडे आपले ध्येय ठेवीत असल्याचे दिसत नाही. सध्याच्या यांत्रिक व रासायनिक साधनांच्या उत्पादनाचा झपाटा पाहिला की, कम्युनिस्ट देशांतमुद्धा भांडवलदारी राष्ट्रांच्या बरोबरीने समृद्धी नांदू लागेल असे गृहीत धरण्यास काहीच हरकत नाही. याचाच अर्थ असा कीं, जी आज 'आहेरे' राष्ट्रे आहेत–युरोपीय कम्युनिस्ट राष्ट्रे मी त्यांतच जमा समजतो–त्यांच्यातील व 'नाहीरे' राष्ट्रांतील दरी रुंदावतच जाणार. येथे गांधीप्रणीत अनासक्तीच्या अथवा विनोबाप्रणीत " दानं संविभाग " च्या मार्गाचा तरी अवलंब करावा लागेल अथवा मार्शल लिन् पिआव

कवा माओप्रणीत समृद्ध राष्ट्रांना मागास राष्ट्रांनी घेराव घालण्याचा रस्ता तरी पकडावा लागेल. आपण माओच्या मार्गाने गेलो, तर जागतिक एकाधिपत्य निर्माण होऊन या लेखात आधी निर्दिष्ट केलेली आपत्ती निर्माण होईल आणि वर्गविहीन व शासनविहीन समाजप्रस्थापनेचे उद्दिष्ट कायमचेच नाश पावेल.

मार्क्स काय किंवा गांधीजी काय, काही बाबतीत त्यांची दृष्टी इतकी अचूक वेध घेणारी, तर काही बाबतीत इतकी स्वप्नाळू, असे का घडत असेल ? जेथे सर्व झगडे विराम पावलेले असतील, जेथे शोषण थांबलेले असेल, जेथे बंधुभाव, आरोग्य नांदत असतील व मानवाची शक्ती, बुद्धी व आकांक्षा व्यर्थ न ठरता सार्थकी लागतील, अशा स्वप्नभूमीचा आसरा त्यांच्यासारख्या कार्यनिष्ठ व कर्तव्यकठोर महापुरूषांनाही आवश्यक भासत असेल काय ? ही मानवी मनाची स्वाभाविक भूक म्हणावी काय ? त्यामधूनच बुद्धाचे निर्वाण, शंकराचे अद्वैत, ख्रिस्ताचे ईश्वरी राज्य ( Kingdom of God ), मार्क्सचा वर्गविहीन व दंडविहीन समाज व गांधीजींचे रामराज्य जन्मास आले असेल काय ? म्हणजे धर्माला अफूची गोळी म्हणणाऱ्या मार्क्सला स्वत:साठी एक अफूची गोळी तयार करावी लागली म्हणायची ! तशी आतापर्यंतच्या सर्व प्रेषितांना, धर्मसंस्थापकांना व क्रान्तिकारकांना करावी लागलेली आहे असे दिसते.

२१

# मार्क्सवाद व गांधीवाद

प्रा. दि. ब. केरूर

मार्क्स व गांधी या दोन द्रष्टयांनी अखिल मानवतेला ज्या देणग्या दिल्या, त्यांचें विश्लेषण पुढील लेखात आहे. वर्गकलहाशिवाय आर्थिक समता प्रस्थापित करण्याचा जो सत्याग्रहाचा मार्ग गांधीजींनी सांगितला, त्याची शक्ती किती आणि कशी आहे, याची मीमांसा यथे केलेली आहे.

गतिमानता हा समाजजीवनाचा प्रमुख विशेष होय. तथापी इतिहासाच्या ओघात अनेक कारणांमुळे समाजाची गती अवरुद्ध होते. व्यक्ती वा व्यक्तिसमूह यांच्या परस्पर-हितसंबंधातील संघर्षामुळे समाज-जीवनच स्थगित होण्याचे, क्वचित नष्ट होण्याचे, भय निर्माण होते.

या भयाचे निवारण कसे करावे, गतिमानतेचा अवरोध नाहीसा करून समाज-परिवर्तन कसे घडवून आणावे, हा विचार अनेकांना व्यथित करतो. या विचाराच्या चिंतनातून कित्येक प्रज्ञावंतांना समाज-परिवर्तनाचा मार्ग दिसतो. ते द्रष्टे ठरतात. महात्माजी आणि मार्क्स हे असे द्रष्टे पुरुष होते. या उभयतांनी स्वकालीन समाज-स्थितीचे नीट विश्लेषण केले; समाज-जीवनाच्या मूळ अधिष्ठानाचा –स्वयं-प्रज्ञेनुसार–शोध घेतला आणि समाज-परिवर्तनाचे शास्त्र प्रस्थापिले. आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, स्वत: क्रियाशील राहून जगाला क्रांतीचा वस्तुपाठ दिला.

मार्क्सने श्रमिक वर्गाला भांडवलशाहीच्या शोषण-भयातून मुक्त केले; समाजवादी समाज-व्यवस्थेचे दर्शन घडविले. आज पूर्व-युरोप आणि चीन येथे मार्क्सवादाची धारणा सांगणारे समाजशासन सुप्रतिष्ठ होऊ पहात आहे.

महात्माजींनी नि:शस्त्रांना, असहाय पीडितांना सत्याग्रहाचे शस्त्र दिले, सर्वांच्या कल्याणाचे –सर्वोदयाचे –स्वप्न साकारण्याचा मार्ग दाखविला. कोटयवधी निरक्षर आणि नि:शस्त्र जनांचा भारत बलाढ्य साम्राज्याशी असहकाराचे युद्ध करून स्वतंत्र झाला, याचे श्रेय महात्माजींचे. मार्टिन ल्यूथर किंग यांसारख्या लोकाग्रणींच्या नि:शस्त्र आंदोलनाची प्रेरणा महात्माजींची.

महात्माजी आणि मार्क्स दोघेही अलौकिक. सामान्य जनांविषयीची सहानुभूती, शोषणाचा तिरस्कार, अन्यायाची चीड, धैर्य, त्याग, लोकसंग्रह, संघटनाकौशल्य आणि क्रियाशीलता –हे सारे गुण त्यांच्या ठायी साक्षात्कृत झाले होते. मानवाच्या अर्वाचीन इतिहासातील हे युगपुरुष होत, यात शंका नाही.

१९६७ मध्ये मार्क्सच्या 'कॅपिटल' या युगप्रवर्तक ग्रंथाची शताब्दी झाली. १९६९ हे वर्ष महात्माजींच्या जन्मशताब्दीचे. या योगाच्या निमित्ताने या दोन महापुरुषांच्या विचारांचे मर्यादित परिशीलन आणि मूल्यमापन या लेखात संकल्पित आहे.

**भारताचे स्वातंत्र्य-आंदोलन :**

नवभारताचे निर्माते, हिंदचे राष्ट्रपिता म्हणून महात्माजी विश्रुत आहेत. १९२० साली लोकमान्यांचे निर्याण झाले; नेतृत्वाचा वारसा महात्माजींच्याकडे आला. 1 ऑगस्ट १९२० रोजीच भारतीय जनतेचे ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध असहकार-युद्ध सुरू झाले, आणि ते स्वातंत्र्य-प्राप्तीपर्यंत विविध स्वरूपात चालू राहिले.

असहकार-युद्धाचे शास्त्र महात्माजींच्या प्रज्ञेचा विलास होता. मात्र त्याचे स्वरूप भारतातील तत्कालीन परिस्थितीतून उत्क्रान्त होत गेले.

१९१४ चे महायुद्ध स्वयंनिर्णयाच्या तत्त्वासाठी झाले. या युद्धात हिंदी जनता यथाशक्ती सहभागी होती. साहजिकच हिंदलाही स्वयंनिर्णयाचे स्वराज्य लाभेल, अशी अनेकांना भाबडी आशा होती. त्यात प्रागतिक मंडळी प्रमुख होती. प्रत्यक्षात, १९१९ च्या सुधारणा कायद्याने सर्वांचा अपेक्षाभंग केला. जालियनवाला बागेतील हत्याकांडाने जनता प्रक्षुब्ध झाली होती. राज्यकर्त्यांनी मात्र अत्याचारी अधिकाऱ्यांना दोषमुक्त केले. हिंदी जनतेची ही मानहानी होती. यात सनदशीर राजकारणाचा शेवट होता. आता, प्रतियोगी सहकारितेस असहकारितेचे स्वरूप येणे अपरिहार्य होते. देशापुढे सशस्त्र-क्रांती वा नि:शस्त्र युद्ध याहून तिसरा पर्याय नव्हता. भारता-सारख्या कोटयवधी नि:शस्त्र, निरक्षर लोकांच्या प्रचंड देशाला सशस्त्र क्रांतीचा मार्ग उघडच युक्त नव्हता.

सत्तान्ध शासकांना केवळ बलाचीच भाषा समजते; हे सत्य असले तरी क्रांतिकारकांच्या साहसी कृत्यामुळे शासक वर्ग अधिक अत्याचारी होऊन दडपशाहीचे भय उग्र होते, असा इतिहास आहे. निःशस्त्र सामान्य-जनांचे या आपत्तीमधून रक्षण करावयाचे तर शान्तातमय प्रतिकार वा अहिंसात्मक असहकार–हाच एक पर्याय शिल्लक राहतो, यात शंका नाही. आणि म्हणूनच महात्माजींनी देशास निःशस्त्र क्रांतिवादाची दीक्षा देण्याचा निर्णय केला. या निर्णयास लोकमान्यांचा आशीर्वाद होता, हे ध्यानात घ्यावयास हवे. "लोक तुमच्या ( सत्याग्रहाच्या ) शस्त्राचा अवलंब करीत असतील तर मी तुमचाच आहे." असे लोकमान्यांचे महात्माजींना आश्वासन होते. निःशस्त्र प्रतिकाराचा –सत्याग्रहाचा –मार्ग हा शास्त्रपूत मार्ग असल्याचा त्यांचा अभिप्राय होता. पराभूत वृत्तीच्या प्रागतिकांशी लढा देऊन राष्ट्रसभेची सूत्रे लोकमान्यांनी राष्ट्रीय पक्षाच्या हाती आणली, आणि ती महात्माजींच्या स्वाधीन केली.

**महात्माजींचे असहकारयुद्ध :**

१९१५ च्या आरंभी महात्माजी भारतात आले. तत्पूर्वी दक्षिण आफ्रिकेत त्यांनी आपल्या अभिनव सत्याग्रह-शस्त्राने अपूर्व यश संपादिले होते. भारताच्या सर्व आपत्तींचे निवारण सत्याग्रह-साधनेनेच होईल, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती.

भारतीय राजकारणात अर्ज-विनंत्यांचे सनदशीर राजकारण निष्फल झाले होते. सशस्त्र क्रांतीचा मार्गही अव्यवहार्य ठरला होता आणि देशात एक असहायतेची, अगतिकतेची स्थिती निर्माण झाली होती. महात्माजींच्या सत्याग्रह-युद्धाने ही अगतिकता पार नाहीशी झाली.

स्वातंत्र्याच्या लढ्यात समाजातील सर्वांनी, सर्व स्तरांतील, सर्व वर्गांतील लोकांनी सहभागी व्हावे, याविषयी महात्माजी अती दक्ष होते. त्या दृष्टीनेच त्यांनी असहकाराचा कार्यक्रम आयोजित केला. पदव्यांचा त्याग, शाळा-कचेऱ्यांवरील बहिष्कारापासून करबंदी, कायदेभंग-कार्यक्रम असहकारात अंतर्भूत होता. अतिसामान्यापासून सामान्यापर्यंत सर्वांना या असहकार युद्धात पराक्रमाची स्फूर्ती आणि संधी मिळाली. 'आत्मक्लेश' हेही प्रतिकाराचे समर्थ साधन ठरते–याचा साक्षात्कार हा या युद्धाचा फार मोठा लाभ होता.

शासकांच्या अत्याचाराला काही बंधन राहावे म्हणून लोकमान्यांनी आपला लढा कायद्याच्या मर्यादेत लढविला. आता जनतेची आत्मक्लेशाला सिद्धता झाली होती, हे जाणून महात्माजींनी कायद्याची सीमा उल्लंघिली. जुलमी,अन्याय्य राज्यामध्ये कायदेभंगदेखील न्याय्य आणि धर्म्य ठरतो, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कायदेभंगाने जनता खऱ्या अर्थाने निर्भय झाली. मात्र कायदेभंगाची परिणती अराजकात होऊ नये, याची महात्माजींना चिन्ता होती. त्यासाठीच त्यांनी कार्यकर्त्यांना, स्वयंसेवकांना सतत सत्य-अहिंसेची जाणीव दिली, अत्याचाराचा निषेध

केला. इतरांच्या अपराधावद्दल स्वत: प्रायश्चित्त घेतले आणि प्रसंगी स्वकीयांचा विरोध पत्करूनही आंदोलन मागे घेतले.

महात्माजींचे हे अहिंसात्मक युद्ध जगाला नवे होते. धर्म आणि नीती—हे त्याचे अधिष्ठान होते. प्राचीन उपनिषदातील आत्मवलाचे तत्त्वज्ञान या युद्धाचा आधार होता. भारतीयांच्या मन:प्रवृत्ती मूलत: धर्मपर. त्यांना महात्माजींच्यामध्ये 'अवतारा' चे दर्शन झाल्यास नवल नाही !

महात्माजींनी राष्ट्रसभेचे स्वरूपही आमूलाग्र वदलून टाकले. त्यांचा लोक-संग्रह, त्यांचे संघटना-कौशल्य विलक्षण होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे समाजातील सामान्य आणि असामान्य सारे राष्ट्रसभेकडे आकर्षित झाले. आता राष्ट्रसभा यथार्थ-त्वाने देशाची प्रतिनिधि-सभा झाली. महात्माजींनी राष्ट्रसभेची सर्व स्तरांवर पुनर्-रचना केली; स्वयंसेवक दल उभारले, ग्रामोद्योग संघ, हरिजन सेवक संघ यांसारख्या संस्था स्थापून राष्ट्रसभेचा पाया व्यापक आणि विस्तृत केला.

महात्माजी हे क्रियाशील होते. स्वत:च्या आचरणाने, उदाहरणाने त्यांनी सर्वांना सतत कार्यप्रवण ठेवले— अस्पृश्यतानिवारण, दलितोद्धार, राष्ट्रीय शिक्षण, खादी, ग्रामोद्योग यांसारख्या विधायक कार्यक्रमांची प्रेरणा देऊन कार्यकर्त्यांना समाजाभिमुख केले. समाजसेवा आणि समाजसुधारणा या कार्यांच्या योगे राष्ट्रीय चळवळीने सारे समाज-जीवन व्यापून टाकले.

ब्रिटिशांनी यंत्राधिष्ठित नवे उद्योग आणले. ही नवी अर्थ-संस्कृती होती. तिने देशातील जुन्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा वळी घेतला. परकीय उद्योगांच्या स्पर्धेमुळें जुने उद्योग टिकेनात; नव्यांची वाढ होईना. महात्माजींच्या खादी-ग्रामोद्योगाने जनतेला काही आधार दिला. अन्न आणि वस्त्र या मूलभूत गरजा; शेती आणि वस्त्रोद्योग हे मूलभूत उद्योग. ते उद्योग ग्रामाच्या स्वाधीन असावेत, अशी महात्माजींची दृष्टी होती. त्यांना स्वावलंबी-स्वयंपूर्ण ग्रामसंस्था आणि स्वायत्त ग्रामराज्य अभिप्रेत होते.

आर्थिक विषमता महात्माजींना संमत नव्हती, तथापी वर्गकलहही त्यांना मान्य नव्हता. श्रीमंत हे समाजाच्या संपत्तीचे विश्वस्त होत; आपल्या स्वाधीन असलेले धन हे समाजाच्या मालकीचे आहे, अशा वृत्तीने धनिकांनी वागावे; धनाचा विनियोग सर्वहितबुद्धीने करावा, असे महात्माजींचे प्रतिपादन होते. या प्रतिपादनास ते ईशा-वास्योपनिषदाचा आधार घेत. औद्योगिक कलहाचा परिहार संप, टाळेबंदी या रीती-पेक्षा चर्चा, तडजोड, मध्यस्थी अशा मार्गांनी करावा, असा त्यांचा आग्रह होता.

असहकाराचे राजकारण असो, विधायक कार्यक्रमांचे समाजकारण असो वा पुनरुज्जीवनाचे अर्थकारण असो—महात्माजींची सत्याग्रही अहिंसक दृष्टी अचल होती. अन्यायाचा प्रतिकार आत्मक्लेशाने, अहिंसक रीतीने करावा, प्रतिपक्षाच्या अंत:-करणातील विवेक-बुद्धीला आवाहन करावे, असा त्यांचा आदेश असे. हृदय-परि-

वर्तनाच्या या पद्धतीमुळे धर्म-जाति-भाषा आदींनी शकलित झालेल्या समाजातील अंतर्विरोध सह्य झाला; सामाजिक संघर्षाची धार कमी झाली.

महात्माजींचे सत्याग्रह-तत्त्वज्ञान समाज-जीवनाच्या साऱ्या क्षेत्रांना व्यापणारे होते. सत्य आणि अहिंसा या तत्त्वांचे त्यांनी कोणासही – कोणत्याही क्षेत्रात – विस्मरण होऊ दिले नाही. परिणामत: साऱ्या देशात बंधुभावाचे आणि स्नेहाचे वातावरण राहिले. हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, शेतकरी-सावकार, मालक-मजूर, शिक्षित-अशिक्षित, ग्रामीण-नागर –असे सारे राष्ट्रसभेच्या ध्वजाखाली एकत्र आले; आणि त्यांनी स्वातंत्र्याचा लढा दिला. महात्माजींच्या नेतृत्वाखाली भारताची स्वातंत्र्य-चळवळ क्रमश: अधिक व्यापक, अधिक तीव्र होत गेली. तिचे स्वरूप नित्य वर्धिष्णू राहिले आणि अखेर प्रत्यक्ष सत्तांतरही शांततेने घडून आले. जगाच्या इतिहासात हे अनत्याचारी असहकार-युद्ध अपूर्व होते.

**सत्याग्रहाचे क्रांतिशास्त्र :**

महात्माजींचे सत्याग्रह-तत्त्वज्ञान हे प्रामुख्याने भारतीय स्वातंत्र्य-लढ्याच्या संदर्भात विकास पावले. तथापी ‘ सत्याग्रह ’ हे केवळ राजकीय स्वातंत्र्याचे साधन नव्हे; व्यापक समाज-व्यवस्थेचे ते शास्त्र आहे–अशी महात्माजींची धारणा होती. महात्माजींच्या अनेक भाष्यकारांनी –“ सत्याग्रह हे एक राष्ट्रीय क्रांतिशास्त्र आहे, त्याचप्रमाणे ते सर्वांगीण क्रान्तिशास्त्र आणि समाज-संघटनाशास्त्र अगर समाज-धारणाशास्त्रही आहे, ” अशी मीमांसा केली आहे.

क्रांती ही हिंसात्मक असते अशी सर्वसामान्य समजूत आहे. इतिहासाचा पुरावाही सामान्यत तसाच आहे. तथापि क्रांती अहिंसात्मकही असू शकते, किंबहुना खरी क्रांती अहिंसात्मकच असते. असे महात्माजींचे प्रतिपादन आहे. त्यांच्या दृष्टीने अहिंसा हा मानवाचा नित्यधर्म असून जीवनाचे ते अंतिम मूल्य आहे. अहिंसाधिष्ठित सहजीवन ही प्रकृती आणि हिंसामिश्रित संघर्ष ही विकृती, असे ते मानीत.

मानवी समाजाची वाटचाल अहिंसेच्या दिशेने होत असल्याचे महात्माजींना दिसते. प्राचीन काली नरमांसभक्षक असलेला माणूस आज कुटुंबवत्सल होऊन राज्याचा नागरिक म्हणून राहू इच्छितो. मानवाची ही अहिंसक प्रगती थांबता कामा नये. अन्यथा मानवजातीचाच विनाश होईल, असा भयसूचक इषाराही त्यांनी दिला आहे. महात्माजींची ही आध्यात्मिक इतिहास-मीमांसा आहे.

महात्माजींना समाज-जीवनाच्या गतिमानतेची जाणीव होती. समाजपरि-वर्तनाची , समाजक्रांतीची अपरिहार्यताही ते जाणीत होते. मात्र या परिवर्तनाचे आणि क्रांतीचे अधिष्ठान आध्यात्मिक व नैतिक असावे–लढा कोणताही असो, त्यामध्ये सत्य आणि अहिंसेचा आश्रय करावा– संघर्ष व कलह टाळावा–पाशवी शक्तीविरुद्ध आत्मिक शक्ती उभी करावी आणि इष्ट ती क्रांती साधावी, असा त्यांचा आग्रह होता

मानवी जीवनातील अन्याय मूलत: माणसाच्या मनोवृत्तीमध्ये उद्‌भवतो. काही व्यक्ती वृत्तीने स्वार्थी असतात तर काही दुवळचा असतात. यामुळेच समाजातील सारा अन्याय, सारी विषमता निर्माण होते. या अन्यायाचे, परिमार्जन आणि विषमतेचे निराकरण करावयाचे, तर प्रथम वृत्तीमध्ये परिवर्तन आवश्यक आहे. अतएव समाजक्रांतीचे, समाजपरिवर्तनाचे रहस्य अन्तत: हृदयपरिवर्तनामध्ये राहते. महात्माजींच्या तत्त्वज्ञानाचे, त्यांच्या सत्याग्रह-क्रांतिशास्त्राचे स्वरूप हे असे आहे. महात्माजींचे असहकाराचे राजकारण, दलितोद्धाराचे समाजकारण आणि विश्वस्त-वृत्तीचे अर्थकारण–या सर्वांची संगती त्यांच्या सत्याग्रह-विचाराने नीट लागते. महात्माजींचे सत्याग्रह तत्त्वज्ञान हे एक जीवनदर्शन होय, यात शंका नाही.

**मार्क्स– जीवनाचा समर्थ भाष्यकार :**

मार्क्स हाही जीवनाचा एक समर्थ भाष्यकार होता. समाज-विज्ञानामध्ये मार्क्सवादाचे वर्णन कटाक्षाने ‘ शास्त्रीय समाजवाद ’ म्हणून केले जाते.

मानवी समाजजीवन, त्या जीवनाची गतिशीलता–हा मार्क्सचा अभ्यास-विषय होता. समाजाचे गतिशास्त्र हे मार्क्सवादाचे मुख्य प्रतिपाद्य आहे. तत्त्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र–समाजविज्ञानाच्या या सर्व शाखांमधील मार्क्सची गती अती विलक्षण होती. त्याहून महत्त्वाचे, तो क्रियाशील क्रान्तदर्शी द्रष्टा होता. इतिहासाचे परिशीलन करून मार्क्सने समाजपरिवर्तनाची मीमांसा केली आहे. समाजव्यवस्था कशावर आधारित असते, इतिहासाच्या ओघात ती व्यवस्था कशी बदलते, याची एक शास्त्रीय उपपत्ती त्याने सिद्ध केली आहे, आणि या उपपत्तीस अनुलक्षून इतिहास-क्रमात अपरिहार्य असणारा बदल (समाजपरिवर्तन) कसा घडवून आणावा, याची रीतही त्याने सांगितली आहे.

समाजपरिवर्तनाचे सूत्र हे समाजाच्या अर्थव्यवस्थेमध्ये अनुस्यूत राहते असे मार्क्सचे प्रतिपादन आहे. उत्पादन-पद्धती, विविध अर्थव्यवसाय, त्यांतून निर्माण होणारे आर्थिक संबंध यामुळे अर्थव्यवस्थेचे स्वरूप ठरते आणि या अर्थव्यवस्थेवरच एकूण समाज , समाजाची संस्कृती आधारित राहते.

जीवनात स्थैर्य यावे, सुरक्षा लाभावी ही मनुष्याची सहज कांक्षा आहे. यातूनच त्याची ज्ञानलालसा उद्‌भवते. मानवी जीवन ज्या भौतिक सृष्टीने परिवेष्टित आहे त्य सृष्टीविषयी मनुष्याला कुतूहल वाटते. या सृष्टीची माहिती व्हावी, सृष्टि-नियमांचे ज्ञान संपादावे, म्हणून तो नित्य प्रयत्नशील राहतो. ओघानेच त्याच्या या ज्ञानाची कक्षा विस्तारत जाते.

सृष्टि-नियमांच्या भौतिक ज्ञानाबरोबर उत्पादन-पद्धती बदलते, उत्पादनाचे नवे तंत्र उपलब्ध होते. मनुष्याचे संपत्ति-निर्मितीचे सामर्थ्य वाढत जाते. अर्थव्यव-सायांची तौलनिक स्थिती बदलते. काही व्यवसाय जुने ठरतात; काही नवे निर्माण

होतात. जुन्यांची उत्पादनक्षमता क्षीण झाल्यान त्यांना आता स्थान नसत. नव उद्योग नव्या तंत्रामुळे अधिक कार्यक्षम राहतात. परिणामत: व्यवसायांची पुनर्विभागणी, आर्थिक संबंधांची पुनर्रचना अपरिहार्य ठरते. या पुनर्रचनेमुळे अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलून जाते. ओघाने त्या अर्थव्यवस्थेवर आधारित असलेली समाज-व्यवस्थाही बदलते.

**इतिहासाची आर्थिक मीमांसा :**

इतिहासाच्या ओघात मानवी समाज हा मृगया, कृषी, व्यापार, उद्योग–अशा विविध अवस्थांतून वाटचाल करीत असल्याचे दिसते. हे स्थित्यंतर घडून येण्यास प्रामुख्याने उत्पादन-पद्धतीमधील बदल आणि त्यामुळे उत्पादन-सामर्थ्यात झालेली वाढ कारण आहे; यात शंका नाही. कृषिव्यवसाय मृगयेहून अधिक कार्यक्षम आहे. व्यापारी क्रांतीने कृषीचे स्वरूप बदलले; यथाक्रम उद्योगाची जोड मिळाली. उद्योग हा व्यापाराचा मूलाधार आहे. उद्योगामध्ये समाजाच्या साधनसामग्रीचा अधिक कुशल, अधिक उत्पादक असा विनियोग होतो. उद्योगाचे मूळ शास्त्रामध्ये, तंत्रविज्ञानामध्ये राहते.

मृगयेवर जगणारा समाज, कृषि-समाज, व्यापारी समाज आणि औद्योगिक समाज यांच्या समाजजीवनातील वेगळेपणा स्पष्ट आहे. आचार, विचार, नीती, संस्कृती या सर्वच संदर्भात वेगळेपणा राहतो. कृषि-समाजातील सरंजामशाही, व्यापारी समाजातील राष्ट्रवाद आणि औद्योगिक समाजातील भांडवलशाही ही वैशिष्टये इतिहाससिद्ध आहेत.

**वर्गविग्रहाची विरोध-विकास-प्रक्रिया :**

भौतिक ज्ञानामुळे उत्पादन-पद्धती बदलते; अर्थव्यवस्था बदलते. परिणामत: समाजही बदलतो. हे परिवर्तन अपरिहार्य असते. तथापि ते नेहमीच सहज वा अविरोध घडून येत नाही, असा इतिहास आहे. उत्पादनक्षम अर्थव्यवसाय, उत्पादनाची साधने ही ज्या वर्गाच्या स्वाधीन, तो वर्ग समाजामध्ये समर्थ वर्ग असतो. त्या वर्गाचे राज्यशासनावरही प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष नियंत्रण राहते. राज्यशासनही या समर्थ वर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण करते. इतिहासाच्या ओघात आर्थिक पुनर्रचना अपरिहार्य ठरली, तर समाजातील जुना समर्थ वर्ग नव्या संदर्भात समर्थच राहील, हे संभवत नाही. नवे ज्ञान, नवे तंत्र आत्मसात करून नव्या परिस्थितीशी अनुरूप असे नवे उद्योग करणारा वर्ग महत्त्व पावतो. ज्या जुन्या समर्थांना नव्या रचनेत स्थान राहत नाही, ते पुनर्रचनेस विरोध करतात; या कार्यात प्रसंगी राज्यशासनाचेही साहाय्य घेतात. हा विरोध अर्थातच प्रतिगामी स्वरूपाचा असतो. नवे ज्ञान, नवी उत्पादनपद्धती, नवी अर्थरचना व्यापक समाजहिताची असल्याने इतिहासाच्या प्रक्रियेत विरोधकांचा पराभव होतो; इष्ट ते परिवर्तन घडून येते आणि समाज-विकासाची वाटचाल चालू राहते.

समाज-परिवर्तनाची ही विरोध-विकास–प्रक्रिया आहे. जोपर्यंत समाजामध्ये

साधनांच्या स्वामित्वावर आधारित असे वर्ग आहेत, तोपर्यंत विरोधातून विकास ही प्रक्रिया अनिवार्य दिसते; आणि तीमध्ये हिंसाही अटळ दिसते. विरोध-विकास-प्रक्रिया म्हणजे वर्गयुद्ध असून त्या युद्धात राज्यशासनही सहभागी असते. त्यामुळे अत्याचार, दडपशाही यांचाही अनुभव येतो. तथापि समाजपरिवर्तन हे जनहिताचे असल्याने शेवटी राज्यक्रांती होते आणि परिवर्तन घडून येते. किंबहुना तसे ते घडवून आणणे हेच कल्याणकारक असते; प्रगतिकारक असते.

कृषि-अर्थव्यवस्थेत जमीनदार समर्थ असतो, तर व्यापार-युगात व्यापारी महत्त्वाचा ठरतो आणि औद्योगिक क्रांतीमुळे कारखान्याचा स्वामी भांडवलदार महत्त्व पावतो. या प्रत्येक स्थित्यंतरामध्ये नव्या वर्गाला लढा द्यावा लागला आहे. राज्यक्रांतीही घडून आली आहे. मात्र या सर्व स्थित्यंतरामुळे समाजाचा विकास साध्य झाला आहे.

समाज-परिवर्तनाची मार्क्सची मीमांसा ही अशी आहे. अर्थ-व्यवस्थेमधील बदल हे परिवर्तनाचे मुख्य कारण होय, असे त्याचे प्रतिपादन असल्याने त्याच्या या मीमांसेचे, इतिहासाची आर्थिक वा भौतिक मीमांसा, असे यथार्थ वर्णन केले जाते. या मीमांसेला अनुलक्षूनच मार्क्सने भांडवलशाही समाजव्यवस्थेचे विश्लेषण केले असून समाजवादी क्रांतीची अपरिहार्यता सिद्ध केली आहे. शिवाय ही क्रांती कशी घडवून आणावी, याचेही दिग्दर्शन केले आहे.

**भांडवलशाहीची वाटचाल**

उत्पादन-साधनांची खाजगी मालकी, उद्योगांचे खाजगी संयोजन आणि स्पर्धा ही भांडवलशाहीची काही मूलभूत वैशिष्ट्ये. उद्योगाचे प्रवर्तन, संयोजन आणि उद्योगाचा विस्तार–यामागे ‘ नफा ’ ही मुख्य प्रेरणा. भांडवलशाहीच्या वाटचालीत या नफ्याचे प्रमाण कमी होत जाते. उद्योगाची मुख्य प्रेरणाच अशी क्षीण झाल्याने संयोजक वर्ग अगतिक होतो आणि एकूण अर्थव्यवस्था संकटात येते. भांडवलशाही व्यवस्थेच्या मार्क्सवादी विश्लेषणाचे हे सार आहे. अंततः अर्थव्यवस्थेवरील संकटाचा परिहार समाजवादी क्रांतीमुळे होतो, असे मार्क्सचे त्यापुढचे प्रतिपादन आहे.

वस्तूंना महत्त्व येते ते मनुष्यांमुळे आणि मनुष्यांच्या संदर्भात. म्हणून संपत्ती आणि संपत्तीचे मूल्य यांचे स्वरूप सामाजिक असते. या संपत्तीचे उत्पादन म्हणजेच मूल्याची निर्मिती. ही मानवी श्रमामुळे होते असा मार्क्सवादाचा सिद्धान्त आहे आणि तो शास्त्रपूत आहे. श्रमामुळे निर्माण होणारे मूल्य त्या श्रमासाठी द्याव्या लागणाऱ्या मूल्यापेक्षा अधिक असते. परिणामतः मूल्याधिक्य निर्माण होते. दोन वेळच्या भोजनातून दिवसभर टिकणारी श्रमशक्ती निर्माण होते. मात्र त्या भोजनातील अन्नाच्या निर्मिती-साठी दिवसभरची श्रमशक्ती लागत नाही. प्रसंगी कित्येक दिवस मनुष्य हा अन्ना-शिवाय काम करू शकतो, असा अनुभव आहे. यामध्येच मूल्याधिक्याच्या निर्मितीचे

रहस्य आहे. तथापि उद्योगाची मालकी खाजगी संयोजकाची असल्याने मूल्याधिक्या-वर त्याचे स्वामित्व राहते आणि या मूल्याधिक्यामधूनच त्याला नफ्याची प्राप्ती होते.

भांडवलशाही उत्पादनपद्धतीत भांडवल आणि श्रमशक्ती यांचे साहचर्य असते. तथापि विकासाच्या प्रक्रियेत भांडवलात वाढ होते आणि श्रमशक्तीचे प्रमाण कमी होत जाते. उद्योगातील एकूण श्रमशक्तीचे प्रमाण तुलनेने कमी होत गेल्याने मूल्याधिक्याचे प्रमाणही कमी होत जाते. परिणामतः नफ्याचे प्रमाणही घटत जाते.

भांडवलाच्या वाढीमुळे समाजाचे उत्पादन-सामर्थ्य वाढते यात शंका नाही. तथापि एकूण श्रमशक्तीचा विनियोग कमी झाल्यामुळे उत्पादन-सामर्थ्याला अनुरूप अशी उत्पादनवाढ होत नाही. श्रम ही अत्यंत विनाशी वस्तू आहे. रोजगार नसलेल्या श्रमिकाची श्रमशक्ती ही वायाच जाते. उत्पादन-सामर्थ्याचा हा अपव्यय ही सामाजिक आपत्ती होय. भांडवलाचे प्रमाण वाढते, तसा उद्योगाचा विस्तार होतो; उत्पादनाचे प्रमाण मोठे होते. यंत्राच्या वापराचा तो एक अपरिहार्य परिणाम असतो. उद्योगसंस्थांमधील स्पर्धेमुळे उत्पादनाचा अतिरेक होतो आणि मंदीचे संकट कोसळते.

विकासाच्या प्रक्रियेत नफ्याचे प्रमाण घटत जावे, हे स्वाभाविक आहे. तथापि संयोजकवर्ग सूक्तासूक्त मार्गाने नफा टिकविण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी तो वेतनकपात करून श्रमिकांचे शोषण करील, कृत्रिम टंचाई निर्माण करून वस्तूंच्या किंमती वाढू देईल आणि मक्तेदारी स्थापून ग्राहकांना अगतिक करील. कोणत्याही देशाच्या आर्थिक इतिहासात याचा प्रत्यय येईल. हे सारे मार्ग अर्थातच समाजहिताला बाधक, किंबहुना घातक, होत. बेकारी, उत्पादनसामर्थ्याचा अपव्यय, श्रमिकांचे शोषण, मक्तेदारी—या सर्व अरिष्टांचे मूळ ' नफा ' या प्रेरणेमध्ये आहे. आणि जोपर्यंत उत्पादनाची सूत्रे खाजगी संयोजकांच्या स्वाधीन आहेत, तोपर्यंत नफा ही एकमेव प्रेरणा प्रभावी राहते.

विकासाच्या प्रक्रियेत समाजातील सर्व श्रमशक्तीचा विनियोग, गरजेला अनुरूप उत्पादन आणि वाढत्या उत्पादनक्षमतेला अनुलक्षून उतरत्या किंमती यांचा प्रत्यय यावयास हवा. व्यापक समाजहिताच्या दृष्टीने हाच खरा विकास होय. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये या प्रक्रियेत व्यत्यय येतो. भांडवलशाहीचे हे मार्क्सवादी विश्लेषण आहे.

**समाजवादाची अपरिहार्यता :**

भांडवलशाहीमुळे विकास-प्रक्रियेत येणारा व्यत्यय दूर करावयाचा तर अर्थ-व्यवस्थेचे अधिष्ठानच बदलावयास हवे. नफ्याऐवजी समाजहित आणि स्पर्धेऐवजी नियोजन यावर आधारित अशी समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करावयास हवी, असे मार्क्सचे प्रतिपादन आहे. इतिहासाच्या वाटचालीत भांडवलशाहीचे कार्य संपले

म्हणजे समाजवाद अनिवार्य ठरतो. त्यामुळे समाजवादाची प्रस्थापना हे ऐतिहासिक दृष्टया प्रगतिशील परिवर्तन ठरते. या परिवर्तनात भांडवलदार-वर्गाचे महत्त्व नष्ट होते आणि श्रमिक वर्ग महत्त्व पावतो. नव्या परिस्थितीत हे युक्तच असते. तथापि भांडवलदार या परिवर्तनास सहज मान्यता देत नाहीत. त्यातूनच वर्गविग्रह उद्‌भवतो. या विग्रहाच्या संदर्भात मार्क्सने श्रमिक वर्गाला संघटनेचा आणि लढ्याचा आदेश दिला आहे. श्रमिक वर्गानी प्रसंगी राजकारण खेळावे, राज्यशासन हस्तगत करावे आणि तद्‌द्वारा समाजवादाची प्रस्थापना करावी; असे त्याचे दिग्‌दर्शन आहे.

समाजवादी परिवर्तनात हिंसा आवश्यक ठरते, असे मानण्याचे कारण नाही. भांडवलदार संयोजक वर्ग विवेकी झाला तर समाजवादाची अपरिहार्यता तो स्वयं-मान्य करील. भांडवलशाहीच्या वाटचालीत उद्योग मोठा होत जातो. कारखान्यामध्ये सहस्रावधी कामगार काम करू लागतात. संयोजकाच्या निर्णयाचा परिणाम सहस्रावधी कामगारांचे कुटुंबीय आणि लक्षावधी ग्राहक यांच्यावर होतो. असा उद्योग संयोजकाचा खाजगी मानावा कसा ? येथे उद्योगाचे स्वरूपच बदलून गेलेले असते. कायद्याने तो उद्योग खाजगी ठरत असला, तरी वस्तुतः त्याचे स्वरूप सार्वजनिक झालेले असते. विवेकी संयोजकास हा बदल नीट जाणवतो. आणि तो परिवर्तनास स्वयंसिद्ध होतो. तथापी असा संयोजक विरळा ! परिणामतः संघर्ष, वर्गयुद्ध –हा समाजइतिहासाचा नियमच ठरून जातो. अर्थात हे युद्ध अहिंसात्मक राहिले, तर मार्क्सवाद त्याचे स्वागतच करील.

समाजामध्ये केवळ मालकी हक्कावर आधारलेले अर्थार्जनाचे मार्ग उपलब्ध आहेत तोपर्यंत मालक आणि मजूर असा वर्गभेद अपरिहार्य असतो. हा भेद नाहीसा व्हावा, एवढीच मार्क्सची दृष्टी आहे. आणि त्यासाठीच उत्पादन-साधनांवरील खाजगी स्वामित्व नष्ट करावयास हवे, असा त्याचा आग्रह आहे. आता हे कसे साध्य करावे, एवढाच प्रश्न उरतो.

**समाजपरिवर्तन आणि सत्याग्रह-शास्त्र :**

धनिकांनी आपल्या धनाचा विश्वस्तवृत्तीने समाजहितार्थ विनियोग करावा असा महात्माजींच्या सत्याग्रहशास्त्राचा आदेश आहे. तथापि जेथे धन हे मुळात अन्याय्य मार्गांनी संपादिलेले असते, तेथे धनाचा विनियोग विश्वस्त वृत्तीने करावा, अशी प्रवृत्ती व्हावी कशी ? भांडवलशाही व्यवस्थेमध्ये विनाश्रम अर्थार्जन करण्याचे कित्येक मार्ग कायदेशीर असे राहतात. या मार्गांनी संपत्ति-संचय करणारे हे आपली प्राप्ती न्याय्य आहे, असे गृहीत धरूनच व्यवहार करीत असतात. अशा धनिकांमध्ये जनहिताची विश्वस्तवृत्ती यावी कशी ? अन्याय्य मार्गांनी व्यवहार करणारांकडून न्याय्य वर्तनाची अपेक्षा ही सत्याग्रहशास्त्राच्या दृष्टीने विसंगती होय. महात्माजींचा साधन-शुचितेविषयी कटाक्ष होता, हे सर्वश्रुत आहे.

केवळ विश्वस्तवृत्तीच्या आदेशाने वर्गविग्रह थांबून वर्गसमन्वय साध्य होईल—ही आशा भावडी ठरेल. अन्याय्य मार्गांना प्रतिष्ठा देणारे कायदे नष्ट करणे आणि ते करण्यासाठी राज्यशासन हस्तगत करणे—याविना अन्य मार्ग राहत नाही.

प्रत्यक्ष अर्थरचनेच्या दृष्टीने महात्माजींनी ग्रामोद्योगांचा, स्वयंपूर्ण स्वायत्त ग्रामसंस्थेचा पुरस्कार केला. यात समन्वयाची दृष्टी असली तरी हा पुरस्कार इतिहासाच्या स्वाभाविक प्रवाहाला विरोधी असा आहे. यंत्र आणि कारखाने यांमुळे सामान्य जनांच्या वाटचाला बेकारी, शहरातील गलिच्छ वस्ती या आपत्ती आल्या असल्या, तरी 'यंत्र' ही एक नवी शक्ती आहे. समाजाची पुनर्रचना करून यंत्रशक्तीचा समाजकल्याणासाठी विनियोग करावा, यात विकास आहे. आणि इतिहासाला ते धरून होईल. राष्ट्रसभेला आणि पं. नेहरूंसारख्या तिच्या नेत्यांना याची जाणीव होती. म्हणूनच त्यांनी औद्योकीकरणाचा, समाजवादी समाजरचनेचा आग्रह धरला.

जातिभेदासारख्या सामाजिक प्रश्नाच्या संदर्भातही महात्माजींनी समाजपुनर्रचनेचा आग्रह धरला नाही. त्यांची दृष्टी समन्वयाची होती. दलितांची सेवा आणि सुधारणा यांवर त्यांचा भर होता. परिणामतः हरिजन-सेवक-संघासारख्या संघटना केवळ वरिष्ठवर्गीय सेवक कार्यकर्त्यांच्या संस्था झाल्या. त्यांना प्रातिनिधिक स्वरूप आले नाही. काळाच्या ओघात दलितवर्ग राजकीय दृष्टचा जागृत झाला. आणि या जागृतीमधून त्यांच्या स्वतंत्र वर्गीय संघटना निर्माण झाल्या. हेही इतिहासक्रमाला धरूनच झाले, यात शंका नाही.

सत्य, अहिंसा यांसारखी मूल्ये आणि विश्वस्तवृत्ती, सेवा यांसारखी नीतितत्त्वे यांची अन्तिम इष्टता वादातीत आहे. प्रत्यक्ष व्यवहारात या मूल्यांचा आविष्कार कसा होईल, व्यक्तींच्या आचरणात त्यांचा प्रभाव कसा राहील, हा प्रश्न प्रस्तुत आहे. व्यक्तीच्या केवळ अन्तःप्रेरणेवर निर्भर राहता येत नाही. स्वार्थाला अनुकूल असणारे जुने नियम, जुने कायदे, जुन्या संस्था व्यक्ती सोडीत नाही वा मोडीत नाही. ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे. यातूनच सामाजिक संघर्ष उद्भवतात. अन्तिम मूल्यांना प्रतिबंधक आणि बाधक ठरणारे नियम आणि कायदे बदलल्याशिवाय सामाजिक व्यवहाराचा संदर्भ बदलणार नाही. महात्माजींना याची जाणीव होती. म्हणूनच त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याचा आणि लोकशाहीचा पुरस्कार केला. त्यांच्या प्रस्थापनेसाठी संघटना उभारून लढाही दिला. सत्य-अहिंसाधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी राजसत्ता लोकांच्या स्वाधीन असणे आवश्यक आहे, अशी महात्माजींची धारणा होती.

समाजपरिवर्तनाचे एक साधन म्हणून राजसत्ता महत्त्वाची आहे, हे सत्य मार्क्स आणि महात्माजी या उभयतांना संमत होते; यात शंका नाही. मार्क्सने श्रमिकवर्गाच्या राज्यशासनाचा आग्रह धरला. हे श्रमिकांचे शासन सर्व तऱ्हेच्या

स्वामित्वाचे हक्क नष्ट करून वर्गविरहित समाजाची प्रस्थापना करील. असे झाले म्हणजे समाजातील संघर्षाचे मूळ कारणच नाहीसे होईल. आणि अन्ततः राज्यसंस्था गळून जाईल, अशी मार्क्सवादाची अपेक्षा आहे.

मार्क्सला अभिप्रेत असलेले श्रमिकांचे राज्यशासन मुळात सशस्त्र क्रान्तीने अधिकारावर येते. आणि त्याच्या हाती अर्थसत्ता आणि राजसत्ता या दोनही सत्तांचे केंद्रीकरण होते, अशा केन्द्रीकरणामुळे हे राज्यशासन अधिक उग्र होते. हिंसात्मक मार्गाने अधिकारावर येणारे शासन–मग ते श्रमिकांचे का असेना–अनियंत्रित सत्तेने अधिक हिंसक होते, असे महात्माजींचे भाष्य आहे. रशिया आणि चीन येथील अनुभव महात्माजींच्या या भाष्याचा प्रत्यय आणून देणारा आहे.

केन्द्रीकरण–सत्तेचे वा संपत्तीचे–हे लोकशाहीला आणि समाजवादाला घातक ठरते. यासाठीच महात्माजींनी राजसंस्था आणि अर्थसंस्था या वेगवेगळ्या राहाव्यात आणि त्या संस्थांची रचनाही विकेंद्रित असावी, असा त्यांनी आग्रह धरला. 'ग्रामोद्योग, स्वायत्त ग्रामसंस्था स्वयंपूर्ण ग्रामराज्य'–या कार्यक्रमातील विकेंद्रीकरणाची दृष्टी स्पष्ट आहे.

**मार्क्सवाद–गांधीवाद : समन्वयाची आवश्यकता**

केवळ स्वामित्वावर आधारलेले वर्गभेद, अर्थसत्तेचे वाढते केन्द्रीकरण, समर्थवर्गाचे राज्यशासनावरील वर्चस्व, अन्याय्य कायदे आणि दुर्बलांचे शोषण,–या आजच्या समाजाच्या प्रमुख व्यथा होत. मार्क्स आणि महात्माजी यांनी या व्यथांचा परिहार कसा करावा, याचे स्वयंप्रज्ञेनुसार मार्गदर्शन केले आहे. वर्गसमन्वय, सत्याग्रह, लोकशासन हा महात्माजींचा मार्ग आहे. यामध्ये अध्यात्मनिष्ठ नैतिक दृष्टी आहे. वर्गविग्रह, सशस्त्र क्रान्ती, श्रमिकांचे राज्यशासन आणि समाजवादाची संस्थापना हा मार्क्सचा मार्ग आहे. यामध्ये वस्तुनिष्ठ शास्त्रीय दृष्टी आहे. समाजविज्ञानामध्ये या दोनही दृष्टींचे महत्त्व सुस्पष्ट आहे. त्यांचा समन्वय समाजविकासाला उपकारक ठरेल, यात शंका नाही.

समाजजीवनाचा मूलभूत विचार केला तर राज्यसंस्था अनिवार्य असल्याचे स्पष्ट होते. शांतता, सुव्यवस्था, जीवितवित्ताविषयी किमान सुरक्षा – यांची निश्चिती राज्यसंस्थेविना मिळू शकत नाही, हे ऐतिहासिक सत्य आहे. राज्यसंस्था आली म्हणजे दंड, शासन, हिंसा या गोष्टी ओघानेच येतात. लोकशाहीमध्येही हे भय राहते. लोकशासनांतील राज्यसंस्थेकडून होणाऱ्या अन्याय्य हिंसेचा अहिंसात्मक प्रतिकार कसा करावा–याचे विश्लेषण आणि मार्गदर्शन सत्याग्रहशास्त्राच्या भाष्यकाराकडून, गांधीवादाच्या आचार्यांकडून आज अपेक्षित आहे. अशा विश्लेषणावरच महात्माजी आणि मार्क्स यांच्या विचारांचा समन्वय अवलंबून आहे.

२२

# गांधीजींच्या पांच निष्ठा

## बाळकोबा भावे

गांधीजींचे जीवन ज्या मूलभूत निष्ठांवर आधारलेले होते, त्यांचे विवेचन पुढील लेखात केलेले आहे. त्यांच्या सत्यनिष्ठेतून इतर निष्ठा कशा निर्माण झाल्या, याचे दर्शनही या लेखात, गांधीजींच्या सहवासांत दीर्घ काळ घालविलेल्या बाळकोबांनी, घडविले आहे.

गांधीजींच्या जीवनात मुख्यपणे पाच निष्ठा आढळून येतात: (१) सत्यनिष्ठा (२) ईश्वरनिष्ठा (३) अहिंसानिष्ठा (४) ब्रह्मचर्य-निष्ठा व (५) परिश्रमनिष्ठा

(१) सत्यनिष्ठा हा गांधीजींच्या जीवनाचा मूळ पाया आहे. त्यांची सत्याची व्याख्या विशेष स्वरूपाची होती. स्वत:ला जे सत्य वाटते त्याचा आग्रह ठेवून तो अमलांत आणण्याचा आटोकाट प्रयत्न करणे ही त्यांची सत्याची व्याख्या होती. या व्याख्येत दोन गोष्टींचा समावेश गृहीत धरलेला आहे: (१) आपणाला जे सत्य वाटते ते स्वहितकर म्हणजे स्वत:चे कल्याण करणारे व (२) परहितकर म्हणजे दुसऱ्याचेकल्याण साधणारे असले पाहिजे. स्वार्थ व परार्थामध्ये विरोध असू शकतो. पण स्वहित व परहितामध्ये विरोध नाही.

सत्य कुणाला म्हणावयाचे हे सामान्यत: बहुतेक सर्वांना कळते. पण बुद्धीला सत्य कळले तरी ते अमलात आणणे म्हणजे आचरणात आणणे प्राय: सर्वांना कठीण जाते. याचे मुख्य कारण लहानपणापासून तसा अभ्यास करविला जात नाही. जो

विचार आपल्या बुद्धीला पटला तो अमलात आणलाच पाहिजे, अशा प्रकारची आग्रही वृत्ती समाजात अलिकडे कमी दिसून येते. हल्ली जे शिक्षण दिले जाते त्यात बौद्धिक विकासावर जितका भर दिला जातो तितका भर आचरणाला लागणारी निग्रही शक्ती वाढविण्यावर दिला जात नाही. मनाची निग्रही शक्ती वाढविण्याची सोय हल्लीच्या शिक्षणसंस्थांमधून आढळून येत नाही. त्यामुळे विचार आणि आचार यांमधील अंतर हल्ली जितके वाढलेले दिसते, तितके कदाचित प्राचीन काळी नसावे. गांधीजींच्या लक्षात ही गोष्ट लहानणपणीच आलेली असावी, असे त्यांच्या चरित्रावरून दिसून येते. जी गोष्ट त्यांना पटली, सत्य वाटली, ती लगेच अमलात आणल्याशिवाय ते कधी रहात नसत. रस्किनचे 'अण्टु धिस लास्ट' म्हणजे 'सर्वोदय' पुस्तक वाचल्यानंतर त्यांना ज्या नवीन सत्य गोष्टी कळल्या, त्या तावडतोब त्यांनी अमलात आणल्या. बॅरिस्टरी एकदम सोडून दिली. बॅरिस्टर असताना त्यांचा वकिलीचा धंदा चांगलाच चालला होता. दक्षिण अफ्रिकेत २१ वर्षे त्यांनी वकिली केली व ती देखील त्यांनी सत्यानेच केली. सत्याने वकिली करणे शक्य नाही, असे प्राय: सर्व वकिलांचे मत आहे. वकिलीचा धंदा करून पैसा कमविणे सत्याला धरून नाही, हे कळताच वकिली सोडून ते शेतीत परिश्रम करू लागले. त्यांच्या या सत्यनिष्ठेतूनच जाज्वल्य कर्तव्यनिष्ठा त्यांच्या जीवनात निर्माण झाली.

१९२१ सालची गोष्ट आहे. खिलाफतची चळवळ चालू होती. मी त्या वेळी त्यांच्या व्यक्तिगत सेवेत होतो. त्या वेळी माझे वय २१ वर्षांचे होते. ते व्याख्यान देण्यासाठी जात त्या वेळी मी त्यांच्या बरोबर व्याख्यान ऐकण्यासाठी कधीच जात नसे. ते वाहेर गेल्यानंतर त्यांची उरलेली सेवा करण्यातच माझा सर्व वेळ जात असे. दोन महिन्यांच्या सेवेनंतर एके दिवशी अचानक माझ्या मनात त्यांचे व्याख्यान ऐकण्याची इच्छा झाली. गांधीजींना विचारणे योग्य होईल किंवा कसे, याचा निर्णय चित्तात होईना. अशा अनिश्चित मन:स्थितीतच शेवटी मी त्यांना "व्याख्यान ऐकण्यासाठी आपल्या वरोबर येऊ कां ? ' असे विचारले. त्यांनी मला जे त्या वेळी उत्तर दिले व त्यातून मला जो कर्तव्यनिष्ठेचा बोध झाला, त्याचा माझ्या पुढील जीवनावर खोल परिणाम झाला. ते म्हणाले," तुला कुणी बोलाविले आहे का? ''हे त्यांचे वाक्य ऐकताच माझ्या चित्तात प्रकाश पडला. मला जी त्यांची व्यक्तिगत सेवा त्यांनी सोपविली आहे ती सेवा करणे माझे कर्तव्य समजून त्यात मी गढून जाणे व तद्व्यतिरिक्त कोणतीही इच्छा मनांत उद्भवू न देणे, हे मला साधले पाहिजे, असा त्या वेळी माझ्या मनाचा निश्चय झाला.

(२) गांधीजींच्या जीवनाचा मुख्य आधार जी ही सत्यनिष्ठा त्यातूनच गांधीजींना ईश्वरनिष्ठा लाभली. गीतेचे वाचन केल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, ईश्वर सर्वत्र भरलेला आहे. त्याव्यतिरिक्त कोणतीही स्वतंत्र वस्तु

अस्तित्वात नाही. देहाभिमानामुळेच मनुष्याला नेहमी दु:खाचा अनुभव येत असतो. अखंड ईश्वरस्मरणाशिवाय व ईश्वराला समर्पण झाल्याशिवाय देहाभिमान गळून जाणे शक्य नाही. देहाभिमान गळल्याशिवाय मनुष्याला अखंड शांती लाभणे अशक्य आहे. हा सत्य विचार त्यांच्या लक्षात येताच अखंड ईश्वरस्मरणाचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी मला लिहिलेल्या एका पत्रात ईश्वरस्मरणाविषयी येणेप्रमाणे लिहिले आहे : "जागृत असा एक क्षण नाही की, ज्या वेळी ईश्वर माझ्यामध्ये आहे व तो सर्व पाहून राहिला आहे याचे मला भान नसेल. हे भान बुद्धीला आहे व अभ्यासाने झाले आहे." त्यांना ईश्वरस्मरण अखंड होते. तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांचे फारसे अध्ययन न करता तत्त्वज्ञानाचे मुख्य सार जी अहंशून्यता ती अहंशून्यता त्यांच्या प्रत्येक क्रियेत दिसून येई. जीवनातील लहानमोठ्या सर्व क्रिया करीत असताना 'मी लेशमात्र काही करीत नसून माझ्या हातून सर्व कांही 'ईश्वरच करवीत आहे' अशी अकर्तृत्वाची, अहंशून्याची भावना नेहमी त्यांच्या चित्तात जागृत असे व ती त्यांच्या आचरणात नेहमी दिसून येई. त्यांच्यामध्ये ही जी जाज्वल्य ईश्वरनिष्ठा निर्माण झाली तिच्या-योगाने त्यांच्या चित्ताची शांती कधी ढळली नाही. एकदा मला ते म्हणाले, "माझी ईश्वरावर जी श्रद्धा आहे, त्या श्रद्धेच्या आधारानेच मी जगून आहे, अन्यथा चित्तावर आघात होण्यासारखे इतके प्रसंग माझ्या या व्यापक सार्वजनिक जीवनांत सारखेब नत असतात की, त्यातून शरीर टिकाव धरणे शक्य नाही.

१९१६ सालची गोष्ट आहे. अहमदावादजवळ स्थापन केलेल्या गांधीजींच्या आश्रमात रहाण्यासाठी एक हरिजन कुटुंब आलेले पाहून जे कट्टर सनातनी श्रीमंत आश्रमाला आर्थिक मदत देत होते, त्यांनी मदत देण्याचे बंद केले. त्या वेळी स्व. श्री. मगनलाल गांधी आश्रमाचे व्यवस्थापक होते. त्यांनी गांधींजींना सांगितले की, फक्त एक महिन्यापुरती खर्चाची रक्कम आश्रमाजवळ शिल्लक आहे. गांधीजी स्वस्थ होते. ते म्हणाले, "ईश्वराची जशी इच्छा असेल तसे होईल. तो नेहमी मदत करीत आला आहे. या वेळी देखील तो मदत करील." त्याच सुमारास एके दिवशी मोटारी-तून एक गृहस्थ आले. गांधीजींना बोलावून म्हणाले, "मला आश्रमाला काही मदत करावयाची आहे. तुम्ही घ्याल का ?" गांधीजी म्हणाले, "मी या वेळी अडचणीत आहे, मदत अवश्य घेईन." दुसऱ्या दिवशी त्याच वेळी ते मोटारीने आले व आश्रमात पाऊल न ठेवता १३,००० रु. च्या नोटा गांधीजींच्या हातात ठेवून चालते झाले. पूर्वी त्यांनी आश्रम कधी पाहिला नव्हता. व या वेळी देखील आश्रम पाहण्याची इच्छा न ठेवता परभारे मदत करण्याची ही पद्धती पाहून गांधीजी म्हणाले, "ईश्वर सदैव आपला पाठीराखा आहे."

(३) या त्यांच्या ईश्वरनिष्ठेतून अहिंसेविषयी निष्ठा निर्माण होऊन त्यातून सामुदायिक अहिंसेचे दर्शन त्यांना घडले. ईश्वरनिष्ठेमुळे व ईश्वरसमर्पणामुळे सर्वत्र

ईश्वर पहाण्याची दृष्टी त्यांना लाभली. त्यातून वृत्ती व्यापक वनल्यामुळे चित्तात करुणा, भाव जागृत होऊन गरीवांची दुःखे निवारण करण्याचा अहिंसक मार्ग त्यांना सुचला. अहिंसा म्हणजे शुद्ध प्रेमाचा उत्कर्ष. अशा प्रकारच्या शुद्ध प्रेमाचा उत्कर्ष गांधीजींच्या जीवनात प्रकट झालेला दिसत होता. विशुद्ध प्रेमात विचार-परिवर्तन घडवून आणण्याचे सामर्थ्य आहे, हे स्वानुभवावरून त्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांना सामुदायिक सत्याग्रहाची कल्पना सुचली. व्यक्तिगत अहिंसेचा उत्कर्ष प्राचीन काळापासून संतांमध्ये झालेला आढळून येतो. पण सामुदायिक अहिंसेची कल्पना गांधीजींना सुचल्यामुळे त्यांनी सामुदायिक अहिंसेची साधना आपल्या जीवनात केली व इतरांकडूनही करविली. आपापसांतील संघर्ष, झगडे, स्पर्धा, ईर्षा, आदि टाळण्याचा, समाजात समता स्थापन करण्याचा विशुद्ध सत्याग्रहाचा एक उत्तम उपाय त्यांनी जगाला दाखविला. हल्ली आपल्या राष्ट्रात सत्याग्रहाचे विशुद्ध स्वरूप आढळून येत नाही, ही खेदाची गोष्ट आहे.

(४) त्यांच्या सत्यनिष्ठेतून, ईश्वरनिष्ठेतून व अहिंसेच्या निष्ठेतून ब्रह्मचर्यनिष्ठा त्यांच्या जीवनात निर्माण झाली. ते गृहस्थाश्रमी असून वयाच्या ३१ व्या वर्षीच त्यांनी ब्रह्मचर्यपालनाचा निश्चय केला व ३७ व्या वर्षी त्यांनी ब्रह्मचर्यव्रत घेतले ब्रह्मचर्याच्या सूक्ष्म पालनाशिवाय अहिंसेचे सूक्ष्म पालन होणे शक्य नाही, अशी त्यांची ठाम समजूत होती. ब्रह्मचर्याच्या सूक्ष्म पालनासाठी त्यांनी भगीरथ प्रयत्न केला. त्यातून त्यांना पुष्कळच यश मिळाले. अखंड ईश्वरस्मरणाशिवाय ब्रह्मचर्याचे कायिक, वाचिक, मानसिक पालन अशक्य आहे, हा त्यांचा अनुभव होता. या वावतीत त्यांनी येणे प्रमाणे लिहिले आहे:—" आत्मशुद्धीसाठी नेहमी ईश्वराचे स्तवन करावे. आस्तिक असे मानतो की, ईश्वर अंतर्यामी आहे. तो झोपेत देखील आपल्या चेष्टा पहात असतो. म्हणून आपण २४ तास सावध रहावे. कोणतीही शारीरिक किंवा मानसिक क्रिया करीत असताना ईश्वराचे नाव विसरू नये. म्हणजे ईश्वराचे विस्मरण होऊ देऊ नये. थोड्या अभ्यासाने दरेक अनुभवू शकतो की, सर्व क्रिया करीत असताना ईश्वर-स्मरण शक्य आहे. एका वेळी मनुष्य एकच विचार करू शकतो, हा नियम फक्त ईश्वरस्मरणालाच लागू नाही. कारण ईश्वरस्मरण हा आत्म्याचा स्वाभाविक गुण आहे. वाकी सर्व विचार उपाधिरूप आहेत. ईश्वर सर्व काही करतो, असे समजून जो ईश्वरामध्येच लीन होतो त्याला स्वतंत्र रीतीने विचार करण्याचे किंवा काही करण्याचे काय रहाते ? कारण तो स्वतः शून्य होऊन ईश्वराच्या हातातले फक्त साधनमात्र वनला आहे. अशा ईश्वरस्मरणाशिवाय ब्रह्मचर्याचे कायिक, वाचिक व मानसिक पालन मी असंभाव्य समजतो.''

(५) सत्यपालनाच्या आग्रहातूनच त्यांच्या जीवनात परिश्रमनिष्ठा निर्माण झाली. दक्षिण आफ्रिकेत असतानाच त्यांनी परिश्रमनिष्ठ जीवन सुरू केले होते. हिंदुस्थानात

अमदावादजवळ १९१६ साली त्यांनी जो सत्याग्रह आश्रम स्थापन केला त्यात सार्वजनिक सेवेचे काम त्यांनी ८ तास निश्चित केले होते. ८ तास सार्वजनिक सेवेचे काम केल्याशिवाय भोजनाचा कुणाला अधिकार नाही असे त्यांचे निश्चित मत होते. आश्रमात मुख्य काम कातणे, पिंजणे व विणकाम असे व त्यात दरेकाला ८ तास द्यावे लागत. या ८ तासांत स्वयंपाक आदी गृहकृत्यांचा समावेश नसे. आठ तास सार्वजनिक सेवेचे काम, आठ तास विश्रांती व बाकीच्या आठ तासांत गृहकृत्य, दोन वेळच्या प्रार्थना, स्वाध्याय आदींचा समावेश असे. १९१६ साली कोचरब आश्रमात मी ११ दिवस राहिलो होतो. त्या वेळी गांधीजी सकाळी उठल्यानंतर एक तास दळत असत. नंतर आश्रमात रहाणाऱ्या सर्व मंडळींचा स्वयंपाक फक्त दोन मुलींच्या मदतीने ते स्वतः करीत. दुपारी भोजनानंतर विणकाम करीत. त्यानंतर सायंकाळचा स्वयंपाक सकाळच्या स्वयंपाकाप्रमाणे स्वतः करीत. दोन वेळा स्वतः वाढीत. भोजन करतेवेळी पत्रे लिहवीत. मुलाखती तर असतच. त्या वेळी लोकमान्य टिळक आश्रम पहावयास आले होते. त्यांच्या परिश्रमनिष्ठेचे त्या वेळी मला जे दर्शन घडले त्याचा माझ्या मनावर खोल संस्कार उमटला. पटलेला विचार आत्मासात करण्याची म्हणजे तावडतोव अमलात आणण्याची त्यांची जी प्रखर सत्यनिष्ठा होती ती निरुपमच होती. ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिले आहे–" अर्जुना समत्व चित्ताचे । तेचि सार जाण योगाचे । जेथ मना आणि बुद्धिचे । ऐक्य आथि ।'' बुद्धी व मन यांमधील संघर्ष, झगडा दरेकाच्या नित्य अनुभवाला येतो. त्यांनी तो कायमचा मिटवून, ज्ञानदेव-महाराजांच्या म्हणण्याप्रमाणे बुद्धिमनाचे ऐक्य करून टाकले होते. आत्म्याच्या म्हणजे परमात्म्याच्या प्रेरणेप्रमाणे चालणारी बुद्धी व बुद्धीच्या अधीन मन व मनाच्या अधीन सर्व इन्द्रिये अशी आदर्श स्थिती त्यांची होती, असे म्हणावयास हरकत नाही.

त्यांच्या जीवनातील या पाच निष्ठांपैकी सत्यनिष्ठा हा त्यांच्या जीवनाचा मुख्य आधार असूनही ईश्वरनिष्ठा हा त्यांच्या जीवनाचा मुख्य गाभा होता. एके ठिकाणी ते लिहितात, " सत्य शब्दाची उत्पत्ती सत् या शब्दातून आहे. 'सत्' म्हणजे त्रिकाला-बाधित, एकरूपाने अस्तित्वात असणे, हे फक्त एका परमात्म्यालाच लागू होते. अशा सत्यस्वरूप परमात्म्याची भक्ती करून त्याला आपल्या हृदयात नेहमीसाठी ज्याने स्थान दिले, त्याला शतकोटी नमस्कार असोत. ''

दुसऱ्या एके ठिकाणी ते लिहितात, " या सत्यस्वरूप परमेश्वराचे ध्यान मला केवळ प्रार्थनेच्या वेळीच आहे असे नाही. पण खाता, पिता, बोलता, वाचताना, मलोत्सर्ग करीत असता, हे लिहीत असताना, दुसरे काही लिहीत असताना, भाषण करीत असताना प्रतिक्षण आहे, असे म्हणता येईल. इतके असूनही माझ्यामध्ये असणाऱ्या अपूर्णतेला तर पारच नाही. कारण ईश्वराचे मला फक्त ध्यान आहे. ईश्वर-मय अजून मी झालो नाही. या जन्मी हे साध्य होईल असेही नाही. पण या जन्मी

हे साध्य झाले नाही तरी त्याची मला काय चिंता ? कारण प्रयत्नांचा धनी मी आहे. फलाचा धनी सत्यनारायण आहे. ''

दुसऱ्या एके ठिकाणी ते लिहितात, "सर्व मानसिक दुर्बलतेचे कारण आपली ईश्वरविषयक अश्रद्धा हे होय "

१९२४ साली मी साधनेसाठी सत्याग्रहाश्रमातून गांधीजींना न विचारताच एकांतात गेलो. त्या वेळी त्यांना दु:ख झाले. त्यांनी मला लिहिले, " मी सत्याग्रहाश्रमाची स्थापना हरिदर्शनाच्या साधनेसाठीच केली आहे. असे असून तू आश्रमाबाहेर एकांतात गेलास याचे मला दु:ख झाले. '' आतून ईश्वरावर त्यांची दृष्टी किती खिळलेली होती, हे वरील वर्णनावरून सहज लक्षात येईल. लोकमान्य टिळकांनी 'गीतारहस्य' ग्रंथाच्या शेवटी येणेप्रमाणे भगवंतांची प्रार्थना केली आहे, " भक्तीची, ब्रह्मज्ञानाची, व कर्तृत्वाची जोड घालून देणाऱ्या या सम आणि तेजस्वी गीताधर्माने परमेश्वराचे यजनपूजन करणारे सत्पुरुष पुन: या देशात उत्पन्न होवोत, अशी भगवंतांची अखेर प्रार्थना करून गीतेचे हे रहस्यविवेचन पुरे करतो. ''

पू. गांधीजींसारखे महात्मे या भरत-भूमीत सतत उत्पन्न होवोत, अशी या शताब्दीच्या पवित्र प्रसंगी परमेश्वराजवळ प्रार्थना करून हा लेख संपवितो.

२३

# गांधीजींची आध्यात्मिक घडण

बाकूभाई मेहता

गांधीजींच्या जीवनांत सत्य-अहिंसादी व्रते परस्परांशी निगडित कशी होती, हे पुढील लेखात दाखविले आहे. स्थितप्रज्ञाची लक्षणे गांधीजी केवळ प्रार्थनेत म्हणत असे नव्हे, तर त्याप्रमाणे आचरण करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. रायचंदभाई, टॉलस्टॉय, रस्किन या थोर व्यक्तींचा प्रभाव गांधीजींच्या चित्तावर कसा पडला, हेही या लेखात दाखविले आहे. राजकारणातही साधनशुचितेचा आग्रह गांधीजी का धरीत, याचीही मीमांसा पुढील लेखात केली आहे.

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ।। दासबोध, दशक २०

काही माणसे जन्मजातच मोठी असतात, काही प्रयत्नाने मोठी होतात. आद्य शंकराचार्यांनी वयाच्या आठव्या वर्षीच वेद मुखोद्गत करून घेतले; नंतर चार वर्षांच्या आत सर्व शास्त्रांचे अध्ययन पुरे केले व सोळाव्या वर्षी बदरीकेदार येथे शांकरभाष्य लिहिले. तसेच ' बालपणीच सर्वज्ञता । वरी तयातें ।' अशा ज्ञानेश्वरांनी एकोणिसाव्या वर्षीच ' ब्रह्मविद्येचा सुकाळ ' करण्यासाठी ज्ञानेश्वरीसारखा लोकोत्तर ग्रंथ नेवासे येथे लिहिला. गांधीजी असे उपजत मोठे नव्हते. ते ' चणे खावे लोखंडाचे ' असे प्रयत्नवादी होते.

" नर करणी करे तो 'नारायण' नही, लेकिन 'महात्मा' जरूर वन सकता है " हे गांधीजींनी आपल्या उदाहरणाने जगाला दाखवून दिले आहे. मामुली मनुष्यामध्ये लहानपणी जे गुणदोष आढळून येतात तसे गांधीजींमध्येही होते; परंतु केनोपनिषदात म्हटल्याप्रमाणे, 'प्रतिबोधविदितं मतममृतत्वं हि विंदते' ह्या तत्त्वानुसार जीवनातील प्रत्येक प्रसंगांतून बोध घ्यावयाचा आणि आपल्याला पटली ती गोष्ट लगेच अमलात आणावयाची, हे गांधीजींचे वैशिष्टच होते. गांधीजींनी लहानपणापासून ह्याप्रमाणे वागण्याची सवय लावून घेतल्याने त्यांनी आपल्या जीवनात उत्क्रांती घडवून आणली. प्रत्येक प्रसंगाने आपल्या आध्यात्मिकतेचा विकास करीत करीत त्यांनी आपले जीवन कसे विशाल, व्यापक, भव्य आणि दिव्य वनविले हे पाहणे मोठे मनोरंजक आणि बोधप्रद आहे.

लहानपणी सहासात वर्षांचे असताना त्यांना भुताप्रेतांची फार भीती वाटे, तेव्हा प्रेमळ 'रंभा' दाईने अशा प्रसंगी आपत्तीमध्ये रामनामाचा जप केला असताना भीती वाटणार नाही, असे सुचविले. त्याप्रमाणे त्यांनी वागण्यास सुरुवात केली त्याचा त्यांना फार लाभ झाला. 'मी असे म्हणू शकतो की, रामनाम चोवीस तास जरी प्रत्यक्ष माझ्या ओठांत नसले तरी माझ्या हृदयात आहे. ते माझे रक्षण करणारे आहे आणि मी सतत त्याच्यावर जगलो आहे.'[१] 'रामनामाने मनुष्यामध्ये अनासक्ती आणि समता वाणते, रामनाम आपत्तिकालामध्ये त्याला धर्मच्युत होऊ देत नाही.[२] 'रामनाम आजसुद्धा एक अमोघशक्ती आहे.'[३] ह्यावरून दिसून येते की, लहानपणी रंभादाईने गांधीजींच्या मनात रामनामाच्या जपाचे जे इवलेसे रोप लावले, त्याचा शेवटी कसा मोठा वृक्ष वनला !

त्याच सुमारास गांधीजींनी 'हरिश्चंद्राख्यान' नाटक पाहिले आणि त्याची छाप त्यांच्या जीवनावर कायम राहिली. 'हरिश्चंद्रासारखे सत्यवादी सर्वांनी का असू नये ? असे रात्रंदिवस मला सारखे वाटत असे. हरिश्चंद्रावर कोसळल्या तशा आपत्ती भोगाव्या आणि सत्याचे पालन करावे असे माझे ध्येय असले पाहिजे, अशा तऱ्हेचे चिंतन माझे चाले.'[४] गांधीजींची सत्यनिष्ठा अत्यंत आदर्श होती. प्राचीन कालच्या हरिश्चंद्रानंतर सत्याचा इतका जोरदार पुरस्कार करणारा आणि त्याप्रमाणे प्रत्यक्ष आचरण करणारा, दुसरा कोणी क्वचितच झाला असेल असे वाटते. गांधीजींनी सत्याच्या तीन व्याख्या ठरविल्या आहेत. सत्य शब्द संस्कृत 'सत्' ह्या धातूपासून वनला आहे. सत् म्हणजे अस्तित्वात असणे, ह्यावरून 'नसे मिथ्यास अस्तित्व, नसे सत्यास नाशही', 'ज्याने हे व्यापिले सर्व ते जाण अविनाश तू । नाश त्या

१ ह. १७–८–१९३४
२ हिं. न. २१–१०–१९२६
३ आ. क. पा. २३
४ आ. क. पा. ६

मराठा ... ग्रंथालय, ठाणे. ...
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ................ नों: दि: ................

नित्यतत्त्वाचा कोणीही न करू शके' ह्या गीतेच्या (२-१६-१७) सिद्धांताला अनुसरून विश्वाचे मूळ कारण, विश्वाचे संचालन करणारे तत्त्व–आत्मा–ब्रह्म-हे एक सत्य.[५]

"सत्य म्हणजे काय? हा कठीण प्रश्न आहे, परंतु मी तो माझ्यापुरता सोडविला आहे. आतला आवाज सांगतो ते सत्य."[६]

सत्य जे सामान्यत: समजण्यात येते ते. खोटयाच्या विरुद्ध जे खरे ते सापेक्ष सत्य.[७]

सर्व वस्तूंचा पाया नीतिमत्ता आहे आणि सर्व नीतिमत्तेचे सार 'सत्य' आहे, अशी माझी खात्री झाली. 'सत्य' हेच माझे ध्येय बनले, त्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत गेले, आणि सत्येच्या व्याख्येचाही सतत विकास होत गेला.[८]

**पाच व्रतांचे परस्पर-संबंध**

सत्य म्हणजे केवळ वाचिक सत्य नव्हे तर सत्यमय जीवन, बोलणे आणि कृती. मन, वाचा आणि कृती ह्यांमध्ये पूर्ण सुसंगती म्हणजे सत्य.[९]

सत्याच्या उपासनेपासूनच इतर व्रतांचा जन्म झाला. 'सत्य' हे ध्येय आणि हे ध्येय साधण्यासाठी साधन 'अहिंसा' असले पाहिजे. 'जगातील कोणत्याहि प्राण्याशी मनसा, वाचा, कायेन हिंसा करण्याचे टाळणे ह्याचे नाव अहिंसा'[१०] कारण सर्वांमध्ये आत्मा आहे. 'ज्ञानादेवांनी 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत'[११] आणि तसेच तुकारामांनी 'तुका म्हणे जे जे भेटे। ते ते वाटे मीऐसे ।।'[१२] असे म्हटलेच आहे.

सत्याची–ब्रह्माची–उपासना हे ध्येय असल्यावर ब्रह्मचर्यपालन हे ओघानेच प्राप्त होते. 'ब्रह्मचर्य' ह्याचा अर्थ 'ब्रह्म'-साक्षात्कार करण्यासाठी संयमित जीवन व्यतीत करणे असा आहे. ब्रह्मचर्याचे पालन करताना, ब्रह्माशिवाय, इतरांचा–स्त्री-पुरुषांचा–विचार मनात आणणे, सत्योपासनेच्या विरुद्ध आहे.

आता 'अस्तेय' व्रत : चोरी करणे म्हणजे दुसऱ्याचे धन लुबाडणे. परंतु सत्योपासनेमध्ये 'दुसरा' म्हणून कोणी राहतच नाही. जो दुसरा वाटतो तो दुसरा नव्हे 'स्वत:च' आहे. कारण दुसऱ्याचा आत्मा आणि माझा आत्मा एकच आहे. तेव्हा सत्योपासनेमध्ये 'अस्तेय' व्रताचे पालन आपोआपच होते.

ह्याच विचारसरणीप्रमाणे 'अपरिग्रह'ही होतो. कारण मनुष्य स्वत:साठी

५ पॅ. ला. फे. १ पा. ३४०
६ यं. इं. ३१–१२–१९३१
७ आ. क. प्र. पा. १५
८ आ. क. पा. २५
९ पॅ. ला. फे. १ पा. ३४७
१० ह. ७–९–१९३५
११ ज्ञा. (१०–११८)
१२ सं. प्र. अ. २

वाजवीपेक्षा फाजील संग्रह करील तर दुसऱ्याला साहजिकच कमी पडेल आणि दुसऱ्यामध्येही 'आत्मा' असल्यामुळे त्याला कमी पडणे म्हणजे सत्य आणि अहिंसा व्रतांचा भंग होय. जगामध्ये आज दारिद्र्य आणि बेकारी दिसून येतात ह्याचे कारण 'अस्तेय' आणि 'अपरिग्रह' ह्या व्रतांचे लोक आचरण करीत नाहीत हेच होय.

ह्यावरून हे लक्षात आलेच असेल की, पंचव्रते कशी परस्परांशी निगडित आणि परस्परावलंबी आहेत.

ही पाच व्रते निरनिराळी म्हटली खरी, परंतु मूळ सत्य आणि अहिंसा ही दोनच आहेत. कारण ब्रह्मचर्य, अस्तेय, अपरिग्रह ही व्रते सत्य-अहिंसेच्या पोटात येऊन जातात; म्हणून गांधीजी, आटोपशीरपणाच्या दृष्टीने कधी कधी 'सत्य-अहिंसे'-चाच उल्लेख करतात. सत्य आणि अहिंसा ही नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे आहेत.

'सत्य आणि अहिंसा ही माझी फुप्फुसे आहेत.'[१३]

'देशाच्या किंवा धर्माच्या मुक्तीसाठी मी सत्य आणि अहिंसा ह्यांचा त्याग करणार नाही.'[१४]

'सत्य आणि अहिंसा सर्व धर्मांचा खरा पाया होय.'[१५]

गांधीजींची सत्याची उपासना फार कडक होती. सत्याच्या उपासनेमध्ये अतिशयोक्ती त्यांना बिलकूल खपत नसे. तसेच विनोदामध्ये, थट्टेमध्ये, व्यंगार्थाने, व्याजोक्तीने किंवा अन्य कोणत्याही रीतीने सत्यापासून यत्किंचितही ढळलेले त्यांना आवडत नसे. म्हणून ते प्रत्येक शब्द 'तोलून' बोलत किंवा लिहीत. त्यांच्या सर्व लिखाणातून ह्याची प्रतीती येते.

गांधीजी प्रथम 'ईश्वर' सत्य आहे असे मानीत, परंतु खोल चिंतनानंतर त्यांना असे आढळून आले की 'सत्य' ईश्वर आहे. त्यांची विचारसरणी अशी आहे:– 'ईश्वर' सत्य आहे ह्याचा अर्थ असा की, ईश्वर–विश्वाचे नियंत्रण करणारी शक्ती-शाश्वत, अविनाशी आहे, परंतु असे म्हणण्यात ईश्वराचे वैशिष्ट्य तितकेसे प्रतीत होत नाही, जितके 'सत्य' ईश्वर आहे असे म्हणण्याने होते; कारण 'सत्य' ईश्वर आहे असे म्हटल्याने प्रत्येक शाश्वत प्रमेय–सिद्धांत ईश्वर आहे असा बोध होतो, आणि असे म्हणणे, 'ईश्वर' सत्य आहे असे म्हणण्यापेक्षा अधिक व्यापक आहे हे उघड आहे.

### तीन विभूतींचा प्रभाव

'आधुनिक तीन व्यक्तींनी माझ्या जीवनावर खोल छाप पाडली आहे. रायचंदभाईंनी त्यांच्या जिवंत संपर्काने, टॉलस्टॉयने 'किंग्डम ऑफ हेवन इज विदिन यू'

१३ यं. इं. २१–१०–१९२६

१४ यं इं २०–१–१९२७

१५ ह. ६–४–१९३४

ह्या पुतस्काने आणि रस्किनच्या ‘ अन्टु धिस लास्ट ’ ह्या पुस्तकाने मला आश्चर्यचकित करून टाकले.[२५]

‘ रस्किनच्या पुस्तकापासून जी तत्त्वे गांधीजी शिकले ती अशी:–

(१) सर्वांच्या कल्याणांत व्यक्तीचे कल्याण आहे

(२) ज्या अर्थी सर्वांना आपआपल्या कामापासून आजीविका मिळविण्याचा हक्क आहे, त्या अर्थी वकील आणि न्हावी ह्यांच्या कामाचे मूल्य सारखे आहे.

(३)श्रमनिष्ठ जीवन –जमीन कसणाऱ्यांचे आणि ग्रामोद्योग करणाऱ्यांचेच– जगण्याच्या लायकीचे आहे.

ही तत्त्वे ‘ सर्वोदयाची तत्त्वे ’ म्हणून मानली जातात.

‘ प्रत्येकाने आपल्या आजीविकेसाठी शारीरश्रम केले पाहिजेत. जगामध्ये आज जे भयंकर दु:ख आहे त्याचे कारण वरील कर्तव्ये लोक बजावीत नाहीत म्हणून आहे.[२६] ’ ह्या टॉलस्टॉयच्या शिकवणीचाही परिणाम गांधीजींवर खूप झाला.

टॉलस्टॉयने माझ्या आंतरिक जीवनावर परिणाम घडवून आणला.[२७]

टॉलस्टॉयचे ‘ किंग्डम ऑफ हेवन इज विदिन यू ’ हे पुस्तक वाचून माझ्या मनातल्या हिंसेसंबंधीच्या सर्व शंका नष्ट झाल्या आणि अहिंसेवर माझा पक्का विश्वास बसला.[२८]

टॉलस्टॉयची ‘ किंग्डम ऑफ हेवन इज विदिन यू ’,‘ वॉट श्याल वुई डू देन ’, ‘ गॉस्पेल्स इन ब्रीफ ’’ ‘ दी फोर गॉस्पेल्स हारमोनाइज्ड अॅण्ड ट्रान्सलेटेड ’ ही आणि इतर दुसरीहि पुस्तके गांधीजींनी वाचली. ही पुस्तके वाचून ‘ जागतकि प्रेमाच्या अनंत संभवनीयतेचा साक्षात्कार मला अधिकाधिक होऊ लागला, ’[२९] असे खुद्द गांधीजींनी म्हटले आहे.

पॅरेलालजी म्हणतात:–

“ टॉलस्टॉयचे जीवन आणि तत्त्वज्ञान ह्यांचा रंग गांधीजींच्या केवळ जीवनाला आणि धर्मविचारांना लागला असे नाही, तर त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विचारांनाही लागला. टॉलस्टॉयचे जीवन आणि तत्त्वज्ञान ह्यांची छाप गांधीजींवर पडल्यामुळे गांधीजींना भारताची प्राचीन तत्त्वे नव्या अर्थाने प्रकट झाली; त्यामुळे गांधीजींना आयते तयार केलेले आराखडे जणू मिळाले. टॉलस्टॉयने ज्या शास्त्राचा पुरस्कार केला होता, त्याचा व्यापक प्रमाणावर उपयोग करण्यासाठी,ते शास्त्र अधिक सफाईदार करण्याच्या दृष्टीने, ह्या आराखड्याचा चांगला उपयोग झाला. ’’[३०]

---

२६ यं. इं. २०–९–१९२८
२७ इं. के. फॉर स्वराज्य पा. २४५
२८ यं. इं. २०–९–१९२८
२९ पॅ. अ. फे. पा. ६२८
३० पॅ. अ. फे. पा. ६२८

**साधन-शुचितेवर भर**

गांधीजींच्या अध्यात्मामध्ये ‘ साध्य आणि साधने ’ ह्या दोहोंच्या शुद्धीकडे विशेष लक्ष दिले जाते. सत्य आणि अहिंसेच्या उपासकाला ह्या दोहोंच्या शुद्धीबद्दल दक्ष असणे आवश्यकच आहे.

गांधीजींच्या कर्मयोगामध्ये ‘ साध्य ’ आणि ‘ साधने ’ हे शब्द परस्परांसाठी वापरण्याजोगे (Convertible) आहेत. चांगल्या कृतीपासून चांगले परिणाम येण्यासाठी साधने शुद्धच असली पाहिजेत.[३१]

“ लोक म्हणतात की, ‘ साधने ही शेवटी साधनेच आहेत.’ मी असे म्हणेन की, ‘ साधने ही शेवटी सर्व काही आहे. ’ जशी साधने तसा त्यांचा शेवट. हिंसक साधने, हिंसक स्वराज्याला जन्म देतील . . . ‘ साधनांच्या तंतोतंत प्रमाणांत साध्याचा साक्षात्कार होतो. ’ ह्या प्रमेयाला कोणताही अपवाद नाही. ”[३२]

कित्येक वेळेला साध्य शुद्ध आहे की नाही हे कळण्याला मार्ग नसतो. अशा परिस्थितीत वागावे कसे, ह्यासंबंधी गांधीजींनी केलेला खुलासा विचारणीय आहे. ते म्हणतात:——

मूलत: चांगले काय आहे हे मला माहीत नाही म्हणून परिणामावरून मी एखादी गोष्ट चांगली आहे किंवा वाईट आहे हे ठरवीत नाही. साधनांची काळजी घेतली म्हणजे पुरे. जर चांगल्यापासून कदाचित् वाईट परिणाम दिसून आला तर वापरलेली साधने चुकीची असण्याचा संभव आहे. असे अनुमान निघेल.[३३]

शुद्ध साधनांवर गांधीजी किती जोर देत होते, हे त्यांच्या खालील उद्गारांवरून लक्षात येते:–

‘ सत्याचा त्याग करून जर स्वराज्य मिळाले, तर भारताचा नाश झाला तरी मला चालेल. ’ [३४]

प्रत्येक व्यक्ती किंवा वस्तू ह्यापासून जी गोष्ट आपल्याला पटली तिचा स्वीकार करावयाचा आणि लगेच ती अमलात आणावयाची, असे गांधीजींचे धोरण होते. भूतांची भीती घालविण्यासाठी रंभा दाईने रामनामाचा जप सांगितला. लगेच त्याप्रमाणे वागायला सुरुवात केली. ‘ हरिश्चंद्र ’ नाटक पाहिले आणि सत्याचे आजन्म उपासक बनले. रस्किन्चे ‘ अन्टु धिस लास्ट ’ वाचले, तावडतोब ‘ श्रम-निष्ठ जीवन ’ आणि ‘ समान वेतन ’ सुरू केले. टॉलस्टॉयचे ग्रंथ वाचले आणि आंतरिक जीवनाचे कित्येक सिद्धांत ठाम केले.

१९३१ साली लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेमध्ये ‘ हरिजनांना

---

३१ यं. ला. फे २ पान ७६३
३२ यं. इं. १७–१९२४
३३ यं. ला. फे २ पा ७६३
३४ यं. इं. १–१०–१९३१

स्वतंत्र मतदार-संघ दिला तर मी त्याचा प्राणपणाने प्रतिकार करीन '( I shall resist it with my life) असे ते बोलले होते. परंतु सरकारने त्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही; एवढेच नव्हे तर सरकारने आपली भेदनीती दृढमूल करण्यासाठी हरिजनांना स्वतंत्र मतदार संघ देण्याचे जाहीर केले. म्हणून गांधीजींनी एकवीस दिवसांचा उपवास सुरू करून बोलण्याप्रमाणे कृतीने उत्तर दिले. त्यामुळे सरकारला आपले धोरण वदलावे लागले.

'थेंबे थेंबे तळे साचे ' असे आपण पाहतो. मक्षिका कणाकणांनी मध गोळा करतात, त्याप्रमाणे गांधीजींनी, वर वर्णन केल्याप्रमाणे, आपल्या जीवनरूपी प्रवाहात मिळतील तितक्या आध्यात्मिक अमृतबिंदूंचा आपल्यामध्ये संचय केला आणि त्यामुळे ते समृद्ध आणि सार्थ बनले. म्हणूनच ना. गोखले ह्यांनी गांधीजींचे असे वर्णन केले आहे:—

" ह्या अवनी-तलावर गांधीजींपेक्षा अधिक शुद्ध, अधिक उदात्त, अधिक शूर, आणि अधिक उन्नत आत्मा झाला नाही. मानवांमध्ये एक अद्वितीय मानव, वीरांमध्ये एक अनुपम वीर आणि देशभक्तांमध्ये विरल देशभक्त असे त्यांचे वर्णन करणे योग्य होईल. त्यांचे चरित्र पहाता हल्लीच्या काळात हिंदी मनुष्य किती उन्नत होऊ शकतो, ह्याची आपल्याला चांगली कल्पना येते. "

राजकीय गुरूंकडून शिष्याला मिळालेले हे प्रमाणपत्र किती यथार्थ आहे !

गांधीजी मोठे प्रयोग-वीर होते. त्यांनी आपल्या जीवनात अनेक प्रयोग केले. आधुनिक शास्त्रज्ञ आपल्या प्रयोगशाळेत बसून अनेक टेस्ट टच्यूब वगैरे उपकरणांच्या साहाय्याने प्रयोग करीत असतात. परंतु गांधीजींची प्रयोगशाळा विलक्षण होती. ती चार भिंतींनी मर्यादित नव्हती. अखिल मानवसमाज त्यांचे प्रयोगक्षेत्र होते, आणि सत्य, अहिंसा ह्यांसारखी अत्यंत सूक्ष्मतत्त्वे, त्यांच्या टेस्ट टच्यूब्ज होत्या.

गांधीजींची विशेषता ही होती की, त्यांनी सत्य आणि अहिंसा ह्यांचा उपयोग सामूहिक क्षेत्रात केला. त्यांनी म्हटले आहे की, " आपल्याला सत्य आणि अहिंसा ह्यांचा उपयोग केवळ व्यक्तीकडून करून घ्यावयाचा नसून, समूह, समाज आणि राष्ट्रे ह्यांच्याकडून करून घ्यावयाचा आहे. "[३५]

**व्यवहारातही सत्य हवे**

जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांमध्ये अशी समजूत प्रचलित आहे की, राजकारण, वकीली आणि व्यापार ह्यांमध्ये खोटे बोलल्यावाचून चालतच नाहीं, किंबहुना असेही मानले जाते की, राजकारणामध्ये डावपेच आणि हिंसा ह्यांचा अवलंब केल्याशिवाय भागतच नाही. जगातील देशांच्या इतिहासाचे वरवर निरीक्षण जरी केले तरी त्यामध्ये, डावपेच, कृष्ण कारस्थाने, खून, लढाया, वगैरे आढळून येतातच; एवढेच नव्हे तर

३५ ह. २–३–१९४०

राजकारणी आणि मुत्सद्दी म्हटला की तो ह्या सर्वांत तरबेज असलाच पाहिजे, नाही तर त्या कामासाठी तो नालायक समजण्यात येतो.

परंतु गांधीजींना असले, लबाडी आणि हिंसा ह्यांनी बरबटलेले, राजकारण मान्य नव्हते. त्यांचा आत्मा अशा राजकारणात गुदमरून जाई, म्हणून त्यांनी अधिक उन्नत आणि अभिनव अशी पद्धती स्वीकारली. त्यांनी–

(१) राजकारण सत्यावर अधिष्ठित केले, आणि

(२) अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी 'सत्य' आणि 'अहिंसा ह्यांवर उभारलेले 'सत्याग्रह' हे शस्त्र (Weapon) मानवतेला दिले.

जागतिक संस्कृतीला गांधीजींच्या ह्या दोन बहुमोल देणग्या होत.

गांधीजी मुमुक्षू होते. परंतु मोक्षासाठी ते हिमालयाच्या धवलगिरी शिखरावर जाऊन एकांतात साधना करीत बसले नाहीत. त्यांना मोक्षाची तीव्र तळमळ होती, परंतु मोक्षाचा त्यांचा मार्ग इतर मुमुक्षूंपेक्षा निराळा होता.

गांधीजी चराचरामध्ये परमेश्वर पाहत होते. गीतेच्या सहाव्या अध्यायात (३०-३२ मध्ये) म्हटल्याप्रमाणे 'मज सर्वांत जो पाहे, पाहे माझ्यात सर्वही', 'जो आत्मौपम्यबुद्धीने सर्वत्र सम पाहतो' अशी त्यांची दृष्टी होती.

गांधीजींच्या राजकारणाचे असे स्वरूप असल्याने, त्यांच्याबद्दल प्रतिस्पर्ध्यांच्या मनात आदर असे.

गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेमध्ये १९०३ ते १९१४ पर्यंत तेथील एशियन लोकांच्या हक्कांसाठी लढा दिला. 'गोरे विरुद्ध काळे' असा हा लढा होता. गोऱ्यांचे प्रतिस्पर्धी जनरल स्मट्स् ह्यांच्याशी तडजोड होऊन हा लढा मिटला. जनरल स्मट्स् ह्यांनी 'गांधीजी हे जगातील महान् पुरुषांपैकी एक होत. उच्च आध्यात्मिक ध्येयांनी प्रेरित असलेले त्यांचे जीवन आहे,'[३६] असे उद्‌गार काढले आहेत.

दक्षिण आफ्रिकेतून गांधीजी १९१५ मध्ये भारतात आले. १९१५ ते १९४७ पर्यंत –सतत बत्तीस वर्षे– गांधीजींनी सत्य आणि अहिंसा ह्यांवर अधिष्ठित अशा चळवळी करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले, आणि जगाला 'रणावीण स्वातंत्र्य' मिळविता येते, हे सिद्ध करून दाखविले. जगाच्या इतिहासांत सोनेरी अक्षरांनी लिहिण्यासारखी ही घटना घडवून आणली! इंग्रजांतर्फे स्वातंत्र्याचे उदक सोडणारे लॉर्ड माऊंटबॅटन ह्यांनी गांधीजींना सांगितले की, 'हिंसेपुढे यत्किंचितही झुकावयाचे नाही, असे इंग्रजांचे धोरण नेहमीचे आहे, परंतु 'महात्म्या'च्या अहिंसेने मात केली. भारताच्या अहिंसक लढ्याचा परिणाम म्हणून इंग्रजांनी भारत सोडण्याचे ठरविले आहे.'[३७]

३६. पॅ. ला. फे. १ पा. ११
३७. पॅ. ला फे. २ पा. ७८

एवढेच नव्हे, तर लॉर्ड माऊंटबॅटन पुढे एकदा गांधीजींना म्हणाले की, ‘एकंदर जगाच्या दृष्टीने तुमचे स्थान अद्वितीय आहे. . . . . अहिंसेचा संदेश पसरविण्यासाठी तुम्हाल दीर्घायुष्य लाभो. ’[३८]

भारताचे स्वातंत्र्य, इतर देशांच्याही स्वातंत्र्याची नांदी ठरली. भारताप्रमाणेच ब्रह्मदश, सिलोन ह्या देशांना स्वातंत्र्य मिळाले. शिवाय त्याच दिशेने आफ्रिकेतील केनिया, टांगानिका वगैरे प्रदेशांनाही स्वातंत्र्य मिळाले.

गांधीजींच्या आध्यात्मिक राजकारणाची छाप जगातीलही काही विचारवंत लोकांवर पडली आहे.

अमेरिकेतील नीग्रो लोकांचे सुप्रसिद्ध पुढारी मार्टिन ल्यूथर किंग ह्यांनी गांधीजींच्या ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास केला, एवढेच नव्हे तर गांधीजींसंबंधी अधिक माहिती मिळविण्यासाठी ते १९५९ साली भारतात आले, त्या वेळी त्यांनी गांधीजींचे सहकारी आणि प्रमुख अनुयायी ह्यांची भेट घेऊन सत्य-अहिंसेसंबंधी त्यांच्या मनात जे प्रश्न, शंका होत्या, त्यांचे निरसन त्यांनी करून घेतले. अमेरिकेत नीग्रो लोकांवर जे सामाजिक अन्याय होतात, ते दूर करण्यासाठी त्यांनी गांधीजींच्या सत्याग्रहाचा अवलंब केला. त्यांत त्यांना थोडे यश मिळालेही. ह्याच मार्गाने आपले कार्य पुढे चालू ठेवण्याचा त्यांचा निश्चय होता, परंतु दुर्दैवाने गांधीजींप्रमाणे त्यांचाही खून झाला !

सिसिलीचे पुढारी श्री. डोलची हेही गांधीजींच्या तत्त्वानुसार आपल्या देशाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात.

इंग्लंडचे सुप्रसिद्ध गणितज्ञ आणि तत्त्वज्ञानी बर्ट्रंड रसेल ह्यांनाही गांधीजींचा मार्ग पसंत असून तेही इंग्लंडमध्ये हिंसक राष्ट्रांच्या कारवायांविरुद्ध दहा दहा हजार लोकांचे अहिंसक मोर्चे, निदर्शने, आंदोलने करीत असतात.

व्यापार हा असाच व्यवहार आहे की, ज्यात खोटे बोलल्याशिवाय चालत नाही, असे लोक मानतात.

गांधीजी म्हणतात:–“ सर्वसाधारण अशी समजूत आहे की, ‘ अध्यात्म आणि भौतिक कल्याण ह्यांच्यामध्ये नेहमी विरोध असतो. व्यापार आणि तत्सम इतर विषयांच्या बाबतीत मनुष्य आध्यात्मिक दृष्टया वागू शकत नाही. अशा बाबतीत अध्यात्माला स्थान नाही. अध्यात्म केवळ मोक्षासाठी आहे. ’ पुष्कळ व्यवहारचतुर लोकांना असे म्हणताना आपण ऐकतो. ”

अशा रीतीने जीवन आणि व्यवहार ह्यांची फारकत करण्यास गांधीजी तयार नव्हते. ज्याप्रमाणे ताण्यात बाणा हा विणलेला असतो, त्याप्रमाणे जीवनरूपी ताण्यात अध्यात्माचा बाणा विणलेला असला पाहिजे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत आणि जीवनाच्या

---

३८ पॅ. ला. फे. २ पा. ४५८

सर्व प्रसंगी अध्यात्माचा आधार सुटता कामा नये, असे त्यांचे मत होते. ते म्हणतात,

"माझ्या मते गीतेच्या कर्त्याने (भगवान् श्रीकृष्णाने) वरील कोटिक्रमाचे निरसन केले आहे. त्याने मोक्ष आणि सांसारिक गोष्ट ह्यांमध्ये लक्ष्मणरेषा काढलेली नाही. ह्याच्या उलट त्याने असे दाखवून दिले आहे की, आपल्या सांसारिक बाबतीतही अध्यात्माचे नियंत्रण असलेच पाहिजे. मला असे वाटते की, गीता असे शिकविते की, दैनंदिन जीवनामध्ये जे आचरणात आणणे शक्य नाही त्याला अध्यात्म म्हणणे शक्य नाही. गीतेने असे म्हटले आहे की, 'अनासक्तीने जी कर्मे करणे शक्य नाहीत ती त्याज्य होत.' हा सोनेरी नियम मनुष्याला पुष्कळ वेळा खड्डयात पडण्यापासून बचावतो. ह्या नियमानुसार खून, असत्य बोलणे, उच्छृंखल असंयमी जीवन आणि तत्सम इतर गोष्टी 'पापयुक्त आणि म्हणून त्याज्य' मानल्या पाहिजेत. असे वागल्याने मानवी जीवन साधे बनते आणि त्या साधेपणापासून मनुष्याला शांती लाभते. ह्या दृष्टीने विचार करता मला असे वाटते की, गीतेच्या केन्द्रीभूत शिकवणीप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करताना मनुष्याला सत्य-अहिंसेप्रमाणे वागणे क्रमप्राप्तच आहे." [३९]

---

३९ गांधीजी सं. ग. ६–८–१९३१

२४

# व्रतांचें व आश्रमांचें अधिष्ठान

मामा क्षीरसागर

गांधीजींच्या नानाविध कार्यांचा उगम त्यांच्या आध्यात्मिक वृत्तींतून झालेला होता. ईश्वरी साक्षात्कारासाठी त्यांनी राजकारण केले व त्यासाठीच ५ आश्रम व ११ व्रते चालविली. त्यांची मूलभूत प्रेरणा कोणती होती, याचे दर्शन पुढील लेखात घडविले आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात नवनिर्माणाचा मोठा प्रयत्न चालला आहे. परंतु त्यातून नवजीवन निर्माण होत आहे का ? जीवनाची नवीन मूल्ये स्थापन होत आहेत का ? जीवनाला नवीन आशय प्राप्त होत आहे का ? याचा विचार प्रथम केला पाहिजे. आजसुद्धा तीच जुनी भांडणे, तेच हेवेदावे—मत्सर, तेच जातिभेद-भाषाभेद-प्रांतभेद, तीच संकुचित क्षुद्रभावना, तेच मनोमालिन्य दिसून येत असेल, तर मग घरादारात, पोषाखात, रस्त्यात आणि बाह्य भौतिक सृष्टीत केवढाही विकास घडून येत असलेला दिसला, तरी त्याचा उपयोग काय ? भौतिक परिसर, घरदार, केशभूषा, वेषभूषा इत्यादी सगळ्यांत बदल झाला, पण अंत:करणात व मानवी संबंधात बदल झाला नाही, तर मानवी जीवनात क्रांती होणार नाही—ते सफल, कृतार्थ होणार नाही.

आजच्या वातावरणात 'क्रांती' हा शब्द विशेष लोकप्रिय झालेला आहे. तथापी रक्तरंजित क्रांतीच्या रूढ कल्पनेमागे अपरिहार्य असलेल्या आत्यंतिक द्वेष-मत्सरात आणि क्रोधाच्या ज्वालामुखीत समाजधारणेला व स्थैर्याला आवश्यक

असलेला परस्परस्नेहाचा–विश्वासाचा–सहकारितेचा मानवी संबंधच जळून खाक होतो. अशा परिस्थितीत सुस्थिर, सुविकसित आणि सर्वभूतहितेरत असलेल्या मानवी समाजाची उभारणी व बांधणी कशी होऊ शकेल ?

सर्व प्रकारच्या अनिष्ट बाह्य संबंधांतून मुक्त झालेला समाज निर्माण व्हावा आणि त्याचे सर्व व्यवहार विवेक, प्रेम आणि सेवा यांच्या आधारावर चालू राहून, समाजात सर्वत्र स्वातंत्र्य, समता व बंधुता नांदत राहावी, हीच खऱ्या क्रांतीची मूलभूत प्रेरणा आहे आणि मानवधर्माची मूलभूत शिकवणसुद्धा हीच आहे. म्हणून गांधीजींनी व्यक्तीच्या आचरणावर विशेष जोर दिला आणि आपले व आपल्या अनुयायांचे संपूर्ण जीवन त्यांनी व्रतपरिपालनाने बांधून काढले. "My Revolution is the code of individual conduct" –व्यक्तिवाचक आचारनिष्ठेतूनच जीवनाची यथार्थ क्रांती घडून येते, असे गांधीजींचे म्हणणे होते. व्यक्तीच्या जीवनात संयम, पावित्र्य, समानता, बंधुता, सेवाभाव, सचोटी, उद्योगपरायणता, सहकारिता इत्यादी सद्‌गुणांची वाढ ज्या मानाने होईल, त्या मानाने त्या व्यक्तीचे व राष्ट्राचे सामर्थ्यही वाढेल. साहजिकच समष्टिहितासाठी व्यक्तीव्यक्तींच्या जीवनात या सद्‌गुणांची जोपासना करण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला पाहिजे, अशी गांधीजींची धर्माचरणाची दृष्टी होती.

आपल्या आचारविचारानुसार आपले कुटुंब वागते आणि तशा कुटुंबांतूनच समाज निर्माण होतो. आपणामध्ये जर अप्रीती, हेवा-दावा-मत्सर, स्पर्धा काठोकाठ भरलेली असतील, तर या भयंकर विषाचा संसर्ग कुटुंबाला व शेवटी समाजालाही बाधक झाल्याशिवाय राहणार नाही. "Society is the extension of the individual–society is the projection of ourselves" असे जे. कृष्णमूर्ती म्हणतात. युनेस्कोच्या मूळ उद्दिष्टाच्या ठरावात म्हटले आहे की, सर्व लढ्यांचे, उत्पातांचे, प्रक्षोभांचे मूळ मानवी मन हेच आहे. त्या मनाला सुसंस्कृत, सुस्थिर, स्नेहपूर्ण आणि समाधानी बनविण्याचा मूलभूत प्रयत्न झाला पाहिजे.

मनावर सुसंस्कार करणे म्हणजे पंचेन्द्रियांच्या बेफाम वासनांना लगाम घालणारे मन तयार करणे. मनुष्यप्राणी जसा वासनांनी भरलेला असतो, तशीच त्याला विवेकाची व नीतीचीही चाड असते, आवड असते आणि म्हणूनच तो पशूहून निराळा ठरतो. मनुष्यमात्राच्या ह्या चांगल्या अंगांची बूज राखून त्यांची जोपासना करणे त्याच्या व समाजाच्या अंतिम हिताच्या दृष्टीने नितांत जरूरीचे आहे.

या मानवी मनाचा सखोल अभ्यास करून आणि त्यावर सुसंस्कार घडविण्यासाठी अखंड तपःसाधना करून, गांधीजींनी आपली एक आचारसंहिता बनविली. त्यामुळे गांधीजींच्या विचारसरणीची एक थोर परंपरा या देशात आणि बाहेरही निर्माण झाली. त्या आचारविचारांनी युक्त अशी कर्त्या व थोर पुरुषांची परंपरा

निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न येथे ज्या काही विचारवंतांनी केला, त्यात गांधीजींचा निर्देश प्रामुख्याने करावा लागेल. त्या दृष्टीने गांधीजींचा व्रतविचार आणि आश्रमीय जीवनपद्धती ही गांधीजींची जगाला फार मोठी देणगी आहे.

महात्मा गांधी हे युगपुरुष होते. त्यांच्या सत्याग्रहाच्या जीवनसाधनेमुळे जगाच्या विचाराला नवीन वळण लागले. "गांधींच्या मानवतावादी क्रांतिकारक विचाराने आमचे जीवनच पालटून गेले," असे हुतात्मा मार्टिन ल्यूथर किंग यांनी म्हटले आहे. समाजाचे अंतर्बाह्य परिवर्तन घडवून आणणारा गांधीजींचा हा विचार युद्धजन्य परिस्थितीमुळे जगाला विशेषः स्वागतार्ह वाटला.

गेल्या तीनचारशे वर्षांत पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये भौतिक शास्त्रांचा उत्कर्ष होऊन त्यांच्याकडे जगाचे स्वामित्व गेले. विज्ञानाच्या अभूतपूर्व प्रगतीमुळे त्या राष्ट्रांमधील उत्साह-उमेद-आशावाद उतू जात होता आणि आपण अजिंक्य, आपणाला अशक्यसे काही नाही, अशी त्यांची समजूत होत चालली होती. पण याच भौतिक विद्येतून पुढे दोन जागतिक महायुद्धांचे डोंब पेटले आणि या प्रचंड रणयज्ञात लक्षावधी लोकांच्या आहुती पडल्या व लाखो संसार धुळीस मिळाले. तेव्हा तिकडील विचारवंत सज्जनांना आपल्या या भौतिक प्रगतीच्या शहाणपणाबद्दल व उपकारितेबद्दल शंका येऊ लागली. बर्ट्रांड रसेल म्हणतात : "ज्या जगाला आपल्या उत्पन्नाचा मोठा वाटा युद्धसाहित्यावर उधळण्यात काही गुन्हा वाटत नाही, त्या जगात फारसे शहाणपणच राहिलेले दिसत नाही." यूनोचे महासचिव उ थान्ट पण म्हणतात, "मानवाच्या हितापेक्षा लढायांवर प्रचंड प्रमाणात खर्च केला जात आहे–यूनोच्या एक वर्षाच्या खर्चाएवढा पैसा व्हिएटनामच्या युद्धात प्रत्येक दिवशी खर्च होत आहे." इतक्या या अवाढव्य खर्चाने चालविलेल्या महायुद्धात लक्षावधी जीवांची हत्या तर होतेच, पण त्याबरोबरच या युद्धाच्या राक्षसी हातांचा स्पर्श होताच समाजाचा सर्व बाजूंनी नैतिक अधःपात झपाट्याने सुरू होतो आणि माणूस आपल्या माणुसकीला पारखा होत जातो, ही प्रत्यक्ष हत्येपेक्षाही महाभयंकर गोष्ट आहे.

म्हणजेच विज्ञानाच्या बळावर मानवाने जगाचा ताजमहाल बनविण्याचा उपक्रम सुरू केला खरा, पण अंती त्यात मानवाचे आणि मानवतेचेही थडगेच स्थापित होण्याची साधार भीती जगातील विचारवंतांना वाटू लागली.

**युद्धाला नैतिक पर्याय**

अशा या भयंकर कोंडमाऱ्याच्या परिस्थितीत गांधीजींच्या 'सत्याग्रहा'च्या तत्त्वज्ञानाकडे जगाचे लक्ष आकृष्ट होणे अपरिहार्यच होते. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील सरकारच्या अन्यायी व जुलमी कायद्याविरुद्ध जो यशस्वी लढा दिला तो सर्वांच्या कौतुकाचा विषय बनला होता–"जगातल्या अन्यायाचा अहिंसात्मक प्रतिकार करण्याचा जो अभिनव प्रयोग तुम्ही करीत आहात, त्याकडे सर्व जगाचे लक्ष वेधले

आहे. '' असे धन्योद्गार महर्षी टॉलस्टॉय यांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात काढले होते. सत्याग्रहाच्या रूपाने गांधीजींनी युद्धाचा एक नैतिक पर्याय शोधून काढल्यामुळे (Moral substitute for war) परतंत्र, पददलित व दु:खपीडित लोकांच्या हाती अन्यायनिवारणाचे एक अमोघ शस्त्रच मिळाले. स्वाभाविकच गांधीजी हे जगांतील पददलितांचे व अन्यायपीडितांचे कैवारी आणि मार्गदर्शक बनले.

**गांधीजींची हाक**

गांधीजींनी जगाच्या अंत:करणाला साद घातली की, " जगाचे प्रश्न युद्धाने कधी संपणार नाहीत. म्हणून लढाया, झगडे, भांडणतंटे, मतभेद सर्व परस्पर-विचार-विनिमयाने सोडवू या; हिंसेचा विचार अजिवात सोडून देऊ या; विरोधकांशीही सौजन्याने, प्रेमाने वागू या; अन्यायाचा प्रतिकार जरूर करू—पण तो पाशवी शक्तीची आराधना न करता, सत्याग्रहाने करू या; नीतीच्या, प्रेमाच्या व परस्पर-समजुतीच्या पायावर जीवनाची नवीन बैठक उभारू या. '' भगवान बुद्धांनीही—" वैराने वैर केव्हाही, नाही संपत ते इथे । अवैरानेच ते संपे ।। '' असा हितोपदेश याच भूमीत हजारो वर्षांपूर्वी केला होता. युद्धसंत्रस्त व किंकर्तव्यमूढ जनतेला गांधीजींच्या वरील संदेशाने दिलासा मिळाला—नवीन प्रकाश दिसला.

**सत्याग्रहातील प्रतिकार**

गांधीजींच्या मते सत्याग्रह हा मनुष्याचा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. सत्याग्रह म्हणजे सत्याचा कायदा, प्रेमाचा आविष्कार. त्यात हिंसेला स्थान नाही, पण प्रतिकार जरूर आहे. प्रतिकार कोणाचा ? प्रतिकार अन्यायाचा, अपराधाचा, पण अपराधी किंवा अन्यायी माणसाचा नव्हे. मनुष्याचा रोग निराळा, मनुष्य निराळा. मनुष्याचा रोग दूर करण्यासाठी आपण जीवाभावाने सेवा करतो, तशा प्रेमाने व हळुवारपणाने अपराध, अन्याय, दुराचार करणाऱ्या व्यक्तीची आत्मक्लेशपूर्वक सेवा करावी. कारण माणूस मुळात चांगला आहे. परंतु वाईट कल्पनांच्या व दुराचारी संगतींच्या आहारी गेल्यामुळे तो वाईट वागतो. त्याची सेवा करून त्याला सुधारणे हे माझे कर्तव्य आहे. तो माझ्याही उन्नतीचा एक भाग आहे. म्हणून स्वत: क्लेश सोसून त्या माणसाच्या अंतरंगातला सद्भाव मी जागृत करीन, त्याचे हृदयपरिवर्तन करीन, हा विश्वास सत्याग्रहीच्या धर्माचा पाया आहे. पाश्चिमात्य विचारवंत थॉमस हक्सले म्हणतात की, " जीवनदोषांमुळे जगण्याला असमर्थ ठरलेल्यांना जगण्यासाठी समर्थ बनवून त्यांचे जीवन समृद्ध व संपन्न बनविणे यातच तुमच्या जीवनाची सार्थकता आहे (Fitting the unfit to survive) आणि हेच खऱ्या प्रगतीचे तत्त्व आहे. '' गांधीजी या तत्त्वालाच सत्याग्रह म्हणतात.

**गांधीजींनी केलेला चमत्कार**

हा सत्याग्रहाचा मार्ग प्राचीन काळी हरिश्चंद्र—प्रल्हाद—सॉक्रेटीस—येशू ख्रिस्त

गां. गौ. १३

आदि अनेक साधुसंत-सत्पुरुषांनी प्रत्यक्ष आचरून दाखविला आहे. पण त्यांचे हे प्रयोग एकेकटयाचे होते. या सत्याग्रहाला व्यक्तिगत क्षेत्रातून काढून सामाजिक क्षेत्रात आणण्याची महनीय कामगिरी गांधीजींनी केली. भारतीय स्वातंत्र्य-संग्रामात गांधीजींच्या या मार्गाची दीक्षा लाखो लोकांनी घेतली. आणि त्यांच्या आदेशानुसार देशातील तुरूंग तुडुंब भरले; घरादारांच्या आणि संसारांच्या होळचा पेटल्या; लाठ्यांनी आणि बंदुकांनी शेकडो जणांची मस्तके छिन्न-विच्छिन्न झाली. स्त्रियांनी व लहान मुलांनीही छातीवर बंदुकीच्या गोळचा झेलल्या. एखाद्या वाल्या कोळचा-समोर नारदाने उभे राहणे निराळे आणि लष्करी सैन्याच्या गोळीवारासमोर शेकडो सत्याग्रहींनी आपली छाती उघडी करणे निराळे. पण गांधीजींनी हा चमत्कार जगाला दाखविला. प्रारंभीच्या भीतिग्रस्त व दीन-दुबळचा-परतंत्र लोकांमधूनच गांधीजींनी ही शूरवीरांची सेना निर्माण केली ! गँथरने म्हटल्या-प्रमाणे "Made heroes out of clay !"

**आश्रम म्हणजे समाज-जीवनाच्या प्रयोगशाळा**

गांधीजींची ही सत्याग्रही सेना अर्थातच एका दिवसात तयार झाली नाही. सत्याग्रह हेही निःशस्त्र प्रतिकाराचे, पण युद्धच आहे, आणि प्रचलित युद्धाप्रमाणेच त्यालाही प्रशिक्षित व सुसज्ज अशी सेना तयार करून घ्यावी लागते. गांधीजींना अभिप्रेत असलेला सत्याग्रही हा सतत सेवातत्पर आणि जीवनशुद्धीला वाहिलेला, तद्वतच समर्पित जीवनात सार्थक मानणारा असावा लागतो. तेव्हाच बाहेरच्या कोणत्याही शस्त्रास्त्रांना किंवा परिस्थितीला दाद न देणारी प्रचंड व प्रभावी शक्ती त्याच्या प्रत्येक कृतीत व शब्दात निर्माण होते. परंपरागत युद्धातील सर्वसामान्य सैनिकांपेक्षा सत्याग्रही सैनिकांचे हे वैशिष्टच असल्यामुळे गांधीजींनी आपल्या या सत्याग्रहींना स्वतःच्या देखरेखीखाली तयार करून घेण्यासाठी एकूण पाच आश्रमांची स्थापना केली आणि त्या आश्रमांत त्यांनी आपल्या अनन्यसाधारण व्रतविचाराने या सैनिकांना शिक्षित व दीक्षित केले.

भारतीय संस्कृतीचा पाया उपनिषत्काली घातला गेला. त्यामुळे साहजिकच उपनिषत्कालीन ऋषिमुनी, त्यांचे आश्रम, त्यांची खडतर तपश्चर्या, त्यांचे जीवनाचे नानाविध प्रयोग, त्यांची ब्रह्मविद्या आणि एकूण त्यांची जीवनसाधना, या सर्व गोष्टी आज हजारो वर्षे भारताला मोठ्या विलोभनीय वाटत आलेल्या आहेत. हे ऋषींचे आश्रम म्हणजे, विनोबा म्हणतात त्याप्रमाणे, समाजजीवनाच्या प्रयोगशाळाच होत्या.

गांधीजींनी या प्राचीन आश्रमकल्पनेला उचलून धरले आणि त्या आश्रमातील शिक्षण-पद्धतीला अनुसरून त्यांनी स्वावलंबन, शुचिता, साधेपणा, सेवापरायणता, ज्ञानोपासना, प्रयोगशीलता, तपस्या, विश्वात्मैक्यदृष्टी इत्यादी सार्वकालीन सद्-गुणांच्या जोपासनेवर मुख्य भर दिला. स्वाभाविकच गांधीजींचे हे आश्रम राष्ट्रीय

जीवनाच्या प्रयोगशाळा तर झाल्याच, पण त्यावरोबर ती राष्ट्राची सामर्थ्योत्पादक केन्द्रेही (Power–Houses) वनली. म्हणून राष्ट्र-उभारणीच्या कामातील या आश्रमांची कामगिरी अविस्मरणीय अशीच झाली आहे.

गांधीजींचे असे हे आश्रम पाच होते. पैकी फिनिक्स वसाहत व टॉलस्टॉय फार्म हे आफ्रिकेत आणि कोचरव, सावरमती व सेवाग्राम हे हिंदुस्थानात होते.

## १ फिनिक्स वसाहत

दक्षिण आफ्रिकेत असताना "टॉलस्टॉय व रस्किन यांनी आपल्या जीवनात व ग्रंथांत जी ध्येये प्रगट केली, ती अनुसरणे व पुरस्कारणे," या हेतूने १९०४ साली गांधीजींनी 'फिनिक्स वसाहत' स्थापन केली. ग्रीक पुराणात फिनिक्स पक्ष्याच्या अंगच्या पावित्र्य, त्याग व अमरत्व या गुणांनी मोहित होऊन गांधीजींनी त्या पक्ष्याचे नाव या आश्रमाला दिले. आश्रमात राहणाऱ्यांचे योजकवर्ग व सेवकवर्ग असे दोन भाग होते. योजकांना आपला चरितार्थ शरीर श्रमावर चालवावा लागे. त्यासाठी प्रत्येकाला तीन एकर जमीन दिलेली होती. येथील छापखान्यातूनच गांधीजींचे 'Indian Opinion' हे वृत्तपत्र निघत असे. १९१३ सालापासून गुरु-कुल पद्धतीवर एक आश्रमशाळा सुरू झाली. त्यात २५-३० विद्यार्थी होते. शाळेचे मुख्याध्यापक गांधीजीच होते. वसाहतीत इंग्रज, जर्मन, पारशी, मुसलमान, तामिळी असे नाना प्रकारचे लोक होते आणि ते सर्व कोणताही भेदभाव मनात न आणता प्रेमाने व समभावाने वागत. प्रत्येक रविवारी सामुदायिक प्रार्थना होत असे.

## २ टॉलस्टॉय फॉर्म

दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहींची व त्यांच्या कुटुंबियांची राहण्याची सोय करण्यासाठी जर्मन एंजिनिअर कॅलनबॅक यांनी आपली अकराशे एकर जमीन गांधीजींना दान दिली व टॉलस्टॉयवरील या उभयतांच्या भक्तीमुळे 'टॉलस्टॉय फार्म' असे नाव आश्रमाला देण्यात आले. या फार्मवर राहणारे सुमारे ८० लोक नाना धर्मांचे होते. सर्वांचा रसोडा सामुदायिक होता. त्यात मांसाहार सर्व-संमतीने वर्ज्य होता. संडास चराचे होते. स्वावलंबी होण्यासाठी चपला करणे, लाकडी वस्तू वनविणे इ. छोटे धंदे सुरू केले होते. सर्वांना परिश्रम करावे लागत. शिक्षण, आहार, निसर्गोपचार इत्यादी विषयांसंबंधी नाना प्रकारचे धाडसी प्रयोग गांधीजींनी या आश्रमात केले. या प्रयोगामुळेच हा आश्रम म्हणजे आध्यात्मिक शुद्धीचे आणि तपश्चर्येचे स्थान, असे गांधीजींनी मानले.

## ३ कोचरब येथील सत्याग्रहाश्रम

गांधीजी आफ्रिकेतून आपल्या सहकाऱ्यांसह हिंदुस्थानात परत आल्यावर अहमदावादजवळील कोचरव या गावी त्यांनी १९१५ साली आपल्या 'सत्याग्रहाश्रमा'ची स्थापना केली. मातृभूमीची सेवा हे आश्रमाचे ध्येय व ती सेवा यथासांग

व्हावी म्हणून ‘ सत्य-अहिंसा-ब्रह्मचर्यादी ’ व्रतांचे परिपालन आवश्यक होते. स्वतःच्या चरितार्थासाठी सर्वांनी शारीरिक श्रम करावे आणि आपल्या मानसिक व आध्यात्मिक गुणांचा विनियोग समाजहितासाठी करावा, हा गांधीजींचा आग्रह असे. विद्यार्थ्यांना व्रताची दीक्षा दिली जाई. त्यांना धर्मतत्त्वे, शेती, हातमाग, भाषा इ. विषय शिकवीत. सर्व अभ्यासक्रम १० वर्षांचा असे. अभ्यासक्रम समाप्त होईपर्यंत विद्यार्थ्यांना आईबापांची भेट घेता येत नसे.

## ४ साबरमती आश्रम

गांधीजींनी कोचरब येथील आपला आश्रम १९१८ साली सोयीच्या दृष्टीने साबरमतीच्या काठी नेला. स्वातंत्र्य-आंदोलनाची सूत्रे या आश्रमातूनच गांधीजींनी १२ वर्षे हलविली. “ देश स्वतंत्र झाल्याशिवाय मी या आश्रमात परत पाऊल टाकणार नाही, ” अशी भीष्मप्रतिज्ञा करून आणि स्वातंत्र्य-यज्ञात आपल्या या आश्रमाचा स्वहस्ते प्रथम होम करून १२ मार्च १९३० रोजी गांधीजी येथूनच दांडीयात्रेसाठी बाहेर पडले.

## ५ सेवाग्राम

वर्ध्यापासून पाच मैलांवर असलेल्या मूळ ‘ शेगाव या गावी गांधीजी १९३६ साली प्रथम गेले. हळूहळू त्यांच्यासाठी व इतर प्रवृत्तींसाठी तेथे झोपड्या उभारण्यात आल्या. शेती, गोसेवा, नई तालीम, इत्यादी संस्थांचा संसार पण हळूहळू वाढत गेला.

याच शेगावचे ‘ सेवाग्राम ’ असे नामकरण गांधीजींनी १९४० साली केले आणि येथूनच स्वातंत्र्य-आंदोलनाच्या सर्व प्रेरणा राष्ट्राला मिळू लागल्या.

## व्रत-विचार

वरीलप्रमाणे गांधीजींच्या आश्रमांची स्थूलमानाने माहिती करून दिल्यानंतर तेथील आश्रमवासीयांच्या जीवनाची जडणघडण प्रत्यक्ष ज्या व्रतपद्धतीने होत असे, त्या ‘ व्रताचारा ’चा परिचय आता करून द्यावयाचा आहे. ‘ मंगलप्रभात ’ या छोटेखानी ग्रंथातून हा व्रतविचार गांधीजींनी मांडला आहे. ग्रंथ छोटासा असला तरी तो गांधीजींच्या समग्र जीवनाचे यथार्थ दर्शन करून देणारा असल्यामुळे त्याला ‘ गांधी-उपनिषत् ’ असेही नाव मिळाले आहे. या ग्रंथामध्ये गांधीजींनी जीवनसाधना करण्याच्या दृष्टीने अकरा व्रते सांगितली आहेत. विनोबांनी ती श्लोकबद्ध केली आहेत:—

“अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह ।
शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन ।।
सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना ।
ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये ।। ”

यांपैकी पहिली पाच व्रते ही 'महाव्रते' या नावाने प्राचीन काळापासून ओळखली जात असून त्यांचा उल्लेख भगवान् पतंजलींच्या योगासूत्रात, मनुस्मृतीत आणि जैन ग्रंथांतूनही आलेला आहे.

जगाच्या आजच्या दु:खाचे मूळ स्वार्थात व लोभात आहे:– "लोभमूलानि पापानि।'' त्यातूनच हिंसा, अत्याचार, विषमता, दारिद्र्य, इत्यादि अनर्थपरंपरा निर्माण होते. म्हणून ज्या मनात ही विकृती प्रथम जन्मास येते, त्याच मनावर प्रथमपासून सुसंस्कार करण्याची दृष्टी गांधीजींनी धरली होती. मनाची शक्ती अनंत व अपार आहे. पण योग्य संस्कारांच्या अभावी ते "प्रमाथी-वलवत्-दृढ'' होते आणि जीवनाच्या नावेला वाऱ्याप्रमाणे वाटेल तिकडे फरफटत नेते. हीच मनाची शक्ती जर अनुकूल करून घेतली तर ते प्रसन्न मन आपल्या सर्व सिद्धींचे कारण होऊन बसते. म्हणून गांधीजींनी आपल्या आश्रमीय जनांची जीवने अढळ निश्चयाने बांधून काढण्यासाठी अकरा व्रतांच्या परिपालनावर विशेष कटाक्ष ठेवला आणि स्वत:ही त्यांनी ही व्रते अत्यंत काटेकोरपणाने व विनम्रभावाने पाळली.

**अकरा व्रतांचे निरूपण**

### १ स त्य

सामान्यत: सत्य याचा अर्थ खरे बोलणे.परंतु गांधीजींच्या मते जीवनाची कायिक-वाचिक-मानसिक अशी प्रत्येक क्रिया सत्यमय झाली पाहिजे. या सत्याच्या आराधनेसाठीच सर्व जीवन समर्पित केले पाहिजे. त्यासाठी संसार सोडून हिमालयात जायला नको. ते सत् तत्त्व सर्वत्र भरलेले आहे आणि त्याचा शोध लहानसहान प्रत्येक व्यवहारात करायचा आहे. विषय संडासाचा असो की स्वयंपाकाचा असो, जोडे शिवण्याचा असो की राजकारणाचा असो, या सर्वच विषयांत एखाद्या शास्त्रज्ञाच्या हौशीने, चिकाटीने आणि तन्मयतेने गांधीजींनी खोल बुडी मारून परम सत्य हुडकून काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांचे सर्वच जीवन 'सत्याचे प्रयोग' ठरले.

### २ अ हिं सा

गांधीजींच्या मते सत्यशोधनाचे काम अहिंसेशिवाय होणार नाही. अहिंसा ही त्याची गुरुकिल्ली आहे. सत्य साध्य, अहिंसा साधन. साधन आपल्या हातातील वस्तू आहे. त्या साधनाची काळजी आपण घेतली, तर कधी काळी तरी सत्याचे दर्शन घडेलच. दुष्टांचा प्रतिकार कसा होईल ? प्रेमपूर्ण सेवेने व आत्मक्लेशाने प्रतिपक्षाच्या अंत:करणातील उपजत सत्प्रवृत्ती जागृत करायची. हा उपाय केवळ व्यक्तीपुरताच नव्हे, तर वर्गावर्गांचे, जातीजातींचे आणि राष्ट्राराष्ट्रांचे झगडेही या अहिंसेच्या मार्गाने सोडविता येतील, असा गांधीजींचा आत्मविश्वास होता.

### ३ ब्र ह्म च र्य

ब्रह्मचर्यासंबंधी तीन नवे विचार गांधीजींनी जगापुढे ठेवले : (१) सत्य व

अहिंसा यांचे परिपालन ब्रह्मचर्याशिवाय अशक्य आहे. (२) आध्यात्मिक परिपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठी जीवनात सर्वेंद्रियसंयमपूर्वक ब्रह्मचर्याचे पालन आवश्यक आहे. (३) विवाहितांनाही ब्रह्मचर्यव्रत पाळून वानप्रस्थवृत्तीने राहणे शक्य होईल. विवाहित ब्रह्मचर्याचा गांधीजींनी स्वानुभवाने घालून दिलेला हा आदर्श रूढ ब्रह्मचर्याच्या समजुतीहून क्रांतिकारी होता. ते म्हणतात – "मी इतका वर चढलो तो बॅरिस्टर झालो म्हणून नव्हे; किंवा बाची सुद्धा आज जी पूजा होत आहे ती माझी पत्नी म्हणून नव्हे, तर आम्ही दोघांनी ब्रह्मचर्याचे पालन केले, हे त्याचे कारण आहे."

### ४ अस्वाद

अस्वाद म्हणजे रुची न घेणे. स्वादिष्टपणाचा विचार न करता ज्याप्रमाणे आपण औषध घेतो, तसेच अन्नाचे सेवन केले पाहिजे. रुची वाढविण्यासाठी कृत्रिम रस निर्माण केल्यामुळे शरीरात नाना विकृती निर्माण होतात. म्हणून या व्रताच्या परिपालनासाठी 'सामुदायिक स्वयंपाकघर' हा उपाय गांधीजींनी सुचविला आहे.

### ५ शरीरश्रम

अस्वादव्रतासाठी शरीरश्रम अवश्य आहेत. गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील 'यज्ञ' शब्दाचा अर्थ गांधीजींनी शरीरश्रम असा केला आहे. जो शरीरश्रम करणार नाही, त्याला खाण्याचा हक्क नाही–'तो चोर आहे' असे गीता म्हणते. 'यो भुङ्क्ते स्तेन एव सः।' वायवलनेही सांगितले आहे की– "तू आपली भाकरी स्वतःच्या घामाने कमव." यालाच टॉलस्टॉयने 'ब्रेड लेबर' म्हटले आहे. याप्रमाणे सर्वांनीच जर शरीरश्रम केले, तर गरीब-श्रीमंत, मालक-मजूर, श्रमजीवी-बुद्धिजीवी असे भेदभाव समाजातून मिटून जातील.

### ६ अस्तेय

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. जाणता-अजाणता आपण सर्वजण चोरी करीत असतो. सामाजिक कायद्याप्रमाणे दुसऱ्याची वस्तू न कळत घेणे ही चोरी होय. आश्रमाच्या कोठारातून दुसऱ्याच्या न कळत गुळाचा बारकासा खडा जरी तोंडात टाकला, तरी तो चोरी होय. दुसऱ्याच्या वस्तूची मनानेही इच्छा केली तरी ती चोरीच. वस्तुतः अनावश्यक अशी एकही वस्तू आपण घेता कामा नये. आपण आपल्या गरजेपेक्षा अधिक वस्तूंचा संग्रह स्वतःच्या उपभोगासाठी करीत असल्यामुळे जगातले पुष्कळसे दारिद्र्य आपण निर्माण केले आहे.

### ७ असंग्रह

असंग्रह म्हणजे साठा न करणे. अस्तेय व असंग्रह या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कारण संग्रह करून ठेवण्याच्या वृत्तीतूनच दुसऱ्याला चोरी करण्याचा मोह निर्माण होतो. म्हणून चोरी करणे हे जसे पाप, तसेच अधिक संग्रह करणे हेही

पापच. त्याशिवाय, माणसाच्या संग्रहातूनच विषमता निर्माण होते आणि विषमतेतून स्पर्धा, झगडे, लढाया निर्माण होतात. म्हणून गांधीजी म्हणतात, " खऱ्या सुधारणेचे लक्षण परिग्रहाची वाढ हे नाही. अभ्यासाने मनुष्य आपल्या गरजांना कात्री लावू शकतो आणि त्यायोगे त्याला सुख-शांति-समाधान लाभत जाते. परिग्रह म्हणजे परावलंबन—म्हणजेच दु:खपरंपरा. "

## ८ सर्वत्र भयवर्जन

अभयवृत्ती ही दैवी संपत्तीचा पाया आहे. भित्र्या माणसाला कोणतीच गुण-संपदा हाती लागणार नाही. अभय म्हणजे सर्व तऱ्हेच्या बाह्य भयापासून मुक्ती. मृत्यूचे भय, चोराचे भय, अब्रूचे भय, इत्यादी. अभय ही निर्मोह स्थितीची पराकाष्ठा आहे. देहावरील ममता झडली तर अभय सहजी प्राप्त होईल. कुटुंब, देह, पैसा यासंबंधीची आपली कल्पना बदलली पाहिजे. ती माझी नव्हेत, ईश्वराची आहेत, मीसुद्धा त्याचाच आहे—असा मीपणा सोडून शून्यवत् होऊन गेलो—तर सहजीच सर्व भये जिंकता येतील आणि मग सत्यनारायणाचे दर्शन होऊ शकेल.

## ९ सर्वधर्मसमभावना

सर्वच धर्म खरे आहेत, पण सगळेच अपूर्ण आहेत. कारण मानवच अपूर्ण आहे. म्हणून या सर्व धर्मांत उच्चनीचता न मानता आपण सर्वांकडे समभावनेने पाहावे. वस्तुत: सर्व धर्मांचे मूल सिद्धान्त एकच आहेत. सर्व धर्म ईश्वर मानतात. सत्य, प्रेम, करुणा, दान, सदाचार यांवर सर्वांचा कटाक्ष आहे. सर्वांमध्ये साधुसंत स्त्री-पुरुष होऊन गेले आहेत आणि यापुढेही जन्माला येत राहतील. म्हणून खरा धर्मभक्त इतर धर्मांकडे प्रेमादराने पाहील. सर्व धर्मांचा समभावनेने अभ्यास करताना काही दोषस्थळे आढळली तरी ती परस्परांना विनम्रपणाने दाखविण्यामुळे कोणाचाही गैरसमज होणार नाही, कोणाचे अंत:करण दुखावणार नाही. अनेक जातिधर्मांनी युक्त असलेल्या भारताला गांधीजींची ही सर्वधर्मसमभावाची शिकवणूक अत्यंत उपकारक आहे.

## १० स्वदेशी

स्वत:च्या देशात बनलेल्या वस्तूंचा उपयोग करणे व परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकणे हा स्वदेशी-व्रताचा रूढ अर्थ आहे. पण गांधीजींच्या मते स्वदेशी म्हणजे स्वावलंबन. आज गावातला तेली-चांभार-कोष्टी एकमेकांनी तयार केलेला माल विकत न घेता शहरी माल घेतात व अशा प्रकारे परस्परांना मारण्याचा धंदा करीत राहतात. स्वदेशीव्रताचे पालन करणारा इसम आपल्या शेजाऱ्याची सेवा करण्याची पहिली संधी साधील. म्हणून स्वदेशी म्हणजे 'शेजारधर्म' अशी सुटसुटीत व्याख्या विनोबांनी केली आहे.

## ११ स्पर्शभावना

पूर्वपरंपरेनुसार चांभार, भंगी, धेड आदी अंत्यज जाती या अस्पृश्य मानल्या

गेल्या आहेत. त्यांच्या स्पर्शाने हिंदू अपवित्र होतो, ही रूढ कल्पना गांधीजींनी हिंदु-धर्मावरील कलंक मानली. हा कलंक धुऊन टाकण्यासाठी आश्रम बंद पडण्याचा धोका पत्करूनही गांधीजींनी आश्रमात अंत्यजांना प्रवेश दिला आणि संडाससफाई–वगैरे त्यांची म्हणून मानलेली कामे आश्रमीय मंडळींनी करावी, असा नियम केला. अस्पृश्यता निवारणे म्हणजे उभ्या जगाशी मैत्री जोडणे. म्हणून विनोबांनी या व्रताचे नामकरण ' स्पर्शभावना ' असे हेतुपुर:सर केले, म्हणजे त्यायोगे आमचा सर्व विश्वाशी स्पर्श होत आहे, ही भावना वाढीस लागावी. कोटयवधी मानवांविषयीची अस्पृश्यता म्हणजेच उच्चनीच-भावना हिंदूंच्या अंत:करणातून निघून गेली, तर त्या घटनेमुळे इतर जातीजमातींतील मत्सर व अविश्वास नष्ट होतील आणि या घटनेचा मंगल परिणाम हिंदुस्थानातील सर्व जातींवरच नव्हे, तर अखिल जगतावर झाल्याविना राहणार नाही, अशी गांधीजींची खात्री होती.

### १२ गांधी-जीवनाचा वस्तुपाठ

उपरोक्त गांधीजींचा व्रतविचार म्हणजे त्यांच्या जीवनाचे सारसर्वस्व होते. त्यांनी आपले सारे जीवनच व्रताधारित केले होते, त्यामुळे त्यांच्या जीवनात एक प्रचंड नैतिक आणि आध्यात्मिक सामर्थ्य निर्माण झाले व त्याचा प्रभाव साऱ्या जगावर पडल्यावाचून राहिला नाही.

शेक्स्पीयरने म्हटले आहे : " Some are born great and some become great. " यांपैकी गांधीजी दुसऱ्या कोटीचे होते. ते उपजत मोठे नव्हते. पण ते स्वप्रयत्नाने आयुष्यभर खडतर जीवनसाधना करून ' महात्मा ' बनले. स्वत:च्या जीवनात सत्यशोधनाचे अनंत प्रयोग करून आणि व्रतपरिपालनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून केवढ्या महत्पदाला जाता येते, याचे गांधीजी हे जिवंत उदाहरण आहे. गांधीजींच्या जीवनसाधनेचा मानवमात्राला मिळालेला हा प्रत्यक्ष वस्तुपाठ पृथ्वीमोलाचा आहे.

### व्रते व पारलौकिक कल्याण

गांधीजींच्या व्रतविचारात पारलौकिक कल्याणाचा समावेश केलेला नाही. म्हणजे गोरक्षण-व्रतधारी मनुष्य गोलोकाला, स्वदेशीव्रतवाला कैलासाला किंवा हरिजनसेवक वैकुंठाला जाईल, असे त्यांनी सांगितलेले नाही. म्हणजेच त्यांनी आपल्या व्रतांची सांगड परलोकाशी न घालता ती ऐहिक कल्याणाशी घातली. रामदासांनी म्हटल्याप्रमाणे :" जयाचे अत्र धड नाही। तयाचे परत्र पुससी काई।" समाज-हिताकडे सर्वस्वी दुर्लक्ष करून केवळ व्यक्तिगत स्वर्ग-मोक्षाच्या विचारांची जी पकड भारतीय जनमानसावर आज हजारो वर्षे बसलेली आहे, तिच्यातून जनतेची सोडवणूक झालीच पाहिजे. वर आकाशाकडे पाहून चालणारा मनुष्य पायाखालच्या खड्ड्यात पडला तर त्यात नवल काय ? व्रतोपासनेने सर्वसामान्य माणसाचे ऐहिक जीवन सुखी,

निरामय व आनंदपरिपूर्ण होऊ शकेल, इतकेच गांधीजींनी सांगितले.

**व्रतधारी व समाजसेवक**

दुसरी गोष्ट अशी की, आजवर समाजात व्रतधारी लोक होतेच. पण त्यांची व्रतोपासना व्यक्तिगत मोक्षासाठी होती. त्यांना सामाजिक कर्तव्याची किंवा समाज-सेवेची जरूरी भासली नाही, आणि आधुनिक पद्धतीने जे समाजसेवेला लागले होते, त्यांना व्रताचरणाची आवश्यकता वाटत नव्हती. गांधीजींनी या दोघांचा समन्वय केला. त्यांच्या मते व्रत-निरपेक्ष समाजसेवा ही आंधळी आहे आणि सेवा-निरपेक्ष व्रतनिष्ठा ही पांगळी आहे. म्हणून त्यांनी परंपरागत व्रतधाऱ्यांना समाजसेवेची आणि प्रचलित समाजसेवकांना व्रतोपासनेची महती पटविली.

**गांधीजींची क्रांतिकारकता**

याशिवाय व्रतविचारात गांधीजींनी आणखी एक मौलिक भर घातली. गांधीजींचा कटाक्ष मूल्यपरिवर्तनावर होता. म्हणून त्यांनी रूढ समाजसेवेचे ध्येयधोरणच बदलून टाकले. आजवरची समाजसेवा ही स्थितिशीलता ( Status quo ) रक्षण करणारी होती. उदा. गोसेवेचा विचार करायचा म्हणजे पांजरापोळ काढून तेथे लुळ्यापांगळ्या भाकड गाईंची व्यवस्था ठेवायची. परंतु गांधीजींनी गाईंचे चांगले पोषण कसे होईल, त्यांचे दूध कसे वाढेल, त्यासाठी त्यांना आहार कोणता द्यावा, त्यांचा वंश कसा सुधारावा, इत्यादी सर्वांगीण विचार करून गोसेवेच्या कार्यक्रमात मूलभूत क्रांती घडविली.

तीच गोष्ट अस्पृश्यता-निवारणाची. फक्त शिवाशिव नष्ट करण्यावर गांधीजी संतुष्ट नव्हते. तर त्या लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी त्यांचे धंदे विज्ञानाच्या पायावर उभे करून देणे; त्यांच्यात स्वच्छता, चांगल्या सवयी, चांगले आचारविचार रुजविणे, इत्यादी गोष्टींवर त्यांनी भर दिला. भंग्यांची सेवा करण्यासाठी त्यांनी नवीन प्रकारचे संडास तयार केले.

अशा प्रकारे जीवनातल्या प्रत्येक शाखेत त्यांनी मुळाशी जाऊन क्रांतिकारक वदल घडवून आणण्याचा पद्धतशीर प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक विधायक कार्यक्रमाचे अंग हे राष्ट्राच्या उभारणीतील एकेक प्रगतीचे पाऊल ठरले.

तात्पर्य असे की, 'सत्याग्रह' हे एक समाज-परिवर्तनाचे अमोघ शस्त्र असून, मानवसमाजाच्या जीवनात त्यायोगे अंतर्बाह्य क्रांती घडवून आणता येईल, या दृष्टीने गांधीजींनी सत्याग्रही जीवननिष्ठा निर्माण करणाऱ्या आपल्या व्रतविचारांची मांडणी केलेली आहे. गांधीजींचा हा व्रतविचार सध्याच्या विपरीत परिस्थितीत अत्यंत उपकारक ठरणार आहे. कारण गांधीजींची शिकवण ही जीवनाचे सर्वांगीण विकसन करणारी शाश्वत स्वरूपाची एक श्रेष्ठ आचार-संहिता आहे.

शास्त्रज्ञ वाहेरच्या जगाला तुफानी वेगाने बदलीत चालले असले,तरी मानवाचे

मन अद्यापि रानटी अवस्थेतच रेंगाळत आहे. त्यामुळे माणसाच्या मनातून स्पर्धा, द्वेष, झगडे, लढाया नाहीशा झालेल्या नाहीत. परंतु मानवजातीचे अस्तित्वच पुसून टाकणाऱ्या अणुयुद्धाचा आश्रय इतउत्तर कोणी घेऊ धजणार नसल्यामुळे, आता राष्ट्राराष्ट्रांचे झगडे, गांधीजी म्हणतात त्याप्रमाणे, परस्पर-समजुतीने व सलोख्याने म्हणजेच अहिंसक वृत्तीने सोडवावे लागणार आहेत. तद्वतच मानवाची संग्रहवृत्ती आणि स्पर्धा मोकाट सोडल्याचे दुष्परिणाम पाहून आता नियोजन व नियंत्रण या तत्त्वांना अर्थशास्त्रज्ञांनाही मान्यता द्यावी लागत आहे. म्हणजेच असंग्रह, अस्तेय, शरीरश्रम या गांधीप्रणीत व्रतांना आता आर्थिक घटनेच्या दृष्टीनेही सामाजिक आशय प्राप्त होत आहे. अर्थातच गांधीजींच्या एकूण शिकवणुकीकडे जग खेचले जात आहे, याचा हा स्पष्ट निर्देश आहे.

जगाला गांधीजींच्या शिकवणुकीची नितांत गरज आहे. अंधारातच प्रकाश पाहिजे असतो, वादळात आणि खवळलेल्या सागरातच दीपस्तंभाची गरज भासते. म्हणून संकटाच्या गडद सावल्या आज जरी भेडसावीत असल्या तरी गांधीजींच्या वात्सल्यपूर्ण पवित्र जीवनाचा तेजोमय दीपस्तंभ जगाला यथार्थपणे मार्गदर्शन करील आणि मानवमात्राची जीवनयात्रा शुभसंस्कारसंपन्न, स्नेहपूर्ण, सेवापरायण आणि मंगलमय करील, अशी माझी श्रद्धा आहे.

२५

# गांधी-एक युग-मुद्रा

## बाबा आमटे

[ हे एक गद्य-काव्य ! त्यात गांधीजींचे उत्तुंगत्व कोठे, कसे, होते, हे नाना रूपकांनी सांगितले आहे. वेदना व विश्वास या बिरुदांनी भूतलावर वावरलेला महात्मा पुनश्च कोणत्या स्वरूपात दिसणार ? स्वराज्यात जन्मलेल्या पिढीनेच याचे उत्तर दिले पाहिजे. ]

**गां**धी : एका युगाचा चेहरा
ज्याच्या नजरेला तो जगत असलेल्या शतकाची
हिंस्र स्वप्ने कैद करू शकली नाहीत
आणि इतिहासाच्या दर्पणात
ज्याच्या समर्पणाचीच प्रतिमा
भविष्यातील पिढ्यांना दिसेल, असा.
गांधी : एक हिमनग
ध्रुवभूमीवरून शीत प्रवाहांच्या सोबतीने
व उष्णवृत्तांच्या रोखाने निघालेला,
ज्याचे प्रचंड प्राचीन सात-अष्टमांश
पाण्याखाली आणि जो
फक्त एका ठेंगण्याशा उंचवट्याइतका वर.
त्याने क्षितिजाशी डोके वर काढले

तेव्हा अफाट समुद्रात वाट चुकल्यासारखे
बावळट वाटण्याइतपत साधेसरळ त्याचे ध्यान होते
तेव्हा पुष्कळांनी त्याच्याकडे गमतीने पाहून
आपली करमणूक करून घेतली.
पण त्याच तुच्छतेने सर्व समुद्रांवर राज्य करणाऱ्या
जहाजाचा एक काफला त्याच्यावर चालून गेला
तेव्हा जगाने असे पाहिले की,
त्या हिमनगाच्या चेहऱ्यावरचे बालिश हास्य ढळलेले नाही
आणि त्या लढाऊ जहाजांना जलसमाधी मिळालेली आहे.

गांधी : एक कलाकार

देश एका कोऱ्या चित्रफलकासारखा त्याच्यासमोर होता.
आणि त्या रित्या चौकटीने त्याला बेचैन केले होते.
आव्हानिले होते.
कुंचला घेतलेला त्याचा हात प्रारंभी काहीसा थरथरत होता.
तो पेलण्याचा आत्मविश्वास अजून आलेला नव्हता.
चित्रफलकावर तो टेकवण्याचे साहस अजून होत नव्हते.
म्हणून रंगात बुडवून त्याने दुसरीकडे कोठेतरी
काही फटकारे ओढले.
अखेर रंगांची एक संगती त्याने साधली
त्यात दारिद्र्याचा मिट्ट काळा रंग होता
श्वेत राजनीती आणि गूढ निळे अध्यात्मही होते.
नवविचारांच्या अनेक रंगच्छटाही होत्या.
पन्नाशी गाठता गाठता त्याला आपली स्वतःची रेषा
—व्हर्जिन लाईन ऑफ ॲक्शन—गवसली.
आतून उंचवळणारा आपला टोन त्याला सापडला.
सर्व गृहीतांच्या सरहद्दी पुढे ढकलणारा हाही
एक पॉप-आर्टिस्ट होता.
चार तपांच्या तयारीने दोन तपांच्या आत त्याने
ते चित्र पुरे केले.
एका युगमुद्रेचे चित्र !
जे एका देशाच्या चित्रफलकात मावू शकत नाही.
त्यात एकीकडे राजधानीतल्या विजयोन्मादाचा
दिखाऊ दीपोत्सव आहे.

आणि दुसरीकडे रक्तलांच्छित अंधारात—
जेव्हा स्वतःची सावली थरथरत मागे सुटलेली, तेव्हा
विश्वासाची काठी टेकीत टेकीत
ध्यानाच्या बांधावरून तोल सावरत निघालेली
एका कोटिशीर्ष विराट पुरुषाची वाटचाल आहे—
आणि एक गरजणारे महामौन आहे.
एक जहाज : बंदर गाठण्याच्या बेतात असतानाच किनाऱ्यापाशी येऊन फसलेले
आणि वरगड्यांना साखळ्या बांधून तो ते ओढीत आहे एकटाच !
खेचू शकला नाही तो हे रुतलेले जहाज.
खेचण्याच्या प्रयत्नात ऊर फुटून तो कोसळला.
नव्हे !
जहाज ओढणाऱ्या शक्तीलाच
तो ओढण्याचा प्रयत्न न समजलेल्या
एका मूर्ख आवेगाने डागले.
आणि आजही ते जहाज तेथे वाट पहात पडलेले आहे.
कोणी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रेन लावून
ते ओढण्याचा प्रयत्न केला आहे.
कोणी मुक्तिसेनेची वाट पहात थांबले आहेत
कोणी धर्मचक्र फिरवून या जहाजाचे चक्र
फिरवण्याच्या प्रयत्नात आहेत.
कोणी कोळीष्टकातच ते फसले आहे असे समजून
अध्यात्माच्या हलक्या हातांनी ते काढू पहाताहेत.
हा गुंतवळा काढण्यासाठी ते जातात
आणि फक्त एक गोतावळा जमा करतात
आणि काढायचे श्रेय कोणाला म्हणून आधीच
आपसात भांडत सुटतात.
स्वराज्यात जन्मलेली पिढीच
हे रूतलेले जहाज काढू शकणार आहे.
आणि जे त्या पिढीला पकडू शकतील
तेच त्याचे खरे वारसदार ठरणार आहेत
तप्त शलाकेसारखी ही पिढी कोण पकडेल ?
ती पकडण्यासाठी हवी असते अलिप्त यांत्रिकाची हिकमत !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ही हिकमत त्याच्यात होती.
त्याने प्रथम एका मिठाच्या पुडीला हात घातला
आणि मग एक साम्राज्य
मिठाच्या सात समुद्रांपलिकडे फेकून दिले
त्याने सुतातून सुरुवात केली
आणि अखेर स्वराज्याचा स्वर्ग गाठून दाखवला.
याच साध्या सुताने त्याने एक पिढीच्या पिढी आणि
एक देशच्या देश बांधून दाखवला
पण एक देशच्या देश आणि एक पिढीच्या पिढी पकडण्यासाठी
नुसतीच हिकमत पुरी पडत नाही
त्यासाठी ताकदही लागते
भारी वजनाचा एक क्रूस वाहण्याची ताकद !
गांधी : ती हिकमत असलेला मानव
आणि ती ताकद असलेला प्रेषित होता.
अखेर एक मानवच तर तो होता.
त्याने सामान्य मानवासारखे प्रमाद केले
पण सामान्य माणूस जे कबूल करीत नाही
ते त्याने जगजाहीर केले,
माणसाच्या आदिम समस्यांशी
त्यालाही धडक द्यावी लागली.
मानवाच्या वास्तवतेचे रूप बुरखा काढून पाहण्याचा
त्यानेही प्रयत्न केला
आणि या प्रयत्नात पहिल्यांदा
खुद्द आपला बुरखा त्याने फाडून फेकला.
वरगड्या दिसणाऱ्या त्याच्या छातीवर
दोन विरुदे होती.
आणि एक ‘ नंगा फकीर ’ असल्यामुळे
ही विरुदे त्याच्या मांसालाच चिकटली होती.
त्यांपैकी एक होते वेदनेचे
आणि दुसरे विश्वासाचे.
वेदना हा वर्तमानाचा स्वीकार होता
विश्वास हे भविष्याचे आश्वासन होते.
अखेरपर्यंत वेदना आणि विश्वास

या दोन किनाऱ्यांतून
त्या संतमानवाचा प्राणनद वाहत गेला.
पण त्याला तिसराही एक किनारा होता.
शाश्वताचा !
आणि या तिसऱ्या किनाऱ्याने प्रारंभापासून दिली होती त्याला
एक परिपक्वता !
ही परिपक्वता असली
तरच आपल्या प्रेषितत्वाचे ओझे वाटत नाही
आणि अवतारकार्याचा खून चढत नाही
आणि चेहऱ्यावर कायम वसलेले असते
ते तसले शिशूचे हास्य !
जे प्रेषिताला माणसाच्या जवळ ठेवते.
तेव्हाच तो नेत्यांचा नेता
आणि जेत्यांचा विजेता होतो.
सामान्य माणसावर त्याचा असामान्य विश्वास असतो
सामान्य माणसातील असामान्य साहसे तो जागवतो
आहेत त्याच साधनांतून तो आपल्या युद्धनौका घडवतो
आणि मिळतील त्याच माणसांतून तो
त्यांच्या काफल्याचे कप्तान आणि खलाशीही तयार करतो.
तो समाजसखा होऊन येतो.
मित्रभावाशिवाय दुसरी कोणतीही जादू
त्याच्याजवळ नसते
म्हणून त्याच्याइतकी लगट
अज्ञान समाजाशी दुसरा कोणीही करू शकत नाही.
समाजमातेच्या गर्भातून महान् कल्पनेचे सुदृढ मूल
बाहेर पडायचे असते
तेव्हा तिची वीण उसवण्याची शक्यता असते.
अशा वेळी तिचे दायित्व करणारा तोच असतो.
स्वरांच्या गोंधळातून गोंधळी एक लय तयार करतो
तसेच गर्दीच्या गोंधळातून
त्याचे आव्हानमंत्र उठतात.
हा संतमानव मरगळलेल्या जीवनात वसंत
फुलवीत येतो.

नेते आणि जेते हे त्याची कडूगोड फळे
गोळा करणारे असतात
ते भरती-ओहोटीचे स्वार असतात
त्याचे स्थान मात्र भरती-ओहोटीत वाट दाखवणाऱ्या
धृवासारखे निश्चल असते.
समाज त्याच्या पालख्या घेऊन
शतकानुशतके नाचत सुटतो
जगज्जेत्यांच्या जन्मतिथ्या मात्र
शाळकरी पोरांकडून घोकंपट्टी करवून लक्षात ठेवाव्या लागतात.
तुमच्या-आमच्या जीवनातली शक्ती
प्रतिक्रियेत खर्च होते.
त्याच्याजवळ विशुद्ध क्रिया असते.
म्हणून धवधब्यापेक्षा हजारपट मोठी
श्रावणझडीची उंची त्याला दिसते.
रोग्यात तो योगी पाहतो
आणि अस्पृश्यात त्याला हरिजन दिसतो.
आणि म्हणून तो कर्मकांडी राहू शकत नाही.
जीवनाचे संदर्भ तोडून कृतींचे अर्थ तो लावीत नाही.
गफ्फारखानाच्या मुलासाठी तो मांसाहाराची व्यवस्था करतो
हिंसक क्रांतिकारकांच्या धैर्यापुढे तो नम्र असतो.
आणि प्रतिस्पर्ध्याशीही वागताना त्याची मान ताठ
पण माथा झुकलेला असतो.
म्हणून त्याच्या उपवासाने त्याला
प्रतिस्पर्ध्याच्या हृदयात वास मिळतो.
ही विशुद्ध क्रिया नसली
म्हणजे अशाउपवासाचा उपहास होतो.
( वहुधा अशा उपवासांचा उपद्रवच होत असतो. )
त्याचा मंत्र जवळ नसला
म्हणज त्याच्या यंत्रावर विणलेली खादी
वैफल्याची नग्नता झाकू शकत नाही.
आणि त्याच्या तत्त्वांचे घटपट करीत चालणारे
बौद्धिक हस्तमैथुन
समाधानाचा फक्त भास देऊ शकते.
त्याने निर्मिती होत नाही.

विकृती मात्र निर्माण होते.
पण खांद्यावर जेव्हा क्रूस असतो
आणि डोक्याला कफन गुंडाळून जेव्हा जीवन निघालेले असते
तेव्हा त्याच्या श्वासाश्वासात संकल्प असतात.
त्याच्या आचाराच्या पायाशी सिद्धी लोळण घेत येतात.
आणि त्याच्या विचारातून क्रांतीचा जन्म होत असतो.
आपली भूमिका संपली
म्हणजे दैदीप्यमान मृत्यूने आसमंत उजळीत
तो निघून जातो
पण बेचिराख झालेली त्याची राखही हसत असत
आणि तिच्यातून कित्येक किंग आणि डच्युवचेक [illegible] असतात.
ज्याला तो क्रूस वागवता येतो
त्याच्या सोबत वारा अनुयायी असले तरी त्याचे
प्रेषितत्व घावरत नाही.
पण खांद्यावर क्रूस नसताना कोणी बारा लाख वाजारबुणगे
घेऊन निघाला
तरी त्याचा महंत होतो
आणि महंत फक्त गादी चालवू शकतात
मन्वन्तर घडवू शकत नाहीत
( नव्या युगाचा चेहरा कोणत्याही जुन्या साच्यात घडवला जाऊ शकत नाही. )
गांधी-माहात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाही.
आणि उद्याच्या पिढ्यांना त्याची ओळख पटण्यासाठी
कदाचित कॉम्प्यूटर लागेल.
पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा
कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार नाही.

२६

# अशांत मनाचे गांधीजी

## दि. के. बेडेकर

सांप्रत जगाच्या दाराशी समृद्धी उभी आहे. परंतु त्याबरोबरच सर्व-विनाशाचे चक्रही जगाच्या डोक्यावर फिरत आहे. अशांत व भयभीत झालेल्या दिशाहीन मानवाला गांधीजींनी कोणता मार्ग दाखविला, त्यांची ईश्वरविषयक कल्पना काय होती, याचे विवेचन पुढील लेखात केले आहे.

गांधीजी १८९३ मध्ये डरबनला गेले. कोट्स या ख्रिस्ती धर्मोपदेशकांशी त्यांची ओळख झाली. कोट्स यांनी दिलेली वरीच ख्रिस्तधर्मीय पुस्तके त्यांनी वाचली. परंतु ईश्वरावर भार टाकून शाश्वत शांती मिळविण्याचा ख्रिस्ती मार्ग गांधीजींना पसंत पडला नाही. तेथेच 'प्लिमथ ब्रदरेन' नावाच्या ख्रिस्ती उपपंथाच्या एका गृहस्थाशी बोलताना गांधीजींनी उत्तर दिले, "मला पापाच्या फलातून मुक्ती नको. पापवृत्तीतून, पापकर्मातून मुक्ती हवी. ती मुक्ती मिळत नाही, तोवर माझी अशांती मला प्रिय आहे." (आत्मकथा, पृष्ठे ११५–११६)

'माझी अशांती' या गांधीजींच्या शब्दात फार मोठा अर्थ आहे. गांधीजींची अशांती ही आजची आंधळ्या, दुबळ्या अर्ध-मानवाची अशांती आहे का ? पैशाच्या हव्यासाने स्पर्धेच्या बाजारात हपापणाऱ्या माणसाची केविलवाणी धडपड म्हणजेही अशांती आहेच. सत्तेच्या शिडीवर चढताना, डावपेच खेळताना, कसरतीचे प्रयोग करताना भयाकुल झालेल्या सत्ताधाऱ्यांचीही अशांतीच असते. सगळीकडून नाडलेला व भरडला जाणारा श्रमिक अशांत असतो, आणि नाडला जात असून धुवट कपड्यांच्या

कैफात जगणारा सुशिक्षितही अशांत असतो. पण हे सारे माणसांचे असले तरी अर्धवट मानवी जीवन आहे; या जीवनाला अशांतीचा शाप भोगावा लागत आहे. पण अशा अशांतीचा शाप गांधीजी भोगीत नव्हते. 'माझी अशांती' म्हणताना ते आपल्या मनातील वेगळ्याच व्यथेबद्दल सांगत आहेत.

मुळात जाऊन शोध घेण्याची धमक आणि इच्छा ज्या थोड्या माणसात असते, त्यांपैकी गांधीजी एक होते. आपल्या संतांपैकी तुकाराम हे अशाच पिंडाचे होते. काही देताघेताना पारखून व तोलूनमापून घेण्याची वृत्ती तुकारामांमध्ये होती. म्हणून त्यांनी 'अध्यात्म'देखील पारखून घेतले आणि म्हटले, "नलगे मुक्ती, धनसंपदा!" तुकारामांचा काळ पाहता, 'नलगे मुक्ती' म्हणणे केवढे धाडसाचे व खोल अनुभूतीचे बोलणे होते, याची कल्पना थोडीफार येईल. इतरांच्या आध्यात्मिक अशांतीची व जिज्ञासेची धाव मुक्तीपर्यंत जाणारी होती. पण ती मुक्ती मला नको, असे तुकाराम म्हणू शकले.

आधुनिक भारतात अनेक संत, महात्मे व साधक झाले; (आजही आहेत.) त्यांना अशांती दूर करावयाची होती व त्यासाठी हा ना तो परमार्थमार्ग त्यांना उपलब्ध झाला. गांधीजींची अशांती वेगळ्या प्रकारची होती व ती त्यांना प्रिय होती. त्यांना त्यांच्या अशांतीतून मार्ग काढावयाचा होता.

### आतले व बाहेरचे पाप

गांधीजींची अशांती त्यांना प्रिय होती, तरी तिच्यातून मुक्तता त्यांना हवी होती. ती कशी मिळेल याबद्दलच त्यांनी म्हटले आहे की, "मला पापाच्या फलातून मुक्ती नको." पाप करण्याची संधी, सक्ती किंवा दोन्ही गोष्टी उपलब्ध आहेत. कुवतीप्रमाणे पाप आपण करीत आहोत. पण पापाच्या फलापासून सुटका करून घेण्याचीही सोय आहे. अशी काहीतरी सुंदर योजना गांधीजींच्या पुढ्यात आली. त्यांनी या योजनेत गुंतायचे साफ नाकारले.

'पापकर्मातून मुक्ती हवी' ही गांधीजींची आर्त मागणी आहे, ईश्वराला हाक आहे आणि यासाठीच जन्मभर ते धडपडताना दिसत आहेत.

त्यांच्या जीवनाच्या महावस्त्रामध्ये यश आणि अपयश, सुख आणि दुःख यांचे आडवे-उभे धागे दिसतातच. शिवाय एक दिसते : आतल्या पापाविरुद्ध त्यांनी दिलेला अविरत लढा दिसतो, आणि असाच निकराचा सामना बाहेरील पापाशी त्यांनी दिलेला दिसतो.

आतले पाप म्हणजे माणसाला माणुसकीपासून ढळविणारे दुबळ्या मनाचे, अहंकाराचे, क्रोधाचे, हिंसेचे व वासनेचे पाप.

बाहेरचे पाप म्हणजे पुन्हा तसेच आहे. तेही माणसाची माणुसकी हिरावून घेते. गोरा माणूस साम्राज्यवादी पशू बनतो. ब्राह्मणक्षत्रियादि वरिष्ठ जाती

अस्पृश्यांना माणसेही न मानण्याच्या अधम अवस्थेला जातात. भांडवलदार मजुरांना यंत्र समजून स्वतः नफा मिळविणारे निर्घृण यंत्रच बनतात. मुसलमान काफिरांच्या कत्तली करतात आणि ख्रिश्चन पाद्री अन्यधर्मीयांची कुचेष्टा करीत आपला कळप वाढवू पाहतात.

आतील वा बाहेरील अशा दोन्ही पापांचे आकलन गांधीजींना झाले. इतके दाहक आकलन इतर समकालीन विचारवंतांना, राजकीय नेत्यांना व धर्मसुधारकांना झालेले नव्हते. दोन्ही पापे वेगवेगळी आणि एकवट उमगून घेण्यासाठी लागणारी सहृदयता व करुणा गांधीजींमध्ये होती. त्यामुळे असे झाले की, पापांच्या चिमुकल्या अंशाशी वैर करीत बसलेले जिद्दी लोक गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकृष्ट झाले.

परकीय सत्तेच्या पापाविरुद्ध निर्भयपणे लढण्याचा मार्ग हा मनुष्य दाखवीत आहे. तसाच मार्ग सामाजिक पापाविरुद्ध लढण्यासाठी हाच माणूस दाखवीत आहे. आणि इतक्या व्यापक, दोन आघाडींच्या लढाईची सूत्रे धिटाईने अंगिकारणारा हा मनुष्य ब्रह्मचर्य, आहारशुद्धी, रुग्णसेवा यांच्याही तपशिलात मोठ्या रसिकतेने व सूक्ष्मतेने प्रयोग करीत आहे. हे सारेच नवीन होते व नवलाचे होते. गांधीजींना भारताचे नेतृत्व लाभले ते या नवलामुळे.

पण, यात मुख्य गोष्ट लोकांच्या विश्वासाची होती. लोकांनी त्यांच्यावर विश्वास कसा ठेवला ?

याचे उत्तर मी असे देईन की, गांधीजींनी प्रत्यक्ष वागून दाखविले की, आतील व बाहेरील पापाशी मी युद्धाचा प्रसंग रात्रंदिन चालविला आहे.

**अशांतीचा प्रेषित**

गांधीजींना प्रेषित, म्हणजे ईश्वराचा खास दूत, मानणारे लोक आहेत. त्यांना मरण लाभले ते येशूचे, त्यांनी लढे दिले ते महंमदाच्या शौर्याने आणि त्यांच्या हृदयात विशाल करुणा होती ती गौतमबुद्धाची. पण ते 'ईश्वराचे प्रेषित' म्हणायची मला तरी इच्छा होत नाही. याचे कारण असे की, गांधीजी जन्मले ते युग ईश्वराचे नसून मानव-युग आहे. अशांत, भयभीत आणि माणुसकी हरपल्याने दिशाहीन झालेल्या मानवाचे हे युग आहे. मानवी बुद्धीने व पराक्रमाने मानवाचे सारे वंश आता एकजीव झाले आहेत, आणि एकमेकांची हत्या करणाऱ्या अमानुष यांत्रिकतेने बद्ध झाले आहेत. आता, समृद्धी हाताशी आहे, पण सर्वविनाशाचे चक्र पाची खंडांवर भ्रमण करीत आहे. माणसाला वाचविणारा ईश्वर कोठे आहे ? तो माणसातच आहे, का नाही ? असा अशांत यक्षप्रश्न आहे.

गांधीजी या अशांतीचे प्रेषित आहेत.

**ईश्वराला प्रार्थना !**

आपल्या आत्मकथेत ते एका ठिकाणी म्हणतात, "तरी ईश्वराविषयी श्रद्धा

वाटत होती असे म्हणता येणार नाही................ पण एका गोष्टीचे मूळ रोवले गेले, ती ही की, हे जग नीतीवर टिकले आहे. सारी नीती सत्यात सामावलेली आहे. '' ( आत्मकथा, पृ. –३२ )

'रोवले गेलेले मूळ ' म्हणजे नीती व सत्याची समावेशक कल्पना. ईश्वरावर श्रद्धा ठेवून अत्यंत विकट प्रसंगातून स्वतःला वाचविण्यास गांधीजी शिकले. पण हा ईश्वर म्हणजे 'सत्य'च आणि सत्याचा गाभाही नीतीच. प्राचीन भारतीय सेश्वर दर्शनांनी मानलेला हा ईश्वर नाही, आणि प्रेषित धर्मांनी ( म्हणजे ख्रिस्ती व महंमदी धर्मांनी ) मानलेला ईश्वरही हा नाही. हा टॉलस्टॉयने मानलेला ईश्वर आहे व 'किंग्डम् ऑफ गॉड इज् विदिन यू ' या त्याच्या ग्रंथाचे वाचन करताना गांधीजींना त्याची ओळख झाली. प्राचीनांच्या ईश्वराप्रमाणे हा ईश्वर करुणाघन आहे. पण तो सगुणही नाही व निर्गुणही नाही. तो ईश्वर केवळ मानवी आहे.

'मानवी ईश्वर ' म्हणजे काय ? असा आक्षेप घेता येईल. पण येथे तर्कसंगतीचा किंवा प्राचीन धर्मश्रद्धांशी मेळ बसण्याचा प्रश्न नाही. येथे एका नव्या युगधर्माची व युगश्रद्धेची साक्ष आहे.

रामकृष्ण परमहंसांना ईश्वराचे दर्शन घडले होते आणि विवेकानंदांना त्यांनी ते दर्शन घडविले होते. पण विवेकानंदांचे पुढील उद्गार पहा : "जो ईश्वर सर्वांचा पिता आहे, दुर्बलांचे रक्षण करताना ज्याला बलिष्ठांची भीती वाटणार नाही, ज्याला लाच देऊन विकत घेता येणार नाही, असा एखादा ईश्वर कोठे तरी आहे काय ?'' (Collected Works, Vol. III, pp. 475–477 ) विवेकानंद आर्त मनाने हा प्रश्न विचारीत आहेत. आणि पारंपरिक धर्मश्रद्धेच्या दृष्टीने हा प्रश्न पाखंडीपणाचा आहे. हा प्रश्न ते विचारू शकले, याचा अर्थ गांधीजींप्रमाणेच विवेकानंददेखील मानवयुगाच्या नव्या श्रद्धेने जगाकडे आणि ईश्वराकडेही पाहत आहेत.

गांधीजींची ईश्वरावरील श्रद्धा प्रथम बळकट नव्हती, पण उत्तरोत्तर दृढ होत गेली. ईश्वराची प्रार्थना त्यांना कसोटीच्या प्रसंगी बल देणारी होती. पण प्राचीन धर्मश्रद्धाळू भगवद्भक्तांच्या प्रमाणे गांधीजी प्रार्थना करीत नव्हते. देवभेटीसाठी त्यांची आर्तता नव्हती, तर त्यांची सारी ओढ मानवी पापमुक्तीसाठी होती. मानवाचे आंतरिक व बाह्य जीवन पापमय आहे, ते निष्पाप कसे होईल, ही एकमेव व्यथा त्यांना जाळीत होती.

प्रार्थना करीत असताना त्यांना वीरमरण लाभले, यातही एक प्रतीकात्मक पूर्तता आहे. त्यांनी जिवंत समाधी घेतली नाही किंवा सदेह स्वर्गारोहण केले नाही. मानवांच्या साक्षीने साधे मरण त्यांना लाभले.

**अशांतीतूनच प्रवास**

फाळणीच्या भेसूर हत्याकांडाची व अनैतिक अमानुष घटनांची पार्श्वभूमी

गांधीजींच्या मृत्यूला लाभली. गांधीजींचे शिष्यत्व पत्करणाऱ्या मार्टिन ल्यूथर किंग यांनाही भीषण अशांततेच्या पार्श्वभूमीवर वीरमरण लाभले. मानवी जीवनात काहीतरी साठवलेले आहे, फार मोठे व भीषण संचित आहे. या संचिताला आव्हान देणाऱ्यांचे देह रक्ताच्या थारोळ्यात निष्प्राण होतात, असे हे संचित आहे.

अनेक संस्कृतींनी आपल्या विषम व आसुरी लालसेत जोपासलेले हे संचित आज तिसऱ्या महायुद्धाच्या रूपाने मानवजातीला ग्रासीत आहे. धनसंचय, सत्तारूढांची मदांधता, भ्रष्ट मिथ्थ्या जीवनात मग्न होण्याची माणसाची मूर्खता, या अनेक पापांना मिळून आज आपण मानवाचे संचित म्हणू शकतो. हे संचित ज्यांना उघडया डोळ्यांनी पाहता आले, ते या पापांना निर्भय विरोध करू शकले. गांधीजी या विरोधकांचे मन जिंकू शकले; कारण सर्व जन्मभर त्यांनी एकाच सत्याचा शोध घेतला. ते सत्य म्हणजे पापमुक्त मानवसमाजाचे जीवन.

ज्यांना आजच्या मिथ्या जीवनातील पापाचा साक्षात्कार होत नसेल, त्यांनी खुशाल कोणत्याही भव्यदिव्याचे साक्षात्कार पाहावेत; किंवा सत्तेच्या सिंहासनावर बसून गांधीजींच्या स्मृतीला वंदन करावे; किंवा विषमतेच्या समर्थनासाठी जुनीनवी शास्त्रवचने सांगत राहावे. पण, मानवयुगाचे पाऊल जेव्हा आजच्या अंधारातून खऱ्या मानवोचित जीवनाच्या सर्जनकालात पडेल, तेव्हा सारी मानवजात गांधीजींचे स्मरण करील.

अशांत मनाचे गांधीजी ज्या भीषण कालखंडात वावरले, पापाशी झगडले व वीरमरणाला सामोरे गेले, तो काळ आजही भीषणपणे नांदत आहे. तोपर्यंत त्यांचे स्मरणही अशांत मनानेच आपण करू शकू. त्यांचे अशांत जीवनही कृतार्थ होते, पण त्याचा खरा अर्थ उमगण्याचा काळ अजून यावयाचा आहे. माणसांनीच तो आणावयाचा आहे.

२७

# गांधीजींची लोकशाहीची कल्पना

अच्युत भाई देशपांडे

गांधीजींच्या अहिंसेतून मानवाची समता व त्यातून लोकशाहीची कल्पना निघाली. लोकशाहीला अवश्य असणाऱ्या आर्थिक समतेसाठी गांधीजींनी रचनात्मक कार्यक्रम जनतेपुढे ठेवला. जनतेने हक्काआधी कर्तव्याकडे लक्ष द्यावे, असे गांधीजींचे मत होते. ग्रामपंचायतीचे स्वरूप, विश्वस्तवृत्तीची कल्पना, इत्यादी प्रश्नांचे विवेचन पुढील लेखात पहावयास सापडते.

गांधीजींनी आपल्या तत्त्वज्ञानाचे कोणतेही शास्त्र बनविले नाही. " सत्याग्रहशास्त्राचे स्वरूपच असे आहे की, अगदी समोरचे एक पाऊल टाकण्याइतकेच त्याला दिसते. '' आणि " मला एक पाऊल पुरे '' असेच ते मानीत असत. माझ्या जीवनाच्या या दर्शनाचे माझे प्रयोग चालू आहेत म्हणून त्याचे मला नियमबद्ध शास्त्र बनविता येत नाही; खेरीज या जीवन-दर्शनाचे स्वतंत्र प्रयोग करणाऱ्यांनी आपली स्वतंत्र बुद्धी वापरावी आणि त्या बुद्धीनुसार येणारे निर्णय अमलात आणावे, म्हणजे त्याला या विकसित शास्त्राचे नवे नवे ज्ञान होईल असे गांधीजी म्हणत. अशा स्थितीमध्ये गांधीजींची लोकशाहीविषयक कल्पना निर्णायक अशी मांडता येणे कमी शक्य आहे. परन्तु गांधीजींनी वेळोवेळी त्याबाबत काढलेले उद्‌गार, आपल्या लेखात वा पुस्तकात केलेले उल्लेख, त्यांना

मान्य असलेल्या त्यांच्या भाष्यकारांनी गांधीजींच्या जीवनकाळात मांडलेले विचार आणि गांधीजींच्या जीवनदृष्टीनुसार निघू शकणारे निष्कर्ष यांचीच नोंद घेणे शक्य आहे.

**साधन-साध्य-अभेद**

गांधीजी स्वतःला सत्य-अहिंसादि व्रतांचे उपासक मानीत, आणि त्या कसोटीनुसार प्रत्येक विचार ते पारखून घेत. सत्य-अहिंसादी व्रतांचे पालन अनादी कालापासून होत आले आहे, आणि गांधीजींचा जन्म विज्ञानाच्या प्रसाराच्या काळात झालेला असल्यामुळे या सत्य-अहिंसेचा व्यापक प्रचारही त्यांना ओघप्राप्तच होता. परंतु गांधींचा जीवन-निकष, जो त्यांनी सर्वत्रच लावला, तो कोणता ? श्रीमत् शंकराचार्यांनी स्थितप्रज्ञलक्षणांच्या भाष्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे, "सर्वत्रहि अध्यात्मशास्त्रे यानि एव साधनानि तानि एव साध्यानि प्रयत्न-साध्यत्वात्।" हा साधनसाध्य-अभेद, जो केवळ अध्यात्मशास्त्रापुरताच पूर्वी मानला जात असे तो, जीवनाच्या सर्व अंगांना लागू करणे, हे आपल्या जीवनाचे कार्य गांधीजींनी ठरवले आणि सत्यानुसार नीतिशास्त्र, समाजशास्त्र, राजकारणशास्त्र, अर्थशास्त्र इ. इ. बावत आपले विचार मांडले.

या साधन-शुचितेच्या आग्रहामुळे जनतेवरील नितांत प्रेमाने जगातील सर्व-अन्त्य अशा आफ्रिकी जनसमूहाच्या देशात आपल्या शेजाऱ्यांची सेवा करीत असता तीव्र क्षणी गांधीजींना अहिंसेचा साक्षात्कार झाला. जनतेवरील तीव्र प्रेमामुळे जनतेला सर्वसुलभ अशी ती अहिंसा त्यांनी स्वीकारली आणि आपल्याला लाभलेल्या या प्रकाशात जगातील आपला मार्ग चोखाळला. लोकशाहीविषयक त्यांच्या दृष्टीला ही अहिंसेची बैठक सर्वत्र दिसून येते. लोकशाहीसाठी हिंदुस्थानात टिळक, गांधी आदींनी' स्वराज्य 'हा शब्दही वापरला आहे, म्हणून स्वराज्याच्या बावतीत आलेले त्यांचे उल्लेखही लोकशाहीविषयक समजावयास हवेत.

**सर्व-हित साधण्याची कला व शास्त्र**

गांधीजींनी स्पष्टच सांगितले आहे की, "माझ्यापुढे मुख्य महत्त्व अहिंसेचे आहे, स्वराज्याचे नंतर." अहिंसेच्या या निकषावर स्वराज्याचे स्वरूप कसे असेल ? ते म्हणतात, "अहिंसेवर आधारलेल्या समाजातील शासनाचे स्वरूप काय असेल, याची मांडणी मी मुद्दामच केली नाही. चालू स्थितीहून ते निराळे असेल परंतु ते नेमके कसे असेल हे मी आगाऊच सांगू शकणार नाही." (हरिजन, फेब्रुवारी १९३९). "परंतु माझा असा विश्वास आहे की, अहिंसेवर प्राधान्याने उभारलेला समाज (आणि त्याचे राज्य) अस्तित्वात येऊ शकतो आणि मी त्याच्यासाठी यत्न करीत आहे." असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. "संपूर्ण अहिंसेवर आधारलेले राज्य तर आदर्श राज्यच म्हटले जाईल. त्यात काही राजकीय सत्ता नसेल; कारण राज्यच नसेल."

त्यात प्रत्येक जण स्वराज्य उपभोगील, म्हणजे स्वत:वर राज्य करील. अर्थात् कुणी कुणावर सत्ता चालविण्याची जरूरच पडणार नाही.'' ही स्थिती "नैव राज्यं न राजासीत् न च दण्डो न दण्डिक: । धर्मेणैव प्रजा: सर्वा: रक्षन्ति स्म परस्परम् ।।'' असे महाभारतात सांगितल्याप्रमाणे असेल. अशी स्थिती कधी शक्य होईल किंवा नाही या वादात न सापडता गांधी म्हणतात, युक्लिडच्या रेखेच्या नेमक्या व्याख्यानुसार रेखा काढणे अशक्य असले तरी भूमितीचा सारा विकास त्या व्याख्येला धरूनच झाला आहे म्हणून हा आदर्श समोर ठेवला पाहिजे. वरील स्थितीच्या जवळवजळ येऊ शकणारी "अहिंसेवर आधारलेले'' आणि "जे सर्वांत कमी सत्ता चालवते ते सरकार उत्तम'' या व्याख्येला सार्थ करणारी लोकशाही गांधीजींनी मांडण्याचा यत्न केला आहे. गांधीजी म्हणतात, स्वातंत्र्याची खरी कसोटी ही आहे की, "सामान्य माणसाला, आपण आपल्या भाग्याचे विधाते आहो, असे भान निर्माण झाले पाहिजे.'' "लोकशाही जर खरी लोकशाही असावयाची असेल, तर समाजातल्या बलवानातील बलवानाबरोबर अशक्तातील अशक्तालाही पुरेशी संधी विकासासाठी तिने उपलब्ध करून दिलेली असली पाहिजे. हे अहिंसेनेच होऊ शकते.'' राज्याचा चाललेला कारभार योग्यपणे चालला आहे किंवा नाही हे सांगण्याचे, तो चालला नसल्यास त्याला सुधारण्याचे "स्वातंत्र्य देशातील सर्व माणसांना, अगदी क्षुल्लक समजल्या गेलेल्या माणसालासुद्धा असले पाहिजे.'' "स्वातंत्र्य हा सत्याचा भाग आहे आणि मनुष्य सर्व प्रकारे स्वतंत्र नसेल तर सत्याची उपासना करू शकतच नाही.'' जीवनाचे ध्येय सत्यदर्शन आहे आणि दर्शनासाठी प्रयत्न करण्याचे स्वातंत्र्य, त्यासाठी आवश्यक ती साधने उपलब्ध करून घेण्याचे स्वातंत्र्य आणि या सर्व व्यवहारात भाग घेण्याचे स्वातंत्र्य मनुष्याला असले पाहिजे. आज सर्वत्र जगभर चाललेल्या लोकशाहीची रचना अत्यंत व्यामिश्र आहे. सामान्य माणूस जसा हिमालयाकडे वा एखाद्या प्रचंड कारखान्याच्या अजस्र यंत्ररचनेकडे पाहून अवाक् होतो, तद्वत् याच लोकशाहीत तो किंकर्तव्यमूढ होतो. त्याला जे समजेल, ज्यात भाग घेता येईल अशा लहान लहान घटकांच्या आधारावर रचलेली राजनैतिक रचना त्याच्या लक्षात येऊ शकते. त्यात त्याला आपल्या शेजाऱ्यांशी ओळखीचा मानवी संबंध स्थापित करता येतो. त्याचे शेजारी एका मोठ्या केन्द्रीय घटकाचे एक, दोन अशा संख्येने युक्त असलेले अंश नसून त्याच्या सोवत राहत असलेले आणि तेथील कारभारात भाग घेणारे संपूर्ण नागरिक आहेत, अशी जाणीव त्याला झाली पाहिजे. गांधीजी म्हणतात, "सदोष का होईना पण अशी रचना भारतातील जुन्या पंचायत राज्यात होती.'' या पंचायत राज्याबाबत आम्ही पुढे अधिक सांगणार आहो. येथे नागरिकांना सार्वत्रिक राज्यकारभारात भाग घेता यावा, ही अहिंसेची मागणी आहे, एवढेच सुचविले आहे. गांधीजींनी एकदा लोकशाहीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली होती, "जनतेच्या सर्व

गटांची समग्र शारीरिक, आर्थिक आणि आध्यात्मिक साधनसंपत्ती जुळवून सर्वांच्या समान हितासाठी कामाला लावण्याची कला आणि शास्त्र म्हणजे लोकशाही." समाजाला येणाऱ्या संकटातून पार पडण्याचा, लाभलेल्या सोयी सर्वांबरोबर उपभोगण्याचा आणि सहकार्याने काम करण्याचा जो प्रयत्न नागरिकांकडून सार्वत्रिकरीत्या घडतो, त्यातून व्यक्तींची आत्मोन्नती होते आणि समाजाच्या उन्नतीचाही तोच मार्ग आहे. काही ठरीव मुदतीनंतर केवळ मतदानात भाग घेण्यानेही जीवनदायी अनुभव लाभत नसतो.

## अंत:शुद्धीची गरज

लोकशाहीत नागरिकाला आपल्या उन्नतीसाठी मतस्वातंत्र्य, विचार-स्वातंत्र्य, उच्चारस्वातंत्र्य, प्रचार-स्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य इत्यादी हक्कांची अत्यंत आवश्यकता असते. हे हक्क त्याला समाजाची सेवा करू शकण्याला समर्थ करतात. समाजाच्या सेवेने त्याच्या गुणांचा विकास होतो आणि विकसित गुणांच्या द्वारे तो समाजाचा विकास करतो. लोकशाहीमध्ये वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल साधणे महत्त्वाचे असते. सत्यसोधनासाठी आपल्या स्वातंत्र्याचा उपयोग करीत असता दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला बाधा येता कामा नये, हे लोकशाहीत गृहीत आहे. आपल्याला कळलेले सत्य हे आपल्यापुरते जरी जीवन-प्रयोगाची सुरुवात करायला पुरेसे असले तरी दुसऱ्या भूमिकेतून त्याचे दर्शन आणि ग्रहण करणेही जरूरीचे असते आणि यानेच सत्याचा विकास साधतो. दुराग्रह आणि अनिश्चय टाळून लोकशाहीच्या विकासात नागरिकाला भाग घ्यावयाचा असतो आणि यासाठी व आत्मविकासासाठीच सर्वजनहितबुद्धीचा विकास त्याला करावा लागतो. सर्वजनहित-बुद्धि-योग प्राप्त होण्यासाठी चित्तशुद्धीची आणि समाजाला शुद्ध करणाऱ्या कार्यात गुंतण्याची आवश्यकता असते. गांधीजी म्हणतात, " लोकशाहीचा विकास सक्तीच्या पद्धतींनी होत नसतो. लोकशाहीचे जीवन-तत्त्व बाहेरून लादले जात नसते, ते आतून यावे लागते. "" ही शुद्धी किंवा स्वातंत्र्य जितके ज्या वेळी आत विकसित झाले असेल, त्याच प्रमाणात बाहेरचीही शुद्धी किंवा स्वातंत्र्य आपल्याला लाभेल. "

बायबलमधे एक प्रसंग आला आहे. ख्रिस्ताचे शिष्य कुणा मित्राचा विकार दूर करू शकले नाहीत. ते ख्रिस्ताला विचारतात, " हे प्रभू ! आम्ही तो का दूर करू शकलो नाही ? " ख्रिस्त म्हणाला, " त्यासाठी अधिक प्रार्थनेची आणि उपवासाची जरूर आहे. " तुकाराम तर म्हणतात, " सारे व्यवहार मी अंत:शुद्धीसाठीच करीत आहे." "भूती देव म्हणुनी भेटतो या जना, नाही हे भावना नरनारी ।। दयेसाठी केला उपाधि पसारा ।" सारा जागतिक व्यवहार देवाची दया व्हावी म्हणून मी करीत आहे.

**कर्तव्यावर भर**

"रचनात्मक कामाची परिपूर्णता म्हणजे स्वराज्य", अथवा हक्कांऐवजी कर्तव्यांवर गांधीजी भर देतात, तेव्हा समाजसेवेद्वारा आणि लोक-सहयोगद्वारा समाज-शुद्धीच्या द्वारे लोकशाहीसंचलनाची त्यांची दृष्टी स्पष्ट होते. कर्तव्यावावत ते म्हणतात, "(समाजाप्रत) आपले कर्तव्य करण्याचा हक्क हाच एक असा मोलाचा हक्क आहे की, ज्यासाठी आपण जगावे अथवा मरावे. या हक्कात सर्व कायदेशीर हक्क आले." एच्. जी. वेल्सनी 'राईट्स् ऑफ मॅन' या पुस्तकावावत गांधीजींना जी तार पाठविली, त्याच्या उत्तरात गांधीजींनी त्यांना जे उत्तर दिले ते येथे लक्षात घेण्यासारखे आहे. १९४०च्या ऑक्टोवरात हैद्राबाद राज्यात व्यक्तिगत सत्याग्रह झाला त्या वेळी त्यात सत्याग्रही पाठविताना त्या राज्याच्या त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांना गांधीजींनी जे पत्र लिहिले होते त्यातही त्यांनी हा आपला मजकूर उद्धृत केला होता–

"माझ्या तरुण वयात माझे हक्क बजावण्याचा प्रयत्न करीत मी जीवनाला सुरवात केली, आणि लगेच माझ्या लक्षात आले की, मला एकही हक्क नाही, माझ्या पत्नीवरसुद्धा माझा हक्क नाही. म्हणून मी माझी पत्नी, माझी मुले, मित्र, सोबती आणि समाज यांच्याविषयी माझी काय कर्तव्ये आहेत ती शोधू लागलो आणि ती पार पाडू लागलो आणि आज मला हे दिसत आहे की, कदाचित् माझ्या माहितीतील कोणत्याही जीवित माणसापेक्षा मला अधिक हक्क आहेत. हा दावा फार मोठा आहे असे असेल, तर मी असे म्हणतो की, माझ्यापेक्षा अधिक हक्क बाळगतो असा कुणीही माणूस माझ्या माहितीत नाही."

गांधीजी असा अनुभवही सांगतात की, "जे लोक आपली राज्याविषयीची कर्तव्ये पूर्ण करून (त्याच्या परिणामी) हक्क मिळवितात, ते त्याचा उपयोग समाजाच्या सेवेसाठीच करतात, स्वतःसाठी नाही."

**विधायक कार्याची पूर्ती–स्वराज्य**

याच दृष्टीने लोकशाहीचे पालनपोषण व रक्षण करण्यासाठी गांधींनी रचनात्मक कार्यक्रम सांगितला आहे. तो कोणत्याही राज्यातील जनता पूर्ण करू शकली, तर त्या कार्यक्रमाच्या पूर्तीतच लोकशाहीची यशस्विता आहे आणि त्या कार्यक्रमातच त्या कार्यक्रमाला कुणाकडून अडथळा आल्यास दूर करण्याचे सामर्थ्य आहे. रचनात्मक कार्यक्रम, असहकार आणि प्रतिकार ही तिन्ही गांधीजींच्या एकाच कार्यक्रमांची एकमेकास पूरक अंगे होत. गांधीजी म्हणतात, "रचनात्मक कामाचे ध्येय एक अहिंसक समाजरचना उभारणे, हे आहे." "त्यातून लोकांची सत्ता निर्माण होते" आणि अशा प्रकारे लोकसत्ता बळकट होते. या रचनात्मक कामातून लोकांचा आळस झाडून काढावयाचा असतो. त्यांची बौद्धिक आणि संशोधनात्मक शक्ती जागृत करावयाची असते. आर्थिक समानता आणावयाची व ती प्रस्थापित होईपर्यंत समाजात

आपल्यापेक्षा कमी साधने राखणाऱ्यांना सर्व लोकांनी साह्य करावयाचे असते. परस्परात सहयोग राखावायचा असतो. परस्परात ऐक्य स्थापून उच्चनीच कल्पनांचा उच्छेद करावयाचा असतो. सर्व धर्मांत समभाव बाळगून, वंश-पंथ-लिंग-निरपेक्ष सर्वांचा दर्जा समान मानण्याची वृत्ती जोपासवायाची असते आणि समाजाचे स्वास्थ्य कायम ठेवून समाज दास्यातून मुक्त करावयाचा असतो. माझ्या हाती एक दिवस राज्य आले तरी मी सर्व देश दारूमुक्त करीन. '' असे गांधीजी म्हणाले होते. त्याचप्रमाणे "मी जर डिक्टेटर असेन तर धर्म आणि राज्य ( स्टेट ) हे वेगवेगळे असतील असे करीन. मी माझ्या धर्माचा निष्ठावान पुरस्कर्ता आहे (आय स्वेअर वाय ईट). मी त्याच्यासाठी मरेन. परंतु ते माझे वैयक्तिक कार्य आहे. राज्याला त्याच्याशी काही करावयाचे नाही. . . .ती प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे. '' "सरकारने फक्त मूलभूत नैतिक तत्त्वे शिकवावीत. '' सांप्रदायिक धर्मांच्या (डिनॉमिनेशन रिलिजन्सच्या) शिक्षणाची सोय त्या त्या धर्माच्या अनुयायांनीच करावी, सरकारने करू नये, असेही त्यांचे म्हणणे होते. खादी, ग्रामोद्योग इत्यादींबाबतची त्यांची निष्ठा जगजाहीर आहे. अहिंसेचे उपासक असलेल्या गांधीजींनी खालील विशेष विचार मांडून लोकशाहीच्या आजपर्यंतच्या विकासात भर घातली आहे.

**लोकशाहीला अहिंसेचा ओघ**

१. समाजात नागरिकानागरिकामध्ये चढाओढ नसावी. सहयोग, सेवा सद्भावना असावी.
२. सर्वांना प्रामाणिक परिश्रमाचा मोबदला समान मिळावा.
३. न्यायाप्रमाणे शिक्षण राज्यकर्त्यांच्या सत्तेपासून मुक्त आणि स्वतंत्र असावे.
४. शिक्षण घेत असता सर्व नागरिकांना उत्पादक शरीर परिश्रमाचे शिक्षण दिले जावे.
५. समर्थ्याचें सामर्थ्य जनसेवेला वाहिलेले असावे.
६. राज्याच्या कायद्याखेरीज सामाजिक नीतिमत्ता वा मानवी धर्माच्या विकासासाठी सरकारनिरपेक्ष अन्य योजनाही असावी.
७. सेना बरखास्त व्हावी. पोलिसांनी व जनतेच्या सेवकांनी देशात शांतीचे रक्षण करावे.
८. राज्यकारभाराचा खर्च कमी असावा, त्याचे तंत्र सोपे असावे.
९. सत्तेच्या बाहेर सत्ता हाती न घेता केवळ जनसेवा करणारा असा एक लोकसेवक संघ असावा. त्याने जनतेला शिक्षित करीत तिच्यामार्फत राज्यकारभारात सुधारणा व बदल घडवून आणावा. आपत्ति-प्रसंगी त्याला सत्ता हाती घ्यावी लागेल. (आपल्या मृत्यूपूर्वी एक दिवस त्यांनी

याची सविस्तर योजना आखली होती.)

१०. विशिष्ट वयानंतर(उ. पन्नास वा अधिक) मतदानाचा हक्क नसावा.

नागरिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आणि बंधुतेचा विकास होण्यासाठी गांधीजींनी सत्ता, संपत्ती, आर्थिक रचना आणि उद्योगांची संघटना याबाबत विकेन्द्रीकरणाची एक योजना समोर मांडली आहे. चालू राज्यपद्धतीत परिवर्तन करण्यासाठी आवश्यक अशा युक्तीचीही त्यातच योजना आहे. तसेच आर्थिक समता आणण्यासाठी व ती कायम टिकविण्यासाठी गांधीजींनी 'ट्रस्टीशिप '(विश्वस्तवृत्ती)चा सिद्धांत पुढे मांडला आहे. या दोन योजना अमलात आणल्याविना अहिंसेवर आधारलेली लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही आणि जी समतेवर व अहिंसेवर आधारलेली नाही तीत स्वातंत्र्यही नाही आणि ती लोकशाहीही नाही. प्रथम आपण ट्रस्टीशिपचा विचार करू.

**ट्रस्टीशिप**

जोवर आर्थिक विषमता आहे तोवर मतदानाचे, कारभारी मंडळ निवडून देण्याचे, कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे, त्याचे धोरण ठरविण्याचे आणि सुधारण्याचे अधिकार नागरिकाला योग्य प्रकारे उपभोगता येत नाहीत. त्याचे मतस्वातंत्र्य आणि प्रचारस्वातंत्र्य केवळ माया ठरते म्हणून आर्थिक समानता लोकशाहीचे महत्त्वाचे अंग आहे. कायद्याने ही सांपत्तिक विषमता दूर केली तरी मनुष्यातील शारीरिक आणि बौद्धिक शक्तींची विषमता टळणारी नाही, यामुळे वैयक्तिक मालकी-हक्क काढून घेतल्यानंतरच्या स्थितीतही सांपत्तिक विषमता पुन्हा मूळ धरू लागेलच. शिक्षणाने आणि नियमाने ही विषमता आपण कमी करण्याचा प्रयत्न केला तरी या " Risiduary ownership चा—आगळ्या शक्तींच्या मालकीचा प्रश्न शिल्लकच राहील. मनुष्याला लाभलेली ही बुद्धिशक्ती समष्टीच्या व्यवस्थेमुळे, सहयोगामुळे आणि सद्‌भावनेमुळेच लाभली असल्यामुळे ती सर्वांच्या हितासाठीच उपयोगात आली पाहिजे आणि ती समाजासाठी आपल्याजवळ एक 'ट्रस्ट' ( विश्वस्तनिधी ) म्हणून ठेवली आहे, असे त्याने मानले पाहिजे. हा आहे ट्रस्टीशिपचा (विश्वस्त वृत्तीचा ) सिद्धांत. गांधीजींनी मानवांच्या परस्परांच्या संबंधात जसा प्रेमाचा, अहिंसेचा संबंध धर्म्य मानला,तसा वस्तू आणि मानव यांच्या संबंधासाठी ही विश्वस्तवृत्ती धर्म्य मानली. समाज ही आपली बँक आहे आणि त्यात राहिलेली संपत्ती ही आपली वर्धिष्णू संपत्ती आहे, असे माणसाला वाटले पाहिजे. लोकशाही वृत्तीच्या माणसाला ही गोष्ट कठीण वाटू नये. "प्रेम (अहिंसा) आणि अन्यनिरपेक्ष धनसंचय (एक्सक्ल्युजिव्ह पजेशन)मेळ खात नाहीत.'' गांधीजी असेही म्हणतात की," जी वस्तू मी सर्व जनतेबरोबर वाटून घेऊ शकत नाही ती वस्तू मी निषिद्ध समजतो. '' (१९३४) परस्पर विश्वासावर आधारलेली समाजरचना सर्वांच्या विविध शक्तींचे सुसंवादी

संयोजन असते. आपापल्या शक्तींचा सर्वांच्या भल्यासाठी उपयोग करणे हे लोकशाही-साठी अत्यंत आवश्यक आहे. मागे दिलेल्या गांधीजींच्या लोकशाहीविषयक एका व्याख्येवरून आपणास हे दिसून आलेच आहे. ट्रस्टीशिपसंबंधी आपली साधी व्याव-हारिक योजना गांधीजींनी खालीलप्रमाणे पुढे मांडली आहे. प्यारेलालजींच्या 'लास्ट फेज (भाग २) पुस्तकातून आम्ही ती जशीच्या तशी अनूदित करून येथे देत आहो. (पहा. ला. फे. भा. २ पा. ६३३)

**विश्वस्त-योजना**

१. ट्रस्टीशिप (विश्वस्तवृत्ती) वर्तमान भांडवलशाही समाजरचनेला सर्व-हितकारी (इग्यालिटचारियन) समाजरचनेंत रूपांतरित करण्याचे एक साधन पुरविते. ती भांडवलशाहीला स्थान देत नाही, परंतु आजच्या मालकवर्गाला स्वतःला सुधारण्याची एक संधी देते. मानवी प्रकृती दोषमुक्तीच्या पलीकडे नाही, या श्रद्धेवर ती आधारलेली आहे.

२. समाज स्वतःच्या भल्यासाठी जितक्या खासगी मालकीची परवानगी देईल, त्याशिवाय संपत्तीच्या खासगी मालकीचा अन्य कोणताही हक्क ती मान्य करीत नाही.

३. मालकीचे आणि संपत्तीच्या उपयोगाचे कायदेशीर नियमन तिच्या कक्षे-बाहेर नाही.

४. अशा प्रकारे राज्याने नियमित केलेल्या ट्रस्टीशिपअन्वये कोणतीही व्यक्ती स्वार्थी समाधानासाठी किंवा समाजाच्या हिताची पर्वा न करता संपत्ती बाळगण्याला किंवा वापरावयाला मोकळी असणार नाही.

५. ज्याप्रमाणे बरे (डिसेंट) किमान जीवन-वेतन ठरविण्याची योजना आहे, त्याचप्रमाणे समाजातील कोणत्याही माणसाला कमाल उत्पन्न किती असू द्यावे, याची मर्यादा निश्चित झाली पाहिजे. अशा किमान आणि कमाल उत्पन्नामधील फरक सयुक्तिक व न्यायसंगत असला पाहिजे आणि तो वेळोवेळी बदलत राहिला पाहिजे. हा फरक नाहीसा व्हावा, असे त्याचे वळण असले पाहिजे.

६. गांधी-विचार-अर्थरचनेत उत्पादनाचे स्वरूप सामाजिक गरजेने निर्णित होईल, वैयक्तिक लहर किंवा लोभ यांनी नव्हे.

**विकेन्द्रीकरण**

समाजाच्या सर्वांगीण व्यवस्थेत लोकांना अधिकात अधिक भाग घेणे शक्य व्हावे, यासाठी राजकीय आणि औद्योगिक गट लहान लहान असावेत. मोठ्या औद्योगिक व्यवसायात व्यावसायिक स्वराज्य राहून मजूर आणि मालक मिळून उत्पादन, विभाजन, आणि विनिमय समाजाच्या वतीने करतीलच, परंतु

हे लहान घटकही स्वायत्त, स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण असले पाहिजेत. १९४१ मध्ये गांधीजींनी असे लिहिले होते की, केन्द्रीकरण अहिंसक समाजरचनेशी विसंगत आहे.'' " भारताला अनेक बाबतीत विकेंद्रित व्यवस्था करावी लागेल तरच तेथील लोकशाही टिकेल, '' असेही गांधीजींना वाटत होते. अहिंसक संस्कृती स्वावलंबी व स्वाश्रयी खेड्यांवरच उभी राहते, असे सांगून गांधीजी म्हणतात की, " जुन्या काळातील भारतीय ग्राम-पंचायतीत माझ्या व्याख्येतील आणि कल्पनेतील अहिंसा जरी काम करीत नसली, तरी वरील संस्कृतीच्या जवळ जवळ जाऊ शकणारी अशी ती व्यवस्था होती आणि तीत अहिंसेचे बीज होते. '' या पंचायतीच्या हातात जुन्या काळात विकेंद्रित उद्योगही होते; पण त्यांची केन्द्राशी जुळलेली अशी सुसंबद्ध योजना नसल्यामुळे ते उद्योग आणि त्या पंचायतीही नाहीशा होऊ शकल्या. गांधीजींच्या सुसंबद्ध योजनेतील हे राजकीय, आर्थिक आणि औद्योगिक विकेंद्रीकरण एक सुसंबद्ध आणि सुसंवादी अशा योजनेचा भाग असल्यामुळे त्याचा पाया भक्कम आहे. लोकशाहीच्या हितकर स्वरूपासाठी त्याची अत्यंत आवश्यकता आहे. या स्वाश्रयी योजनांमुळे सरकारचा कमीत कमी दखल गावाच्या योजनेत येतो. आणि " जे सरकार आपले काम लोकांच्या कार्यात अधिक हस्तक्षेप न करता घर्षणाविना परिणामकारक रीत्या करते, तेच खरे लोकाशाही सरकार ठरते,'' हे गांधीजींचे म्हणणे सार्थ ठरू शकते. गावात लोकशाहीचा पाया भरभक्कम होईल आणि सरकार " लोकांच्या सद्‌भावनांवर आधारलेल्या आपल्या नैतिक अधिकारानेच लोकांची व्यवस्था करील. '' " या विना अन्य साधनांचा उपयोग करणे योजना-दारिद्र्याचे लक्षण आहे. सर्वांना पायाभूत असलेल्या या घटकांत सर्व सत्ता स्थापून वरच्या घटकांना त्यांच्यातील काही अंश वेळोवेळी द्यावा. हे संघटनात्मक संघटन भौगोलिक निकटतेवर व भौतिक आवश्यकतांच्या पूर्तीवर अवलंबून राहील. या लहान घटकांत स्वार्थ-विरोधांचा निरास करून हितैक्याची सहयोजना उत्तम प्रकारे होऊ शकेल आणि ' पांचामुखी परमेश्वर ' हा न्यायही लागू करणे कठीण होणार नाही. माणसामाणसांत हितविरोध असतो असे मानून केवळ बहुमतावर राज्य चालविणे ही कृत्रिम लोकशाही आहे. हिला चालविण्यासाठी गुंतागुंतीची न्याय-व्यवस्था आणि दंडविधान इत्यादींचे एक मोठेच जाळे रचावे लागत असते. ग्रामपंचायतीच्या या विकेन्द्रित अर्थरचनेत न्याय सुद्धा फार सोपा, सरळ आणि विनखर्चाचा होणार आहे; इतकेच नव्हे तर इतर न्याय-व्यवस्थेला त्यापासून बोध घेता येईल, असे तिचे कामकाज असेल. या स्वाश्रयी व स्व-शासित खेड्यांची आपसात संबद्धता व सुसंवाद कसा असेल, याबाबत गांधीजींनी आपली योजना खालीलप्रमाणे मांडली आहे.

" असंख्य खेड्यांनी संयुक्त अशा या रचनेत निरंतर प्रसरण पावणारी वर्तुळे असतील. ती एकावेर एक रचलेली नसतील. जीवन पिरॅमिडसारखे, शिखराचा भार

पायावर, हे असल्यासारखे नसेल. ते एक सामुद्री वर्तुळाप्रमाणे असेल आणि त्याचा केन्द्रबिंदू व्यक्ती असेल. ज्याप्रमाणे सरोवरात दगड मारल्यावर प्रथम एक खळगा पडतो, मग क्रमश: एकानंतर एक वर्तुळाकार लाटा उठतात आणि शेवटी सारे सरोवर तरंगित होते, त्याप्रमाणे व्यक्ती ही नेहमी गावात विलीन होण्याला तयार असेल आणि गाव दुसऱ्या ग्राममंडळात. जोवर व्यक्तींनी निर्मिलेल्या जीवनात सर्व सृष्टी भरून जात नाही, तोवर हे चालणार. या व्यक्ती आक्रमणकारी नसतील, उलट ज्या गावाच्या त्या अविभाज्य घटक आहेत आणि जी असंख्य गावे सामुद्री वर्तुळा-प्रमाणे फैलली आहेत. त्यांच्या समृद्धीचा आणि गौरवाचा अत्यंत नम्रतेने परस्पर मिळूनमिसळून त्या लाभ घेतील.''सत्तेच्या विकेन्द्रीकरणाची खालपासून वरपर्यंत एक संपूर्ण योजना गांधीजींनी बनविली आहे. गावातून जिल्हा, जिल्ह्यातून प्रांत आणि प्रांतातून देश यांची व्यवस्था मंडळे, कायदे मंडळे कशी निवडून दिली जावीत, याची सविस्तर योजना मांडलेली आहे. संसदीय राज्यपद्धतीला गांधीजी अनुकूल होते, पण भारतीय परिस्थितीनुसार अनुभवाने तिच्यात बदल करणे जरूर होईल,असे त्यांना वाटे.

**सत्याग्रहशक्तीची जोपासना**

या योजनेचा मुख्य फायदा हा आहे की, सत्याग्रहशक्तीच्या जोपासनेला ही योजना अत्यंत उपयुक्त आहे. केवळ "संसदीय पद्धतीने राजवटीत क्रांती घडून येत नसते. त्यासाठी रचनात्मक कार्याच्या शक्तीने कधी शोधनात्मक तरी कधी असहकार व प्रतिकार या रूपाने तो पालट करणे'' या विकेन्द्रित योजनेमुळे शक्य होते. जीवनाच्या साऱ्या प्राथमिक गरजांत हे घटक स्वायत्त असल्यामुळे केन्द्रीय सरकारशी विरोध आला तरी ते तग धरू शकतात. मागे दुसऱ्या युद्धापूर्वी एकदा रशियामध्ये एका जिल्ह्याने केन्द्रीय सरकारची योजना नाकारली. केन्द्रीय सरकार-मार्फत या जिल्ह्यात गहू जात असे. गोळ्या घालून त्या जिल्ह्यातील लोकांना जेरीस आणण्याऐवजी रशियन केन्द्रीय सरकारने त्या जिल्ह्याचा गहूं बंद केला आणि त्या जिल्ह्यास शरण आणले ! !

सरकारला, तें चुकत असेल तर सुधारणे, त्यावर आपला प्रभाव राखणे, जरूर तेव्हा त्याच्या रचनेत फरक करणे, हे जनतेचे मूलभूत हक्क जर कायम राहावयाचे असतील, तर लोकशाही राष्ट्राची रचना स्वायत्त आणि स्वाश्रयी अशा लहान घटकां-वरच उभारावयाला हवी. या लहान घटकांत माणसांचा परिचय वाढतो. भ्रातृ-भावाची वास्तव जोपासना होऊन ती वाढीला लागते व व्यक्ती एकमेकांच्या जीवनात मिसळून जाण्याचा प्रयत्न करून परस्परांना जबाबदार राहतात.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, शांतता आणि जबाबदारी यांनी युक्त अशी ही लोकशाहीची कल्पना गांधीजींच्या वेळोवेळी प्रकट झालेल्या विचारांतून आकार घेऊ शकते.

२८

# सर्वांगीण क्रांतीचे अग्रदूत

नरेन्द्र तिडके

गांधीजींच्या सर्व कार्यांचा मानबिंदू 'मानव' हा होता. त्यातही जो दलित–क्षुधित, रंजला–गांजलेला मानव असेल, त्याची भौतिक व नैतिक उन्नती करण्याकडे गांधीजी कसे लक्ष पुरवीत, याचे विवेचन पुढील लेखात केलेले आहे.

महात्मा गांधी एक क्रांतिकारक व्यक्तित्व होते. युगायुगातून समष्टीच्या कल्याणासाठी कधीतरी अवतीर्ण होणाऱ्या थोर संतांपैकी ते एक होते. गांधीजींच्या जीवनाचे विविध पैलू आहेत. जीवनाचे असे कोणतेही दालन नाही की, ज्याचा त्यांनी विचार केला नव्हता. आरोग्यापासून तर देशाच्या भाग्योदयापर्यंत सर्वच गोष्टींचा त्यांनी साकल्याने विचार केला. नुसता विचारच केला नाही तर, त्यासंबंधी चिंतन करून त्यातून अनुभवास आलेली सूत्रे त्यांनी प्रयोगासाठी जगासमोर ठेवली आणि प्रत्येक समस्या आपल्या परीने सोडविण्याचा प्रयत्न केला. अशा व्यक्तिमत्त्वाला क्रांतिकारक व्यक्तिमत्त्व म्हणावे लागेल. क्रांतीमध्ये केवळ जुन्यांचा नायनाट अपेक्षित नसतो, तर नव-निर्मितीही हवी असते. जीर्ण आणि गतार्थ गोष्टी, मग त्या जीवनाशी कितीही निगडित असोत, परंपरेने मान्य केलेल्या असोत किंवा रूढींनी जपलेल्या असोत, नष्ट करायच्या आणि नव्या व अपरिचित गोष्टींची उभारणी करायची, हे क्रांतीचे स्वरूप असते. या

दृष्टीने गांधीजींनी केलेले कार्य मौलिक व क्रांतिकारक ठरते.

१९२० साली देशाच्या सार्वजनिक जीवनात त्यांचा उदय झाला आणि पाहता पाहता त्यांच्या दीप्तीने सारे प्रभावित झाले. देशात सुरू असलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाचे ते सेनानी बनले. स्वातंत्र्याची चळवळ त्यांनी अधिक प्रभावी केली. सत्याग्रहाचे व असहकाराचे अभिनव तंत्र स्वीकारून चळवळीचे लोण खेड्यापाड्यापर्यंत त्यांनी नेले. जनजागृतीचा प्रचंड कार्यक्रम हाती घेऊन स्वातंत्र्याची चळवळ अधिक व्यापक व विशाल केली. गांधीजींची क्रांतिकारी शिकवण केवळ एकाच काळासाठी किंवा केवळ भारतीयांसाठी नव्हती. त्यांची शिकवण सर्वकालीन मानवजातीसाठी आहे. गांधीजींनी भारतात कार्य सुरू केले त्या वेळी गुलामगिरीची चीड असलेले भारतीय प्रामुख्येकरून दहशतवाद, क्रांतिकारी मार्गाचा अवलंब करीत होते. परंतु गांधीजींनी आपणाला धैर्याची, स्वाभिमानाची शिकवण दिली. सत्याग्रहाचे अभिनव तंत्र शोधून राजकीय व सामाजिक जागृतीची ज्योत खरोखर प्रज्वलित केली. प्रत्येक खेडेगाव, तालुका यात प्रतिगांधी निर्माण केले. गरीब, सामान्य माणूस गांधीजींना देव मानू लागला. खरोखरच गांधीजींनी मातीतून माणसे निर्माण केली.

पण केवळ स्वातंत्र्याचे आंदोलन चालविण्याइतके त्यांचे व्यक्तिमत्त्व एकांगी नव्हते. स्वातंत्र्याची चळवळ चालवीत असताना देशाला त्यांनी एक व्यापक रचनात्मक कार्यक्रम दिला. स्वातंत्र्यासाठी लोकांना त्याग करण्याचे आवाहन करीत असताना त्यांना उदारनिर्वाहकरिता किमान त्यांची रोजी निघावी म्हणून चरखा व ग्रामोद्योगाची जोड दिली. खेड्यापाड्यात स्वातंत्र्याची चळवळ पोचावी व पर्यायाने स्वावलंबनाचा संदेश त्यांना मिळावा, हे तत्त्व त्यात अनुस्यूत होते. स्वातंत्र्यसंपादन हे त्यांच्या शिकवणीचे बाह्यरूप होते. भारतीयांत नैतिक धैर्य निर्माण करून भारतीयांचे जीवन संपन्न करण्याचा त्यांचा हेतू होता. सर्वोदय म्हणजे सर्वांचे जास्तीत जास्त चांगले करणारी समाजव्यवस्था त्यांना अभिप्रेत होती. प्रत्येक व्यक्तीला समान दर्जा व विकासाची समान संधी मिळावी, असे त्यांचे स्वप्न होते. सामाजिक न्याय व आर्थिक समृद्धी एकाच वेळी प्रत्यक्षात आणणारा समाज त्यांना उभारावयाचा होता.

गांधीजींच्या विचाराचा आणि आचाराचा केंद्रबिंदू किंवा पायाच सामान्य माणूस होता. उपेक्षित, रंजलेला-गांजलेला अशा माणसाचा त्यांनी विचार केला. त्यांचे सर्वांगीण उत्थान कसे घडवून आणता येईल, हाच त्यांचा ध्यास होता. सर्व प्रकारच्या सोयी व सवलतींपासून वंचित असलेला किंवहुना समाजाने बहिष्कृत केलेला हरिजन-गिरीजन यांचा वर्ग पुढे कसा येईल, ही त्यांना तळमळ होती. "अस्पृश्यता हिंदू धर्मावरील कलंक आहे," ही गोष्ट त्यांनी स्पष्टपणे मांडली व तो कलंक धुवून काढण्याचे आटोकाट प्रयत्न आयुष्यभर केले. ते म्हणत की, प्रत्येक सवर्ण हिंदूने हरिजनांचे दुःख हे आपले दुःख आहे, असे समजून त्यांच्याशी मैत्री केली पाहिजे.

स्वराज्याची इमारत स्थापण्याच्या महान कार्याचा तो एक भाग आहे.

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात अवतीर्ण होणाऱ्या सामाजिक लोकशाहीची सारी बीजे गांधीजींनी स्वीकारलेल्या व चालविलेल्या हरिजन-गिरिजनोद्धाराच्या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत. समाजातील अगदी खालचा, शेवटचा माणूस वर कसा येईल, याची त्यांना चिंता होती. म्हणून सामान्य माणसाला समजेल, झेपेल, पचेल आणि तो चालवू शकेल, असेच कार्यक्रम त्यांनी आखले. महारोग्याच्या सेवेपासून तर भंगीमुक्तीपर्यंतच्या सर्व चळवळी त्यांनी पुरस्कारिल्या व चालविल्या. हा महामानव अत्यंत सामान्य मनुष्याच्या सुखासाठी जगाला व अमर झाला. "मानवापुढील अवघड प्रश्न सोडविण्यासाठी गांधी-विचारच सर्वोत्तम !" असे श्रीमती कोरेटा किंग म्हणाल्या, ते का उगीचच !

गांधीजींची क्रांती अहिंसात्मक व शांततेवर आधारलेली होती. त्यात हृदयपरिवर्तनाला महत्त्व होते. परकीय राज्यकर्त्यांचे हृदयपरिवर्तन त्यांना अपेक्षित नव्हते, तर वहुसंख्य समाजाकडे पाठ करून बसलेल्या मूठभर कर्मठ लोकांचे हृदयपरिवर्तन करून खऱ्याखुऱ्या सामाजिक लोकशाहीचा त्यांना पाया घालावयाचा होता. समाजात बद्धमूल असलेल्या वाईट व दुष्ट रूढी केवळ कायद्याने नष्ट होणार नाहीत, हे ते बोलून दाखवीत. स्वातंत्र्योत्तर काळात या दुष्ट रूढी नष्ट करण्यासाठी कायदे होतील हे त्यांना माहीत होते.पणकेवळ कायद्याच्या आधारे हे साध्य होणार नाही म्हणून हृदयपरिवर्तनाचा मार्ग त्यांनी स्वीकारला. आत्मक्लेशाने परपीडा सुखी लोकांना कळावी, हा त्यांचा वाणा होता. "वैष्णव जन तो तेणे कहिये, जो पीड परायी जाणे रे" हे त्यांचे आवडते भजन होते. समाजातील मूठभर सुखी लोकांनी असंख्य व अमर्याद दुःखी आणि वंचित लोकांना जवळ करावे, ही त्यांची धडपड होती. त्यासाठी त्यांनी आयुष्याचा क्षण अन् क्षण आणि रक्ताचा थेंब अन् थेंब वेचला. एवढेच नव्हे, तर शेवटी त्यासाठी आत्मबलिदानही केले.

सामाजिक क्रांती कायद्याने होत नाही. लोकांचे हृदयपरिवर्तन होऊन त्यांनी ती स्वेच्छेने स्वीकारली पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष होता. असे झाले नाही तर स्वातंत्र्याची फळे लोकांना मिळणार नाहीत, याची त्यांना जाणीव होती. स्वराज्याचे सुराज्य होण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची गरज व आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली.

नवीन समाजरचनेचे त्यांचे चित्र सुस्पष्ट व सर्वस्पर्शी होते. त्यांना वर्गविहीन आणि जातिविहीन अशी समाजरचना हवी होती. जातिभेद, धर्मभेद व वर्गभेद, भाषाभेद, प्रांतभेद आदी भेदाभेदांनी पोखरलेला व खिळखिळा झालेला समाज त्यांना एकात्म करायचा होता. त्यासाठी समभाव जागवण्याचा प्रयत्न केला. हजारो वर्षांपासून केवळ रूढींनी अस्तित्वात असलेल्या भेदमूलक गोष्टी नष्ट करण्याचा त्यांना ध्यास होता.

गांधीजींनी ग्रामीण जीवनाचे पुनरुत्थापन करण्यावर भर दिला होता. लक्षावधी खेड्यांवर भारताची अर्थव्यवस्था अवलंबून आहे, हे त्यांनी ओळखले होते. परंतु गेली कित्येक शतके गावांकडे दुर्लक्ष झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रवाह कुंठित झाला होता. गावांचा, पर्यायाने देशाचा विकास खुंटला होता. जमिनीचा कस दिवसेंदिवस कमी होत चालला होता व त्यामुळे शेतकरी दारिद्र्यात पिचत होता. स्वयंपूर्ण ग्राम ही ऐतिहासिक गोष्ट बनली होती. शेतकरी-गावकरी सामाजिक व आर्थिक ओझ्याखाली चिरडले जात होते. सर्व गावांवर उदासीनतेची अवकळा पसरली होती. या सर्व परिस्थितीवर गांधीजींनी एकच मंत्र दिला होता. तो म्हणजे "गावाकडे परत चला !" गाव स्वयंपूर्ण व्हावे व त्याने आपले शिलकी उत्पादन समाजाला द्यावे, अशी त्यांची कल्पना होती. स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था, स्वावलंबी ग्रामीण समाज हेच त्यांचे ध्येय होते. एवढेच नव्हे तर, ते स्वत: ग्रामीण जीवनाशी समरस होऊन अशी अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत होते. "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले" अशा साधुसंतांपैकी ते एक होते. ते स्वत: फक्त पंचा घालीत, स्वत:ला दरिद्रीनारायण म्हणवीत. झोपडीत राहात व ते राहात असलेले सेवाग्राम तर आदर्श स्वावलंबी ग्राम बनले होते.

स्वतंत्र भारतात आपण कृषि-औद्योगिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याचे व विकेंद्रित लोकशाही उभारण्याचे ध्येय उराशी बाळगले आहे व यामागची प्रेरणा गांधीजींचीच आहे. स्वयंपूर्ण स्वावलंबी कृषि-अर्थव्यवस्था उभारून देशाचे औद्योगिकीकरण करणे हाच आपला हेतू आहे. ग्रामपंचायतीकडे आपण गावाचा कारभार सोपविला आहे. सामूहिक विकासकार्यात लोकांनी स्वखुषीने भाग घ्यावा म्हणून त्यांना संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. स्थानिक जनतेने स्वत:च्या पायावर उभे राहून नवभारताची उभारणी करावी, हाच आपला उद्देश आहे.

भांडवलदारांकडून श्रमिकांची, कामगारांची जी पिळवणूक होत असते. तिचा गांधीजींनी उघडपणे अनेक वेळा धिक्कार केला. सामान्य जनतेने, कामगारांनी ह्या पिळवणुकीविरुद्ध अहिंसक लढा द्यावा, सत्याग्रह करावा, असा त्यांचा आग्रह असे. परकीय सत्तेचे आव्हान ज्या रीतीने त्यांनी स्वीकारले, त्याच पद्धतीने वर्गविग्रहाचा लढा लढावा, असे त्यांचे मत होते. ह्या भूमिकांमागे मानवी व्यक्तीची प्रतिष्ठा राखणे हाच एकमेव उद्देश होता. व्यक्तीचा अनादर म्हणजे प्रत्यक्ष सत्याचा, परमेश्वराचा धिक्कार असे ते मानीत. मानवी प्रतिष्ठेला धक्का बसतो, माणुसकीची प्रतिमा डागळते, म्हणूनच त्यांचा परकीय राजसत्तेला, तसेच सामाजिक, धार्मिक व आर्थिक विषमतेला विरोध होता. ह्या मानवतावादी दृष्टिकोनातूनच गांधीजी प्रत्येक प्रश्नाकडे पाहात. मानवी व्यक्तीची किंमत कमी करणे, व्यक्तीच्या इच्छाशक्तीवर बंधन घालणे म्हणजे हिंसा, असे ते प्रतिपादन करीत आणि अशा हिंसेचा सर्व शक्तीनिशी

प्रतिकार करण्यास ते स्वतःला धन्य मानीत. त्यांची अहिंसा, सत्याग्रह संधिसाधू कावेबाजांचा नव्हता व त्यातून स्फुरण पावलेले सत्याग्रहाचे क्रांतिकारक तत्त्वज्ञान म्हणजे मानवतावादाचे सार होते. म्हणूनच त्यांच्या क्रांतिकारी नेतृत्वाने मातीतून माणसे निर्माण केली व त्यांचे नाव महा-मानवांच्या मालिकेत अमर झाले.

गांधी जन्मशताब्दी वर्षात गांधीजींचे पुण्यस्मरण करायचे ते त्यांचा हा संदेश मनावर बिंबवून घेण्यासाठी आणि त्याप्रमाणे आचरण करण्यासाठी. आज वयात आलेल्या पिढीने गांधीजींना पाहिले नाही. त्यांची अमृतमय, उद्धारक व प्रेरक वाणी त्यांनी ऐकली नाही. त्यांचे विचार आणि आचार ह्यांच्याशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आलेला नाही. अशा नव्या म्हणजे उदयोन्मुख पिढीला गांधीजी समजले पाहिजेत. उमजले पाहिजेत. त्यासाठी गांधी जन्मशताब्दीमध्ये युवकांनी गांधीजींचे जीवन आणि कार्य समजावून घेतले पाहिजे.

आज गांधीजींचा संदेश शहरात व खेडयापाडयांत तरुण पिढीपर्यंत पोहोचविला जाणे जरूर आहे. सार्वजनिक जीवनाची निकोप आचारसंहिता तयार करीत असताना जगातील सर्व लोकशाही देशांना महात्माजींचीच शिकवण स्फूर्ती व सामर्थ्य देईल, असा विश्वास वाटतो. त्यांच्या मार्गावर पावले टाकल्यानेच आपल्याला हवा असलेला, नैतिक पायावर आधारित असा, समाजवादी समाज निर्माण करता येईल. म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात गांधीजींच्या पश्चात उदयास आलेल्या पिढीला 'गांधीजी' सांगण्याचा प्रयत्न झाला, तरी जन्मशताब्दीत महत्त्वाचे कार्य केल्याचे श्रेय आपणास मिळेल.

२९

# अहिंसा व लोकशाहीचीं मूल्यें

प्रा. डॉ. इंदु टिकेकर

अहिंसेचा स्पर्श संघर्षाची आग विझवू शकतो आणि जीवनात मांगल्य आणू शकतो. गांधीजींनी जीवनव्यापी मूल्याची प्रतिष्ठा वाढविली व लोकशाही राष्ट्रांपुढे एक नवाच आदर्श उभा केला.

कोणताही गहन विचार, कसलेही तत्त्वज्ञान यांचा ऊहापोह न करताही एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट दिसते. भीती, साशंकता यांना दूर सारून माणूस मोकळा, निर्भय होऊन जगू इच्छितो. गैरसमजांनी तो अस्वस्थ होतो, शत्रुत्व नाहीसे करू पाहतो. जबरदस्तीचा त्याला मूलतः तिटकारा वाटतो. ही स्वातंत्र्याची ऊर्मी, हा जीवनाचा मूलस्रोत.

पण माणूस समाज करून राहणारा प्राणी आहे. परस्परांच्या संबंधातून मानवी जीवन वाटचाल करीत राहते. या संबंधामुळेच माणूस म्हणून व्यक्ती जगू शकते. स्वातंत्र्याच्या मूलस्रोताबरोबरच परिस्थितीचे सम्यक आकलन घडविणारी बुद्धी हे माणसाचे खास वैशिष्टच. म्हणून परस्परांची सोय, सर्वांची मिळून व्यवस्था व प्रत्येकाच्या विकासासाठी शक्य तितका मोकळेपणा या विवेकनिष्ठ मार्गाचा आदर्श समाजमान्य होऊ शकला.

स्वातंत्र्याची ओढ व परिस्थितीची समज या दोन सहज शक्ती प्रबल होत्या,

म्हणून रानटी अवस्थेतून, जंगली कायद्याच्या कचाटयातून आणि युद्धांच्या आपत्तीतून वाट काढीत मानवजात आजवर तगून राहू शकली आहे. कधी अपयश आले, कधी उपकारकर्त्या मार्गदर्शकाचेच रक्त सांडले, तर कधी उंच झेप घेतानाच पाय पांगुळले; पण धडपड अविरत चालूच आहे. या धडपडीचे प्रत्यंतर लोकशाही राजवटीच्या अभिव्यक्तीतून येत असते. सर्व मानवी समाजाला विकासासाठी निर्वेधता लाभावी, तृप्तीचे– शांतीचे दिवस लाभावेत, ही सुजाण मनुष्याची आकांक्षा आहे. न्यायासनासमोरील समानता; अल्पसंख्यांकांच्या अधिकाराची जपणूक; विचार' उच्चार व आचारांच्या वेगळेपणाला प्रतिष्ठा, या सर्वातून मनुष्याच्या व्यक्तित्वाच्या सन्मानाची भावनाच व्यक्त होते. इतरांच्या हिताला अविरोध असेल व सर्वांचे मिळून हित साधण्याला वाव असेल, तर व्यक्ती स्वतंत्रपणे जगू शकते.

मूलभूत प्रवृत्ती जीवनव्यापी असतात. म्हणून मानवी मूल्यांच्या आधारावर केवळ राजकीय व्यवस्था आकारावी, इतकेच म्हणून भागत नाही. जीवनाचे तुकडे पडले, सोयीसाठी केलेल्या तात्पुरत्या विभागणीलाच चुनेबंद स्वरूप आले की मानवी जीवनाला तडे जातात, व्यक्तिच्या व्यक्तित्वाची चिरफाड होते. समूहासमूहांची हिते, व्यक्तीव्यक्तींची सुखे परस्पर - विरोधात उभी ठाकतात. आपलीच शेपूट पकडू पाहणाऱ्या मांजराच्या पिलाप्रमाणे माणूस चक्रावून जातो. भलत्याच मार्गाने समग्रतेचा आभास तो निर्माण होऊ देतो. आत्मविस्मृतीलाच सुखानंद समजू लागतो. पण ही विकृती आहे, हे कळायला वेळ लागत नाही. समाजाला ग्रासणारे हे ग्रहण ठरते.

म्हणून जीवनव्यापी समग्र मूल्यप्रतिष्ठा स्वीकारणे अपरिहार्य होते. लोकशाहीची पायाभूत दोन मूल्ये–स्वातंत्र्य व समता-यांना व्यापकतेचा स्पर्श देणारे (जीवन पोषक व जीवन संवर्धक) मूल्य जोडून देणे आवश्यक आहे. ऑक्सिजनचा एक कण हैड्रोजनच्या दोन कणांशी जोडून दिला की पाणी जन्माला येते. अहिंसेचे मूल्य प्राणवायूप्रमाणे जीवनदायी ठरते. लोकशाही राज्यव्यवस्था काही देशांतून मान्य असूनही तेथील संघर्षाची आग विझत नाही. समाजहिताच्या अखंडत्वाची साधना शिकविणाऱ्या अहिंसेला ही शांती आणता येईल.

धर्म, जाती, वंश यांतील भेद समाजमान्य आहेत, तोवर बहुसंख्य व अल्पसंख्य यांच्या परस्पर-संबंधात संघर्ष पेटत राहणार. वेगळेपणा रक्ताच्या आधाराने पोसला गेला की हितविरोधांना मुक्तद्वार राहते. राजकीय लोकशाहीने विचार-उच्चार-आचारांचे स्वातंत्र्य मान्य केले खरे, पण रक्ताधिष्ठित भेदभाव पुसणे, साऱ्या समाजाला हितविरोधांच्या खोल पाण्यातून वर काढणे, राज्यव्यवस्थेला शक्य झाले नाही. आधुनिक काळात राज्य जीवनाचा बहुतांश व्यापून आहे, पण राज्याचे व्यक्तीशी नाते असते ते तिच्या बाह्य वर्तनापुरते मर्यादित असते. वर्तनाचा स्रोत आनतू

वाहतो. या अंतस्तलाला स्पर्श करणारे जीवनाचे एकात्म स्वरूप प्रत्ययाला आणून देणारे प्रेमतत्त्व हे अहिंसेचे भावतत्त्व आहे. समजुतीला खरीखुरी जाग आणण्याचे कार्य हेच भावतत्त्व करू शकते.

पण बहुसंख्य व अल्पसंख्य यांतील विरोध वेगळ्या स्वरूपात प्रकट झाले तर ? व्यक्तीव्यक्तींच्या कुवतीत फरक राहील तोवर श्रीमंती व गरिबी, तज्ज्ञता व अज्ञता, एका मर्यादेत का होईना, वास्तविक आणि नैसर्गिक आहेत. यातून निर्माण होणारे संघर्ष टाळता येणे, नाहीसे करणे शक्य असले तरी इष्ट आहे काय ? अहिंसा आंतरिक एकतेला उजेडात आणून व्यवहारातील विभिन्नतेला कटु विरोधात परिणत होऊ देत नाही. विभिन्नता परस्पर पूरक ठरण्यासाठी जिव्हाळा निर्माण करणारे किमयेचे तत्त्व म्हणजे अहिंसा. श्रीमंतीचे व तज्ज्ञतेचे फलित समाजार्पण करीत, व्यक्तीच्या मूलभूत समान-मूल्याचे अधिष्ठान राजकीय क्षेत्रातील मर्यादांतून मुक्त करून सर्वच क्षेत्रात मान्य करविणे हा उपाय अहिंसा सुचविते. आर्थिक क्षेत्रातील आज मान्य असलेल्या तत्त्वात यामुळे क्रान्ती होईल, लोकशाहीचा पाया रुंदावेल, सखोल होईल.

आजच्या सुधारलेल्या समाजातील आर्थिक जीवनाची घडी अशी बसली आहे की, माणूस शरीराने तृप्त असूनही पूर्ण व्यक्तित्वाचा विकास व समाधान त्याला साधत नाही. समाजाच्या ढिगाऱ्यातील वाळूचे कण म्हणजे व्यक्ती. बुद्धी आकसलेली व वृत्ती बेफिकिरीने मिटलेली राहिल्याने मन अतृप्तच असते. हृदयाच्या ओलाव्याला आधुनिक मनुष्य पारखा होत आहे. माणसाला माणसाच्या जवळ आणण्याची प्रक्रिया कोणत्या ना कोणत्या रूपात, आर्थिक दृष्ट्या विकसित समाजात, सुरू व्हायला हवी. नव्याने विकसित होणाऱ्या समाजात परस्पर-संबंधांना अशी काजळी धरू नये, हा प्रयत्न प्रथमपासून करता येणे शक्य असते. व्यक्तीव्यक्तींना परस्परांबद्दल जिव्हाळा वाटेल, अशी सोयीस्कर अर्थव्यवस्थेची घडी बसविणे अशक्य असू नये. मनुष्याला मनाने तृप्त करण्याचे उद्दिष्ट गाठायचे, तर अहिंसेचे मूल्य स्वीकारावे लागेल.

अल्पसंख्य-बहुसंख्य यांचे संघर्ष सर्व क्षेत्रांतून नाहीसे करणे म्हणजे विचारभेद नष्ट करणे नव्हे. समाज-जीवन निर्वेध चालावे यासाठी योग्य पथ्ये प्रत्यक्षात पाळली गेली, तर विचारभेद विकासाचाच मार्ग अधिक निष्कंटक करू शकतील. मग ‘वादेवादे’ ‘तत्त्वबोध’ व्हायला काहीच हरकत असू नये. हा भेद कलात्मक आविष्कारात, सांस्कृतिक जीवनाच्या विविधतेत सौंदर्य निर्मीत राहील; सामाजिक, आर्थिक क्षेत्रात प्रायोगिक स्तरावरही त्याचे मूल्य राहील. भिन्नता म्हणजे हितविरोध नव्हेत, ही जाणीव सर्वच बाबतीत अहिंसेला निर्मिता येते.

कोणतेही जीवनव्यापी मूल्य भूगोलाचे बंधन मानीत नाही; राजकीय-सांस्कृतिक सीमाही त्याला टोचत राहतात. लोकशाहीच्या मूल्यात अहिंसा एकरूप झाली की राष्ट्राच्या सीमा अर्थहीन ठरून आक्रमणांच्या अट्टाहासाने त्या पुसण्याचा आग्रह

विरून जातो. आर्थिक-सामाजिक-सांस्कृतिक जवळिकीच्या नव्या जगात राष्ट्रे परस्परांकडे, आक्रमणाच्या उद्देशाने नव्हे, बरोबरीच्या– मित्रत्वाच्या नात्याने पाहतील, तरच मानवी समाजाला एकात्मतेचे बळ व सौंदर्य लाभेल. असे घडल्या-खेरीज व्यक्ती सन्मानित रहाणार नाही व जीवनाचा मूलस्रोत संरक्षित राहणार नाही.

अहिंसा हे जीवनाचे रसतत्त्व आहे. अहिंसेचा स्पर्श जीवनातील मांगल्य विकसित करतो. तिच्या छटा अनंत आहेत. व्यक्ति-व्यक्ती व व्यक्ति-समाज यांच्या अनेकविध संबंधात त्या छटा खुलून आल्या, तर मानवी जीवन आनंदाचे निधान बनू शकेल. दुष्टता, क्षुद्रता, कटुता यांना मानवी संबंधातून दूर करण्यासाठी अहिंसेचे मूल्य कृतिशील असायला हवे. हेच प्रयोग या देशात महात्माजींनी अविरतपणे केले. परस्पर-अविश्वासाच्या वातावरणात सारेच अस्वस्थ असतात. अहिंसा म्हणजे विश्वास. विश्वासाच्या पाऊलवाटेने आजही नव्या प्रयोगांचे शोधन चालू आहे–येथे, इतरत्रही वैचारिक गोंधळाच्या, पूर्वइतिहासाच्या ओझ्याखाली, या प्रयोगांचे महत्त्व आज कमी भासत असेल, पण उद्याच्या युगाचे आश्वासन यातूनच आकारले जात आहे.

३०

# सत्याग्रह -सामान्यांचे प्रभावी अस्त्र

द. का. कुंटे

दलित पण दुर्बल समाजाला आपल्यावरील अन्यायाचे निवारण करण्यासाठी गांधीजींनी एक शस्त्र दिले – ते म्हणजे, सत्याग्रह. या शस्त्राचा प्रयोग गांधीजींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेत केला आणि नंतर भारतात ब्रिटिश साम्राज्यशाहीशी लढा देण्यासाठी. या सत्याग्रह शास्त्राची मीमांसा पुढील लेखात केली आहे.

चालू शतकातील एक अग्रगण्य विभूती म्हणून गांधीजींना आज जग मानीत असले, तरी त्यांच्या जीवनातील विविध टप्प्यांकडे पाहिले, त्यांतील तपशिलात शिरले म्हणजे ध्यानात येते की, अगदी सामान्यातून असामान्यत्वाची सोपानपरंपरा चढून जाण्याची अपूर्व किमया त्यांनी करून दाखविली. या किमयेने मन एका बाजूस थक्क होते, तर दुसऱ्या बाजूला एका निराळाच दिलासा मनास चाटून जातो की, गांधीजींचे जीवन म्हणजे सामान्यातून असामान्यत्वाकडे जाण्याचा एक वस्तुपाठच होय. काही एक शिस्त जीवनाला लावून घेतली, कोणत्या मुक्कामाच्या दिशेने पावले टाकावयाची ते निश्चित केले, की वैयक्तिक जीवनाची उंची गाठता येईल आणि सगळ्या समष्टिजीवनाला गवसणी घालण्याचा आवाका येऊ शकेल, असे सामान्य, नगण्य माणसालाही वाटू लागावे, असे गांधीजींचे जीवन होते.

गांधीजींचे सुरवातीचे आयुष्य पाहिले असता पुढील कालात जो मोठेपणा

त्यांनी सहजगत्या मिळविला, त्याची सूक्ष्म चिन्हेही आढळत नाहीत. सौराष्ट्रातील एका छोटयाशा संस्थानाच्या माजी दिवाणाच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांची बुद्धिमत्ता अफाट नव्हती. विद्यार्थीदशेत त्यांनी कधी विशेष चमक दाखविली नाही. शरीरप्रकृतीही यथातथाच, किंबहुना दुबळीच. बॅरिस्टर होऊन आल्या-नंतरही मुंबई हायकोर्टात पहिल्याच केसमध्ये आपण माघार घेतल्याचेही त्यांनी स्वत: लिहिले आहे. म्हणजे वकिलीच्या व्यवसायाला सुरवात केल्यावरही विशेष काही धडाडी त्यांनी दाखविली नाही. आफ्रिकेत जाईपर्यन्तचे गांधीजींचे प्रारंभीचे जीवन हे असेच सामान्य होते. पण त्यांनी पुढे जी उंची गाठली ती लक्षात घेतली की साराच एक चमत्कार वाटू लागतो. त्यांच्या भावी थोरवीची कोणतीही बीजे पहिल्या आयुष्यात कधीच दृष्टीस पडली नसताना त्यांनी एवढा मोठा पल्ला गाठला की. जगातील शास्त्रज्ञ आणि बुद्धिमंतही स्तिमित होऊन गेले. सामान्य माणूस तर हे पाहून चक्रावून जातो व हा सारा चमत्कार कसा झाला, याचा अचंबा करू लागतो.

गांधीजींच्या जीवनातील या कोडयाचे रहस्य शोधून काढणे ही बाब सोपी नाही. परंतु त्या दृष्टीने प्रयत्न करणे मात्र जरूर आहे. गांधीजींचा सत्याचा आग्रह म्हणजेच स्वत:शी प्रतारणा न करण्याचा, प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. सौराष्ट्रातील एका वैष्णव कुटुंबात जन्मलेला हा तरुण वयाच्या १८–१९ व्या वर्षी लंडनमध्ये बॅरिस्टरीच्या शिक्षणाकरिता गेला. एका सर्वस्वी नव्या उद्योग-व्यापार-विद्या-कला-समृद्धी या सर्व दृष्टींनी अग्रेसर असलेल्या आधुनिक जगात त्यांनी या वेळी प्रवेश केला. इंग्लंडमध्ये जाण्याची परवानगी आई-कडून मिळविण्याकरिता तिच्या तीन अटी त्यांना कबूल कराव्या लागल्या होत्या. संपूर्ण शाकाहारी राहीन, ही एक अट त्यात होती. आईनें घेतलेली अट इंग्लंडमध्ये गेल्यानंतर सहज विसरून जाणे शक्य असताही या प्रामाणिक तरुणाने ती तंतोतंत पाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला. लंडनमध्ये शाकाहारी भोजनालये त्या वेळी धुंडून काढावी लागत. त्याप्रमाणे त्याने पायपिटी करून ती शोधून काढली. पण गांधीजी एवढयावरच थांबले नाहीत. या विषयावरील जे वाङ्मय हाती आले ते सर्व त्यांनी वाचून काढले. लंडनमध्ये जे शाकाहारी होते त्यांनी शाकाहाराचा व्रतनियम म्हणून स्वीकार केलेला होता. गांधीजींवर या गोष्टीचा विशेष परिणाम झाला. आणि दिलेल्या शब्दांशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करीत असताना शाकाहार हाही त्यांनी आपल्या जीवननिष्ठेचा भाग बनविला. गांधीजी हे तत्त्वचिंतक विचारवंत होते, असे म्हणता येणार नाही. मात्र प्रश्न उभा राहिला, अडचण आली की, ती सोडविण्याचा प्रयत्न करताना त्याबाबत स्वतंत्रपणे विचार करावयाचा, अशी त्यांची रीत असल्याचे आढळते. यातूनच एक नवीन विचारसरणी प्रकट होत गेली. पण

त्यासाठी मुद्दाम हव्यास नव्हता. हव्यास असे तो फक्त जीवनाभिमुख राहून स्वतःशी प्रामाणिक राहावयाचे व अशा ठाम भूमिकेवरून जीवनाची वाटचाल निर्भयपणे करावयाची याचा.

लंडनमध्ये राहत असताना तेथील जीवनाशी समरस होण्याचाही त्यांनी प्रयत्न केला तो याच दृष्टिकोनातून. झुळझुळीत शोभेचा पोशाख तयार करवून नृत्यांचे धडेही त्यांनी गिरविले. परंतु हे त्यांच्या प्रकृतिधर्माला न पटणारे असल्याचे आढळल्यावर त्या साऱ्या जीवनाचा त्याग करण्याचे धैर्यही त्यांनी दाखविले. हाताने स्वयंपाक करावयास सुरवात करून त्यांनी साधी राहणी स्वीकारली.

याच काळात त्यांच्या जीवनावर विशेष परिणाम करणारे 'लाइट ऑफ् एशिया' हे बुद्धचरित्र, भगवद्गीता, बायबल इत्यादी ग्रंथ त्यांनी इंग्रजीतून वाचले. वैष्णव संस्कार यामुळे अधिक दृढ झाले. बायबलातील पर्वतावरील प्रवचनाचा त्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला. त्याचबरोबर लंडनसारख्या प्रगत व्यापारी व राजधानीच्या शहरात रहात असल्याने टापटीप, व्यवस्थितपणा, वक्तशीरपणा, स्वच्छता, आरोग्य, श्रमप्रतिष्ठा इत्यादींबाबत नवीन संस्कार त्यांनी संपादन केले. बॅरिस्टर होऊन परत येताना हेही भांडवल गांधीजींनी बरोबर आणले.

मुंबईत पहिल्याच खटल्यात अवाक् होऊन खाली बसण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. परंतु थोड्याच दिवसांनी योगायोगाने एका दाव्यात काम करण्याच्या निमित्ताने त्यांना दक्षिण आफ्रिकेत जाण्याची संधी मिळाली. दक्षिण आफ्रिकेच्या विकासात भारतीयांचाही मोठा वाटा असला, तरी तेथे काळागोरा भेद फार तीव्र स्वरूपात होता. भारतीयांना तेथे कुली (सामान्य, हलके काम करणारा मजूर) म्हणून संबोधण्यात येत असे. या वर्णविद्वेषाचा प्रसाद गांधीजींनाही लवकरच मिळाला. पाश्चात्य पोशाखातील हे बॅरिस्टरसाहेब पहिल्या वर्गातून प्रवास करीत असताना एका गोऱ्या सार्जंटाने त्यांचा बाडबिछाना गाडीमधून स्टेशनच्या फलाटा-वर फेकून दिला. याचा प्रतिकार कसा करावयाचा, असा प्रश्न साहजिकच त्यांच्या मनात उभा राहिला. इतर भारतीयानांही असे अनुभव आले असता ते असे सर्व प्रकार निमूटपणे सहन करीत असत. तसे न करता आपल्या स्वाभिमानाचे रक्षण करावयाचे, असा गांधीजींनी मनोमन निश्चय केला.

वर्णविद्वेषातील आणखी पाऊल म्हणून दक्षिण अफ्रिकन सरकारने भारतीयां-वर आणखी काही अपमानकारक निर्बंध लादण्याचा निर्णय जाहीर केला. हे निर्बंध विशेषतः सामान्य मजुरी करणाऱ्या भारतीयांना जास्त जाचक होणार होते. हे सर्व भारतीय सामान्यपणे कमी शिकलेले, गरीब, असंघटित होते. काय करावे याचा आपसात विचार चालला असता गांधीजींचा सल्ला दक्षिण अफ्रिकन भारतीयांनी विचारला. जे काही करावयाचे ते विचारपूर्वक ठरवावे आणि ते ठरविल्यानंतर

त्या प्रकारे निर्धारपूर्वक वागावे, असा सल्ला गांधीजींनी दिला. तो सल्ला भारतीयांनी मान्य केला, सरकारकडे निवेदने सादर करून, शिष्टमंडळे पाठवून भारतीयांचे म्हणणे मांडण्यात आले. परंतु काही दाद लागली नाही. तेव्हा गांधीजींनी ठामपणे उभे राहून एका अभिनव पद्धतीने प्रतिकार करण्याचे आपल्या मनाशी ठरविले व तसा सल्ला दिला. धीमेपणाने निर्बंधांचा भंग करण्याचे पाऊल टाकण्यात आले. निर्बंधभंगाबद्दल खटले भरण्यात आले, तेव्हा लोकांनी गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणे गुन्हा कबूल करून त्याबद्दलची शिक्षा आनंदाने स्वीकारली व तुरुंगवास पत्करला. हा काय प्रतिकार, याने काय होणार, असा प्रतिकाराचा अर्थात साहजिकच उपहास झाला. परंतु सत्याग्रही दमले नाहीत, निर्बंधभंग थांबला नाही. शेवटी दक्षिण आफ्रिकन सरकार आणि तुरुंग इत्यादी आत्मक्लेशही पत्करून सत्याचा आग्रह धरणारे सत्याग्रही यांच्यात तडजोड झाली. सत्याग्रह संपूर्ण शांततामय होता. इतकेच नव्हे तर मध्यंतरी दक्षिण अफ्रिकन सरकारचे झुलू लोकांशी युद्ध झाले तेव्हा सरकारला अडचणीत टाकू नये म्हणून सत्याग्रह स्थगित करण्यात आला व एक शुश्रूषापथक गांधीजींच्या नेतृत्वाखाली सरकारच्या मदतीला युद्धमैदानावर गेले. शत्रू, विरोधक, अन्याय करणारा यांच्याशी एक निराळ्या प्रकारच्या सभ्यतेची, सौजन्याची, मित्रतेची वागणूक घडली. अन्यायाविरुद्ध तीव्र लढा पण अन्याय करणाराला कोणतीही तोशीस नाही की त्रास द्यावयाचा नाही, असा हा अभिनव प्रकार होता. अभिमानाने मान ताठ ठेवून अन्यायाचा प्रतिकार करण्याचा नवा मार्ग दुबळ्यांना सापडला आणि सत्यग्रहाचा जन्म झाला.

भारतात परत आल्यावर गांधीजींनी या आपल्या अभिनव प्रतिकाराचा उपयोग करून चंपारण्यातील गोऱ्या मळेवाल्यांविरुद्धचा किसानांचा लढा लढविला. यानंतर खेडा जिल्ह्यातील संग्राम, पंजाब मार्शल लॉ इत्यादी छोटे समरप्रसंग, तसेच असहकार, कायदेभंग, छोडो भारत अशी महापर्वं यामध्ये सत्याग्रहाचा एक अस्त्र म्हणून वापर करण्यात आला. हे अस्त्र सर्वसामान्य माणसालाही पेलेल अशा क्षमतेचे होते. पण त्याचा जो आविष्कार झाला त्यातून केवढ्या तरी प्रचंड सामुदायिक शक्तीचा प्रत्यय आला. बलशाली ब्रिटिश सरकारविरुद्ध सशस्त्र बंडाचे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. पण या प्रयत्नांतून सामान्य माणसाच्या हृदयाला भिडेल अशी चेतना मिळणे कठीण होते. मीही या संग्रामात सामील होऊ शकेन अशी अनुभूती सर्वसाधारण माणसाला मिळणे शक्य नव्हते. भारतातील परिस्थितीत गांधीजींच्या मार्गाचे, सत्याग्रहाचे आवाहन व त्यातून साहजिकच उत्पन्न होणारी साम्राज्यविरोधी प्रतिकारभावना सर्वसामान्य माणसापर्यन्त पोहोचू शकली हा चमत्कार वाटत असला तरी, सामान्याच्या भूमिकेवरून कृती करून असामान्यत्व प्रकट करणाऱ्या गांधीजींच्या अलौकिक मार्गाचा तो परिणाम होता. यातूनच

स्वत्वाची जाणीव व एक प्रकारची निर्भयता साध्या नगण्य माणसांत निर्माण होऊ शकली.

सामान्य माणसाला कृतिशील व निर्भय बनविण्यावरोबरच लोकशाही मूल्यांची जोपासना गांधीजींच्या मार्गाने होऊ शकली. खोलवर जाऊन भूमिका अभ्यासावयाची; न्याय मागताना न्याय करण्याची तयारीच नव्हे तर उत्सुकता, परमताचा आदर हा जो लोकशाहीचा गाभा त्याचा संपूर्ण अंगिकार गांधीजींच्या लढ्यात झाल्याने लोकशाही मूल्ये रुजू शकली.

स्वत:शी प्रामाणिक राहण्याचा आटोकाट प्रयत्न करून, सांगोपांग अभ्यासाने जी गोष्ट पटली तिच्याशी प्रतारणा न करणे हे सत्याग्रहाचे वैशिष्टच आहे. अशा आचरणात व्यक्तीला महत्त्व असल्याने सर्वसामान्य माणसाच्या मनापर्यन्त त्याचे आवाहन पोहोचू शकले. सैन्यातील व्यक्तिगत सैनिकाला व्यक्तित्व नसते. विन-चेहऱ्याचा हा माणूस प्रचंड सैन्ययंत्राचा एक अविभाज्य भाग बनतो. सर्व सैनिक सारखेच दिसतात. नव्हे ते तसे दिसावे असा प्रयत्नही असतो. सत्याग्रहातील आचरण प्रामुख्याने व्यक्तिगतच राहत असल्याने त्यात व्यक्तीचे अस्तित्व लोपून जात नाही. सत्याग्रहाचा हा विशेष लक्षात घेता गांधीजींचे मार्ग हे सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यातील होत, असे म्हणावयास हरकत नाही. अर्थात या मार्गाचे निष्ठापूर्वक पालन केल्याने होणारा परिणाम मात्र असामान्य होता. गांधीजी स्वातंत्र्याच्या चळवळीत जनतेला खेचू शकले ते यामुळेच, व त्यांच्या चळवळीतून प्रचंड शक्ती उभी राहिली तीही यामुळेच.

स्वातंत्र्य चळवळीतील सत्याग्रहमार्गाबद्दल आज मात्र भारतातच शंका व्यक्त करण्यात येते. स्वराज्यात सत्याग्रहाला स्थान आहे का, या प्रश्नाचे उत्तर नेहमीच होकारार्थी मिळते असे नाही. ज्यांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली निरनिराळ्या लढ्यांत भाग घेतला असे कित्येक नेते असा दावा करतात की, आता लोकशाही आली आहे, मतपेटीने सरकार बदलता येते, तेव्हा सत्याग्रहाची आवश्यकता नाही. परंतु ही विचारसरणी पटण्यासारखी नाही. व्यक्ती व समाज, राज्यकर्ते व नागरिक यांचे संबंध नेहमीच परस्परप्रेमाचे राहतील असे नाही. स्वराज्यात अन्याय होणार नाही, असे थोडेच आहे ? मतपेटीने सरकार बदलेपर्यन्त नागरिकाने गप्प बसावयाचे असेल, तर अन्यायाचे परिमार्जन अशक्यच होईल. तेव्हा त्या अन्यायाविरुद्ध आपला आवाज उठविण्याचा, तो अन्याय दूर व्हावा म्हणून सत्याग्रह करण्याचा नागरिकाचा हक्क स्वराज्यातही मान्य केला पाहिजे. सत्याग्रही सत्याचा आग्रह धरताना होणारे क्लेश सहन करावयास तयार असतो. समाज किंवा राजसत्ता जे शासन करील ते तो खुशीने भोगतो. तेव्हा सत्याग्रहाचा अधिकार मान्य करण्यात समाज किंवा राजसत्ता यांना कोणतीही अडचण वाटण्याचे कारण नाही. सत्याग्रहात अभिप्रेत

असलेला विचार लक्षात घेतला की, स्वराज्यात सत्याग्रहाला स्थान आहे, हा मुद्दा पटावा. प्रचलित, सामाजिक, आर्थिक वा राजकीय व्यवस्थेमध्ये बदल करण्याची मागणी करणारा सत्याग्रही प्रथम ती व्यवस्था समाजमान्य आहे हे स्वीकारतो व म्हणून शासन जी शिक्षा करील ती मी आनंदाने व स्वेच्छेने स्वीकारीन असे म्हणतो. सत्याग्रही असेही सांगतो की, मी जो बदल मागत आहे तो माझ्या फायद्याचा जरूर आहे. परंतु तो माझ्या फायद्याचा आहे म्हणूनच केवळ मी त्याची मागणी करीत नाही, तर तो न्याय आहे, सत्य आहे, समाजाच्या अर्थव्यवस्थेच्या वा राजसत्तेच्याही तो फायद्याचा आहे, म्हणून त्यासाठी माझा आग्रह आहे. सत्याग्रही ज्या व्यवस्थेविरुद्ध उभा राहतो ती व्यवस्था तो नष्ट करू मागत नाही. त्याला अभिप्रेत असलेला बदल कदाचित आमूलाग्र बदल करणाराही असेल, परंतु सत्याग्रही नेहमी तडजोडीस तयार असतो, आणि असलेली व्यवस्था स्वीकारून पाऊल टाकतो, म्हणजे ती व्यवस्था व तो स्वत: या दोघांचेही अस्तित्व टिकावे, त्यांचा अभ्युदय व्हावा, हे त्याचे उद्दिष्ट असते.

या प्रश्नाकडे आणखी एका दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. आजची राजसत्ता एवढी प्रबळ बनली आहे, अर्थसत्ता एवढी अमर्याद आहे की, तिचा शस्त्रबळाने पाडाव करणे केवळ अशक्य आहे. राजसत्तेइतकी विनाशक हत्यारे मिळविता आली, तरच प्रतिकार शक्य आहे. हे सैन्यावर ताबा मिळाला तरच शक्य आहे. देश हुकूमशाही असो की लोकशाही असो, राजसत्ता सर्वंकष, सर्वशक्तिमान् आणि संपूर्णपणे प्रभावी झाली आहे व तिचे बल दिवसेंदिवस सर्वतोपरी वाढते आहे. हुकूमशाही राष्ट्रात बदल घडवून आणणे दुरापास्तच, पण लोकशाही राष्ट्रात मत-पेटीने बदल घडवून आणणे शक्य असले तरी यासाठी करावा लागणारा खटाटोप प्रचंड असतो. शिवाय बदल होतो तो कानामात्रेचाच. अमेरिका व रशिया या बलाढ्य राष्ट्रांनी चंद्रावर पोहोचण्याची खटपट चालविली आहे आणि ती यशस्वीही होईल. पण रशियातील नागरिकाला उच्चार व आचार स्वातंत्र्य मिळालेले नाही. रशियाचे सामर्थ्य अफाट असूनही आतापर्यन्त तो अन्नाबाबत स्वयंपूर्ण झाला नव्हता. सर्वांना राहावयास घरे मिळालेली नाहीत. अमेरिकेतील संपन्नता जगाच्या असूयेचा विषय बनली आहे. तेथील दहा टक्के असलेली निग्रो प्रजा त्यांची गुलामगिरी नष्ट होऊन आज शंभर वर्षे लोटली असली, तरी ती अजून नागरिक झाली, असे सर्वांशाने म्हणता येणार नाही. आणि ती केव्हा होईल हे सांगणेही कठीण आहे. या दोन बलाढ्य देशांतील ही परिस्थिती कशी पालटेल ? निग्रो दंगेधोपे करून आपले हक्क मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण तो यशस्वी ठरत आहे असे म्हणता येणार नाही. यादवी युद्धाने बदल घडविणे आज शक्य नाही. आजची विनाशशक्ती एवढी प्रबल आहे की, शस्त्रबलाने प्रश्न

सुटणार नाहीत. अशा स्थितीत राज्यकर्ते ठेवतील तसे राहावे, यापेक्षा दुसरा कोणता मार्ग नागरिकापुढे खुला आहे ? हा मार्ग एकच आणि तो म्हणजे सत्याग्रहाचा– निशस्त्र प्रतिकाराचा. अमेरिकन निग्रोंचे पुढारी ख्रिस्तवासी डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांनीही या मार्गाचा निर्भेळ पुरस्कार केला आणि तद्द्वारा बरेच यश संपादन केले.

एका सामान्य निग्रो स्त्रीनेही या मार्गाच्या शक्तीचा साक्षात्कार घडविला. चालू दशकात घडलेली ही हकीकत आहे. अमेरिकेतील अटलान्टा शहरातील बस-मधून एक सामान्य निग्रो बाई जात होती. बसमध्ये गर्दी नव्हती म्हणून ती पुढे बसली. थोड्या वेळाने उतारू चढू लागले. गोरे व निग्रो दोन्ही लोकांची गर्दी वाढली. कण्डक्टरच्या लक्षात आले की, ती निग्रो बाई गोऱ्या लोकांच्या राखीव जागेवर बसली आहे. म्हणून त्याने तिला मागे जाण्यास सांगितले. यामुळे बस थांबविण्यात आली. शहरातील निग्रो वस्तीत या बाईच्या वर्तनाची वार्ता पसरली. गोऱ्यांना पुढची जागा दिली पाहिजे, आपण मागे राहिले पाहिजे, ही तर साऱ्या निग्रोंच्या नित्य परिचयाची गोष्ट होती. पण त्या बाईच्या आग्रही वर्तनाचा निराळाच परिणाम झाला. शहरातील निग्रोंनी हा प्रश्न धसास लावण्याचे ठरविले. आम्ही गोऱ्यांप्रमाणे कर देतो, भाडे देतो, मग आम्हांला निराळी वागणूक का ? नगरवाहतुकीचे गोरे चालक म्हणाले, हे असेच पूर्वपार चालत आले आहे. तुमचे नवे लाड चालणार नाहीत. निग्रो म्हणाले, अशी व्यवस्था आम्हांस नको. भेदभाव करणाऱ्या बसमध्ये आम्ही बसणार नाही. आणि त्याप्रमाणे शांतपणे संघटितपणे वागण्याचे त्यांनी ठरविले. निग्रोंनी आपले नित्याचे व्यवहार पूर्ववत् चालू ठेवले. ते कामावर गेले, बाजारात गेले–सर्व काही पूर्ववत्. परंतु हा प्रवास ते पायी करीत, स्वतःच्या अगर मित्राच्या मोटरमधून करीत. टॅक्सीने करीत, परंतु बसवर त्यांचा बहिष्कार. या बहिष्काराने बसव्यवस्थेला तोटा होऊ लागला. विचारी गोऱ्यांपुढे प्रश्न उभा राहिला, असा भेदभाव का टिकावा ? लढा बरेच दिवस चालला. पण शेवटी चालक थकले आणि निग्रोंचा सत्याग्रह यशस्वी ठरला. कोणतीही उलथापालथ न होता एक जटिल प्रश्न निकालात निघाला. निग्रोंचा आत्मविश्वास वाढला. गोऱ्यांच्या मनातही खूप मंथन सुरू झाले. समान वागणुकीच्या धोरणाला गती मिळाली. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या सत्याग्रहाचा संपन्न अमेरिकेतील हा मोठाच विजय होता. बलाढ्य सत्ताधाऱ्यांनाही नमविण्यात दुर्बल निग्रो शांतता मार्गाने यशस्वी ठरले. या एका उदाहरणावरूनही आजच्या जगात सत्यागहमार्गाची महती केवढी आहे, हे सहज पटावे.

औद्योगिक क्रांतीने आणलेल्या यंत्रयुगामुळे कारखाने निर्माण झाले आणि ते दिवसेंदिवस मोठे व अवाढव्य होत आहेत. कारखान्यातील कामगार असंघटित

होते, तेव्हा त्यांची स्थिती मोठी अगतिक होती. साधी संघटना करण्याचा हक्कही त्यांना फार तीव्र व मोठे लढे करूनच मिळविता आला. तीच हकीकत संप करण्याच्या हक्काची. कामगारांचे मालकाविरुद्धचे मोठे हत्यार म्हणजे संप होय. या संपातही आत्मक्लेश आणि ज्याच्याशी लढा त्याला कष्ट देणे या सत्याग्रहातील दोन्ही गोष्टी कमीअधिक प्रमाणात आढळतात. संपकाळात कारखाना बंद असल्याने कामगाराला मजुरी मिळत नाही. त्यामुळे त्याला व त्याच्या कुटुंबियांना क्लेश सहन करावे लागतात. तसेच संप संपताच कारखाना पूर्ववत सुरू होतो, याचे कारण म्हणजे संपकाळात कामगार मालकांवर कितीही रागावला असला तरी आजकाल सामान्य-पणे तो आपला राग त्या कारखान्यावर किंवा त्यातील यंत्रावर काढीत नाही. यात मालकाला कष्ट देऊ नये, हा विचार तो करीत नाही. कारखाना बिघडला तर आपणाला मजुरी भेटणार नाही. स्वार्थवृत्ती असते अशी; पण परिणामी मालकाला कमी कष्ट होतात हे खरे. यामुळे असे म्हणण्याचा मोह आवरत नाही की, आधुनिक जगातील संपाच्या या महान प्रभावी हत्याराला गांधीजींनी घासून पुसून, त्यात सुधारणा करून त्याचे नवसंस्करण केले. संघटित शक्ती व धार्मिक वृत्ती यांची सांगड घालून सत्याग्रहाचे हे नवीन अस्त्र बनविले. गांधीजींचा आणखी विशेष म्हणजे दैनंदिन जीवनात–समाजकारण, अर्थकारण, राजकारण अशा सर्व क्षेत्रांत सामान्य माणसाकरवी त्यांनी ते अस्त्र यशस्वीपणे वापरले. ते कसे वापरावे, या-करिता शिक्षणाची जरूरी होती. परंतु हे शिक्षण म्हणजे स्वतःशी प्रामाणिक व मागणीशी एकनिष्ठ राहणे एवढ्यापुरतेच होते. या शिक्षणाकरिता तीक्ष्ण बुद्धी किंवा बलवान शरीर यांची खास आवश्यकता नसते. असते आवश्यकता माणुसकीची आणि ती माणुसकी प्रत्येक माणसात संभवते; साध्या दलित माणसात तर ती विशेष प्रमाणात आढळते.

गांधीजींच्या जीवनात असामान्य ठरलेला पण सामान्य माणसालाही पेलणारा सत्याग्रह आजही उपयुक्त आहे. किंबहुना सामान्य नागरिकाला हेच एक प्रभावी अस्त्र उपलब्ध आहे. निसर्गावरील प्रभुत्व शासन व अर्थसत्ता यांनाच उपलब्ध असल्याने ती जास्त जास्त बलशाली होत आहेत. उलट ही साधने हाती नसलेली व्यक्ती तुलनेने आणखी सामान्य, असहाय होत आहे. अशा सामान्यांना बलाढ्यांवरही मात करण्याची शक्ती देणारे सत्याग्रहाचे अमोघ अस्त्र उपलब्ध करून देणे, ही गांधीजींची विशेष देणगी होय.

३१

# सत्याग्रही लढ्यांचें स्वरूप व प्रयोग

ग. स. आकतेकर

गांधीजींनी सत्याग्रहाचे लढे आपल्या आयुष्यात पुष्कळ दिले. त्याचा कळस म्हणजे १९४२ चे ' चले जाव ' चे अहिंसक आंदोलन. त्या लढ्यांची मीमांसा पुढील लेखात केली आहे.

तत्त्वज्ञान म्हणजे केवळ बुद्धीची कसरत नव्हे. तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीसाठी सूक्ष्म चिंतन व तदनुसार आचारही हवेत. जीवन आणि त्यातील समस्या पलायन-वृत्तीने टाळून, जगताच्या बाहेर कोठे तरी दूर परतत्त्व दडले आहे, असे समजून त्याच्या शोधार्थ जाणे म्हणजे तत्त्वज्ञान नव्हे. तसे असेल तर तत्त्वज्ञानाचा जीवनात काही उपयोग नाही व ज्याला जीवनाचा विचार करावयाचा आहे, त्याने तत्त्वज्ञानाच्या मागे लागून कालक्षेप करण्याचे मुळीच कारण नाही. जे हे अफाट जग व जीवन पसरले आहे, त्याचे मूल म्हणजेच तत्त्व होय. ते ह्या जगाला आणि जीवनाला सोडून नसून त्याच्या केवळ अंतर्गतच नव्हे तर त्याचे नियंत्रण करणारे आहे. त्याचा उकल करणे हाच तत्त्वचिंतनाचा हेतू आहे. तो जीवनाच्या बाहेर जाण्याने साध्य होत नाही, तर जीवन जगत जगत त्याच्या मुळाकडे जाण्यानेच साध्य होऊ शकतो.

महात्मा गांधी हे आपल्या जीवनात हरएक विकटप्रसंगी निर्णय घेऊन

कराव्या लागणाऱ्या आचरणाला 'सत्याचे प्रयोग' मानीत. रोजच्या जीवनामध्ये बरे-वाईट, न्याय-अन्याय, योग्य-अयोग्य, सत्य-असत्य अशा अनेक गोष्टी आपल्या-पुढे उभ्या राहतात. त्यांत निर्माण झालेल्या प्रश्नांचा विचार करून आपल्यास पुढे पाऊल टाकावे लागते. वासना मोकाटपणे आपल्या पूर्तीकरिता आपणास ओढीत असतात, तर सदसद्विवेकबुद्धी त्यांना आवरण्याचा प्रयत्न करीत असते. काम-क्रोध लोभ-मोहादी विकार आपले वर्चस्व स्थापू पहातात, तर सद्विचार त्यांना आपल्या कह्यात ठेवण्याची खटपट करीत असतो. केव्हा विकार आपला प्रभाव गाजवितात, तर केव्हा आपला विचार त्यांच्यावर आपली मात करतो. असे युद्धाचे प्रसंग रात्रंदिवस चालू असतात. योग्य कोणते व अयोग्य कोणते, ते ठरवून योग्याचे—म्हणजे सत्कार्याचे— आचरण करून सत्यदर्शन घेण्याचा जो प्रयत्न आहे, त्याला गांधीजी सत्याचे प्रयोग असे म्हणतात. सत्य हे परम ध्येय आहे. त्याचे पूर्ण स्वरूप कळणे हे या देही अशक्य आहे. तथापी ते जाणण्याची कोशीस करीत राहिले पाहिजे सत्याला विरोधी ते असत्य होय. त्याचा आपल्याला स्पर्श न होण्याची खबरदारी घेतली पाहिजे. गांधीजी ईश्वर मानणारे होते. ईश्वरावर त्यांची नितांत श्रद्धा होती. परमेश्वर हा सत्यमय आहे, हे यथार्थ नसून सत्य म्हणजेच परमेश्वर असे ते मानीत. सत्य हे त्रिकालाबाधित आहे. ते सर्वत्र भरलेले आहे. सत्यदर्शनाकरिता जीवमात्रा-विषयी आत्मवत् प्रेम आचरणात उतरणे आवश्यक आहे. 'जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत' अशी वृत्ती झाल्याशिवाय भगवंताचे—म्हणजे सत्याचे— दर्शन घडणार नाही. सर्व जीवमात्रांच्या एकात्मतेची प्रचीती आली पाहिजे. ती सर्वांची सेवा करण्याने येईल.

गांधीजींच्या प्रार्थनेतील ईशावास्योपनिषदामधील त्यांच्या आवडत्या श्लोकात वरील मथितार्थ आणि त्याच्यापासून निघणारे सिद्धांत ग्रथित झालेले आहेत.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किं च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा गृधः कस्यस्विद् धनम् ।।

जगात जे काही जीवन आहे ते सर्व परमेश्वराने अधिष्ठित झालेले आहे. म्हणून तू त्यागपूर्वक यथाप्राप्त सेवन करीत जा. कोणाच्याही धनाविषयी लालसा धरू नकोस. सर्वांभूती परमेश्वर भरला असल्याने तू परकेपणाची भावना सोडली पाहिजे आणि सर्वांच्या समवेतच प्राप्त वस्तूंचे सेवन करावयास पाहिजे. दुसऱ्यांना त्यांचा भाग न देता जो आप्पलपोटेपणाने स्वतःच सर्व घेतो, तो चोरीच करतो, असे म्हणावयास पाहिजे. अशी वागणूक सर्वथैव त्याज्य होय. जे दुसऱ्याचे हित तेच आपले हित, अशी वृत्ती बनली पाहिजे. सर्व प्राणिमात्राच्या ठिकाणी परमेश्वर आहे, ही जाणीव होऊन ती भावना दृढ होऊन व सर्वांच्या कल्याणार्थ झटणे, हीच ईश्वराची म्हणजे सत्याची उपासना होय, हे ओघानेच सिद्ध होते. "यद् भूतहितम-

त्यन्तं तद्धि सत्यं प्रचक्षते । '' असे महाभारतात प्रतिपादन केले आहे. ज्याने प्राणिमात्राचे आत्यंतिक कल्याण साधले जाते ते सत्य होय, असे त्या ठिकाणी नि:संदिग्धपणे म्हटले आहे. सत्याचे स्वरूप पूर्णपणे समजणे शक्य नसले, तरी कोणाचाही द्वेष अगर मत्सर न करता सर्वांची चिंता व सेवा सर्वकाळ करीत राहणे हीच सत्याची उपासना आहे व त्यानेच आपण सत्याच्या जवळ जाऊ शकू, असे गांधीजींना वाटत होते. सर्वांच्या हितासाठी झटणे हाच न्यायमार्ग असून भूतमात्रावद्दल दया आणि प्रेमभाव असणे हे दैवी संपत्तीचे महत्त्वाचे लक्षण आहे. "न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ।।" समर्थ (कविता स्फुट प्र.३०– ५.) सत्य, न्याय म्हणजेच देव, असे म्हटल्यावर असत्य, अन्याय म्हणजे राक्षस असे ओघानेच आले. गीतेमधील दैवी आणि आसुरी संपत्तीच्या विवेचनाचा भावार्थ गांधीजींच्या विचारसरणीत दिसून येतो. समाजात व राष्ट्रात जे अन्याय चालू आहेत, ते आसुरी प्रवृत्तीमुळे होत.

हे अन्याय व त्यामुळे जनतेची होत असलेली दुर्दशा गांधीजींना ठिकठिकाणी दिसून आली. एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर चालविलेले अन्याय व पिळवणूक, शासनकर्त्याकडून प्रजाजनांवर चाललेला जुलूम आणि वरिष्ठांकडून कनिष्ठांची होत असलेली गांजणूक, हे सारे आसुरी वृत्तीच्या लोकांकडून दलितांवर लादलेले अन्याय आहेत. त्यांना सत्याची चाड नाही अगर असत्याची खंत नाही, किंवहुना असत्यावरच बेदरकारपणे त्यांनी आपले अधिष्ठान मांडलेले असते. आपल्या पाशवी शक्तीच्या जोरावरच त्यांनी आपला शिरजोरपणा चालविलेला असतो. मीच ह्या जगाचा मालक आहे, मी म्हणेन ती पूर्वदिशा, तेव्हा माझी आज्ञा सर्वांनी मानलीच पाहिजे, अशी त्यांची अरेरावी असते. जगातील सर्व संपत्ती माझ्या उपभोगासाठी आहे, असे ते मानतात. अशा लोकांच्या क्रौर्यास काही मर्यादा असत नाही, हे गेल्या महायुद्धात सर्वांच्या निदर्शनास आलेच आहे. पादाक्रांत केलेल्या देशातील प्रजेला हे दासाप्रमाणे आपल्या हिताकरिता राबवितात. फार तर त्यांना दुय्यम दर्जाच्या प्रजाजनांचे हक्क देऊन त्यांच्याकडून आपल्या देशाच्या फायद्याकरिता त्यांच्या श्रमाचा आणि संपत्तीचा उपयोग करून घेतात. आक्रमक राष्ट्राच्या पाशवी वलापुढे दलित राष्ट्रातील नि:शस्त्र प्रजा हताश होते. तिला नाइलाजाने गुलामाप्रमाणे पारतंत्र्यातील हालअपेष्टा सोसाव्या लागतात. परवशतेतील ही दु:सह अवस्था हिंदुस्थानासुद्धा आशियातील काही राष्ट्रांना आणि आफ्रिकेतील अनेक देशांना सोसावी लागली आहे. आफ्रिकेतील काही देशांतील लोक आणि तेथे जाऊन राहिलेले भारतातील रहिवासी हे तेथल्या हालअपेष्टांत अद्यापी खितपत पडले आहेत.

दक्षिण आफ्रिकेत गांधीजींनी सरकारशी हा जो रोखठोक लढा सुरू केला

तो भारतामध्ये राष्ट्रीय सभेने अगर कोणत्याही पक्षाने राजरोसपणे सरकारविरुद्ध लढा सुरू करण्यापूर्वी होय. कायदा न मानता सरकारशी सरळ प्रतिकार करण्याच्या कल्पनेचे व चळवळीचे गांधीजी हे आद्य प्रवर्तक आहेत. सत्याग्रहाच्या चळवळीचे तर ते द्रष्टे आहेत.

भारतापासून फार दूर आणि जगाच्या अगदी मागासलेल्या भागात वसाहत करून, संपूर्णपणे स्वार्थासाठी काळ्या लोकांना जवळजवळ गुलामाप्रमाणे राबवून, एकतंत्री राज्य चालविणाऱ्या गोऱ्या लोकांच्या आफ्रिकेंत जाऊन राहिलेल्या हिंदी लोकांचे नेतृत्व गांधीजींनी केले. ह्या हिंदी लोकांना क्रूरपणे वागविण्यात येत होते. त्यांना मतदानाची अगर कसल्याही प्रकारच्या राजकीय हक्काची पात्रता नाही, असे तेथील राज्यकर्ते मानीत. व्यापारासाठी जाऊन राहिलेले थोडे हिंदी लोक वगळले तर बाकीचे केवळ मोल-मजुरी करणारेच होते व अत्यंत निकृष्ट अवस्थेत रहात होते. अशांना मानवी हक्क मिळवून देण्याचा झगडा गांधीजींनी अभूतपूर्व पद्धतीने सुरू केला. आपला मायदेश पारतंत्र्यात होता. तेथील सरकारही गोऱ्यांच्या जातभाईचे होते. भारतातील सरकारची सहानुभूती बेताचीच होती. कोठल्याही सरकारचा पाठिंबा नसता दलितांसाठी ह्या थोर पुरुषाने प्रबल व अरेरावी सत्ते-विरुद्ध निकराचा लढा चालविला. गांधीजींचे तंत्र म्हणजे जणू पाषाणाला पाझर फोडण्यास लावण्याचे होते.—प्रेमाने कठोर हृदयास वश करण्याचे होते.—शांतीने आसुरी वृत्तीला जिंकण्याचे होते. तेथे त्यांनी न्याय मिळविण्यासाठी सत्य आणि अहिंसा यांच्या मार्गाने यत्न केला. प्रतिपक्षाला काडीइतकीसुद्धा इजा न करता केवळ आत्मक्लेशाने त्याला जिंकण्याचा प्रयोग केला. निकृष्ट अवस्थेस पोचलेल्या हिंदू-मुसलमान वगैरे भिन्नधर्मी, भिन्नप्रांतीय व भिन्नभाषिक अशा आपल्या बांध-वांत एकजूट करून त्यांना आपल्या अभिनव सामुदायिक सत्याग्रहाचे व अहिंसा-मार्गाचे शिक्षण देऊन निर्बलांमध्ये अलौकिक आत्मबल निर्माण केले. त्यायोगे त्यांना पाठविलेल्या अभिनंदनाच्या पत्रात ज. स्मट्सनी म्हटले की, त्यांच्या अहिंसक लढ्यामुळे त्यांना " विरोध करणारे सरकार म्हणा अगर जमात म्हणा नैतिक दृष्ट्या खचते आणि प्रचंड भावनात्मक परिणामामुळे नमते. त्यांचे तंत्र आत्मक्लेशाच्या सिद्धांतावर आणि दुसऱ्याचे क्लेश स्वतःवर ओढवून घेऊन दुस-ऱ्यांच्या भावनांची शुद्धी घडवून आणण्यावर आधारलेले आहे. जेथे बुद्धिवादावर आधारलेल्या आणि मनाला पटविण्याच्या सर्वसामान्य राजकीय पद्धती काम देत नाहीत असे दिसून येते, तेथे गांधी प्राचीन भारतीय अथवा पौर्वात्य मार्गाचा आधार घेतात. राजकीय कार्यपद्धतीत गांधींची ही नाव घेण्याजोगी भर आहे. लौकिक मापे त्यांच्या कार्यपद्धतीला लागू करता यत नाहीत. '' ( सत्याग्रहाची जन्मकथा, पान ३४०–४१ )

ज्याच्याविरुद्ध गांधीजींनी आफ्रिकेत न्यायासाठी अनेक वर्षे प्राणपणाचा झगडा केला, त्या कट्टर विरोधकाचा हा कबुली–जवावच म्हटला पाहिजे. सत्याने असत्यावर, अहिंसेने हिंसेवर आणि प्रेमाने द्वेषावर सामुदायिक लढा देऊन यश मिळविता येते व आत्मशुद्धीने विरोधकाच्या भावनांची शुद्धी करता येते, हे गांधीजींनी जगाच्या इतिहासात प्रथम दाखवून दिले. दक्षिण आफ्रिका ही भारताच्या स्वातंत्र्यासाठी, त्यांनी पुढे हाती घेतलेल्या प्रचंड शांतिसंग्रामाची, शिक्षण घेण्याची, जनरल स्मट्सनी म्हटल्याप्रमाणे मोठी, शाळाच झाली.

कितीही सामोपचाराने वागले तरी ब्रिटिश सरकार आपली पकड सोडण्यास तयार होत नाही. गप्प बसल्यास भारतात अधीर लोकांकडून हिंसात्मक मार्गांचा अवलंब होऊन परिस्थिती आटोक्यावाहेर जाण्याची शक्यता आहे, असे वाटल्यावरून काँग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली 'छोडो हिंदुस्थान' हे अहिंसात्मक निर्वाणीचे प्रचंड आंदोलन करण्याचे ठरविले.– अहिंसात्मक मार्गाने 'करा अगर मरा' ह्या जिद्दीने लढा देण्याचा लोकांना आदेश दिला. ह्यापूर्वी वावीस वर्षे वारंवार चालविलेल्या सत्याग्रहाच्या चळवळीने राष्ट्राला अहिंसात्मक लढ्याचे चांगले शिक्षण मिळाले होते. मागे काही हिंसात्मक कृत्यांमुळे चळवळ बंद करावी लागली होती. तरी दर लढ्याच्या वेळी जनतेने अहिंसेची शिकवण अधिकाधिक आत्मसात् केली होती. आता अधिक वेळ वाट पहाणे म्हणजे धोका स्वीकारणे होय, असे जाणून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली ८ ऑगस्ट १९४२ रोजी स्वातंत्र्याचा निर्वाणीचा अहिंसात्मक लढा पुकारला. तावडतोव सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांची देशभर धरपकड झाली. जनतेने सदर संग्रामाला सर्वत्र प्रचंड पाठिंवा दिला. सरकारने अभूतपूर्व दडपशाही सुरू केली, वटहुकुमांचे राज्य सुरू केले, लाठीमार, गोळीवार वगैरे प्रकार चळवळ चिरडून टाकण्यास अमलात आणले. लोक दवले नाहीत. त्यांनी शांतपणे सर्व हालअपेष्टा सोसून चळवळ चालविली. काही ठिकाणी उत्साहाच्या भरात तारा तोडणे, रेल्वे स्टेशने व पोलीसचौक्यांवर हल्ला करणे अशा गोष्टी तुरळकपणे घडून आल्या, पण कोणाला शारीरिक इजा केली नाही. पुढारी तुरुंगात टाकले गेल्यानंतर चळवळ लोकांच्या हाती गेली; तथापी मुख्यतः अहिंसेने, पण क्वचित ठिकाणी जमेल त्या मार्गे, जनतेने सरकारी अत्याचाराला तोंड दिले. नामर्दपणे शरण जाऊन भ्याडपणा पत्करण्यापेक्षा, अहिंसेने करता येत नसेल तर, शारीरिक शक्तीने केलेला प्रतिकार परवडला. ह्या दुय्यम मार्गाचाही क्वचित ठिकाणी अवलंव झाला. काही कार्यकर्त्यांनी भूमिगत राहून चळवळ चालू ठेवली. हा लढा १९४४ च्या मे महिन्यापर्यंत चालला. भारतावर जवरदस्तीने राज्य करता येणार नाही, असे ब्रिटिशांना दिसून आले आणि अखेर त्यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य सुपूर्त केले.

सत्यनिष्ठा व अहिंसेची वृत्ती ही गांधीजींच्या जीवनात लहानपणापासूनच दिसून आली आहे. या गुणांची त्यांच्या स्वभावात उत्तरोत्तर परिणति होत गेली. सत्य व अहिंसा यांत भेद करता येत नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची दृढ बैठक आहे. ह्या बैठकीवरूनच त्यांना चिंतन करता करता अहिंसात्मक सत्याग्रहाच्या मार्गाचे दक्षिण आफ्रिकेत दर्शन घडले. तो मार्ग त्यांनी तेथे आचरून यशस्वी करून दाखविला व त्यानंतर ते हिंदुस्थानात आले. येथल्या परिस्थितीला ते नवखे होते. तीन-चार वर्षांत येथील परिस्थितीचे त्यांनी आकलन केले. त्यांना दिसून आले की, या ठिकाणची परिस्थिती आफ्रिकेहून वेगळी आहे. येथे निरनिराळ्या धर्मीयांत बऱ्याच दिवसांची तेढ आहे व ही दुही राज्यकर्त्यांनी जोपासली आहे. एकाच धर्माच्या लोकांत अस्पृश्यतेसारख्या रूढीमुळे पराकोटीचा भेदभाव व अन्याय नांदत आहे. दक्षिण आफ्रिकेत एकच प्रकारचा अन्यायी कायदा साऱ्या हिंदी लोकांना सारखाच जाच करीत असल्याने त्यांच्यात दुही निर्माण करणे त्या सरकारला शक्य नव्हते. पण येथे एका जमातीला जवळ करून 'फोडा व झोडा' या नीतीने राज्य करणे सुलभ होते. आफ्रिकेत वेगवेगळे राजकीय पक्ष आपल्यात नव्हते व आपल्यात परस्परविरुद्ध स्वार्थाचा प्रश्न नव्हता. आफ्रिकेत हिंदी वस्ती काही हजारांची, तर येथे अनेक कोटींची होती. तेथला प्रदेश लहान तर येथला खंडप्राय. इतक्या अडचणींतून ऐक्य संभाळून, कोणाचा विरोध होणार नाही अशा रीतीने गांधीजींना, येथे पूर्वी कोणी केली नाही ती सरकारविरुद्ध रोखठोक प्रत्यक्ष विरोधाची पण अहिंसात्मक चळवळ चालवावयाची होती. लढा चालविताना अडचणी आल्या, तेव्हा कित्येक वेळ. आंदोलन तहकूब करून लोकांची अधिक तयारी झाल्यावर त्यांनी ते पुढे चालविले एवढ्या प्रचंड देशात काही मतभेद व काही वेळा क्वचित् ठिकाणी अत्याचार अपरिहार्य, म्हणून त्यांनी ते अखेर अखेर तितकेसे मनावर घेतले नाहीत. प्रचंड जनतेचा त्यांना अमाप पाठिंबा होता व तिने त्यांच्या आत्मक्लेशाच्या अहिंसक मार्गाचा स्वीकार केल्याने त्यांना ती यशस्वी करणे शक्य झाले. किरकोळ हिंसात्मक प्रकार व काही मतभेद झाले ते एवढ्या अवाढव्य संग्रामात लुप्तप्राय झाले. हे लक्षात ठेवले पाहिजे की, अहिंसेच्या मार्गामुळेच ही चळवळ प्रसार पावन टिकू शकली; इतका काळ एकसारखी वाढून यशस्वी होऊ शकली. नैतिक मूल्यांची जणू मूर्ती असा अद्वितीय नेता भारतास लाभला, ही ह्या देशावर परमेश्वराची कृपाच होय.

गांधीजींनी भारताला सत्य, अहिंसा आणि त्याग यांची शिकवण देऊन दुसऱ्यांना इजा न करता आत्मक्लेशाने त्यांचे अंतःकरण जिंकावयास शिकविले. दुसऱ्याला शारीरिक त्रास देणे जसे त्यांना मान्य नव्हते, त्याप्रमाणे मालमत्तेची नुक-

सानी करणेही त्यांना संमत नव्हते. साध्य व साधन ही दोन्ही शुद्ध असावयास पाहिजेत यावर त्यांचा कटाक्ष होता. हीन साधनांनी मिळविलेले ध्येय सुखावह होत नाही व चिरकालही टिकत नाही. तनाचा नाश करण्याप्रमाणे धनाचा नाश करणे ही राक्षसी क्रिया आहे. मालमत्तेची लूट, जाळपोळ अगर मोडतोड करणे हा व्यक्तीचा तसाच जमावाचा शुद्ध वेडेपणा आहे, असे निक्षून सांगून असल्या आचरणाचा त्यांनी निःसंदिग्धपणे निषेध केला आहे. चळवळ चालविणाऱ्यानी ती आपल्या कह्यांत ठेवली पाहिजे व विध्वंसनाच्या गोष्टी होऊ देता कामा नये, असे त्यांनी अनेकवार बजावले आहे. गांधीजींची ही शिकवण आपण त्यांच्यामागे फार थोडचा वेळात विसरून गेलो आहो. भाषेकरिता आंदोलन असो, विश्वविद्यालयातील तक्रारी असोत, विद्यापीठाची मागणी असो, प्रांतविभागणीसाठी चळवळ असो अगर कसल्याही कारणासाठी उठाव असो; अशा झगडचात बसगाडचा, रेल्वेचे डबे आणि स्टेशने यांचे विध्वंसन केले जाते. शिवाय खाजगी मालमत्तेची लुटालूट व जाळपोळ बेशक करण्यात येते. कित्येक आंदोलनांत लक्षावधी नव्हे तर कोटचवधी रुपये किंमतीच्या मालमत्तेचा विनाश केला जात आहे. अहिंसा-मार्गाचे समर्थन करताना गांधीजींनी एक कारण असे दिले आहे की, कोणाचे म्हणणे खरे आहे ह्याबद्दल मतभेद असू शकतो. आपल्या मताचा पाठपुरावा करताना अहिंसा अशासाठी पाळावयाची की, चूक आपली असल्यास त्या कामी होणारे क्लेश फक्त आपल्यालाच कष्टानें आपली बाजू खरी ठरल्यास तिजसाठी आपणास सोसाव्या लागणाऱ्या होईल दुसऱ्याच्या मताचे परिवर्तन होईल. आपला पक्ष असत्य ठरल्यास त्याची झळ दुसऱ्यास सोसावी लागू नये. खऱ्या बाजूकरिता अहिंसेने आत्मक्लेश सोसून यश मिळविणे हेच अधिक चांगले. त्यामुळे आत्मशुद्धी आणि प्रतिपक्षाच्याही अंतःकरणाची शुद्धी होते, व हे यश दोघांनाही कल्याणकारी होऊन कायम टिकते. काही झालें तरी दुसऱ्याच्या संपत्तीची अथवा सार्वजनिक मालमत्तेची लूटालूट अगर विनाश कधीही करू नये. आज तो देशात चोहोकडे केला जात आहे. तो प्रक्षोभाच्या भरात केला जातो, ह्या सबबीखाली दडता येणार नाही. जे चळवळ सुरू करतात त्यांच्यावर हे प्रकार घडू न देण्याची जबाबदारी आहे, अशी गांधीजींची शिकवण आहे. परमत – सहिष्णुता ही अवश्य असावयास पाहिजे. सत्याऐवजी असत्य, अहिंसेऐवजी हिंसा, त्यागाऐवजी भोग आणि प्रेमाऐवजी द्वेष आज थैमान घालू लागले आहेत. त्यामुळे राष्ट्राची नैतिक अवनती आणि अगणित आर्थिक नुकसान होत आहे. गांधीजींच्या जन्मशताब्दीच्यावेळी आपण अंतर्मुख होऊन त्यांची शिकवण आचरणात आणू, तर त्यांची जन्मशताब्दी खरेपणे साजरी केली असे होईल.

३२

# जीवनांतील आशास्थान

## प्रेमा कंटक

सत्यातून श्रद्धा व श्रद्धेतून शक्ती गांधीजींनी कशी संपादन केली ? सत्याला त्यांनी व्यवहारात, राजकारणात कसे आणले ? आणि साधनांची शुचिता कशी राखली ? या प्रश्नांची उत्तरे पुढील लेखात सूत्ररूपाने दिलेली आहेत. आजच्या संशयी व भयग्रस्त जगताला गांधीजींच्या विचारातून व कार्यावरून पुष्कळच शिकण्यासारखे आहे.

ज्या जगात आपण राहतो, ते देश व काल यांनी मर्यादित आहे. या जगात माणसे जन्मास येतात व मरतात. पशु-पक्षी व सर्व चराचर सृष्टि सारखी वदलत आहे. हा क्रमही सर्वांस माहीत आहे. अर्वाचीन कालात विज्ञानाने फार मोठी आघाडी मारली आहे. तरी या विश्वचक्राच्या सूक्ष्मच काय पण स्थूल नियमांचेही पुरते ज्ञान मानवांना झाले नाही. अद्याप जीवन म्हणजे काय ? हा प्रश्न सर्व मानवांसमोर उभा आहे. आपण कशासाठी जगतो आहो, असा प्रश्न प्रत्यक्षात आपल्या मनास विचारावा. त्याचे निःसंदेह उत्तर मिळेल तेव्हा जीवन म्हणजे काय ते समजेल.

लहानपणापासून मनुष्याला संस्कार मिळत जातात. घरी, दारी, शिक्षणसंस्थातून, वाङ्मयातून, वाहतुकीच्या साधनांतून—सर्वच क्षेत्रांतून संस्कार व समजुती मिळत

असतात. या शिकवणुकी इतक्या भरपूर असतात की, मनुष्याला स्वतंत्र चिंतन वा विचार करताच येत नाहीत. ऐकलेली वा वाचलेली मते मनुष्य बोलून दाखवतो. त्यामुळे जीवनविषयक स्वतंत्रपणे विचार करणे त्याला सुचतच नाही. अर्थात् जीवन म्हणजे काय, या प्रश्नाचे उत्तरही त्याला मिळत नाही. आणि ते उत्तर प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणातूनच येणे जरूर असते. आपल्या जीवनाचा अर्थ आपणच शोधून काढला पाहिजे. ज्यांची जन्मशताब्दी आपण साजरी करीत आहो, त्यांनी या प्रश्नाचा खोल विचार केला होता. प्रारंभी त्यांची जीवनावर श्रद्धा होती, नंतर ज्ञान होत गेले. जीवनाचा अर्थ जाणून घेताना वास्तवता अथवा तत्त्वज्ञानाच्या भाषेत सांगावयाचे तर सत्य म्हणजे काय, याचा उलगडा करून घ्यावा लागतो. कारण आमचे सर्व विचार व आचार अथवा कृती सत्याच्या पायावर उभारण्याची आमची इच्छा असते. ज्या विचारांचा पाया सत्य आहे, त्याबद्दल खात्री असते. वावटळ येवो की वादळ होवो, आम्ही हिमालयासारखे अचल राहू, असा विश्वास वाटत असतो. त्यामुळे आपणास सुरक्षितता वाटत असते.

सत्याचा शोध योग्य मार्गांनी केल्यास अनुभूती प्राप्त होते. ती झाल्यावर ज्ञान पक्के होते. मग श्रद्धा अनुभवात लीन होते. अशा मुष्याच्या जीवनात अपरिमित शक्ती निर्माण होते. सारे जग विरुद्ध गेले तरी तो डगमगत नाही.

अशा या सत्याच्या शोधासाठी निघालेला मनुष्य प्रथमत: तरी बाह्य वस्तूंचेच परीक्षण करीत असतो. स्वत:च्या इंद्रियांनी समजू शकणाऱ्या गोष्टींतून तो सत्य धुंडाळण्याचा प्रयत्न करतो. नंतर इंद्रियांना सूक्ष्मदर्शक, दूरदर्शक साधनांची मदत देऊन तो सत्य शोधू लागतो. स्थूल सृष्टीचे परीक्षण झाल्यावर सूक्ष्म सृष्टी आपल्या मन-बुद्धी आदि साधनांनी चाळू लागतो. कधी थकतो व आप्तवाक्यांवर विश्वास ठेवून दिवस निभावू लागतो. इतके करूनही साध्य वस्तू मृगजलाप्रमाणे दूर दूर जाऊ लागते. विचारा फार निराश होतो व प्रयत्न सोडून देतो.

महात्मा गांधी तरुण वयात धर्मनिष्ठ नव्हते. त्यांना धर्माचे ज्ञान नव्हते व तो जाणून घेण्याची भूकही नव्हती. दक्षिण आफ्रिकेत गेल्यावर त्यांच्या ख्रिस्ती युरोपियन मित्रांच्या सहवासात राहिल्यावर त्यांच्यात धर्मजिज्ञासा निर्माण झाली. लहानपणी त्यांना 'सत्य' हा शब्द माहीत झाला होता. सत्यासाठी सर्वस्व देणाऱ्यांच्या कथा त्यांनी ऐकल्या होत्या. त्या सत्याच्या साक्षात्कारासाठी जीवनभर प्रयत्न करण्याचा दृढ संकल्प त्यांनी केला व सतत चिंतन आणि अभ्यास यांच्या योगाने त्यांनी शोध लावला की विश्वात भरून राहिलेल्या आणि त्याहूनही थोर असलेल्या परमतत्त्वाकडून आपणास जे शरीर मिळाले आहे, जे आयुष्य व इतरही देणग्या मिळाल्या आहेत, त्यांचा उपयोग त्या अंतिम शाश्वत तत्त्वाचा साक्षात्कार करून घेण्यासाठी केला पाहिजे व तो साक्षात्कार केवळ अहिंसा अर्थात् मंगलमय प्रेम या साधनाने होऊ

शकेल. हा शोध लागल्यावर त्यांना जीवनात गोडी वाटू लागली व या कार्यासाठी आपण दीर्घायुषी व्हावे, एकशेपंचवीस वर्षे जगावे, असे ते उघड म्हणू लागले ! सत्यच ईश्वर आहे असे ते कंठरवाने लोकांना सांगू लागले. सत्याच्या साधकाला खासगी आणि जाहीर असे काहीच नसते; सबंध जीवनच तपस्या अथवा साधना बनते. जेव्हा जीवन साधना बनते, तेव्हा साध्यासाठी वापरावयाची साधनेही शुद्ध असावी लागतात. सत्याला धर्मपुस्तकातून बाहेर व्यवहारात आणले पाहिजे, त्याला कायावाचामनादिकांतून प्रकट केले पाहिजे. त्याच्यासाठी मरण पतकरले पाहिजे, अशी महात्मा गांधींची विचारसरणी होती. सत्याचा मार्ग हा सोपा नाही. अर्थात् निश्चयाने तो मार्ग आक्रमणाऱ्या पथिकास आवश्यक ती शक्ती ईश्वर देतो. पण त्याची कसोटीही होत असते. कसोटीपासून पथिकाचाच फायदा होतो. तीतून तो उतरला तर त्याची शक्ती वाढते व उत्साहही वाढतो.

आफ्रिकेतून परत आल्यावर महात्मा गांधींनी अहमदाबादजवळ साबरमती येथे आपला आश्रम स्थापला. त्यांच्या तपश्चर्येने व पराक्रमाने दिपलेल्या त्यांच्या स्नेह्यांनी या आश्रमास आर्थिक मदत देण्यास सुरुवात केली. बहुतेक स्नेही अहमदाबाद शहरातीलच होते. काही दिवसांनी श्री. अमृतलाल ठक्कर या समाजसेवकाचे पत्र महात्मा गांधींना गेले. दुधाभाई नावाचा एक धेड गृहस्थ आपली पत्नी व दोन महिन्यांची कन्या यांसह आश्रमाचे नियम पाळून आश्रमात राहू इच्छीत होता. त्याला प्रवेश मिळेल काय ?–असे त्यांनी विचारले होते. महात्मा गांधींच्या मनातून अस्पृश्यता पूर्णपणे निघून गेली होती. हिंदुधर्म अस्पृश्यता मानीत नाही, अस्पृश्यता रूढीतून आली आहे, असे त्यांचे मत होते. त्यांनी लगेच श्री. ठक्कर यांना उत्तर पाठवले की, "त्या कुटुंबाला येथे पाठवून द्यावे."

ही बातमी जाहीर होताच क्षोभ उसळला ! आश्रमातील भगिनीवर्गाकडून, (ज्यात महात्मा गांधींच्या पत्नी श्री. कस्तूरबा यांचाही समावेश होतो,) विरोध झाला. "अस्पृश्यांना आश्रमात ठेवल्याने विटाळ होईल, आम्ही अन्नग्रहण करणार नाही," असे भगिनींनी सांगितले. तिकडे अहमदाबादमधील स्नेह्यांनी कळविले की, "धर्मविरुद्ध गोष्ट केल्यास आमच्याकडून यापुढे आश्रमास मदत दिली जाणार नाही." कठिण प्रसंग आला होता ! व्यक्तीच्या निष्ठेची कसोटी होण्याची वेळ आली. आप्त व समाज विरुद्ध होते. काल विरुद्ध होता. त्या वेळी अस्पृश्यतानिवारणाचे तत्त्व कोणास मान्य तर नव्हतेच. खुद्द अस्पृश्य समाजातही जागृती झाली नव्हती. त्यामुळे महात्मा गांधींच्या या सत्यनिष्ठ आचरणास कोठेच पाठिंबा मिळाला नाही. पण ते स्वत: पक्के तत्त्वनिष्ठ होते. "पत्नीला माझे करणे पसंत नसेल तर तिने मला सोडून जावे. स्नेह्यांना पसंत नसेल तर त्यांनी मदत व संबंध तोडून टाकावेत. पण मी सत्याचा मार्ग सोडणार नाही." असे त्यांनी जाहीर केले. ते अस्पृश्य कुटुंब आश्रमात दाखल

झाले. महात्मा गांधींनी त्या कुटुंबाला आत्मीयतेने व बरोबरीने वागविण्यास सुरुवात केली. आश्रमातील सवर्ण स्त्रियांनी जेवण सोडून दिले व त्या फलाहार करू लागल्या. अहमदाबादेतील मित्रांनी आश्रमावर बहिष्कार टाकला; मदत बंद केली. पण महात्माजी दृढ राहिले. एक महिना गेल्यावर आश्रमाच्या व्यवस्थाकांनी सांगितले, "आता आश्रम फार दिवस चालू शकणार नाही. पैसे संपत आले आहेत." तरी महात्माजी नमले नाहीत. ते आपल्या भूमिकेपासून तसूभरही ढळले नाहीत. ते कसोटीस पूर्ण उतरले. समाज व काल यांच्या शक्ती त्या वेळी त्यांच्या विरूद्ध होत्या तरी त्यांनी पर्वा केली नाही. त्या तपस्व्याच्या तपश्चर्येने व निष्ठेने ईश्वरी शक्तीला मदतीसाठी धावून येण्यास भाग पाडले ! एके दिवशी एक श्रीमंत गृहस्थ आपल्या मोटरमधून अचानक आश्रमाच्या फाटकाशी आला व महात्माजींना बाहेर बोलावून घेऊन त्यांच्या हाती तेरा हजार रुपयांच्या नोटा ठेवून निघून गेला ! एकनिष्ठेचे फळ मिळाले ! कारण महात्माजींचे सत्य पुराणातले वांगे नव्हते !! धर्मो रक्षति रक्षितः !

पुढे १९३२ मध्ये अस्पृश्यता-निवारणाच्या चळवळीस अनुकूल असा काल आला. तोवर समाजातही जागृती झाली होती. खुद्द अस्पृश्य समाज जागृत होऊन मागण्या करू लागला होता. त्याने चळवळही चालवली होती.

श्री. विनोबाजी वारंवार म्हणत असतात की, व्यक्तीच्या शक्तीहून समाजाची शक्ती मोठी असते, समाजाच्या शक्तीहून कालाची शक्ती मोठी असते, पण ईश्वराची शक्ती सर्वांहून मोठी असते. त्यामुळे आपल्या एकनिष्ठेने व निर्धाराने ईश्वरास प्रसन्न केल्यास तो आयत्या वेळी मदत करून भक्ताची लाज राखतो. आणि असे अनुभव वारंवार येत गेले तर जगण्यात व मानवरूपात ईश्वराची सेवा करण्यात साधकाला परमानंद वाटू लागतो. संतांच्या जीवनात अशा शेकडो बोलक्या घटना झाल्या आहेत.

या तत्त्वनिष्ठेचा यशस्वी परिणाम व्यवहाराच्या भाषेतसुद्धा सांगता येईल. जगात आज सर्वत्र द्वेष, भय व अविश्वास यांचे वातावरण दिसून येत आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर असे वातावरण फारच उग्र झालेले आहे. मधून मधून हिंसक स्फोट होत आहेत. ही परिस्थिति कुणालाही आवडत नाही. पण त्यावर इलाज कोणासच सुचत नाही. राजकीय संघटना व भिन्न भिन्न राष्ट्रांची सरकारे यांवर नियंत्रण आणणे व्यक्तीला शक्य नाही. तरी व्यक्तीने आपला प्रयत्न थांबवावा काय ? मुळीच नाही. समाजाची नैतिक पातळी उंचावली पाहिजे असे आपण म्हणतो तेव्हा कोणता अर्थ आपल्या मनात असतो ? नीतीचा संबंध मानवातील परस्परसंबंधांशी निगडित असतो. परस्परसंबंधांच्या गुणवत्तेलाच नीती म्हणतात. हे परस्परसंबंध शहाणपणाचे व शुद्ध असावे, म्हणून गेल्या हजारो वर्षांपासून समाज व शासनसंस्था प्रयत्न करीत

आहेत. धर्माच्या आज्ञा, शासनाचे कायद, उपदेश, शिक्षण, शिक्षा आणि बक्षिसे, स्वर्गाची लालूच व नरकाचे भय, जुलूम आणि युद्ध या सर्व साधनांनी मानवांना नैतिक दीक्षा दिली जात आहे. तरी अद्याप हे संबंध शुद्ध, सरळ व निर्धास्त झाले नाहीत. याचे कारण असे आहे की, सुधारक स्वत: सुधारला नाही, त्याच्या जीवनात खोलवर परिवर्तन झाले नाही, तर तो दुसऱ्यांना सुधारू शकत नाही. कोणालाही आपणास जबरदस्तीने संस्कार दिले गेल्यास आवडत नाही. मतपरिवर्तनानेही तावडतोब सुधारणा होत नाही. स्वत:स सुधारण्याची इच्छा आतून निर्माण झाली पाहिजे. ती प्रत्यक्ष आदर्शाच्या दर्शनाने व स्वत:वर विश्वास टाकणाऱ्या आप्तांच्या वागणुकीतून निर्माण होते.

स्पष्ट सांगावयाचे म्हणजे सुधारक स्वत: श्रेष्ठ नैतिक शक्तीचा मनुष्य असला तरी ज्या दुसऱ्या व्यक्तीला सुधारण्याची त्याची इच्छा आहे, तिजवर विश्वास ठेवून, तिच्या स्वाभिमानाला धक्का न लावता, आदरपूर्वक व प्रेमपूर्वक तिची सेवा करीत, जरूर तर दीर्घकालपर्यंत त्याला प्रयत्न करावे लागतील. पतंजलीने योगमार्गात प्रवेश करणाऱ्या साधकास " दीर्घकाल, नैरंतर्य व सत्कारपूर्वक'' प्रयत्न चालू ठेवल्यास यश मिळेल, अशी ग्वाही दिली आहे. तसाच प्रकार येथेही समजावा. आपण क्षुद्र आहो, जड-बुद्धी आहो, लवाड आहो, अशा दृष्टीने सुधारक आपणाकडे पहात आहे, असे जर एखाद्या मनुष्याला वाटले तर त्याच्या स्वाभिमानास धक्का बसेल व तो त्या सुधारकाबद्दल अविश्वास तर बाळगीलच, पण पुढेमागे त्याचा द्वेष्टाही बनू शकेल. म्हणून सुधारकाने सर्वांवर प्रेम करून त्यांचे गुण पहावयास शिकले पाहिजे. कारण जगात पूर्ण सद्गुणी व पूर्ण दुर्गुणी अशी व्यक्ती मिळणे कठिणच आहे. शिवाय प्रत्येक मानवात आत्मा असतोच. त्यामुळे नराचा नारायण बनण्याची शक्ती त्याच्यात बीजरूपाने असतेच.

महात्मा गांधींनी याच पद्धतीने व्यक्ती व समाज यांना सुधारले. ते कधी उद्वेगकारक वाक्य बोलत नसत. सर्वांवर विश्वास ठेवून आपली सुधारणा व प्रगती करून घेण्यास प्रत्येकास प्रोत्साहन देत. मनुष्याकडे मनुष्य म्हणून पहाण्याची त्यांची दृष्टी होती. त्यांच्याकडे कसलीच गुप्तता नसे. सारा कारभार उघड असे. त्यामुळे सरकार व त्यांचे विरोधक यांच्या भात्यांतील वाफ आपोआप निघून जात असे. कारण सरकार व विरोधक यांच्यातील सत्तत्त्वावर आपला विश्वास आहे असे ते दाखवून देत असल्यामुळे साहजिकच त्यांनाही महात्माजींवर विश्वास ठेवावा लागे. आपण ज्याला विरोध करीत आहो तो आपणास जिंकू इच्छीत नाही, पण आपले मन वळवू इच्छितो, असे समजून आल्यावर अर्थातच विरोधाचा मोहराच बदलून जातो. त्यामुळे संबंध स्वच्छ होतात, उंचावतात व नैतिक पातळी वर येऊ लागते.

आज जगात नैतिक पातळी खालावल्याचे दिसून येते आहे,याचे कारण मानवांची

मन भयग्रस्त, सशयी व शंकाकुल झाली आहेत. राष्ट्राराष्ट्रांतील संबंध सहज व सरळ नाहीत. प्रत्येक राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राच्या हेतूबद्दल संशय वाटत आहे. ही परिस्थिती बदलावयाची असेल, तर धोका पत्करूनही शेजाऱ्यांवर विश्वास ठेवण्याचे धोरण राष्ट्रांनी स्वीकारले पाहिजे. त्यासाठी परस्परांचे मानस समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महात्मा गांधींनी इंग्रज-सरकार, विरोधक व कार्यकर्ते सर्वांवर विश्वास ठेवून त्यांच्याशी उघड व मोकळी वागणूक ठेवली. कायदेभंग करण्यापूर्वी ते जाहीर सूचना देत व उघडपणे कायदेभंग करीत. परिणामी लोक निर्भय राहिले आणि सरकारलाही गुप्त टेहळणी करण्याची गरज राहिली नाही. उघड हालचालींमुळे असत्याचा लोप होतो. त्यामुळे कोणाची फसवणूक होत नाही; उलट सर्व संबंधितांची जबाबदारी वाढते. शिवाय मानव सर्वत्र एकच आहेत, ही भावना वाढीस लागते.

विश्वास हा जिवंत आणि प्रेरक असतो. विकृत मनाची माणसे क्वचित आढळतात, त्यांची गोष्ट सोडून द्यावी. सर्वसामान्य मनुष्याला विश्वासामुळे ऊब मिळते. माणुसकीची जाणीव होते. एका व्यक्तीपासून सुरूवात करावी; अनेकांना संसर्ग झालेला दृष्टोत्पत्तीस आल्याविना राहणार नाही. हे कसे होते? ते कळले म्हणजे जीवनाचे कोडे उलगडेल. ईश्वरावर श्रद्धा असो वा नसो, मानवांचा परस्परांवर विश्वास असेल, तर त्यांचा विकास अवश्य होईल. कारण भिन्न देहधारी मानवांत एकच चैतन्य अनुस्यूत आहे. स्थूल दृष्टीने पाहिले तरी प्राण्यांमध्ये मनुष्यांची एक स्वतंत्र व अखंड जात आहे. वंश, राष्ट्र, संस्कृती, जात, धर्म, शिक्षण, बुद्धी, आर्थिक व सामाजिक पायरी . . कोणतीही बाब घेतली तरी मनुष्य हा सर्वत्र मनुष्यच आहे. सर्व मानवांना मनही सारखेच असते—गुणधर्माच्या दृष्टीने; इंद्रियेही सारखीच असतात. शरीरांची आंतरघडण देखील सारखीच असते. सर्वांचे रक्त लाल असते. सर्वांना मेंदू असतो. पशुपक्ष्यांपेक्षा मानवांची मुले सर्वत्र अधिक परावलंबी असतात. सर्व मानव एकमेकांशी व्यवहार करताना भाषेचा उपयोग करतात. मानवांतील साम्य विचार केल्यास वाढते असे दिसून येईल. या साम्याची सतत जाणीव ठेवल्यास भिन्नत्व तोकडे होत जाईल. म्हणून मनुष्य सर्वव्यापी व सर्वांतर्यामी ईश्वराला मानो अगर न मानो, त्याला मानवांतील एकतेची जाणीव झाली तर तो महात्मा गांधींच्या अहिंसा तत्त्वाला मान्यता दिल्याविना राहणार नाही.

३३

# गांधीजींची जीवन-मूल्यें

**वि. स. पागे**

गांधीजींच्या अकरा व्रतांत अपरिग्रह हे एक आहे. त्याच्या अर्थाची व आशयाची व्याप्ती किती आहे, हे उपनिषदांच्या आधारे पुढील लेखात विवेचिले आहे. त्याच्या अनुषंगाने विश्वस्त कल्पनेचाही विचार त्यात केला आहे.

आज आपल्याला अपरिग्रहासंबंधी गांधीजींच्या विचारांचा परामर्श घ्यावयाचा आहे. महात्माजींच्या मनाची अपरिग्रहाच्या विचारांनी कशी पकड घेतली, याचे मोठे मनोवेधक वर्णन त्यांनी आपल्या 'आत्मकथेत' दिलेले आहे. सन १९०३ च्या आसपासचा काल होता तो. थिऑसफिस्ट लोकांच्या संगतीत गांधी आले होते. त्या वेळी गांधींनी काही हिंदू धर्मग्रंथांचे वाचन केले. त्यामध्ये स्वामी विवेकानंदांचे 'राजयोगा' हे पुस्तक आपल्या मित्रांच्यावरोवर वाचल्याचे त्यांनी नमूद केले आहे. तसेच, पतंजलीची योगसूत्रेही भगवद्गीतेवरोवर त्यांनी इतरांच्याबरोबर बसून वाचल्याचे लिहिले आहे. या दोन्ही ग्रंथांत अपरिग्रहाचा उल्लेख आला आहे. पातंजल योगसूत्रांमध्ये 'अहिंसा सत्यमस्तेय ब्रह्मचर्यपरिग्रहाः यमाः...' असे तिसावे सूत्र आहे व त्यापुढेच, 'ये ते जाति-देश-काल-समयानवच्छिन्नाः सार्वभौमा महाव्रतम्,' असे एकतिसावे सूत्र आहे. सत्य, अहिंसा, चोरी न करणे, ब्रह्मचर्य यांबरोबरच अपरिग्रहाची महाव्रतां-

मध्ये गणना केली आहे. जो मनुष्य दुसऱ्याच्या देणग्या स्वीकारतो तो पतित होतो, त्यामुळे माणसाचे स्वातंत्र्य जाऊन गुलामीची मनोवृत्ती तयार होते–असे विवेकानंदांनी अपरिग्रहावर भाष्य केले आहे व Non-receiving असे त्या शब्दाचे भाषांतरही केले आहे. याला 'सार्वभौम महाव्रत' म्हटले आहे. कारण ही व्रते सर्व माणसांनी देश-काल-परिस्थिती कशीही असली तरी, आचरणाला योग्य आहेत. गीतेत सहाव्या अध्यायात दहाव्या श्लोकात हा शब्द आला आहे. 'साधुषु अपि च पापेषु समबुद्धि: विशिष्यते' असे समबुद्धीचे विवेचन ९ व्या श्लोकात संपवून, योग्याने योगाभ्यास कसा करावा, हे सांगताना, 'योगी युञ्जीत् सततं आत्मानं रहसि स्थित:। एकाकी यतचित्तात्मा निरायशीरपरिग्रह:' असे दहाव्या श्लोकात सांगितले आहे. एकांतात योग्याने सतत योग्याभ्यास करावा, शक्य तो एकटे राहावे, मन ताब्यात ठेवावे, आहार परिमित असावा आणि संग्रहाचा त्याग करावा.

गांधीजींनी 'अपरिग्रह' या शब्दाचा अर्थ देणगी न घेणे यापासून संग्रह न करणे येथपर्यंत वदलला आहे. या काळात रोज गीतेचे दोन श्लोक पाठ करण्याचा गांधींचा परिपाठ होता. वर उल्लेखिलेल्या सहाव्या अध्यायातील नवव्या व दहाव्या श्लोकांनी त्यांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. समभाव व अपरिग्रह, या दोन विचारांनी त्यांच्या मनाची पकड घेतली. सर्वांशी समभाव कसा धरावयाचा, हे त्यांना कोडे पडले होते. मोठ्या भावपूर्ण शब्दांत ते अपरिग्रहाबद्दल लिहितात :

"कसे सर्व संग्रह सोडू? शरीरही संग्रह नाही का ? आणि वायका-मुलांचे काय ? हे पुस्तकांचे कपाट नष्ट करू ? का सारे सारे सोडून ईश्वराचा रस्ता धरू ?'' गांधी लिहितात, "एकदम सरळ उत्तर मिळाले सारे काही सोडल्यावाचून देवाच्या मार्गावर मी पाऊलच टाकू शकत नाही.'' झाले, या विचारांनी गांधीजींच्या जीवनांत क्रांती घडून आली. लागलीच त्यांनी रेवाशंकरभाईंना पत्र लिहिले. आपला विमा रद्द करून टाकला. त्या वेळी गांधी आफ्रिकेत होते. त्यांनी हिंदुस्थानात भावाला पत्र लिहिले, आतापर्यंत "मी केलेली सारी वचत तुम्हाला देऊन टाकीत आहे. मात्र आता माझ्यापासून आपण काही अधिक अपेक्षा करू शकत नाही. येथून जे मिळवीन ते सारे समाजासाठी उपयोगात आणले जाईल.'' गांधी म्हणतात, "माझी आता खात्री झाली आहे की, ज्यांनी मला, माझ्या पत्नीला, मुलाला उत्पन्न केले, तो परमेश्वर काळजी घेईल.'' मात्र गांधीजींच्या बंधूनी त्यांना कळविले, " तूं माझ्यासंबंधीच्या कर्तव्याची जाणीव ठेव, आणि आपल्या वडिलापेक्षा अधिक शहाणे वनण्याची आकांक्षा करू नकोस.'' गांधींनी मोठ्या नम्रतेने उत्तर पाठविले, "आपल्या वडिलांनी जे केले तेच मी करीत आहे. फक्त मी कुटुंब या शब्दाच्या अर्थाचा विस्तार करीत आहे. मी जे पाऊल उचलीत आहे, त्यातील शहाणपणा हळू हळू प्रकाशात येईल.'' गांधींच्या बंधूंना हे पुरे पटले आणि त्यांनी आपली मुले शिक्षण-संवर्धनासाठी गांधींच्या स्वाधीन केली. अशी

'अपरिग्रह' या गीतेतील कल्पनेने,गांधींच्या जीवनात अक्षरश: क्रांती घडवून आणली.

अपरिग्रहाचे व्रत स्थिर झाले म्हणजे काय होते, हे पातंजल योगसूत्रांत वर्णिले आहे. 'अपरिग्रहस्थैर्ये जन्मकथतां संबोध' असे ते सूत्र आहे. याचा अर्थ अपरिग्रह स्थिर झाला की जन्म कशासाठी झाला आहे हे समजते. याचाच अर्थ जीवनाचे ध्येय स्पष्ट होते. विवेकानंदांनी 'पूर्वजन्मस्मृती जागी होते' असा या सूत्राचा अर्थ लाविला आहे. गांधींना आता आपल्या जीवनाचे ध्येय समजले–जणू पूर्वजन्मसंस्कार जागे झाले. गांधी बॅरिस्टर होते, आणि आफ्रिकेतील या काळी ते तो व्यवसाय करीत असत. स्नेल या ग्रंथकाराच्या इक्विटीवरील ग्रंथामधील. विश्वस्तासंबंधीचे विचार या वेळी त्यांच्या मनामध्ये आले. गांधीजींच्या विश्वस्त सिद्धांताचा उगम याच वेळी झाला. ज्युरिस्प्रुडन्स, म्हणजे कायद्याच्या तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आता त्यांना अधिक आदरणीय वाटू लागला. गांधी लिहितात, "त्या ग्रंथात मला आता धर्माचा शोध लागला. मला आता गीतेतील अपरिग्रहाचा अर्थ समजला.ज्याला मोक्ष हवा आहे, त्याने विश्वस्ता-सारखे वागले पाहिजे. कितीही संपत्ती ताब्यात असो, एक कण आपला मानू नये, हा तो अर्थ होय." याचबरोबर गांधीजींना हेही कळून चुकले की, अपरिग्रह ही एक उच्च मानसिक अवस्था आहे, ते एक अंत:करणाचे पूर्ण परिवर्तन म्हटले तरी चालेल.

हिंदुस्थानात येण्यापूर्वीच गांधींच्यात हे परिवर्तन झाले होते. हे परिवर्तन होताच गांधींनी या तत्त्वाचा व्यवहारात अमल सुरू केला. शंभर एकर जागा खरेदी करून त्यांनी फीनिक्स वसाहतीची स्थापना केली,आपली सर्व मिळकत सार्वजनिक ठेवली, पुढील सत्याग्रहाच्या काळात एका जर्मन मित्राच्या साहाय्याने टॉलस्टॉय फार्म काढले. अपरिग्रहाच्या विचाराने गांधींचे घर सुटले ते कायमचेच. ते अनिकेत–विश्वकुटुंबिक–बनले. एके ठिकाणी गांधींनी म्हटले आहे की, ज्यांचा आपण अमल करू शकत नाही.–अगर काहीही उपयोग करू शकत नाही, असे विचार उगाच मेंदूत साठविणे, म्हणजे परिग्रहाचे पाप करणे होय. म्हणून गांधींनी अपरिग्रहाचा नुसता विचार केला नाही, तर आचार केला. हा गांधींचा अपरिग्रहाचा विचार भारतातील धर्मग्रंथांत अगदी उपनिषत् कालापासून आपणाला आढळेल. सर्वात जुने पहिले उपनिषत् म्हणजे ईशावास्योपनिषद्. त्यातील पहिल्या श्लोकात

तेन त्यक्तेन भुञ्जीथा:
मा गृध: कस्यस्वित् धनम् ।

(ते तू त्यागून भोग. दुसऱ्या कोणाचेही धन लुवाडू नकोस.)

गांधीजींच्या मनावर याचा एवढा परिणाम होता की, ते म्हणत सारे धर्मग्रंथ जरी नष्ट झाले, आणि त्या प्रलयातून एवढा एक श्लोक जरी राहिला तरी सारी धर्मसृष्टी पुन्हा उत्पन्न होईल, इतक्या मोलाचा हा विचार आहे. अनेक साधुसंतांनी

संग्रह न करण्याच्या वृत्तीबद्दल लिहिले आहे. या असंग्रही वृत्तीच्या धर्मपुरुषांना ईश्वराच्या अस्तित्वाचा आधार वाटे. आपले भरणपोषण तो करील, हा भरवसा वाटे. मूलत: अपरिग्रहाची कल्पना आजवर तरी धर्मविचारांतच दिसून येते. म्हणून ती ईश्वराच्या कल्पनेशी जोडली आहे.

भोजनाच्छादने चिन्तां,
वृथा कुर्वन्ति वैष्णवा: ।
यो सौ विश्वंभरो देव:
स भक्तान् किमुपेक्ष्यते ॥

अन्नवस्त्राची वृथा चिंता वैष्णवांनी करू नये. विश्वाचे भरपोषण करतो तो विश्वंभर. तो सर्व पाहील. महाराष्ट्रीय संतांनी म्हटले आहे.

सकल जीवांचा करितो हा संभाळ ।
तुज मोकलील ऐसे नाही ॥

बायबलमध्ये हा विचार आला आहे. पशु, पक्षी, यांच्या खाण्यापिण्याची चिंता त्यांचा निर्माता करतो. तुकाराममहाराजांनी म्हटले आहे–

पक्षियांचे घरी नाही सामुग्री ।
त्यांची चिंता करी नारायण ॥

लहान मुलांना कोण सांभाळतो–

जब दात न थे–तब दूध दिया
अब दात दिये–कहाँ अन्न न देय ?

जेव्हा दात नव्हते तेव्हा देवाने दूध दिले. तो आता त्यानेच दात दिले असताना अन्न देणार नाही का ? जरूरीपुरते अन्न ईश्वर अवश्य देतो. असा विचार अनेक वेळा केला आहे. या विचाराचा अतिरेक कधी कधी ‘ ईश्वरावर भरोसा असेल तर तो श्रम न करणाऱ्यालाही देतो ’, असे करण्यापर्यंत आला आहे.

अजगर करे न चाकरी– पंछी करे न काम ।
दास मलूका यों कहे–सब का दाता राम ॥

पण यामुळे आळसाची वृद्धीच होईल. आणि झालीही !

असेल माझा हरी–तर देईल खाटल्यावरी ।

ही वृत्ती वळावली. असे अतिरेकी उद्‌गार सोडले तरी संतांच्या वचनांत उघड उघड कर्मप्रेरणा आहे. कर्माप्रमाणे ईश्वर फल देतो, हा विचार काटेकोरपणे बजावून सांगितला आहे.

राम झरोके बैठकर–सब का मुजरा लेत,
जितनी जाकी चाकरी–उतना वाको देत ॥

‘ शक्तीप्रमाणे काम करा, आणि कामाप्रमाणे दाम मिळेल ’ हे समाजवादी सूत्रच

यामध्ये आहे. पण कामाचा दाम नक्की कोण करणार? तेंव्हा आवश्यकतेनुसार देव देतो, हा विचार पुढे आला.

चिंटीको कण– और हाथीको मण देता है ।

देव मुंगीला एक कण व हत्तीला एक मण खाना देतो.म्हणजे आवश्यकतेनुसार पुरवठा हे तत्त्व प्रतिपादिले आहे. पण आवश्यकता तरी कशी ठरवावयाची व गरजा किती ठरवावयाच्या, हा विचार शिल्लक राहतोच. यासंबंधी गांधींचे विचार मननीय आहेत. हिंदुस्थानातील सार्वत्रिक दारिद्रय आणि व्यक्तीमधील संग्रही वृत्ती गांधींनी पाहिली. म्हणून त्यांनी आपले विचार असे मांडले आहेत:–'गरजा कमीत कमी केल्या पाहिजेत. गरजांच्या नावाखाली संग्रहवृत्ती वळावते.' अकाल, दुर्भिक्ष्य, रोग, वृद्धावस्था याकडे पाहून चातुर्य, दूरदर्शीपणा, व्यवहारकुशलता या नावाखाली माणसे संग्रहच करीत रहातात. संग्रहाचे महापरिणाम सामाजिक उत्पात घडून येतात. रोगाची जशी साथ फैलावते तशी राष्ट्रे उद्ध्वस्त करणारी साथ समाजांतील नेते पुरुषांच्या लोभाने, संग्रही वृत्तीने निर्माण होते,' असे आयुर्वेदात वर्णिले आहे. चरक संहितेतील जनपदोद्ध्वंसनीयविमानम् प्रकरण वाचनीय आहे. एवढेच नाही तर या संग्रही वृत्तीला पावित्र्यही प्राप्त झाले आहे. जिकडे तिकडे आपण काटकसरीची व बचतीची स्तुती ऐकतो. जोडणे, संभाळणे, प्रसंगी गरजेप्रमाणे उपयोग करणे हे सगळे चांगले गुण आहेत. हे परिग्रहाच्या आणि अपरिग्रहाच्या समर्थनार्थ जे विचार पुढे आले आहेत, ते सारे परीक्षिले तर त्यातून काय बोध होतो हे पाहणे जरूरीचे आहे. पैसा मिळविण्यास हरकत नसावी, परिमित संग्रहास हरकत नसावी. महात्मा गांधींनी दोन गोष्टींचा निषेध केला आहे. 'स्वामित्वाची फाजील भावना आणि अपरिमित संग्रह.' पदार्थांचा उपयोग देखील उधळपट्टीने करता उपयोगी नाही, हात राखून केला पाहिजे, असे इस्लाम-धर्म-संस्थापक हजरत महंमद यांनी सांगितले आहे. निर्वाहादाखल परिश्रमाचा संत निषेध करीत नाहीत. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचारे वेच करी । उत्तमचि गति तो एक पावेल ।' असे श्रीतुकारामांनी म्हटलेच आहे. खरी संपत्ती चारित्र्यबल ही आहे. पण तिचादेखील समाजासाठी उपयोग केला पाहिजे.

विश्वस्ताच्या कल्पनेसंबंधी आणखी थोडा विचार करणे अपरिहार्य आहे. विश्वस्त कल्पनेत स्वामित्वाच्या कल्पनेचा निषेध असला तरी तावा हातातच राहतो. म्हणून 'त्या कल्पनेशी भलेबुरे सहचारी भाव जोडले आहेत व त्या कल्पनेचा दुरुपयोग होण्याचा संभव आहे,' असे विनोबांनी म्हटले आहे.काही साम्यवाद्यांनी तर, गांधींच्या विश्वस्त कल्पनेत, पुंजीवादास पुष्टी दिली आहे, असे म्हटले आहे. पूर्ण विचारांती मी सांगू इच्छितो की, गांधींची विश्वस्ताची कल्पना पुंजीवादाला मुळीच पुष्टी देत नाही. समाज जेवढे स्वामित्व मान्य करतो, तेवढे सोडून बाकीच्या मिळकतीचा वापर व्यक्तींनी कसा करावा, हे कायद्यांनी ठरविण्यास गांधी अनुकूल होते. गांधींचा

विरोध होता तो सक्तीने मिळकत काढून घेण्यावर. समाजाची बंधने तोडली तर त्याचा परिणाम मिळकत काढून घेणे. सरकार मूलत: हिंसेवर अवलंबून असते. ते शस्त्रावर चालते. त्यात त्याने हिंसा करून अर्थबलही हाती घेतले तर मानव गुलाम होईल. ही भीती त्यांना वाटत होती. गांधींना थोड्या लोकांची राज्यसत्ता नको होती. त्यांना मूठभर क्रांतिकारक नको होते. यासाठीच त्यांनी अहिंसक चळवळी केल्या. त्यांना विपुल संपत्ती नको होती असे नाही. पण ती थोड्या लोकांच्या घरी नव्हे, सरकारच्या खजिन्यात नव्हे, तर घरोघरी साठविलेली हवी होती. आवश्यक ती मिळकत सार्वजनिक मालकीची असली पाहिजे, असे त्यांनी अनेक ठिकाणी प्रतिपादिले आहे.

अपरिग्रहाच्या या साऱ्या गांधींच्या विचारांतून काही निश्चित निष्कर्ष निघू शकतात. संपत्ती श्रमाने मिळविली पाहिजे, गरजा कमीत कमी केल्या पाहिजेत, उरलेली संपत्ती समाजासाठी वापरली पाहिजे, ती समाजासाठी कशी वापरावी यासाठी जागृत लोकमताने—प्रातिनिधिक लोकमताने—केलेला कायदा पाळला पाहिजे. याशिवाय उरलेली संपत्ती समाजाच्या मालकीची असली पाहिजे. अपरिग्रहातून निघालेल्या विश्वस्त सिद्धांताचे हे अर्थ आहेत. पण अपरिग्रह ही मूलत: मानसिक स्थिती आहे. ' गांधींनी सत्यादी नैतिक मूल्यांना अध्यात्माचा नैतिक दर्जा दिला हा एक तऱ्हेने जैन तत्त्वज्ञानाच्या परंपरेचा परिणाम आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. विकारांची उत्पत्ती न होणे या अवस्थेला अहिंसा म्हणतात.' हे जसे जैन तत्त्वज्ञानात सांगितले, तसेच आचार्य रजनीशांनी, ' विचारांचाही परिग्रह जेथे नाही त्या अवस्थेला अपरिग्रह ' म्हटले आहे. गांधींनी शरीर-धारणेला व थोड्याशा आसक्तीलाही परिग्रह मानले व त्याज्य मानले. पण महात्मा गांधींचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी हे गूढ तत्त्वज्ञान वैयक्तिक व सामाजिक व्यवहारात कसे आणता येईल, ते स्पष्ट केले व स्वत:पुरते ते आचरणात आणले.

३४

# म. गांधींची सर्वांगीण क्रांति

दा. न. शिखरे

क्रांती म्हणजे मोडतोड, जाळपोळ, रक्तपात, हिंसा हा रूढ अर्थ उथळ व भ्रामक आहे. फ्रान्स, अमेरिका, रशिया किंवा चीन यांमधील क्रांत्यांमध्ये हे सारे प्रकार घडले असले तरी, तेवढ्यावरूनच त्या घटनांचे क्रांतिकारत्व ठरत नाही. त्या क्रांत्यांमुळे सर्वसामान्य मानवाच्या जीवनमूल्यांत जे परिवर्तन घडून आले असेल, त्यावरून त्या क्रांत्यांचे गौरव वा लाघव ठरते. समाजाला नवें अधिष्ठान मिळवून देणे, हा क्रांतीचा खरा अर्थ व आशय. गांधीजींनी सर्वांगिण क्रांति कशी केली, याचें विवेचन पुढील लेखात केलें आहे.

गांधीजींनी व्यक्ति-जीवन व समाजजीवन यांमध्ये कधी फरक केला नाही, त्याचप्रमाणे एका व्यक्तीच्या जीवनातही निरनिराळे कप्पे त्यांनी कधी मानले नाहीत. सर्व जीवन एकजिनसी, एकसंध आहे, असे ते मानीत. राजकीय, सामाजिक, आर्थिक असे भेद जसे ते मानवी जीवनात करीत नसत, त्याचप्रमाणे खाजगी जीवन व सार्वजनिक जीवन यांत ते भेद करीत नसत. सर्व जीवन सलग आहे आणि म्हणून सर्वांगांनी त्याचा विकास व्हावयास हवा, असा त्यांचा आग्रह असे.

आपल्या जीवनाचे ध्येय आत्मसाक्षात्कार हे आहे, मोक्ष-प्राप्ती हे आहे—असे त्यांनी

पुन:पुन. नि:संदिग्धपणे म्हटले आहे. " ईश्वराला समोरासमोर पहावे अशी मला तळमळ आहे." असे त्यांनी 'आत्मकथे 'त व अन्यत्र अनेक वेळा स्पष्टपणे सांगितले आहे. ' माझे जीवितकार्य ' या आपल्या लेखात १९२४ साली त्यांनी असा स्पष्ट खुलासा केला आहे की, " याच देही आत्मसाक्षात्कार व्हावा, मोक्ष मिळावा, म्हणून मी उतावीळ झालेलो आहे. देहाच्या बंधनातून माझा आत्मा मुक्त करण्याचे शिक्षण घेण्याचे एक अंग म्हणजे माझी देशसेवा आहे. माझा मोक्षाचा मार्ग म्हणजे, स्वदेशसेवेसाठी–आणि त्या द्वारा मानवतेच्या सेवेसाठी–अविरत परिश्रम करणे. प्रत्येक प्राणिमात्राशी तादात्म्य पावण्याची माझी इच्छा आहे. गीतेच्या भाषेत सांगावयाचे तर, ' समः शत्रौ च मित्रे ' असे मला व्हावयाचे आहे. "

तुकाराम किंवा तुळशीदास, मीराबाई किंवा मुक्ताबाई यांची ईश्वरावर जितकी श्रद्धा होती, तितकीच गांधीजींची होती; आणि ईश्वराच्या दर्शनासाठी प्राचीन साधुसंतांना जितकी तळमळ होती, तितकीच गांधींजींनाही होती. " शाश्वत मुक्तीच्या व चिरंतन शांतीच्या भूमीकडे चालू असलेल्या माझ्या प्रवासातील एक टप्पा म्हणजे माझी देशभक्ती. " असे त्यांनी निभ्रांत विधान केले आहे. अध्यात्मातील ते एक श्रेष्ठ साधक होते. पण त्यांनी आध्यात्मिक परंपरेत दोन परिवर्तने घडवून आणली. एक म्हणजे, वैयक्तिक धर्मसाधनेला त्यांनी सामुदायिक धर्मसाधनेची जोड दिली. " मी हिमालयात न जाता समाजात राहूनच ईश्वराच्या लेकरांची सेवा करीन आणि त्या द्वारे मोक्षप्राप्ती करून घेईन. " असा त्यांचा संकल्प होता. जन-सेवेने ईश्वर-सेवेचा मार्ग त्यांनी स्वीकारला होता; त्यासाठी त्यांनी ५ आश्रम स्थापिले व ११ व्रते निश्चित केली. पूर्वीच्या यम-नियमादी साधनांवरच ही व्रते आधारलेली आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी ' अहिंसा ' हा शब्द पतंजलीच्या ' वैरत्याग ' या अर्थाने वापरला आणि ' अहिंसा म्हणजे अपार प्रेम ' असा विधायक आशय त्या शब्दात भरला. आश्रम म्हणजे सामुदायिक रीतीने धार्मिक जीवन घालविण्याचा संघ, असे ते मानीत. मोक्षार्थींचा मेळावा, या दृष्टीने त्यांनी आपले सर्व आश्रम चालविले, एवढेच नव्हे तर, सर्व समाजातून असत्य, कपट, हिंसा, द्वेष हे दोष नाहीसे होऊन प्रेम निर्माण व्हावे, यासाठी त्यांनी जन्मभर अखंड प्रयत्न केले. म्हणून "सामुदायिक साधुत्वाचा प्रथम प्रणेता" असे त्यांना म्हटले जाते. सॉक्रेटिसानंतर गांधीजींएवढा सत्यनिष्ठ पुरुष जगाच्या इतिहासात दुसरा झाला नसेल. ते म्हणत, "We must speak the truth under a shower of bullets."

वैयक्तिक व सामुदायिक जीवनांचा संयोग साधण्याचा त्यांनी जसा प्रयत्न केला, त्याप्रमाणेच आध्यात्मिक क्रांतीला भौतिक क्रांतीची जोड देण्याचा उद्योगही त्यांनीं केला.पूर्वीचे साधु-संत वैयक्तिक मोक्षाकडेच लक्ष लावीत असत, पण गांधीजींनी त्या मोक्षाच्या ध्रुवताऱ्यावर आपली दृष्टी अविचल ठेवूनही, परिस्थितीत सुधारणा

करण्याचे, राष्ट्राचे पारतंत्र्य नष्ट करण्याचे, दलित जनतेचा उद्धार करण्याचे व्रत अविरत चालविले. स्वातंत्र्यप्राप्ती, अस्पृश्यतानिवारण, ग्रामोद्योग, गोरक्षण, दारुबंदी, निसर्गोपचार इत्यादी "आब्रह्मस्तंव" अशी असंख्य कार्ये गांधीजींनी हाती घेतली, पुढे चालविली आणि काही तडीस नेली, हे खरे असले तरी, त्यांच्या जीवनाचे एकमेव व अंतिम साध्य आत्मसाक्षात्कार हेच होते. धार्मिक साधनांच्या व उपासनेच्या मार्गात परिवर्तन करून गांधीजींनी आध्यत्मिक क्रांती घडवून आणण्यास प्रारंभ केला. त्यांना या बाबतीत कोणी गुरू भेटला नाही की सिद्धी प्राप्त झाली नाही, पण ते एक अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे साधक होते, यात शंका नाही. प्रख्यात तत्त्वज्ञ गुरुदेव रानडे यांनी The Conception of Spiritual Life in Mahatma Gandhi या आपल्या पुस्तकात गांधीजींच्या अध्यात्म–साधनेची चिकित्सा सूक्ष्मतेने केली आहे आणि परमार्थाच्या वाटेवर गांधीजी कोणत्या मुक्कामावर जाऊन पोचले होते, याचे सयुक्तिक विवेचन केले आहे. गांधीजींचे उद्‌गार व कार्य यांची कठोर चिकित्सा करून गुरूदेव रानडे असा निष्कर्ष काढतात की, "अनुभवाचे सामर्थ्य, मनाचा समतोलपणा, संदेशाच्या शब्दाबरहुकूम नंतर घडलेली वस्तुस्थिती– या सर्वांवरून हा देवाकडून मिळालेला संदेश सत्य होता, हे निःसंशयपणे सिद्ध होते."

अर्थात हा "आतला आवाज ' ऐकण्याची पात्रता गांधीजींना एकाएकी प्राप्त झाली असे नव्हे. प्रस्तुत लेखक १९४४ साली गांधीजींना भेटण्यासाठी येरवड्याच्या तुरुंगात गेला असताना, त्याने त्यांना विचारले, "एकाग्रता साधली म्हणजे मनुष्याच्या मनात एखादा नवाच विचार चमकून जातो, त्याहून आपला 'आतला आवाज ' भिन्न आहे काय ?" तेव्हा गांधीजींनी ठासून "होय" असे उत्तर दिले. त्यावर, हा "आतला आवाज कसा ऐकू येतो ?" अशी पृच्छा प्रस्तुत लेखकाने केली असता गांधीजींनी उत्तर दिले, "लोकमान्य तिलक-महाराजांनी गीतारहस्यात सांगितल्याप्रमाणे, यम-नियमांचे पालन केल्याने हा आवाज ऐकू येतो." गांधीजींनी स्वतः यम - नियमांचे असे पालन किती काटे-खोरपणे व कठोरपणे केले होते, हे प्रसिद्धच आहे. त्या साधनेमुळे, त्या तपस्येमुळे, ते सामान्याचे असामान्य झाले– अल्पात्मा होते, ते महात्मा बनले.

या त्यांच्या अध्यात्म-साधनेच्या तीन अवस्था गुरुदेव रानडे यांनी वर्णन करून स्पष्टपणे सांगितल्या आहेत. वरील पुस्तकात ते म्हणतात, "त्यांच्या पारमार्थिक प्रगतीत तीन अवस्था आहेत असे आम्हास वाटते. प्रथम अवस्थेत अनाहत नादाशी समान अशा त्यांच्या 'आंतील आवाजा' बद्दल त्यांचे अनेक उद्‌गार आहेत. दुसऱ्या अवस्थेत या आंतर आवाजातून त्यांना अनेक संदेश मिळाल्याचे निर्देश आहेत. हे संदेश काय होते, हे मात्र त्यांनी सांगितले नाही.

शेवटच्या अवस्थेविषयी त्यांचे दोन उद्‌गार अगदी निःसंदिग्धपणे निर्दिष्ट आहेत. यांत त्यांना संदेश कोणत्या शब्दात मिळाले, हे त्यांनी विस्तृतपणे सांगितले आहे.''

तरीसुद्धा, प्रश्न असा उरतो की, या अवस्थांतून गेल्यानंतर गांधीजींना आपले अंतिम साध्य प्राप्त झाले का? त्यांना आत्मसाक्षात्कार झाला का? ईश्वराचे दर्शन घडले का?

या प्रश्नांना खुद्द गांधींनी स्पष्ट उत्तर कोठे दिलेले नाही. पण गुरूदेव रानड्या-सारख्या अधिकारी पुरूषाने असा निष्कर्ष सांगितला आहे की, "दीर्घ व घन अंधारमय रात्रीत गांधींना प्रवास करावा लागला व शेवटी त्यांना परमेश्वराचे अंधुक दर्शन घडले.'' ते परमेश्वर-दर्शन स्पष्ट व सतत व्हावे, यासाठी गांधीजींनी आमरण अध्यात्म-साधना केली; एवढेच नव्हे तर, त्यांनी धर्मसाधनेत अपूर्व क्रांती केली.

गांधीजींचे राजकारण ही एक धर्म-साधनाच होती. "माझ्या दृष्टीने धर्मशून्य राजकारण असूच शकत नाही—धर्मशून्य राजकारण म्हणजे मृत्यूचा सापळा. राजकारण हे धर्माला पोषक असले पाहिजे.'' ही आपली भूमिका त्यांनी वारंवार स्पष्ट केली आहे. राजकारणाच्या आखाड्यात उतरण्याची त्यांना इच्छाच नव्हती. पण परिस्थितीनेच त्यांना त्यात ओढले. दक्षिण आफ्रिकेत काय, चंपारण्यात काय, किंवा अखिल भारतात काय, त्यांनी जे जे लढे केले, ते त्यांनी स्वेच्छेने—स्वयंप्रेरणेने निर्माण केलेले नव्हते—परिस्थितीने ते त्यांच्यावर लादले—आणि ते त्यांनी धर्मनिष्ठेने, आपल्या आध्यात्मिक साधनेचे अंग म्हणून, जन्मभर चालविले. अध्यात्म म्हटले की, अभय, संशुद्धी इत्यादी दैवी गुण आलेच. त्या गुणांचा प्रवेश राजकारणात करण्यासाठी गांधीजींनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. राजकारण म्हणजे रजोगुणाचा गोळा. त्याला अध्यात्माची ऊब देण्याचा त्यांचा उद्देश होता. "राजकारण अध्यात्ममय केले पाहिजे—नीतिमय बनविले पाहिजे,'' असे मत न्या. रानडे, ना. गोखले इत्यादी विचारवंतांनी पूर्वी मांडलेले होते. पण त्या मताचा प्रत्यक्ष आचार गांधीजीइतका अन्य कोणी क्वचितच केला असेल. त्यासाठी साधनशुचितेचा आग्रह त्यांनी जितका धरला, तितका अन्य कोणी सहसा धरला नसेल. "शत्रूवर प्रेम करा'' हा येशूचा संदेश अधिकात अधिक आचरिला असेल तर तो गांधीजींनीच. "द्वेष ब्रिटिश शासनपद्धतीचा करा—ब्रिटिश लोकांचा नव्हे.'' असा अट्टाहास त्यांनी केला. त्यामुळे ब्रिटिश साम्राज्याला सुरुंग लावणारा व स्वतंत्र झालेला भारत आजही, ब्रिटिश राष्ट्र-समूहात, कोणताही कटुभाव न बाळगता, नांदत आहे. उलट, साम्राज्यच्युत झालेली ब्रिटिश जनताही भारताबद्दल द्वेष बाळगीत नाही. म्हणून तर जगप्रसिद्ध इतिहासकार मि. टॉयनबी यांनी म्हटले, "Gandhiji is a great benefactor of India and England too." याच्याही पुढे जाऊन अमेरिकेचे राजदूत मि. चेस्टर बौल्स् यांनी गांधीजींच्या

कार्याचे मूल्यमापन पुढील शब्दांनी केले – "Everybody on earth has been affected by Gandhi." अखिल मानवजातीचा उपकारकर्ता म्हणून गांधीजी असे गौरविले गेले. याचे कारण साधनशुचिता हे जसे आहे, त्याचप्रमाणे सत्याग्रह हेही आहे.

सत्याग्रहाचा शोध गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत लागला. टॉलस्टॉय व थोरो यांचे ग्रंथ वाचल्यामुळे त्यांच्या सत्याग्रही विचारांना पुष्टी मिळाली हे खरे. पण ते वाचण्यापूर्वीच त्यांनी आपले सत्याग्रहाचे शास्त्र स्वतःच बनविले होते व आचरिलेही होते. सत्याग्रह म्हणजे अन्याय-निवारण. शस्त्रांनी अन्यायाचे निवारण करण्याचा जुना मार्ग सुसंस्कृत मानवाला घृणास्पद वाटू लागला होता आणि बुद्धिवादाने किंवा लोकशाहीतील मतदानाने अन्याय-निवारणाचा उपाय बोथट ठरला होता. स्वतः क्लेश सोसून, ईश्वराचा धावा करून, अन्यायी प्रतिपक्ष्याचे हृदयपरिवर्तन करावे, हे सत्याग्रहाचे नवे तंत्र गांधीजींनी सामुदायिक प्रमाणावर प्रथमच उपयोगात आणले. सज्जनांचे दुःखपाहून इतरांचे हृदय कळवळते, हा सार्वत्रिक अनुभव आहे. पण आपल्या सेवेने समाजाचे प्रेम एखाद्याने संपादन केले असेल, तर त्याचा अकारण छळ झालेला पाहून तो समाज द्रवल्याशिवाय, क्षुब्ध झाल्याशिवाय, प्रतिकारास सिद्ध झाल्याशिवाय, राहत नाही. जनताजनार्दनाचा हा पाठिंबा हेच गांधीजींचे मोठे बल होते.

ईश्वरी कृपा-हे सत्याग्रहाचे मुख्य बल होय, अशी गांधीजींची ठाम श्रद्धा होती. पण ती ज्यांना लाभली नसेल अशा जडवादी लोकांनाही हे पटावयास हरकत नाही की, सेवाभावी सज्जनांच्या क्लेशामुळे निर्माण झालेला लोकक्षोभ कोणताही अन्याय निवारण्यास समर्थ असतो. असहकार व कायदेभंग ही त्या सत्याग्रहाचीच दोन अंगे होत. परिस्थितीप्रमाणे सत्याग्रहाची स्वरूपे भिन्न-भिन्न असू शकतील, पण सत्याग्रहाचा आत्मा म्हणजे अहिंसा, म्हणजेच स्वतः क्लेश सोसून, प्रसंगी मरणही पत्करून, अन्यायाचे निर्दाळण करणे. प्रकाश नसेल तर सूर्य नाही; त्याप्रमाणे प्रतिकार नसेल तर गांधीवाद नाही– मात्र त्या प्रतिकारात कोणत्याही प्रकारची हिंसा असता कामा नये. इंग्लंडातील क्वेकर पंथाने आत्मक्लेशाने अन्याय-निवारणाचा मार्ग चोखाळला होता; पण अल्प प्रमाणांत. गांधीजींइतक्या व्यापक प्रमाणावर व दीर्घकालपर्यंत सत्याग्रहाचे लढे जगाच्या इतिहासात दुसरे कोणी केलेले नाहीत. निःशस्त्र व पीडित मानवतेला गांधीजींनी जी देणगी दिली, ती सत्याग्रहाच्या अभिनव व सात्त्विक साधनाची. "सत्याग्रहपूर्व" व "सत्याग्रहोत्तर" असे दोन स्वतंत्र खंड जगाच्या इतिहासाचे पडावेत, इतकी महान कामगिरी गांधीजींनी केलेली आहे. अमेरिकेतील नीग्रो नेते डॉ. मार्टिन ल्यूथर किंग यांनी याची ग्वाही आपल्या शब्दांनी, कृतींनी व शेवटी आत्मबलिदानाने दिली आहे. सत्याग्रहाचा हा संजीवनी मंत्र यापुढे जगभर अधिकाधिक पसरत जाईल यात शंका नाही.

३५

# गांधीजींचे शिक्षण-विचार

ए. रा. घोंगडे

गांधीजींच्या उद्योग-मूलक शिक्षणाची चिकित्सा पुढील लेखात केली आहे. दीर्घ चिंतन व अनुभव यातून गांधीजींनी ही जी शिक्षण-योजना भारतापुढे ठेवली, तिचे मूल्यमापन महाराष्ट्राचे सेवानिवृत्त प्रमुख शिक्षणाधिकारी यांनी पुढील लेखात केले आहे.

महात्मा गांधींचे जीवन विविध अनुभवांनी समृद्ध व संपन्न आहे. त्यांच्या जीवनातून व कार्यातून अनेकांना स्फूर्ती मिळालेली आहे. तेव्हा त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण करून आजच्या काळास लागणारी प्रेरणा व स्फूर्ती मिळविणे जरूर आहे.

पहिला प्रश्न आपणापुढे उभा राहतो तो हा की, गांधीजींनी शिक्षण-विचार कोणत्या भूमिकेवरून मांडले ? म्हणजे त्यांचा या क्षेत्रात अधिकार काय होता ? स्वत: गांधीजी आपणांस शिक्षणतज्ज्ञ समजत नसत. शिक्षणविषयक निरनिराळ्या पद्धतींचा शास्त्रीय दृष्ट्या अभ्यास करणारे शिक्षणशास्त्री ते नव्हते. त्यांनी स्वत:च म्हटले आहे– "मी शिक्षणक्षेत्रात एक अनधिकारी व्यक्ती आहे व शिक्षणाचा जो रूढ व तांत्रिक अर्थ आहे त्यात अनभिज्ञ आहे.''त्याचप्रमाणे 'महात्मा' या भूमिके-तूनही ते आपले विचार दुसऱ्यांवर लादण्यास तयार नव्हते. आपल्या लिखाणाच्या

साक्षेपी अभ्यासकास त्यांनी स्पष्टपणे वजावले आहे की, "मी 'महात्मा' म्हटला गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणी चालू नये. 'महात्मा' कोण हे आपल्याला माहीत नाही. म्हणून चांगला मार्ग हा की, 'महात्म्या'चे वचनदेखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावे आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा.'

रूढ अर्थाने जरी गांधीजी शिक्षणशास्त्री नव्हते, तरी त्यांच्या शिक्षणविषयक विचारांना शिक्षणक्षेत्रात पुष्कळ महत्त्व प्राप्त झाले. सर्वसामान्य लोकांना त्यांची शिक्षणविषयक विचारधारा विशेष माहीत झाली ती ऑक्टोबर १९३७ मध्ये वर्धा येथे झालेल्या शिक्षण परिषदेपासून. त्या वेळी गांधीजींनी आपले विचार सुसूत्रपणे राष्ट्रासमोर मांडले. तिलाच वर्धायोजना किंवा मूलोद्योग शिक्षण अथवा बेसिक शिक्षण असे म्हणू लागले. ती मांडताना गांधीजींनी आत्मविश्वासपूर्ण असे उद्‌गार काढले होते. ते म्हणाले–"मी आजपर्यंत हिंदुस्थानला ज्या अनेक गोष्टी दिल्या आहेत त्यांत ही शिक्षण-योजना व पद्धती सर्वात मोठी गोष्ट आहे आणि मला नाही वाटत की, याहून अधिक चांगली अशी दुसरी कोणती गोष्ट मी राष्ट्रास देऊ शकेन.''

शिक्षणतज्ज्ञ नसतानासुद्धा गांधीजींना हे उद्‌गार काढण्याचा अधिकार कसा प्राप्त झाला ? या प्रश्नाचे उत्तर हेच की, या उद्‌गारांमागे चाळीस वर्षांची त्यांची तपस्या, त्यांचे चिंतन व त्यांनी केलेले शिक्षणाचे प्रयोग या गोष्टी उभ्या आहेत. १८९७ मध्ये दक्षिण आफ्रिकेत त्यांनी बिऱ्हाड थाटले, तेव्हाच आपल्या परिवारातील मुला-मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला आणि तो सोडविण्याचे प्रयोग त्यांनी स्वत: आरंभिले. स्वत:ला मिळालेल्या शिक्षणाची छाननी त्यांनी केली आणि परकी शिक्षणाच्या आपणावर झालेल्या संस्कारांची विपरीतता त्यांना जाणवू लागली. त्या चिंतनातून शिक्षणाची मूलभूत उद्दिष्टे काय असावीत याचा शोध सुरू झाला व ती प्राप्त करण्याचे मार्ग ते धुंडाळू लागले. १९११ मध्ये 'टॉलस्टॉय फार्म'ची ट्रान्सवाल-मध्ये स्थापना झाली आणि तेथेही शिक्षणाच्या प्रयोगांना चालना मिळाली. १९१५त गांधीजी भारतात परतले, तेव्हा त्यांचा पहिला मुक्काम, शिक्षणाचे जे प्रयोगकेन्द्र, त्या शांतिनिकेतनात होता. कोचरब येथे १९१५ त स्थापन झालेला सत्याग्रहाश्रम पुढे प्लेगमुळे साबरमतीला हलविण्यात आला. तो आश्रमही शिक्षण-प्रयोगांचे माहेर-घर बनला होता. १९१७ मध्ये चंपारण्यात सुरू केलेले ग्रामशिक्षण, असहकाराच्या चळवळीचा महत्त्वाचा पैलू बनलेले 'राष्ट्रीय शिक्षण', १९२१ मधील गुजरात विद्यापीठाची स्थापना व त्यातील प्रयोग, आणि त्यापुढील काळात निरनिराळ्या भाषणांतून दिसून येणारे त्यांचे शिक्षणविषयाचे चिंतन या सर्व घटना गांधीजींचा शिक्षणक्षेत्रातील अधिकार स्पष्ट करण्यास पुरेशा आहेत. दीर्घ व व्यापक निरीक्षण, चिंतन व प्रयोग या मार्गांनी गांधीजींनी स्वत: शिक्षणाचा अनुभव मिळविला व त्यामुळेच त्यांच्या विचारधारेला महत्त्व प्राप्त झाले.

शिक्षण-विचाराचा अभ्यास करताना दुसराही एक प्रश्न कोणी विचारील तो असा की, " राजकारणाचे व समाजकारणाचे क्षेत्र सोडून गांधीजी शिक्षणाच्या क्षेत्रात का शिरले ? असे करण्यात त्यांचे उद्दिष्ट काय होते ? " या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपण हे ध्यानात घेतले पाहिजे की, भारतीय स्वातंत्र्याचा लढा चालवीत असताना, यंत्रयुगीन संस्कृतीचे मानवतेवर होणारे परिणाम उलगडून दाखवीत असतानाच, गांधीजी शिक्षणाविषयी विचार करीत होते. ते करीत असलेल्या सत्याच्या प्रयोगांत शिक्षणप्रयोगांनाही स्थान होते; कारण ते जीवनाचा समग्रपणे विचार करणारे तत्त्वचिंतक होते. जीवनाची व शिक्षणाची फारकत होऊ शकत नाही, हे मर्म गांधीजींनी स्वानुभवाने जाणले होते. शिक्षण हे समाज-परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे, हा पाश्चिमात्य शिक्षणतज्ज्ञांनी पुरस्कारलेला विचार गांधीजींच्या शिक्षणयोजनेत अंतर्भूत होता. वर्गहीन, शोषणरहित आणि सहकार्य व समता यांच्यावर आधारलेले जे 'रामराज्य' भारतात प्रस्थापित व्हावे असे त्यांचे ध्येय होते, त्याचेच ही शिक्षण-योजना हे प्रभावी साधन आहे, असे त्यांना वाटत होते. त्यांनी म्हटले होते—"कातण-पिंजण यांसारख्या ग्रामीण उद्योगांच्या माध्यमांतून प्राथमिक शिक्षण देण्याची माझी ही योजना म्हणजे एका शांततामय सामाजिक क्रांतीचा चंचूप्रवेश असून त्याचे परिणाम अत्यंत दूरगामी आहेत. शहरे आणि खेडी यांच्यांतील परस्पर-संबंधाला त्यामुळे अधिक निकोप व नैतिक असे अधिष्ठान मिळणार असून, आज सामाजिक असुरक्षिततेचे व वर्गीय विद्वेषाचे जे घातुक दुष्परिणाम आढळतात, त्यांपैकी बरेचसे टाळण्यास या शिक्षणयोजनेचा उपयोग होणार आहे." शिक्षणात समाजपरिवर्तनाचे सामर्थ्य आहे, असा गांधीजींचा विश्वास असल्यामुळे, ते राजकारण व समाजकारण करताना शिक्षणापासून अलग राहू शकले नसावेत.

तत्कालीन शिक्षणाची चिकित्सा गांधीजींनी केली व ते शिक्षण कसे सदोष आहे याचा बारकाईने विचार केला. त्यांनी म्हटले आहे—" शिक्षणाबद्दल जरी एवढे विलक्षण आकर्षण वाटत असले, तरी शिक्षण ही काय वस्तू आहे, आजपर्यंत मिळा-लेल्या शिक्षणाने आम्हाला लाभ झाला की आमचे नुकसान झाले, किंवा यासाठी जेवढी मेहनत घेण्यात आली तेवढा फायदा झाला आहे की नाही, याबद्दल क्वचित विचार केला जातो." त्यांनी पुढे म्हटले आहे—" शिक्षण हे काही साध्य नव्हे, ते एक साधन आहे. ज्या शिक्षणाने आपण चारित्र्यवान बनू, तेच खरे शिक्षण मानता येईल. आज-काल शाळातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाने हा परिणाम घडून येतो, असे कोणीच म्हणू शकणार नाही. शाळेत जाऊन चारित्र्य गमावून बसल्याची अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. एका निःपक्षपाती इंग्रज लेखकाने म्हटले आहे की, हिंदुस्थानात जोपर्यंत शाळा व घर यांच्यात मेळ वा सामंजस्य निर्माण होणार नाही, तोपर्यंत

विद्यार्थी दोहोंनाही मुकतील.'' शिक्षणाचे सत्यस्वरूप विशद करताना गांधीजी म्हणतात–" आम्ही काय शिकतो, याची आई-बापांना पर्वाही नसते. शिकणे म्हणजे परीक्षा देण्यासाठी केलेली हमाली असेच प्राय: मानले जाते, आणि परीक्षा होता क्षणीच, केलेला अभ्यास लवकरात लवकर विसरून जाण्याचा प्रयत्न केला जातो.'' या दोषांचे मूळ शोधताना गांधीजींनी म्हटले आहे–"या स्थितीच्या कारणांचा विचार करता मला असे वाटू लागले आहे की, मुख्य दोष आम्हाला इंग्रजीद्वारा मिळणाऱ्या शिक्षणाचा आहे. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण पुरे करावयाला साधारणपणे बारा वर्षे लागतात. इतक्या वर्षात आम्हाला सामान्य ज्ञान फारच थोडे मिळते. परंतु आमचा प्रयत्न त्या ज्ञानाचा व्यवहाराशी मेळ घालण्याचा, त्याचा उपयोग करून घेण्याचा, असत नाही. आमची सारी धडपड असते, या ना त्या प्रकारे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविण्याची.'' शालेय शिक्षणाची ही स्थिती किती विपरीत आहे हे पटवून देताना गांधीजी म्हणतात–"जर आम्ही निव्वळ शाई-शोषक टीपकागद बनलो नसतो, तर पन्नास वर्षांच्या शिक्षणानंतर सर्व जनतेत काही नवीन हालचाल, प्रवृत्ती दृष्टीस पडली असती. आम्ही जनतेला ओळखत नाही. जनताही आम्हांला सभ्य-सुधारलेले समजून बाजूस काढीत आहे. आम्ही सर्व लोकांना रानटी समजून तुच्छतेच्या दृष्टीने त्यांच्याकडे बघतो.''

कॉलेजातील शिक्षणाविषयी गांधीजींनी काढलेले निष्कर्ष मननीय आहेत. ते म्हणतात–"आम्ही आपसांतील व्यवहार अशुद्ध उच्चाराच्या व व्याकरण-दोषांनी भरलेल्या इंग्रजीत करू लागतो. वेगवेगळ्या शास्त्रांतील पारिभाषिक संज्ञा आम्ही आमच्या भाषेत निश्चित केलेल्या नाहीत, आणि इंग्रजीतील ते शब्द आम्हांला पुरतेपणी समजत नाहीत. कॉलेजचे शिक्षण पुरे झाल्यावर आमच्या बुद्धीत तेज उरत नाही आणि शरीरही दुर्बल बनते. आयुष्यभर औषधाच्या बाटल्या आमच्या सोबतिणी बनतात. इतके झाले तरी लोकांना वाटते आणि आम्हांलाही वाटते की आम्ही म्हणजे जनतेचे नाक आहोत, जनतेचे त्राते आहोत आणि जनतेचे भविष्य आमच्या हाती आहे. कॉलेजातून बाहेर पडलेले नवयुवक खोल विचार करून जनतेच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतील, तर मी त्यांना हिंमतबहाद्दर समजेन.''

शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असणारी शिक्षणपद्धती चुकीची आहे असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. त्यांनी म्हटले आहे–" ज्या पद्धतीने इंग्रजी शिक्षण देण्यात आले आहे, त्या पद्धतीने सुशिक्षित भारतीयांना नि:सत्त्व, पुरुषार्थहीन बनविले आहे. भारतीय विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तीवर तिचा खूप ताण पडला आहे आणि तिने आम्हांला केवळ अनुकरणशील बनविले आहे. देशी भाषांचे क्रमश: उच्चाटन हे एक भारतीय-ब्रिटिश-संबंधाच्या इतिहासातील अत्यंत दु:खद प्रकरण आहे.'' ब्रिटिश सरकारने लादलेल्या शिक्षणपद्धतीमुळे हिंदुस्थानचे सत्त्वहरण झाले आहे, असा गांधी-

जींचा विश्वास होता. याविषयी त्यांचे उद्गार असे आहेत–"एक गोष्ट मात्र आपल्याला निश्चित कळून चुकली आहे, आणि ती म्हणजे गेल्या पन्नास वर्षांत भारत अधिक दरिद्री झाला आहे. आपले संरक्षण करावयाला आपण अपात्र बनलों आहोत आणि आपली मुले अधिक निःसत्त्व बनली आहेत. राज्यकारभाराच्या सदोष पद्धतीमुळे हे घडत आहे हे मला कोणी सांगण्याची गरज नाही. त्या राज्यपद्धतीचा अत्यंत सदोष भाग आहे ही शिक्षणव्यवस्था.'' शिक्षणपद्धतीतील निरनिराळ्या दोषांची चिकित्सा करताना गांधीजी म्हणतात–"आमच्या शिक्षणात दोन मोठे दोष आहेत. आमचा शिक्षणक्रम तयार करणाऱ्यांनी शारीरिक व नैतिक (आध्यात्मिक) शिक्षणाची फार उपेक्षा केलेली आहे.''

गांधीजींचे हे विचार आज वाचताना त्यांनी केलेली शिक्षणाची चिकित्सा किती मार्मिक होती व आजमितीलासुद्धा त्यांनी दाखविलेले दोष दूर करण्यावर भर देणे कसे आवश्यक आहे, याचे शिक्षणतज्ज्ञांनी मनन केले पाहिजे.

आता शिक्षणाचे उद्दिष्ट काय असावे, याविषयी त्यांचे विचार काय होते ते पाहू या. प्रा. हक्स्ले यांनी केलेली शिक्षणाची व्याख्या गांधीजींना पसंत पडल्यासारखी दिसते. हक्स्ले यांच्या लांबलचक व्याख्येतील काही भाग असा– " ज्याच्या मनाचे भांडार निसर्गाविषयीच्या मूलभूत ज्ञानाने समृद्ध झालेले आहे, वासनांना प्रबल इच्छाशक्तीच्या अधीन राहून काम करण्याचे वळण लागलेले आहे, आणि ही इच्छाशक्ती ज्याच्या संवेदनशील सदसद्विवेक-बुद्धीची दासी बनलेली असते, सर्वच प्रकारच्या दुष्टतेबद्दल ज्याच्या मनात विद्वेषाची भावना असते, आणि जो स्वतःइतकाच इतरांना मान द्यावयाला शिकला आहे, त्याच मनुष्याला खरे उदार संस्कारी शिक्षण लाभले आहे, असे मला वाटते.'' गांधीजींच्या मते "प्राथमिक शिक्षण काय किंवा उच्च शिक्षण काय, त्यांपैकी एकाचाही मुख्य गोष्टीसाठी उपयोग नाही. (ती मुख्य गोष्ट म्हणजे) या शिक्षणाने आम्ही मनुष्य बनत नाही.'' शिक्षणाचा अर्थ केवळ अक्षर-ओळख, साक्षरता असा सर्वसाधारणपणे होतो. या अक्षरज्ञानाचा उदो उदो करण्याचे कारण नाही, हे दाखवून देताना गांधीजी म्हणतात–"अक्षरज्ञान म्हणजे काही आपली कामधेनू नव्हे. अक्षरज्ञानाला जीवनात एक विशिष्ट स्थान आहे आणि त्या स्थानाच्या मर्यादेत त्याला महत्त्व आहे. आपण जेव्हा इंद्रियांना ताब्यात ठेवू, नीतिमत्तेचा पाया दृढ करू, तेव्हा अक्षरज्ञानाला जीवनात स्थान आहे.'' गांधीजींच्या मते कोणत्या गोष्टी व विचार ग्रहण करावेत व कोणते ग्रहण करू नयेत, याचा विवेक विद्यार्थ्यांना करता आला पाहिजे आणि तसा तो करावयाला शिकविणे हे शिक्षकांचे कर्तव्य आहे. ते म्हणतात–" आपण मानव विचार करणारे, ज्ञान करून घेणारे ज्ञानी आहोत, आणि या काळात सत्य कोणते व असत्य कोणते, कटु भाषण कोणते व मधुर भाषण कोणते, शुद्ध वस्तू कोणती व

अशुद्ध वस्तू कोणती, यांतील फरक आपल्याला समजला पाहिजे.'' हृदयाच्या भावनांचे शिक्षण पाठ्यपुस्तकांच्या द्वारे देता येईल असे गांधीजींना वाटत नसे, तर ''शिक्षकांच्या-गरुजनांच्या जिवंत संपर्कातूनच ते देता येईल'' असे त्यांनी म्हटले आहे. आज प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक कोण आहेत ? हे शिक्षक श्रद्धावान व चारित्र्यशील आहेत काय ? इत्यादी प्रश्न त्यांनी या संदर्भात उभे केले. एकदा एका विद्यार्थ्याने गांधीजींना प्रश्न विचारला की, ''शिक्षण संपल्यावर मी काय करावे ?'' प्रश्नाचे उत्तर देतांना गांधीजींनी स्पष्ट केले की,म्हणजे मुख्य गोष्ट ही आहे की, आमची भयापासून मुक्ती झाली पाहिजे. ते म्हणतात, ''ज्यांनी आम्हाला गुलाम बनविले त्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी आजच्या शिक्षणपद्धतीची उभारणी केली आहे.''

ते पुढे म्हणतात–''याचा अर्थ असा की, शिक्षण हे जास्तीत जास्त संपत्ती मिळविण्याचे, मोठ्यात मोठे स्थान वा अधिकार मिळविण्याचे साधन आहे, असे लोक मानतात. धनाच्या व सत्तेच्या लोभापुढे गुलामगिरी प्रिय वाटू लागली आहे. या वातावरणातून सुटलो तरच 'सा विद्या या विमुक्तये' हा प्राचीन मंत्र आपण सिद्ध करू शकू. विद्या म्हणजे केवळ आध्यात्मिक ज्ञान व मुक्ती म्हणजे सुटका, एवढाच त्या मंत्राचा अर्थ करून चालणार नाही. विद्येचा अर्थ आहे, लोकोपयोगी पडणारे सर्व प्रकारचे ज्ञान आणि मुक्तीचा अर्थ आहे या जीवनातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करून घेणे.'' शिक्षणाने शरीर, बुद्धी व हृदय या तिहींचा समतोल विकास साधला पाहिजे, हे स्पष्ट करताना गांधीजी म्हणतात–''मनुष्य म्हणजे केवळ शरीर नव्हे, केवळ बुद्धी नव्हे वा केवळ आत्मा नव्हे. या तिहींच्या समान विकासानेच मानवाचे मानवत्व तयार होते. यातच खरे अर्थशास्त्र आहे.'' शाळा-कॉलेजे म्हणजे ज्ञानप्राप्तीच्या अनेक साधनांपैकी एक साधन होय, त्यांना वाजवीपेक्षा अधिक महत्त्व आपण देत आहोत, हे विशद करताना गांधीजी म्हणतात––'' शिक्षण केवळ कॉलेजात गेल्यानेच मिळू शकते, हे मानणे ही एक अंधश्रद्धा आहे. शाळा-कॉलेजे नव्हती तेव्हाही जगाने तेजस्वी विद्यार्थ्यांना जन्म दिलाच होता. स्वाध्यायासारखी चिरकाल टिकणारी वस्तू नाही.'' विद्यार्थ्यांमध्ये नैतिक बुद्धी दृढ करणे व त्यांचे चारित्र्य-संवर्धन करणे हे गांधीजींच्या मते शाळेचे मुख्य उद्दिष्ट होय.

संस्कृती हा शिक्षणाचा पाया असल्यामुळे शिक्षणाच्या बौद्धिक अंगापेक्षा सांस्कृतिक स्वरूपाला गांधीजी अधिक महत्त्व देत. या संदर्भात त्यांनी म्हटले आहे– '' तुमच्या अंतर्यामी असलेली संस्कृती तुमच्या वाणीतून प्रतिबिंबित झाली पाहिजे. त्याचप्रमाणे तुम्ही पाहुण्यांशी कसे वागता, परस्परांशी कसे वागता, अध्यापक आणि वडीलधारी माणसे यांच्याशी कसे वागता, यांतून तुमची संस्कृती प्रगट झाली पाहिजे.

गांधीजींना अभिप्रेत असलेले शिक्षणाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी त्यांनी आपली शिक्षणयोजना आखली. त्या योजनेत मातृभाषेचा अभ्यास आद्यस्थानी असून मातृ-

भाषा हेच शिक्षणाचे माध्यम योजिले आहे. तिच्यात हिंदीला स्थान आहे, अंकगणित, निसर्ग-परिचय, समाज-परिचय, चित्रकला व संगीत यांचाही समावेश आहे. विशेष म्हणजे हे सर्व विषय उत्पादक उद्योगांच्या माध्यमातून शिकवावयाचे आहेत आणि त्या उद्योगांमुळे शिक्षण स्वयंपूर्ण वा स्वावलंबी बनवावयाचे आहे. शिक्षण व उद्योग यांचा संबंध जोडला जावा असे अनेक शिक्षणतज्ज्ञांनी म्हटले आहे, पण एक मध्यवर्ती उत्पादक उद्योग हे शिक्षणाचे 'माध्यम' असावे ही गांधीजींची अभिनव व क्रांतिकारी कल्पना होती. ती सर्वांना पटली नाही, तिच्याविषयी गैरसमज पसरले आणि टीकाही झाली. उद्योगाचे माध्यम स्वीकारल्याने शिक्षण कृत्रिम व कंटाळवाणे होईल. वाङ्मयीन शिक्षणाकडे दुर्लक्ष होईल, ही कल्पना मध्ययुगीन असून ती यंत्रयुगाशी विसंगत आहे, तिच्यायोगे शिक्षण स्वावलंबी होणे अशक्य आहे, इत्यादी विविध आक्षेप त्या योजनेवर घेतले गेले. त्या आक्षेपांना वेळोवेळी गांधीजींनी उत्तरेही दिली आहेत. उद्योगाच्या माध्यमावर गांधीजींनी जो भर दिला होता तो यासाठी की, उद्योग जर वैज्ञानिक दृष्टीने (यांत्रिकपणे नव्हे) केला तर विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास घडून येईल. शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थी आपल्या पायावर उभा राहू शकेल आणि समाजात बुद्धिजीवी वर्ग आणि श्रमजीवी वर्ग ही जी विभागणी झाली आहे ती नाहीशी होईल असा या योजनेचा दृष्टिकोन होता. शिवाय या माध्यमातून तयार झालेला विद्यार्थी हा समाजाचा नीतिवान घटक बनेल, खराखुरा नागरिक होईल, त्याच्या अंगी सहकार्य, जबाबदारीची जाणीव व स्वयंशासन हे गुण बाणतील, अशी त्यांची विचारसरणी होती.

गांधीजींनी पुरस्कारिलेली मूलोद्योगी शिक्षणाची योजना आज जरी व्यवहारात रुळली नसली, तरी ती क्रांतिकारी स्वरूपाची व आदर्श तत्त्वांवर आधारलेली आहे, असे त्या योजनेचे टीकाकारही मान्य करतात. या योजनेच्या अपयशास अनेक कारणे आहेत. मुख्यत: गांधीजींनी या योजनेची जी पथ्ये सांगितली होती ती पाळली गेली नाहीत. जुन्या चाकोऱ्या कायमच राहिल्या, आणि योजनेमागील जीवनविषयक नवविचारांची जी बैठक आहे ती आकलन करणारा शिक्षक-वर्ग आणि अधिकारी-वर्ग पुरेशा प्रमाणावर तयार झाला नाही, या कारणामुळे ही योजना मागे पडली असे म्हणता येईल.

गांधीजींना वाटे-" आमचे शिक्षण पूर्णतया विदेशी आहे राष्ट्रीय शिक्षणावाचून सर्व काही व्यर्थ आहे. स्वराज्य आज मिळेल वा उद्या मिळेल. पण राष्ट्रीय शिक्षणावाचून ते टिकू शकणार नाही." त्यांच्या मते " राष्ट्रीय शिक्षणात-

(१) शिक्षण मातृभाषेतून दिले जावे.

(२) शिक्षण आणि घरची परिस्थिती या दोहोत मेळ असावा.

(३) ज्यामुळे अनेक लोकांच्या गरजा पुऱ्या होतील असे शिक्षण असावे.

(४) प्राथमिक शाळेतील अगदी पहिल्या इयत्तेपासूनचे शिक्षक चारित्र्यवान असावेत.

(५) शिक्षण मोफत असावे.

(६) शिक्षण-व्यवस्थेवर लोकांचा अंकुश असावा.''

गांधीजींनी म्हटले आहे, "गावातील हस्तव्यवसायाचे शिक्षण हा शिक्षणाचा मध्यबिंदू मानण्याची किती महत्त्वाची आवश्यकता आहे, याबद्दल मला मुळीच संदेह नाही. हिंदुस्थानातील शिक्षणसंस्थात जी पद्धती स्वीकारण्यात आली आहे, तिला मी शिक्षण म्हणू शकत नाही. मनुष्याच्या बुद्धीतील सर्वोत्कृष्ट अंशाचा ती विकास करीत नाही. तो केवळ बुद्धीचा विलास–अपव्यय आहे.'' ते पुढे म्हणतात– "विद्यापीठानेसुद्धा आपल्या विद्यार्थ्यांना समाजाच्या सेवेचे क्षेत्र पुरविले पाहिजे आणि त्यांचा उदरनिर्वाह होईल अशी साधने तयार केली पाहिजेत. उदरनिर्वाह हे शिक्षणाचे उद्दिष्ट बनू नये, पण विद्येचे ते फळ असलेच पाहिजे. विद्येचा हेतू आत्म-विकास हा आहे. जेथे आत्मविकास आहे, तेथे उपजीविका ही आलीच.'' राष्ट्रीय शिक्षणात " ज्ञानसुद्धा चारित्र्यविकासासाठीच दिले गेले पाहिजे. ज्ञान साधन आहे, चारित्र्य-विकास हे साध्य आहे, असा गांधीजींचा आग्रह होता. शिक्षणातील अन्य विषयांवरसुद्धा गांधीजींनी प्रसंगोपात्त आपले विचार व्यक्त केले आहेत. उदाहरणार्थ, "प्रत्येक राष्ट्रवाद्याने संस्कृतचा अभ्यास करावयास पाहिजे. कारण त्याच्यायोगे इतर प्रान्तीय भाषांचा अभ्यास करणे सोपे होते.''"नीति-सदाचारांची मूलभूत तत्त्वे सर्व धर्मात सारखीच आहेत. ती मुलांना निश्चितपणे शिकविलीच पाहिजेत. "धार्मिक शिक्षणाचा जो अभ्यासक्रम आखला जाईल, त्यात आपल्या धर्माव्यतिरिक्त अन्य धर्मांच्या सिद्धान्तांचाही समावेश व्हावयास पाहिजे.'' व्यायाम व खेळ सक्तीचे करण्यात आले, ही गोष्ट मला आवडली. जी गोष्ट आपल्या हिताची आहे ती आपण अनिवार्य वा आवश्यक केलीच पाहिजे. "मुला-मुलींच्या ठिकाणी असलेल्या आंतरिक गुणांच्या प्रकटीकरणात खरे शिक्षण आहे. खरे शिक्षण विद्यार्थ्यांच्या डोक्यात कुचकामी गोष्टी भरून दिल्याने साध्य होत नाही. लोकशिक्षणाचे गांधीजींनी दोन मार्ग सुचविले होते. " एक म्हणजे लोकशिक्षकाने कोठले तरी खेडे निवडावे व त्या गावी जाऊन स्थायिक व्हावे, गावातील लोकांत मिळून मिसळून त्यांची सेवा करावी.'' " दुसरा मार्ग म्हणजे लोकशिक्षणाच्या दृष्टीने योग्य, सुलभ व स्वस्त साहित्याची निर्मिती करून त्याचा प्रसार केला जावा.'' विद्यापीठीय शिक्षणासंबंधी गांधीजींचे उद्‍गार असे आहेत–" आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी जे आपले जीवन समर्पित करतील, असे सच्चे जनसेवक निर्माण करणे, हे आपल्या विश्वविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे.''

गांधीजींची शिक्षण-विषयक विचारधारा ही त्यांच्या स्वतःच्या अनुभवावर

आणि शिक्षणविषयक प्रश्नांच्या सतत चिंतनावर आधारित होती. त्यांनी वेळोवेळी सांगितलेल्या तत्त्वांतून हे प्रकट होते की, शिक्षण हे जीवनाशी निगडित कसे राहील यावर त्यांनी विशेष भर दिला होता व शिक्षणात नैतिक मूल्ये आणि चारित्र्यसंवर्धन यांचा परिपोष झाला पाहिजे, इकडे त्यांचा कटाक्ष होता. शिक्षणाकडे समाज-परिवर्तनाचे एक प्रभावी साधन म्हणून पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. हे त्यांचे विचार आजच्या परिस्थितीतसुद्धा आपणाला मार्गदर्शक आहेत याचा उल्लेख महाराष्ट्र शासनाच्या शिक्षणविषयक 'श्वेतपत्रिके'त आला आहे. "या महान उद्दिष्टांना जीवनात साकार करण्याच्या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधींनी त्यांच्या जीवनशिक्षणाची योजना देशासमोर मांडली. प्रथम ती प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर स्वीकारण्यात आली. यापुढे शिक्षणाच्या सर्व स्तरांवर तिची उद्दिष्टे प्रतीत होतील. या महान कार्यात सर्वांच्या सहकार्याची गरज आहे."

३६

# मूलोद्योग शिक्षण - पुनर्मूल्यांकन

ग. वि. अकोलकर

शिक्षणाच्या क्षेत्रात काही सुधारक असतात, तर काहीं तत्त्वज्ञ असतात. त्यांमध्ये गांधीजींचे स्थान कोणते आणि त्यांचे शिक्षणविषयक विचार आजच्या शिक्षणशास्त्राच्या कसोटीस कितपत उतरतात, याची मीमांसा पुढील लेखात केली आहे.

**म.** गांधींनी आपले शिक्षणविषयक विचार प्रथम 'हिंद-स्वराज्य' या पुस्तकाद्वारे जगासमोर मांडले. त्या गोष्टीस आता साठ वर्षे झाली आहेत. स. १९०८ ते १९३७–३८ च्या अडीच तपांच्या काळात स्वत: महात्माजींनी व त्यांच्या विश्वासातील अनुयायांनी 'राष्ट्रीय शिक्षणा'बाबत अधिक चिंतन व प्रयोग केले. सन १९३८ मध्ये राष्ट्रसभेने व त्या वेळच्या काँग्रेस सरकारने गांधीजींची विचारधारा स्वीकारली. पुढील अडीच तपांच्या काळात 'बेसिक एज्युकेशन' वा 'मूलोद्योगी शिक्षण' भारतात चालू राहिले. अजूनही अधिकृतपणे त्याचा त्याग केल्याचे ऐकिवात नाही. परंतु राष्ट्रीय शिक्षण आयोगाने (सन १९६४-६६) मूलोद्योगी शिक्षणातील तत्त्वे मान्य करून तपशील बाजूला सारला आणि मूलोद्योगी शिक्षणाचे स्वरूप व त्याचा तोंडवळा पार बदलून टाकला. महाराष्ट्र शासनाने 'कोठारी-शिक्षण आयोगा'च्या शिफारशींची अंमल-

बजावणीही सुरू केली आहे, हे प्रशिक्षण-पदविका-शिक्षणक्रमावर दृष्टिक्षेप केला की सहज लक्षात येते. या साऱ्या पार्श्वभूमीवर महात्माजींच्या शिक्षण-विचारांचे पुनर्मूल्यांकन वा मूल्यमापन करून, शिक्षणवेत्ते या नात्याने गांधीजींचे स्थान काय, याचा विचार करावयाचा आहे.

**सुधारक की तत्त्वज्ञ ?**

या बाबतीत विचार करू लागताच, प्रथम एकदोन प्रश्न समोर उभे राहतात. गांधीजींनी मांडलेले शैक्षणिक विचार तत्कालीन परिस्थितीवरील प्रतिक्रियारूप होते की जीवनविषयक तत्त्वज्ञानातून ते निर्माण झाले होते ? तत्कालीन शिक्षण-व्यवस्थेत जे दोष त्यांना दिसले, त्याचे निराकरण करणे एवढेच त्यांचे उद्दिष्ट होते की आपल्या शिक्षण-विचारातून एका नवीन आदर्श समाजरचनेची निर्मिती ते करू इच्छित होते? यांतील पहिल्या प्रकारच्या प्रयत्नाला वाहून घेणाऱ्यांना शिक्षण-सुधारक (रिफॉमर) व दुसऱ्या प्रकारच्या विचारवंतांना शैक्षणिक तत्त्ववेत्ते (फिलॉसॉफर) असे सामान्यतः समजण्यात येते. प्लेटो, रूसो, हर्बार्ट, ड्यूई यांसारख्या व्यक्तींना तत्त्वज्ञ म्हणून गौरविण्यात येते ; तर कोमिनीअस, ल्यूथर, पेस्टॉलॉझी, फ्रोबेल इत्यादींची गणना प्रायः शिक्षणसुधारकांत होते. विचारांची मौलिकता व द्रष्टेपण या बाबतीत ही सुधारकमंडळी कमी प्रतीची होती असे नव्हे ; पण सामाजिक, राजकीय वा आध्यात्मिक तत्त्वांच्या बाबतीत नवीन भर घालण्याच्या भरीस ते पडले नव्हते, एवढाच त्याचा अर्थ. म. गांधींचे स्थान या दृष्टीने कोणते ठरते, याचा विचार, आता त्यांच्या निधनाला वीस वर्षे लोटल्यानंतर आणि त्यांच्या विचारांच्या प्रयोगाला वीस वर्षांचा कालावधी मिळाल्यानंतर, करावयास काहीच हरकत नाही. तो करीत असताना, गांधीजींच्या शैक्षणिक विचारांचा प्रामाणिकपणे वा योग्य वातावरणात प्रयोग झालेलाच नाही, असे म्हणणारे त्यांचे काही अनुयायी आहेत, तर मूलोद्योगी शिक्षणाने शिक्षणाचा खेळ खंडोबा केला आहे, असे म्हणणारेही लोक आहेत, हे विसरून चालणार नाही. पहिल्यांच्या मतानुसार पुनर्मूल्यांकनाची वेळ अद्यापी आली नसणार, तर दुसऱ्यांच्या विचारसरणीप्रमाणे अशा मूल्यमापनाची गरजच नसणार !

**गांधीजींचा आदर्श**

गांधीजींच्या शिक्षण-विचाराची चर्चा करताना एक गोष्ट ध्यानात घ्यावयास हवी. ती म्हणजे त्यांचा शिक्षणविचार हा त्यांच्या जीवनदर्शनाचाच एक भाग वा अंग आहे. प्लेटो व रूसो यांच्याप्रमाणेच गांधीजींचे 'आदर्श समाजा'चे एक स्वप्न वा चित्र होते. त्याला त्यांनी 'रामराज्य' नाव दिले होते. त्यालाच 'सर्वोदय समाज' असे संबोधण्यात येऊ लागले. सत्य व अहिंसा यावर आधारलेल्या या समाजात स्वकष्टाने धनार्जन करणारे पण धनलालसा नसणारे, न्याय व समता यांचे पालन करणारे संयमी व सेवाशील स्त्रीपुरुष जीवनाचा उच्च आनंद उपभोगीत आध्यात्मिक

उन्नतीचा मार्ग आक्रमतील. समता ही जशी सामाजिक असेल तशीच ती प्रामुख्याने आर्थिक असेल. ही आर्थिक समता विकेन्द्रित अर्थव्यवस्थेमुळे, तशीच आपण समाजाचे विश्वस्त आहोत या विचाराने व अपरिग्रहवृत्तीने, स्थापन करता येईल. अहिंसक समाज म्हटला की तो शोषणरहित व सहकार्याधिष्ठितच असणार. प्रत्येक व्यक्ती जर स्वत: परिश्रम करून जगू लागेल तर पिळवणुकीचा, वांडगुळाप्रमाणे जगण्याचा, प्रश्नच उद्‌भवणार नाही. सामाजिक समतेमुळे वंश, भाषा, जाती व धर्म यांवर आधारलेले भेद आपोआपच नाहीसे होतील. समाजातील सर्व तंटे-बखेडे शरीर-बळाचा वापर न करता विचारविनिमयाने, सत्यशोधनाने व सत्याग्रहाने सोडविले. जातील. अशा समाजातील नागरिक आपले घर, गाव, देश यांच्यापुरतीच आपली दृष्टी संकुचित न ठेवता विश्वकुटुंवक वृत्तीचे असतील.

हे स्वप्न गांधीजींना अचानक स्फुरले नव्हते. पाश्चिमात्य संस्कृतीतील कृत्रिमता, मानवी जीवनाबद्दल बेफिकिरी, हिंसा-सामर्थ्य वाढविण्यासाठी चाललेली अहमहमिका, बहुसंख्य मानवांची गुलामगिरी व पिळवणूक, विषमता व अन्याय यांनी बरबटलेली समाजव्यवस्था यांचे निरीक्षण करून स्वत:च्या व मानवाच्या मुक्तीचा शोध घेत असताना धर्मजिज्ञासेतून मिळालेल्या प्रेरणेतून हे स्वप्न हळूहळू तयार झाले होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्राचे नेतृत्व करताना आपल्या आदर्श समाजा-कडे वाटचाल करण्याचा प्रयत्न ते स्वत: करीत होते, सहकाऱ्यांना व अनुयायांना त्या विचाराची लोकशाही मार्गाने दीक्षा देत होते. पण सबंध समाजाचे परिवर्तन-विशेषत: नव्या पिढीची या ध्येयानुसार घडण–करण्याचा मार्ग कोणता ? साधन कोणते ? आजवर अनेक तत्त्ववेत्त्यांना व राज्यकर्त्यांना जे साधन सापडले, तेच गांधीजींना सापडले. ते म्हणजे शिक्षण. राष्ट्र स्वातंत्र्याच्या दाराशी आले असताना चिंतन-मननातून त्यांना ते गवसले. या एकाच किल्लीने सर्व प्रश्न सुटतील, असे त्यांच्या मनाने घेतले.

**शिक्षणविचाराचे दोन कालखंड**

गांधीजींच्या शिक्षणविषयक विचाराचे सोयीसाठी दोन कालखंड कल्पावयास हरकत नाही. स. १९२०–२१ मध्ये सुरू झालेल्या असहकाराच्या चळवळीपासून पहिला कालखंड सुरू होतो. दुसरा कालखंड प्रांतिक स्वायत्ततेच्या सुरुवातीपासून सन १९३७ मध्ये सुरू होतो. असहकाराच्या चळवळीत शाळा-कॉलेजांवरील बहि-ष्काराला महत्त्वाचे स्थान होते. शाळा-कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या शेकडो कुमार-तरुणांच्या शिक्षणाची काही व्यवस्था करणे आवश्यकच होते. त्यासाठी राष्ट्रीय शाळा व राष्ट्रीय विद्यापीठे यांची स्थापनाही झाली. या शाळा-कॉलेजांतील युवकांकडे स्वातंत्र्य-चळवळीतील सैनिक या दृष्टीने गांधीजी पाहत होते. शुद्धाचरणी, संयमी, त्यागी, निर्भय, सत्यप्रिय व सेवाभावी अशी पिढी त्यांना

त्यांच्यातून निर्माण करावयाची होती. त्यासाठी शिक्षणाच्या उद्दिष्टांची चर्चा करणे आवश्यकच होते. पण ती करताना प्रचलित शिक्षणपद्धतीने लोकांच्या मनाची जी पकड घेतली होती, जनमनावर जी मोहिनी टाकली होती, त्यातून त्यांची मने सोडविणे ही पहिली आवश्यक गोष्ट होती. प्रचलित शिक्षणावर गांधीजींनी अत्यंत निर्भीडपणे व अतिशय कठोर टीका केली आहे. परकीय शिक्षणाने व परकीय माध्यमाने तरुण पिढीचा होणारा शारीरिक व बौद्धिक ऱ्हास, त्यांच्यात वाढणारी पोशाखीपणाची वृत्ती, परिश्रमांविषयी त्यांना वाटणारी लाज, स्वकीयांबद्दलची उपेक्षावृत्ती इ. इ. अनेक दोष १८९२-१९०८ या काळातही श्री रवीन्द्रनाथ, लो. टिळक, श्री. अण्णासाहेब विजापूरकर इत्यादींनी दाखविले होते. पण गांधीजींच्या वाणीत काही विलक्षण तेज होते. हे सारे दोष एकवटलेली परकीय शिक्षणपद्धती म्हणजे "शुद्ध विष आहे, हा पूतनेचा नवा अवतार आहे, ती आम्हांला नेभळट व भ्याड बनवीत आहे, ब्रिटिश राज्य येथे कायम टिकवणारी ही सोनेरी शृंखला आहे,'' अशा विदारक शब्दांनी त्यांनी झंझावाती प्रचार सुरू करताच लोक खडबडून जागे झाले. परकीय शिक्षणाचे दोष इतके खोलवर गेले आहेत, रोमारोमात भिनले आहेत की, काही तरी जालीम, साहसी उपाय ('हिरॉईक रिमेडी'-गांधी) केल्याशिवाय त्यांचे उच्चाटन होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट सांगितले. या काळात मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण, परिश्रमांची दीक्षा व उद्योग आणि विधायक कार्यद्वारा जनतेशी संपर्क एवढीच त्यांच्या शैक्षणिक विचाराची वैशिष्ट्ये दिसतात. विद्यार्थ्यांनी ज्ञान मिळवावयाचे ते मुक्तीसाठी, प्रथम ही मुक्ती परदास्यातून हाच 'सा विद्या या विमुक्तये-' चा अर्थ त्यांनी प्रतिपादन केला. त्यासाठी शीलसंपन्न व आत्मनिर्भर बनणे हेच उद्दिष्ट व त्याला पोषक असाच शिक्षणाचा कार्यक्रम, अशी त्यांची विचारसरणी होती. विधायक कार्याच्या द्वारा हिंदु-मुस्लीम ऐक्य, अस्पृश्यता-निवारण, राष्ट्रभाषेचा प्रचार-प्रसार या आनुषंगिक कार्यक्रमातून व्यापक एकराष्ट्रीयतेची व नागरिकत्वाची दृष्टीही ते देत होते, हे विसरून चालणार नाही. परंतु या कालखंडातील शिक्षणाचा व्याप अत्यंत मर्यादित होता.

स. १९३७ मध्ये भारतातील सात प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे बनली. काहीशी खरीखुरी सत्ता हाती आली. हिचा उपयोग प्रथम करून घ्यावयाचा तो राष्ट्र सुशिक्षित करण्यासाठी. आज ना उद्या जे स्वराज्य येणार ते प्रजातन्त्रीय, लोकशाहीचे. ते सुरक्षित राहावयाचे असेल तर प्रत्येक नागरिक सुबुद्ध हवा. दारिद्र्यापेक्षाही अज्ञान हा महाभयंकर शाप आपल्या देशाला ग्रासीत आहे, या अज्ञानापायीच आत्मतेज व आत्मविश्वास आम्ही गमावून बसलो; जाती, धर्म, पंथ इत्यादी भेदांचा बुजबुजाट, स्त्रियांबद्दल अनादर–उपेक्षेची वृत्ती, सधन-निर्धन असा भेदभाव, अधनांची पिळवणूक व असहाय लाचारी–या सर्वांतून मुक्तता करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शिक्षण,

सार्वत्रिक, सक्तीचे मोफत शिक्षण. हे शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे· त्यासाठी सार्वत्रिक राष्ट्रीय शिक्षणाची योजना आखण्याची गरज गांधीजींना तीव्रतेने भासली. त्या गरजेपोटी वर्धा-शिक्षण-योजना जन्मास आली.

या देशात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, सक्तीचे व निःशुल्क करावे, हा विचार पंचवीस वर्षांपूर्वी (स. १९१३) गांधीजींचे गुरू ना. गोखले यांनी मांडला होता. पण आर्थिक दृष्ट्या अव्यवहार्य म्हणून त्यांची योजना बाजूला सारण्यात आली होती. गांधीजींच्या पुढेही तोच पेच होता—त्याहून विकटतर. दारूचे उत्पन्न वाढवा व शिक्षणासाठी खर्च करा, असा पर्याय ब्रिटिश सत्तेने उभा केला होता. दारूचा पैसा हा पापाचा, लोकांच्या पिळवणुकीचा. तो स्वीकारण्यास गांधीजी तयार नव्हते. त्यांच्या अहिंसेत व साधनशुचितेत ते बसत नव्हते. दुसरा काही तरी पर्याय शोधणे भाग होते. ते एक आव्हान होते. जो उपाय शोधावयाचा त्यातून शिक्षण तर प्रथम मिळालेच पाहिजे, पण दारिद्र्याचा अडसरही दूर झाला पाहिजे. हे आव्हान गांधीजींच्या प्रतिभेने स्वीकारले. शिक्षण आणि उत्पादक उद्योग यांची सांगड घातली तर ? अज्ञान आणि दारिद्र्य या दोहोंवर एकदमच हल्ला चढविण्याचे ते प्रभावी शस्त्र ठरेल, असे त्यांच्या मनाने घेतले. आजवर केलेल्या प्रयोगांच्या व घेतलेल्या अनुभवांच्या प्रकाशात त्यांनी आपला विचार, सर्वांगांनी तपासला आणि आपली खात्री पहाताच निर्भयपणे तो जगापुढे मांडला.

**नव्या योजनेचे स्वरूप**

गांधीजींची योजना 'हरिजन'मध्ये प्रसिद्ध होताच देशाच्या सर्व भागात जी खळबळ उडाली, तिच्यावरून ती योजना सर्वांना कशी क्रांतिकारक वाटली, हे लक्षात येते. आतापर्यंत त्यांनी चरखा हा केन्द्रबिंदू, " ग्रहमालेतील सूर्य," मानून त्याभोवती रचनात्मक कार्यक्रमाची उभारणी केली होती. आता ते टकळीला केन्द्रबिन्दू मानून तिच्याभोवती शिक्षणविषयाची उभारणी करू इच्छीत होते— उद्योग हे शिक्षणाचे माध्यम बनवावयाचे होते. भाषा, गणित, इतिहास, भूगोल या सर्वांचा कताई-विणाईशी 'समवाय' साधावयाचा होता. हाताने उद्योग करतानाच 'का व कसे' समजून घेत बुद्धी, आकलनशक्ती व विचारशक्ती यांचा विकास घडून आणावयाचा होता. हे शिक्षण सामुदायिक वातावरणात सहकार्याने चालावयाचे होते. हे शिक्षण घेतानाच सत्य, सहकार्य, सौंदर्य यांचेही पाठ मिळावयाचे होते. त्यातून आपोआपच आत्मविश्वास व नैतिकता यांचे पोषण करावयाचे होते. आपले व समुदायाचे जीवन निर्मळ, सुंदर आणि अर्थपूर्ण करण्यास विद्यार्थी शिकणार होते. कर्मातून ज्ञान निर्माण करावयाचे, ज्ञान व्यवहारात तपासून, तावून-सुलाखून घेऊन उपयोगात आणावयाचे, अशी ही योजना होती. तिच्यात पढिकतेला, केवळ पुस्तकी ज्ञानाला स्थान नव्हते.' विद्यार्थी जे निर्माण करतील त्याला 'मूल्य' असल्याने शाळेचा-

शिक्षणाचा काही खर्च तर निघेलच, पण त्यांना एक उदरंभरणाचे साधनही हाती मिळेल.

ही सर्व योजना मांडताना गांधीजींच्या पुढे सात लाख खेड्यांतील अर्धपोटी अर्धनग्न जनता होती, हे तर स्पष्टच आहे. कोरड्या पुस्तकी ज्ञानाने त्यांच्या भाकरीचा प्रश्न सुटत नाही व म्हणून ते शिक्षण घ्यावयाला तयार नाहीत, हेही त्यांना दिसत होते. (आजही डोंगराळ आदिवासी भागात हीच परिस्थिती आहे.) या लोकांना 'माणूस' बनविणे, त्यांच्या जीवनात आनन्द निर्माण करणे, आलस्य, दारिद्र्य, व्यसनीपणा व अज्ञान यांतून त्यांची मुक्तता करणे, त्यांच्यात 'सामाजिकता' वाढविणे, हे खरे काम. ब्रिटिश अमदानीत रूढ असलेले पुस्तकी वा केवळ साक्षर बनविणारे शिक्षण हे काम करू शकत नव्हते. बडोदा संस्थानात साक्षरतेचा झालेला प्रसार व शिक्षणाच्या संस्थांची वाढ पाहून त्यांनी थोडेसे समाधान व्यक्त केले. पण लगेच प्रश्न उपस्थित केला—"या शिक्षणाने लोकांच्या गरजा तृप्त होतात काय ? या शिक्षणाने शेतकऱ्यांची मुले अधिक चांगली शेती करतात काय ? या शिक्षणामुळे त्यांची नैतिक व भौतिक सुधारणा झाली आहे काय? शिक्षणप्रसार होऊनही बडोद्यातील बहुसंख्य जनता पूर्वीप्रमाणेच असहाय आहे; दुष्काळात त्यांची तीच दैना चालू आहे, त्यांच्या गावाची आरोग्यव्यवस्था पूर्वीइतकीच निकृष्ट आहे; बडोद्याची जमीन सुपीक असूनही त्यांना आपल्याला लागणारे अन्नवस्त्र स्वत:ला निर्माण करता येत नाही.'' (यं. इं. २१।१।२६)जे शिक्षण, जी विद्या जगण्याची कला हस्तगत करून देत नाही, ते शिक्षण कसले, ती विद्या काय कामाची ? ती तर निव्वळ पोपटपंची ! म्हणून खरे जीवन जगत, जीवन जगावे कसे हे सांगणारे, जीवनशिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे.

गांधीजींच्या वरील प्रश्नातच आपली खऱ्या शिक्षणाची कसोटी त्यांनी सांगितली आहे. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्याबद्दल आज सर्वत्र कंठशोष चालू आहे. गांधीजींनी आत्मविश्वासपूर्वक सांगितले होते की, " माझ्या कल्पनेतील प्राथमिक शाळेतील सहासात वर्षांच्या मुलाला सध्याच्या प्राथमिक शाळेतल्या मुलां-मुलींपेक्षा किती तरी अधिक भोवतालच्या व्यवहाराचे ज्ञान असेल, त्याला सुंदर मोत्यांच्या दाण्यासारखे अक्षर काढता येईल, त्याला शुद्ध वाचता येईल, सोपी बेरीज, वजाबाकी गुणाकार व पाढेही येतील—आणि हे सर्व एक वर्षाच्या आत.'' खेड्यातील मुलांना खेड्यांतच राहून खेड्यांतील व्यवसायांच्या द्वारा आधुनिक ज्ञान-विज्ञानाची ओळख करून द्यावयाची व सात वर्षांच्या काळात इंग्रजी वजा जाता बाकीच्या विषयांची माध्यमिक शालान्त परीक्षेपर्यंतची तयारी करून घ्यावयाची, शिवाय त्याच्या जोडीने व्यावसायिक, सामाजिक, नैतिक ज्ञान व मनोवृत्तीची घडण. ही केवढी महत्त्वाकांक्षा, केवढे 'अप-ग्रेडिंग,' शिक्षणाचा स्तर उंचवण्याची केवढी हिंमत ! आपल्या योजनेला त्यांनी 'क्रांतिकारक' म्हणून संबोधले त्यात नवल नाही.

गांधीजींच्या 'नयी तालीम'चे क्रांतिकारकत्व केवळ पद्धतीत नव्हते, किंवा विद्यार्थ्यांच्या ज्ञानकौशल्याचा स्तर अल्पावधीत उंचावण्याच्या तिच्या सामर्थ्यात नव्हते. आरंभी म्हटल्याप्रमाणे त्यांची शिक्षण-योजना हे त्यांच्या आदर्श-समाज-निर्मितीचे साधन होते. मुंबई येथे केलेल्या भाषणात (हरिजन, ९।१०।३७) त्यांनी स्पष्टपणे असा निर्वाळा दिला होता की,–

"माझी ही योजना म्हणजे एका शांततामय सामाजिक क्रांतीचा चंचूप्रवेश असून तिचे परिणाम दूरगामी आहेत. शहरे आणि खेडी यांच्यातील परस्परसंबंधाला त्यामुळे अधिक निकोप व नैतिक वळण मिळणार असून आज सामाजिक असुरक्षिततेचे व वर्गीय भावनेचे जे घातुक दुष्परिणाम आढळतात, त्यांपैकी बरेचसे टाळण्यास या शिक्षण-योजनेचा उपयोग होणार आहे. आपल्या खेड्यांचा जो सतत अधःपात चालू आहे, त्याला तिच्यामुळे आळा बसेल, आणि न्याय्यतर अशा समाजाच्या उभारणीचा पाया तिच्यामुळे घातला जाईल. आज सधन व निर्धन अशी जी समाजाची कृत्रिम विभागणी आढळते, ती या नव्या व्यवस्थेत असणार नाही"

गांधीजींची शिक्षणाकडे बघण्याची दृष्टी एका थोर तत्त्वज्ञाची होती, हे लक्षात येण्यास एवढे विवेचन पुरेसे आहे.

**शिक्षणाची व्यापक कल्पना**

गांधीजींनी शिक्षणासंबंधीच्या अन्य समस्यांचाही सखोल व सर्वांगीण विचार केलेला होता. शिक्षणाचा जसा जीवनाशी घनिष्ठ संबंध असावा, असे त्यांनी प्रतिपादिले, तसेच विद्येचा, ज्ञानाचा शुद्ध आनंद मिळावा, हीही त्यांची कल्पना होती. म्हणून 'विद्या' व 'व्यवसाय'।करियर यांच्यात त्यांनी भेद कल्पिला आहे. शिक्षणाचे स्वरूप सामान्य की व्यवसायाभिमुख असावे, असा एक वाद आहे. (या द्वंद्वाचे निरसन ड्यूईंनी फार चांगल्या तऱ्हेने केले आहे.) गांधीजींचेही त्याबाबत विचार आढळतात. अध्यापनात बालकांना स्वातंत्र्य किती असावे, क्रीडनशीलतेला (प्ले-वे) अवसर किती असावा, याबद्दलही काही विचार त्यांनी मांडले आहेत. शिक्षकांची भरती, गुणवत्ता, प्रशिक्षण व मनोवृत्ती यांचा विचार केल्याशिवाय त्यांना गत्यंतरच नव्हते. शरीर, हृदय व मन यांचा समतोल व परस्परपूरक विकास हे शिक्षणाचे कार्य त्यांनी मानले असल्याने शारीरिक शिक्षण, नैतिक व धार्मिक शिक्षण यांचा ऊहापोह करणे त्यांना भागच होते. मूलोद्योगी शाळेतील शिक्षणाची सुंदर फळे घरापर्यंत पोहोचतील व ही मुले पालकांना नव्या नव्या गोष्टी शिकवू लागतील, असे सांगून पालक-शिक्षणाच्या स्वरूपाची कल्पनाही त्यांनी दिली आहे.

गांधीजी पढिक वा सैद्धान्तिक (थिअरिस्ट) शिक्षणशास्त्री नव्हते, तर स्वानुभवातून व प्रयोगातून आपल्यासमोर येणाऱ्या समस्यांची उकल करण्याचे मार्ग शोधीत शिक्षणशास्त्री बनले होते व बनत होते, हे त्यांचे मोठे वैशिष्ट्य आहे. अडचण होती

ती त्यांच्या कल्पना आकलन करण्याची वा आकलन झाल्या तरी त्यांची कार्यवाही करण्याची. सत्ता आणि संपत्ती यांचा उपभोग घेण्याची ज्यांना चटक लागली होती, सरंजामशाहीचे संस्कार ज्यांच्या रक्तात भिनले होते, त्यांना गांधीजींचे तत्त्वज्ञान व शिक्षणविचार रुचणेच शक्य नव्हते. पाश्चिमात्यांच्या तंत्र-विज्ञानजन्य भौतिक समृद्धीची ज्यांना मोहिनी पडली होती, त्यांनाही गांधीविचार 'युग-विरोधी,' 'काल-विसंवादी' वाटत होता. गांधीजींना हे सर्व समजत होते. पण त्यांचे मन स्वप्नाळू नव्हते. या खंडप्राय देशातील अर्धमानवी जीवन जगणाऱ्या कोटयवधी मानवांच्या संजीवनाची, मुक्तीची व जीवनाची उघडीनागडी भीषण समस्या त्यांच्यासमोर उभी होती. आणि ती सोडविण्याचा अत्यंत व्यवहार्य उपाय त्यांना हवा होता. त्यांना तो सुचला. त्या उपायाची तंतोतंत अंमलवजावणी झाली नाही, म्हणून त्याचे 'क्रांति-कारकत्व' खोटे ठरत नाही. महात्म्यांचे अपयश हे त्यांच्या अनुयायांच्या कमकुवत-पणातून येत असते.

**काही आक्षेपांचे निरसन**

गांधीजींनी हस्तोद्योगावर जो भर दिला, प्राथमिक शिक्षणाची जी एकसारखी तरफदारी केली व इंग्रजी माध्यमावद्दल जो तिटकारा व्यक्त केला, त्यामुळे गांधीजींच्या शिक्षणविचारावावत काही आक्षेप घेण्यात येतात. गांधीजींचे विचार पूर्वग्रह टाळून वा मुळात जाऊन न वाचल्यामुळेच हे आक्षेप (व त्यांमागील गैरसमज) निर्माण झाले आहेत, असे म्हणावे लागते. अनेक आक्षेपांपैकी महत्त्वाचे तीनच आक्षेप येथे निवडले आहेत :–

(१) पहिला आक्षेप असा की, गांधीजी ज्या संन्यस्त वृत्तीने राहत, त्याच वृत्तीचा पुरस्कार ते सर्वत्र करतात. त्यांच्या विचारसरणीमुळे भारताचा भौतिक व आर्थिक विकास कधीच होणार नाही. भारत हे एक मागासलेले राष्ट्र राहील. (याचा अर्थ ते दरिद्रयांचे राष्ट्र असेल.)

(२) इंग्रजीचे अध्ययन-अध्यापन थांवल्यामुळे ज्ञान-विज्ञानाची उपासनाच थांबेल, गांधीजी हे साहित्य-कलांचे द्वेष्टे आहेत-निदान भोक्ते नाहीत.

(३) गांधीजींनी उच्च शिक्षणावावत औदासीन्य दाखविले आहे. भारताच्या प्रगतीच्या दृष्टीने ही गोष्ट हानिकारक आहे.

सुदैवाची गोष्ट अशी आहे की, काही प्रामाणिक विचारवंतांनी या शंका निर्भयपणे गांधीजींपुढे मांडल्या आणि स्वत: गांधीजींनीच त्यांचे निरसन केले. त्यामुळे या आक्षेपांचे निरसन करताना तर्कानुमानाचे साहाय्य घेण्याची गरजच उरलेली नाही.

**(१) भारतातील भौतिक प्रगती व समृद्धी**

गांधीजी स्वत: संन्यस्त वृत्तीने राहात, असे म्हणण्यापेक्षा ते संयमी जीवन

व्यतीत करीत, असे म्हणणेच योग्य होईल. ब्रह्मचर्य, असंग्रह, अस्वाद, ही त्यांनी प्रतिपादिलेल्या एकादश व्रतांतील महत्त्वाची तत्त्वे आहेत, त्यांचे ते पालन करीत. मोक्षसाधनेसाठी वा आध्यात्मिक सामर्थ्य वाढविण्यासाठी त्यांची आवश्यकता त्यांना स्वानुभवाने पटली होती. या संदर्भात एक गोष्ट ध्यानी घ्यावयास पाहिजे की, समाजाच्या उद्धाराची जबाबदारी शिरावर घेणाऱ्या व त्यासाठी आध्यात्मिक सामर्थ्य संपादिलेल्या महापुरुषांची जीवनपद्धती व गांधीजींची जीवनपद्धती यात काहीच फरक नाही. आचार्य जावडेकरांनी प्रतिपादिलेली 'यतिवर्गा'ची परंपराच ते चालवीत होते. पूर्वीच्या काळातील श्रीशंकराचार्य, श्रीसमर्थ रामदास व अलीकडच्या काळातील श्रीविवेकानंद यांची जीवनपद्धती व जीवनध्येये आणि गांधीजींची जीवनपद्धती व ध्येये यात फारसा फरक नाही. देशबांधवांचे संसार केवळ सुखाचेच नव्हे तर सर्व मिळमिळीतपणा, सारे दैन्य व सर्व लाचारी बाजूला सारून ते भव्य, तेजस्वी व दिव्य व्हावेत म्हणून अहर्निश धडपडणारे हे सारे महात्मे होते. म्हणून भारताच्या भौतिक समृद्धीबाबत शंका घेणाऱ्यांना गांधीजींनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले आहे :–

"मैंने ऐसे दारिद्रयपीडित भारतका चित्र नहीं खींचा था, जिसमें लाखों आदमी अनपढ हैं। मैंने तो अपने लिअे ऐसे भारतका चित्र खिचा है, जो अपनी बुद्धिके अनुसार सतत प्रगति कर रहा हैं। .....यदि मेरा स्वप्न पूरा हो जाय, तो भारतके सात लाख गांवोंमें से हरएक गांव समृद्ध प्रजातन्त्र बन जायगा। उस प्रजातंत्रका कोई व्यक्ति अनपढ न रहेगा, कामके अभावमें कोई बेकार न रहेगा, बल्कि किसी न किसी कमाऊ धंधेमें लगा होगा। हरएक आदमीको खानेको पौष्टिक चीजें, रहनेको अच्छ हवादार मकान, और तन ढंकनेको काफी खादी मिलेगी .. अैसे राज्यको विभिन्न प्रकारकी और उत्तरोत्तर बढती हुई आवश्यकताअें होनी चाहिये।..."
(हरिजनसेवक, ३०–७–३८)

### (२) विज्ञानाची उपासना

वरील लेखात उच्च शिक्षणाबाबत विचार आहेत, ते पाहण्यापूर्वी भारताच्या आर्थिक समृद्धीबाबत अन्यत्र मांडलेल्या विचारांचा परामर्श घेऊ. दक्षिण भारतातील एका महाविद्यालयाच्या अमेरिकन प्राचार्यांना (डॉ. जॉन डी. बोअर) दिलेल्या मुलाखतीत समाजवाद, आर्थिक प्रगती व साधी राहणी या मुद्द्यांची चर्चा आलेली आहे. त्या मुलाखतीत गांधीजींनी म्हटले आहे की, तीन कोटी लोकांचे काम तीस हजार कामगारांकडून यंत्राच्या द्वारा करून घेण्यास माझी हरकत नाही. अट एकच आहे की, बाकीचे लोक बेकार होता कामा नयेत. दुसरी गोष्ट लाखो टन गहू समुद्रात ओतणारी अमेरिकेची संपन्नताही आम्हांस नको आहे. समृद्धीचा अर्थ अन्न-वस्त्र निवारा यांसाठी प्रत्येक व्यक्तीला पुरेशी सामुग्री आणि आपल्या बुद्धीला शिक्षित व सुसंस्कृत करण्याला पुरेशी साधने असा असेल, तर ती समृद्धी मला पण संतोषप्रद

वाटेल. त्यावेळी त्यांनी म्हटले आहे–"पर मैं हिंदुस्तानमें न तो गरिवी या मुफलीसी चाहता हूँ, न मुसीवत और गन्दगी चाहता हूँ।" ( ह. से. १२.२ ३८)

### (३) उच्च शिक्षण अनिवार्यच

प्रत्येक खेडे जर 'समृद्ध प्रजातंत्र' व्हावयाचे असेल, आणि त्याच्या 'उत्तरोत्तर वाढत्या गरजांची' परिपूर्तता व्हावयाची असेल, तर त्यासाठी उच्च शिक्षण व संशोधन यांची नितांत आवश्यकता आहे. गांधीजी ही गोष्ट जाणून होते. गांधीजींचा विरोध उच्च शिक्षणाला नव्हता, तर ज्या पद्धतीने त्या वेळी ते दिले जात होते (आणि आजही दिले जात आहे) आणि ज्या उद्देशाने ते दिले-घेतले जात होते (व आजही दिले-घेतले जात आहे) त्या पद्धतीला व उद्देशाला होता. 'उच्च शिक्षण' नावाच्या लेखाच्या अखेरीस ते म्हणतातः–

" मी स्पष्टपणे सांगू इच्छितो की, मी उच्च शिक्षणाचा विरोधक नाही. पण देशात आज जे उच्च शिक्षण दिले जात आहे, त्याला मात्र माझा निश्चित विरोध आहे. माझ्या योजनेतील उच्च शिक्षणात अधिक प्रमाणात व चांगल्या दर्जाची ग्रंथालये असतील, चांगल्या रसायनशाळा व प्रयोगशाळा असतील. त्या योजनेत आमच्यापाशी प्रजेच्या वाढत्या गरजा भागविणारे व राष्ट्राचे सच्चे सेवक असणारे व अन्य विशेषज्ञ यांची मोठी सेना असेल. ते लोक जनतेची भाषा बोलतील आणि त्यांनी संपादन केलेले ज्ञान सर्वांच्या सामायिक मालकीचे असेल." (हरिजन,९.७.३८)

परंपरागत महाविद्यालयातून वाहेर पडलेले तरुण "सरकारी नौकरीच्या मागे पळत सुटतात किंवा भलभलत्या मार्गाने जाऊन लोकांत असंतोष भडकवून आपल्या भावनांना वाट करून देत असतात." स. १९४६ मध्ये गांधीजींनी मांडलेला हा विचार व केलेले निरीक्षण व त्यातून दिलेला इशारा आज तीस वर्षानंतर किती तीव्रतेने अनुभवास येत आहे ! आज ज्या पद्धतीने तुटपुंज्या सामग्रीवर व तुटपुंज्या ज्ञानाच्या प्राध्यापकांच्या जीवावर गावगन्ना महाविद्यालये निघत आहेत, आणि त्यांच्या जोरावर महाविद्यालयीन उच्च शिक्षणाच्या प्रसारावावत जनता व शासन समाधान मानीत आहे, ते पाहून गांधीजींना काय वाटले असते, किती वेदना झाल्या असत्या, हे सांगणे कठीण आहे ! आपल्या कल्पनेतील ग्रामीण विभागातील महाविद्यालये कशी असावीत, याची कल्पना त्याच साली (१९४६) डॉ. किनी यांच्या पत्रावरील आपला अनुकूल अभिप्राय व्यक्त करून गांधीजींनी सुचविली आहे. (शिक्षण-विचार -गां. वि. दर्शन खंड ११–पृ. १३४) पण हे ' जुने ठेवणे' पाहतो कोण ?

आपण अक्षर-ज्ञानाचे शत्रू आहोत, असा उगाच गैरसमज करण्यात येत आहे, असे सांगून ते म्हणाले " सत्य तो इससे उलटा ही है । मैं नहीं चाहता कि राष्ट्रीय विद्यालयोंमें पढाई-लिखाई बन्द करके सिर्फ कातना-पिंजाना ही सिखाया जाय या कराया जाय । मैं चाहता हूं कि विद्यार्थियोंको काफी और मुनासिव अक्षरज्ञान

दिया जाय।'' ( नवजीवन २१-१२-२४ )
स. १९२४ मध्ये सांगितलेला हा विचार वर्धा-शिक्षण-योजनेच्या संदर्भात त्यांनी अनेकदा मांडला आहे. दस्तकारी वा उद्योग हा शिक्षणाचे, बुद्धिभावनांच्या विकासाचे साधन व माध्यम म्हणूनच योजावयाचा आहे आणि प्रत्येक उद्योगाचे कार्यकारणज्ञान विद्यार्थ्यांना मिळून त्यांची विचार-शक्ती वाढवायची आहे, यावर त्यांनी भर दिला.

**इंग्रजी माध्यमाचा जुलूम**

गांधीजी इंग्रजी भाषेचे द्वेष्टे नव्हते, उलट प्रेमीच होते. इंग्रजीची देशातून हकालपट्टी करावी, असेही त्यांनी कधी म्हटले नाही. इंग्रजी ही जगातील हवा येण्याची खिडकी असेल, तर अनेक भाषांच्या खिडक्या आमच्या घराला हव्यात, असे त्यांनी रवींद्रनाथांना उत्तर दिले होते. त्यांचा विरोध होता तो इंग्रजी माध्यमाला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक शक्तीचा व वेळेचा अपव्यय त्यांना टाळावयाचा होता. प्रत्येक व्यक्तीचा मातृभाषाद्वारा ज्ञान घेण्याचा हक्क ते प्रस्थापित करू पहात होते. जपानचे अनुकरण करून भाषांतर-अनुवाद करणाऱ्या भाषा-तज्ज्ञांची एक सेना सज्ज ठेवावी असा त्यांचा सल्ला होता. सुदैवाने त्यांचा हा दृष्टिकोन आता मान्यही झाला आहे. पण अजूनही उच्च शिक्षणात इंग्रजीचे अवडंबर माजवू पाहणारा, न्यूनगंडाने पछाडलेला व निष्क्रिय असा बुद्धिमंतांचा वर्ग देशात आहेच. त्यांचे समाधान करणे अशक्य आहे !

स्वराज्य-प्राप्तीनंतर आपल्या राष्ट्राने नियोजनाची कास धरून औद्योगीकरणाला सुरुवात केली आहे. शिक्षणासाठी पूर्वीच्या अनेक पटींनी द्रव्यबळ उपलब्ध करून दिले जात आहे. अशा वेळी गांधी-विचारातले काय शिल्लक उरले आहे ? त्याचे स्वारस्य काय आहे ?

आमच्या मते 'राष्ट्रीय शिक्षणपद्धती' निर्मिण्यासाठी नेमल्या गेलेल्या कोठारी-शिक्षण-आयोगाच्या बहुसंख्य शिफारशी म्हणजे गांधी-विचारांचेच नवे रूप आहे; नवा परिष्कार आहे. आयोगाने जवळ जवळ तशी कबुलीही दिली आहे. ( को. शि. आ. ८-१०९ ) शिक्षणपद्धती समाजाच्या गरजा-आकांक्षांशी सुसंगत असली पाहिजे, हा आयोगाने ठिकठिकाणी उद्घोषिलेला विचार हाच गांधी-शिक्षण-विचाराचा गाभा आहे. उत्पादकता, अन्नवस्त्रांबाबत स्वावलंबन, सर्वांना पूर्ण वेळ रोजगार मिळवून देण्याची शासनाची जबाबदारी, राष्ट्रीय आणि सामाजिक एकता, कार्यानुभव आणि समाजसेवा यांचा शिक्षणक्रमात अन्तर्भाव, लोकशाही व विज्ञान-निष्ठा यांची जोपासना, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जपणूक, समान शिक्षण, पद्धतीद्वारा समानतेचे संस्कार, हे सर्व आयोगाच्या आरंभीच्या प्रकरणात चर्चिलेले विषय गांधीजींच्या विचाराहून वेगळे नाहीत. बेसिक एज्युकेशनची मूलभूत तत्त्वे म्हणजे ( १ ) शिक्षणात उत्पादक कार्याचा समावेश, ( २ ) उत्पादक कार्ये, भौतिक

परिसर आणि सामाजिक वातावरण यांच्याशी शिक्षणक्रमाचा समवाय, (३) आणि शाळा व स्थानिक समाज यांच्यात घनिष्ठ संपर्क ही होत आणि आपल्या शिक्षण-योजनेत त्यांचा आपण सर्व स्तरांवर स्वीकार केला आहे, असे आयोगाने म्हटले आहे (८.१०५). वरील विचारसरणी मान्य असेल तर गांधी-शिक्षण-विचार संपला नसून त्याच्या कार्यवाहीला बदललेल्या परिस्थितीनुरूप जरूर तो फेरबदल करून आता सुरुवात होत आहे, असेच म्हणावे लागेल. महाराष्ट्राच्या शिक्षण-मंत्र्यांनी आपली श्वेतपत्रिका सादर करताना हीच भूमिका घेतली आहे. गांधीजींच्या शब्दांचे अक्षरश: पालन न करता त्यातील चैतन्यदायी तत्त्वांचे आचरण हाच महत्त्वाचा भाग आहे.

**गांधीजींच्या विचारातील मौलिकता**

'कृतिद्वारा शिक्षण' (लर्निंग बाय डुइंग) हा विचार गांधीजींच्या पूर्वी अनेक तत्त्ववेत्त्यांना सुचला असला, तरी गांधीजींपुरता तो मौलिकच होता. कारण एक तर या बाबतीत त्यांनी पूर्वसूरींच्या विचारांचा अभ्यास केलेला नव्हता; हा विचार स्वत:च्या प्रयोग-अनुभवातून त्यांनी मर्मदृष्टीने ग्रहण केला होता. दुसरे म्हणजे उत्पादक उद्योगांशी संबंध जोडण्याची त्यांची कल्पना इतरांपेक्षा वेगळी होती. ड्यूई यांनी आपल्या लॅबोरेटरी स्कूलमध्ये जीवनव्यवसाय हे शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारले होते, हे खरे; पण त्यातून उत्पादन व्हावे, काही आर्थिक लाभ व्हावा, अशी दृष्टी नव्हती. भारतासारख्या मागास देशात ही दृष्टी व विचार यांना अत्यंत महत्त्व आहे. आजही त्याचे महत्त्व कमी झालेले नाही. औद्योगिक युगात जीवनावर जी आर्थिक विचाराची छाप पडलेली आहे व श्रम-उद्योगाची गरज प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत वाढत आहे, त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला 'परिश्रमांचा अनुभव' (वर्क-एक्स्पिरिअन्स) असला पाहिजे आणि हे परिश्रम वा कार्य डोळसपणे वैज्ञानिक दृष्टीने करण्याची कला व क्षमता प्राप्त झाली पाहिजे. हा विचार पाश्चात्य देशांत मान्यता पावला असून त्याची अंमलबजावणीही चालू आहे.

गांधीजींनी या उद्योगद्वारा शिक्षणाच्या कल्पनेशी नैतिक व आध्यात्मिक विचारांची जी सांगड घातली आहे, ती एक त्यांची नवी मौलिक भर मानता येईल. त्यामुळेच त्यांची गणना तत्त्ववेत्त्यांमध्ये करावीशी वाटते. गांधीजी केवळ शिक्षणविषयक समस्या सोडवू पाहणारे सुधारक नव्हते, तर तत्त्वज्ञानात ज्या 'समग्रते'चा विचार केला जातो, त्या समग्रतेचा, सर्व जीवन एकसंध आहे असे मानून विचार करणारे चिंतक होते. काही पाश्चात्यांप्रमाणे ते 'इहलोकवादी' नव्हते व केवळ बुद्धिवादीही नव्हते. त्यामुळे जीवनातील भौतिक समृद्धीचे महत्त्व जाणत असूनही भोगपरायणतेपासून केवळ अलिप्तच नव्हे, तर संयम-अपरिग्रहाचा

पुरस्कारही ते करीत. जी शिक्षणपद्धती आपण स्वीकारू, तिच्यातून शेवटी काह जीवनमूल्ये व जीवनध्येये विंबवायची असतात, हे ते जाणून असल्याने आपल्या अहिंसक लोकतंत्रात्मक रामराज्याच्या निर्मितीचे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहत होते. ही दृष्टी तत्त्वज्ञाची आहे, केवळ सुधारकाची नाही.

**नवयुगाचे प्रवर्तक**

वस्तुत: पाहता गांधीजी व अन्य शिक्षणतज्ज्ञ यांच्यात तुलनाच होऊ शकत नाही. एक तर प्लेटो, रूसो, हर्बार्ट व ड्यूई ही मंडळी तत्त्वज्ञानाची सखोल अभ्यासक होती. व्यासंग, चिंतन, मनन यांसाठी त्यांना भरपूर अवधी लाभला होता. अध्यापन हे त्यांपैकी वहुतेकांचे नित्याचे कार्यक्षेत्र होते. गांधीजींना यांपैकी कशाचीच अनुकूलता नव्हती. गांधीजी 'व्यवहारी तत्त्वज्ञ' (प्रॅक्टिकल फिलॉसॉफर) होते. परिस्थिती उद्‌भवेल, प्रसंग पडेल, तसा सत्याचा शोध घेत घेत, एक एक सिद्धान्त ते हुडकून काढीत होते. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एका पददलित, रूढी–अज्ञान–दारिद्र्य यांनी गांजलेल्या व ग्रासलेल्या पसतीस कोटी लोकसंख्येच्या राष्ट्राचे स्वातंत्र्य संपादनासाठी चाललेल्या प्रदीर्घ लढ्यात सत्याग्रहाच्या अभिनव शस्त्राने ते नेतृत्व करीत होते. हे त्यांचे कार्य व व्यक्तिमत्त्व अलौकिक व असाधारण आहे. प्लेटोप्रमाणे 'आदर्श प्रजासत्तात्मक राज्या'चे चित्र गांधीजींनीही रंगवले. पण प्लेटोच्या आदर्श व्यवस्थेतही गुलामगिरीचे उच्चाटन नव्हते. मार्टिन ल्यूथर-प्रमाणे शासनांकित सार्वत्रिक शिक्षणाचा विचार त्यांनीही मांडला, पण उच्च शिक्षण ही वरिष्ठ वर्गाची मिरासदारी असे त्यांनी कधी मानले नाही. समाज-रचनेतील कृत्रिमता व विषमता यांच्यावद्दल रूसोप्रमाणे त्यांनाही चीड होती. व्यक्तीचे स्वातंत्र्य व तिची प्रतिष्ठा यावद्दल रूसोप्रमाणे गांधीजींनाही जिव्हाळा होता. रूसोप्रमाणेच निसर्गाकडे वघण्याचा त्यांचा दृष्टिकोन भक्ति-भावाचा होता. पण रूसोच्या विचारसरणीत नारीजीवनाला जे गौणत्व आहे, ते त्यांना कधीच मान्य नव्हते. 'कृतिद्वारा शिक्षण' व 'शिक्षणातून लोकशाहीची प्रतिष्ठापना व लोकशाहीतून शिक्षणाचा विकास,' यावावतीत गांधीजींचे विचार ड्यूईंच्या विचारांशी जुळणारे आहेत. जागतिक युद्धे संपुष्टात यावीत आणि यंत्र-तंत्रयुगाचे लाभ सर्वांना उपभोगावयास मिळावेत, हा ड्यूईचा विचार गांधीजींच्या सर्वोदय कल्पनेचा गाभाच आहे. पण ड्यूईंची विचारसरणी कितीही विशुद्ध, उदार व नीतियुक्त असली तरी ती 'ऐहिकतावादी' होती. गांधीजींना त्यांचा 'फल-प्रामाण्य-वाद' (प्रॅग्मॅटिझम) वा साधनतावाद कधीच मान्य नव्हता. त्या दृष्टीने गांधीजी आदर्शवादी होते. सृष्टीमागील 'सत्-चित्-आनंद'-मय तत्त्वावर त्यांची गाढ श्रद्धा होती. ड्यूईंनी अमेरिकेतील वंशवादावर फारसा कटाक्ष ठेवलेला आढळत नाही. गांधीजींनी मात्र भारतातील अस्पृश्यतेसाठी गुलामगिरीविरुद्ध जीवाचे रान केले.

शैक्षणिक दृष्टया शिक्षणातील उत्पादनाला आर्थिक व नैतिक मूल्य असले पाहिजे, हा गांधींचा विचार सर्वस्वी नवीन होता. एका निर्धन राष्ट्राला शिक्षणातून स्वावलंबी, सज्ञान व सतज वनविण्यासाठी गांधीजींनी जो नवा मंत्र दिला, ते त्यांचे नवयुग-प्रवर्तकत्व आहे. स्वातंत्र्य मिळाले व सारा जमाना बदलला, ही गोष्ट वेगळी. पण स्वातंत्र्य इतक्या लवकर न येते, तर राष्ट्राला गांधीजींच्या मार्गाने जाणें अपरिहार्यच झाले असते, यात शंका नाही. वर उल्लेखिलेले सर्वच शिक्षणवेत्ते व तत्त्वज्ञ आपापल्या कालखंडात श्रेष्ठ होते, त्यांच्या विचारसरणीचा प्रभाव शिक्षणप्रणालीवर पडला व शैक्षणिक तत्त्वज्ञानात त्यांनी मोलाची भर घातली. गांधीजींनीही भारतीय संस्कृतीच्या आदर्शांना उजळा देऊन, काही वेळेस त्यांचा नवा अर्थ लावून, त्यांचा आधुनिक काळातील समस्यांशी व विचारांशी मेळ घालण्याची अलौकिक कामगिरी केली आहे. वर म्हटल्याप्रमाणे, कोठारी–शिक्षण–आयोगात गांधीविचारांचे सार प्रतिबिंबित झाले आहे, हेच त्यांच्या शिक्षणविचारांचे यश आहे.

३७

# स्त्री-शिक्षणांतील क्रांती

### श्रीमती प्रेमलीला ठाकरसी

गांधीजींनी समग्र स्त्री-जीवनात क्रांती करण्याचा प्रयत्न केला. साहजिकच, स्त्रियांच्या शिक्षणामध्येही त्यांनी परिवर्तन घडविले. त्याचे स्वरूप पुढील लेखात विशद केले आहे.

आम्हां भारतीय स्त्रियांना गांधीजींनी बंधमुक्त केले, यावद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहो. युगायुगाच्या गुलामगिरीतून आम्हांला सोडविण्याचे व समाजात आम्हांला हक्काचे स्थान मिळवून देण्याचे श्रेय कोणाकडे जात असेल तर ते गांधीजींकडेच. त्यांनी आम्हांला स्वयंपाकघराच्या कोंडवाड्यातून बाहेर आणले, त्यांनी आम्हांला स्वाभिमानाची शिकवण दिली व आम्हांला शूर आणि निर्भय बनविले. ते बापू म्हणजे आमचे पिताजी होते. ज्या स्वराज्यात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान नाही, ते स्वराज्यच नव्हे, असे त्यांचे मत होते.

गांधीजी व्यवसायाने शिक्षक नव्हते, पण आम्ही स्पष्टपणे असे म्हणू शकतो की, गांधीजींनी सबंध जन्मभर शिकविण्याचेच काम केले. जात, गोत, धर्म, वर्ण, स्त्रीपुरुष इत्यादी कोणत्याही प्रकारचे भेदाभेद त्यांच्यापुढे नव्हते. ईश्वराने ज्या मानवाला आपली प्रतिमा म्हणून निर्माण केले आहे, त्या मानवाचा सर्वांगीण विकास करणे

हे गांधीजींच्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. म्हणून सबंध मानवजातीचे संपूर्ण जीवनच शिक्षणाने व्यापले आहे असे ते म्हणत. गांधीजी लिहितात, " लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत त्यांच्यांतले जे उत्कृष्ट असेल ते विकसित झाले पाहिजे व त्यांचे शरीर, मन व आत्मा यांना पूर्णावस्था प्राप्त झाली पाहिजे. साक्षरता हे शिक्षणाचे अंतिम ध्येय नाही, ते प्रारंभीचे उद्दिष्टही नाही. स्त्रीपुरुषांना शिक्षित करण्याचे ते एक साधन आहे. साक्षरता हे शिक्षण नव्हे. बालकांमधील शारीरिक, बौद्धिक व आत्मिक शक्ती खेचून काढून त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करणे हे खरे शिक्षण आहे. '' गांधीजी चारित्र्यविकासावर विशेष भर देत असत. स्वतंत्र भारतात शिक्षणाचे ध्येय काय असावे, असा त्यांना प्रश्न विचारताच त्यांनी ताडकन उत्तर दिले, "चारित्र्य, सदाचरण,धैर्य,सामर्थ्य व सद्‌गुण या गुणांची जास्तीत जास्त वाढ करण्याचा प्रयत्न करणे. नुसत्या साक्षरतेपेक्षा हे जास्त महत्त्वाचे आहे. पदवी परीक्षेचे शिक्षण ह्या अत्युच्च ध्येयाचे एक सर्वसामान्य साधन आहे.'' चारित्र्याशिवाय शिक्षण आणि वैयक्तिक पावित्र्याशिवाय चारित्र्य याला अर्थ नाही. ज्ञानाचा शेवट चारित्र्यसंपादनात झाला पाहिजे. सत्य आणि पावित्र्य यांच्या पायावर उभारलेल्या सदाचरणावर शिक्षणाची उभारणी झाली पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते.

दिल्लीच्या कस्तुरबा बालिकाश्रमाच्या विद्यार्थिनींपुढे भाषण करताना गांधीजी म्हणाले, " विद्वत्तेपेक्षा शिक्षणाच्या सांस्कृतिक अंगाला मी विशेष महत्त्व देतो. संस्कृती हा शिक्षणाचा पाया आहे आणि येथल्या मुलींना ती प्रथम शिकविण्यात आली पाहिजे. तुम्हां मुलींच्या रोजच्या बोलण्याचालण्यात, वागण्यात, कपड्यात, प्रत्येक ठिकाणी ती अशी दिसली पाहिजे की, तुम्ही ह्या संस्थेच्या विद्यार्थिनी आहात, हे बाहेरच्या लोकांना आपोआप कळून आले पाहिजे.''

शिक्षण ही जन्मापासून मृत्यूपर्यंत कधीही न संपणारी अखंड व अविभाज्य अशी क्रिया आहे. स्त्रियांची पारतंत्र्यांतून मुक्तता झाल्याशिवाय भारताला नैतिक, भौतिक किंवा आत्मिक क्षेत्रात प्रगती करता येणार नाही. म्हणून गांधीजींनी शेवटी असा निष्कर्ष काढला की, स्त्रियांच्या पुनरुज्जीवनाचे शिक्षण हे सर्वांत प्रभावी साधन आहे.

मुंबईच्या भगिनीसमाजातर्फे भरलेल्या स्त्रियांच्या सभेत भाषण करताना गांधीजी उद्‌गारले, " तुम्हांला लिहितावाचता आल्याशिवाय तुमचे चालणार नाही, असा माझा पक्का विश्वास आहे. या ज्ञानामुळे बुद्धीचा विकास होऊन ती तीक्ष्ण बनते आणि दुसऱ्यांचे कल्याण करण्याच्या शक्तीला चालना मिळते. आपले हक्क सुरक्षित राखण्यासाठी स्त्रियांना शिक्षणाची जरूरी आहे. ज्या लाखो लोकांना हे शिक्षण मिळालेले नाही, त्यांना स्वतःची स्वतःलासुद्धा ओळख पटणे दुरापास्त असते. जो मानवी प्राणी शिक्षणाशिवाय असतो त्याच्यांत आणि जना-

वरांत फारसा फरक नसतो, असे म्हणण्यात यत्किंचितही अतिशयोक्ती नाही. म्हणून पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षणाची तितकीच आवश्यकता आहे. परंतु त्यांचा शिक्षण-क्रम वेगवेगळा असावा.''

पुरुष आणि स्त्रिया यांचा दर्जा समान आहे. ते एकमेकांचे पूरक व परस्परांचे सहाय्यक आहेत. एकाशिवाय दुसऱ्याचे अस्तित्व नाही. या सर्व गोष्टींवरून असा उपसिद्धांत काढता येतो की, एकाचा दर्जा खालावल्यास त्याचा परिणाम दुसऱ्यावर झाल्याशिवाय रहाणार नाही. आणि अखेर दोघांचाही नाश होईल...बाह्य जगाशी पुरुषाचा संबंध असतो, तर घर हे स्त्रीचे एकमेव क्षेत्र आहे. घर सांभाळणे, आल्या-गेल्याचे आगतस्वागत करणे, घराची व्यवस्था पहाणे, मुलांचे संगोपन आणि संवर्धन करणे ही स्त्रियांची मुख्य कार्ये आहेत. पुरुष व स्त्रिया यांची कार्यक्षेत्रे अशी वेग-वेगळी व विभक्त असली तरी कौटुंबिक जीवनात सहकार्य व सहजीवन हेच मुख्य असते. स्त्रियांच्या शिक्षणासंबंधी गांधीजींचे असे विचार आहेत, ते येथे सूत्ररूपाने मांडले आहेत.

मुलींच्या एका शाळेत भाषण करताना गांधीजी एकदा म्हणाले, "तुमचे पालक तुम्हांला निर्जीव बाहुल्या बनविण्याकरिता शाळेत पाठवीत नाहीत, उलट तुम्ही 'दयेच्या देवता' बनावे अशी तुमच्याबद्दल अपेक्षा असते. जी स्वतःबद्दल विचार करीत नाही, पण गरीब व दुर्दैवी भगिनींचा विचार करते, तीच 'दयेची देवता' होऊ शकते. सुशिक्षित भारतीय तरुणींनी पाश्चात्यांचे अंधानुकरण करू नये. योग्य शिक्षणाने, सदाचरणाने, चारित्र्याने, पावित्र्याने व संयमशील वर्तनाने स्त्रियांनी सीता, दमयंती व द्रौपदी यांचा आदर्श पुढे ठेवावा व भारतीय स्त्रीजातीची उन्नती करावी.''

मूलभूत किंवा मूलोद्योगी शिक्षणाच्या बाबतीत मुले व मुली यांत भेदाभेद करता कामा नये, असे गांधीजींचे म्हणणे असे. मुलामुलींच्या सहशिक्षणाचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. कितीतरी वर्षापूर्वी म्हणजे १९१७ साली गांधीजींनी इंग्रजी शिक्षणासंबंधी पुढील विचार प्रकट केले होते : "स्त्रियांना इंग्रजी शिक्षणाची आवश्यकता आहे की नाही, याबद्दल मला दोन शब्द बोलावेसे वाटतात. आपल्या सर्वसाधारण जीवनात पुरुषांना किंवा स्त्रियांनाही इंग्रजी शिक्षणाची जरूरी नाही, असे माझे ठाम मत झाले आहे. उपजीविकेसाठी किंवा राजकीय चळवळीत भाग घेणारांसाठी इंग्रजीची जरूरी आहे, हे मला मान्य आहे. स्त्रियांनी नोकरी करावी किंवा कारखान्यात काम करावे, हे मला ठीक वाटत नाही. ज्या मुलींना इंग्रजी शिकावयाची हौस असेल किंवा जरूरी असेल, त्यांनी मुलांच्या शाळेत जावे. केवळ मुलींसाठी असलेल्या शाळेत इंग्रजी शिक्षण सुरू करणे म्हणजे आपली अगतिकता वाढविणे आहे. इंग्रजी वाङ्मयातील समृद्ध वाङ्मयाचे भांडार स्त्रीपुरुषांना सारखेच खुले असावे, असे मी पुष्कळांच्या तोंडून ऐकले आहे. इंग्रजीबद्दल अशी भावना असणे

ही गैरसमजूत आहे, असे मी नम्रपणे सांगू इच्छितो. हा ठेवा केवळ पुरुषांना उपलब्ध व्हावा व स्त्रियांना त्याचे दार बंद असावे, असे कोणीही म्हणणार नाही. तुम्हांला जर खरोखर ज्ञानाची तीव्र जिज्ञासा असेल व तुम्ही जगातल्या वाङ्मयाचा अभ्यास करू इच्छीत असाल, तर तुम्हांला कोणीही अडवू शकणार नाही. ज्ञानाचे सर्व भांडार केवळ इंग्रजी भाषेतच आहे असे नाही, तर इतर भाषांतही तसेच उत्कृष्ट वाङ्मय आहे. जगातल्या सर्व भाषांतील हे उत्तमोत्तम साहित्य सर्वसामान्य वाचकांसाठी उपलब्ध झाले पाहिजे आणि त्यासाठी विद्वानांनी त्याचे भाषांतर करण्याचे परिश्रम केले पाहिजेत. ''

विवाहानंतर ज्या तरुण स्त्रिया सार्वजनिक जीवनातून अदृश्य होतात, त्या-बद्दल गांधींना मनस्वी खेद होत असे. लग्नानंतर त्या जर नवऱ्याच्या हातच्या बाहुल्या झाल्या व केवळ कुटुंब-संवर्धनाच्या उद्योगाला लागल्या, तर त्यांच्या शिक्षणाचा उपयोग काय ? संसारात पडल्यावरही त्यांनी आपले सार्वजनिक जीवन सोडू नये. हिंदु मुलींनी पार्वती व सीता यांचा कित्ता पुढे ठेवावा, इतकेच नव्हे तर त्यांच्या वरचढ होण्याचा प्रयत्न करावा, असे गांधीजींचे म्हणणे असे.

गांधीजी हे खरोखर बापू होते--हिंदी स्त्रियांचे ते तारणहार होते.

३८

# म. गांधी व राष्ट्रभाषा

गो. प. नेने.

भारताची राष्ट्रभाषा कोणती असावी, याचा विचार गांधीजींनी पन्नास वर्षांपूर्वीपासून केला आहे. हिन्दी या राष्ट्रभाषेचा पुरस्कार त्यांनी सर्व देशभर इतक्या प्रचंड प्रमाणावर केला की, राजाजीं-सारख्यांनीही त्याला पाठिंबा दिला आणि घटना परिषदेनेही त्या मताला संमती दिली. हा सारा इतिहास पुढील लेखात साधार कथन केला आहे.

महात्मा गांधींसारख्या अलौकिक नेत्याच्या दृष्टिपथातून राष्ट्रीय जीवन व राष्ट्रीय संघटना या दोहींशी संबंधित असा जीवनाचा एखादा पैलू सुटला तरच आश्चर्य मानावे लागेल.

राष्ट्रीय जागृती व राष्ट्राची बांधणी यांसाठी उदयोन्मुख अशा भारतीय जीवनाकरिता ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता होती, त्यांची त्यांनी अत्यंत दक्षतेने व बारकाईने जोपासना केली. भारतासारख्या बहुभाषी राष्ट्राकरिता एखाद्या सार्वदेशिक भाषेची आवश्यकता आहे व ती राष्ट्र-ऐक्याचे साधन म्हणून व्यवहारात यावी, ही गोष्ट या शतकाच्या आरंभीच त्यांच्या लक्षात आली.

१९०९ साली त्यांनी 'हिंदस्वराज्या'त लिहून ठेवले की, भारतासारख्या देशातील लोकांनी बहुभाषी झाले पाहिजे. सर्वांना हिन्दी भाषेचे ज्ञान असले पाहिजे. हिन्दू-मुसलमानासारख्या दोन मोठ्या जमातींनी एकमेकांना समजून घेण्याच्या व जवळीक निर्माण करण्याच्या दृष्टीने एकमेकांची भाषा व लिपी शिकून घेणे जरूरीचे आहे: प्रत्येक भारतीयास आपली मातृभाषा आलीच पाहिजे. हिन्दूंना संस्कृत व मुसलमानांना अरबी-फारसीचे ज्ञान असले, तर तेवढ्याने भागणार नाही. काही हिन्दूंनी अरबी-फारसी शिकावी, तर काही मुसलमानांनी संस्कृत शिकून घ्यावी. उत्तर व पश्चिम भागांत राहणाऱ्या लोकांनी दक्षिणेतील तामिळ भाषा शिकावी. असे झाले तरच आपण परस्परव्यवहारातून इंग्रजीचे प्रभुत्व कमी करू शकू. बहुभाषी राष्ट्रातील लोकांमध्ये परस्परसद्भाव व सहिष्णुवृत्ती निर्माण होण्याच्या दृष्टीने गांधींनी दिलेला हा भाषिक संदेश किती मोलाचा आहे हे लक्षात येईल.

परस्परांची भाषा शिकून घेतल्यामुळे सद्भाव निर्माण झाला, तरी त्यामुळे राष्ट्रीय व्यवहाराचा मार्ग सुकर होत नाही. ही गोष्ट त्यांनी आरंभीच ओळखली व म्हणून १९१७ साली भडोच येथे भरलेल्या गुजरात शिक्षण परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना त्यांनी स्पष्ट बजावले की, कोणत्याही परिस्थितीत इंग्रजी ही राष्ट्रीय भाषा होऊ शकणार नाही. राष्ट्रीय भाषेचे लक्षण सांगताना त्यांनी म्हटले की, ती सरळ व सोपी असावी, त्या भाषेच्या माध्यमातून धार्मिक, आर्थिक, राजकीय व्यवहार करता आले पाहिजेत; ती भाषा भारतातील बहुसंख्य लोकांना समजेल अशी असली पाहिजे. इंग्रजी भाषेमध्ये यांपैकी एकही लक्षण नसल्याने ती कदापी राष्ट्रीय भाषा होऊ शकणार नाही, हे पक्के जाणले पाहिजे. हिन्दीसाठी देवनागरी व फारसी ह्या दोन्ही लिप्यांचा वापर करावा.

राष्ट्रीय भाषेसंबंधी विचार मांडताना म. गांधींनी अडीअडचणींच्या बाबतीत यत्किंचितही दुर्लक्ष केले नाही. इतकेच नव्हे तर ज्या दाक्षिणात्यांना राष्ट्रीय भाषा शिकणे इतरांपेक्षा जड जाईल, अशा लोकांच्या अडचणींचा आवर्जून उल्लेख केला आहे. गुजरात शिक्षण परिषदेच्या भाषणात त्यांनी सांगितले की, गुजराती, सिंधी, बंगाली लोकांपेक्षा तामीळ लोकांना हिन्दी भाषा शिकून घेणे सोपे नाही हे खरे असले, तरी त्यांच्यामध्ये स्वदेशाभिमान तितकाच प्रखर असल्याने त्यांनी हिन्दी भाषा आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा. जर हिन्दीला राष्ट्रभाषा अथवा राजभाषेची प्रतिष्ठा प्राप्त झाली व भविष्यकाळी मद्रासच्या शाळांतून हिन्दी शिक्षणाची सोय झाली तर तेथील लोकांना इतर प्रांतांशी व्यवहार करणे सुलभ होईल. आपण समजतो तितकी इंग्रजी भाषा द्रविड जनतेमध्ये मुरलेली नाही. हिन्दीला प्रवेश मिळविणे जड नाही. तेलगू लोक तर आजही हिन्दी जाणण्याचा प्रयत्न करीत आहेत. १९१८ साली हिन्दी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून गांधीजी म्हणाले की, " द्रविड लोकांना हिन्दी

भाषा शिकवण्याच्या दृष्टीने व्याकरण व स्वयंशिक्षक तयार करणे आवश्यक आहे. आमच्या सभेच्या अधिवेशनांतून हिन्दीचा वापर झाला पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी या बाबतीत प्रयत्न करावयास हवेत.''

१९२० साली म. गांधींनी 'यंग इंडिया'मध्ये 'अपील टू मद्रास' हा लेख लिहून देशाचे लक्ष ह्या प्रश्नाकडे वेधले. ते लिहितात, " मी काँग्रेसच्या अधिवेशनात भाग घेऊन, तसेच शेकडो प्रतिनिधी व प्रेक्षक यांच्याशी चर्चा केली. देशभर हिंडून शिक्षित व अशिक्षित लोकांना भेटलो. त्यावरून माझे असे निश्चित मत झाले की, राष्ट्राचा कारभार चालवणे व विचारविनिमय करणे यांसाठी हिंदुस्थानी भाषेखेरीज दुसरी कोणतीही भाषा माध्यम होऊ शकणार नाही. मद्रास प्रांत सोडल्यास काँग्रेसचे प्रेक्षक व प्रतिनिधिवर्गातील लोकांना इंग्रजीपेक्षा हिंदुस्तानी भाषा अधिक समजते. याचा अर्थ असा की, दाक्षिणात्यांनी हिंदुस्थानच्या व्यापक ऐक्याच्या दृष्टीने हिंदुस्तानीचे ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. असे झाल्यास मद्रास भागातील लोकांना काँग्रेसच्या कारभाराचा सारांश तरी समजून घेणे सोयीचे होईल.'' गांधीजींनी दाक्षिणात्यांच्या अडचणींची दखल आरंभापासून घेतली व त्या दृष्टीने त्यांनी प्रचार व उपदेश करण्यास आरंभ केला. राष्ट्रीय सभेसारख्या व्यासपीठावरून व इतरत्र केलेल्या भाषणांतून त्यांनी हिंदी-हिदुस्तानीचा पुरस्कार केलाच. इतकेच नव्हे तर १९२५ साली काँग्रेसमध्ये तशा तऱ्हेचा ठरावही पास करून घेतला. त्या ठरावात स्पष्ट म्हटले आहे की, " काँग्रेस महासमिती व काँग्रेस कार्यकारिणीचे काम सर्वसाधारणतः हिंदुस्तानीतून चालेल. ज्या वक्त्यांना हिंदुस्तानीतून भाषण करता येणार नाही, त्यांनी इंग्रजी अथवा प्रांतिक भाषांचा वापर करावा. प्रांतिक काँग्रेस कमिट्यांचे काम त्या त्या प्रादेशिक भाषांतून चालेल. त्यांना हिंदुस्तानी भाषेचाही वापर करता येईल.''

या ठरावास उद्देशून १९२६ साली 'यंग इंडिया' व 'नवजीवन' मध्ये गांधीजींनी लिहिलेल्या लेखांत म्हटले आहे की, काँग्रेसमध्ये हिंदुस्तानीसंबंधी पास झालेला ठराव प्रगतिशील लोकमताचा निदर्शक आहे. इंग्रजीतून काम करणे म्हणजे काँग्रेस महासमितीच्या सदस्यांवर अत्याचार करणे होय. याबाबत केव्हा ना केव्हा तरी अंतिम निर्णय करावाच लागेल. तसे झाल्यास काही काळपर्यन्त अडचणी निर्माण होतील, असंतोषही वाढेल; परंतु राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने आपण शक्य तो लौकर हिंदुस्तानीतून काम करणे इष्ट होईल.''

गांधीजींनी एखादे कार्य करायचे ठरवले म्हणजे त्यातील सर्व बाजूंचा व मुख्यतः अडीअडचणींचा दूरवर विचार करून ते योजना आखीत असत. योजना यशस्वी करण्याच्या दृष्टीने अनुकूल माणसांचा संग्रह करणे, संस्थासंघटनांची उभारणी करणे, इ. गोष्टींबाबत ते व्यावहारिक दक्षता बाळगीत. काँग्रेससारख्या देशाच्या

महान प्रातिनिधिक संस्थेत ठराव करून ते थांवले नाहीत, तर त्यांनी त्या राजकीय गोटात हिरीरीने हिन्दीचा पुरस्कार केला. हिन्दीच्या वावतीत खरी अडचण दक्षिणेत उत्पन्न होईल, या गोष्टीचे जणू त्यांना स्वप्नच पडले होते. म्हणून त्यांनी दाक्षिणात्यांनी म्हणजे द्रविडभाषी लोकांनी हिंदी आत्मसात करण्यावर भर दिला. त्यांनी १९१८ मध्ये आपले पुत्र देवदास गांधी याना हिन्दीप्रचारासाठी मद्रासकडे पाठविले. देवदास गांधी हे पुढे 'हिंदुस्तान टाइम्स' सारख्या नामांकित इंग्रजी दैनिकाचे संपादक झाले. पण त्यांचे सार्वजनिक आयुष्य हिन्दी प्रचारक म्हणून सुरू झाले. एखादी गोष्ट करायची म्हटली म्हणजे गांधीजी माणसांची योजना कशी करीत, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे हिंदीप्रचारातील देवदास गांधी हे होत. आचार्य काकासाहेव कालेलकर, श्री. जमनालाल वजाज, आचार्य दादा धर्माधिकारी, वावा राघवदास, हरिहर शर्मा यांच्यासारख्या कर्मनिष्ठ व्यक्तींचे संपूर्ण सहकार्य गांधीजीना मिळाले. १९१८ साली गांधीजींनी दक्षिण भारतात हिन्दीचा प्रचार करण्यासाठी सुप्रसिद्ध अशा दक्षिण भारत हिन्दी प्रचार सभेची मुहूर्तमेढ रोवली व त्या संस्थेमार्फत रचनात्मक पद्धतीने हिन्दीप्रचाराचे काम आरंभले. शिक्षक व प्रचारक तयार करणे, परीक्षा चालवणे, वर्ग व विद्यालये उघडणे, वाड्.मय प्रकाशित करणे यांसारख्या विविध प्रवृत्ती चालवून या संस्थेने दक्षिणेकडे प्रचंड कार्य केले आहे. आजच्या केरळ, मद्रास, कर्नाटक व आंध्र या चार द्रविडभाषी संस्थांमध्ये हिन्दीचे काम करण्यासाठी या संस्थेची स्थापना झाली. आज या प्रत्येक राज्यात द. भा. हिं. प्र. सभेच्या शाखा म्हणून काम करणाऱ्या संस्था पुष्कळशा वावतीत स्वतंत्रपणे फार मोठे कार्य करीत आहेत. अशा प्रकारे गांधीजींनी संस्थांमार्फत विधायक पद्धतीने व राजकीय वर्तुळातून प्रचारात्मक पद्धतीने हिन्दीचा जोरदार पुरस्कार चालवला.

त्या कामी श्री. राजगोपालाचार्य, श्री. विजयराघवाचार्य, श्री. सत्यमूर्ती यांच्यासारख्या धुरंधर पुढाऱ्यांनी गांधीजींना पाठिंवा देऊन केवळ हिंदीचा पुरस्कारच केला असे नव्हे, तर त्यांनी हिंदीप्रचाराच्या कार्यात सर्व प्रकारे सहकार्य दिले. राजाजी तर दीर्घकाळपर्यन्त दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेचे मोठे आधारस्तंभ होते. या संस्थेमार्फत १९२८ साली 'हिंदी-इंग्रजी सेल्फ इन्स्ट्रक्टर' नावाचे पुस्तक प्रसिद्ध झाले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते लिहितात,

"From the political as well as cultural and business points of view it is imperatively necessary for the south Indians to learn Hindi . . . Can the deliberations of the Central Assembly and transactions of the high officers of state and other exercising authotity in the Central Government be permitted to be done in English ? Obviously not, if we desire democracy to be true in fact as well as in form, if we do not

want educated men to be appointed to places of power and influence, and conduct their affairs apart from the people and electorate. To make popular control real the state language must be one spoken and understood by the large masses of people. Hindi is bound to be the language of the Central Govt. and the legislature and also of the provincial Governments in their dealings with each other and with the Government of India . . . .

No less important than political reasons, the cultural unity of India demands the knowledge of a common spoken language."

श्री. राजाजींनी कोणत्या कारणासाठी हिंदीचा एवढ्या हिरीरीने पुरस्कार केला, ते लक्षात घेण्यासारखे आहे. आज मात्र त्यांचे मत अजीबात बदलले आहे. पण त्या काळी गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाची व विचारांची केवढी छाप राजाजींसारख्या प्रखर बुद्धिवादी पुढाऱ्यावर होती, हे पहाण्यासारखे आहे. १९३७ साली मद्रासमध्ये राजाजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्यांनी शाळांतून पाचव्या इयत्तेपासून सक्तीने हिन्दीचे शिक्षण सुरू केले. श्री. रामस्वामी नायकर व द्रविड कळघम हे त्याही काळी हिंदीला विरोध करीत होते. पण व्यापक राष्ट्रहित लक्षात घेऊन राजाजींनी विरोधाला यत्किंचितही जुमानले नाही, आणि हिंदीचा प्रचार व शिक्षण या दोन्हीस भरपूर वाव दिला. त्या काळी दक्षिणेत तर हिंदीबावत जनतेमध्ये अमाप उत्साह होता.

१९३०–३२ ची चळवळ व गोलमेज परिषदांसारख्या राजकीय कार्यात महात्मा गांधींचे मन गुंतून होते. १९३५ चा कायदा अस्तित्वात येऊ पहात होता. अशा प्रकारे स्वशासनाचा हप्ता पदरात पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. अशा वातावरणात १९३६ साली इंदूर येथे हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान गांधीजींनी भूषविले होते. तत्पूर्वीच त्यांनी दक्षिणेत हिंदीप्रचाराची मूहूर्तमेढ रोवली. १९३५ सालानंतर त्यांनी दक्षिणेखेरीज बंगाल, आसाम, ओरिसा, गुजरात, महाराष्ट्र इ. हिन्दीतर प्रदेशांतून हिन्दीप्रचाराचे कार्य आरंभ केले. त्यांनी वर्धा येथे समिती स्थापन केली. त्या वेळी गांधीजींनी दोन गोष्टींवर विशेष भर दिला. त्यांनी हिंदी-हिंदुस्तानी शब्दाचा विशेष वापर केला व भारताची राष्ट्रभाषा सर्वसंग्राहक, व्यापक असावी असे सांगितले. उत्तर भारतात हिंदु-मुस्लिम व इतर लोक सहज समानतेने जी भाषा बोलतात व जी देवनागरी आणि फारसी लिपीत लिहिली जाते अशा भाषेला हिंदी-हिंदुस्तानी म्हटले व देवनागरी आणि उर्दू या दोन्ही लिप्यांचा पुरस्कार केला. यानंतर त्यांनी निरनिराळ्या भाषांतील विद्वानांचे परस्पर सहकार्य व्हावे, या दृष्टीने अ. भा. साहित्य परिषदेची स्थापना केली. श्री. क. मु. मुन्शी व प्रेमचंद यांचे सहकार्य घेतले. त्याचप्रमाणे देवनागरी लिपी सुधारण्यासाठी लिपी-समितीची स्थापना

केली. अशा प्रकारे गांधीजींचे कार्य निष्ठेने व व्यापकतेने चालू होते. या काळात ते जेथे जेथे गेले, तेथे तेथे त्यांनी राष्ट्रभाषेचा प्रचार केला.

१९३७ साली सर्व प्रांतात कॉंग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारावर आली व कॉंग्रेसच्या धोरणाप्रमाणे माध्यमिक शाळांतून हिंदीचे शिक्षण सुरू झाले. कॉंग्रेसने हिंदुस्तानी या शब्दाला मान्यता दिलेली होती. हिन्दी व हिन्दुस्तानी हे दोन्ही शब्द समानार्थी आहेत, असे गांधीजी म्हणत. एकाच भाषेला हिंदी, उर्दू, हिंदुस्तानी अशी तीन नावे आहेत. यांपैकी ज्यांनी जो शब्द स्वीकारला असेल त्याचा वापर करण्यास त्याला मुभा असावी. या दृष्टीने हिन्दी साहित्य संमेलन हिंदी शब्दाचा वापर करीत असले, तरी कॉंग्रेसने हिन्दुस्तानी शब्द वापरण्यास हरकत नाही, असे त्यांचे धोरण होते. या दृष्टीने सर्व हिन्दीतर प्रांतांतील माध्यमिक शाळांत हिन्दीचे शिक्षण दिले जाऊ लागले.

यानंतर १९४९ साली भारताच्या राज्यघटनेमध्ये संघ सरकारची राजभाषा म्हणून देवनागरी लिपीतील हिंदीचा रीतसर समावेश झाला. त्या वेळपर्यन्त देशभर सर्वत्र हिंदी-हिंदुस्तानीचा वाद माजून राहिला होता. दोन लिप्यांची बाब सोडल्यास हिंदुस्तानी या शब्दाचा पुरस्कार करणाऱ्यांची फार मोठी संख्या देशात होती. राजभाषेच्या बाबतीत तीन पक्ष होते : १. हिंदुस्तानी भाषा आणि देवनागरी व उर्दू लिपी, २. हिंदुस्तानी भाषा आणि देवनागरी लिपी, ३. हिंदी भाषा आणि देवनागरी लिपी.

घटना परिषदेमध्ये व देशात राजभाषेच्या नावापेक्षा एक लिपी की दोन लिप्या आणाव्यात, याबाबत संघर्ष होता. गांधीजी हिंदुस्तानी व दोन लिप्या यांचा पुरस्कार करीत. उलट टंडनजींच्या नेतृत्वाखाली हिंदी साहित्य संमेलन हिन्दी-नागरीचा पुरस्कार करी. गांधीजी हिंदुस्तानी म्हणजेच हिन्दीचा पुरस्कार करतात, म्हणून अतिरेकी मुसलमान गांधीजींना दोष देऊ लागले. याउलट संस्कृतनिष्ठ हिन्दीचे पुरस्कर्ते म्हणू लागले की, गांधीजी हिन्दुस्तानीच्या नावाखाली उर्दूचाच पुरस्कार करीत असून ते मुसलमानांना खूष करू पहातात. या बाबतीत गांधीजींचे म्हणणे असे होते की, जी भाषा आज देशभर सर्वत्र बोलली व समजली जाते, तिची हिंदी-उर्दू-हिंदुस्तानी अशी तीन नावे असून ही नागरी व उर्दू लिप्यांत लिहिली जाते, ही वस्तुस्थिती आहे. हिंदुस्तानी नाव व दोन लिप्या यांचा स्वीकार करणे म्हणजे वस्तुस्थितीला मान्यता देणे होय. या दृष्टीने गांधीजी हिंदी भाषेचा पुरस्कार करीत. राष्ट्राची बांधणी व राष्ट्रैक्य या दोन्ही दृष्टींनी त्या काळात अनुकूल असे धोरण गांधीजींनी अवलंबिले होते. स्वराज्य अद्याप मिळालेले नव्हते. देशाच्या विभाजनाची कल्पना तर नव्हतीच नव्हती. अशा वातावरणात गांधीजींची भूमिका समजून घेण्याची गरज होती. श्री. पुरुषोत्तमदास टंडन व हिंदी साहित्य संमेलन हे गांधीजींची भूमिका

मानावयास तयार नव्हते. अशा परिस्थितीत गांधीजींनी १९४२च्या प्रारंभी हिंदुस्तानी प्रचार सभा स्थापण्याच्या दृष्टीने वर्धा येथे संमेलन भरवले. त्यानंतर अखेरचे स्वातंत्र्य आंदोलन सुरू झाले.

गांधीजी १९४५ त तुरुंगातून सुटून आल्यावर गांधी-टंडन पत्रव्यवहार झाला. पण मतभेद मिटू शकले नाहीत. अखेर गांधीजींनी हिंदी साहित्य संमेलन व वर्ध्याची राष्ट्रभाषा प्रचार समिती या संस्थांचा राजीनामा दिला व दोन लिप्यांतून हिंदुस्तानीचे काम चालवणाऱ्या हिंदुस्तानी प्रचार सभेचे कार्य जोमाने चालवण्याची प्रेरणा दिली.

घटना परिषदेतील काँग्रेस पक्षात अनेक वेळा तीव्र स्वरूपाचे मतभेद हिंदी-हिंदुस्तानीच्या प्रश्नावर झाले. एवढेच नव्हे तर या प्रश्नावर काँग्रेस पक्षच मोडून जातो की काय, अशी भीती अनेकांना वाटली. घटना परिषदेच्या अखेरीअखेरीस सप्टेंबर १९४९ त या प्रश्नाचा निकाल लागला. त्याही वेळी फार मोठे मतभेद झाले. परंतु इंग्रजी नको, ही गोष्ट सर्वांना मान्य होती. राजभाषेला हिंदुस्तानी म्हटल्यास चालण्यासारखे होते. एकाच वेळी नागरी व उर्दू अशा दोन लिप्या चालवणे व्यवहारत: अशक्य होते, या परिस्थितीची जाणीव सर्वांना होती. तरी सुद्धा शेवटी सारा वाद अंकांवर येऊन ठेपला. दक्षिणेतील लोकांनी इंग्रजी अंकांचा आग्रह धरला. ते अंक परकीय नसून भारतीयच होत, असे त्यांचे म्हणणे. अखेरीस भारतीय अंकांचे आंतरराष्ट्रीय रूप म्हणजेच इंग्रजी असे अंक मान्य झाले. अशा प्रकारे हिन्दी भाषा, देवनागरी लिपी व इंग्रजी अंक यांना घटना परिषदेने मान्यता दिली.

हिंदी-हिंदुस्तानी वादाच्या बाबतीत हिंदीतर प्रदेशातील लोकांचा फार मोठा पाठिंबा गांधीजींना होता. परंतु हिन्दीभाषी लोकांचा आग्रह व संख्या यांचा परिणाम अखेरीस झाला. गांधीजी हा निर्णय ऐकण्यास जिवंत राहिले नाहीत.

एकंदरीत पाहता राष्ट्राशी संबंधित प्रत्येक प्रश्नाबाबत गांधीजीचा दृष्टिकोन व्यापक, समन्वयवादी व राष्ट्राच्या भावनिक एकात्मतेस पोषक असा असे. राजभाषा वा राष्ट्रभाषेच्या प्रश्नाबाबतही तेच स्पष्ट दिसते. आहे ती वस्तुस्थिती मान्य करणे व परिस्थितीची अनुकूलता आणि गरज यांप्रमाणे तसे वळण देणे त्यांचे मुख्य सूत्र असे. म्हणूनच त्यांनी राष्ट्रभाषेची आवश्यकता, नाव, स्वरूप या सर्व गोष्टींवर विशेष दृष्टिकोनातून भर दिला. या बाबतीतही त्यांची व्यापक दूरदृष्टी व समन्वयात्मक भूमिका यांचा प्रत्यय येतो.

३९

# लो. टिळक व म. गांधी

द. कृ. गोसावी

लो. टिळक व म. गांधी यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानामध्ये सौम्य-वैषम्य कोणते आहे, याचे जे सप्रमाण विवेचन प्रस्तुत लेखात केले आहे, ते कोणाच्याही विचाराला चालना देणारे आहे. लेखकाने या विषयाचा विस्तार आपल्या इंग्रजी पुस्तकात केला आहे.

गेल्या शतकात ( इ. स. १८५०–१९५० ) भारतात जे थोर पुरुष होऊन गेले, त्यांत लो. टिळक व महात्मा गांधी या दोन पुरुषांची गणना प्रामुख्याने होते. त्या दोघांनी भारताच्या स्वराज्यप्राप्तीच्या कार्यात व संस्कृतिसंवर्धनकार्यात बहुमोल भर घातली आहे. त्या दोघांच्या कार्याची ठळक माहिती भारतभर सर्वांनाच आहे. या लहानशा लेखात या दोन महान व्यक्तींच्या जीवन-तत्त्वज्ञानाचा ऊहापोह संक्षेपाने करण्याचे योजिले आहे. तसेच त्यांच्या तत्त्वज्ञानातील साम्याचे अंश आणि वैषम्याचेही अंश दाखविण्याचे योजिले आहे.

लोकमान्यांच्या 'गीतारहस्य' ग्रंथात त्यांचे तत्त्वज्ञानविषयक आणि नीतिधर्म-विषयक सर्व सिद्धान्त पूर्णत्वाने मिळू शकतात. याच 'गीतारहस्य' ग्रंथाच्या आधारे ( तृतीय मुद्रण ) या लेखात त्यांचे सिद्धान्त संक्षेपाने मांडले आहेत.

**लोकमान्यांचे सिद्धांत**

लो. टिळक ( १८५६–१९२० )

१. अखिल विश्वाच्या बुडाशी एकच सत्यवस्तू आहे. ती वस्तू अनादि-अनंत असून सर्वव्यापक आहे. त्याच सत्यवस्तूला परब्रह्म, परमेश्वर किंवा ईश्वर या संज्ञेने संबोधले जाते.

२. आपणाला दिसणारे हे अनंत विश्व त्याच सत्यस्वरूपी परब्रह्माने किंवा ईश्वराने निर्माण केले आहे. हे विश्व सत्य आणि शाश्वत नसून विनाशी म्हणजे सारखे बदलणारे आहे. याच सतत बदलणाऱ्या विश्वाच्या रूपामुळे त्याला मिथ्या म्हणजे अशाश्वत किंवा मायिक म्हणतात.

३. तथापि या मायिक किंवा सतत बदलणाऱ्या विश्वातच मानवाला आपले जीवन व्यतीत करावयाचे आहे. निष्काम किंवा अनासक्त कर्मयोगानेच मानवाने परमेश्वराची म्हणजेच परमेश्वरनिर्मित विश्वाची उपासना अथवा पूजा करावी, हे त्याचे कर्तव्य आहे.

४. सत्य, अहिंसा इत्यादी नीतिसिद्धान्त तत्त्वतः निरपवाद आहेत.

५. तथापि प्रत्यक्ष व्यवहारात दुष्टांनी भरलेल्या या अपूर्ण जगात वरील नित्य सिद्धान्तांना निरुपायाने अपवाद करावे लागतात. आणि अशा अपवादांना महाभारत, मनुस्मृती इ. ग्रंथांची मान्यता आहे.

६. धर्मग्रंथांनी मान्य केले असले तरी ते अपवाद म्हणजे एक प्रकारची दुर्बलता किंवा दोषच आहे. म्हणून भारतीय धर्मशास्त्रकारांनी या दोषांच्या निराकरणार्थ प्रायश्चित्तेही सांगितली आहेत.

७. भविष्य काळात साधुवृत्तीच्या थोर पुरुषांना या सापवाद नीतिधर्मात त्या त्या काळच्या देशपरिस्थितीस अनुसरून समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने बदल करण्याचा आणि त्यात भर घालण्याचा अधिकार आहे.

लोकमान्यांच्या या सात सिद्धान्तांपैकी पहिले तीन तात्त्विक सिद्धान्त ' गीता-रहस्य ' ग्रंथातील ' अध्यात्म ' या नवव्या प्रकरणाच्या आधारे मांडले आहेत. आणि त्यापुढील क्रमांक ४ ते ७ हे शेवटचे सिद्धान्त 'गीतारहस्य' ग्रंथातील प्रकरण दुसरे ' कर्मजिज्ञासा ' आणि प्रकरण १२ व ' सिद्धावस्था व व्यवहार ' यांच्या आधारे मांडले आहेत. वर नमूद केलेल्या प्रकरण ९, प्रकरण २ आणि प्रकरण १२ या प्रकरणांतून वरील संक्षिप्त सिद्धान्तांचा संपूर्ण खुलासा वाचकांना मिळण्यासारखा आहे.

**म. गांधींचे सिद्धांत**

म. गांधी ( १८६९–१९४८ ) यांचे जीवितकार्य स्थूल मानाने सर्वांना माहीत आहे. त्यांचे जीवनविषयक तात्त्विक सिद्धान्त आणि धर्म-नीति-सदाचाराचे सिद्धान्त

संक्षेपाने खाली दिले आहेत.

१. अद्वैत तत्त्वज्ञानावर श्रद्धा. एक अद्वैत तत्त्व म्हणजे परब्रह्म किंवा ईश्वर हेच त्रिकालाबाधित तत्त्व आणि ईश्वराने निर्माण केलेले हे अनंत विश्व त्याचेच रूप असले, तरी ते सतत वदलणारे असल्याने मिथ्या आहे किंवा माया आहे असे ते मानतात.

२. त्यांची ईश्वरावर निष्ठा होती व सत्य हेच ईश्वराचे स्वरूप असे ते मानीत. " ईश्वर-साक्षात्कार हे माझ्या जीवनाचे साध्य आहे. माझ्या सर्व चळवळी आणि खटपटी ईश्वराच्या साक्षात्कारासाठीच चालू आहेत. ईश्वराचा साक्षात्कार मला झाला नाही, पण त्यासाठी सतत प्रयत्न करणारा मी एक साधक आहे.''

३. 'सत्य आणि अहिंसा ही माझ्या जीवनाची दोन मूलतत्त्वे आहेत.' सत्य आणि अहिंसा एकच असली तरी अखेर सत्य हे साध्य व अहिंसा हे साधन आहे. अहिंसा म्हणजे प्रेम.

४. शूराची अहिंसा तुमच्याजवळ नसेल तर हिंसेने का होईना पण अन्यायाचा प्रतिकार न करणे हा भ्याडपणा आहे. अहिंसा हा संन्याशांचा धर्म आहे असे काही म्हणतात, ते मला मान्य नाही. अहिंसा ही एक जीवनपद्धती किंवा जीवनक्रमणाचा मार्ग आहे; आणि स्वत: आचरून तो मार्ग जगाला दाखवून देणे हे भारताचे मिशन– कर्तव्य – आहे, असे ते मानीत. राजकीय, धार्मिक व सामाजिक सर्व प्रकरणी अहिंसेनेच वागले पाहिजे. अहिंसेच्या उपासकांनी स्वत: मरण पत्करून सुद्धा अहिंसाधर्माचाच आचार आणि प्रसार केला पाहिजे.

५. सत्याग्रह हा अहिंसात्मकच म्हणजे प्रेममूलकच असला पाहिजे. सत्याग्रहींचे प्रतिपक्षावर प्रेम असले पाहिजे. सत्याग्रह हे सत्यनिष्ठांचेच साधन आहे. सत्याग्रहाचा मार्ग हा गांधीजींच्या शिकवणुकीचा गाभा किंवा अर्क आहे.

६ साध्य आणि साधन ही एक स्वरूपाचीच असली पाहिजेत असे ते मानीत. प्रतिपक्षाने वापरली नाहीत तरी सुद्धा आपण एकतर्फी का होईना सत्य-अहिंसात्मक साधनेच वापरली पाहिजेत. आपले तत्त्वज्ञान नित्य आचारात आणले पाहिजे. आचाराशिवाय तत्त्वज्ञान निर्जीव आहे.

७. 'सत्य-अहिंसा या तत्त्वांना काही विकट प्रसंगी अपवाद आहेत हे मी मान्य करीत नाही. अपवाद मान्य करण्यापेक्षा आपली दुर्बलता मान्य करणे हेच वरोवर आहे.' तसे करण्यानेच मनुष्य पूर्णतेकडे जाण्याचा अधिकाधिक प्रयत्न करील, असे गांधीजी मानीत.

८ अनासक्त कर्मयोग हाच गीतेचा संदेश किंवा शिकवणूक आहे, असे ते मानीत.

९. 'मला पूर्ण मानू नका. मला पूर्णता प्राप्त झालेली नाही' असे मृत्यूपूर्वी २–३ दिवसच आधी त्यांनी दिल्ली येथे एका अमेरिकन मिशनऱ्यास सांगितले आहे.

वरीलप्रमाणे लोकमान्यांचे तत्त्वज्ञानविषयक सिद्धान्त आणि धर्म, नीती, सदाचाराचे सिद्धान्त आपण प्रारंभी संक्षेपाने पाहिले आहेत. आणि त्यानंतर गांधीजींचेही तत्त्वज्ञानविषयक मूळ सिद्धान्त आणि धर्म-नीति-सदाचाराची तत्त्वे आपण संक्षेपाने समजून घेतली आहेत. गांधीजींचे सिद्धान्त, त्यांचे 'आत्मचरित्र', 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास' हे त्यांचे पुस्तक आणि 'इंडिअन ओपिनियन', 'यंग इंडिया' व 'हरिजन' इ. त्यांच्या साप्ताहिकांतील त्यांचे लेख व इतर अनेक देशी-विदेशी पंडितांनी त्यांच्याविषयी लिहिलेले ग्रंथ यांच्या आधारे वर ग्रथित केले आहेत.

आता या दोन थोर पुरुषांच्या तत्त्वविचारांत आणि आचारपद्धतींत साम्य किती आहे आणि भेद किती आहेत, हे आपणाला समजू शकेल. म्हणून क्रमाने प्रथम साम्यस्थळे आणि नंतर भेदस्थळे दाखवण्याचा प्रयत्न करीत आहे.

**साम्यस्थळांचे मुद्दे**

१. मायावादासहित अद्वैत सिद्धान्तावर टिळक व गांधी दोघांचाही विश्वास होता.

२. टिळक व गांधी दोघांचीही ईश्वरावर निष्ठा होती आणि ईश्वरस्वरूपाची दोघांचीही कल्पना सामान्यपणे सारखीच होती.

३. "निष्काम-कर्मयोग" किंवा "अनासक्त कर्मयोग" हाच गीतेचा मुख्य संदेश आहे, असे टिळक व गांधी दोघेही मानीत. दोघांनीही भारताची निष्काम सेवा केली आणि ही निष्काम सेवा हीच ईश्वर-प्राप्तीचे साधन मानले.

४. दोघांचेही व्यक्तिजीवन निरपवाद शुद्ध स्वरूपाचे होते.

५. अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे, असा दोघांचाही सिद्धान्त होता. (परंतु प्रतिकाराच्या पद्धती दोघांच्या वेगवेगळ्या होत्या. हा दोघांमधील भेद पुढे भेदांचे मुद्दे मांडले जातील, त्यात स्पष्ट केला जाईल.)

६. धार्मिक आणि नैतिक आचारात पूर्वीच्या धर्मशास्त्रकारांनी घालून दिलेल्या पद्धतीत देशकालानुसार योग्य तो बदल करण्याचा अधिकार त्या त्या पुढील काळातील थोर साधुपुरुषांना आहे, असे टिळक आणि गांधी दोघेही मानीत.

या दोन थोर पुरुषांमधील विचारांचे साम्य दाखविणारे ठळक मुद्दे वरीलप्रमाणे आहेत.

**भेदाचे मुद्दे**

१. **मानवसमाजाच्या पूर्ण स्थितीत** सत्य, अहिंसा आदिकरून नीतितत्त्वांचा पूर्णत्वाने आणि निरपवाद रीतीने आचार करणे योग्य आहे असे टिळक मानीत. पण या नीतितत्त्वांना **मानवसमाजाच्या अपूर्ण स्थितीत** काही विकट प्रसंगी निरुपायाने अपवाद करावे लागतात आणि हे अपवाद महाभारत, मनुस्मृती आदि धर्म-

ग्रंथांनी मान्य केले आहेत, असेही टिळक मानीत.

सर्व परिस्थितीत सत्य-अहिंसादी नीतितत्त्वे निरपवाद आहेत, असे गांधीजी मानीत. या नीतितत्त्वांना अपवाद गांधीजी बिलकुल मानीत नसत; पण ज्या प्रसंगी त्या नीतितत्त्वांचा पूर्ण आचार ते करू शकत नसत त्या प्रसंगी आपली स्वत:ची अपूर्णता आणि दुर्बलता ते मान्य करीत आणि निर्धारपूर्वक अधिक प्रयत्न करून आपली दुर्बलता व अपूर्णपणा कमी कमी करीत गेले पाहिजे आणि पूर्णावस्थेला पोचण्याचा सतत प्रयत्न करीत राहिले पाहिजे, असे गांधीजी मानीत.

२. 'जशास तसे' म्हणजे सुष्टाशी सुष्ट व दुष्टाशी दुष्ट आचाराची नैतिकता टिळक प्रतिपादन करीत; असत्य किंवा हिंसात्मक पद्धतीने ते स्वत: कधीही वागत नसत किंवा तशा वागण्यास ते पाठिंबाही देत नसत; पण प्रतिपक्षाने तसा डाव टाकला तर **केवळ प्रतिकार म्हणून** ते तशाच पद्धतीने "जशास तसे" या न्यायाने वागण्यास तयार असत.

प्रतिपक्षी कसा वागतो किंवा वागेल याचा विचार न करता आपण स्वत: मात्र एकतर्फी असले तरी देखील, सत्य-अहिंसेनेच वागले पाहिजे, असा गांधीजींचा आग्रह आहे. आत्मरक्षणासाठी किंवा प्रतिकारासाठी सुद्धा असत्याने आणि हिंसेच्या मार्गाने आपण वागता कामा नये, असे गांधीजींचे म्हणणे आहे. मरणाचा प्रसंग आला तरी तेही पत्करून सत्य-अहिंसेच्याच मार्गाने वागले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे आहे. वागणुकीचा उत्तम मार्ग म्हणजे अन्यायाला अहिंसात्मक मार्गानेच प्रतिकार केला पाहिजे हा होय; पण पहिला उत्तम मार्ग कोणाला झेपत नसेल त्याने हिंसेने का होईना पण अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे, असा दुसऱ्या प्रकारचा गौण मार्ग ते मान्य करीत. अहिंसेच्या नावाने अन्यायाला प्रतिकारच न करणे हा भ्याडाचा निषिद्ध मार्ग आहे, असे ते मानीत.

३. टिळक 'जशास तसे' या न्यायाने अपवादात्मक प्रकरणी प्रतिकार करणे नैतिक आहे असे मानीत. गांधीजींनी कोणत्याही परिस्थितीत 'जशास तसे' वागण्याच्या तत्त्वाला मान्यता दिली नाही. दुष्टाशीही आपण चांगुलपणानेच वागले पाहिजे, असे गांधीजी म्हणत व तसे वागत. या दोन थोर पुरुषांमधील हा तात्त्विक भेद टिळक व गांधी यांच्या दरम्यान १९२० च्या जानेवारीत 'यंग इंडिया' आणि 'मराठा' या इंग्रजी साप्ताहिकांत जी चर्चा झाली त्या लेखातून, स्पष्ट होणारी आहे. टिळकांनी 'यंग इंडिया'ला अमृतसर काँग्रेसनंतर १८-१-१९२० रोजी जे पत्र लिहिले आणि गांधींनी २८-१-१९२० च्या 'यंग इंडिया'त टिळकांच्या पत्राला जे उत्तर दिले, त्यावरून दोघांच्या कार्यपद्धतीतला हा भेद स्पष्ट होणारा आहे. "शठं प्रति शाठ्यम्" असे टिळकांच्या वागण्याचे सूत्र होते, तर "शठं प्रत्यपि सत्यम्" असे आपले तत्त्व असल्याचे गांधीजींनी स्पष्ट केले आहे. वाचकांनी सविस्तर

पत्रव्यवहारासाठी जानेवारी १९२० मधील 'यंग इंडिया' व 'मराठा' या साप्ताहिकांचे अंक पहावेत.

४. पुढील काळातील थोर साधुपुरुषांना देशकालपरिस्थितीला धरून आचार-धर्मात आणि नीतिधर्मात बदल करण्याचा अधिकार आहे, हे टिळकांनी मान्य केले आहे. ( गीतारहस्य, तृतीय मुद्रण, पा. ३९६ )

तथापि या तत्त्वाप्रमाणे त्यांनी स्वत: परंपरेने चालत आलेल्या धर्म-नीति-सदाचारात कोणताही प्रगतिपर बदल केला नाही. मनू आणि महाभारतकार यांनी घालून दिलेली नीतितत्त्वेच त्यांनी मान्य केली.

गांधीजींनी मात्र एक पाऊल पुढे टाकले आणि परंपरेने चालत आलेल्या नीतिधर्मात बदल करण्याचा प्रयत्न आणि प्रयोग केला. "शठं प्रत्यपि सत्यम्" या त्यांच्या तत्त्वाप्रमाणे अहिंसाप्रधान म्हणजे प्रेममूलक सत्याचा मार्ग ऊर्फ सत्याग्रहाच्या मार्गाची प्रतिष्ठापना केली आणि त्याप्रमाणे व्यक्तिजीवनात आणि राजकारणासहित सर्व सार्वजनिक जीवनातही सत्याग्रहाच्या मार्गानेच सर्व प्रकारच्या अन्यायांना विरोध केला. मानवाच्या प्रगतीच्या मार्गात गांधीजींनी घातलेली ही नवी स्वतंत्र भर आहे. आपल्या जीवनकालात सत्याग्रहमार्गाची प्रगती जेवढी करता आली, तेवढी आपण केली; पण ती पूर्ण झालेली नाही आणि यापुढील प्रगती आपल्यामागून येणाऱ्या समानधर्मी पुरुषांनी करावयाची आहे, असे त्यांनी लिहून ठेवले आहे.

५. टिळकांच्या जीवनातील साध्य भारताचे स्वातंत्र्य हे होते. गांधीजींच्या जीवनाचे साध्य ईश्वरसाक्षात्कार हे होते. हिंदी स्वातंत्र्याचा लढा ही ईश्वरप्राप्तीची गांधीजींची एक साधना होती. मृत्युसमयी टिळकांचे शेवटचे शब्द खालीलप्रमाणे होते : "स्वराज्यसंपादन केल्याशिवाय हिंदुस्थानचा उत्कर्ष होणार नाही. आमच्या केवळ अस्तित्वासाठी सुद्धा स्वराज्याची आवश्यकता आहे." मृत्यूपूर्वी गांधीजींचे शेवटचे शब्द पुढीलप्रमाणे होते : "हे राम." टिळक हे मुख्यत: देशभक्त आणि मुत्सद्दी होते; गांधी हे मुख्यत: ईश्वरसाक्षात्कारासाठी सतत प्रयत्न करणारे साधक होते व केवळ दुय्यम दृष्टचा ते थोर देशभक्त व मुत्सद्दी होते.

६. टिळक हे फार मोठे पंडित होते. गांधी हे फार मोठे तपस्वी व भक्त होते.

४०

# भारतीय संस्कृति आणि गांधीजी

डॉ. चिं. ग. काशिकर

गांधीजींची सत्यनिष्ठा व ईश्वरनिष्ठा भारतीय संस्कृतीच्या परंपरेत कोठे बसते, हे पुढील लेखात स्पष्ट केले आहे आणि त्या निमित्ताने वर्णव्यवस्था, स्त्री-पुरुषसमानता, शिक्षण-विचार, अर्थशास्त्र व अध्यात्म इत्यादी प्रश्नांचाही ऊहापोह, गांधीजींच्या संदर्भात, पुढील लेखात केला आहे.

जगातील श्रेष्ठ पुरुषांच्या चरित्रांचे अवलोकन केले तर असे दिसून येते की, त्यांनी आत्मोन्नतीसाठी प्रयत्न केले, त्याचप्रमाणे मानवमात्राचे जीवित उन्नत करण्याकडेही तितकेच लक्ष दिले. अशा पुरुषश्रेष्ठांच्या मालिकेमध्ये गांधीजींचे स्थान आहे. त्यांनी आत्मोन्नती तर साधलीच, पण त्याचबरोबर भारतीय जनतेची नैतिक उंची वाढविण्याचे पराकाष्ठेचे प्रयत्न केले, आणि तेही जागतिक संदर्भात. त्यामुळे गांधीजी हे केवळ भारताचेच नव्हे, तर जगातील एक थोर तत्त्वचिंतक म्हणून मान्यता पावले.

जनतोद्धाराचे हे जे कार्य गांधीजींनी केले, ते करीत असताना त्यांना भारतीय जनतेच्या भूतकालाचा आणि वर्तमानकालाचा संदर्भ दृष्टीसमोर ठेवणे अपरिहार्य होते. म्हणून भारतीय संस्कृतीच्या स्वरूपाची चिकित्सा करून त्यांतील शाश्वताला

उजळा देण्याचे आणि अशाश्वताचे दोषाविष्करण करण्याचे कामही त्यांना करावे लागले. मनुष्याला कर्तव्याचा मार्ग दाखविणारी आचारपद्धती म्हणजे संस्कृती अशी संस्कृतीची व्याख्या त्यांनी केली आहे. सत्य, अहिंसा इत्यादी शाश्वत मूल्यांना अनुसरून किंवा अविरोधी राहून व्यक्तीने किंवा समाजाने वेळोवेळी व्यक्त केलेल्या भावना, विचार आणि आचार हे संस्कृतीचे व्यापक स्वरूप आहे, असेच त्यांना म्हणावयाचे आहे. पाश्चात्य संस्कृती आणि पौरस्त्य संस्कृती असे शब्दप्रयोग त्यांनी कधी कधी केले आहेत, पण ते निराळ्या संदर्भात. आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचे विकट स्वरूप जीवन-प्रवाहात विष कालविते, उलटपक्षी भारतीय संस्कृतीचे प्राचीन स्वरूप जीवनावर अमृताचे सिंचन करते. मानवमात्राने संस्कृतीच्या विकृत स्वरूपाचा त्याग करून तिच्या शाश्वत आणि सत्य स्वरूपाची उपासना केली पाहिजे, असे त्यांचे सांगणे आहे.

सध्याच्या लोकशाही युगात संस्कृती हा शब्द नव्याने रूढ झालेला आहे. प्राचीन काळी संस्कृतीची कल्पना धर्मकल्पनेत अंतर्भूत होती. धर्माने जीवनाचे संपूर्ण क्षेत्र व्यापलेले होते. यामुळे जुन्या काळचा धर्म आणि आजच्या काळातील संस्कृती यांचे नाते अत्यंत नजीकचे आहे, हे उघड आहे. गांधीजींच्या लिखाणात धर्म शब्दाचा वापर कोठे कोठे दिसून येतो. कर्तव्य या अर्थाने धर्म शब्दाचा उपयोग त्यांनी केला आहे; रूढ अर्थानेही त्या शब्दाचा प्रयोग त्यांनी केलेला आहे. सद्धर्माचा प्रचार करणाऱ्या गांधीजींना धर्म शब्दाचे वावडे असते तरच नवल.

गांधीजींच्या जीवनाचे सार आणि मर्म एका शब्दात सांगावयाचे तर ईश्वर-निष्ठा या शब्दाने सांगता येईल. त्यांच्या जीवननौकेचे ते सुकाणू आहे. परमेश्वराशी तादात्म्य पावणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते, आणि तेच सर्वांच्या जीवनाचे ध्येय असावे, असा त्यांचा आग्रह होता. आपली प्रत्येक कृती त्या ध्येयाशी सुसंगत असली पाहिजे, विसंगत असता कामा नये, यावर त्यांचा कटाक्ष असे. हेच भारतीय संस्कृतीचे प्रतिपाद्य आहे, हे लक्षात घेतले म्हणजे महात्माजी हे भारतीय संस्कृतीचे निःसीम उपासक आणि पुरस्कर्ते होते, हे निराळे सांगावयाला नको. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय इत्यादी सनातन तत्त्वांचे निष्ठापूर्वक आचरण हा त्यांच्या मते परमेश्वराशी एकरूप होण्याचा मार्ग आहे. त्यातल्या त्यात सत्यावर त्यांनी जास्त भर दिला आहे. सच्चिदानंदस्वरूप परमेश्वराचे प्रतिपादन संक्षेपाने सत्य या एका शब्दाने त्यांनी केले आहे. परमेश्वर हा सत्य आहे. आणि सत्य म्हणजेच परमेश्वर. केवळ वाणीतले सत्य म्हणजे सत्य नव्हे. विचारही सत्य असला पाहिजे, विचारानुसार करावयाचे कर्मही सत्य असले पाहिजे.सत्यासाठी मनुष्याने आग्रह धरला पाहिजे, आणि असत्याचा सत्याने प्रतिकारही केला पाहिजे. हे उदात्त तत्त्व गांधीजींच्या सत्याग्रहाचे मर्म आहे. सत्य म्हणजे शाश्वत, नित्य. परमेश्वर शाश्वत आहे, म्हणून तो सत्, सत्य आहे. जे सत्य असते ते परिणामी हितकर म्हणजे चांगले असते. म्हणून सत् म्हणजे चांगले, असाही

अर्थ प्राप्त होतो. गांधीजींनी सांगितलेली सत्य, अहिंसा इत्यादी व्रते नवी नाहीत. प्राचीन भारतीय संस्कृतीत त्यांचा उपदेश वारंवार करण्यात आला आहे. गांधीजींनी नव्या व्यापक संदर्भात त्यांचे पुनरुज्जीवन केले, ही गोष्ट खरी. गांधीजींचे हे प्रतिपादन म्हणजे भारतीय संस्कृतीचाच आविष्कार आहे.

गांधीजींच्या उपदेशाकडे सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास असे दिसून येते की, प्रत्येक गोष्टीत जनतेसमोर आदर्श मांडण्याची त्यांची प्रवृत्ती असते. मानवी जीवन अधिकाधिक उन्नत करण्याच्या तळमळीनेच ध्येयरूप वस्तू ते लोकांपुढे मांडतात. सभोवती सर्व अमंगल आहे, त्यातून मंगलाकडे जाण्याचा मनुष्याने प्रयत्न करावा; जीवनात सर्वत्र अंधार आहे, त्यातून प्रकाशाकडे झेप घ्यावी, सर्व सृष्टपदार्थ मरणशील आहेत, त्यातून पार होऊन अमृताची आस धरावी, हा त्यांचा आंतरिक हेतू आहे. आदर्श स्थिती पुढे मांडताना ती सामान्यतः आटोक्यावाहेरची आहे असे वाटल्यास त्या मार्गातील पहिला टप्पा सांगण्यालाही ते विसरत नाहीत. आदर्शाकडे जाणे लोकांना शक्य आणि सुलभ व्हावे इकडेही ते लक्ष देतात. वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केल्यास अंतिम हेतू साध्य होणे कठीण होईल, याची त्यांना जाणीव असे.

उदाहरणार्थ, अहिंसाधर्माच्या पालनासंबंधी त्यांनी म्हटले आहे की, अहिंसाधर्म वरोवर समजून त्याचे योग्य प्रकारे पालन करणाऱ्या प्रजेला देशरक्षणासाठी तोफा, वंदुका, आरमार वगैरेसारख्या साधनांची जरूरीच पडणार नाही. पण ही स्थिती तूर्त कल्पनेतच आहे. म्हणून स्वतंत्र हिंदुस्थानने इतर राष्ट्रांशी प्रेमाने आणि ऐक्यभावनेने वागण्याचे ठरविले आणि त्यांच्या निर्वाहसाधनांवर आक्रमण न करण्याचा निश्चय केला, तरी सुद्धा आक्रमक राष्ट्रांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी काही लष्करी सामर्थ्य संपादन करावेच लागेल. मांसाहारात हिंसा करावी लागत असल्यामुळे मांसाहार त्याज्य समजावा, असे त्यांचे सांगणे. शारीरिक सामर्थ्यासाठीही मांसाहाराची आवश्यकता नाही, असे त्यांचे मत आहे. परंतु हा आदर्शवाद शक्यतेच्या पलीकडे असल्यामुळे ते त्यासंबंधी आग्रह करीत नाहीत. दूध हाही त्यांच्या मते मांसाहार आहे परंतु दुधाशिवाय रहाणे कठीण आहे हेही ते जाणतात. पतिनिधनानंतर स्त्रीने वैधव्याचे व्रत पाळावे, समाजाने तिच्याविषयी अनादरबुद्धी न वाळगता आदरबुद्धीच ठेवावी, असे त्यांचे सांगणे आहे. परंतु व्रतस्थ रहाणे विधवेला कठीण वाटत असेल, तर तिने विवाहवद्ध होण्याला त्यांची संमती आहे. विधुरांनी विधवांशीच विवाह करावा, असा त्यांचा आग्रह आहे. मलमूत्र वाहून नेण्याचे काम करण्याचा प्रसंग भंग्यावर मुळीच येऊ नये, असे त्यांना वाटते. पण हे शक्य होत नाही, तोपर्यंत भंग्याचे काम त्याला त्रासदायक न होईल अशा प्रकारे वागण्याचा आग्रह त्यांनी प्रकट केला आहे. अशी आणखी किती तरी उदाहरणे देता येतील.

भारतीय संस्कृती ही एक संयुक्त संस्कृती आहे. अनेक घटकांनी ती वनलेली

आहे. बौद्ध, जैन, इस्लाम, ख्रिश्चन इत्यादी धर्मांनी आणि संस्कृतींनी आपापला हिस्सा भारतीय संस्कृतीला दिला आहे. भारतात हिंदू बहुसंख्य असल्यामुळे भारतीय संस्कृतीवर हिंदू संस्कृतीची छाप मोठ्या प्रमाणात आढळावी हे स्वाभाविक आहे.ही वस्तुस्थिती गांधीजींनी मोकळ्या मनाने मान्य केलेली आहे.तथापी सर्व धर्मांत सनातन नैतिक तत्त्वे सारखीच असल्यामुळे आणि सर्व धर्मांचे उद्दिष्ट समान असल्यामुळे मनुष्याने कोणत्याही धर्मासंबंधी पक्षपातबुद्धी धारण करता कामा नये, सर्व धर्मांसंबंधी समान आदरबुद्धी मनात बाळगली पाहिजे. भारताचा सांस्कृतिक इतिहास नजरेसमोर आणल्यास गांधीजींचे हे विचार भारतीय संस्कृतीशी सुसंगतच असल्याचे आढळून येते. संस्कृती ही ईश्वरवादी असली पाहिजे, असा गांधीजींचा ठाम सिद्धांत आहे. भारतीय संस्कृती तशी आहे. मानवातील सत्तत्त्वाचा आणि नैतिकतेचा विकास ती साधू पहाते, म्हणून तिच्यामधील शाश्वत मूल्यांची जपणूक केली पाहिजे, अशी त्यांची विचारप्रणाली आहे पाश्चात्य संस्कृती प्राय: निरीश्वरवादी आहे, म्हणून तिचे अनुसरण करण्याला त्यांचा विरोध आहे. भोगवादी पाश्चात्य संस्कृतीने भौतिक शास्त्रांच्या विकासाच्या द्वार जीवनात विविध सोयी निर्माण केल्या. परंतु सुधारणेच्या या अधार्मिक प्रवृत्तीमुळे मानवाची नैतिक उंची वाढलेली नाही. म्हणून आधुनिक पाश्चात्य संस्कृतीला त्यांचा विरोध आहे.

हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे वर्णधर्म हा हिंदुधर्माचा प्रधान अंश आहे. हिंदू समाज-व्यवस्था वर्णधर्माने नियमित झालेली आहे. हिंदी संस्कृतीत हिंदू संस्कृतीचे प्राधान्य असल्यामुळे वर्णधर्माचा विचार गांधीजींनाही करावा लागला आहे. हजारो वर्षांपासून हिंदू समाज चार वर्णांमध्ये विभागलेला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र यांच्याबरोबर पंचम वर्णाचीही कल्पना स्मृतिकारांनी केली आहे. मूलत: वर्ण कर्मानुसारच ठरले असले पाहिजेत. कालांतराने ते जन्मावरून ठरू लागले. सर्व वर्णांचे लोक आपापले व्यवसाय वंशपरंपरेने करू लागल्यामुळे पुढे जन्मावरून वर्ण ठरू लागले, हे स्वाभाविकच आहे. वर्ण चारच असले तरी उपजाती अनेक निर्माण झाल्या आणि हिंदू समाज शतश: विभागला गेला. याचे परिणाम व्हावयाचे तेच झाले. हा अतिरेकी व्यवहार बाजूला ठेवला तर गुणकर्मपरत्वे समाजाची चार भागांत केलेली. विभागणी समाजाच्या स्थैर्याला आणि योगक्षेमाला उपकारकच ठरली असली पाहिजे. गांधीजींनी वर्णधर्माचा मूलभूत विचार केलेला आहे. आणि तो त्यांना पटल्यामुळे त्यांनी त्याचा पुरस्कारही केलेला आहे. मात्र वर्णांमध्ये उच्चनीचभाव नाही, सर्व वर्णांचे समाजात समान स्थान आहे, या भूमिकेवर ते स्थिर आहेत. धर्मशास्त्रकारांनी प्रत्येक वर्णाचे वैशिष्टय दाखविण्यासाठी त्यांचे भिन्न भिन्न आचार सांगितले आहेत त्यावरून पुढे श्रेष्ठकनिष्ठ दर्जाच्या कल्पना रूढ झाल्या. परंतु मूळ आधारभूत. साहित्य पाहिल्यास त्यात वर्णांच्या श्रेष्ठकनिष्ठभावास जागा नसून कार्यपरत्वे त्यांचे

पृथकत्व दाखविण्यासाठी विविध आचारांची मांडणी करण्यात आली. समाज-पुरुषाच्या हस्तपादादी अवयवांचे वर्णांशी सादृश्य ऋग्वेदाच्या पुरुषसूक्तात दाखविले, म्हणून त्या सूक्तकाराला श्रेष्ठकनिष्ठभाव अभिप्रेत होता असे मानण्याचे कारण नाही. शरीराचा व्यवहार चालण्यासाठी त्या त्या अवयवाने नेमून दिलेले काम केले पाहिजे इतकाच त्याचा अर्थ. जन्मसिद्ध चातुर्वर्ण्य गांधीजींनी मान्य केले आहे. मात्र प्रत्येक वर्णाने आपल्या धनापैकी आवश्यक तेवढा भाग स्वतःच्या कुटुंबासाठी खर्च करून शेष भाग इतर समाजासाठी खर्च केला पाहिजे, असा दंडक त्यांनी घातला आहे. विचाऱ्या शूद्राजवळ सेवेशिवाय द्यावयाला दुसरे काही नाहीच. त्याला मालक होण्याचा लोभ नाही, म्हणून तो सहस्त्रवार वंदनीय आहे, असे गांधीजींनी म्हटले आहे.

वर्णधर्म हा स्वेच्छेने पालन करावयाचा धर्म आहे. ज्याने त्याने आपापल्या धर्माचे पालन केले तरच जगाची धारणा होईल, हे जाणून प्रत्येकाने आचरण केले पाहिजे आणि ते करीत असतांना सर्व वर्णाचे समाजधारणेच्या कार्यात समान स्थान आहे, अशी सर्वांचीच धारणा असली पाहिजे. दुर्दैवाने ही धारणा वऱ्याच जुन्या काळा-पासून नाहीशी झाली आहे, आणि त्यामुळे चातुर्वर्ण्यसंस्थेमुळे समाजाला होणारा लाभ आम्ही घालवून वसलो आहोत, आणि उच्चनीचभावनेची जोपासना करण्यामुळे समा-जाची विघटना करण्याच्या पापाचे धनी झालो आहोत. उपजातींचे बंड मोडून काढले तर वर्णधर्मांचा फेरविचार करून चार किंवा अधिकही जन्मजात वर्णांमध्ये समाजाची पुनः घडी वसविणे अशक्य नाही, असा आशादायक विचारही गांधीजींनी बोलून दाखविला आहे.

जन्मजात शूद्रवर्ण मानून सुद्धा समतेच्या भूमिकेवरून सार्वजनिक अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढला पाहिजे, या सिद्धान्ताचे प्रतिपादन आणि आचरण गांधीजींनी आमरण केले. समाजात शेकडो वर्षे रूढ झालेल्या प्रथा नाहीशा होण्याला वेळ लागणे स्वाभाविकच आहे. तरीसुद्धा अलीकडील काळात सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता, कांही अपवाद वगळून, कमी झाली आहे, हे मान्य करावयाला हवे. परंतु अस्पृश्य मानल्या गेलेल्या बंधूंना हा विलंब सहन होत नाही. शेकडो वर्षांचा कलंक चुटकीसरसा धुऊन काढण्याची आकांक्षा त्यांनी वाळगलेली दिसते. त्यामुळे गांधीजींचा हिंदुधर्मांतर्गत सोज्वळ मार्ग सोडून धर्मांतराचा क्रांतिकारक मार्ग अवलंविण्याचे त्यांच्यापैकी कांहींनी पत्करलेले दिसते. प्रत्येक जण आपापल्या मार्गाने जाण्याला स्वतंत्र आहे हे खरे. क्रांतिकारक मार्गाने इष्टसिद्धी होईल असे ज्यांना वाटते, त्यांना ती प्राप्त होवो, अशीच इच्छा गांधीजींनी व्यक्त केली असती. इतिहासाचा दाखला मात्र त्यांना अनुकूल होण्यासारखा नाही. वाईट एवढेच वाटते की, जन्मभर अंतःकरणाच्या तळमळीने अस्पृश्यतेचा कलंक धुऊन काढण्यासाठी गांधीजींनी केलेले प्रयत्न त्या वर्गापैकी काही घटकांच्या तरी विश्वासाला पात्र ठरले नाहीत ! परमेश्वराचा भक्त

अजून कसोटीला उतरला नाही, इतकाच याचा अर्थ.

आश्रमधर्म हे हिंदुधर्माचे एक प्रधान अंग आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम अशा चार आश्रमांत हिंदुमात्राचे जीवन धर्मशास्त्राने विभागले आहे. आश्रमधर्माचे पालन शिस्तीने झाले तर व्यक्तीचे, कुटुंबाचे आणि समाजाचे जीवन सुखी होईल. चारी आश्रमांमध्ये ब्रह्मचर्याश्रम श्रेष्ठ आहे असे गांधीजींचे मत आहे. हिंदु धर्मशास्त्र गृहस्थाश्रमाचे महत्त्व अधिक मानते; कारण इतर तीन आश्रम हे गृहस्थाश्रमावर अवलंबून असतात. गृहस्थाश्रमातील पतिपत्नीसंबंधाविषयी गांधीजींनी वरीच चर्चा केली आहे. गृहस्थाश्रमातही गृहस्थाने कटाक्षाने ब्रह्मचर्यव्रताचे पालन केले पाहिजे. त्या कामी त्याच्या पत्नीने त्याला संपूर्ण सहकार्य दिले पाहिजे.प्रसंगी पत्नीच्या मनाची दखल पण त्याने घेण्याचे कारण नाही,असा गांधीजींचा आग्रह आहे. गृहस्थाच्या ब्रह्मचर्यव्रताची ही कल्पना त्यांच्या वैयक्तिक आध्यात्मिक उन्नतीच्या दृष्टीने कदाचित योग्य असेल, पण हिंदु धर्मशास्त्राची या कल्पनेला संमती नाही. पत्नीच्या मनाची दखल घेणे हे गृहस्थाचे कर्तव्य आहे, असे धर्मशास्त्र सांगते.

स्त्रीजातीसंबंधी गांधीजींनी आपले विचार व्यक्त केले आहेत. पुरुष आणि स्त्री ही समाजपुरुषाची दोन अंगे आहेत, या दोन्ही अंगांचा समान अधिकार आहे ही गोष्ट त्यांनी कटाक्षाने सांगितली आहे. स्त्रीपुरुषांत नैसर्गिक भेद आहेत, त्यामुळे जीवनामध्ये त्यांनी वजवावयाच्या कर्तव्यांमध्येही भेद आहेत. या भेदांचा फायदा घेऊन समाज स्त्रियांना तुच्छ लेखतो, त्यांना अडाणी ठेवतो, दडपतो, त्यांचा अवमान करतो, त्यांना भोगसाधन मानतो. शेकडो वर्षे हा प्रकार रूढ झालेला असल्यामुळे समाज विकलांग झाला आहे. हा परिस्थिती तावडतोब बदलली पाहिजे. मुलांना आणि मुलींना बरोबरीच्या नात्याने शिक्षण दिले पाहिजे. स्त्रियांच्या ठिकाणी सामर्थ्य आहे, त्याची जाणीव त्यांना करून दिली पाहिजे. त्या दुर्बल नसून सबला आहेत; त्यांच्यापाशी श्रद्धा, भावना आणि त्याग या गुणांचे सामर्थ्य आहे. धर्माचे रक्षण मुख्यतः स्त्रीवर्गाने केले आहे. विवाहासंबंधी पुरुषाला ज्या प्रमाणात स्वातंत्र्य, त्या प्रमाणात स्त्रियांनाही दिले गेले पाहिजे. वयात आलेल्या स्त्रिपुरुषांचेच विवाह झाले पाहिजेत, हे उघड आहे. वधूला आणि वराला आपला जोडीदार पसंत करण्याचा अधिकार आहे. परंतु विवाह ही एक सामाजिक घटना आहे. तिच्याशी वधूवरांइतकाच त्यांच्या कुटुंबियांचाही संबंध आहे. यासाठी विवाह हे घरांतील वडीलधाऱ्या मंडळींच्या सल्ल्याने व्हावेत, असे गांधीजींचे मत आहे. वैवाहिक जीवन सुखी व्हावयाचे तर वधू-वर आणि त्यांचे कुटुंबीय हे समान पातळीवरचे असणे आवश्यक आहे. यासाठी सामान्यतः विवाह सजातीयच व्हावेत. भिन्न वर्णांतील विवाहांत दोन्ही बाजूंची जीवनपद्धती समान असण्याची शक्यता कमीच. म्हणून भिन्न वर्णांतील विवाह हे अपवादरूपच

समाजावे, असे गांधीजींना वाटते. विधवाविवाहाला त्यांची संमती आहेच. स्त्री-जातीविषयीचे आणि विवाहासंबंधीचे त्यांचे विचार भारतीय संस्कृतीशी प्राय: जुळते असेच आहेत. स्मृतिकारांनी बालविवाह सांगितला आहे. तो तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा परिणाम समजला पाहिजे. एका बाजूला स्मृतिकार 'न स्त्री स्वातंत्र्य-मर्हति' असे म्हणतात; तर दुसऱ्या बाजूला 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' असेही म्हणतात. सत्य या दोहोंच्या मध्ये कोठे तरी आहे.

जीवनाचा अर्थाशी म्हणजे धनाशी निकटचा संबंध आहे. व्यक्ती, कुटुंब, समाज, आणि राष्ट्र यांचे धनावाचून चालणार नाही. म्हणून अर्थशास्त्राचा विचार क्रमप्राप्त आहे. येथेही गांधीजींनी आपला आध्यात्मिक निकष सोडलेला नाही. त्यांच्या मते पाश्चात्य अर्थशास्त्र चुकीच्या दृष्टिकोणावर आधारलेले असल्यामुळे ते अनर्थशास्त्र झाले आहे. ते भोगांचा गौरव करते, त्याचे सिद्धान्त साम्राज्यवादी परिस्थितीशी जुळते असतात, मूठभर स्वकीयांचे हित ते पहाते. आणि नीतितत्त्वाशी त्याची फारकत झालेली आहे. उलट भारतीय अर्थशास्त्र मानवतावादी आहे. ते नीति-तत्त्वांशी सुसंगत राहील, खेडी आणि शहरे यांचा समतोल राखील, शेती आणि उद्योग-धंदे यांत निकटचा संबंध ठेवील, जीवनवेतनाचा सिद्धांत मान्य करील, यंत्र मनुष्याचे भक्षक होणार नाही अशी खबरदारी घेईल, मालक आणि मजूर यांतील संघर्ष नाहीसा करील, प्रत्येकाला काम देईल आणि पुरेसे अन्न देईल. प्राचीन भारतात अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र यांचा विचार विशिष्ट मर्यादेपर्यंत केलेला आढळतो. भौतिक शास्त्रांचा विकास झाल्यानंतर अर्थशास्त्रात जी प्रचंड क्रांती झाली ती जुन्या काळातील भारताला अपरिचितच होती. गांधीजींनी अर्थशास्त्राला आध्यात्मिक मानवतेच्या चौकटीत बसविले आणि विचारवंतांना धोक्याचा इशारा दिला.

शिक्षणासंबंधी गांधीजींनी विचार व्यक्त केले आहेत. 'सा विद्या या विमुक्तये'- विद्येचे अंतिम ध्येय मोक्ष हे आहे, असे त्यांनी म्हटले आहे. केवळ विविध विषयांची माहिती मिळविणे म्हणजे विद्या नव्हे. विद्येने चित्ताची शुद्धी झाली पाहिजे. मन आणि इंद्रिये ताब्यात ठेवण्याचे सामर्थ्य आले पाहिजे. निर्भयपणा आला पाहिजे, स्वावलंबनाची वृत्ती बाणली पाहिजे. गांधीजींनी शिक्षणाचा जो आदर्श आपल्या-पुढे ठेवला आहे तो लक्षात घेतला, तर त्यांच्या वेळी दिले जाणारे शिक्षण आणि सध्याचे शिक्षण यांत फारसा फरक आहे असे आढळत नाही. हे शिक्षण जीवनाचा व्यापक विचार न करता माणसाच्या गरजांचा विचार करते. शिक्षणामुळे शिक्षित आणि अशिक्षित यांच्यांत तफावत निर्माण झाली आहे. लोकांत धर्मविमुखता निर्माण झाली आहे आणि संयमाची वृत्ती नाहीशी झाली आहे. ईश्वर आणि गुरुजन यांच्यासंबंधीची निष्ठा नाहीशी झाली आहे, नीतीची चाड उरलेली नाही, आणि भोगवादी वृत्ती वाढली आहे. ही स्थिती बदलली पाहिजे. शिक्षणाने विचारशक्ती वाढली पाहिजे.

धार्मिक शिक्षण दिले गेले पाहिजे, असा गांधीजींचा आग्रह आहे. केवळ नीतितत्त्वांचे शिक्षण त्यांच्या मते अपुरे आहे. प्रत्येकाला त्याच्या धर्माचे ग्रंथ, धार्मिक समजुती आणि आचार, थोर धार्मिक संत यांचे ज्ञान श्रद्धापुरःसर दिले पाहिजे. शाखारूप संप्रदायांचे ज्ञान शिक्षणात नको. इतर धर्मांच्या प्रमुख तत्त्वांचे ज्ञानही विद्यार्थ्याला द्यावे. मानवसमाजात स्थलकालपरत्वे निरनिराळे धर्म निर्माण झाले,त्यांच्यात समाज-रचना आणि रीतीरिवाज या बाबतीत भिन्नता किंबहुना विरोध दिसत असला, तरी-सुद्धा आस्तिकवाद, नीतितत्त्वांचे आचरण आणि संयमी जीवन या गोष्टी सर्व धर्मांना समान असल्यामुळे धार्मिक शिक्षण देताना या समभावावर जोर दिला गेला पाहिजे. पुरुषांचे शिक्षण घेण्याला स्त्रियांना प्रतिबंध नसावा, परंतु त्यांना आपल्या जीवनात जी जबाबदारी उचलावयाची आहे, ती पेलण्याला त्या समर्थ होतील असे शिक्षण त्यांना दिले पाहिजे.

शिक्षणात भाषेचे जे स्थान आहे, त्यासंबंधी गांधीजींनी व्यक्त केलेले विचार आजही मार्गदर्शक आहेत. स्वभाषा हे शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे, हा त्यांचा ठाम सिद्धांत आहे. राष्ट्रभाषा हिंदीचा पुरस्कार त्यांनी फार वर्षांपासून केला आहे. हिंदीच्या स्वरूपासंबंधी त्यांचे एक विशिष्ट मत आहे, आणि त्यांच्या त्या मतासंबंधी देशात चर्चाही पुष्कळ झाली आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी त्यांनी इंग्रजी भाषेचे महत्त्व मान्य केले आहे, परंतु अंतर्गत व्यवहारात इंग्रजीचा बडेजाव मिरविणे हे गुलामगिरीचे द्योतक आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे. संस्कृत भाषा ही भारतीय भाषांची जननी असल्यामुळे आणि संस्कृत भाषेत हिंदूंचे धर्मग्रंथ लिहिलेले असल्यामुळे संस्कृत भाषेचा अभ्यास व्हावयाला पाहिजे, विशेषतः हिंदू विद्यार्थ्यांना संस्कृत आलेच पाहिजे, असे त्यांचे मत आहे. त्रिभाषासूत्र त्यांना मान्य नव्हते.

विद्यार्थ्यांच्या कर्तव्याचाही त्यांनी ऊहापोह केला आहे. शिक्षणक्रमाची तप-शीलवार आखणीही त्यांनी करून दिली आहे. बालवयांत मुलामुलींना एकत्र शिक्षण देण्याला त्यांची हरकत नाही. शिक्षणकार्यात शिक्षकाचे स्थान फार श्रेष्ठ आहे. पहिली गोष्ट म्हणजे तो चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. चारित्र्यहीन शिक्षक विद्यार्थ्यांच्या अंतःकरणावर योग्य प्रभाव पाडू शकत नाही. शिक्षकाला आपल्या विषयाचे उत्तम ज्ञान असले पाहिजे, आणि हे ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये उतरविण्याचे सामर्थ्यही असले पाहिजे, हे उघडच आहे.

शिक्षणाविषयी आजच्याइतका तपशीलवार विचार प्राचीन काळी केला गेला नसला, तरी शिक्षणाची मूलभूत तत्त्वे आणि गुरुशिष्यांचे संबंध यांसंबंधी शास्त्रशुद्ध दृष्टिकोण त्या वेळच्या वाङ्मयांत व्यक्त झालेला आढळतो.तैत्तिरीय उपनिषदांत गुरूने शिष्याला केलेला उपदेश आजही विद्यापीठाच्या पदवीदानप्रसंगी केला जातो.

साहित्य आणि कला ही संस्कृतीची विशिष्ट अंगे आहेत. त्यांच्यामुळे मनुष्याचे

जीवन समृद्ध होते. अर्थात् जीवनाशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. जीवन अधिकाधिक उन्नत करणे हे साहित्याचे आणि कलेचे अप्रत्यक्ष फलित असले पाहिजे. आनंद हे त्यांचे साक्षात् फलित आहे. साहित्य आणि कला ही सत्य, शिव आणि सुंदर असली पाहिजेत. गांधीजींच्या सारखा वरून रुक्ष भासणारा विचारवंतही सौंदर्याचा रसास्वाद घेऊ शकतो. त्यांनी म्हटले आहे की, निसर्गाच्या भव्य सौंदर्यापुढे मानवनिर्मित सौंदर्य फिके पडते.

अशा प्रकारे संस्कृतीच्या विविध अंगांसंबंधी गांधीजींनी आपले विचार व्यक्त केले आहेत. आणि ते व्यक्त करीत असताना त्यांनी आपला मूलभूत आध्यात्मिक दृष्टिकोण यत्किंचितही ढळू दिलेला नाही. या त्यांच्या विचारप्रणालीमुळे त्यांना अभिप्रेत असलेला आदर्शपुरुष साधारण जनांच्या पेक्षावेगळा, काहीसा रूक्ष, गंभीर· उदासीन, अत्यंत साधा, कमीत कमी गरजा असलेला असा भासला तर नवल नाही, गांधीजींनी लोकसेवेची लक्षणे सांगितली आहेत; ग्रामसेवकांची कर्तव्येही सांगितली आहेत. रामराज्याचा आराखडाही त्यांनी दिलेला आहे. तो पाहिला म्हणजे त्या रामराज्यांतला प्रातिनिधिक नागरिक कसा असेल, याची कल्पना आपणाला करता येते. असा आदर्श पुरुष इतरांना कसा दिसतो, ह्याविषयी गांधीजींना कर्तव्य नाही. ज्या खडतर मार्गाचे आचरण त्यांनी स्वत: केले आणि त्याचा इतरांना उपदेश केला, त्या मार्गाचे अनुसरण करणारी माणसे त्यांना हवी होती, आजही हवी आहेत. नरसी मेहतांचा वैष्णव जन तो हाच. भारतीय संस्कृतीने हाच आदर्श आपल्यापुढे ठेवला आहे. असे आदर्शपुरुष पूर्वी भारतात होऊन गेले, अलीकडेही झाले आणि पुढेही होतील. त्यांच्या आचरणाने आणि उपदेशाने समाज अधिकाधिक उन्नत होत आहे सत्ययुगाकडे चालला आहे, असा प्रबल आशावाद गांधीजींनी धारण केला होता. मानवाच्या प्रगतीसाठी त्याचीच गरज आहे.

# ४१

# जागतिक राजकारण व गांधींची अहिंसा

अप्पासाहेब पंत

सर्व जगात सध्या जे संघर्ष वाढत आहेत त्यांचे स्वरूप कोणते; याची मीमांसा पुढील लेखात केलेली असून त्या संघर्षावर गांधीवादाचा तोडगा कितपत उपयोगी पडेल, याचे दिग्दर्शन केलेले आहे. कायदेभंग आणि सत्याग्रह या अहिंसात्मक साधनांची उपयुक्तता का व कशी आहे, याचे विवेचन या लेखात वाचावयास सापडते.

सुमारे एकवीस वर्षांपूर्वी एका माथेफिरू हिंदी माणसाने महात्मा गांधींचा खून करून एका थोर व स्फूर्तिदायक जीवनाचा अंत केला. हिंदुस्थानाप्रमाणे जगात सर्वत्र संघर्ष, विरोध व तणातणी सुरू आहे. पुष्कळ लोक असे म्हणतात की, भारताने महात्मा गांधींच्या तत्त्वांना तिलांजली दिली आहे. आर्थिक, राजकीय व लष्करी सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्याऐवजी सर्व सत्ता केंद्रित करण्यात येत आहे. यंत्रांकडून गुलामांप्रमाणे काम करून घेण्याच्याऐवजी आपण उत्पादनवाढीसाठी मोठमोठी प्रचंड शक्तीची यंत्रे बसवीत आहो आणि तीच यंत्रे माणसाला गुलाम करीत आहेत, इतकेच नव्हे तर त्याचे मानवी यंत्रांत रूपांतर करीत आहेत. अहिंसेच्या बळावर आक्रमणाला तोंड देण्याऐवजी आपण आत्मसंरक्षणासाठी वेळोवेळी शस्त्रांचा आश्रय घेतला आहे व त्यावर विसंबून राहिलो आहे. हिंदुस्थानात झालेले अनेक दंगे, संघर्ष

व लढे आपणाला लाठीमाराशिवाय किंवा प्रसंगी गोळीबाराशिवाय शमविता आले नाहीत. हिंदी जनताच काय, पण परदेशांतील लोकही आम्हांला विचारतात, " तुमच्या गांधींचे ते तत्त्वज्ञान कोठे गेले ? गांधींची ती तत्त्वे कोठे लुप्त झाली ? "

मला वाटते, या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी भारतात आणि भारताबाहेरच्या जगात जे लढे, संघर्ष, विरोध एकसारखे वाढत चालले आहेत, त्यांचे स्वरूप समजावून घेणे अधिक युक्त होईल. भारताप्रमाणे सबंध जगात, विशेषतः आफ्रिका, आशिया व दक्षिण अमेरिका या विकासवादी राष्ट्रसमूहांत, सामाजिक विघटनेचे प्रश्न प्रामुख्याने व तीव्रतेने उभे आहेत. जागतिक दळणवळण, उद्योगीकरण, सार्वत्रिक शिक्षण आणि साम्राज्यवाद्यांनी आपल्या अंकित देशांची केलेली बंधमुक्तता या गोष्टींमुळे अशिया-आफ्रिका खंडांतील समाजरचनेत अत्यंत जलद व मूलगामी स्वरूपाचे असे प्रचंड स्थित्यंतर घडून आले आहे. उद्योगीकरणामुळे शहरे मोठी होत आहेत आणि खेड्यांतील आर्थिक स्वयंपूर्णता नष्ट होत आहे. हस्तव्यवसाय व ग्रामीण स्वरूपाचे छोटे उद्योगधंदे यांची जागा मोठ्या प्रमाणावरील कारखान्यांनी व औद्योगिक संघटनांनी घेतली आहे.

यंत्रांमुळे एक प्रकारे हिंसावृत्तीचा प्रवेश झाला आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे तंत्र हे माणसाला अपरिहार्यपणे गुलाम बनविण्यास प्रवृत्त करणारे आहे. समाजवादी देशांप्रमाणे भांडवलशाही देशांतही अनेक प्रकारचे प्रयोग करण्यात आले असले, तरी मोठ्या कारखान्यांतील कामगारांच्या वाट्याला जी गुलामगिरी येते व त्यांना मानवी यंत्रांचे जे स्वरूप प्राप्त होते, त्यातून त्यांची सुटका कशी करावी, हा प्रश्न अजून सुटलेला नाही. यंत्रांबरोबर काम करण्यामुळे कामगारांमधील माणुसकीचा संकोच होत आहे किंवा ती नष्ट होत आहे, असे आज दिसते.

महात्मा गांधींनी दूरदृष्टीने या परिस्थितीचे आकलन केले होते, म्हणून त्यांनी आर्थिक सत्तेचे केन्द्रीकरण त्याचप्रमाणे प्रचंड प्रमाणावरील उद्योगधंदे यांविरुद्ध अनेकवार लिहिले आहे. मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीमुळे व अविचारी यांत्रिकीकरणामुळे मानवाच्या कपाळी गुलामगिरी येत आहे, एवढेच नव्हे तर त्याचा सामाजिक-मानसिक, बौद्धिक व आत्मिक ऱ्हास होत आहे, असा इशारा गांधींनी शेकडो वेळा दिला आहे आणि युरोप-अमेरिकेने आर्थिक वर्चस्वाच्या जोरावर जे आक्रमक सामर्थ्य प्रस्थापित केले आहे, तशा प्रकारचे प्रभुत्व संपादण्याला हिंदुस्थान एकादे वेळी प्रवृत्त होण्याचा संभव आहे, असे गांधींनी जाहीरपणे म्हणून ठेवले आहे. म्हणून महात्मा गांधी स्पष्टपणे म्हणतात की, केवळ विकेन्द्रीकरणामुळे व जरूरीपुरत्या यंत्रांच्या माफक उद्योगामुळे मनुष्याला आपली माणुसकी टिकवता येते आणि त्यायोगे तो अहिंसक, अनाक्रमक व संपूर्ण शांततावादी असा समाज उत्पन्न करू शकतो.

यंत्रांवरोवर काम करणाऱ्या मनुष्याचा आणखी एक प्रकार असतो, याची गांधीजींना जाणीव होती. नुसत्या दोन हातांनी किंवा एकाद्या साधनाच्या सहाय्याने काम करणारा माणूस सर्वशक्तिमान होत नाही. त्याची शक्ती, त्याचा अहंकार अगदी मर्यादित असतो. पण जेव्हा तो मोठ्या यंत्रांचा उपयोग करू लागतो तेव्हा आपण कोणी तरी मोठे आहो असे त्याला वाटू लागते आणि आपण सर्व जगाला गवसणी घालू, असा अहंकार त्याच्या मनात उत्पन्न होतो. यंत्रशक्तीच्या द्वारे माणसाच्या अंगी जो आत्मशक्तीचा संचार होतो तोच पुढे त्याचा अहंकार वाढण्यास कारणीभूत होतो. दुसऱ्यांवर आपले वर्चस्व स्थापन करावे व त्यांना आपले गुलाम वनवावे, असे त्याला वाटू लागते.

म्हणून, संघर्षाचे आणि विरोधाचे हे दोन प्रकार एकाच वेळी दृष्टिपथात येतात. पहिली गोष्ट म्हणजे दुर्दमनीय अशी वर्चस्वाची भावना आणि स्वयंकेंद्रित आत्मनिष्ठता. जो माणूस प्रचंड यंत्रे असलेला वडा कारखानदार आहे त्याला आपल्या कारखान्यात काम करीत असलेल्या कामगारांबद्दल आत्मीयता किंवा सहानुभूती असणे शक्य नाही. मनुष्य एकदा प्रचंड यंत्रांचा अधिपती झाला म्हणजे त्याच्या ठिकाणी उत्पन्न होणाऱ्या सत्ता-सामर्थ्याचा परिपाक संघर्ष व विरोध यांत होणे अपरिहार्य असते.

यंत्रयुगाचा आणखी एक दुष्परिणाम आहे. त्याचा दूरदृष्टीने विचार करताना महात्मा गांधींना तर धक्काच वसला. प्राचीन काळी माणसाजवळ भाला किंवा तलवार असले एकादे हत्यार असले तर तो दहा, वीस किंवा शंभर माणसे सुद्धा ठार करू शकत असे. आपण माणसांची हत्या करीत आहो, हे त्याला दिसत असे आणि त्याची त्याला जाणीवही असे. तरी त्याला कळत अगर नकळत त्यांच्या दुःखावद्दल केव्हा तरी, काही तरी वाटत असे. आता सुधारलेल्या प्राणघातक शस्त्रास्त्रांच्या द्वारे माणसाच्या हातात एवढी प्रचंड शक्ती आली आहे की, आज मृत्यू पाहूनही, माणसाची कसलीच भावनात्मक प्रतिक्रिया होत नाही. वर्तमानपत्रातून आपण ज्या मृत्यूच्या वातम्या वाचतो, त्या नुसत्या आकडेवारी देणाऱ्या, निर्जीव व भावनाशून्य असतात. मनाला कोणत्याही भावनेचा अगर कोमलतेचा स्पर्श होऊ न देता मनुष्य आज हजारो माणसांचा संहार करू शकतो. जेव्हा नागासाकी व हिरोशिमा या शहरांवर अणुबॉम्ब टाकण्यात आले, तेव्हा गांधीजी भयग्रस्त होऊन गेले व दुःखाश्रू ढाळू लागले. त्यांच्या निकटवर्तीयांनी गांधीजींचे हे दुःख प्रत्यक्ष पाहिले आहे. गांधीजी उद्‌गारले, "अखेर माणूस येथपर्यंत पोचला ना ! प्रभो, तूच त्राता आहेस ! "

लोक असे विचारतात की, सामान्य माणूस आपल्या सामान्य जीवनात या अहिंसा-शक्तीचा उपयोग करू शकेल काय व झगडा आणि संघर्ष उत्पन्न करणाऱ्या संबंधितांचे परिवर्तन घडवून आणील काय ? राग, द्वेष, जुलूम, जवरदस्ती, दंडेली

इत्यादिकांनी भरलेले हे लढे आणि संघर्ष, प्रतिकाराशिवाय नियंत्रित करता येतील काय ?

आपण आपल्या दैनंदिन जीवनात जरूर प्रसंगी अहिंसेचा मर्यादित प्रमाणात उपयोग करतो, हे उघड आहे. आपली समाजव्यवस्था कितीही प्राथमिक अवस्थेतील असो किंवा सुधारलेली असो, आपण काही नियम व कायदे केले आहेत. शहरातील वाहतुकीचे नियम हे अहिंसात्मक रीतीने समाजनियंत्रण करण्याचे विशिष्ट नियम आहेत. बुद्धिप्रधान समाजाच्या घटकांना पूर्णपणे मान्य असलेला कायदा हा अहिंसेचा एक आविष्कार आहे. परस्परासंबंधी आदराचे व माणुसकीचे हे दृश्य स्वरूप आहे. सुधारलेले मानवसमाज आपल्या विशिष्ट प्रादेशिक परिसरात व विशिष्ट व्यक्तिसमूहांना बंधनकारक होतील असे कायदे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. जुन्या व जीर्ण कल्पनांचा पुरस्कार करणारे कायदे, व्यक्ती आणि तिची मालमत्ता यांसंबंधीचे कायदे, त्याचप्रमाणे सरकार आणि खाजगी मालमत्ता यांचे संबंध दर्शविणारे कायदे आता बदलण्याची वेळ आली आहे. कारण सर्वच समाजव्यवस्थेत क्रांतिकारक स्थित्यंतरे घडून येत आहेत. अशा या संधिकालात, ज्या वेळी विघटनाची क्रिया पूर्ण झालेली नाही आणि पुनर्घटनेची क्रिया सुरू झालेली नाही, त्या वेळी नवीन कायदे करणे व ते अंमलात आणणे मोठे दुस्तर आहे. परंतु, कामगार आणि मालक, शेतमजूर आणि जमीनमालक, सरकार आणि जमीनदार, सरकार आणि भांडवलदार यांच्यामध्ये परस्परसंमतीने तडजोडीची एकादी योजना केली, तर कोणावर सक्ती न करता ती अंमलात आणणे शक्य होईल. या बाबतीत लवाद पद्धतीचाही परिणामकारकपणे उपयोग करता येईल. मात्र ज्या वेळी असा परस्परसंमतीचा तडजोडीचा करार होऊ शकणार नाही, त्या वेळी विरोध उत्पन्न होणे अपरिहार्य आहे. अशाच वेळी अहिंसा हीच खरी उपयुक्त व परिणामकारक ठरणारी आहे. जेव्हा कायदा सक्तीने अंमलात आणता येत नाही आणि विरोध तर फार प्रखर आहेत, जेव्हा परस्परसलोख्याचा करार करणे अशक्य आहे, जेव्हा द्वेष, मत्सर व अहंकार यांचे थैमान चालू आहे, अशा वेळी अहिंसेचा कसा उपयोग होणार ? अहिंसेच्या उपयोगाची एकादी विशिष्ट रीत किंवा पद्धत आहे काय ? महात्मा गांधींच्या म्हणण्याप्रमाणे त्यासाठी विशेष शिस्त पाळावी लागते काय ? आणि अहिंसेच्या उपयोगावर काही बंधने आहेत काय ? काही मर्यादा पाळाव्या लागतात काय ? काही विशिष्ट परिस्थितीत अहिंसा ही परिणामशून्य व निरुपयोगी होऊ शकेल काय ? जर तसे असेल तर हिंसा, दडपशाही, जुलूमजबरदस्ती, धाकदपटशा हीच एकमेव साधने आहेत, असे समजावयाचे काय ?

असाही एक प्रश्न विचारला जातो की, आंतरराष्ट्रीय पातळीवर अहिंसा कार्यशील होऊ शकेल काय ? सार्वभौम राष्ट्रातील संघर्ष मिटविण्याच्या बाबतीत अहिंसा हे परिणामकारक साधन होऊ शकेल काय ?

पुष्कळदा सार्वभौम राष्ट्रांनी आपणांमधील तंटेबखेडे सोडविण्याच्या कामी तडजोडीचा अगर लवादाचा उपयोग केला आहे. पं. जवाहरलाल नेहरू व चौ एन लाय यांनी शांतता व सहकार्य यांसाठी १९५४ साली केलेला सुप्रसिद्ध पंचशील करार व राष्ट्रांराष्ट्रांमधील सहजीवनाचे तत्त्व यांचा विचार केला असता राष्ट्रांराष्ट्रांतील तंटे व विकट प्रश्न, शस्त्रास्त्रांचा आश्रय न करता, एकमेकांच्या समजुतीने मिटवावे, अशी भावना त्यात तरी दिसून येते.

दुसऱ्या महायुद्धामुळे उत्पन्न झालेल्या वेदनांमुळे 'संयुक्त राष्ट्रांची संघटना' जन्मास आली आणि मनुष्य यापुढे हिंसेला किंवा सांघिक हत्याकांडाला प्रवृत्त होणार नाही, अशी घोषणा त्यातूनच निर्माण झाली.

अहिंसेवरील श्रद्धेची पुन्हा एकदा केलेली ही प्रतिज्ञाच होय. पण माणसाची स्मरणशक्ती किती कोती आहे !–किती अल्पकालीन आहे !

आता आपण अगदी वेगळाच मुद्दा विचारात घेऊ. आम्ही काहीजण हिंदु-मुसलमानांमधील वैमनस्यावद्दल गांधीजींबरोबर एकदा चर्चा करीत होतो. या दोन जमातींमध्ये सलोखा व एकोपा घडवून आणण्यासाठी गांधींनी केलेल्या चमत्कारां-बद्दल आम्ही त्यांना धन्यवाद दिले, आणि नंतर त्यांना विचारले, 'हिंदुमुसलमान जमातींमधील अत्यंत कट्टर जातीयवादी व प्रतिगामी व्यक्तींचे मन वळवून त्यांच्यात ऐक्यभावना उत्पन्न करणे शक्य का नाही ?' त्यावर गांधींनी उत्तर दिले, "माझ्या अंत:करणात कोणावद्दल रागद्वेष किंवा दुरावा नाही. सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांशी ऐक्यभावना ठेवावी, असे मला मन:पूर्वक वाटते. पण माझ्या हृदयात मला न कळत ऐक्य, भावनेविरुद्ध एक विकल्प राहिला असणे शक्य आहे. हा विकल्प जेव्हा पूर्णपणे नाहीसा होईल आणि हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, ज्यू, शीख किंवा पारसी यांच्या-संबंधी माझ्या मनातील भेदभाव पार लयाला जाईल, तेव्हां अहिंसेचे तत्त्व आपोआप अंमलात येईल आणि सर्व प्रकारचा विरोध व वैमनस्य पार वितळून जाईल."

यथायोग्य शिस्तीशिवाय व पूर्वतयारीशिवाय 'अहिंसा' हे तत्त्व आचरणात आणता येणार नाही, यावर गांधीजी पुन्हा पुन्हा भर देत. गांधीजींनी जे अनेक अहिंसात्मक लढे केले, त्या प्रत्येक लढ्याच्या वेळी सत्याग्रह करणारांनी कोणते कायदे पाळले पाहिजेत व कशा प्रकारे वर्तन केले पाहिजे, याची एक नियमावली त्यांनी तयार केली होती. हिंदी जनतेचे स्वातंत्र्यहरण करण्यासाठी, कोणाही नागरिकाला राजद्रोहाच्या केवळ संशयावरून अटक करण्याचे किंवा स्थानबद्ध करण्याचे अधिकार देणारा रौलट कायदा १९१९ साली ब्रिटिश सरकारने जारी केला होता. या कायद्याविरुद्ध गांधींनी राष्ट्र-व्यापी अहिंसक आंदोलन सुरू केले होते. पण ह्या अहिंसक लढ्याचे हिंसक लढ्यात रूपांतर होत आहे असे जेव्हा गांधीजींना कळून आले, तेव्हा सत्याग्रह करण्यास जनता अजून पूर्ण लायक झाली नाही असे त्यांना वाटले व आपल्या हातून 'हिमालयाएवढी

चूक' झाली, अशी त्यांनी जाहीर कबुली दिली. ते म्हणाले, " जेव्हा जनतेला कायदेभंगाची मूलभूत तत्त्वे पूर्णपणे समजतील तेव्हाच ती सविनय कायदेभंगाला लायक ठरेल. ज्यांना सत्याग्रहाचे कडक नियम व कायदे पूर्णपणे कळले आहेत, सत्य व अहिंसा या तत्त्वावर ज्यांची जाज्वल्य निष्ठा आहे, अशा शुद्ध चारित्र्यसंपन्न सत्याग्रही वीरांचे एक पथक तयार करणे आवश्यक आहे. सर्वसामान्य जनतेला सत्याग्रह व अहिंसा यांचे धडे देण्याचे कार्य हे पथक करूं शकेल.''

गांधीजींच्या ह्या अहिंसात्मक मोहिमा सुरू असता, जर त्यांना राग, द्वेष अगर हिंसा यांचा नुसता जरी संशय आला, तरी आपला लढा थांबविण्याचे व आत्मशुद्धीसाठी प्रायश्चित्त घेण्याचे धैर्य त्यांच्या अंगी होते. १९१९ सालच्या चळवळीच्या वेळी गांधीजींनी काही नियम तयार केले होते. हे नियम म्हणजे आफ्रिकेतील लढ्याच्या वेळी त्यांनी केलेल्या नियमांची सुधारलेली आवृत्ती होती. आफ्रिकेत त्या वेळी वर्णद्वेषाविरुद्ध त्यांनी निकराचा लढा चालविला होता. या लढ्याच्या वेळी स्वावलंबनावर भर देण्यात येत असे. पत्रके व पुस्तके प्रसिद्ध करून त्यांच्या विक्रीतून मिळणारा फायदा या चळवळीला देण्यात येत होता व त्यावर ती चळवळ चालली होती.

प्रत्येक चळवळीचा प्रारंभ करण्याचे व ती पुढे चालविण्याचे कार्य सत्याग्रहीच्या हाती असते. ब्रिटिश सरकारच्या जुलमामुळे जनतेत क्षोभ उत्पन्न होऊन जनता वियरली आणि तिने अत्याचाराला प्रारंभ केला, तर तिला कह्यात आणण्याचे, तिला नियंत्रित करण्याचे कठीण कार्य सत्याग्रह्याला करावयाचे असते. ती त्याची कसोटीच होय. प्रक्षुब्ध झालेल्या जमावाला थोपवून धरण्याच्या शक्तीमुळे सत्याग्रह अधिकाधिक परिणामकारक झाला आणि त्यायोगे ब्रिटिश सरकारने अधिकाधिक दडपशाहीचे धोरण अंमलात आणले.

महात्मा गांधींनी सुरू केलेल्या प्रत्येक अहिंसक लढ्याच्या प्रारंभी आपल्या कोणत्या मागण्या आहेत त्या स्पष्ट शब्दांत, निःसंदिग्धपणे मांडण्यात येत असत. चर्चा, वादविवाद, शिष्टमंडळे, कायदेशीर हरकती, मध्यस्थी, सामोपचार हे सर्व नेहमीचे उपाय थकल्याशिवाय सविनय कायदेभंग किंवा निःशस्त्र प्रतिकार सुरू करण्यात येत नसे. प्रत्येक चळवळीच्या वेळी, सरकारच्या कोणत्या गोष्टी किंवा वृत्ती आक्षेपार्ह अगर त्याज्य आहेत व सरकारने त्या तावडतोव मागे घेणे का जरूरीचे आहे, यासंबंधी महात्मा गांधी प्रारंभी सरकारशी पत्रव्यवहार करीत. ते आपल्या वृत्तपत्राच्या द्वारे व इतर साधनांनी अहिंसक लढ्याला पोषक असे वातावरण निर्माण करीत असत. सरकार किंवा प्रतिपक्षी यांच्याबद्दल क्रोध, द्वेष, अहंकार किंवा श्रेष्ठत्वाची भावना यांपासून हे वातावरण पूर्णपणे अलिप्त असे.

मध्यस्थी, तडजोड, सामोपचार, अर्ज, विनंत्या हे सर्व मार्ग अयशस्वी ठरले म्हणजे मगच आपण निःशस्त्र प्रतिकाराचा जो मार्ग स्वीकारणार आहो तो कितपत

युक्त व निर्दोष आहे, याची ते जाहीरपणे चिकित्सा करीत. साध्य आणि साधने यांत अभिन्नता आहे, असा महात्मा गांधींचा आग्रह असे. साधनशुचितेशिवाय आपले इच्छित साध्य होणार नाही, असा त्यांचा विश्वास होता. म्हणून प्रत्येक अहिंसक लढ्याच्या वेळी ते आपल्या साधनांची अत्यंत सूक्ष्मपणे व काटेकोरपणे तपासणी करीत. कोणत्याही कृतीत किंवा विचारात गुप्तता असू नये, याबद्दल त्यांचा विशेष कटाक्ष होता. नि:शस्त्र प्रतिकाराची कोणती साधने कोणत्या प्रकाराने वापरण्यात येणार आहेत, याची अगदी स्पष्टपणे ते जाहीर रीतीने कल्पना देत. कोणत्याही प्रसंगी व कोणत्याही गोष्टीत कसल्याही प्रकारचे गौप्य असता कामा नये.

आणि जर यदाकदाचित तुमच्या प्रतिस्पर्ध्याने तुम्हाला फसविण्याचा घाट घातला तरी तुम्ही त्याचा चांगुलपणा, त्याची सत्प्रवृत्ती व माणुसकी सिद्ध करण्याची त्याला आणखी एक संधी दिली पाहिजे. प्रतिपक्ष हा बेभरवशाचा व विश्वासघातकी आहे हे माहीत असले, तरी आम्ही त्याचा अप्रामाणिकपणा सिद्ध करण्याची व वाढविण्याची संधी देता कामा नये. महात्मा गांधी हे मूलत:च मानवी हृदयातील चांगुलपणा मानणारे होते आणि कोणत्याही परिस्थितीत प्रतिपक्षाच्या हृदयात सत्प्रवृत्ती निर्माण व्हावी, अशी त्यांची सदैव इच्छा असे.

यासंबंधात गांधीजींनी काढलेले उद्गार वाचकांना विशेष अर्थपूर्ण व अनुभवाचे बोल वाटतील. ते म्हणतात, "मी गेली ५० वर्षे अखंड ध्येयधोरण म्हणून अहिंसा तत्त्वाचे शास्त्रोक्त रीतीने परिपालन करीत आहे. मी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात–मग ते कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय असो–हे अहिंसेचे तत्त्व लागू केले आहे. कोणत्याही ठिकाणी ते निष्फळ ठरले, असे माझ्या अनुभवाला आले नाही. ज्या ठिकाणी ते फलद्रूप झाले नाही व अयशस्वी झाले तेथे माझ्यातील अपुरेपणा कारणीभूत आहे असे समजावे. मी पूर्ण आहे असा मी कधीच दावा करीत नाही, पण मी सत्याचा निष्ठावंत शोधक व अव्यभिचारी भक्त आहे, असे मात्र मी मानतो आणि सत्य म्हणजे ईश्वराचेच दुसरे नाव आहे. सत्याचे हे संशोधन चालू असतांनाच मला अहिंसेचा शोध लागला. या अहिंसा–तत्त्वाचा प्रसार करणे हे माझ्या जीविताचे ध्येय आहे. . .ब्रिटिशांची विमाने, रणगाडे व मशीनगन्स यांच्यापुढे हिंदुस्थान स्वत:ला दुर्बळ समजत असल्यामुळे त्याने नि:शस्त्र प्रतिकाराचा व असहकारितेचा स्वीकार केला आहे, असे म्हणणे चुकीचे आहे. शस्त्रास्त्रांच्या दृष्टीने हिंदी राष्ट्र कमजोर असल्यामुळे त्याने अहिंसेचा अंगीकार करावा असे मी प्रतिपादन करीत नाही. आपल्या अंगी शक्ती व सामर्थ्य आहे, हे जाणूनच भारताने अहिंसा अमलांत आणावी, अशी माझी मन:पूर्वक इच्छा आहे."

४२

# गांधीजींचा वारसा

प्रा. प्र. रा. दामले

गांधीजींच्या असहकाराचे सामर्थ्य कशात आहे आणि त्यांचे सर्वोदय हे ध्येय जगाला तारक कसे आहे, यावर पुढील लेखात प्रकाश पाडला आहे. प्रत्येक व्यक्तीने आपला आचार गांधीजींच्या उपदेशानुसार कसा ठेवावा याचेहि दिग्दर्शन या लेखात केलेले आहे.

'I am a man of God who has strayed into politics.'– Gandhi

'Centuries hence it will be difficult to believe that such a one actually lived in flesh and blood'–Einstein

भारताच्या स्वातंत्र्य-संपादनांत गांधीजींनी इतके मोठे कार्य केले, व स्वातंत्र्य-प्राप्ती ही भारतीय जीवनातील इतकी महत्त्वाची घटना होती की, गांधीजींचा विशिष्ट दृष्टिकोन, त्यांची कार्यपद्धती, त्यांची श्रद्धा ही काय होती व स्वातंत्र्यसंपादनानंतरही आपण व जगाने त्यांच्याकडून शिकण्यासारखे व शिकले पाहिजे असे काय होते यांकडे अनेक वेळा दुर्लक्ष होते. तसे पाहिले तर तेच अधिक महत्त्वाचे आहे. कारण राष्ट्राच्या दृष्टीने विचार केला तरी स्वराज्यात भारतीय नागरिकांचे जीवन कसे असावे व ते सुधारण्याच्या दृष्टीने गांधीजींनी कांही सांगितले आहे का, हा प्रश्न कायमचा महत्त्वाचा आहे. रानडे, टिळक,. दादाभाई इत्यादी थोर देशभक्त नेत्यांना स्वराज्य मिळविणे व स्वराज्याची पात्रता या दोहोतील साध्य-साधनच नव्हे तर तादात्म्यसंबंध नीट माहीत होता. गांधींच्या अमदानीतील दास, मोतीलाल नेहरू, आझाद, राजाजी, वल्लभभाई, जवाहरलाल अशांनाही ती जाणीव होती. परंतु बहुसंख्य राजकारणी

नेत्यांना ती नव्हती व त्यांची फळे आज आपण भोगीत आहोत. विशेषत: गांधीजी स्वत:ला 'Man of God who has strayed into politics' असे म्हणत तेव्हां त्यांचा वारसा काय हे समजून घ्यावयाचे, तर त्यांचा मूलभूत दृष्टिकोन काय हे नीट समजून घेतले पाहिजे. गांधीजींच्या निधनानंतर उत्कटतेने व तेव्हापासून अद्याप,जगात निरनिराळ्या ठिकाणी विचारवंत गांधींच्या जीवनदृष्टीबद्दल, जगाच्या प्रगतीच्या संदर्भात, विचार प्रदर्शित करीत असतात, यावरूनही हेच दिसून येते. गांधींचा वारसा हा आपला भारतीयांचाच नसून सर्व मानवजातीचा आहे. इतिहासास एक वैशिष्टयपूर्ण देणगी त्यांनी दिली आहे व ती टिकविणे, तिचे चीज करणे आपणा सर्वांच्या हिताचे आहे. प्रस्तुत लेखात याबद्दल थोडक्यात विवेचन करण्याचे योजिले आहे. तत्पूर्वी त्यांच्या सार्वजनिक कार्याचा व जीवनक्रमाचा धावता आढावा घेऊन त्यांच्या वैशिष्टयांचे दिग्दर्शन करणे उपयुक्त ठरेल.

दक्षिण आफ्रिकेत गांधींना झालेली सार्वजनिक जीवनातील अन्यायाची तीव्र जाणीव व त्यांना सुचलेला चाकोरीबाहेरचा उपाय ही दोनही गांधींचा उत्कट प्रामाणिकपणा व प्रतिभा दाखवितात. ज्या भारतीयांना स्वदेशांत पारतंत्र्य होते व अवमानित जीवन जगावे लागत होते, त्यांना साम्राज्यसत्ताधीश गोऱ्यांच्या एका वसाहतीत न्यायाची व समानतेची वागणूक मिळणे अशक्यप्राय होते. परंतु माणसाने माणसाला असे वागवावे हे अध:पाताचे व अन्यायाचे ढळढळीत उदाहरण होते. त्याचा प्रतिकार होणे अवश्य होते,— माणसाला पशू म्हणून जगायचे नसेल तर. परंतु त्याला प्रतिकार करायचा, तर तो करण्यास सैन्यात लागते त्यापेक्षा अधिक धैर्य, शिस्त व चिकाटी असलेली सेना हवी. पुष्कळ विचार करून गांधींनी या कार्यास हात घातला व मग त्यातल्या प्रत्येक तपशिलाकडे लक्ष देऊन ती चळवळ रुजवली. हळूहळू त्याचे परिणाम दिसू लागले व प्रथम नुसते कुतूहल (Novelty, Innocent symbol)असे वाटणाऱ्या त्यांच्या प्रयत्नांनी तेथील भारतीयांत, व ब्रिटिशांतही, या अमानुष,अन्याय्य वर्तनाबद्दल घृणा उत्पन्न केली. हालअपेष्टा, त्याग, शुद्ध चारित्र्य, दंगा व हिंसा यांवर कटाक्षाने टाकलेला बहिष्कार या सर्व उपायांनी जे बळाने करणे अशक्य होते तेही, काही प्रमाणात करणे शक्य झाले. गांधींचे हे कार्य पूर्ण झाले नाही व आफ्रिकेतील वर्णविग्रह आज एका प्रकारे अधिक तीव्र झाला आहे हे खरे असले, तरी गांधींनी येथे वापरलेला उपाय चिकाटीने, शहाणपणाने वापरून सामाजिक अन्याय दूर करण्यास समर्थ आहे हे सिद्ध झाले व गांधींना त्याच्या शुद्धतेची व प्रभावीपणाची मनोमन कायमची खात्री वाटू लागली.

१९१५ च्या प्रारंभी गांधी हिंदुस्थानात परतले, तेव्हा येथील राजकीय कार्याचा दुसरा टप्पा संपत आला होता. १८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना झाली तेव्हापासून १९०७-८ पर्यंत,व्यवस्थित निवेदने करून ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे आपली न्याय्य गाऱ्हाणी

मांडून त्यांचा परिहार करण्याबद्दल त्यांना विनंती करणे ही भूमिका होती. देशाच्या अवनतीची सर्वांगीण जाणीव करून घेणे हे फार महत्त्वाचे कार्य होते. गुलामगिरी झुगारण्याची पहिली पायरी 'आपण गुलाम झालो आहो' हे कळून येणे ही होय. शहाण्या-सुरत्यांनाही हे समजत नसे आणि ही जाणीव झाली तर स्वार्थ व भीरुता यांनी लोपून जाई. न्या. रानड्यांच्या Divine Dispensation या कल्पनेत जी परिस्थिती आहे तिचा सर्वांगीण व कायमच्या प्रगतीकरिता रचनात्मक उपयोग करून घेतला पाहिजे. निराश होण्याचे कारण नाही, निराश होऊन चालणार नाही ही भूमिका होती, परंतु या जाणिवेला धार आली पाहिजे. ब्रिटिश राज्यकर्त्यांचे मन वळायचे तर त्यांच्या वर एक प्रकारचे दडपण आणले पाहिजे. देशाच्या कल्याणाकरिता जरूर तो त्याग करण्याची, हालअपेष्टा सहन करण्याची तयारी ज्यांची आहे, असे नागरिक तयार झाले पाहिजेत, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात हिंदुस्थानची भूमिका व परिस्थिती समजावून सांगून पुढारलेल्या जगाची सहानुभूती मिळविली पाहिजे व लढाईसारख्या प्रसंगी ब्रिटिश राज्यकर्त्यांना हिंदुस्थानला राजकीय हक्क देण्याशिवाय तरणोपाय नाही हे मान्य करावे लागेल, अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे, हे टिळकादी नेत्यांचे म्हणणे. या धोरणानुरूप चाललेले राजकीय कार्य फार महत्त्वाचे होते. कलकत्त्याच्या काँग्रेसपासून राष्ट्रीय चळवळीत स्वदेशी, बहिष्कार, निषेध, दडपण, स्पष्ट मतदर्शन यांना महत्त्वाचे स्थान मिळाले. एका बाजूस सशस्त्र क्रांतिकारक व मुख्यत: टिळकांच्या नेतृत्वाने डॉ. बेझंट, लजपतराय, चित्तरंजन दास इत्यादी सर्वांनी राजकीय चळवळीचा दुसरा टप्पा गाठला. टिळकांवर झालेला १९०८ मधील राजद्रोहाचा खटला, त्यांनी केलेले आत्मसमर्थन व त्यांना दिली गेलेली ६ वर्षांची शिक्षा हा या चळवळीतील परमोच्च बिंदू होय. काही काळ पड खाऊन टिळक तुरुंगातून परत आल्यावर पुन: त्यांनी त्याच मार्गावर पावले टाकली. हे कार्य प्राय: सुशिक्षित भारतीयांतच झाले– परंतु सुशिक्षित भारतीय हे आम जनतेचे प्रतीनिधी म्हणून. यामुळे टिळकांच्या वेळीच या जागृतीला बरेच व्यापक स्वरूप आले. रानडे, दादाभाई, फिरोज-शहा, गोखले व टिळक या व इतर नेत्यांनी भारतीय स्वराज्यप्राप्तीचा पाया निर्विवाद घातला.

गांधींचा 'असहकार' ही या चळवळीची परिणतावस्था होय व गांधीं-सारख्या प्रतिभावान नेत्यालाच ती सुचणे शक्य होते. आफ्रिकेतला अनुभव व प्रयोग हा गांधींनी इतका आत्मसात् केला होता की, येथे आल्यावर त्याच मार्गाने येथील कोंडी फुटेल व पाऊल पुढे पडेल, असा विश्वास त्यांस वाटला. १८८० पासून भारतीय स्वातंत्र्याकरिता ज्या महाभागांनी प्रयत्न केले, त्या सर्वांच्या मनात एक प्रबळ श्रद्धा होती. ती अशी की, कितीही अडचणी असल्या तरी त्यांतून बाहेर पडून भारत देश निश्चितपणे स्वतंत्र होईल. वर सांगितलेली रानड्यांची Divine Dispensation ची

कल्पना, Home Rule is my Birthright & I shall have it ही टिळकांची उक्ती, Through our failures, success will surely come हा गोखल्यांचा आशावाद ही त्याची ठळक उदाहरणे आहेत. गांधी १९३० साली दांडीमार्चवर जात असता एके दिवशी चिंताक्रांत दिसले, तेव्हा कोणी विचारल्यावरून ते म्हणाले की "ज्या स्वराज्याकरिता ही खटपट सुरू आहे ते दौडत येत आहे व लवकरच मिळणार यात मला शंका नाही. ते स्वराज्य पेलायला माझा भारतीय नागरिक अगदी असमर्थ दिसतो, तो पात्र कसा होणार, ही मला काळजी वाटत आहे." म्हणून १९२० साली गांधी भारतीय क्षितिजावर आल्यापासून १९४७ साली स्वराज्य मिळेपर्यंत अनेक वेळा लोकांनी गांधींची राजकीय कारकीर्द आता संपली असे म्हटले, तरी गांधी परिस्थितीप्रमाणे उठाव घेत व चळवळीचे गाडे पुढे ढकलीत.

गांधींनी मागील सर्व नेत्यांच्या धोरणांचा समन्वय करून त्याला असामान्य उत्कटता आणली. १९२०–२१, ३०–३२, ४२ अशा तीन मुख्य टप्प्यांनी गांधींनी येथील राजकीय असंतोष अशा कोटीला नेऊन पोचवला की, दुसरे महायुद्ध संपण्याच्या आधीच आपणास आता हिंदुस्थान सोडणे भाग आहे, हे ब्रिटिशांच्या लक्षात आले. महायुद्धाने ब्रिटनवर पडलेला ताण, आंतरराष्ट्रीय-समूहात ब्रिटनचा खाली आलेला दर्जा, त्या युद्धातील विमानदलाच्या विलक्षण वाढीमुळे ब्रिटनचे नाविकदलावर आधारलेले सामर्थ्य फार कमी महत्त्वाचे होणे, सुभाषचंद्र बोस यांनी अद्भुत व चमत्कृतिपूर्ण पराक्रमाने निर्मिलेली आझाद-हिंद-सेना, मुंबईतील नाविक दलाचे बंड-या व अशा इतर घटनांमुळे शेवटी इंग्रजांस येथून जाण्याची घाई झाली. भारतीय काँग्रेस–नेत्यांच्याही काबूबाहेर परिस्थिती गेली व जिनांना अपेक्षेबाहेर यश मिळून या देशाचे दोन भाग झाले व दोघांसही स्वातंत्र्य मिळाले. गांधींच्या तीस वर्षांच्या अमदानीत राजकीय चुका झाल्या नाहीत असे नाही. विशेषत: हिंदु-मुसलमानांच्या प्रश्नाबद्दल त्यांची इतकी उत्कट भावना असून व त्याबद्दल त्यांची मूलभूत भूमिका अगदी योग्य असून त्यांना यश आले नाही. परंतु जे ब्रिटिश सरकार यावच्चंद्रदिवाकरौ येथे राहील असे वाटत होते. त्याला येथे राज्य करणे अधिकाधिक कठीण करून त्यांच्याशी, त्यांना अपरिचित अशा साधनांनी, गांधींनी मुकाबला केला व त्यांचा गोंधळ उडविला हे निर्विवाद. स्वराज्यप्राप्ती कोणा एकाच्या प्रयत्नाने होत नाही, व स्वातंत्र्याच्या चळवळीला परिस्थितीचे दुसरे घटकही सहाय्यभूत झाल्याशिवाय ती यशस्वी होत नाही हे खरेच आहे. गांधींना स्वत:ला ही जाणीव पूर्णपणे होती. तरीही गांधी झाले नसते तर स्वराज्य मिळाले असते पण तेव्हा मिळाले नसते, असे निस्संशय म्हणता येईल व गांधींच्या राजकारणांतील चुका कोणीही कितीही दाखविल्या तरी, स्वराज्य कोणी मिळवून दिले, अशा व्यक्तीचा नामनिर्देश करायचा तर, त्यांचाच निर्देश निर्विवाद पहिला होईल.

गांधीजींची स्वराज्याची चळवळ म्हणजे सर्वोदय-समाज-निर्मितीच्या ध्येयातील एक पायरीच होती ही गोष्ट पुष्कळांच्या नीट ध्यानात येत नाही. कारण स्वराज्य-प्राप्तीकरताही गांधीजींनी वापरलेली साधने व त्यांचा कार्यक्रम उपयोगी होता. परंतु हिंदुमुस्लिम ऐक्य, अस्पृश्यतानिवारण, खादी, मद्यपानबंदी, मूलोद्योगशिक्षण, पंचायतराज्य ही गांधींच्या दृष्टीने केवळ साधने नसून साध्याचाही भाग होत. I do not want even Swarajya with violence हे गांधी म्हणत,ते त्यांचे खरेच मत होते. अस्पृश्य समाज हिंदु समाजापासून वेगळा होऊ नये म्हणून I shall lay down my life असे ते म्हणत व ते त्यांनी आपल्या उपोषणाने सिद्ध केले. पाकिस्तानची निर्मिती ते थोपवू शकले नाहीत, परंतु त्यामुळे व हिंदुमुसलमान जमातींतील अमानुष हिंसेमुळे ते अतीव व्यथित झाले-'आता मला जगायची इच्छा नाही' असे म्हणायला लागले व शेवटी त्याच कारणी त्यांच्या देहाचे पतन झाले. खादी, मद्यपानबंदी, मूलोद्योगशिक्षण इत्यादी सर्व बाबींबद्दल त्यांना उत्कट आस्था होती व स्वराज्याचा अर्थ त्यांत आहे, असे ते समजत. काँग्रेसने राजकीय पक्ष म्हणून अवतार संपवून (नैतिक-आध्यात्मिक स्वराज्य) रामराज्य स्थापन करण्याकरिता यापुढे प्रयत्न करावा, असे त्यांनी आपल्या शेवटल्या निवेदनात सांगितले आहे. या सर्वांचा अर्थ हाच की, जगात शांतता, समाधान, सर्वांचा सर्वांगीण उदय होईल अशा मानवी समाजाची घडण होण्याकरिता व होण्याचा भाग म्हणून भारतीय स्वातंत्र्याची त्यांची आकांक्षा होती.

'सर्वोदय'-म्हणजे सर्वांचा व सर्वांगीण उदय-हे ध्येय एका अर्थी सनातनच आहे. 'सर्वे ऽत्र सुखिनः सन्तु',' जो जे वांछील तो ते लाहो' अशा प्रकारचा आदेश सर्व संस्कृतींतील महाभागांनी नेहमी दिला. परंतु तो आदेश अद्यापही मानवजातीच्या सामान्य आचरणात पाळला जात नाही. आपण सुधारलेल्या प्रगत अशा व्यक्ती किंवा समूह समजतो, त्यांचे आचरणही या दृष्टीने फार सदोष आहे हे सर्वांस विदित आहे. शिवाय मागे कधी नव्हत्या इतक्या अडचणी एका अर्थी यावावत आज आहेत. त्या अशामुळे की, चाचपडत चुकत का होईना ' The comman man has come into his own ' व ' we are one world ' ही खरी आहेत असे आज सर्वांना कबूल करावे. लागते. परंतु या तऱ्हेने, 'सर्व' याची व्याप्ती वाढली म्हणजे त्याच्या कल्याणाकरिता करण्याचे प्रयत्नही अधिक लागतात व तो ताण अनेकदा असह्य होतो.शिवाय 'सर्वांगीण' या संज्ञेचा अर्थही आता फार व्यापक झाला आहे. भौतिक शास्त्रांच्या विलक्षण प्रगती-मुळे सुखसोयींचे अमाप क्षितिज आपणापुढे आहे. त्याचा व पहिल्याचा-म्हणजे सर्व मानवजातीचा-मेळ घालणे कठीण झाले आहे,इतकेच नव्हे तर, या दोन गोष्टी परस्पर-विरोधीही क्वचित् ठरतात. परंतु तरीही कोणी सुसंस्कृत नागरिक सर्वांचा सर्वांगीण उदय हे ध्येय नाही असे म्हणू शकत नाही. जो तो आजच्या अडचणींतून, चुकांतून बाहेर पडून हे ध्येय कसे गाठावे याचे आपल्या समजुतीप्रमाणे निदर्शन करतो.

गांधींनी, माझ्या मते, याबाबत मुख्य व वैशिष्टयपूर्ण गोष्ट केली ती अशी की असा समाज ज्याला ज्याला प्रस्थापित करायचा असेल त्याने पाळण्याची पथ्ये व घडवून आणण्याच्या गोष्टी त्यांनी सांगितल्या, प्रतिपादिल्या व शक्य तो करून दाखविल्या. Non-violence बद्दल त्यांचा मूलभूत आग्रह आहे तो अशा अर्थी की, मनुष्य-स्वभावाबद्दल एक श्रद्धा त्यातून प्रगट होते. ती अशी की, मनुष्य हा सत्प्रवृत्त आहे, विवेकाच्या आवाहनाला पात्र आहे. इतिहासाच्या दाखल्याच्या सकृद्दर्शनी उलट वाटणारी ही त्यांची श्रद्धा जगातील सर्व द्रष्टयांची होती व मागेपुढे करून, काही नकळत, अशी सर्व मानवी समाजाची प्रगती त्याच दिशेने चालली आहे.

माझ्या मते, गांधीजींनी याशिवायही या संदर्भात विशेष केले ते हे की, असा सर्वोदय-समाज अस्तित्वात येण्याकरिता नेहमी करण्याच्या गोष्टी कोणत्या त्या सांगितल्या. त्या म्हणजे समाजाच्या मूल्यांत 'साधेपणा' (गरजा आवश्यक तितक्याच ठेवणे) व कार्ययंत्रणा 'विकेन्द्रित' राखणे. कलह, मतभेद उत्पन्न झाले तर सामोपचार, सत्याग्रह, शांततेवर व स्नेहावर अधिष्ठित असहकार हे उपाय आणि विरोध–कलहांची संभाव्यता टाळण्याकरिता, व्यक्ती व समाज यांनी आधिभौतिक सुखसोयी या साधनभूत आहेत हे ओळखून, त्यांनाच ध्येय समजून त्यांचा अमर्याद पाठपुरावा व हव्यास करू नये. जे काही कार्य समाजधारणेकरिता करावयाचे त्यात लहान व खालच्या वर्तुळांतून हळूहळू व जरूर तेव्हा व तेवढ्याचपुरता व्यापक यंत्रणेचा उपयोग करावा. प्राय: कलहाची बीजे आधिभौतिक सुखसोयीविषयक स्पर्धेत असतात व व्यक्ती मोठ्या अवाढव्य यंत्रणेत चिरडून गेली, हतप्रभ व हतबल झाली, म्हणजे थोडे सत्ताधारी आपल्या लहरीप्रमाणे राष्ट्रे झुंजवू शकतात, ही वस्तुस्थिती हेरून गांधींनी वरील सूचना आग्रहाने सतत केल्या.

प्रस्तुत लेख काही पातळीवर स्वयंपूर्ण व्हावा म्हणून गांधीजींच्या काही इतर मूलभूत सिद्धान्तांबद्दल थोडक्यात येथे निर्देश करण्याचे योजिले आहे. या बाबींचा पद्धतशीर व सप्रमाण ऊहापोह करावयाचा तर पुष्कळ विस्तार होईल. गांधी सत्य, प्रेम, अहिंसा, ईश्वर यांबद्दल सतत बोलत व लिहीत. त्यांतील प्रेम व अहिंसा ही एकाच भावनेची व दृष्टिकोनाची दोन रूपे आहेत, हे सहज समजण्यासारखे आहे. गांधींची अहिंसा ही भीरु नव्हती, दुर्बल नव्हती. अन्यायाचा पूर्ण व मूलभूत प्रतिकार करण्याचे ते शस्त्र होते. असहिष्णु विरोध, अन्याय, द्वेष यांवर खरी मात अहिंसेने होते, उत्कट प्रेमपूर्वक केलेल्या त्यागाने होते, असे गांधींना वाटे. मनुष्यमात्राबद्दल स्नेहभाव, बन्धुभाव ही गांधींच्या प्रेमाची व्याप्ती. मनुष्यच नव्हे तर पशू, पक्षी व सजीव सृष्टी ही मानवाच्या प्रेमास पात्र व योग्य विषय होत, असे गांधी समजत व तसे वागत. गांधी स्वत:चे I am a man of God who has strayed into Politics असे वर्णन करीत व कोणतीही लहानमोठी गोष्ट ईश्वराज्ञा म्हणूनच करीत. ईश्वरविषयक

तत्वज्ञानांतर्गत जे वाद आहेत, ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल जी प्रमाणे चर्चिली जातात, त्यांत गांधींनी कधी लक्ष घातले नाही. परंतु ही सृष्टी व विशेषत: मानवी जीवन कोणा गूढ पण प्रेममय सत् शक्तीच्या प्रेरणेने चालते,अशी त्यांची अविचल श्रद्धा होती. त्यांचा 'आतला आवाज'हा बुद्धी व व्यवहार यांच्यापेक्षा खात्रीचा असा त्यांचा ईश्वर-साहचर्याचा मार्ग होता. रुग्णाच्या नाडीवर हात ठेवून कुशल वैद्य जसा रोगनिदान करतो व उपाय सुचवितो, तसा या आंतल्या आवाजाचा उपयोग गांधी करीत. तर्क, अनुमान, चर्चा यांना टाळून नव्हे तर त्यांच्यानंतर Face to Face with God अशा अवस्थेत जे वाटते——सर्व बाह्य उपाधींच्या आत जे स्पंदन चालते त्याचा यात ते मागोवा घेत व त्यावरील त्यांचा अंतिम विश्वास हा ईश्वरावरील पूर्ण श्रद्धेचाच परिणाम होय. साध्यसाधनविषयक गांधींच्या भूमिकेची, विशेषत: टिळकांच्या तात्त्विक व व्यावहारिक भूमिकेच्या संदर्भात, बरीच चर्चा झाली. वर अहिंसेबद्दल गांधींना काय वाटे याचा उल्लेख आला, त्यात त्याचे उत्तर अंशत: आहेच. यापलीकडे साध्यसाधन यांत गौण व प्रमुख असा भेद करता येत नाही. एकाच घटनेचे, अस्तित्वाचे ते दोन घटक आहेत. योग्य साधने वापरली नाहीत तर साध्य दूषित होते, हे गांधींचे म्हणणे निर्विवाद खरे आहे. परंतु साध्याची नीट समजूत असेल तर आपोआपच योग्य साधन वापरले जाते. साध्यनिरपेक्ष असा स्वभाव साधनाला नसतो हेही खरेच आहे. गांधींनी याबाबत महत्त्वाची कामगिरी केली, ती साधनांकडे होणारे दुर्लक्ष नजरेस आणले. War to end war असे जे म्हणतात त्यांना त्यातली विसंगती समजत नाही, हे आग्रहाने दाखविले. सत्य, अहिंसा ही साधनेच वापरली पाहिजेत. त्यांचेकडे पाठ फिरविली तर कोणतेंच खरे साध्य मिळू शकत नाही. स्वातंत्र्य, समता, न्याय, सुख ही सर्व सत्य, अहिंसेच्या मार्गानेच खऱ्या अर्थी कायमची मिळतात. अन्य मार्गाने गेल्यास जे मिळते त्यात दोष येतात. गीतेत अर्जुनाला समत्वबुद्धीने, कर्तव्य म्हणून युद्ध कर, रणांगण, सोडू नको हा उपदेश केला गेला तो चूक,असे गांधींचे म्हणणे नव्हते. अन्यायाचा प्रतिकार दुसऱ्या अधिक योग्य मार्गाने करता येत नसेल,तर तो सहन करण्या-पेक्षा बळाचाही वापर मी करीन असे ते म्हणाले होते,हे या चर्चेत लक्षात ठेवले पाहिजे.

हे गांधी–शताब्दीचे वर्ष आहे. त्यामुळे साहजिकच त्यांचे सार्वत्रिक स्मरण होत आहे. या देशातच नव्हे तर जगातील बहुतेक सर्व प्रमुख राष्ट्रांत सभा, संमेलनें, परिसंवाद व इतर अनेक प्रकारे गांधीजींच्या थोरवीबद्दल बोलले, लिहिले जात आहे. अनेक वेळा या गोष्टी औपचारिकपणे केल्या जातात. तशा त्या झाल्या तर त्यांचा उपयोगही नसतो. गांधींच्या बाबतीत तसे होऊ नये. कारण गांधींनी सामान्य माणूस जागा केला, त्याची कदर ठेवली, त्याच्यावर प्रेम केले व गांधींनी सांगितले–शिकविले ते शाश्वत प्रकारचे होते, मनुष्यस्वभावाची ओळख व त्याबद्दल श्रद्धा व आशावाद यांवर ते आधारलेले होते.

आजच्या भारतातील व जगातील मुख्य समस्या, उणीवा कोणत्या, यांचा विचार केला तर स्वातंत्र्यप्राप्तीकरिता गांधींचे नेतृत्व जसे बहुमोल ठरले, तशीच त्यांची शिकवण आचरणात आणली गेली, तर आजही आपणास आपले स्वातंत्र्य सार्थ झाले व आपण स्वराज्याची आकांक्षा केली ते मिळाले असे होईल. जगातील पुढारलेल्या व इतर राष्ट्रांपुढेही ज्या समस्या आहेत, त्यांवर गांधींची ही शिकवण तोड सुचवील. गांधींनी शाश्वत सत्याचा सतत पाठपुरावा केल्यामुळे त्यांचा संदेश नेहमीच व सर्वत्र उपयुक्त ठरेल. हाही विषय व्यापक आहे व त्यातील मुख्य मुद्द्यांचेच येथे निदर्शन करता येईल. स्वराज्य मिळाले, परंतु जे जीवन स्वराज्यात मिळेल असे वाटले ते मिळाले नाही. भारतीय नागरिक व पुढारी स्वराज्य पेलू शकतात, समाजवादी लोकशाहीची पथ्ये पाळू शकतात असे दिसत नाही व सर्व पातळींवर असमाधान दिसते. आंतरराष्ट्रीय जीवन अधिक गुंतागुंतीचे झाले आहे, प्रगत राष्ट्रांची वाटचाल झपाट्याने चालू आहे. त्याचा ताण आपणावर पडतो, नव्या जोमाने नागरिक आकांक्षा करू लागल्याने अपेक्षा व प्रत्यक्ष प्रगती यांतील फरक अधिक जाणवतो. वगैरे अनेक घटक उपस्थित असले तरी खालील मूलभूत वैगुण्ये आपणांत— भारतीयांत— आज आहेत, हे मान्य करावे लागते.

(१) पैसा हेच एकमेव मूल्य आपण समजू लागलो आहो. (२)दुही, संकुचित वृत्ती यांचा फैलाव. (३)कसलाच उत्साह नाही व म्हणून कष्ट न करण्याची वृत्ती. (४) दुर्बळ व जनतापराङ्मुख नेतृत्व.

स्वराज्यप्राप्तीकरिता गांधींनी सांगितलेली साधने—हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता-निवारण,खादी-उत्पादन, मूलोद्योगशिक्षण, सत्याग्रह व असहकार—यांचा समंजस वापर आजही झाला तर वरील सर्व अडचणी हळूहळू कमी होतील. आजच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारात सामाजिक, राजकीय, आर्थिक व तांत्रिक यंत्रणांखाली झालेली व्यक्तीची कुचंबणा व प्रगत आणि अप्रगत राष्ट्रांमधील परस्पर अविश्वास व अंतर्हित चुरस ही दोन मुख्य धोक्याची स्थळे होत. गांधींच्या Decentralization ( विकेंद्रीकरण ) व Simplicity (साधेपणा) या दोन तत्त्वांच्या पालनाने त्यांपासून आपले निश्चित रक्षण होईल. याविषयी काही विवेचन सर्वोदय-समाज-विषयक जो मजकूर वर आला आहे त्यात आहे, हे वाचकांच्या लक्षात येईलच.

भारतीय व मानवी जीवनाच्या प्रगतीकरिता गांधींनी जे प्रयत्न केले त्यांचे वैशिष्ट्य संक्षेपाने वर सांगितले. त्यावरून लेखारंभीच्या अवतरणात आइन्स्टाईनचे उद्गार दिले आहेत, त्यांचे सार्थत्व दिसून येईल. केवळ व्यक्ती म्हणून कोणते गुण त्यांनी अंगी बाणविले व काय पथ्ये पाळली यांचे आता थोडक्यात दिग्दर्शन करू, म्हणजे सामान्य नागरिकाला त्यांच्याकडून काय शिकण्यासारखे आहे व ज्याला ज्याला काही कार्य करायचे आहे त्याने काय लक्षात ठेवावयास हवे ते ध्यानात येईल.

उत्कट प्रामाणिकपणा, साधेपणा , आत्मविश्वास, सतत उद्योग, व्यवहारी दृष्टी, हिशेबीपणा, सौजन्य, चिकाटी, स्नेहभाव, संयम असे हे साधे परंतु अमोल गुण आहेत. गांधींनी यांच्या साह्याने अलौकिक कामगिरी केली, इतिहासात अढळ स्थान मिळविले. गीतेत म्हटल्याप्रमाणे 'स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्' असे हे गुण आहेत. त्यांचे आचरण कोणी जितके करील तितक्या प्रमाणात त्याचे जीवन समृद्ध, समाधानी, परोपकारी होईल यात संशय नाही. गांधींची तत्त्वे, त्यांचे सार्वजनिक कार्यातील मार्ग ज्यांना पसंत नाहीत, अशा अनेक हिंदी व अहिंदी व्यक्तीनाही गांधींचे मोठेपण मान्य होई व प्रसंगी गांधी त्यांच्याकडून कामे करून घेत. गांधींच्या प्रभावळीतही भिन्न वृत्तीची, भिन्न सामर्थ्याची माणसे होती. नेहरू, पटेल, राजाजी, आझाद, राजेंद्रप्रसाद जयप्रकाश ह्या इतक्या मातब्बर भिन्न व्यक्ती गांधींनी तीस वर्षे सांभाळल्या. गोखले, डॉ. सरोजिनी नायडू, मोतीलाल नेहरू, दास, मालवीय, टागोर,शास्त्री, सप्रू,Mount Batten, Lord Templewood, Cripps, Ho Minh, Shaw Romain Rolland, Russell, Einstein अशा अनेक क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्तींना गांधीबद्दल उत्कट आदर व आकर्षण होते. याशिवायही ज्या अनेक लहानथोर व्यक्ती, अधिकारी, कार्यकर्ते, वृत्तपत्रकार गांधींशी प्रत्यक्ष संपर्क आला ते, 'गांधींचे झाले नाहीत' असे क्वचित होई. कारण सतत जागरूकतेने त्यांनी आपले व्यक्तित्व एखाद्या सौम्य पण अत्यंत परिणामकारक आयुधासारखे बनविले होते. प्रत्येक भारतीयाचे हृदय अभिमानाने उचंबळून यावे, आदराने नत व्हावे, असा हा अलौकिक थोर नेता आपला समकालीन होता, हे आपले सद्भाग्य होय. त्यांच्या कार्याचे थोडेबहुत बीज आपल्या प्रत्येकाच्या हातून व्हावे व त्यांच्या गुणांविषयी आपला आदर, आपण त्यांचे अल्पस्वल्प तरी अनुकरण करून, दाखवावा, ही इच्छा, प्रदर्शित करून ही आदरांजली संपवितो.

४३

# पत्रकार गांधीजी

त्र्यं. वि. पर्वते.

गांधीजींनी आफ्रिकेत व भारतात अनेक वृत्तपत्रे चालविली. ती चालविताना त्यांचे धोरण काय असे, आणि सत्यनिष्ठा व जनसेवा यांना ते किती महत्त्व देत, याचे विवरण पुढील लेखात केले आहे.

आपल्या वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी, कायद्याचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला जाईपर्यंत, महात्मा गांधी वर्तमानपत्रांचे वाचक नव्हते. वर्तमानपत्र वाचण्याची गोडी त्यांना तेथे लागली. ही चटक मात्र नंतर इतकी वाढली की, ते एक व्यसनच होऊन बसले. डेली टेलिग्राफ, डेली न्यूज, पॉलमॉल गॅझेट ही पत्रे आधाशासारखी वाचण्यात त्यांचे तासांवर तास खर्च होऊ लागले. चित्रमय प्रवासवर्णने त्यांना विशेष आवडत. आत्मचरित्राच्या सत्तेचाळिसाव्या पानावर त्यांनी असे नमूद करून ठेविले आहे की, ' हिन्दुस्थानात असताना मी वर्तमानपत्र कधीच वाचले नाही. ' लंडनला गेल्यावर मात्र त्यांना असा अनुभव आला की, वर्तमानपत्रे आपल्याला केवळ माहिती देऊन आणि आपली करमणूक करूनच थांबत नाहीत; आपल्या अंगी वर्तमानपत्रात लिहिण्याची आकांक्षाही त्यांनी रुजविली.

तेव्हा ते अगदीच तरुण होते आणि त्यामुळे त्या वयाच्या लोकांमध्ये, आपले नाव छापून यावे अशी जी एक ऊर्मी सहज उठते, तशी त्यांच्याही मनात उठली असेल ! लंडनच्या शाकाहारी समाजाच्या सभासदांशी त्यांची दोस्ती होती आणि त्यामुळे त्या

संस्थेचे मुखपत्र जे 'व्हेजिटेरिअन' त्यात लेख लिहिण्याची संधी त्यांना लाभली. इंग्लंड-मधील आपल्या तीन वर्षांच्या मुक्कामात त्यांनी भारतीयांचा अन्नव्यवहार, चालीरीती, सणवार वगैरे विषयांवर नऊ लेख लिहिले. यांपैकी एका लेखात त्यांनी लिहिले की, सगळेच हिंदी लोक शाकाहारी आहेत, हा एक गैरसमज आहे. तसेच प्रांतोप्रांती लोक सेवन करीत असलेले अन्नही विविध प्रकारचे असते. या लेखाच्या अखेरीस त्यांनी गोरक्षणाविषयीही चार शब्द लिहिले : " हिन्दू लोकांमध्ये गोपूजनाची वहिवाट आहे. तसेच कत्तल करण्यासाठी गाईंची गलवतांमधून जी निर्यात होते ती बंद पाडण्यासाठी चळवळही सुरू झाली आहे. '' हिन्दुस्थानात परत येण्यासाठी निघाल्यावर बोटीवर आलेल्या अनुभवांचे वर्णन त्यांनी एका लेखात केले. हा प्रवासवर्णनपर लेख दोन हप्त्यांत 'व्हेजिटेरिअन' ने प्रसिद्ध केला. अशा प्रकारे गांधीजी ' फ्री लान्स ' पत्रकार झाले.

मुंबईस त्यांनी वकिली सुरू केली. पण ती यथातथाच चालत होती. त्यामुळे दादा अब्दुल्ला आणि कंपनीने जेव्हा त्यांना आपले वकीलपत्र घेण्याला सांगून आफ्रिकेत बोलाविले, तेव्हा त्यांनी ते स्वीकारले आणि आपला भारतातील छोटासा मुक्काम संपवून१८९३ च्या एप्रिलमध्ये दक्षिण आफ्रिकेला प्रयाण केले.तेथे पोचल्यानंतर त्यांच्या अनेक कल्पना परिणत झाल्या आणि त्यांच्या जीवितकार्याची दिशा कायम झाली आणि त्या कार्याला पूरक म्हणून ते पत्रकारही झाले. लंडनच्या 'व्हेजिटेरिअन सोसायटीने' त्यांना लिहायला व बोलायला शिकविले, तर दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकजीवनाच्या आवर्तांत सापडल्यामुळे ते आपल्या अंतःकरणप्रवृत्तीला प्रमाण मानणारे पत्रकार झाले. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या अनेक दुःखांना व गाऱ्हाण्यांना वाचा फोडीत असताना त्यांनी अनेक अर्जविनंत्या लिहिल्या, गाठीभेटी घेतल्या आणि या सगळ्या कामाला भरपूर प्रसिद्धी दिली. जशी आपली बाजू त्यांनी समर्पकपणे मांडली, तसेच त्यांनी त्यांच्या कामकाजावर व चळवळीवर घेण्यात येणारे आक्षेप व आरोपही खोडून काढले.

यासाठी त्यांना वर्तमानपत्रांचाच आश्रय घ्यावा लागला. १८९६ साली काही महिने ते हिंदुस्थानात परत आले होते. दक्षिण आफ्रिकेतील आपल्या चळवळीला मायदेशाचा पाठिंबा मिळविणे हा त्यांचा या सफरींतील हेतू होता. याच वर्षी ते टिळक, गोखले, फिरोजशहा मेहता वगैरे पुढाऱ्यांना भेटले आणि त्यांचा पूर्ण पाठिंबा त्यांनी मिळविला– आणि गोखले यांना तर त्यांनी आपले राजकीय गुरूच मानले. हिन्दुस्थानातील बहुतेक वर्तमानपत्रांची सहानुभूतीही त्यांनी संपादन केली. त्या वेळी 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी म्हटले : " प्रसिद्धी हेच आमचे एकुलते एक संरक्षणाचे शस्त्र आहे.'' त्यांनी 'ग्रीन पँफ्लेट' या नावाने प्रसिद्ध असलेली एक पुस्तिका तेव्हा लिहिली. तिला भारतीय वर्तमानपत्रांनी चांगली प्रसिद्धी

दिली. 'पायोनियर' चे संपादक चेसनी, 'मद्रास स्टँडर्ड'चे पिल्ले यांच्याशी त्यांचा स्नेह जमला. 'वंगवासी', 'अमृतबाजारपत्रिका', 'स्टेटस्मन' वगैरे पत्रांनी त्यांच्या मुलाखती छापल्या. 'इंग्लिशमन' या कलकत्त्याच्या पत्राचे संपादक श्री. सॉंडर्स यांच्याशी गांधींची फारच गट्टी झाली. आत्मचरित्रात १८१–८२ पानांवर गांधीजी लिहितात : "इंग्लिशमनचे संपादक सॉंडर्स यांनी मला पूर्णपणे आपलासा केला. त्यांनी आपली कचेरी व पत्र माझ्या दिमतीला दिले. (दक्षिण आफ्रिकेच्या) परिस्थितीवर त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखात मला हवे ते फरक करण्याची मुभा दिली. अग्रलेखाचे मुद्रितच त्यांनी मला अगोदर पाठवून दिले." अशा प्रकारे हिन्दुस्थानातील पत्रकार–दुनियेशी त्यांची चांगली जानपहेचान झाली.

लंडनमध्ये कायद्याचा अभ्यास करीत असताना गांधीजींचा दादाभाई नवरोजींशी चांगला परिचय झाला होता. १८९० साली ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीच्या विद्यमाने काढलेल्या 'इंडिया' या साप्ताहिकाचे गांधीजी हे दक्षिण आफ्रिका, जोहन्सवर्ग-दर्बान येथील वातमीदार म्हणून काम करीत. या वातमीपत्रांतून ते आपल्या चळवळीचा चांगला प्रचार करीत. १८९७ साली हिंदुस्थानात मोठा दुष्काळ पडला. तेव्हा लोकांच्या मदतीला ब्रिटिश वसाहतीतील लोकांनीही यावे, असा प्रचार गांधीजींनी केला. २ फेब्रुवारी १८९७ रोजी 'नेटल मर्क्युरी' या पत्रात त्यांनी लिहिले की, "राजेमहाराजे यांच्या श्रीमंतीवरून भारतीयांविषयी कल्पना बांधू नयेत. ते फार गरीब आहेत. दुष्काळासारख्या प्रसंगी त्यांची कौटुंबिक दृष्टीने फारच वाताहात होते. तरी ब्रिटिश वसाहतींतील लोकांनी त्यांच्यावद्दलचा आपला बंधुभाव प्रकट करण्यासाठी उदारपणे मदत करावी." १८९९ च्या ऑक्टोवरात गांधींच्या स्वतंत्र शिलेदारी पत्रकार उद्योगाचा अगदी कळसच झाला, असे म्हटले पाहिजे. कारण त्या वेळी त्यांनी बोअर युद्धातील आपल्या अनुभवांवर आधारलेली लेखमाला 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्रात लिहिली. १६ जून १९०० रोजी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखात त्यांच्या रुग्ण-सेवा-पथकाच्या कार्यावद्दल स्थानिक वर्तमानपत्रांनी जे प्रशंसापर उद्गार काढले, त्यांचे उतारे आहेत. केवळ योगायोगाचीच गोष्ट अशी की, श्री. विन्स्टन चर्चिल हे याच सुमारास 'मॉर्निंग पोस्ट'मध्ये बोअर युद्धावद्दलच लेख लिहीत असत.

१८९६ साली भारतातून दक्षिण आफ्रिकेला परत गेल्यावरोवर आपल्या हिन्दी लोकांच्या तक्रारी व गाऱ्हाणी दूर करण्याच्या चळवळीला स्वतःचे मुखपत्र पाहिजे, असा गांधीजींचा निर्णय झाला होता. परंतु तो सिद्धीस जाईपर्यंत १९०३ साल उजाडले. त्या वर्षी ४ जून रोजी 'इंडियन ओपिनियन' पत्राचा पहिला अंक निघाला. श्री. व्यावहारिक मदनजित नावाचे एक मुंबईचे माजी शिक्षक गांधीजींचे सहकारी होते. ते इंटरनॅशनल प्रेस नावाचा एक छापखाना दर्बान येथे चालवीत. गांधीजींनी लिहिलेल्या अथवा लिहविलेल्या अनेक पुस्तिका व पत्रिका या छापखान्यात

छापल्या जात. या छापखान्याच्या मालकांना गांधीजींनीच 'इंडियन ओपिनिअन' हे पत्र काढण्याला प्रवृत्त केले. यातील पहिला अग्रलेख गांधीजींनीच लिहिला व त्यांत पत्र काढण्याचा हेतू व पुढे करीत राहण्याचे कार्य वगैरे विवेचन आहे. पुढे 'यंग इंडिया' अथवा 'हरिजन' मध्ये गांधीजी व इतर लेखक आपल्या नावावरच सर्व लेखन करीत, तशी पद्धती 'इंडियन ओपिनिअन' मध्ये नव्हती. ब्रिटिशांचा व हिन्दुस्थानचा संबंध ईश्वरानेच जुळविला आहे व भारतीय लोक ब्रिटिश बादशहाशी राजनिष्ठ आहेत; तरीही ब्रिटिश वसाहतीत भारतीयांना अनेक अन्याय्य कायद्यांचा जाच व काच होतो व त्यामुळे वसाहतवाले व ते यांत फार गैरसमज माजतात. ते सर्व दूर करण्याचा व त्यासाठी झगडण्याचा निर्धार पहिल्या अग्रलेखात सांगितला होता. साम्राज्यातील निरनिराळे घटक व त्यांतील लोकसमूह यांमध्ये स्नेह व सलोखा वाढविणे या इच्छे-शिवाय आमच्या कार्यक्रमात दुसरे काहीच नाही, अशा अर्थाच्या वाक्याने अग्रलेख संपला. 'इंडिअन ओपिनिअन' हे साप्ताहिक इंग्रजी, गुजराती, हिंदी व तामीळ अशा चार भाषांतील मजकुराने भरलेले असे. भारतीयांविरुद्ध पंक्तिप्रपंच करणारे अनेक कायदे व सरकारी हुकुम यांबद्दल जे खटले गांधीजी चालवीत त्यांच्या हरकती, भारती-यांविषयी निराधार आरोप आणि गैरसमज पसरविणारा जो मजकूर दक्षिण आफ्रिकी पत्रांतून येत असे त्याचे निराकरण आणि खंडन आणि हिन्दुस्थानातील महत्त्वाच्या बातम्या 'इंडियन ओपिनिअन'मध्ये सतत येत. शिवाय सत्पात्र लेखकांनी लिहिलेले इतर संस्कृतिक महत्त्वाचे लेखही असत. गांधीजींनी स्वतः एकदा 'हिंदी कलाकौशल्य' या विषयावर आग्रा-दिल्लीच्या ताजमहाल प्रभृती इमारती, कार्ले व अजंठा येथील शिल्प, लाकडावरील कोरीव काम इत्यादी गोष्टींचा उल्लेख करून एक लेख १७ सप्टेंबर १९०३ रोजी प्रसिद्ध झालेल्या अंकात लिहिला होता.

या सर्व खटाटोपात गांधीजींना प्राप्ती अशी काहीच नव्हती; उलट पदरमोडच खूप करावी लागे. पहिल्या वर्षी त्यांना २००० पौंडांची तोशीस सोसावी लागली. १३ जानेवारी १९०५ रोजी गोखले यांना लिहिलेल्या पत्रात गांधीजींनी असे लिहिले आहे की, "जेव्हा मला असे समजून चुकले की, श्री. मदनजित पैशाच्या मदतीशिवाय आमचे 'इंडिअन ओपिनअन' पत्र चालवू शकत नाहीत—आणि त्यांच्या देशभक्तीविषयी आणि प्रामाणिकपणाविषयी मला मुळीच शंका नव्हती तेव्हा माझ्या शिलकेचा अधिकांश मी त्यांच्या स्वाधीन केला. आतापर्यंत मी ३५०० पौंड त्यांना दिले आहेत. आता सगळीच जबाबदारी मी माझ्याकडे घेतली आहे आणि माझ्या कचेरीतच सगळे काम निभावून नेतो." पुढे १९०९ साली २५ एप्रिल रोजी गोखले यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले की, "इंडियन ओपिनिअन आणि फिनिक्स वसाहत यांच्याखातर सुमारे ५००० पौंड खर्च झाले आहेत." परंतु याचा खेद त्यांनी कधीच केला नाही. हिन्दी लोकांच्या गाऱ्हाण्यांचे निराकरण करण्यासाठी ते पत्र काढले होते

आणि ते त्यांचे कार्य अबाधित चालू होते. वर फिनिक्स वसाहतीचा जो उल्लेख आला आहे, ती वसाहत म्हणजे 'इंडिअन ओपिनिअन'मध्ये सर्व कामे करणारांचे एक मोठे कुटुंबच होते. सर्वांना सारखा–म्हणजे तीन पौंड–पगार होता. दर्बानपासून १४ मैलांवर, फिनिक्स रेल्वे स्टेशनापासून अडीच मैलांवर, एक मोठा शेतमळा होता. त्यांवर सर्वांनी शेतीवागायतीचे काम निर्वाहासाठी करावे व छापखान्यात काम करावे, अशी योजना होती. शेतमळचाच्या उत्पन्नावर सर्व भागेल व वर्तमानपत्रही नुकसान न होता चालेल ही अपेक्षा मात्र पूर्ण झाली नाही. श्री. वेस्ट, श्री. किट्चिन् व श्री. हेन्री पोलक हे तीन इंग्रज गृहस्थ गांधीजींचे हे पत्र चालविण्यात सहकारी होते.

दक्षिण आफ्रिकेतील हिन्दी लोकांचा स्वाभिमान जागृत करून, आपल्याला सामान्य माणुसकीची वागणूक तरी किमान पक्षी मिळाली पाहिजे,असा आग्रह धरण्याकरिता त्यांना प्रतिकाराला प्रवृत्त करणे,ही या पत्राची प्रतिज्ञा होती. ही गाऱ्हाणी तरी दिसण्यात किती क्षुल्लक ! प्रवेश करण्यावर व व्यापार करण्यावर नियंत्रणे,आगगाड्यांत व भाड्याच्या मोटारींत प्रवास करण्यावर नियंत्रणे, पादपथांचा वापर करण्यावर नियंत्रणे ! वांशिक उद्धटपणा आणि गोऱ्यांच्या हातून व्यापार निसटण्याची भीती हीच या नियंत्रणांच्या मुळाशी होती. शहाणपणाचा, माणुसकीचा उदय गोरे लोक आणि गोरे सरकार यांच्या ठिकाणी व्हावा ही एकच खटपट हे पत्र वर्षानुवर्षे करीत राहिले. आशिया खंडातून येणाऱ्या मुदतबंदीच्या कराराने बांधलेल्या हिंदी व चिनी मजुरांना करार संपल्यावर दक्षिण आफ्रिकेतच राहाणे असेल तर त्यांनी जनावरांप्रमाणे राहाण्याची मनाची तयारी ठेविली पाहिजे, असे सगळ्या कायद्याचे धोरण होते. गांधी याविरुद्ध झगडत होते व इतरांना झगडण्याला प्रवृत्त करीत होते.'इंडिअन ओपिनिअन' हे या लढ्यातील त्यांचे मुख्य हत्यार होते. हिंदी, चिनी वगैरे जे एशिआई लोक दक्षिण आफ्रिकेत होते, त्या सर्वांची एक प्रचंड यादी तयार करण्याचे सरकारने ठरविले. त्यासाठी शरीरावरील ठळक खुणा, अंगठ्याचा ठसा वगैरेंची नोंद ज्यांत आहे असे एक पत्रक प्रत्येकाने आपल्याजवळ ठेविले पाहिजे, अशी सक्ती करण्यात आली.ठरलेल्या तारखेपूर्वी हे घडले नाही, तर दक्षिण आफ्रिकेत वास्तव्य करण्याचा या एशिआई लोकांचा हक्क नष्ट होणार होता. या हुकमाविरुद्ध सत्याग्रह करण्याचे हिंदी लोकांनी ठरविले व हा लढा सारखा चालूच राहिला. इंग्लंड व हिन्दुस्थान या दोनहि ठिकाणी या लढ्याला भरपूर पाठिंबा मिळाला. गोखले यांची १९१२सालातील दक्षिण आफ्रिकेतील शिष्टाईदेखील फळास आली नाही. हिन्दुस्थानचे तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांचाही पाठिंबा मिळाला. जेव्हा गांधी तुरुंगात नसत तेव्हा १९०३ पासून १९१५पर्यंत सतत 'इंडिअन ओपिनिअन'मध्ये गुजारातीतून व इंग्रजीतून लिहीत असत.

१९१५ साली जानेवारीच्या ९ तारखेला गोखले यांच्या सल्ल्याप्रमाणे गांधीजी हिंदुस्थानात परत आले व त्यानंतर हा देशच त्यांची कर्मभूमी झाला. 'इंडिअन ओपि-

निअन ' पत्र पुढेही चालू राहिले. परंतु गांधीजी जाग्यावर नसताना साहजिकपणेच त्याचे वजन व महत्त्व कमी झाले. गांधीजींच्या कारकीर्दीतच या पत्राने अनेक चढ-उतार पाहिले. त्याचे आकार बदलले, रकान्यांची संख्या कमीजास्त झाली. हिंदी व तामीळ भाग बंद करावे लागले. सोळाची आठ पाने झाली. तथापी त्याचा सत्याग्रही बाणा, नेमस्तपणाची भाषा, हकीकतीतील प्रामाणिकपणा यात कधीही फेरफार झाला नाही. सत्याविषयी निष्ठा, भाषेची शुद्धता, कोणालाही अन्याय होऊ नये म्हणून दक्षता हे त्याचे विशेष नेहमीचेच होते. असे असले तरी अनवधानाने अथवा गैर-माहीतगारीने किरकोळ चुका होत नसत असे नव्हे. गांधीजीदेखील अखेर मानवी प्राणीच होते. उदाहरणार्थ, ' इंडिअन ओपिनिअन ' १९०३ च्या ४ जूनला सुरू झाले होते. पण स्वत: गांधीजींनी आत्मचरित्रात ही तारीख ४ जून १९०४ अशी दिली आहे. इंग्रजी शब्दांची स्पेलिंगे चुकत व पोलकसारख्यांना ते खटके. नेक नामदार श्रीनिवास शास्त्री यांनी 'यंग इंडिया'तील व्याकरणाच्या व वाक्‌संप्रदायाच्या काही चुका एकदा दाखविल्यावर गांधीजींनी 'शास्त्री दि स्कूलमास्टर' या मथळ्याखाली लिहिलेला लेख पुष्कळ वाचकांना आठवेल. पण याबद्दल गांधीजी फारशी खंत बाळगीत नसत. इंग्रजी बोलूनसवरून परकी भाषा. आपण ती कितीही उत्तम शिकलो तरी आपल्या काही चुका क्वचित होणे अपरिहार्य आहे, अशी त्यांची धारणा होती. शास्त्री यांनी. रानडे यांच्या लिहिण्यातही अशा किरकोळ खोड्या एकदा काढल्या होत्या. पोलक यांनी एकदा गांधीजींची अशीच चूक दाखविली. दक्षिण आफ्रिकी लोकसत्ताकाचे माजी अध्यक्ष क्रूगर हे वारल्यानंतर त्यांच्याबद्दल लिहिलेल्या एका लेखात पोलक यांनी He is dead and buried असे लिहिले, पण गांधींनी मुद्रिते पाहिल्यावरही प्रत्यक्षात छापून आले ते He is dead and burnt असे आले. पोलक यांना धक्काच बसला, कारण ख्रिस्ती लोकांना मृतांचे दहन मंजूर नाही. शिवाय यामुळे गोऱ्या लोकात निष्कारण गैरसमज माजेल, अशी भीतीही त्यांना वाटली. परंतु गांधींना त्याचे काही विशेष वाटले नाही. आम्हां हिन्दू लोकात मृतांचे दहनच होते. त्यामुळे मला वाचताना काही खटकले नाही, असा खुलासा त्यांनी केला !

'इंडिअन ओपिनिअन'दहा-अकरा वर्षे सर्व प्रकारची जबाबदारी घेऊन चालविल्यामुळे छापखाना व वर्तमानपत्र चालविणे या उद्योगांतील खूप अनुभव व तपशीलवार माहिती त्यांच्यापाशी जमा झाली. ते या कामाचे-म्हणजे या उद्योगाच्या जमाखर्चाचे, जाहिरातखात्याचे, सर्वच व्यवस्थेचे-तज्ज्ञ माहीतगार झाले. प्रथम या पत्रात जाहिराती येत. पण पुढे त्यांनी निश्चय केला की, कोणत्याही पदार्थाची, मालाची, सेवेची जाहिरात पैसे घेऊन करावयाची नाही. समाजोपयोगी कोणत्याही वस्तूची, यंत्राची, सेवेची 'व शोधकाची माहिती देणे हे पत्रकाराचे कामच आहे, असे त्यांनी ठरविले. पुढे यंग इंडिया' व 'नवजीवन' अथवा 'हरिजन' या पत्रात त्यांनी जाहिराती कधीच

घेतल्या नाहीत, हे सर्वांना माहीतच आहे. गांधीजींनी भारतात चालविलेली पत्रे ही केवळ मतपत्रे होती. त्यांच्या सर्व विषयांवरील मतांचा पुरस्कार त्यांत केला जाई. 'इंडिअन ओपिनिअन ' मध्ये मात्र वातम्या व वातमीपत्रेही असत. लंडनहून वातमी-पत्र मिळावे व हिंदुस्थानातूनही अशीच पत्रे मिळावी, म्हणून गांधीजींनी दादाभाईना व गोखले यांना लिहिलेली विनंतिपत्रे प्रसिद्ध आहेत. दक्षिण आफ्रिकेतील सत्या-ग्रहाच्या चळवळीने व अनुभवांनी गांधीजींची सर्व मते अगदी स्थिर झाली होती. हिंदुस्थानात काय करावयाचे, याचाही हिशेब त्यांच्या मनाशी होता. पण त्यांना घाई नव्हती. गोखले यांच्या सल्लामसलतीने चालण्याची त्यांची मनीषा होती, परंतु त्यांचे शिष्यत्व पत्करल्यावरही स्वतंत्र विचार व आचार करण्याच्या आपल्या स्वातंत्र्यावर त्यांनी पाणी सोडले नव्हते. गोखले यांच्या निकडीच्या व निकराच्या विनंत्यांना त्यांनी आदरपूर्वक नकार देऊन दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रह सुरू केला होता. हिंदुस्थानातही गोखले यांना अधिक आयुष्य लाभले असते तर तसाच अनुभव आला असता, असे म्हण-ण्याला मुळीच शंका वाटत नाही. गांधींनी एकदा कोठे तरी असे म्हटलेही आहे की, दादाभाई व गोखले माझ्याच मार्गावर आले असते !

इतिहासाने ती वेळ आणली नाही इतके खरे. गांधीजी हिंदुस्थानात परत आल्या-वर गोखले यांनाच प्रथम भेटले. त्यांनी त्यांना प्रथम मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांना भेटविले आणि गांधीकडून कबूल करून घेतले की,एक वर्षपर्यंत कोणत्याही मताचा जाहीर उच्चार मी करणार नाही व देशाच्या एकंदर परिस्थितीचा सूक्ष्म अभ्यास या मुदतीत मी करीन. गांधीजींनी ही शर्त तंतोतंत पाळली—आणि तीही, गोखले यांचा मृत्यू ते आल्यापासून अवघ्या सव्वा महिन्याने झाला असताना (१९फेब्रुवारी१९१५). पण सत्याग्रहनीतीचे आचरण त्यांनी पुढे चालू केले आणि सर्व्हंटस् ऑफ् इंडिया सोसा-यटीच्या सभासदत्वाचा औपचारिक अर्जही न करता शास्त्रीप्रभृती सर्व भारतसेवकांना निर्धास्त केले.१९१८-१९पर्यंत पोलक,वेस्ट,मणिलाल वगैरे 'इंडिअन ओपिनिअन'च्या चालकांना सल्ला व मदत देण्याचे त्यांचे काम चालूच होते. या मुदतीत त्यांनी स्वतःचे असे पत्र काढले नाही. पण 'क्रॉनिकल' सारख्या दैनिक पत्रात ते लेख व पत्रे लिहून आपली मते प्रकट करीत असत. एका ' हिंदुस्तान ' नामक मुंबईच्या गुजराती दैनि-काच्या दिवाळी अंकासाठी एक लेख लिहिण्याचे त्यांनी कबूल केले.परंतु त्यांना आपले ते वचन पाळता आले नाही. त्यावद्दल खेद प्रदर्शित करून त्यांनी वर्तमानपत्रांविषयी आपली मते संक्षेपाने मांडली.

गांधीजींनी लिहिले : " माझ्या नम्र मताप्रमाणे चरितार्थासाठी वर्तमान-पत्राचा धंदा करणे चुकीचे आहे. काही कार्यक्षेत्रे अशी असतात की, त्यांचा सार्वत्रिक हितावर फार मोठा परिणाम घडत असतो आणि त्या कार्यक्षेत्राचा वापर जीवन-यात्रा चालविण्यासाठी केला तर त्या कार्यक्षेत्रांचे उद्दिष्ट नाहीसे केल्यासारखे होते. त्यातूनही

नफा मिळविण्यासाठी जेव्हा वर्तमानपत्र चालविण्यात येते, तेव्हा तर अनेक गैरप्रकार त्या व्यवहारात उद्‌भवतात. ज्यांना या धंद्याचा अनुभव आहे त्यांना याविषयी जास्त सांगण्याची आवश्यकता नाही. वर्तमानपत्रे मुख्यतः लोकशिक्षणासाठी चालविली पाहिजेत. त्यांना दैनंदिन घटनांची माहिती देणे भागच आहे. हे काम काही कोणीही व कसेही करावे असे नाही. वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, वाचकांना वर्तमानपत्रे नेहमीच विश्वासार्ह वाटत नाहीत. छापून येते एक आणि खरोखर घडलेले असते अगदीच निराळे. असे होऊ नये म्हणून वर्तमानपत्रांनी खबरदारी घेतली पाहिजे. स्वतःची एकाद्या घटनेच्या सत्यतेविषयी खात्री पटल्याशिवाय तिची वाच्यता करणे गैर आहे. भारतीय वर्तमानपत्रांचे वृत्तांतलेखन ( Reporting ) बहुधा गचाळ असते. शब्दशः भाषण कधीच येत नाही, सारांश येतो तोही बरोबर नसतो. एकाद्याचे भाषण छापण्यापूर्वी त्याच्याकडून त्या भाषणाची मुद्रिते तपासून आणणे चांगले. पुष्कळदा कसल्याही सटरफटर मजकुराने वर्तमानपत्रांचे रकाने भरले जातात. पाश्चात्य देशांतही असेच चालते. नफ्यावरच नजर असल्याने असे होते. वर्तमानपत्रांनी लोकांची सेवाही पुष्कळ केलेली असते.म्हणून लोक इकडे दुर्लक्ष करतात. माझ्या मते सेवेबरोबर पुष्कळ नुकसानदेखील वर्तमानपत्रे करीत असतात. पाश्चात्य देशांतील वर्तमानपत्रांत इतका निरर्थक व रटाळ मजकूर भरलेला असतो की,अशा वर्तमानपत्रांना स्पर्श करणेदेखील पाप आहे. कुटुंबाकुटुंबांत आणि जातीजमातींत बखेडे माजविण्याचे काम काही पत्रे करतात. लोकांची थोडीबहुत सेवा ती करतात म्हणून त्यांची गय करता येणार नाही. एकंदरीत असे दिसते की, वर्तमानपत्राचे अस्तित्व सत् आणि असत् यांचा सारखाच प्रसार करण्याला कारणीभूत होते." 'फ्री प्रेस जर्नल'चे संस्थापक व संपादक श्री. सदानंद यांना गांधीजींनी एकदा खडखडीत सांगितले होते की, तुमचे पत्र बंद पडल्याने देशाचे काडीमात्र नुकसान होणार नाही. हा उतारा त्याची आठवण करून देतो.

१९१४–१८ चे जागतिक युद्ध संपले. परंतु टिळक-बेझंट यांच्या मागणीप्रमाणे 'होमरूल'–म्हणजे 'साम्राज्यांतर्गत स्वराज्य'–मिळण्याचे लांबच राहून फक्त दीड-दोन आणे स्वराज्य देणारा माँटेगू-चेल्म्सफर्ड कायदा तेवढा पार्लमेंटाने पास केला. लोकांची चळवळ दडपून टाकण्याकरिता रौलट बिले आली व पुढे जालियनवाला बागेत अमानुष कत्तलही झाली. गांधीजी होमरूल लीगचे सभासद झाले व मुंबई शाखेचे अध्यक्षही त्यांना निवडण्यात आले. रौलट बिलांचा निषेध म्हणून रजिस्टर न केलेले बेकायदा असे 'सत्याग्रही' नावाचे पत्रक दर सोमवारी प्रसिद्ध करण्याचे गांधीजींनी ठरविले. तसेच आक्षिप्त पुस्तकांची व पत्रकांची विक्री उघडपणे करण्याचे त्यांनी ठरविले. ७ एप्रिल, १९१९ रोजी त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. गांधींच्या या चळवळीला केसरी-मराठा पत्रांनी पूर्णपणे पाठिंबा द्यावा,असे विलायतेहून टिळकांनी

खाडीलकर व गोखले यांना पत्र पाठवून कळविले होते. लोकांची प्रतिकार करण्याची स्वाभिमानी वृत्ती गांधीजी चेतवीत होते, हे टिळकांना स्वागतार्ह वाटले होते, परंतु सत्याग्रहाची अहिंसक व आत्मक्लेश सोसण्याची बाजू लोकांना काही नीटपणे समजली नव्हती. यामुळे गांधीजी नुसती बेबंदशाही व गोंधळ माजविण्याला कारणीभूत होत आहेत असे सरकारासच नव्हे, तर श्रीनिवास शास्त्री, रवींद्रनाथ टागोर, शंकरन् नायर यांसारख्या देशभक्तांनाही तेव्हा वाटल्यावाचून राहिले नाही. टागोरांच्या पत्रावरून गांधीजींनी कबूल केले की, सविनय कायदेभंगासाठी जनतेला नीट तयार करण्यापूर्वीच मी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली हे चुकीचे होते. त्याप्रमाणे त्यांनी सत्याग्रह काही काळ स्थगित केला.

याच सुमारास 'दि बॉम्बे क्रॉनिकल' या इंग्रजी दैनिकाचे संपादक श्री. बी. जी. हॉर्निमन यांना सरकारने इंग्लंडांत परत पाठवून दिले. हद्दपारीचा हुकूम त्यांच्यावर बजावण्यात आला. 'क्रॉनिकल'च्या संपादकांनी गांधीजींना त्या पत्राचे संपादकत्व स्वीकारण्याची विनंती केली. गांधीजींनी विचार करण्यास थोडा वेळ मागितला. कदाचित्, हॉर्निमन यांच्या विचारसरणीचा व आपल्या विचारसरणीचा सांधा नीट जुळणार नाही, असे भय त्यांना वाटले असावे. पण त्या पत्रावर सेन्सॉरशिपचा हुकूम बजावून सरकारनेच त्यांचा प्रश्न सोडविला. चालकांनी पत्रच बंद ठेवण्याचे ठरविले. गांधी आपल्या आत्मचरित्रात पान ४७३ वर लिहितात :– 'But the Government as it were came to my rescue, for, by its order, the publication of the chronicle had to be suspended.' असा काही हुकूम बजावला गेला नसता व गांधी क्रॉनिकलचे संपादक झाले असते, तर त्या पत्राच्या कारकीर्दीला कोणते वळण लागले असते, याबद्दल कल्पना-तरंग उठविणे हा एक गमतीचा प्रकार होईल, पण या लेखाच्या चौकटीत तो प्रकार बसत नाही. असो. 'क्रॉनिकल' जरी अल्पकाल बंद पडला तरी त्या मुदतीत 'यंग इंडिया' या नावाचे साप्ताहिक जम्नादास द्वारकादास, कन्हयालाल मुनशी, विभाकर वगैरे मंडळींनी सुरू केले होते. त्याचे संपादकत्व गांधींनी करावे अशी सूचना त्यांच्याकडे आली. गांधीनी ती मान्य केली. 'यंग इंडिया' त्यांनी द्विसाप्ताहिक केला. ही जबाबदारी स्वीकारताना त्यांनी पुढीलप्रमाणे लिहिले : "I was anxious to expound the inner meaning of Satyagraha to the public and also hoped that through this effort. I should at least be able to do justice to the Punjab situation. For, behind all I wrote, there was potential satyagraha and the Government knew as much. By the courtesy of Young India Syndicate, composed as it is largely of satyagrahis, since the deportation of Mr. Horniman, I have been permitted to supervise the duty of the journal. I asked for such supervision ...... I have written

hitherto some leading articles in the usual editorial style. " नवजीवन म्हणून एक गुजराती मासिक हीच मंडळी चालवीत होती. तेही गांधीजींकडे सोपविण्यात आले. अहमदाबादचे श्री. इंदुलाल याज्ञिक हे तेव्हा गांधीजींचे ' नवजीवन ' च्या कामातील निकटचे सहकारी होते. थोड्याच दिवसांत गांधींनी ' यंग इंडिया व ' नवजीवन ' ही दोनही पत्रे साप्ताहिके म्हणून अहमदाबादेहून सुरू केली. प्राय: त्यांची आठ पाने 'फुलस्कॅप' आकाराची असत आणि आणि किंमत एक आणा असे.

प्रथम ' यंग इंडिया 'चा खप १२०० आणि ' नवजीवन 'चा १२००० होता. तेव्हा गांधीजींनी लिहिले की, लोकांना ' यंग इंडिया 'पाहिजे असेल तर त्याचा किमान खप २५०० तरी असला पाहिजे; नाही तर लोकांना त्याची गरज नाही, असे समजून तो बंद करण्यात येईल. जाहिराती घ्यावयाच्या नाहीत हे तर ठरलेलेच होते. 'नवजीवन 'मध्ये गांधींनी तेव्हा असे लिहिले की," मला असे वाटते की, हिंदुस्थानची सेवा मला करावयाची आहे व ती एक संदेश देऊन. माझ्या चिंतनाने आणि अनुभवाने मी अशा काही कल्पना वसविल्या आहेत की त्यांचा अनुकार केल्याने आपले सर्वांचे कल्याण होईल. त्यांचा पुरस्कार करण्याचा माझा सतत प्रयत्न चालू आहे. मला पाहिजे होते असे यश अजून आलेले नाही. कारण माझ्याजवळ पुरेशी शक्ती, वेळ व संधी नाही. कारण सत्याग्रहनीतीविषयी अजून पुष्कळच गैरसमज असलेला मला दिसून येतो– आणि यापेक्षा अधिक चांगली देणगी हिंदुस्थानला देण्याला मजजवळ नाही. लोकांसमोर ही एक अनमोल चीज ठेवण्याला मी अगदी आसुसलेला व अधीर झालो आहे. याकरिता स्वत:चे मतपत्र अगदी अवश्य आहे व ' यंग इंडिया ', व ' नवजीवन ' यांच्या रूपाने माझी ही गरज पुरी झाली आहे. '' अशा प्रकारे ही दोन पत्रे सुरू झाली आणि महादेव देसाई व शंकरलाल बँकर हे दोघे मनाजोगे सहकारीही गांधीजींना मिळाले. १९२१ सालापासून गांधीजी हिंदुस्थानचे एकमेवाद्वितीय राजकीय पुढारी झाले. असहकारितेच्या चळवळीमुळे राजकारणात जरी ते पूर्णपणे गुंतून गेले होते,तरी भारतभर त्यांची जी भ्रमंती सतत चालू होती, त्यामुळे त्यांची अशी खात्री पटली होती की, स्वातंत्र्याचा खरा अर्थ भारतातील विराट जनता आर्थिक व सामाजिक दृष्टीने मुक्त होणे असाच आहे. ( ' Freedom lies in the economic and social emancipation of the teeming millions in the country ' ) यामुळे आठवड्याच्या आठवड्याला ते स्वदेशी, चरखा, सूत कातणे, हिंदु-मुसलमानांचे ऐक्य, अहिंसा, देशी भाषा वगैरे विषयांवर लिहीत राहिले. एखाद्या प्रसंगी तर ते अगदी काव्यमय भाषेत सहज लिहून जात. २१ जुलै १९२० च्या अंकात चरख्याबद्दल त्यांनी पुढीलप्रमाणे लिहिले : " Not on the clatter of arms depends the revival of her ( India's ) prosperity and true independence. It depends most largely upon re-introduction in every home in the music of the spinning wheel.

It gives sweeter music and is more profitable than the execrable harmonium concertia and the accordion." या मुदतीत गांधीजींनी राजद्रोहात्मक लिखाण इतके लिहिले, जाणून बुजूनलिहिले की १९२२ साली अखेर सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला आणि त्यांना न्यायाधीशांनी सहा वर्षांची कारावासाची सजा दिली. गांधीजींनी राजद्रोह केल्याचा गुन्हा कबूल केल्यामुळे न्यायाधीशांचे काम अगदी सोपे झाले व टिळकांच्या याच गुन्ह्यावद्दलच्या खटल्याचा उल्लेख करून त्यांनी तेवढीच शिक्षा गांधींना केली. गांधींनी शिक्षा स्वीकारताना टिळकांच्या नावाचा उल्लेख आपल्या नावाशी निगडित केल्यामुळे आपला फार मोठा गौरव झाला असे उद्गार काढले. गांधींवरील या खटल्याच्या हकीकतीचा एक अतिशय सुंदर लेख श्री. न. चिं. केळकर यांनी लिहिला, तो त्यांच्या लेखसंग्रहात समाविष्ट आहे. गांधींची तुरुंगातून सुटका सुमारे दोन वर्षांनी झाली. या काळात त्यांनी टिळकांची आठवण व्हावी, अशाच तऱ्हेचा विद्याव्यासंग केला.

महाभारत व षड्दर्शने, उपनिषदे व बुद्धविषयक अनेक ग्रंथ, महंमदाचे चरित्र व कुराण, झरतुष्ट्राचा धर्म, व गिबन, बकल, वेल्स, लेकी, गटे, शॉ, टागोर वगैरे श्रेष्ठ लेखकांचे ग्रंथ त्यांनी अभ्यासिले. 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह' या ग्रंथाचा खर्डा त्यांनी केला आणि उर्दू भाषेचे प्रायमर व मॅन्युअल लिहिले. सुटका झाल्यावर आपल्या कारावासातील अनुभवांवर एक लेखमाला लिहिली. शिवाय त्यांच्या नेहमीच्या विषयांवर त्यांचे लेखन पुन्हा चालू झाले. १९२८ सालात त्यांनी नेहरूंची रशियाच्या भेटीवरील लेखमाला छापली. १९२८ सालच्या काँग्रेससाठी अध्यक्ष म्हणून नेहरूंचे नाव सुचविले. तेव्हापासून राष्ट्राचे पुढारीपण करण्यात नेहरूच योग्य आहेत, असा त्यांचा आपल्या मनाशी निर्णय झाला होता असे वाटते. देशाला सत्याग्रहाच्या चळवळीसाठी पुन: समर्थ करण्याचे त्यांचे प्रयास चालू होते, त्याप्रमाणे पुढे मिठाच्या व जंगलाच्या सत्याग्रहाच्या मोहिमा झाल्या. १२. मार्च १९३० रोजी व्हाइसरॉयसाहेबांनी १९१० च्या प्रेस ॲक्टाचे अधिकच कडक स्वरूपात पुनरुज्जीवन केले. याला गांधीजींनी 'प्रच्छन्न लष्करी कायदा' असे म्हटले राष्ट्रद्रोह म्हणजे सरकारविषयी अप्रीती, अनादर हा आता सार्वत्रिकच झाला असल्याने ते सरकार नष्ट करण्याचा लोकांनी निश्चयच केला आहे, अशी घोषणा 'यंग इंडिया' मध्ये ८ मे, १९३० रोजी केली. जुलै १९३० पर्यन्त ६७ वर्तमानपत्रे व ५५ छापखाने बंद पडले. लवकरच नवजीवन छापखाना व 'यंग इंडिया' व 'नवजीवन,' जप्ती आल्यामुळे, बंद पडली. १९३१ साली झालेल्या गांधी-आर्यावन करारा-प्रमाणे, सविनय कायदेभंगाचा पुरस्कार न करण्याच्या शर्तीवर, ती पुन: सुरू झाली. गांधी राउंड टेबल कॉन्फरन्ससाठी लंडनला गेले व परत आल्यावर लवकरच त्यांची पुन: तुरुंगात रवानगी झाली. आणि 'यंग इंडिया' व 'नवजीवन' यांचा अवतार

संपला. तुरुंगात असताना ' हरिजन ' सुरू करण्याची सशर्त परवानगी मिळाली. गांधी वर्ध्याला स्थायिक झाले व तेथूनच 'हरिजन' साठी ते लिहीत. 'हरिजन'मध्ये राजकारण न लिहिण्याचा निर्धार त्यांनी कसोशीने पाळला. १९३५ च्या कायद्याला इंग्लंडच्या राजेसाहेबांनीं संमती दिल्यावरही त्याबद्दल एक शब्दही ' हरिजन मध्ये आला नाही. ताडगूळ, हातसडीचे तांदूळ, खेडेगावची सफाई, पौष्टिक अन्न, गाईचे व म्हशीचे दूध, कंपोस्ट खत, ग्रामीण हिन्दुस्थानची पुनर्रचना, मध, भाजीपाले, चिंच वगैरे पदार्थांचे आहारातील महत्त्वाचे स्थान, निर्विष व विषारी साप असे विषय त्यांच्या लेखात चर्चिले जात असत. कुटुंबनियोजनही त्यात होते, मात्र त्यांचा भर संयमावर होता. कृत्रिम साधनांचा वापर त्यांना सर्वस्वी नापसंत होता. १९३६ साली काही दिवस आजारीपणामुळे 'हरिजन'मध्ये ते काहीच लिहीत नव्हते. पण दोन महिन्यांनी ते पुन: लिहू लागले.१९३८ च्या २४ सप्टेंबरच्या अंकांत त्यांनी पुन: एकदा वाचकांना निक्षून सांगितले की, 'हरिजन' हे केवळ एका माणसाच्या मतांच्या प्रचाराचे पत्र आहे आणि महादेव किंवा प्यारेलाल हे देखील मी जिवंत असता काही लिहू शकणार नाहीत. १९४२ साली १९ जुलैला त्यांनी फिरून लिहिले की, ' हरिजन ' हे केवळ मतपत्र आहे. लोक ते करमणुकीसाठी घेत नाहीत; स्वयंशिक्षणासाठी व दैनंदिन वागणुकीचे नियमन करण्यासाठी घेतात. अहिंसेचे साप्ताहिक धडे त्यांतून वाचकांना देण्यात येतात.

दुसऱ्या महायुद्धात हिंदुस्थानला त्याच्या इच्छेविरुद्ध लोटण्यात आले. त्याचा निषेध म्हणून गांधींनी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. " ना एक पै ना एक भाई " हे त्या वेळचे घोषवाक्य होते. विनोबा पहिले व नेहरू दुसरे, सत्याग्रही म्हणून नियुक्त झाले. विनोबांची प्रचारात्मक भाषणे ' हरिजन ' मध्ये छापण्यास बंदीहुकूम सुटला. तेव्हा त्यांनी ' हरिजन व ' हरिजनबंधु ' बंद करून टाकली. परंतु १८ जानेवारी १९४२ रोजी ती पुन: सुरू झाली. गांधीजींनी एकंदर जागतिक परिस्थितीचे सिंहावलोकन करून ब्रिटनला हिंदुस्थानचा त्याग करण्याचा सल्ला दिला. त्यांच्या पत्रात हा प्रचार धूमधडाक्याने सुरू झाला. सर्वांनी तो उचलून धरला. परिणामत गांधींना ८ ऑगस्ट १९४२ रोजी पुन्हा अटक झाली. ' हरिजन 'च्या सगळ्या प्रती जप्त करण्यात आल्या. ६ मे, १९४४ रोजी गांधींची मुक्तता झाली व १० फेब्रुवारी १९४६ रोजी ' हरिजन ' फिरून चालू झाला. पहिल्याच अंकांत गांधींनी ' हरिजन ' पुन: का सुरू केला याचा खुलासा केला : " Why is Harijan revived ? This question may have occured to many as it has occured to me. I may tell the reader that no special effort was made for its revival. An application for the removal of the ban was made on December 3, 1945 and the ban was removed on January 10, 1946. Many readers, including

English and American, had all along felt a void and they began to feel it more after the defeat of the fascist powers. The reason for the feeling was obvious. They wanted my reaction in terms of truth and non-violence to the various events happening in India, if not in the world. I wish to satisfy this desire." २४ फेब्रुवारी, १९४६ रोजी त्यांनी पुन: एकवार 'हरिजन' का सुरू केला याचा खुलासा करून म्हटले, " हे पत्र भारताच्या स्वातंत्र्यकार्यार्थच केवळ प्रसिद्ध करण्यात येत आहे. " येथे राजकीय स्वातंत्र्यावर जास्त जोर दिलेला आढळतो. नंतरच्या काही अंकात अन्नाचा व वस्त्राचा प्रश्न कसा सोडवावा याचे विवेचन आहे आणि घरोघरी चरखा आणि हातमाग यांचे काम चालावे असे म्हटले आहे. गरजा कमी करण्याचा, शहरांतील लोकांना दूध, फळे, भाज्या खाण्याचा व खेड्यांतील लोकांना अन्नधान्ये व डाळी राखून ठेवण्याचा उपदेश आहे. या वेळी त्यांनी मासे पकडण्याचाही सल्ला दिला. तेव्हा ही कसली तुमची अहिंसा ? असा प्रश्न करणारे स्वाभाविकपणेच निघाले. गांधींनी कबूल केले की, " यात हिंसा होते. पण अशा प्रकारची हिंसा अपरिहार्य आहे. जर कोणी अशी सक्ती कोणावर करील की, त्याने मासे खाऊ नये, तर माझे मत असे की, हा मत्स्यनिवृत्त माणूसच त्या मासे खाणाऱ्या माणसापेक्षा अधिक हिंसक आहे. ज्यांची मासे खाण्याची परंपरा आहे त्यांना ते खाऊ देणे यात हिंसा नाही. त्याकडे सोशिक वृत्तीनेच पाहिले पाहिजे." विनोबांनीही अशाच प्रकारचे उद्गार आपल्या एका प्रवचनात काढलेले आढळतात. १९४७ च्या एप्रिल महिन्यात गांधी अंत:करण बंगालमधील हिंदू-मुसलमानांच्या दंग्यांनी भारावून गेले होते. आपल्या अहिंसेच्या तत्त्वाची खरी कसोटीच आता आहे असे त्यांना वाटून, त्यांनी नौआखलीला जाण्याचे ठरविले व 'हरिजन'चे कामही न झाले तरी चालेल असा त्यांनी निर्धार केला. दंगे शमविण्यासाठी ब्रिटिशप्रणीत उपाय नेहरू प्रधानमंत्री असताही व्हावेत, ही गोष्ट त्यांच्या अगदी काळजाला भिडली आणि नेहरूंना त्यांनी त्याबद्दल तीव्र जाब विचारला. 'हरिजन' बंद करण्याचे विचार त्यांच्या मनात जोर करू लागले. आपल्या सहकाऱ्यांचे व आपले मतभेद होत आहेत असे पाहून ते फार रंजीस आले. 'हरिजन'च्या वाचकांना उद्देशून त्यांनी लिहिले, "आता ब्रिटिश वर्चस्वापासून आपण मुक्त झालो आहो. आता 'हरिजन ' व तत्सम पत्रांची काही गरज नाही." परंतु हे उद्गार उद्वेगाचे आहेत असे दिसते. कारण पुढे त्यांनी काही वाचकांचा पत्रे बंद करण्याचा सल्ला झुगारून ती चालविलीच. मात्र असेही लिहिले की, माझ्या मृत्यूनंतर कदाचित त्यांची गरज उरणार नाही !

१९४७ च्या मे महिन्यांत दिल्लीस परत गेल्यावर गांधीजी पुन: 'हरिजन'-मध्ये लिहू लागले. ते लेखन १९४८ च्या जानेवारीच्या ३० तारखेपर्यंत-म्हणजे त्यांची हत्या होईपर्यंत-चालू होते. नंतर 'हरिजन'बंद होणेच योग्य असे१५ फेब्रुवारी, १९४८

रोजी तत्कालीन भारताचे गव्हर्नर जनरल श्री. राजगोपालाचारी यांनी लिहिले. तरीही तो काही दिवस चालू होता. श्री. किशोरलाल मश्रूवाला यांनी तो खरोखर चांगल्या प्रकारे चालविला. परंतु गांधीजींबरोबर त्याचे दिवस संपत आले होते हेच खरे. गांधीजींनी स्वत: आपल्या मताविषयी इतके लिहून ठेविलेले आहे आणि त्यांचे लिहिणे इतके सुबोध आणि स्वच्छ आहे की, त्यावर कोणीही काहीही भाष्य करण्याची जरूरी नाही. सुदैवाने त्यांचे सर्व लिखाण ग्रंथबद्ध करून पुढील पिढ्यांना मार्गदर्शन व्हावे म्हणून खुद्द सरकारी रीतीनेच मोठा खटाटोप चालू आहे. सर्व देशी भाषांत व इंग्रजीत ते उपलब्ध होत आहे. वस्तुत: त्यांची शिकवण अगदी थोडक्यांत, सुमारे २०० पानांच्या ग्रंथात, सामावून दाखविणे अगदी शक्य आहे. इतक्या ग्रंथसंभाराची त्यासाठी मुळीच जरूरी नाही. स्वत: गांधींनीच ते कार्य 'इंडिअन होमरूल' हे लहानसे पुस्तक छापून व आत्मचरित्र लिहून केलेले आहे. तथापि ज्याला आपण 'राष्ट्रजनक' म्हणतो त्या युगपुरुषाचे अक्षरन् अक्षर आपली जायदाद म्हणून जतन करण्यात काही वावगे आहे असेही नाही. त्यांचा संदेश अजून जगाला बुद्धिगम्य झाला असला, तरी जगाच्या आचारात येण्याला किती काळ लोटेल, हे सांगणे दुरापास्त आहे.

गांधीजींची थोरवी त्यांच्याकडे एक पत्रकार म्हणून पाहून सांगणे म्हणजे त्यांना एका बेतशीर चौकटीत बसविण्यासारखे आहे-आपण त्यांची छायाचित्रे चौकटीत बसवून भिंतीवर टांगतो त्याप्रमाणे.त्यांचे सर्व जीवन हे इतके थोर आहे की,त्याचा असा कोंडमारा करणे शक्यच नाही. पत्रकार ही त्यांची केवळ एक बाजू आहे. आपले जीवन परिणामकारक करण्यासाठी त्यांनी एक साधन म्हणून पत्रकाराचा पेशा पत्करला, तोही केवढ्या ध्येयवादित्वाने, नि:स्वार्थपणे, निरलसपणे, हे आपण पाहिलेच आहे. पत्रकार म्हणूनही त्यांची थोरवी एका त्रोटक लेखात सांगून होण्यासारखी नाही. आपल्या ध्येयाशी आणि जीवितहेतूशी सुसंगत राहूनच त्यांनी वर्तमानपत्रांचा व्यवहार सांभाळला. आपल्या सहकाऱ्यांशी कसे वागावे, जमाखर्च कसा सांभाळावा, संयम कसा पाळावा, भाषा स्पष्ट व सत्यपूर्ण असली म्हणजे ती कडक असण्याची जरूरी कशी नसते, जाहिराती का घेऊ नयेत, वगैरे प्रकारची व्यावहारिक शिकवणूक त्यांच्या पत्रकार-जीवनात आपल्याला मिळते. कोणत्याही ध्येयवादाने प्रेरित होऊन पत्रकार होणाराला, कोणाचीही मदत न घेता ती शिकता येईल. सत्याग्रही म्हणून त्यांनी न्यायकोर्टात आपल्यावर करण्यात आलेल्या आरोपांचे खंडन करण्याकरिता आपले समर्थन केले नाही, असे प्रसंग पुष्कळच आले. परंतु कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल त्यांच्यावर जो एक खटला रौलट बिलाविरुद्ध त्यांनी केलेल्या सत्याग्रहप्रकरणी भरण्यात आला होता, त्यात त्यांनी आपला पूर्ण बचाव केला. हायकोर्टात सर अॅबरसन मार्टेन, हेवर्ड, व काजीजी यांच्यापुढे तो चालला. ३ मार्च, १९२० रोजी ही घटना घडली. कोर्टाची माफी मागण्याचा सल्ला त्यांना देण्यात आला होता. पण त्यांनी तो मानला नाही.

माफी मागण्यासारखा काही गुन्हा आपण केलाच नाही, असे त्यांचे म्हणणे होते. गांधींचे या वेळचे वकिली समर्थन कसे होते याची कल्पना येण्यासाठी एक वाक्य दिले म्हणजे पुरे. ते म्हणाले, " If a son brought a suit against his father and if a journalist thought that his action was wrong, the journalist would be justified in holding the son up to public ridicule, notwithstanding the fact that the suit was still undecided or sub-judice. " तिघाही न्यायमूर्तींनी हे काही एक मानले नाही. त्यांनी त्यांच्यावर गुन्हा शाबीत धरला. त्यांना फक्त सक्त ताकीद (Severe reprimand) देण्यात आली की, असा गुन्हा पुन: करू नये न्यायमूर्ती हेवर्ड म्हणाले की, "The law had certainly been broken but the respondents seem to have posed not as law-breakers but rather as passive resisters of the law. "

गांधीजींनी हा विषय तेवढ्यावरच सोडून दिला नाही. त्यांनी म्हटले की, माफी न मागण्यात मी काही उगाच हट्टीपणा करीत नव्हतो, प्रश्न तत्त्वाचा होता. त्यांनी लिहिले, " I had to conserve a journalists independence and yet respect the law. My own reading of the law was that no contempt was committed by me. But my defence rested more upon the fact that I could not offer an apology, if I was not prepared not to repeat the offence on a similar occasion. Because I hold that an apology tendered to a court, to be true, has to be as sincere as a private apology. The luminons judgement of Justice Marten lays down the law and decides against me. But I feel thankful that it does not question the propriety of my action. Justice Hayward's Judgment recognises it as an instance of passive resistance and practically makes it the reason for not awarding any sentence. Here then we have, an almost complete vindication of civil disobedience. "

याला म्हणतात सत्याविषयीचा प्रामाणिक आग्रह आणि प्रतिपक्षाविषयीही आदर ठेवण्याची न्यायबुद्धी.

४४

# गांधीजींची विश्वस्त-कल्पना

## रिषभदास राका

समाजात सर्वत्र अर्थमूलक विषमता व शोषण आढळते आणि त्यामुळे समाजामध्ये वर्गविग्रह चालू असतो. त्याला पर्याय म्हणून गांधीजींनी विश्वस्तपणाचा सिद्धांत मांडला, त्याचा आशय पुढील लेखात स्पष्ट केला आहे.

मानवाने दुसऱ्याच्या सहकार्याने आजपावेतो जो विकास केला तो अद्भुत आहे. निसर्गाला व आपल्यापेक्षा बलिष्ठ हिंस्र पशूला त्याने आपल्या बुद्धीने वश करून आपले जीवन सुरक्षित केले आणि अधिक सुखद बनविले. मानवांतील सहकार्याचे उचित मूल्यांकन व्हावे, म्हणून विनिमयाला समाजजीवनात त्याने स्थान दिले. परंतु या अर्थाने मानवसमाजात विषमता निर्माण केली आणि शोषणाला जन्म दिला. हे पाहून, समाजात समता यावी, यासाठी अनेक समाजचिंतक महात्मे व थोर पुरुष यांनी निरनिराळे उपाय सुचविले की ज्यांच्यामुळे मानवसमाजात एकता यावी सर्वांना आपला विकास साधण्याची व सुखसोयीने राहण्याची संधी मिळावी. परंतु या प्रयत्नात त्यांना संपूर्णपणे यश मिळाले नाही. समाजात विषमता कायम असून अर्थाने अनेक अनर्थ निर्माण केले व पैसा शोषण करण्याचे साधन झाला.

अशा प्रकार समाजात असणारी असमता ही त्याची दुर्बलता वाढविणारी

असून मानवी विकासात ती अडचण निर्माण करणारी आहे. समाजात जितका मोठा दलितवर्ग राहील, त्या प्रमाणात समाज दुबळा राहणार. मानवजात जो विकास करू इच्छिते, त्यात हा मागासलेला व दलितवर्ग अडचण निर्माण करतो, म्हणून प्राचीन काळापासून ही विषमता दूर करण्याचे प्रयत्न झाले होते. परंतु यंत्रीकरणाने मागील दोनशे वर्षांपासून अर्थाचे प्रावल्य वाढले आणि जगापुढे आर्थिक प्रश्न फार गुंतागुंतीचे व जटिल बनले. आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात वाढली.

ही आर्थिक विषमता दूर करण्याचे प्रथम प्रयत्न युरोपमध्ये सुरू होणे स्वाभाविक होते कारण तेथे यंत्रीकरण प्रथम आले. शोषित मजूरवर्गाला जागृत करून त्यांना आपल्या शोषणाची आठवण पहिल्यांदा करून देण्यात आली. त्यांना संघटित करून भांडवलशाहीला तोंड देण्यात आले. कारण पैशाच्या जोरावर काही लोक हजारो लाखो लोकांच्या श्रमाचा फायदा घेत असत, त्यांच्यावर सत्ता गाजवीत असत, त्यांचे शोषण करीत असत. मजुरांनी संघटित होऊन आपल्यावर होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच समाजवाद व साम्यवाद निर्माण झाला. संघर्ष न करता हा प्रश्न सोडविण्याचे मार्ग टॉलस्टॉय-रस्किननी सुचविले, तर साम्यवाद व समाजवादाचा मार्ग मार्क्स–लेनिनने सुचविला. हा विचार प्रयोगरूपाने अमलात आणण्याचे कार्य लेनिनने केले आणि त्या विचाराचा जगावर फार परिणाम झाला. जगातील फार मोठी लोकसंख्या, आर्थिक विषमता व तिचे दुष्परिणाम दूर करण्यासाठी साम्यवादाचा पुरस्कार होत आहे. परंतु कम्युनिझमने हा प्रश्न सोडविण्यात होणारी हिंसा करून लाखो लोकांचे प्राण व कोट्यवधी लोकांचे स्वातंत्र्य हिरावूनही त्यांना यश मिळालेले नाही. यापेक्षा दुसरा कमी धोक्याचा कोणताही मार्ग मिळत असेल तर पहावा, म्हणून सहज दृष्टी गांधीजींच्या विश्वस्ततेच्या सिद्धांताकडे वळते. गांधींचा ट्रस्टीशिपचा सिद्धांत कित्येकजण अव्यावहारिक मानतात. सिद्धांतरूपाने जरी तो बरा वाटला, तरी आचरणात येण्यासारखा नाही असे मानण्यात येते. पण जरा खोल विचार केला तर असे आढळून येईल की, तोच अधिक व्यवहार्य व कमी धोक्याचा आहे. ही गोष्ट आम्ही गांधींच्या शब्दांतच येथे देत आहोत. ते म्हणतात:–

" जरी उद्योगधंद्यांत किंवा वारसाहक्काने संपत्ती मिळाली तरी ती सर्व संपत्ती त्या व्यक्तीची नसते. त्याचा तर इतकाच अधिकार आहे की, ज्या रीतीने लाखो लोक आपला उदरनिर्वाह करतात त्याचप्रमाणे त्याने सन्मानपूर्वक आपला निर्वाह करावा. त्या संपत्तीवर राष्ट्राचा हक्क असून त्याचा उपयोग राष्ट्रहितासाठी झाला पाहिजे. हा सिद्धांत मी त्यावेळी मांडला की, जेव्हा जमीनदार व राजेराजवाडे यांचा संपत्तीविषयी समाजवादी सिद्धांत देशापुढे आला. समाजवादी विशिष्ट सोयी मिळालेल्या वर्गास नष्ट करू इच्छित होते. परंतु त्यांची संपत्ती व संपत्तीविषयी लोभ असूनही जर ते सामान्य लोकांच्या, जे मेहनत करून भाकरी मिळवितात त्यांच्या, बरोबरीचे

होतील, तर मला हवे आहे.''

अशा रीतीने आपल्या संपत्तीचे विश्वस्त होणारे लोक किती आढळतील ? जर हा सिद्धांत बरोबर असेल तर ही गोष्ट गौण आहे की,त्या सिद्धांतास अमलात आणणारे लोक पुष्कळ आहेत की एक आहे. ही आत्मविश्वासाची गोष्ट आहे. जर तुम्ही अहिंसेचा सिद्धांत मान्य करीत असाल तर त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे-मग त्यात यश मिळो किंवा न मिळो. तुम्ही हे म्हणू शकता की, या सिद्धांताप्रमाणे चालणे कठीण आहे. परंतु या सिद्धांतामध्ये अशी कोणतीही गोष्ट नाही की, जी बुद्धिग्राह्य नाही.

तुम्ही हेही म्हणू शकाल की, 'ट्रस्टीशिप' ही कायदेशास्त्राची केवळ कल्पना आहे. व्यवहारात तिचे कोठेही अस्तित्व दिसून येत नाही. पण लोक जर या गोष्टीचे सतत चिंतन करीत राहतील आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न करीत राहतील, तर मानवजातीच्या जीवनात नियामक शक्तीच्या रूपाने प्रेम आज जितके प्रभावशाली दिसत आहे, त्यापेक्षा हा ट्रस्टीशिपचा सिद्धांत अधिक प्रभावशाली आढळून येईल. जर प्रयत्न केला तर जगात समतेची स्थापना करण्यात दुसऱ्या कोणत्याही उपायापेक्षा या उपायाने अधिक पुढे आपण जाऊ शकूं.

जर राजसत्तेने भांडवलशाहीला हिंसेने दावण्याचा प्रयत्न केला, तर ती त्यात अधिक गुरफटून जाईल—किंवा मग अहिंसेचा विकासच होऊ शकणार नाही, असा माझा दृढविश्वास आहे. राज्यसत्ता हिंसेचे केंद्रित व संघटित रूप आहे. व्यक्तीमध्ये आत्मा असतो, परंतु राज्यसत्ता केवळ जड यंत्रमात्र आहे. म्हणून तिची हिंसेपासून सोडवणूक करणे कठीण आहे. कारण हिंसेतूनच तिचा जन्म होतो. म्हणूनच मी ट्रस्टीशिपच्या सिद्धांताला अधिक महत्त्व देतो. राज्यसत्ता आपल्याशी ज्यांचा मतभेद आहे, त्यांचेशी हिंसेचा फार अधिक प्रमाणात उपयोग करील अशी भीती वाटते. लोक स्वेच्छेने विश्वस्त म्हणून व्यवहार करतील, तर चांगले होईल.

राज्यसत्तेच्या हाती शक्तीचे अधिक केंद्रीकरण न होता त्याऐवजी विश्वस्ततेच्या भावनेचा अधिक विस्तार व्हावा. राज्यसत्तेच्या वैयक्तिक मालकीची हिंसा कमी नुकसान करणारी आहे. परंतु राज्यसत्तेची मालकी अनिवार्य असेल तर ती कमीत कमी असावी.

सामान्यपणे भांडवलदार—मात्र भांडवलदारच नव्हे तर बरेचसे लोक—या गोष्टीचा विचारच करीत नाहीत की, आपण पैसा कसा मिळवितो? अहिंसेचा प्रयोग करणारांचा असा विश्वास असलाच पाहिजे की,कोणीही माणूस कितीही पतित झाला तरी, त्यावर कुशलतापूर्वक व सहानुभूतीने उपाय केला गेला तर त्याची सुधारणा होऊ शकते. माणसात असलेल्या दैवी अंशाला प्रभावित करण्याचा प्रयत्न करून त्याचा अनुकूल परिणाम होईल, अशी अपेक्षा ठेवावी. जर समाजातील प्रत्येक माणसाने आपल्या या शक्तीचा उपयोग, वैयक्तिक स्वार्थासाठी नव्हे तर सर्वांच्या कल्याणासाठी, करण्याचा

प्रयत्न केला, तर काय समाजाच्या सुखसमृद्धीमध्ये वाढ होणार नाही ?

ज्यात कोणत्याही माणसाच्या योग्यतेचा पुरा पुरा उपयोग होऊ शकत नसेल, असा समाज शेवटी नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. भांडवलदार प्रामाणिकपणे कोटयवधी रुपये मिळवो, परंतु त्याचा उद्देश ती सर्व कमाई सर्वांच्या कल्याणासाठी खर्च करावी असा असावा. सर्व-कल्याणकारक नव्या जीवनपद्धतीच्या विकासाचा हाच खरा व निश्चित मार्ग आहे.

गांधीजी द्रष्टे होते. त्यांनी समाजहिताच्या दृष्टीने ट्रस्टीशिप-सिद्धांत त्या वेळी सुचविला की, ज्या वेळी साम्यवादाचा सिद्धांत भारतात इतका प्रभावशाली नव्हता.परंतु आता जी स्थिती आहे त्यात भांडवलदारांचे व सामान्य जनतेचे हित यात आहे की, त्यांनी मिळून मिसळून एकाने दुसऱ्याच्या हिताचे रक्षण करावे. भारताला जर सुख, शांती व समृद्धी हवी असेल, तर त्यासाठी गांधींचा मार्गच अचूक व व्यावहारिक आहे.

आशा करावी की, भांडवलदारांना जर साम्यवादाचा धोका नको असेल, तर ते विश्वस्ततेचा सिद्धांत अमलात आणतील.

४५

# ग्रंथकार गांधींचें अलौकिकत्व

अ. ज. भागवत

गांधीजी हे काही शास्त्रज्ञ किंवा ग्रंथकार नव्हते. तरीसुद्धा आपल्या नानाविध कार्यांच्या अनुषंगाने त्यांनी जितके लेखन केले, तितके फारच थोडयांनी केले असेल. 'आत्मकथे'सारखी बोटांवर मोजण्याइतकी पुस्तके त्यांनी लिहिली. पण त्यांच्या लेखनशैलीचे व विचारसरणीचे काही एक वैशिष्टय आहे. ते पुढील लेखात स्पष्ट केलेले आहे.

महात्मा गांधींचे जीवन विविध अंगांनी नटलेले असल्यामुळे त्यांच्याकडे विविध कोनांतून पहाण्याची सोय आहे. गांधीजींच्या हयातीतच असे कित्येक चांगले प्रयत्न झालेले आहेत. त्यांच्या मृत्यूनंतरही अशा ग्रंथांची निर्मिती होत राहिली आहे. जन्म-शताब्दीच्या निमित्ताने या वर्षी सर्व जगभर असेच प्रयत्न होणार आहेत. मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या लेखसंग्रहात 'ग्रंथकार गांधी' या विषयावर लिहिण्याची मला करण्यात आलेली विनंती मी आनंदाने स्वीकारीत आहे.

ग्रंथांमध्ये मुख्यत: दोन प्रकार होतात. पहिला प्रकार प्रासंगिक ग्रंथांचा म्हणता येईल. चिरस्थायी ग्रंथांचा दुसरा प्रकार मानला जातो. गांधीजींच्या लिखाणात या दोनही प्रकारच्या लिखाणाचा समन्वय झालेला आहे. कारण गांधीजींचे व्यक्तिमत्त्व प्रासंगिकता आणि चिरंतनता या जीवनाच्या दोन्ही अंगांचे एकत्र दर्शन देणारे आहे.

गांधीजी हे आधुनिक काळातील अत्यंत व्यापक आणि विशाल प्रज्ञेचे कर्मयोगी होते. ते स्वत:ला सत्याचे उपासक समजत असत-- आणि त्यांची सत्याची कल्पना संपूर्ण जीवनाला एकाच वेळी व्यापण्याचा प्रयत्न करणारी होती. ते जीवनाच्या अद्वैताचे उपासक होते. व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन हा भेद ते करीत नसत. व्यावहारिक जीवन आणि आदर्श जीवन हा भेदही त्याना मंजूर नव्हता. संसार निराळा आणि चित्तशुद्धीचा परमार्थ निराळा, ही रूढ कल्पना त्यांना स्वीकार करण्यालायक वाटली नाही. राजकीय स्वातंत्र्य, आर्थिक समानता, सामाजिक एकता या तीनही मूल्यांचे एकाच वेळी व एकाच साधनेने संगोपन होऊ शकते, असा त्यांचा दृढ विश्वास होता.

गांधीजींनी विद्यार्थीदशेत असतानाच जीवनाच्या अंतिम मूल्यांचे खूप तीव्रतेने चिंतन केले होते. विलायतेत शिकत असतानाच प्रामुख्याने त्यांनी जीवनाच्या विविध अंगांचा परिचय करून घेतला. आस्तिक-नास्तिक अशा उभयविध विचार-सरणींचा त्यांना परिचय झाला. आहारविषयक प्रश्नांची चिकित्साही त्यांनी खूप केली. या सर्व विचार-मंथनांतून त्यांची जीवनमूल्ये स्थिर होऊ लागली. हिंदुस्थानात आल्यानंतर त्यांचा रायचंदभाईंशी परिचय झाला. रायचंदभाईंच्या विचारांचा गांधीजींच्या जीवनावर अत्यंत खोल परिणाम झालेला आहे. परंतु गांधीजींच्या जीवनविषयक विचारांना खरा आकार मिळाला, तो ते दक्षिण आफ्रिकेत गेल्यानंतर. दक्षिण आफ्रिकेत गांधीजींना आपले जणू जीवनाचे अवतार-कार्यच गवसले. तेव्हापासून जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यांचा जीवन-विकास एकसारखा होत राहिला. जीवनाच्या प्रत्यक्ष संग्रामातच त्यांना जीवनाची निरनिराळी कोडी उलगडण्याची आवश्यकता उत्पन्न झाली व क्रियात्मक चिंतनां-तूनच त्यांचे जीवन-विचार प्रकट होत गेले. म्हणून **क्रियात्मक चिंतन** हे गांधींच्या विचारांचे एकमेव वैशिष्ट्य मानले पाहिजे.

ज्ञान, भावना आणि क्रिया या तीन शक्ती मिळून जीवन बनलेले आहे.व्यक्ति-जीवनाचा विश्वजीवनाशी अखंड संबंध असतो. या संबंधाचे स्वरूप समजणे हीच ज्ञानाची प्रक्रिया बनते. या संबंधालाच गांधीजींनी ‘सत्य’ हा शब्द वापरलेला आहे. हा संबंध अनुभवण्यासाठी उत्कट प्रेमभावनेची आवश्यकता असते. गांधींनी या प्रेमभावनेला ‘अहिंसा’ हा शब्द योजिलेला आहे. व्यक्ति-जीवन काय, किंवा विश्व-जीवन काय, जीवन हे वाहुचत: अखंड कर्ममयच असते. या जीवनकर्मांत अखंड वावरत असतानाच जीवनाच्या एकत्वाचे सदैव भान सांभाळणे आणि प्रेमभावनेचा सतत उत्कर्ष करीत राहणे हा खरा जीवनयोग होय. गांधीजींनी याच जीवनयोगाला ‘सत्याग्रह-दर्शन’ असे नाव दिले आहे. त्यांच्या जीवनाच्या सर्व शक्ती या सत्याग्रह-दर्शनाच्या संशोधनात वेचलेल्या आढळतात. त्यांनी आपल्या साऱ्या जीवनाला

प्रयोगशाळेचे स्वरूप दिले होते. त्यांचे सर्व लिखाण या सत्याच्या प्रयोगांच्या साक्षेपी वर्णनातच जन्म पावलेले आहे.

दक्षिण आफ्रिकेत प्रत्यक्ष सामाजिक लढ्यांतूनच गांधीजींना आपले सत्याग्रह-दर्शन लाभले. रस्किन आणि टॉलस्टॉय या दोन प्रतिभावंत लेखकांचा त्यांच्या जीवनावर उत्कट परिणाम होऊन सत्याग्रहाचे स्वरूप स्पष्टपणे त्यांना उमजले. अमेरिकन तत्त्वविचारक थोरो याचाही सत्याग्रह-विचारांत फार मोठा वाटा आहे. गांधीजींनी आपल्या 'आत्मकथे'त आपल्या जीवनावर कसकसे संस्कार होत गेले व आपली जीवनदृष्टी कशी स्थिर होत गेली, याचे उत्तम चित्रण केलेले आढळते. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह-संग्रामात त्यांना आलेले विविध अनुभव यांचे चित्रण व त्यांच्या विचारांचा झालेला विविध प्रकारचा विकास याचे चित्रण त्यांनी आपल्या 'आत्मकथेत' आणि 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह'या ग्रंथात उत्तम प्रकारे केले आहे. हे त्यांचे दोन ग्रंथ म्हणजे त्यांच्या स्वतःच्या जीवनाचा विकास दर्शविणारे नकाशे आहेत. त्यांनी भारतात आल्यानंतर अनेक लढे केले आणि अनेक प्रयोग चालविले. त्यांच्या सर्व लढ्यांचा व प्रयोगांचा इतिहास त्यांच्याच शब्दात सांगितलेला उपलब्ध आहे. गांधीजींचे वाङ्मय आणि त्यांचे स्वतःचे जीवन ही अत्यंत एकरूप झालेली आढळतात. 'हिंद स्वराज्य' हे त्यांचे पुस्तकरूपाने लिहिलेले पहिलेच लिखाण त्यांच्या सर्व लिखाणात अत्यंत महत्त्वाचे समजावे लागेल. त्या पुस्तकात मानव-समाजाचा नैतिक दृष्टिकोनातून त्यांना प्रतीत झालेला आदर्श त्यांनी जगापुढे ठेवला आहे. गांधीजींचा हा ग्रंथजगातील विचारवंतांना सदैव प्रेरणा देत राहील. विज्ञान-युगाने इतक्या समस्या निर्माण केल्या आहेत की, त्यातून मानवसमाजाला कोणता आणि कसा मार्ग काढावा हे कळणे कठीण होत चालले आहे. विज्ञानामुळे मानव-समाजाला दारिद्र्यातून आणि गुलामगिरीतून सुटका करून घेण्याची फार मोठी संधी आणून दिली आहे हेही खरेच. हिंसा आणि द्वेष या दुष्ट मनोवृत्तींच्या निरा-करणाची सामुदायिक शक्यता समीप आली आहे. तथापी, विज्ञानातून जन्म पावलेल्या अनेक यांत्रिक आणि सामाजिक संघटना राबवून घेण्याला लागणारे नैतिक सामर्थ्य मानवाला वाढविता आले नाही तर, मानवजातीवर विनाशाचे मोठे संकट कोसळल्या-शिवाय राहणार नाही. या विचारांनी व्यथित झालेल्या लोकांना 'हिंद स्वराज्य' हे पुस्तक पुष्कळच प्रेरणा देऊ शकेल.

गांधीजींचे गीतेसंबंधीचे ग्रंथ त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेने नटलेले आढळतात. त्यांनी शोधिलेले सत्याग्रह-दर्शन सतत वाढणारे आणि विकसित होणारे जीवन-दर्शन आहे. गांधीजींना सतत प्रयोगाची व विचारशोधनाची आवश्यकता पट-लेली होती. भौतिक शास्त्रातील संशोधक जसे आपल्या प्रयोगशाळेत सतत प्रयोग करीत राहतात, त्याचप्रमाणे सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रांतही विचार-

वंतांनी सतत प्रयोग चालविले पाहिजेत, आपले सिद्धांत वरचेवर पारखून घेतले पाहिजेत आणि आपल्या नजरेस आलेला सिद्धान्तातील दोषही काढून टाकण्याची हिंमत बाळगली पाहिजे, असा गांधीजींचा अखेरचा आदेश आहे. आपल्या ग्रंथांच्या अभ्यासकांसाठी त्यांनी अत्यंत महत्त्वाचा संदेश देऊन ठेविला आहे.

" मी 'महात्मा' म्हटलो गेलो म्हणून माझे वचन प्रमाण आहे असे समजून कोणी चालू नये. 'महात्मा' कोण हे आपल्याला माहीत नाही. म्हणून चांगला मार्ग हा की, 'महात्म्या'चे वचनदेखील बुद्धीच्या कसोटीवर घासून घ्यावे आणि ते कसास न उतरल्यास त्याचा त्याग करावा. "

" मी खूप आत्मनिरीक्षण केले आहे, एकूण एक मनोवृत्ती तपासली आहे, विश्लेषण केले आहे. पण त्यातून निघालेले निष्कर्ष हे सर्वांच्या बाबतीत अंतिम आहेत. ते खरेच आहेत वा तेच खरे आहेत, असा दावा मी केव्हाही करू इच्छीत नाही. "

" पण एक दावा मी अवश्य करू इच्छितो, आणि तो हा की, माझ्या दृष्टीने ते खरे आहेत, आणि तूर्त तरी ते मला स्वतःला अंतिम असे वाटतात. "

म. गांधींनी आपल्या लेखनाविषयी वाचकाला आणखी एक इशारा देऊन ठेवला आहे. आपल्या जीवनात आपला सतत विकास होत चालला आहे, असा त्यांना दृढ विश्वास होता. ते म्हणतात–

"म्हणून कोणाला माझ्या दोन वचनांत विरोध भासल्यास त्याने, त्याचा माझ्या शहाणपणावर विश्वास असेल तर, एकाच विषयावरील त्या दोन वचना· पैकी मागाहूनचे वचन प्रमाण मानावे. "

म. गांधींनी ही आधुनिक वैज्ञानिक वृत्ती निर्भयपणाने आपल्या देशातील सामाजिक आणि आध्यात्मिक दोनही क्षेत्रांतल्या रूढ आचार-विचारांच्या आणि सिद्धांताच्या परीक्षणात दाखविली आहे. आपल्या समाजात कित्येक शतके स्वतंत्र विचारांचा लोप झालेला होता. स्वतंत्र विचारशक्ती व प्रयोगशक्ती नष्ट झाल्यामुळे साऱ्या समाज--जीवनाला बधिरता आणि जडता आली होती. भारतीय मनाला या जडतेतून सोडविण्याचे कार्य गेल्या शंभर वर्षांत अनेक थोर पुरुषांनी चालविले होते. त्या सर्वांच्या प्रयत्नांत गांधीजींच्या प्रयत्नांना फार मोठे स्थान द्यावे लागेल. गांधीजी आध्यात्मिक मूल्ये मानीत होते, हे खरे असले तरी त्यांनी आपला सर्व मूल्यविचार प्रयोगवादावर उभारला होता. भारतीय समाजाच्या पुनरुत्थानाच्या व्यापक कार्याला त्यांनी फार मोठा हातभार लावला आहे. विज्ञानयुगाने निर्माण केलेल्या सर्व नैतिक प्रश्नांचा त्यांच्या लेखनात सतत ऊहापोह केलेला आहे. 'अनासक्तियोगा'च्या प्रस्तावनेत गीतेचा अर्थ करताना 'गीतेच्या केवळ अक्षरांमधून निघणारा अर्थ आपल्या स्वतःच्या अनुभवाशी

विसंगत असल्यामुळे तो आपल्याला मान्य करता येत नाही, ' असे स्पष्ट उद्गार काढले आहेत. भौतिक युद्ध हे आजच्या काळात धर्म्य समजता येणार नाही. मानवजातीच्या विकासासाठी नवे मानवमन निर्माण करावे लागेल. त्यासाठी नव्या अध्यात्मसिद्धांतांचा स्वीकार करणे अपरिहार्य झाले आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले आहे. रवींद्रनाथ ठाकूर आणि अरविंद घोष यांच्याप्रमाणेच महात्मा गांधींनी भारतीय मूल्यविचारांना नवा आकार देण्याच्या कामात महनीय कामगिरी केली आहे.

गांधीजींनी ह्यातभर जीवनाच्या विविध क्षेत्रात सतत प्रयोग चालविले होते आणि त्या प्रयोगांच्या निमित्ताने त्या विषयावरील प्राचीन-अर्वाचीन सर्व लेखकांचे म्हणणे समजून घेण्यासाठी त्यांनी त्या विषयावरील महत्त्वाचे वाङ्मय स्वत: वारकाईने अभ्यासिले होते. तुरुंगवासात त्यांनी नाना विषयांचा अभ्यास केलेला आढळतो. १९२२ साली त्यांनी तुरुंगात असताना अभ्यासिलेल्या ग्रंथांची एक यादीच एके ठिकाणी दिली आहे. ती पाहिली असता त्यांचे ग्रंथाध्यायन किती विशाल असे, याची कल्पना येऊ शकेल. म. गांधींनी लिहिलेल्या संपूर्ण वाङ्मयाची अधिकृत आवृत्ती सध्या प्रसिद्ध होत आहे. तिचे मोठ्या आकाराचे पन्नास भाग होतील असा सध्याचा अंदाज आहे. या विशाल वाङ्मयातून विषयवारीने निवड करून गांधी स्मारक निधीच्या महाराष्ट्र शाखेने वीस ग्रंथांचा एक संच प्रकाशित केल्यामुळे महाराष्ट्राच्या तरुण पिढीची उत्तम सोय झालेली आहे. भारताच्या पुर्नघटनेच्या सध्याच्या काळात महाराष्ट्रातील तरुण पीढीने आपल्या बौद्धिक विकासासाठी आधुनिक विज्ञानाच्या अध्ययनाबरोबरच गांधीजींचे जीवनविषयक विचार समजून घेण्याचा अवश्य प्रयत्न करावा. कोणत्याही विशिष्ट संप्रदायाच्या आहारी न जाता महाराष्ट्रातील तरुणांनी आपले चित्त प्रयोगशील राहील आणि विश्वातील मानवतेच्या विकासाशी समरस होईल, असा प्रयत्न ठेवावा.

४६

# ग्रामोद्योगाचें भवितव्य

दीनदयाळ गुप्ता

गांधीजींनी रचनात्मक कार्यक्रमामध्ये ग्रामोद्योगाला महत्त्वाचे स्थान दिले होते. केवळ आर्थिक दृष्टीने त्याकडे न पाहता व्यक्ति-स्वातंत्र्य व नीतिमत्ता यांच्या दृष्टीने त्यांचा विचार केला पाहिजे. असे पुढील लेखात प्रतिपादिले आहे.

ज्या काळात म. गांधींचा जन्म झाला व त्यांना जीवन जगावे लागले, त्या काळाची जी सर्वात कठीण ' समस्या ' आकारास येऊ लागली होती, ती होती सामान्य माणसाच्या जीवनाची. समाजात काहीही असले तरी साधारणतः दोन वर्ग नेहमीच निर्माण होतात व असतात. समाज म्हटला की तो संघटित समूह— आणि संघटित म्हणून त्यात नियंत्रक व नियंत्रित असे दोन वर्ग आपाततः निर्माण होतात. या दोन वर्गांचा परस्पर संघर्ष न कळत चालत असतोच. हेही तितकेच अटळ सत्य आहे की, समाजाच्या मूलभूत सुरळीत व ईप्सित अशा जीवनासाठी हे दोन वर्ग अपरिहार्यही असतात व त्यांचे परस्परसहकार्य अनिवार्य असते. या सहकार्याच्या वाढत्या प्रगत रूपाने त्या दोन वर्गांतील भेद जितके कमी करता येतील, तितके प्रयत्न माणूस करीत असतो. ज्या दिवशी तो भेद पूर्ण नष्ट होईल तो दिवस केव्हा उगवेल हे सांगणे कठीण. या वर्गांत सामान्य माणूस हा नियंत्रित वर्गात जातो व नियंत्रक वर्गात शेवटी मूठभर लोकच राहतात. नियंत्रक वर्ग स्वतःला समाजाचे मूर्त प्रतीक मानतो व नियंत्रितांमध्ये ' व्यक्ती ' म्हणून यशस्वी जीवन जगण्याची धडपड सुरू होते.

समाजजीवनाची प्रगती ही जशी संघटित समाजाच्या प्रयत्नाने साधते, तशीच ती व्यक्तीच्या पराक्रमानेही आकार घेते. किंबहुना संघटित समाजाच्या प्रगतीचा वेग नेहमी धीमा व मंद असतो. व्यक्तीच्या जीवनातील विविध ज्ञात-अज्ञात शक्तींमुळे निर्माण होणारी प्रेरणा समाजाला धक्का देत असते. असे धक्के देताना व्यक्ती बंड-खोरी करते व आपल्या पराक्रमाने समाजाला वळणही लावते. ही व्यक्तिप्रेरणा मूळ होऊन तिचा वृक्ष फोफावला की समाज त्याच्या छायेत प्रगतीची पावले टाकतो, तरी, त्याच्या प्रगतीचे स्थायित्व धीमेच असते. अशा तऱ्हेने व्यक्ति-प्रेरणा ही समाजाच्या प्रगतीचे मूल स्तोत असल्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याची नितांत आवश्यकता असते. हे व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित कसे राहील याकडे विचारकांचे मन केंद्रित होत असते. त्यात बाधा आली की विचारशील मन बेचैन होते.

समाजाच्या इतिहासकालीन जीवनात समाज कितीही संघटित झाला आणि त्याच्या नियंत्रक वर्गाने कसाही जुलूम केला, तरी व्यक्तिस्वातंत्र्याचा वाव पूर्ण नष्ट-प्राय कधीही होऊ शकला नव्हता. याला कारण होते परस्पर-संघर्षाच्या साधनांचा व शस्त्रांचा मर्यादितपणा, आणि व्यक्तीचे जीवन व जीविका-स्वातंत्र्य.ही कारणे विद्यमान होती म्हणून रोमन साम्राज्यात गुलामही बंड करू शकले व राक्षसांच्या साम्राज्यांची-मुळे कित्येक वेळा खणता आली. अशा संघर्षांनी इतिहास भरलेला आहे.

पण जो जो औद्योगिक व वैज्ञानिक क्रांती होऊन समाजाची प्रगती एका विशिष्ट दिशेने होऊ लागली, तो तो व्यक्तिस्वातंत्र्याला वाव मिळेनासा झाला. सामान्य माणसाचे जीवन व जीविका ही परावलंबी, परतंत्र होऊ लागली, आणि संघर्षाची साधने आपल्या किचकट प्रखरतेमुळे संघटित समाजाच्या—म्हणजेच नियंत्रक वर्गाच्या—हातात केंद्रित होत गेल्यामुळे सामान्य माणसाची हतबलता अधिकाधिक वाढू लागली. परिणामतः, सामान्य माणूस किंवा व्यक्ती ही समाजपुरुषाच्या शरीरावरील केसां-सारखी होत जाऊन समाज-पुरुषाने या केसांना कुठेही, केव्हाही, कसेही कापावे—स्वतःच्या आकांक्षांसाठी केसांना उजर करता येणे शक्यच राहिले नाही. संघटित समाजाच्या नियंत्रकांनी जगात व्यापार, धंदे,कारखाने, प्रादेशिक व वैचारिक साम्राज्ये स्थापिली, जोपासली, वाढविली आणि त्यांच्या रक्षण– विकासासाठी, महायुद्धे, जुलूम, अत्याचारही घडवून आणले. यात सामान्य माणसाचे सतत बलिदान होत गेले, नव्हे, त्या बलिदानानेच समाजाच्या, दिसते त्या प्रगतीची, दृश्ये निर्माण झाली. पण संघटित समाजाच्या नियंत्रक वर्गासमोर मात्र नियंत्रित वर्गातला सामान्य माणूस सतत अधिका-धिक हतबल होत गेला. या हतबलतेला देशाच्या, रंगाच्या किंवा कशाच्याही संरक्षणाचे कवच आवरू शकले नाही.

सामान्य माणसाच्या ह्या सतत वर्धमान हतबलतेच्या काळात महात्मा गांधींचा जन्म झाला व त्यांना आपले जीवन जगावे लागले. या हतबलतेत शेवटी सामान्य

माणसाच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा लोप होईल व समाजाच्या विकासाला–त्याच्या रूढिप्रियतेला बंडखोरीचे धक्के देऊन पुढे रेटणाऱ्या व्यक्तीच्या आत्मप्रेरणेला वाव राहणार नाही, अशी दृश्ये दिसायला लागली. अशा स्थितीत केवळ भारताने नव्हे तर साऱ्या मानवजातीने विचार करावा अशा परिस्थितीकडे महात्मा गांधींचे लक्ष वेधले. त्यांच्या साऱ्या विचारसरणीचे, आचार-सरणीचे मूळ या सामान्य माणसाची हतबलता दूर करण्याच्या प्रयत्नात कोणालाही आढळून येईल. देशाचे स्वातंत्र्य, भारतीयांवरचा आफ्रिकेतील जुलूम, आदी प्रश्न हे प्रासंगिक पण अध्यात्मातील एकात्मतेतून असो की कशातूनही असो–समाजदृष्टीने मात्र महात्मा गांधींची सारी विचारप्रेरणा या सामान्य माणसाच्या प्रश्नातून निर्माण झाली असे वाटू लागते. म्हणून कधी कधी महात्मा गांधींच्या विचारप्रणालीला 'गांधीवाद' वा कोणताही वाद म्हणता आला नाही, तरी तो 'सामान्यमाणूसवाद' होता असे, निश्चित वाटायला लागत.

या प्रश्नाच्या मुळाशी गेले की असेही सहज ध्यानात येऊ लागते की, औद्योगिक, वैज्ञानिक व शासकीय प्रगती कितीही झाली व त्यामुळे सामान्य माणूस पूर्ण परतंत्र व हतबल होत असला, तरी शेवटी समाजाच्या या संघटित जीवनाला त्याच सामान्य माणसाचे सहकार्य अत्यंत अपरिहार्य असते. त्याशिवाय नियंत्रक वर्गाचे सारे सामर्थ्य लंगडे पडते. सामान्य माणसाच्या या अपरिहार्यतेमध्ये शेवटी त्याच्या साऱ्या स्वातंत्र्याची आशा माणसाला गवसू शकते.

संघर्ष-साधनांमध्ये सामान्य माणसाची हतबलता, जीवनांतील व जीविकेमधली त्याची परवशता, आणि तरी समाजजीवनातील त्याच्या सहकार्याची अपरिहार्यता या तिन्हींचा साकल्याने विचार केला की, व्यक्तिस्वातंत्र्यासाठी व त्यावरच अधिष्ठित माणसाच्या आध्यात्मिक, राष्ट्रीय व आर्थिक स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधींच्या विशिष्ट विचारप्रणालीची सार्थकता विचारवंताला पटू लागते.

व्यक्तिस्वातंत्र्याबद्दल तशी उघडपणे उपेक्षा कोणीच दाखवीत नाही. समाजरचना भांडवलशाही असो की साम्यवादी असो, सर्वांनाच व्यक्तिस्वातंत्र्य हवे असते. ते आहे व असावे अशाच घोषणा सारे करतात. परंतु आजवरचा एकूण समाजेतिहास पाहिला की, स्पष्ट आढळून येते की, हे उद्घोषित व्यक्तिस्वातंत्र्य एक उपेक्षित मरणाचे तरी किंवा यंत्रातील निर्जीव खिळ्याचे असते. जीवन–जीविकेच्या पूर्ण परवशतेत व संघर्षाच्या साधनांच्या अभावात वास्तविक व्यक्तिस्वातंत्र्य संभवनीयच राहत नाही. त्यासाठी जरी औद्योगिक वा वैज्ञानिक प्रगतीच्या मागे माणसाला वा समाजाला कधीच जाता येणार नसले, तरी त्याला जीविकेची अतीव परवशता व संघर्षसाधनांचा अभाव त्यांना दूर केल्याशिवाय, समाजाला प्रगतीसाठी धक्के देण्याची प्रेरणा देणारे बलशाली व्यक्तिस्वातंत्र्य हे एक स्वप्नच ठरल्याशिवाय राहणार नाही.

या पार्श्वभूमीत महात्मा गांधींनी समग्र समाजजीवनाचा विचार केला असावा.

सामान्य माणसाला संघर्षाची नवीन साधने त्यांनी दिली. संघटित समाजनियंत्रकाजवळ विज्ञानाने पुरविलेली साधने अचाट व अफाट, त्यांच्या तुलनेत सामान्य माणसाला साधने द्यायची होती. सामान्य माणूस हाही माणूस व तो समाजाचा खरा, मूलभूत आणि महत्त्वपूर्ण घटक. कितीही साधन-रहित तो झाला तरी त्याची माणुसकी, आत्मिक शक्ती, निर्धारशक्ती किंवा बलिदानशक्ती ही कोणीही हिरावून घेत नाही. किती तरी कठीण प्रसंगांत या शक्तीची चुणूक व्यक्तींनी दाखविली आहे व इतिहासाने त्याची नोंद अगणित वेळा घेतलीही आहे. तरी ती व्यक्तिगत होती, ती संघटित व सामाजिक झाली तर तिच्यातून अचाट सामर्थ्य प्रसृत होऊ शकते, असा महात्मा गांधींचा आत्मप्रत्यय. त्यामुळेच महात्मा गांधींनी अन्यायाशी होणाऱ्या संघर्षात सामान्य माणसाच्या स्वाधीनची आणि निसर्गदत्त साधने परजवायला लावली. इतकेच नव्हे तर तिच्या यशस्वितेचा अनुभव जगाच्या विचारकांच्या डोळ्यांत भरविला. या साधनांमध्ये अन्यायाशी असहकार, स्वयंसंघटन, स्वावलंबन, सत्याग्रह आणि मान तुकविण्याऐवजी हौतात्म्य या पंचशस्त्रांना प्राधान्य त्यांनी दिले. या पाचही शस्त्रांच्या सर्व अंगोपांगांची चर्चा त्यांनी सतत केली आहे. शेवटली दोन साधने प्रतिकाराची-किंवहुना लढाऊ-असली तरी प्रथमची तीन साधने विधायक व जीवन-जीविका यांच्या स्वतंत्रतेची व सुरक्षिततेची आहेत. सामान्य माणसाला संघटित समाजाच्या—आधुनिक विज्ञानाने सज्ज असलेल्या नियंत्रक वर्गाच्या-अन्यायाचा प्रतिकार करायचा असेल तरी, सत्याग्रह, संघटन व बलिदान या साधनांनीच करणे इष्ट व योग्य होईल, किंवहुना या साधनांसमोर नियंत्रकाजवळील वरीच अफाट साधने बेकार व अनुपयोगी ठरतील, आणि नियंत्रित वर्गाच्या सहकार्याशिवाय नियंत्रक वर्ग समाजजीवन चालवूच शकत नसल्यामुळे सत्याधिष्ठित, नियंत्रित पण संघटित सामान्य माणसाच्या समूहासमोर शेवटी नियंत्रक वर्ग झुकेलच— आणि तेही कटुता, सूडवृत्ती निर्माण न होता, असा त्यांचा आत्मविश्वास होता. शिवाय येथे झुकण्याचा, जिंकण्याचा किंवा हरण्याचा प्रश्नच येत नाही, तर द्वेषमुक्त बलिदानानें दोन्ही वर्ग न्यायांतर्गत जवळच येतात व संघर्षाला जन्म देणारा भेद उतरणीला लागतो.

पण ही दोन्ही शस्त्रे सामान्य माणसाला वापरावयालासुद्धां काही प्राथमिक परिस्थितीची अपरिहार्य गरज असते आणि ती पूर्ण करण्याचे कार्य प्रथमच्या तीन साधनांनी करावयाचे असते. या साधनांच्या पूर्ततेसाठी सामान्य माणसाच्या जीवनात 'ग्रामोद्योगा'ला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते.

ग्रामोद्योगाकडे केवळ उद्योग, आर्थिक दृष्टी, व्यापारधंदा या वृत्तीने न पाहता, सामान्य माणसाचे यथाशक्य जीवन-स्वातंत्र्य या दृष्टीने पाहायला पाहिजे. समाजाचे लहानमोठे वेगळे घटक आपाततः निर्माण होतील. वैज्ञानिक प्रगतीमुळे अखिल मानवजात निकट—निकटतर येत चालली असली, आणि मोठमोठ्या नगरांची झपाट्याने

वाढ होत असली, तरी जोवर जमीन, कृषी यांच्याशी माणसाचे जीवन निगडित आहे, तोवर खेड्यांचें अस्तित्वही राहणार आहेच. त्याचा परिणाम म्हणून 'ग्राम' हा समाजाच्या संघटित जीवनाचा लघुतम घटकही राहणारच. जेवढा घटक लहान, तेवढी त्याच्यातील व्यक्तींची परस्पर-आत्मीयता आणि प्रत्यक्ष परस्पर-संबंध अधिक असा जो अनुभव, तोही स्वाभाविकच. म्हणून माणसाच्या जीवनाच्या आत्यंतिक ज्या दोनचार गरजा, त्या बाबतीत या लघुतम घटकांना स्वावलंबी, स्वयंसंघटित व स्वयंशासित करणे फारसे कठीण नाही, त्यासाठी विज्ञानाचे पाहिजे ते साह्यही घेता येईल. पण मूळ मुद्दा—सामान्य माणसाच्या नितांत जीविकेचे स्वावलंबित्व याकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यासाठी स्थानिक कच्चा माल, स्थानिक प्रक्रिया, स्थानिक यंत्र, स्थानिक गरजा, स्थानिक माणसे, आणि स्थानिक वस्तूचा-उपयोग यांची योग्य सांगड बांधता आली पाहिजे. इतर अन्य जीवनावश्यकतांच्या बाबींत वैज्ञानिक प्रगतीचा आणि संघटनसाधनांचा भरपूर उपयोग करून समाजाला सुखवैभवाच्या किंवा युयुत्सुतेच्या शिखरावर बसविता येईल, पण जीवनाच्या नितांत गरजांच्या बाबतीत मात्र तो स्वावलंबी व स्वायत्त रहावा, म्हणून महात्मा गांधींच्या 'ग्रामोद्योगा'ला एक आगळे महत्त्व येते.

देशातील वाढती पूर्ण – अर्ध बेकारी, अफाट पसरलेल्या नैसर्गिक संपत्तीचा पूर्ण सोपा उपयोग, उद्योगांचे विकेंद्रीकरण, खेड्यांत निसर्गाच्या सान्निध्यात, खुल्या हवेत व मोकळ्या वातावरणात उत्पादनकार्य, कृषीला उपयोगी कामे इत्यादी दृष्टीने ग्रामोद्योगांकडे बघता येईल. त्या दृष्टीने त्यांच्याबद्दल भरपूर चर्चा, समर्थन आणि विरोधही भरपूर केले जातात, ते योग्यही असेल. पण ग्रामोद्योगाकडे पहायची– एक आगळी– अखिल मानवसमाज या दृष्टीने पहायची– वृत्ती महात्मा गांधींच्या ग्रामोद्योग-पुनर्जीवनाच्या चळवळीची होती, हेही विचारवंतांनी ध्यानात घ्यायला पाहिजे.

औद्योगिक व वैज्ञानिक क्रांतीच्या काळात ग्रामोद्योग म्हणजे मागासलेपणा असा विपर्यस्त अर्थ कित्येक वेळा काढण्यात येतो. पण माणसाच्या जीवनात कितीही सुखसोयी निर्माण झाल्या तरी, त्याच्या हातपाय–आदी अवयवांच्या हालचालीवरच नियंत्रण घालून, त्याचे संपूर्ण जीवन यंत्रचलित करून टाकले तर त्याचे मानव-दैहिक जीवनच हळूहळू संपुष्टात येईल. तसेच जीवनाच्या अपरिहार्य व निकडीच्या गरजांच्या बाबतीत आत्मीयतेच्या संबंधापलीकडील अतीव परवशता आणली, तर त्याच्या साध्या व्यक्ति-स्वातंत्र्याच्या मुळावरच घाला पडतो व त्यामुळे स्वातंत्र्य-जीवनातून समाज रूढिग्रस्ततेच्या पलीकडे जाऊन, प्रगतीच्या नवीन वाटा हुडकण्याची त्याची आत्म-प्रेरणाच नष्ट होण्याचा संभव असतो, हे विसरता येत नाही.

महात्मा गांधींच्या ग्रामोद्योग–अभियानाकडे पहायची आणखी एक दृष्टी आहे.

माणसाच्या जीवनाच्या अन्न, वस्त्र, जल, निवारा या जशा प्राथमिक गरजा, तशीच एक आणखी तितकीच निकडीची गरज आहे. तिच्याकडे दुर्लक्ष झाले तर पहिल्या गरजांकडील दुर्लक्षामुळे जसा तो देहाने नष्ट होईल, तसा या गरजेकडील दुर्लक्षामुळे तो मनाने नष्ट व विकृत होईल. ती गरज आहे, त्याला आवश्यक व योग्य शारीरिक कामाची. दिवसेंदिवस वैज्ञानिक प्रगतीमुळे वेळेची वचत सर्वच परीने खूप होते व होणार आहे. फुरसतीचा वेळ वाढणार आहे. या फुरसतीच्या वेळेच्या विनियोगावर माणसाच्या संस्कृतीची इमारत उभी होती–रहाणार आहे. आज फुरसतीच्या वेळेचा विनियोग मूठभर लोक इतर बौद्धिक, आत्मिक, कलात्मक विकासासाठी करीत असतील, पण वहुसंख्य सामान्य माणसाचे काय ? पश्चिमेत ड्रिंक, डान्स अ‍ॅण्ड ड्रेस–नृत्य–नशा–नखऱ्यामध्ये हा विनियोग करण्याचा झुकाव वाढत आहे. तो माणसाच्या एकूण संस्कृतीच्या दृष्टीनें उपयोगी व इष्ट ठरेल काय ? यात मानवाची मानवावद्दलची वर्धमान आत्मीयता, परस्परांचे शोषणरहित संबंध विकसित होत राहतील की माणूस वाटेल ते मूल्य देऊन आत्मतुष्ट भोगलालसेत लीन होत जाईल, याचा विचार व्हायला पाहिजे. हा विचार केला तर कामातून मनोरंजन, परिश्रमातून संजीवन व उत्पादनातून आनंद व सुख–या महात्मा गांधीप्रणीत विचारधारेवद्दल अधिक मनन करावेसे वाटूं लागते. ही विचारधारा अंमलात आणायची म्हटली म्हणजे एकूण मानवी जीवनातील ही जीवनावश्यकता भागविणाऱ्या उत्पादक ग्रामोद्योगांचे अनन्य महत्त्व पटू लागते.

उत्पादक श्रम हे प्रत्येकाने करायला पाहिजेत. सर्वांनाच ते देणे कठिण असेल. वऱ्याच लोकांना इतर परिश्रमांत गुंतणे अपरिहार्य असणे स्वाभाविक आहे, तरी मानवी जीवनात उत्पादक श्रमांना प्रतिष्ठा मिळावी म्हणून, कमीत कमी प्रतीकात्मक रीतीने का होईना, प्रत्येकाने त्याला आपल्या जीविकेत नसले तरी जीवनात स्थान द्यायला पाहिजे. कमीत कमी अशा परिश्रमांतून निर्मित वस्तूंचा कटाक्षाने उपयोग करून तरी या परिश्रमांची प्रतिष्ठा जोपासली पाहिजे. या दृष्टीने सर्वांनी कातणे, ग्रामोद्योगी वस्तूंचा उपयोग करणे, यांना महात्मा गांधींच्या ग्रामोद्योग–अभियानात महत्त्व प्राप्त झाले होते.

समाजरचना जसजशी क्लिष्ट, संघटित, नियंत्रकप्रधान व केंद्रित होते, तसतसे व्यक्तिगत जीवनातील सारेच स्वातंत्र्य अंतर्धान पावू लागते आणि सामान्य माणूस सर्वांगांनी पूर्ण परवश होऊन, त्याच्या जीवनाची सारी सूत्रे न कळत, त्याच्यापासून दूर, असंबंधी व इतरत्र केंद्रित शक्तीच्या स्वाधीन होऊ लागतात. इतकी परवशता आली की सामान्य माणूस नियंत्रक शक्तीच्या हातचे वाहुलेच वनतो, असे नव्हे तर, तिच्या मुठीत त्याचा संपूर्ण जीवच गुदमरून जातो. तो दुसऱ्यांचे शोषण करू शकणारा सैतानही वनत नाही, तर फक्त शोषित कळसूत्री हैवान वनतो आणि

अशा हैवानी जीवनात समाजाच्या विकासासाठी बंडखोरी पत्करूनही, आत्मप्रेरणेने नवीन आविष्कार घडविण्याचे त्याचे सामर्थ्य हळूहळू संपुष्टात येऊ लागते.

ग्रामोद्योग पूर्वी होते, ते समाजाच्या आर्थिक व औद्योगिक जीवनाचे एक अविभाज्य अंग होते, पण ते समाजाच्या अविकसित, वैज्ञानिक संशोधनाच्या अभावात अपरिहार्य म्हणून होते. आज त्या भूमिकेवर त्याचे पुनरुज्जीवन म्हणजे धावत्या काळाची थट्टा होईल. पण वदलत्या वैज्ञानिक युगात, काही वेगळ्या भूमिकेत विचार केला, तर महात्मा गांधींनी ग्रामोद्योगांना 'खादी' मध्यबिंदू कल्पून इतके अनन्य महत्त्व का दिले, हे सहज लक्षात येऊ शकेल.

केवळ आर्थिक लाभहानी, उद्योगाची मुनाफा मिळविण्याची पात्रता, मोठ्या यांत्रिक उद्योगांची स्पर्धाक्षमता, याच दृष्टीने ग्रामोद्योगाकडे पाहिले तर सारा विषयच विवादास्पद ठरून पारडे कोणीकडे झुकेल हे सांगणे कठीण. पण त्यामागची महात्मा गांधींची अखिलमानवव्यापी सामान्य माणसाच्या जीविका-सुरक्षितता व स्वतंत्रता-युक्त दृष्टी लक्षात घेतली तर ग्रामोद्योगांकडे वेगळ्या संदर्भातून पाहता येईल आणि त्यासाठी विचारशील माणसाला प्रयत्नशील होणे आवश्यक वाटू लागेल यात शंका नाही.

वर विशद केलेल्या भूमिकेतून आणि महात्मा गांधींच्या विचारसरणीतून ग्रामोद्योगाकडे पाहिले, तरच मानवी जीवनात त्याला काही भवितव्य राहू शकेल; अन्यथा त्याच्या भविष्यासंबंधी कोणत्याही प्रकारचा ऊहापोह अनाठायी ठरून पाण्यावरच्या रेघेसारखी सारी धडपड वाया जाईल.

४७

# गांधीजी व ग्रामोद्योग

सौ. सावित्रीबाई मदन

भारतातील बहुसंख्य ग्रामीण लोकांचा मुख्य धंदा शेती. तिला पूरक म्हणून गांधीजींनी ग्रामोद्योगांवर भर दिला. तसे करताना त्यांनी यंत्रशक्तीचे स्वागत किती मर्यादेपर्यंत केले, याचे विवेचन पुढील लेखात केलेले आहे आणि देशातील बेकारीला आळा घालण्याचे काम ग्रामोद्योगच करतील, असा विश्वास प्रगट केला आहे.

गांधीजी सर्वार्थाने आधुनिक भारतातील युगपुरुष होते. त्यांचे द्रष्टे नेतृत्व राजकीय आघाडीपुरते संकुचित नव्हते. भारतवासीयांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपल्या क्रांतिकारक, परंतु तितक्याच तर्कशुद्ध विचारसरणीने आणि सुयोग्य मार्गदर्शनाने कर्तृत्वाचा ठसा उमटविला. भारताच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करताना देशाच्या सात लक्ष खेड्यांतून राहणाऱ्या जनतेची चिंता राजकीय नेत्यांनी आणि अर्थशास्त्रज्ञांनी सतत वाहिली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. देशाच्या आर्थिक पुनर्रचनेचे स्वरूप समाजातल्या सर्वांत खालच्या थरातील लोकांनाही लाभदायक होईल असेच असले पाहिजे, असे ते मानीत असत.

**ग्रामीण भारताच्या समस्या**

आज भारतात ५२.२ कोटी लोकांपैकी शेकडा ८२– म्हणजे ४२.८ कोटी–लोक ग्रामीण विभागात राहतात. देशातील एकूण जमिनीपैकी शेकडा ४५ लागवडीखाली आहे. त्यातही कालव्याने पाणीपुरवठा शेकडा १९ एवढ्याच जमिनीस होतो. महाराष्ट्रात तर कालव्याच्या पाणीपुरवठ्याचे प्रमाण ह्याच्या तिसऱ्या हिश्श्यानेही नाही.

ह्याचाच अर्थ केवळ शेतीच्या विकासाने राष्ट्राच्या आर्थिक स्थितीत मोठी सुधारणा होऊ शकेल, असे मानण्यास जागा नाही. आज खेड्यांतून राहणाऱ्या लक्षावधी लोकांना शेतीमधून साऱ्या वर्षभर काम मिळू शकत नाही. एरवीही दिवसभर कष्ट करून जो रोजगार मिळतो त्यावरच नेहमी अर्धपोटी राहावे लागते. शेतकरी नेहमीच कर्जबाजारी असल्याने शेतीच्या उत्पन्नातील प्रमुख भाग सावकाराच्या घशात जातो. सारांश अज्ञान, आर्थिक पिळवणूक आणि पूरक उद्योगांचा अभाव या आजच्या ग्रामीण भारताच्या प्रमुख समस्या आहेत, हे गांधीजींनी हेरले होते.

भारताची परंपरागत अर्थव्यवस्था ग्रामीण विभागाच्या स्वयंपूर्णतेवर आधारलेली होती. खेड्यातील बारा बलुतेदारांचे व्यवसाय एका अर्थाने गावातल्या गावात पूरक उद्योग निर्माण करीत असत. त्यायोगे शेतकऱ्यांना त्यांच्या बेकारीच्या काळात रोजगार उपलब्ध होई. निसर्गसंपत्तीवर योग्य प्रक्रिया करण्याचे काम खेड्यातच चालत असल्याने एक नवी संपत्ती गावातल्या गावात निर्माण होई. शिवाय गावच्या बहुसंख्य गरजांच्या बाबतीत ते स्वयंपूर्ण होई. परकीय सत्तेच्या अमलात यांत्रिक सुधारणा होऊ लागली आणि मोठे उद्योगधंदे शहरातून सुरू झाले, तसतसे त्यांच्या स्पर्धेत आमचे ग्रामोद्योग टिकेनात. हळूहळू खेड्यांतील हे सर्व व्यवसाय बंद झाले. गावात आपली आणि कुटुंबाची गुजराण करणे अशक्य झाल्याने हजारो खेडूत शहरची वाट चालू लागले. कारखान्यातून त्यांना रोजगार मिळाला खरा; परंतु त्यामुळे ना त्यांची स्थिती सुधारली, ना त्यांच्या गावची. ग्रामीण भागात तर बहुसंख्य तरुण शहरांकडे गेल्याने शेतीकडे बघण्यासदेखील पुरेशी माणसे मिळेनात. परिणामी, शेतीमालाचे एकरी उत्पादन कमी होऊन वर्षातल्या चार-सहा महिन्यांपलिकडे त्यावर पोट भागेनासे झाले. ऊस —— द्राक्षासारख्या काही बागायती पिकांना जरा बरा भाव आल्याने काही प्रगत शेतकरी सधन दिसत असले, तरी त्यांचे प्रमाण अगदीच अत्यल्प आहे. शेतीसुधारणेसाठी उत्तम पीक देणारे बीबियाणे, पिकाच्या योग्य मशागतीसाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण, स्वस्त वीजपुरवठा आणि मुख्य म्हणजे वेळच्या वेळी पाणी मिळण्याची आवश्यकता असते. यांपैकी पाण्याचा प्रश्न फारच बिकट आहे. महाराष्ट्रात तरी या बाबतीत विशिष्ट मर्यादेपलीकडे प्रगती होणे शक्य नाही. याचाच अर्थ पूरक उद्योग निर्माण झाल्याखेरीज ग्रामीण विभागाची उन्नती होणे अशक्य आहे. भारतातील अतीव दारिद्र्याची कुळकथा ही अशी आहे.

आज तीन पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्यानंतरदेखील देशापुढील प्रमुख समस्या बेकारी-निवारणाची आहे. १९७६ अखेरदेखील देशात अठ्ठावीस दशलक्ष लोक बेकार असतील, असा आजचा अंदाज आहे. अर्धबेकारांचा त्यात समावेश होत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकासाचे धोरण ठरविताना कारखान्यांसाठी आवश्यक त्या मूलभूत वस्तूंचे (capital goods) उत्पादन मोठ्या

कारखान्यांद्वारा सार्वजनिक क्षेत्रात व्हावे आणि ग्राहकापयोगी वस्तूंचे (consumer goods) उत्पादन खासगी क्षेत्रात व्हावे, असे ठरविण्यात आले होते. ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनक्षेत्रात ग्रामोद्योग— विकासास विशेष वाव आहे. देशातील कोटचवधी लोकांना रोजगार पुरविण्यास मोठे उद्योगधंदे आणि कारखाने खासच समर्थ आहेत. कारण उत्पादनखर्च कमी करण्यासाठी वाढत्या प्रमाणात स्वयंचलित यंत्रांचा वापर करणे त्यांना आवश्यक झाले आहे. ग्रामोद्योगांच्या पुनरुज्जीवनाने बेकारीनिवारणीचा प्रश्न समाधानकारकपणे सुटू शकेल. कारण ग्रामोद्योगांचा भर मनुष्यवळाचा अधिकाधिक वापर करण्यावर असतो. अगदी अवश्य अशा ठिकाणी यंत्राचा वापर करावयाचा-आणि बाकी शक्य तेवढी कामे कामगारांकडून करून घ्यावयाची, असा दंडक ठेवल्याने कामगारांना जीवन-वेतन मिळते. गावातल्या गावात आणि तोही रिकाम्या वेळात रोजगार उपलब्ध झाल्याने ग्रामीण जनतेची, सर्वार्थाने निसर्गाने दिलेल्या संपत्तीचा उपभोग होऊन, नवी दौलत निर्माण होते.

खेडचातील खेडचात नवीन उद्योग निर्माण होण्यात आणखी एक महत्त्वाचा फायदा असा आहे की, हे उद्योग घरच्या घरी करण्यासारखे असतात. आणि सारे कुटुंब उत्पादनांत सहभागी होऊ शकते. त्यामुळे व्यवसायातील कसब कुटुंबातील सर्वांनाच आत्मसात् करता यते. कुटुंबातील नवी पिढी त्यात आपोआप तयार होते. स्त्रियांनाही घरकाम सांभाळून आवश्यक ती मदत देता येतो. कुटिर— उद्योग ( Cottage Industries ) अशी संज्ञा आहे. तीत थोडा वदल करून परिवार —उद्योग (Family Industries) असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

**उत्पादनाचा त्वरित फायदा**

ग्रामोद्योगांच्या पुनरुज्जीवनाचा आग्रह धरताना गांधीजींचा भर त्यामागच्या मानवतावादी दृष्टिकोनावर होता. औद्योगिक दृष्टचाही त्यांनी हे स्पष्ट केले होते की, पुन्हा सुरू करावयाचेच झाले, तर ज्यांना मोठ्या प्रमाणावर भांडवलाची आवश्यकता भासणार नाही, असे उद्योग सुरू करावे. भारतात गेल्या वीस वर्षांत पोलाद— कारखान्यांची यंत्रसामुग्री वगैरे निर्माण करणारे कारखाने उभारले— आणि हे आवश्यकही होते. ह्या मोठ्या कारखान्यांत कोटचवधी रुपयांचे भांडवल गुंतून राहिले आहे. पण अद्याप त्यांच्याद्वारा अपेक्षित नफा मिळालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. ग्रामोद्योगांसाठी इमारती, यंत्रसामुग्री, तंत्रज्ञयांची आवश्यकता फारच मर्यादित असते. यंत्रशक्तीचा वापरही जरूर तेथेच होत असल्याने विजेचा व इंधनाचा खर्च बेताचा. त्यामुळे मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता नसते. उत्पादन मात्र त्वरित होऊ शकते. म्हणजे भांडवल-उत्पादन हे गुणोत्तर ग्रामोद्योगात सर्वात मोठे असते. ग्रामीण उद्योगांच्या उभारणी-

नतर प्रत्यक्ष उत्पादन हाती येईपर्यंतचा काळ फारच थोडा असल्याने उत्पादनाचा फायदा मिळण्यास तिष्ठत राहावे लागत नाही. भारतासारख्या विकसनशील देशात ही महत्त्वाची गरज आहे.

समाजवाद हा आधुनिक जगात परवलीचा शब्द झाला आहे. देशातील संपत्तीची न्यायोचित वाटणी हा समाजवादाचा अर्थ आहे. गांधीजींना अभिप्रेत असलेल्या ग्रामोद्योगाधिष्ठित अर्थरचनेत संपत्तीच्या एकत्रीकरणास वावच नाही. म्हणूनच, संपत्ती निर्माण होत असताना तिचे योग्य वाटप आपोआप होत राहील आणि त्यामधून सर्वोदयात संकल्पित अशी नवी समाजरचना निर्माण होऊ शकेल.

## यंत्रविरोध नाही

ग्रामोद्योगाचा पुरस्कार करताना गांधीजींनी किती मूलगामी विचार केला होता, हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. ह्या विवेचनातील तर्कसंगती लक्षात न घेता काही पढिक अर्थतज्ज्ञ मात्र, ग्रामोद्योगांचा पुरस्कार करून गांधीजी देशात बैल गाडीवर आधारलेली अर्थव्यवस्था पुन्हा आणू पहात होते, असा दावा करतात. अर्थ-शास्त्राचा योग्य समज असलेल्या कोणाही व्यक्तीला भारतासारख्या देशात ग्रामोद्योगांची आवश्यकता सहज पटण्यासारखी आहे. विख्यात स्वीडिश अर्थशास्त्रज्ञ प्रा. गुन्नार मिरडाल यांनी गांधीजींच्या ग्रामोद्योग-विकासाच्या कार्यक्रमाचे आग्रह-पूर्वक समर्थन केले आहे. ते म्हणतात–" ग्रामोद्योगांशी स्पर्धा करणारे मोठे उद्योग-धंदे प्रस्थापित करण्याने लक्षावधी खेडुतांना काहीच कामधंदा उरणार नाही. त्यांच्या तोंडचा घासच काढून घेतल्यासारखे होईल. नियोजनाच्या दृष्टीने हे विसंगत ठरेल. आग्नेय आशियातील येत्या ४०।५० वर्षांत ज्यांना दैनंदिन रोजगार हवा आहे अशा कामगारांची संख्या वाढतच जाणार आहे. मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ होऊन त्यात एवढ्या मोठ्या संख्येने रोजगार उपलब्ध होणे आणखी पाच-पन्नास वर्षे शक्य दिसत नाही. यंत्रशक्तीचा वापर करून उभारल्या जाणाऱ्या कारखान्यांत प्रारंभी अधिक-मनुष्यबळ लागले, तरी परंपरागत उद्योगधंद्यातील कामगार कमी करावे लागल्यान होणारे नुकसान त्यायोगे भरून निघण्यासारखे नाही.'' मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध असलेल्या भारतासारख्या विकसनशील देशात, यंत्रावर चालणाऱ्या मोठ्या उद्योगधंद्यांऐवजी गांधीजी ग्रामोद्योगांचा पुरस्कार करीत, म्हणून ते यंत्रविरोधी होते असा एक गैरसमज हेतुपुरस्सर पसरविला जातो. वस्तुस्थिती फार वेगळी होती. गांधीजींनी यंत्रांची आवश्यकता ओळखली होती. मात्र यंत्रांबद्दल त्यांची अपेक्षा एवढीच होती की, त्यांनी कोणत्याही कामात सफाई आणावी, शारीरिक कष्ट कमी करावे आणि काम कंटाळवाणे होऊ नये. मुख्य म्हणजे यंत्र माणसाच्या सोयी-

साठी असावे. माणसाने यंत्राचे गुलाम होऊन चालणार नाही. ह्याच दृष्टीने त शिवणयंत्र आदर्श मानीत. ग्रामोद्योगाच्या मर्यादा लक्षात घेऊन वापरल्या जाणाऱ्या यंत्रात आवश्यक त्या सर्व सुधारणा व्हाव्यात म्हणून गांधीजींनी उत्तेजन दिले. चरख्यात सुधारणा करण्यासाठी त्यांनी एक लक्ष रुपयांचे पारितोषिक जाहीर केले होते. ग्रामोद्योगात वापरल्या जाणाऱ्या अनेकविध अवजारांत त्यांच्या देखरेखीखाली वर्ध्याला सुधारणा झाल्या.

ग्रामोद्योगांच्या विकासासाठी स्वतंत्र अखिल भारतीय संस्था स्थापन करण्याची प्रेरणा गांधीजींनी दिली.

**ग्रामीण स्वावलंबनावर भर**

ग्रामोद्योगांच्या पुरस्कारामागे गांधीजींची दृष्टी ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संतुलनाची आणि स्वावलंबनाची होती. अन्न-- वस्त्रांसारख्या किमान मूलभूत गरजांच्या बाबतीत तरी ग्रामीण जनतेने स्वावलंबी व्हावे, असा त्यांचा कटाक्ष होता. म्हणूनच तेलघाणे, चर्मोद्योग, कुंभारी वगैरे परंपरागत उद्योग आणि हातकागद, नीरा, ताडगूळ वगैरे ग्रामोद्योग सुरू करण्यास त्यांनी स्फूर्ती दिली. ग्रामोद्योगांचा विकास होत जाईल तसतसे नवे नवे उद्योगही समाविष्ट होऊं शकतील

सारांश, देशांतील वाढत्या बेकारीला आळा घालण्याची आणि जास्तीत जास्त लोकांना रोजगार देण्याची क्षमता ग्रामोद्योगातच आहे. अगदी अल्प भांडवलाच्या साह्याने त्यांची त्वरित उभारणी करता येते. त्यांना अवजड यंत्रसामुग्री लागत नाही देशातल्या उपलब्ध तंत्रज्ञानाच्या साह्याने त्यांचा विकास सहजसाध्य आहे. मोठ्या उद्योगधंद्यांप्रमाणे देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांचा फायदा मिळण्यासाठी अधिक काळ लागत नाही व म्हणून दरम्यानच्या काळात महागाई वाढण्याचा धोका नसतो. मुख्य म्हणजे, ग्रामोद्योगांच्या विकासाने संपत्तीचे केंद्रीकरण होण्याचा आणि त्यामुळे येणारी सुबत्ता विशिष्ट क्षेत्रात आणि विशिष्ट व्यक्तींपुरतीच मर्यादित राहण्याचा धोका राहात नाही. कधी काळी शेतीचे उत्पन्न वाढले, उद्योगधंद्यांचा सर्वांगीण विकास होऊन त्यात सर्वांना काम मिळू लागले आणि भारताची बेसुमार लोकसंख्या रोखण्यास आपण यशस्वी झालो, तर त्यानंतर ग्रामोद्योगांवर अवलंबून राहण्याचे कारण पडणार नाही. मात्र सध्या तरी ग्रामोद्योगांच्या विकासाशिवाय तरणोपाय नाही. जागतिक ख्यातीच्या अर्थतंत्रज्ञांनाही आता मान्य झालेला हा विचार गांधीजींना तीस वर्षांपूर्वी सुचला, हेच त्यांचे द्रष्टेपण होय.

४८

# गांधीजींची आरोग्य विषयक दृष्टि

डॉ. रा. वि. साठ्ये

गांधीजींनी जसे सत्याचे व ईश्वरप्राप्तीचे प्रयोग जन्मभर केले, तसेच आहार व आरोग्य यांचेही केले. त्यांचे महत्त्व आधुनिक वैद्यक-शास्त्राच्या दृष्टीने किती आहे, याचें त्या क्षेत्रातील अधिकारी व्यक्तीने केलेले विवेचन पुढील लेखात वाचावयास मिळते.

महात्माजींचे कार्य एवढे मोठे की, त्यांस ' हिंदी राष्ट्राचे जनक ' मानतात व म्हणून ' राष्ट्रपिता ' म्हणतात. त्यास साजेसे असेच असामान्य त्यांचे समग्र जीवन होते. साहजिकच त्यांचा जन्म, त्यांचे कुटुंबीय जीवन, शालेय व पुढील शिक्षण; वैयक्तिक, सामाजिक, राजकीय व राष्ट्रीय कामगिरी इत्यादी त्यांच्या जीवनातील विविध पैलूंवर अनेक सन्मान्य व्यक्तींचे लेख येतीलच. तेव्हा वैद्यकशास्त्राच्या अभ्यासात व वैद्यकीय व्यवसायात आपण आयुष्य घालविले म्हणून, आपण महात्माजींचा आरोग्य-विषयक दृष्टिकोन व त्या क्षेत्रातील त्यांचे कार्य या परीक्षण करावे, असे ठरवून मी पुढील टिपणे लिहीत आहे.

महात्माजींचा प्रत्यक्ष संबंध येण्याचे भाग्य मला लाभले नाही. पण त्या वेळच्या

विद्यार्थीवर्गातील आम्ही सर्व त्यांच्या कार्याने मंत्रमुग्ध होत असू. सन १९१८–पासून पुढे आमच्या शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात खादी, चरखा, स्वदेशी, सत्याग्रह, उपवास इत्यादींच्या वार्ता वेळोवेळी येत व त्याविषयी विद्यार्थीवर्गात चर्चा होत असे. बौद्धिक व राष्ट्रीय दृष्टिकोनातून या कार्याविषयी अत्यंत आकर्षण वाटे. तरुण मनावर या घटनांचा सखोल परिणाम होत असे. या काळात अनेकांनी शाळा-महाविद्यालये सोडून राष्ट्रीय शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळवून शिक्षण घेतले. अनेकांवर सरकारी व निमसरकारी शिक्षणसंस्थांच्या अधिकारी – वर्गाने वडगा फिरविल्यामुळे त्यांना आपल्या शिक्षणास मुकावे लागले, असा तो काळ होता. त्या वेळच्या वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून महात्माजींचे सत्याचे प्रयोग, भाषणे, लिखाणे इत्यादीविषयी माहिती प्रतिदिनी आम्ही उत्सुकतेने वाचीत असू. त्यांच्या विविध क्षेत्रांतील कार्याविषयी एवढी जिज्ञासा तरुण पिढीला, विशेषत: विद्यार्थीवर्गाला, असे. या विषयावरील त्यांच्या कांही लेखनाचा पुन: अभ्यास करून, आरोग्यशास्त्र व त्यातील काही विषयांवरील महात्माजींचा दृष्टिकोन व कार्य यांचे समालोचन करण्याचा हा प्रयत्न आहे.

महात्माजींनी आरोग्यसंवर्धनाच्या दृष्टीने आहार, विहार, व्यायाम, ब्रह्मचर्य निसर्गोपचार इत्यादींसंबंधी अनेक प्रयोग केले. पण त्यांवद्दल लिहिण्यापूर्वी त्यावद्दलची पार्श्वभूमी म्हणून त्यांच्या जीवनातील काही घटनांचा विचार करणे जरूर आहे.

त्यांतील पहिली गोष्ट म्हणजे त्यांच्यावर झालेले वैष्णवपंथाचे संस्कार. त्यांच्या कुटुंबातील अनेक पिढ्यांवर या पंथाचे संस्कार होते. त्यांचा पगडा महात्माजींच्या, मनावर जवर होता. ‘ वैष्णव जन तो तेने कहिये जो पीड परायी जाने रे ’ या भजनाचे ते चहाते होते व त्याप्रमाणे नित्याच्या जीवनात ते एक अत्युच्च वैष्णव होते. त्यामुळेच व्याधिग्रस्तांविषयी त्यांच्या मनात अत्यंत सहानुभूती सदैव जागत असे. कुष्ठरोग्यांचे हाल पाहून त्यांचे मन द्रवत असे. समाजाकडून या रोग्यांची होणारी उपेक्षा त्यांना अस्वस्थ करी. म्हणूनच त्यांनी या रोग्यांची शुश्रूषा स्वत: करणे सुरू केले. त्यांचे उदाहरण पुढे ठेवून कुष्ठरोग्यांच्या उपचाराकरिता अनेक संस्था आज निष्ठेने कार्य करीत आहेत.

पुढील आयुष्यात त्यांनी पाळलेल्या अहिंसाव्रताचा उगमही याच संस्कारांपासून असला पाहिजे. अहिंसेचा इतका खोल पगडा त्यांच्या मनावर होता की, शास्त्रीय संशोधनाकरिताही प्राण्यांची चिरफाड करावी लागणाऱ्या प्रयोगांस त्यांचा विरोध

असे. एका प्राण्याच्या जिवावर असे प्रयोग करून मनुष्याचा जीव वाचविण्यास मदत करणे, ही कल्पनाही त्यांना अभिप्रेत नव्हती.

दुसरी गोष्ट म्हणजे त्यांची निसर्गाच्या नियमांवरची श्रद्धा. ते स्वत: निसर्गाचे नियम कसोशीने पाळीत. यापासूनच त्यांच्या निसर्गोपचाराविषयीच्या प्रयोगाचा उगम झाला असावा. या प्रयोगाविषयी पुढे लिहिलेच आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे त्यांची शास्त्रीय व संशोधक वृत्ती. कोणत्याही विषयाचा ते सखोल अभ्यास करीत, पुस्तके वाचीत, त्या विषयांतील तज्ज्ञांशी चर्चा करीत व या मंथनातून पुढे प्रयोगाचे तंत्र शोधीत. म्हणून याविषयी त्यांनी घेतलेले निर्णय बहुश: अचूक असत.

या शास्त्रीय दृष्टींस आणखी नैतिक व आध्यात्मिक विचारांची जोड असे. त्यामुळे त्यांचे निर्णय शास्त्रसंमत असून मानवतेस अनुकूल असत. आहार, विहार व आचार यांच्या शुद्धतेचे बळ त्यांस येत असे. त्यामुळे समाजधारणेस इष्ट असेच त्यांचे परिणाम असत.

याशिवाय राष्ट्रीय दृष्टी व व्यवहारानुकूलता यांवरही त्यांचा भर असे. कोणत्याही विषयांत साधेपणा असावा, शुद्धपणा असावा, पण बाह्य छानछोकी नको; इष्ट त्या गोष्टी असाव्या, पण विनाकारण खर्चाचे अवडंबर नको. श्रीमंतापासून गरिबापर्यंत, शहरवासियांपासून खेड्यांतील शेतकऱ्यांपर्यंत समाजातील प्रत्येक घटकास उपलब्ध होतील अशाच गोष्टीकडे त्यांची धाव असे.

अशा मनोवृत्तीने त्यांनी सत्यशोधनाचे प्रयोग (Experiments with truth) केले, हे लक्षात घेतल्यास त्या प्रयोगांच्या महत्त्वाची कल्पना करणे शक्य होते. या विषयावर त्यांनी अनेक लेख नवजीवन, यंग इंडिया, हरिजन इत्यादी वृत्तपत्रांतून व आपल्या पुस्तकांतून वेळोवेळी प्रसिद्ध केले. त्यांचे परिशीलन करता, भविष्यातील मानवास उपयोगी अशा अत्युच्च वाङ्मयाचा ठेवा त्यांनी आपणास दिला आहे, असेच म्हणावे लागेल.

त्यांच्या वैचारिक पार्श्वभूमीविषयी एवढे सांगून या क्षेत्रातील त्यांच्या कार्याविषयी खालील गोष्टी नमूद करीत आहे.

महात्माजींची प्रकृती लहानपणापासून केव्हाच सुदृढ नव्हती. त्या वेळच्या त्यांच्या समवयस्क मित्रांनी, मांसाहार घेतल्यास प्रकृती सुधारते व शरीर सतेज व कार्यक्षम होण्यास मदत होते, असे वारंवार बिंबविल्यामुळे दोन-तीन वेळा मांसाहार

करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यांच्या संस्कारयुक्त मनाला त्यामुळे अस्वस्थता वाटू लागल्यामुळे त्यांनी मांसाहार कायमचाच सोडला.

मानवी शरीराची रचना, त्याचे दात व पचनेंद्रिये यांच्या निरीक्षणावरून, मनुष्य हा निसर्गत: शाकाहारी प्राणी असावा, असे शास्त्रीय मत महात्माजींना अभिप्रेत होते. म्हणून शाकाहाराविषयी त्यांनी शास्त्रीय दृष्टीने पुष्कळ विचार केला. शाकाहारात वन्य पशु-पक्ष्यांचे मांस व मासे हे तर नव्हतेच पण अंडेही त्यांना मान्य नव्हते. नरमादीच्या संयोगाशिवाय उत्पन्न झालेले ‘ बीजरहित ’ अंडेही ते निषिद्ध मानीत. दूधही पशूंच्या जीवनावस्थेतूनच निर्माण होत असल्यामुळे ते अनेक वर्षेपर्यंत निषिद्ध मानीत. याचा त्यांच्या मनावर एवढा संस्कार होता की, दूध हे अन्न म्हणून घेण्यास अयोग्य असे ते मानीत. त्यामध्ये जंतूंची वाढ लवकर होते म्हणून ते अपायकारक आहे, असे ते प्रतिपादीत. स्वत: आजारी असताना दूध घेण्यास त्यांनी नकार दिला. कित्येक महिने त्यांचा हा हट्ट चालला होता. वैद्यकवर्गाने दुधाचे महत्त्व कितीही सांगितले तरी त्यांस पटत नसे. एका मित्राने शेवटी असे सुचवले की, ‘ दूध न घेण्याचा निश्चय करतेवेळी, गाईचें व म्हशीचे दूध आपल्या मनात होते, म्हणून शेळीचे दूध घेण्यास हरकत नसावी. ’ महात्माजींनी निरुपाय म्हणून शेळीच्या दुधास मान्यता दिली. तरी पण मनाची ही फसवणूक आहे, असे त्यांनी स्वत:च लिहून ठेवले आहे. या आग्रहामागील पार्श्वभूमी लक्षात ठेवण्यासारखी आहे. बंगालमध्ये गाईचे दूध काढताना अधिक दूध मिळावे म्हणून एक “फुका” म्हणून पद्धत वापरतात, ती क्रूर व अनिष्ट असते, सबब दूध घेणारी प्रत्येक व्यक्ती गोमातेवर अप्रत्यक्षपणे अत्याचार करते, त्यावर उपाय म्हणून दूध हे आहारातूनच वर्ज्य करावे, असा त्यांचा आग्रह होता. इतके असूनही शेळीच्यादुधाने त्यांची प्रकृती सुधारली, हे दिसतांच त्यांनी दुधाच्या अनिष्टतेबद्दलचे आपले मत पालटले. तेव्हापासून दुधाच्या आहारातील उपयुक्ततेचा ते पुरस्कार करू लागले. हीच खरी सत्यान्वेषणबुद्धी—शास्त्रीय दृष्टिकोन.

तांदूळ, गहू, ज्वारी, बाजरी या धान्यांपैकी गहू श्रेष्ठ असल्याचे त्यांचे मत. निसर्गत:ही जगात धान्यांमध्ये जास्त उत्पादन गव्हाचेच होते. रोजच्या आहारात दोन-तीन धान्यांचे पदार्थ न घेता एकाच धान्याच्या पदार्थावर रहाणे प्रकृतीस अधिक अपायकारक असे ते मानीत. अन्न कोरडे घेऊन नीट चावून खाण्याने लाळीचा स्राव होण्यास मदत होऊन पचनास सोपे जाते, म्हणून ते डाळ-भाजीसह खाऊ नये, असा त्यांचा आग्रह असे.

डाळीत प्रथिने जास्त म्हणून त्या जास्त पोषक हे जरी खरे, तरी त्या पचण्यास जड. शेतकरी, पहिलवान व काबाडकष्ट करणारे यांस त्या पचविणे शक्य, इतरांना नव्हे. विशेषत: चणा, हरभरा, वाटाणा, या डाळी पचनास विशेष कठीण. त्यातून मूग व मसूर या डाळी पचनास सोप्या, म्हणून घेण्यास हरकत नाही. असा एकूण डाळीविरुद्धच त्यांचा कटाक्ष असे.

एकदा कस्तुरबांना आतड्यांचा विकार झाला असता त्यांनी डाळीचे पदार्थ वर्ज्य करण्यास सांगितले. 'आपण तरी ते वर्ज्य करू शकाल का ?' असा प्रश्न विचारता, त्याच क्षणी त्यांनी डाळी वर्ज्य केल्या. त्यांचा स्वत:च्या मनावर असला असामान्य तावा होता.

मीठही निराळे घेण्याची जरूरी नाही; अळणी अन्नच बरे, असे वाटल्यावरून एकदा त्यांनी दहा वर्षे मिठाशिवाय अळणी अन्नावर काढली व त्यापासून कोणताही अनिष्ट परिणाम झाला नाही, हे अजमावून पाहिले.

फळे, सुका मेवा यांचा आहार ते उत्तम मानीत. कित्येक दिवस अशा आहारा-वर ते सतत रहात. प्रत्येकाने आपल्या भागात निरनिराळ्या ऋतूंत मिळणारी फळे खाणेच युक्त, असे ते मानीत.

फळभाज्या व पालेभाज्या व त्याप्रमाणेच कंदमुळे यांचा उपयोग चवीपेक्षा उप-युक्ततेच्या तत्त्वानेच करावा असे ते सांगत; उदाहरणार्थ, बद्धकोष्ठावर पालेभाज्यांचा उपयोग.

रोजच्या आहारात धान्य, डाळी, तूप, दूध, ताक व दही किती असावे, भाज्या कोणत्या व कशा घ्याव्या, इत्यादींचे नियम त्यांनी अनुभवाने व विचार करून घालून दिले. इतका आहाराविषयी त्यांनी सखोल विचार केला होता. अनेकदा ते स्वत: स्वयंपाक करीत.

आहारातील पदार्थांचे शरीरावर काय परिणाम होतात ते बारकाईने पहा-ण्याची त्यांची पद्धत असे. त्यामुळे वीर्योत्तेजक पदार्थ कोणते, हे त्यांनी निरखून पाहिले. दूध हे उद्दीपक असे ते मानीत. त्याचप्रमाणे चहा, कॉफी, कोको, तिखट, मीठ व मसाले हे उद्दीपक, असे त्यांनी पाहिले. या निरीक्षणाचा उपयोग, ब्रह्मचर्यास उपयुक्त आहार कोणता, हे ठरवण्याकरिता त्यांनी केला. हा आहार साधा असावा, कच्च्या, न शिजलेल्या पदार्थांचा असावा. ताजी फळे व सुका मेवा हा फार उत्तम, असे त्यांनी प्रत्यक्ष दीर्घ काळच्या अनुभवाने सांगितले.

उपवासावर त्यांचा मोठा भर. प्रत्येकाने रोज जरूर तेवढाच आहार ठेवावा, जास्त खाणे बरे नव्हे, घासभर कमीच खाणे श्रेयस्कर, असे ते मानीत. एवढेच नव्हे तर नियमित उपवासही आरोग्यास व विशेषतः मनोविकासास श्रेयस्कर, असा त्यांचा विश्वास होता. उपवासाने आत्म्याचा अनुभव येतो, अशी त्यांची श्रद्धा होती.

व्यायामाविषयीही त्यांची मते विचारार्ह आहेत. लहानपणापासूनच त्यांची प्रकृती नाजूक. त्यामुळे आखाड्यातील अथवा सांघिक पद्धतीचा व्यायाम किंवा घरी तालीमवजा व्यायाम त्यांना झेपलाच नाही. तरी व्यायाम हा जरूर पाहिजे असे ते सांगत. म्हणून स्वतःकरिता तरी चालण्याचा व्यायाम त्यांनी पसंत केला. प्रत्येकाने रोज ८–१० मैल तरी चालावे असे ते म्हणत व स्वतः त्याप्रमाणे वागत. इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असता व नंतर आयुष्यभर अनेक जोखमी पत्करल्या असताही रोज चालण्याचा व्यायाम ते घेत. पुढे पुढे कामे फारच वाढत गेली तेव्हा, कित्येकांस भेटण्याची वेळ देऊन, अनेक बाबतींची चर्चाही, या चालण्याच्या व्यायामाबरोबरच ते उरकून घेत. म्हणूनच उतारवयात अत्यंत अनिष्ट परिस्थितीतही नौखालीत ते रोज कित्येक मैल पायी प्रवास करू शकले.

निसर्गोपचाराविषयी त्यांना मोठे आकर्षण होते. मानवी देह हा पंचमहाभूतात्मक आहे. तेव्हा त्याच्या विकृतीत उपचाराकरिता त्याच घटकांचा उपयोग करणे योग्य वाटल्यामुळे त्यांनी या विषयांवर अनेक प्रयोग केले. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश म्हणजेच माती, पाणी, सूर्यप्रकाश, स्वच्छ हवा व मोकळेपणा याविषयी प्रयोगांची त्यांनी पराकाष्ठा केली.

त्यांना स्वतःला बद्धकोष्ठाची तक्रार असे. अनेक वर्षे अनेक उपचार-आहारादी तंत्रांच्या योजनेनेही ती दूर होईना. तेव्हा त्यांनी मातीच्या पोटिसाचा त्यावर उपयोग केला. विवक्षित प्रकारची माती घेऊन ती स्वच्छ दुपदरी कपड्यात गुंडाळून ओली करून तिचा लेप पोटावर ठेवून ते रात्री झोपत. या उपचारपद्धतीने आपल्या विकारावर त्यांनी मात केली. अनेक वर्षे अनेक औषधे घेऊनही न बरी होणारी बद्धकोष्ठता त्याने बरी झाली. अनेकांच्या या तक्रारीवर त्यांनी या उपायांची योजना करून तिचा उपयोगीपणा अनुभवला. पोटदुखीवर त्यांनी हा उपाय करून पाहिला. डोकेदुखीकरिता डोक्यावर असा लेप ठेवून उपयोग होतो, हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले. स्वतःस रक्तदाबामुळे होणारा डोके गरगरणे व दुखणे हा त्रास अशा डोक्यावर ठेवलेल्या मातीच्या पट्टीनेच त्यांनी बरा केला. मातीचे अन्य कोणत्या विकारांवर उपयोग

करता येतील हे पहाण्याकरिता त्यांनी प्रयोग करून पाहिले. गळू, जखमा वगैरेंवर मातीच्या लेपाचा त्यांनी उपयोग केला. त्यापासून जखमा बऱ्या होतात, हे त्यांनी स्वानुभवाने अजमावून पाहिले. अशा प्रयोगांकरिता माती कशी असावी, ती कशी साफ करावी, कशी साठवून ठेवावी, कशी वापरावी, वापरल्यानंतर पुन्हा कशी भाजून साफ करून वापरावी, इत्यादीविषयी त्यांनी नियम ठरवून दिले.

पाण्याचाही त्यांनी चिकित्सेत असाच उपयोग करून पाहिला. त्या वेळी जर्मनीत कुन्हे यांनी 'हिप-बाथ' म्हणजे कमरेपर्यंत पाण्यात बसून काही व्याधी बऱ्या करण्याची एक पद्धत प्रसिद्धीस आणली. महात्माजींनी लगेच त्या पद्धतीचे प्रयोग इथे करून पाहिले. ताप आला असता अशा अर्धस्नानाने तो उतरण्यास मदत होते, असे त्यावरून दिसले. अशाच प्रकारे पाण्याजवळ बसून जननेंद्रियावर एका पद्धतीने पाणी शिंपडून काही आजारात इलाज करण्याची पद्धत 'सिट्झ-बाथ' म्हणून प्रसिद्धीस आली होती. तिच्या प्रयोगांसंबंधी माहिती उपलब्ध नाही. याशिवाय पाण्याचा तापावर प्रयोग करण्याची आणखीही एक पद्धत त्या वेळी प्रसिद्धीस आली. त्याप्रमाणे थंड पाण्यात भिजलेली चादर एका ब्लँकेटवर पसरून तापाच्या रुग्णास त्यात गुंडाळून ठेवीत व अशा रीतीने ताप कमी होण्यास मदत होत असे, असे म्हणत. महात्माजींनी या उपचार-पद्धतीचे प्रयोग केलेच होते. त्यांच्या मुलास ४०दिवस मुदतीचा ताप आला. कोण-त्याही उपायाने तो उतरेना. महात्माजींनी वरीलप्रमाणे थंड पाण्याने भिजविलेल्या कपड्यात त्यास गुंडाळून ठेवून ते त्याच्याजवळ पडून राहिले. काही तासांनी घाम येऊन ताप उतरला. तेव्हापासून त्याची प्रकृती उत्तम असे. आपल्या मुलांपैकी सर्वांत या मुलाची प्रकृती उत्तम असल्याविषयी त्यांनी नमूद करून ठेवले आहे.

सूर्यप्रकाशास बंदी करू नये. तो सर्वत्र शक्य तो घरात येऊ द्यावा. सूर्यप्रका-शाने शरीरातील त्वचा वगैरे भागावर इष्ट परिणाम होतात. तेव्हा सूर्यप्रकाशाचे स्नान घ्यावे, म्हणजेच शरीराचा शक्य तेवढा भाग उघडा ठेवून सूर्यप्रकाशात बसून काही वेळ घालवावा. यालाच 'सन-बाथ' म्हणतात. महात्माजींनी या पद्धतीचा प्रयोगादाखल उपयोग करून पाहिला.

प्रकाशाप्रमाणेच हवा घरात खेळावी म्हणजे तिच्यातल्या प्राणवायूचा हितकर परिणाम शरीरावर होतो. त्यासाठी घरे उंच असावीत. दारे-खिडक्या मोठ्या असून ती उघडी ठेवावीत. शक्य तर खुल्या आकाशाखाली मोकळ्या जागेत शक्य तितका वेळ काढावा म्हणजे आरोग्यास श्रेयस्कर, अशी त्यांची श्रद्धा होती. श्वसन दीर्घ

असावे; नियमित पद्धतशीर असावे, तोंडातून श्वास न घेता नाकातून घ्यावा, त्यासाठी नाक पाण्याने रोज धुऊन स्वच्छ ठेवावे, इत्यादी नियम ते याबाबत सांगत.

हे सर्व सांगताना पुन्हा निसर्गोपचारपद्धतीचा उपयोग कुठे व कसा करावा, याविषयी माहिती ते सारखी मिळवीत असत व शास्त्रीय दृष्टीने त्याबाबत ऊहापोह करीत. या शास्त्रातील अधिकारी व्यक्तींशी समक्ष अगर पत्रद्वारे सारखा विचार-विनिमय चालू असे. या तज्ज्ञांनी एकमेकांशी चर्चा करून या तंत्राचा उपयोग कोणत्या व्याधींकरिता कितपत करणे उपयुक्त, ते ठरवावे असे ते म्हणत– पुष्कळदा ही तज्ज्ञ-मंडळी हे कार्य नीट करीत नाहीत, म्हणून नापसंतीही व्यक्त करीत.

प्राप्त परिस्थितीत आपल्या समस्या कशा सोडवता येतील, याविषयी त्यांचे विचार मूलग्राही होते, असेच म्हणावे लागते. पिण्याचे पाणी स्वच्छ असणे जरूर. आम जनतेस ते विहिरीतूनच मिळते, पण त्या विहिरींबद्दल जरूर ती स्वच्छता ठेवणे किती कठीण, हे जाणून सध्यापुरते तरी प्रत्येकाने पिण्याचे पाणी उकळलेलेच असावे, प्रवासात फक्त अशाच पाण्याचा उपयोग करावा, असा नियम त्यांनी सुचविला. प्रात-र्विधीकरिता उघड्या जागी जावे लागते, व त्यामुळे घाण होते, अस्वच्छता वाढते. तेव्हा पद्धतशीरपणे हा विधी व्हावा. त्याकरिता प्रथम लहानसा खड्डा करावा व मातीने तो झाकून घ्यावा, असे त्यांनी सुचविले. कुत्री-मांजरेही निसर्गत:च हे करतात, पण सुबुद्ध मनुष्य हे अजून करीत नाही, याबद्दल ते आश्चर्यही व्यक्त करीत.

एकदा एका निसर्गोपचारतज्ज्ञाने एका संशोधनकेंद्राकरिता महात्माजींची मदत मागितली. त्यांनी हवापाण्याच्या दृष्टीने सोयीचा असा जमिनीचा एक मोठा तुकडा त्यास आखून दिला. त्या तज्ज्ञास याचे फार वाईट वाटले. मी येथे काय करणार? येथे वीज नाही, त्यामुळे विजेची उपकरणे वापरता येणार नाहीत, इत्यादी विचार त्याने प्रकट केले. महात्माजींनी याबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शन केले. निसर्गोपचार हा खेड्या-पाड्यातील प्रत्येकास करणे शक्य असले पाहिजे. त्या दृष्टीने या प्रश्नाकडे पहाणे जरूर आहे. त्याप्रमाणे या जागेत एक खेडे वसवावे, रस्ते आखावे, झोपड्या बांधून राहण्याची सोय व्हावी, फुल-झाडे, फळझाडे लावावी, आहार-जल-निसर्गोपचार चिकित्सेच्या प्रयोगांच्या सोयी तेथे कराव्या, सर्व खर्च भागेल अशी व्यवस्था करून गरीबांसही तेथे उपचार शक्य करून दाखवावा. असे झाल्यास या पद्धतीची गावे देशभर पसरण्यास मदत होईल. ही मूलग्राही व प्रगल्भ दूरदृष्टी.

महात्माजींच्या शास्त्रीय दृष्टिकोनाविषयीही असाच गैरसमज होता. निसर्गो-

पचार, आयुर्वेदीय औषधे, वनस्पती इत्यादींचा चिकित्सेत उपयोग करण्याविषयी त्यांना असणारे आकर्षण, हे सर्व त्यांच्या जुनाट मनाचेच परिणाम असून आधुनिक शास्त्रातील प्रगतीचा उपयोग करून घेण्यास महात्माजींचे मनच तयार नाही, असे अनेकांना कित्येकदा वाटे. पण वस्तुस्थिती मात्र निराळीच होती. व्याधिचिकित्सेत उपयोगी असणाऱ्या कोणत्याही पद्धतीचा स्वीकार करण्यास त्यांची तयारी असे. या दृष्टीने आयुर्वेद, युनानी, निसर्गोपचार, होमिओपाथी, ॲलोपथी अथवा आधुनिक पाश्चात्य वैद्यकशास्त्र ही सर्व त्यांना सारखीच वाटत. उलट वैद्यकशास्त्र हे एकच व आधुनिक असावे, सर्व पद्धतींचे मंथन करून त्यातील उत्तम ते आधुनिक समजून त्याचा उपयोग करून घ्यावा, अशा मताचे ते होते.

आधुनिक वैद्यकाची त्यांना मोठी आवड. आपण वैद्य व्हावे अशी एके वेळी त्यांची फार इच्छा. पण या वैद्यकीय शिक्षणक्रमात जिवंत प्राण्यांवर प्रयोग करावे लागतात, त्याकरिता त्या प्राण्यांची चिरफाडही करावी लागते, त्यावद्दल नापसंती असल्यामुळे हा शिक्षणक्रम त्यांनी वगळला. या शास्त्राविषयी आकर्षण असल्यामुळे पुढे आफ्रिकेत असता एका डॉक्टरकडे त्यांनी सहकारी म्हणून काम केले. जखमा धुणे, पट्ट्या बांधणे, औषधे तयार करून वाटल्यांना लेवले लावून देणे, वगैरे कामे मनापासून करून, या शास्त्रातील चांगल्या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला. वेळोवेळी सूक्ष्मदर्शक ( microscope ) व इतर उपलब्ध उपकरणांचा उपयोग करण्याची संधी त्यांनी वाया जाऊ दिली नाही.

त्यांच्या संशोधकवृत्तीचा आणखी एक पैलू पहा. संशोधनास जरूर तेव्हा शवविच्छेदन करण्यास त्यांची हरकत नसे. मृत मनुष्याच्या शरीराचे अथवा मृत प्राण्याच्या देहाचे विच्छेदन करून ज्ञान मिळविण्यास हरकत नाही असे ते म्हणत. पण प्रयोगादाखलही जिवंत प्राण्याची चिरफाड करण्यास वर सांगितल्याप्रमाणे त्यांची संमती नसे. संशोधनास त्यामुळे अडथळा किंवा कमीपणा येईल असे मात्र त्यांनी केव्हाही मानले नाही. यावद्दल त्यांचा दृष्टिकोन पहाण्यासारखा आहे. पाणी वरच्या साठ्यापर्यंत पोचवायचे असेल तर अशा प्रयत्नात खालील पातळीवरून वाहून जाणारे पाण्याचे सर्व मार्ग रोखून धरले पाहिजेत; तद्वतच जर संशोधनतंत्रांचा उच्चांक गाठायचा असेल तर प्राण्यांवरील अशा क्रूर प्रयोगांचा कनिष्ठ मार्ग सोडूनच प्रयत्न करीत राहणे इष्ट. अशा मनाच्या मांडणीनेच नवीन संशोधनाची उच्चतम तंत्रे निर्माण होतील असा त्यांचा विश्वास होता. एवढा उत्तुंग दृष्टिकोन त्यांचा होता.

४९

# गांधीजींची सूक्ष्म अहिंसा

शरयू धोत्रे

गांधीजींचे राजकारण मानवतावादी कसे होते आणि त्यांच्या अहिंसात्मक प्रतिकाराचे मर्म काय आहे, याची चर्चा पुढील लेखात केलेली आहे.

महात्मा गांधी एक द्रष्टे पुरुष होते, तसेच योग्य नेतेही होते. तथापि ते अन्य मान्यवर पुढाऱ्यांपेक्षा, राजकीय नेत्यांपेक्षा, अगदी भिन्न प्रकारचे नेते होते. ज्यांना आपण राजनीतिज्ञ, लोकनेते मानतो, ते तेव्हाच नेतृत्व करू शकतात की, जोपर्यंत ते स्वत: पुढे होऊन अनुयायांना मार्गदर्शन करू शकतात. नेत्यांना सत्य परिस्थितीचे, देशाच्या सद्य:स्थितीचे दर्शन होत असते. पण ते सत्याचे दर्शन तो नेता जर आपल्या अनुयायांना करवून देऊ शकला नाही, तर तो एकटा काय करू शकणार ?

म. गांधीजी एक उच्चकोटीचे सिद्धांतवादी होते, सत्याचे पुजारी होते. त्यांची अहिंसेवर नितांत श्रद्धा होती. ते आपल्या जीवनात, आचरणात वरील सिद्धांताबाबत तडजोडीला तयार नसत. कठोरपणे ती तत्त्वे अमलात आणण्याचा जीवनभर त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. इतके असूनही एक लोकप्रिय नेता, भारतालाच नव्हे तर सर्व जगाला आकर्षित करणारा थोर पुढारी, असे नेतृत्व त्यांनी केले. जनता त्यांच्या इशाऱ्यावर सर्वस्वाचा होम करण्यास सिद्ध असे. त्याचे कारण काय ? तर त्यांनी जनताजनार्दनाच्या सेवेला आपल्याला वाहून घेतले होते. जनताजनार्दनाची नाडीपरीक्षा त्यांना अचूक होई व त्याला अनुसरून त्यांचे मार्गदर्शन असे. सिद्धांत-

वादी त्यांच्या बोटाला धरून त्यांच्याबरोबर चालण्याची धडपड करी. आमचा हा लोकविलक्षण नेता, जनतेला बरोबर घेऊन, कधी हळू तर कधी जलद गतीने चालून, जनतेकरवी अशक्य वाटणाऱ्या अशा गोष्टी करवून घेऊन, चमत्कार घडवून आणीत असे. भारताचे प्रतिनिधित्व करण्यास अत्यंत योग्य असे नेते महात्मा गांधी आपल्याला लाभले होते. ते जनतेशी अगदी एकरूप होऊन गेले होते. "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह कष्टवीती उपकारे ।" या तुकाराममहाराजांच्या अभंगाप्रमाणे तंतोतंत त्यांचे जीवन होते.

राजकीय नेता म्हटला, राजकारण म्हटले, की त्याला धरसोड, अगर तडजोड अथवा, तत्त्वांना मुरड ही घालावीच लागते, असे सामान्यपणे समजले जाते. पू. बापूंच्या बाबतीत पण असा लोकप्रवाद ऐकायला येई. स्वातंत्र्यप्राप्ती-साठी वेळोवेळी जी आंदोलने बापूंच्या नेतृत्वाखाली झाली, त्या वेळीं परिस्थिती-नुसार व त्यांच्या अहिंसक दृष्टीनुसार कधी ती आंदोलने स्थगित करीत, कधी त्यांचे स्वरूप सौम्य करीत. इंग्रज सरकारशी ज्या वाटाघाटी होत, तेव्हा लोक म्हणत की, "या महात्मा गांधींच्या राजकारणाचा काही पत्ताच लागत नाही. हे जाहीरपणे जी तत्त्वे मांडतात, तीच यांना मांडायची असतात, का काही राजकीय डावपेच आहे ? " कधी मंडळी हैराणही झालेली दिसत. परंतु "या महात्म्याशिवाय देशाला तरणोपाय नाही" अशी श्रद्धाही असे.

त्यांचे राजकारण, समाजकारण हे मानवतावादी होते. त्याला सत्याचे अधि-ष्ठान होते. धर्माचे अधिष्ठान होते. राजकारणात धर्माची लुडबूड चाललेली अनेकांना पटत नव्हती. पण पू. बापूंचा साध्यासाठी साधनशुद्धीवर कटाक्षाने भर होता. आणि म्हणूनच ते मानवधर्माचे अनुयायी होऊ शकले व 'महात्मा' या कोटीला पोचू शकले. ते आपल्या प्रत्येक तत्त्वाचे सखोल चिंतन करीत असत. रोजच्या सकाळ--संध्याकाळच्या प्रार्थनेवर त्यांची प्रगाढ श्रद्धा होती. प्रार्थनेने सूक्ष्मचिंतनाला शक्ती मिळते असे ते मानीत. सूक्ष्म चिंतन करून ते निर्णय घेत. ते 'आतला आवाज' म्हणून मशहूर आहे.

अहिंसेची त्यांची दृष्टी किती सूक्ष्म होती, याबाबत मला आलेला एक अनुभव मोठा विचारणीय आहे.

१९४० साली दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी इंग्रज सरकारशी असहकार पुकारून त्यांनी आंदोलन सुरू केले होते. पुढे ते 'वैयक्तिक सत्याग्रहा'च्या स्वरूपात चालू होते. त्या वेळी सत्याग्रहींची नावे ते स्वतः मंजूर करीत. त्यासाठी देशाच्या सर्व भागांतून मंडळी नावांच्या याद्या घेऊन सेवाग्रामला येत. पहिला सत्याग्रही म्हणून पू. विनोबा-जींची निवड करून त्यांनी देशाला आश्चर्याचा एक धक्का दिला होता. तसाच एक गोड धक्का त्यांनी अस्मादिकांचे नाव सुचवून आम्हाला दिला होता. बापूंनी नाव सुचवि-

त्याने मला अर्थातच स्वर्ग दोन बोटे उरला होता, यात नवल कसले ? कुठलाही विचार न करता सत्याग्रहासाठी मी तयारच होते. माझ्या लहान मुलांच्या अगर घरच्या माझ्यावर असलेल्या जबाबदारीचा विचारही मनाला शिवला नाही. पण तीन दिवस चरखासंघाची चाललेली सभा त्याच दिवशी संपली होती. माझ्याकडे, माझ्याच घरी, रसोडचाची व्यवस्था होती. त्याचे हिशेबठिशेब, भांडीकुंडी ज्यांची त्यांस पोचवावयाची होती. हे सारे काम एका रात्रीत उरकणे केवळ अशक्य होते. तरीही या कामाची मनाला क्षिती वाटत नव्हती. परंतु माझे कर्तव्यपरायण पती भाईसाहेब यांनी या सर्व जबाबदारीची जाणीव करून देऊन, " प्रथम अंगीकृत कर्तव्य पार पाडल्याशिवाय तूं उद्या सत्याग्रह करण्याचा विचार करू नयेस, तो एक मोहाचाच प्रकार ठरेल," असे समजावले. घोर निराशा झाली पण म्हणणे पटतही होते. शेवटी मी नाही तर दुसऱ्या तरी महिलेला ही सुवर्णसंधी मिळावी, म्हणून मी खटपटीला लागले. आमच्याच बरोबरीची एक महिला सत्याग्रह करण्यास उत्सुक होती. मी सेवाग्रामला बापूंना भेटायला जाऊन त्या महिलेचे नाव सुचविले व या नावाला तुम्ही मान्यता द्याच व स्त्री सत्याग्रही पाठवाच, असा आग्रह करू लागले.

मोठ्या हिरीरीने मी वाद घालण्याचे ठरविले होते. बापूंनी त्या महिलेची त्यांच्या अहिंसक कसोटीवर छाननी सुरू केली. त्यांत ती महिला ४–५ महिन्यांची गरोदर आहे, हे लक्षात येताच सारे बिनसले. " तू आणलेली सत्याग्रही मी मंजूर करू शकत नाही. ती गरोदर आहे, तेव्हा अहिंसेच्या माझ्या सिद्धांतात ते बसणार नाही." मी त्यांचे म्हणणे समजू शकत नव्हते." गरोदर असली तर काय बिघडते ? यांची अहिंसा कळतच नाही," असे मी मनात म्हटले. उसने अवसान आणून–कारण त्या वेळी ते सर्वाधिकारी होते, त्यांना त्या वेळी सर्व ' कमाण्डर इन् चीफ ' म्हणत––त्यांची समजूत पटविण्याचा पोरकट प्रयत्न करीत मी बसले. " श्रीकृष्ण नाही का बंदीवासात जन्मला ? शिवाय त्या बाई सर्व विचारांनींच सत्याग्रहास तयार आहेत, सरकारने केली बाळंतपणाची सोय तर काय बिघडतंय ? वगैरे वाद घालीत मी बसले होते व त्यांनी या बाईंना परवानगी द्यावीच, अशी गळ घालीत होते. सर्व ऐकून घेऊन हसत हसत बापूंनी एक चपराक माझ्या डोक्यावर मारली व ते म्हणाले, " मी काय म्हणतो ते तुझ्या डोक्यात अजून शिरत नाही ? माझी अहिंसा अगदी सूक्ष्म आहे. अग वेडे, मी इंग्रज सरकार-विरुद्ध सत्याग्रह करतोय म्हणून त्याचा अर्थ असा नाही की, सरकार अडचणीत येईल असे सत्याग्रही मी पाठवावेत ? त्यांना माझ्या सत्याग्रहींपासून शारीरिक अथवा मानसिक उपद्रव जाणूनबुजून होता कामा नयेत, अशी दक्षता मी घेणे, ही माझी अहिंसा आहे." पुढे काय बोलणार ? सर्वस्वी पटत नव्हते. " आम्ही प्रत्यक्ष हिंसा थोडीच करणार आहोत ?" हिंसेचा स्थूल अर्थच मला समजत होता. पण वरील त्यांच्या

म्हणण्याने विचार करण्यास चालना मिळाला.

दुसऱ्या दिवशी पुण्याची मंडळी 'सत्याग्रहीं'ची नावे मंजूर करून घ्यायला आली होती. त्यांच्यावरोवर मी पुन्हा सेवाग्रामला बापूंच्या भेटीला गेले. या लोकांशी काय चर्चा होते ती ऐकायला मिळेल व अहिंसेच्या तत्त्वावर काही अधिक प्रकाश पडेल ही आशा होतीच. मला पाहिल्याबरोबर हसत हसतच ते म्हणाले, "हं ऽ ऽ आता कुणाच्या नावाची वकिली करायला आली आहेस ? त्या अशिलाची सूक्ष्म अहिंसेच्या दृष्टिकोनातून छाननी केलीस की नाही ? '' म्हणून थट्टा सुरू केली व जाता जाता पुन्हा अहिंसेच्या व्यापक दृष्टिकोनाचाही एक डोस दिला. हातरुमाल खाली पडला होता माझा. तिकडे लक्ष वेधून " ही बघ हिंसा होतीय. रुमालावर अन्याय म्हणजे हिंसाच. प्रत्येक वस्तूचे योग्य स्थान व उपयोग न करणे म्हणजे हिंसाच झाली. प्रत्येक वस्तू योग्य स्थानी असणे, उपयोग होऊ शकणाऱ्या वस्तूचा सदुपयोग करणे ही अहिंसा झाली, समजलीस ? जा पळ आता ! '' म्हणून पाठीवर एक प्रसादी धप्पा मिळाला.

दैनंदिन व्यवहारातसुद्धा, जसे स्वच्छता, नीटनेटकेपणा—मग तो संडासापासून तो स्वयंपाकघरापर्यन्त, जेवणाच्या पंगतीत सर्वत्र—हिंसा-अहिंसेची दृष्टी लावली जाई. सत्याशिवाय अहिंसा शक्य नाही. एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत, असे ते सांगत.

पू. बापूंनी त्या वेळी "सूक्ष्म अहिंसे ''चा पाठ देताना दिलेली डोक्यावरील चपराक व पाठीवरील प्रसादी धप्पा अजूनही वेळोवेळी विचाराला धक्का देण्याचे काम करतो आहे आणि म्हणूनच त्याला मी 'प्रसादी' धप्पा म्हणते !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत,
अनुक्रम ... दि. ...
क्र. ... दि. ...

५०

# कुष्ठकार्याला चालना

## डॉ. दा. वि. वारदेकर

गांधीजींनी आपल्या विधायक कार्यांमध्ये महारोग–निवारणाला स्थान दिले होते. त्याबद्दल त्यांना किती तळमळ वाटत होती व त्या बाबतीत त्यांचे विचार काय होते, हे पुढील लेखात सांगितले आहे. या क्षेत्रात गांधी–स्मारक–निधीने, प्रस्तुत लेखकाच्या नेतृत्वाने, किती कार्य कोणत्या दिशेने केले आहे, याचेही दिग्दर्शन या लेखात केलेले आहे.

गांधीजींना अंत्यजांसंबंधी फार कळवळा होता. कुष्ठरोग्यांना समाज जवळ जवळ अंत्यज़ समजतो, म्हणूनच कुष्ठरोग्यांसंबंधी त्यांना कळवळा होता असे मला वाटते. त्यांचा कुष्ठरोग्यांशी संबंध आला तो परचुरे-शास्त्र्यांपासून, एवढीच माहिती सर्वसामान्य जनांस आहे. खरे म्हणजे त्याआधी कित्येक वर्षे त्यांचा कुष्ठरोग्यांशी संबंध आलेला होता.

इ. स. १८९० मध्ये, गांधीजींचे वास्तव्य दक्षिण आफ्रिकेत असताना, त्यांचा कुष्ठरोग्यांशी संबंध आला. डरबन ह्या शहरातील हिंदुस्थानी लोकांना 'नाताळ इंडियन कॉंग्रेस'चे सभासद करण्याच्या मोहिमेवर ते फिरत होते. एके दिवशी ते ज्या वस्तीत फिरत होते, त्या वस्तीत त्यांचे दर्शन घेण्यास उत्सुक असलेली काही माणसे दूर झाडाआडून आपल्याकडे पहात आहेत, हे त्यांच्या नजरेस पडले. ही माणसे कोण, कोठली ? अशी त्यांनी जवळच्या माणसांजवळ चौकशी केली. पण कुष्ठ-रोग्यांचे मोठ्याने नाव घेऊन सांगण्यासही लोक कचरत, असा तो काळ. त्यांनी

अगदी हलक्या आवाजात गांधीजींना सांगितले की, ते प्रगत अवस्थेतील कुष्ठरोगी आहेत. हे ऐकल्यावरोबर गांधीजींनी आपला मोर्चा तिकडे वळविला. जवळच्या लोकांनी त्यांना तिकडे जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्या आग्रहाला न जुमानता गांधीजी त्या कुष्ठरोग्यांना भेटले व त्यांच्या क्षेमकल्याणाची त्यांनी विचारपूस केली.

डरबंन शहरात त्यांचे वास्तव्य असताना आणखी एक घटना घडली. एके दिवशी गांधीजी आपल्या खोलीत बसलेले असताना त्यांच्या घराचे दार कुणी तरी खडखडवले. गांधीजींनी दार उघडले. समोर पहातात तो एक कुष्ठरोगी. त्याला त्यांनी तावडतोब आत घेतले. कोणत्याही सामान्य माणसाने केले नसते, ते त्यांनी केले. त्याला घरात आश्रय तर दिलाच पण त्यावरोबरच त्याच्या जखमा धुणे, मलमपट्टी करणे व त्याची शुश्रूषा करणे ह्याकडेही त्यांनी लक्ष पुरविले. पण त्याला कायमचा घरात ठेवून घेणे त्यांना शक्य नव्हत. त्यासंबंधी त्यांनी स्वत:च लिहिले आहे, " But I could not go on like that indefinitely. I could not afford it. I lacked the will to keep him always with me. "

त्यानंतर हिंदुस्थानात आल्यावरसुद्धा गांधीजींची कुष्ठरोग्यांवद्दलची सहानुभूती पूर्ववत होती. त्यांनी काही कुष्ठधामांना भेटी दिल्या व रोग्यांशी अत्यंत प्रेमाने बोलणी केली. चंपारण्याच्या सत्याग्रहाच्या वेळेस घडलेली एक घटना पू. सानेगुरुजींनी लिहून ठेवली आहे. ती त्यांच्याच शब्दांत देतो.

" सत्याग्रहांत तमाम जनता भाग घेऊ शकते. चंपारण्यातील त्या सत्याग्रही सेनेत महारोगाने पीडलेला एक शेतमजूर होता. तो पायांना चिंध्या गुंडाळून चाले. त्याच्या टाचा सोलून निघाल्या होत्या, सुजल्या होत्या. अपार वेदना होत असत. परंतु आत्मिक सामर्थ्याच्या जोरावर तो महारोगी झुंजार सत्याग्रही बनला होता.

" एके दिवशी संध्याकाळी सत्याग्रही सैनिक छावणीत परत येत होते. त्या महारोगी सत्याग्रहीच्या पायाभोवतालच्या चिंध्या रस्त्यांत सुटून पडल्या. त्याला चालवेना. टाचांतून रक्त येत होते. इतर सत्याग्रही झपाट्याने पुढे गेले. महात्माजी सगळ्यांच्या पुढे असायचे. महात्माजी फार झपाट्याने चालत असत. मागे राहिलेल्या त्या महारोगी सत्याग्रहीची आठवण कोणालाच राहिली नाही.

" आश्रमात पोचल्यावर प्रार्थनेची वेळ झाली. बापूंच्या भोवती सत्याग्रही बसले. परंतु बापूंना तो महारोगी दिसला नाही. त्यांनी चौकशी केली. शेवटी एकाने सांगितले : " तो जलद चालू शकत नव्हता. थकल्यामुळे तो झाडाखाली बसला होता. "

" एक शब्दही न बोलता गांधीजी उठले. हातात दिवा घेऊन ते शोधार्थ बाहेर पडले. तो महारोगी रामनाम घेत एका झाडाखाली विव्हळत होता. बापूंच्या

हातातील दिवा बघताच त्याचे तोंड आशेने फुलले. भरल्या आवाजाने ' बापू ' अशी त्याने हाक मारली.

" अरे, तुला चालवत नाही, तर मला नाही का सांगायचे ? '' असे गांधीजी म्हणाले. त्याच्या रक्ताळलेल्या पायांकडे त्यांचे लक्ष गेले. तो महारोगी होता-- इतर सत्याग्रही किळस येऊन मागे झाले. परंतु गांधीजींनी शाल फाडून त्याचे पाय गुंडाळले. त्याला आधार देऊन ते त्याला आस्ते आस्ते आश्रमात, त्या शिबिरात घेऊन आले. नंतर त्यांनी त्याचे पाय नीट धुऊन काढले. प्रेमळपणे त्यांनी त्याला स्वतःच्या जवळ बसविले. भजनास सुरवात झाली. प्रार्थना झाली. तो महारोगीही भक्तिप्रेमाने टाळ्या वाजवीत होता. त्याचे डोळे घळघळत होते. ''

परचुरेशास्त्री हे एक अतिशय विद्वान पंडित होते. त्यांना कुष्ठरोग झाला. पुढे खूप विकृतीही आल्या. ही अवस्था झाल्यानंतर ते हरिद्वारला जाऊन राहिले. पुढे ते सेवाग्राम आश्रमात गांधीजींना भेटण्यास आले. गांधीजींनी त्यांच्याकरिता स्वतःच्या झोपडीजवळ एक झोपडी बांधली व काही दिवस त्यांची मालिश पण केली. त्यांना मालिश करताना घेतलेला फोटो सर्वांच्या परिचयाचा आहे.

दिवसेंदिवस गांधीजींना कुष्ठसमस्येचे स्वरूप अधिक जाणवू लागले व त्यांनी आपल्या विधायक कार्यक्रमांत ह्या कार्याला स्थान दिले. विधायक कार्यक्रमांच्या पुस्तिकेच्या दुसऱ्या आवृत्तीत त्यांनी ह्यासंबंधी पुढील मजकूर लिहिला आहे :

Leper is a word of bad odour. India is perhaps a home of lepers next only to central Africa. Yet they are as much a part of society as the tallest among us. But the tall absorb our attention though they are least in need of it. The lot of lepers, who are much in need of attention, is studied neglect. I am tempted to call it heartless, which it certainly is, in terms of non-violence. It is largely the missionary who, be it said to his credit, bestows care on him. The only institution run by an Indian, as a pure labour of love, is by shri Manohar Diwan near Wardha. It is working under the inspiration and guidance of Shri Vinoba Bhave If India was pulsating with new life, if we were all in earnest about winning independence in the quickest manner possible by truthful and non-violent means, there would not be a leper or beggar in India uncared—for and unaccounted for. In this revised edition, I am deliberately introducing the leper as a link in the chain of constructive effort. For, what the leper is in India that we are, if we will but look about us, for the modern civilized world . . ."

गांधीजींनी कुष्ठसमस्येकडे समाजाचे लक्ष वेधले, म्हणूनच ख्रिश्चन मिशनरी नसलेली माणसे कुष्ठकार्य करण्यास प्रवृत्त झाली. गांधीजींनी कुष्ठकार्यात इतके लक्ष

घातले होते, म्हणून त्यांच्या निधनानंतर 'गांधी स्मारक निधीने' गांधी मेमोरियल लेप्रसी फाउंडेशन, ही संस्था कुष्ठकार्य करण्याकरिता स्थापन केली.

कुष्ठकार्याचा गांधीजींनी आपल्या रचनात्मक कार्यक्रमांत समावेश केला होता व या कार्याबद्दल त्यांच्या मनात विशेष तळमळ होती. 'कुष्ठकार्य हे माझ्या जीवनातील अपुरे राहिलेले कार्य आहे' असे ते म्हणत. या दृष्टीने गांधीजींच्या निर्वाणा-नंतर त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ जो स्मारक–निधी उभारण्यात आला, त्यातील एक भाग कुष्ठकार्यासाठी राखून ठेवण्याचा निर्णय त्या वेळच्या आपल्या नेत्यांनी घेतला.

कुष्ठकार्याचे स्वरूप इतर रचनात्मक कार्यांपेक्षा निराळे असल्याने गांधी स्मारक निधीच्या अंतर्गतच पण पूर्णपणे स्वायत्त अशी "गांधी मेमोरियल लेप्रसी फाउंडेशन" ही संस्था १९५२ च्या आरंभी कै. दादासाहेब मावळणकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापण्यात आली. डॉ. जीवराज मेहता हे उपाध्यक्ष होते व श्री. कृष्णदास जाजू, देवदास गांधी, डॉ. खानोलकर, डॉ. पंडित इत्यादी सदस्य होते. डॉ. वारदेकर प्रारंभापासून या संस्थेचे कार्यवाह आहेत. श्री रं. रा. दिवाकर हे १९५७ पासून अध्यक्ष आहेत.

स्वतःच्या कुष्ठकार्याचा आराखडा आखण्यापूर्वी, लेप्रसी फाउंडेशनच्या चालकांनी देशातील कुष्ठप्रश्नाचा व कुष्ठकार्याचा अभ्यास केला. त्यात असे आढळले की, देशात अंदाजे १५ ते २० लाख कुष्ठरोगी असून त्यांतील फक्त १५००० कुष्ठधामांत आहेत व कुष्ठग्रस्त भिकाऱ्यांची संख्या १ लक्ष असावी. परंतु उरलेले रोगी समाजातच राहात असून रोग पसरवीत आहेत. कुष्ठकार्याचा परंपरागत प्रकार म्हणजे लोकवस्ती-पासून दूर कुष्ठधाम किंवा कुष्ठाश्रम चालविणे हा होता. परंतु या धामांतील रोग्यांचा अभ्यास केल्यावर असे आढळले की, प्रत्येक रोगी हा रोगाच्या प्रगत अवस्थेत, विकृती आल्यानंतर, नोकरीधंदा सुटल्यावर व बहुधा लोकांना रोगप्रसार करूनच, मग कुष्ठधामात येतो आणि एकदा आल्यानंतर तो शेवटपर्यंत तेथेच राहतो. त्याला समाजात परत पाठविण्याचे प्रयत्न केले जात नाहीत. कुष्ठधामांत निव्वळ सांसर्गिक प्रकारचे रोगी ठेवणेसुद्धा आपल्यासारख्या देशाला आर्थिक दृष्ट्या परवडण्यासारखे नाही. त्याऐवजी रोगी घरात असतानाच प्रारंभिक अवस्थेत त्याला हुडकून व औषध देऊन, विकृती येण्यापूर्वी व त्याचे समाजातून निर्वसन होण्यापूर्वीच, त्याला रोगमुक्त केल्याने रोगाच्या प्रसाराला आळा बसेल व सरकारने पुढाकार घेऊन हे कार्य केल्यास भारतातून या रोगाचे कालांतराने उच्चाटनही होऊ शकेल, असे फाउंडेशनच्या चालकांचे मत झाले.

या अभ्यासपूर्ण निष्कर्षानंतर फाउंडेशनने स्वतःच्या कार्यक्षेत्रासाठी सीमित अशी लक्ष्मणरेषा आखून घेतली. कुष्ठप्रश्नाच्या विविध पैलूंवर प्रयोग करून ते सोडविण्याचा मार्ग व कार्यपद्धती निश्चित करणे व या प्रयोगांच्या अनुभवातून काढलेले

निष्कर्ष सरकाराला व कुष्ठसंस्थांना त्यांच्या मार्गदर्शनासाठी उपलब्ध करून देणे, हे ते कार्यक्षेत्र होय.

फाउंडेशनने घेतलेले पहिले कार्य म्हणजे ग्रामीण क्षेत्रात सर्व जनतेची वार्षिक तपासणी, लोकांना व रोग्यांना कुष्ठशिक्षण व रोग्यांवर औषधोपचार या त्रिविध कार्यसूत्राच्या आधारे रोगनियंत्रण करणे शक्य आहे काय, याचा प्रयोग सुरू केला. १० राज्यांत १२ वर्षांच्या कामानंतर " सर्वेक्षण, शिक्षण व उपचारकेन्द्रा''च्या पद्धतीने रोगनियंत्रण शक्य आहे असे आढळून आले. ही कार्यपद्धती भारत सरकारने राष्ट्रीय प्रमाणावर स्वीकारली असून या प्रकारची हजारो कुष्ठकेंद्रे गेल्या तीन पंचवार्षिक योजनांत स्थापण्यात आली आहेत.

वरील कार्यावरोवरच, कुष्ठक्षेत्रात मर्यादित स्वरूपात, मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेल्या लोकांना कुष्ठरोगाचे प्रशिक्षण देऊन त्यांचा या कार्यासाठी वापर करण्याचा प्रयोग पण फाउंडेशनने हाती घेतला. यासाठी ९ महिन्यांचा अभ्यासक्रम आखून त्याप्रमाणे प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करून त्यांचा उपयोग आपल्या केन्द्रांमध्ये केला. सरकारने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेतच या कार्यक्रमास मान्यता दिली. अंदाजे २-३ हजार प्रशिक्षित कार्यकर्ते फार मोठ्या प्रमाणावर देशात कार्य करीत आहेत. फाउंडेशनने आतापावेतो ६५७ कार्यकर्त्यांना शिक्षण दिले आहे. याशिवाय १९६८ पासून " कुष्ठकार्यात आरोग्यशिक्षणाचे तंत्र'' या विषयाचा २ महिन्यांचा नवा अभ्यासक्रम, कुष्ठकार्यात ५ वर्षांचा अनुभव असलेल्यांसाठी, आखला आहे. डॉक्टरांसाठी ४ महिन्यांचा, मॅट्रिक कार्यकर्त्यांसाठी ६ महिन्यांचा व अनुभवी कुष्ठकार्यकर्त्यांसाठी २ महिन्यांचा असे तीन शिक्षणक्रम सध्या वर्ध्यास चालविले जातात.

फाउंडेशनने अंगीकारलेला तिसरा प्रयोगात्मक कार्यक्रम शहरी विभागासाठी होता. शहरातील वहुतांश सुशिक्षित लोक सर्व कुटुंबियांची पूर्ण शारीरिक तपासणी करू देण्यास नाखूष असतात, पण आरोग्याबद्दल त्यांच्यात जागरूकता असल्याने कुष्ठरोगाच्या प्रारंभिक लक्षणांची माहिती त्यांना दिल्यास अशा संशयास्पद कातडीच्या चट्ट्याचे निदान करून घेण्यासाठी डॉक्टरकडे शहरी लोक तत्परतेने जातात. दुसरीकडे शहरात "कुष्ठ-उपचार-केंद्र'' काढल्यास इतरांना कळेल, या भीतीने प्रारंभिक अवस्थेतील रोगी अशा केन्द्रात येण्यास कचरतात, परंतु सरकारी व खाजगी दवाखाने शहरात भरपूर असल्याने औषधोपचारासाठी वेगळे केंद्र उघडण्याची आवश्यकता नसते. शहर-विभागाची वरील वैशिष्टये लक्षात घेऊन फाउंडेशनने शहरासाठी एक वेगळी "आरोग्यशिक्षणा''ची कार्यपद्धती आखली व गेली ५ वर्षे जवळजवळ ८ राज्यांतील ३३ शहरांत त्यानुसार कार्य चालविले आहे. या पद्धतीप्रमाणे कुष्ठकार्यकर्ते एकीकडे सर्वसाधारण लोकांना रोगाच्या प्रारंभिक लक्षणांची माहिती देऊन स्वतःच्या खाजगी डॉक्टरांचा सल्ला घेण्यास सांगतात व दुसरीकडे

खाजगी डॉक्टरांना भेटून त्यांच्याकडे येणाऱ्या इतर रोग्यांमध्ये कुष्ठरोगाची प्रारंभिक लक्षणे आढळल्यास रोगनिदान व उपचार खाजगी दवाखान्यात करण्यास प्रवृत्त करतात. या कार्यपद्धतीचे यश व उपयोगिता आता सर्वमान्य झाली असून आगामी योजनेत या प्रकारच्या शहरी कुष्ठकेंद्रांचा समावेश सरकारतर्फे करण्यात येईल.

कुष्ठरोगाच्या प्रतिबंधक औषधांचा प्रयोग हा फाउंडेशनचा चवथा कार्यक्रम. हा प्रयोग आंध्र राज्यातील ५४ खेड्यांत ५ वर्षांपासून चालू आहे. २५ वर्षांखालील सर्व निरोगी लोकांना हे औषध दिले जाते व त्यामुळे रोग-प्रतिबंध किती प्रमाणात झाला, याचा तेथे अभ्यास केला जातो. पाच वर्षांच्या कार्याच्या अनुभवावरून ज्यांना हे औषध दिले, त्यांच्यामध्ये रोगप्रसारास प्रभावी रीत्या आळा बसल्याचे आढळून आले आहे. आता ज्यांना औषध ५ वर्षेपर्यंत दिले, त्यांतील निम्म्या व्यक्तींना औषध देणे बंद करून दिलेल्या औषधाचा प्रभाव किती काळ टिकतो, याचा अभ्यास पुढील ३ वर्षे करण्यात येणार आहे.

गांधीशताब्दीच्या वर्षाच्या निमित्ताने २ ऑक्टोबर १९६९ पासून फाउंडेशनने कुष्ठकार्यात सर्व डॉक्टर लोकांना सहभागी करण्याचा कार्यक्रम अंगीकारला आहे. कुष्ठरोगाचा प्रश्न प्रामुख्याने वैद्यकीय स्वरूपाचा असूनही दुर्दैवाने वैद्यकीय वर्गाने ह्या प्रश्नाकडे द्यावे तसे लक्ष दिलेले नाही. जोवर प्रत्येक डॉक्टर आपल्या दवाखान्यात इतर रोग्यांसारखे कुष्ठरोग्याला औषध देणार नाही, तोवर कुष्ठरोग हा इतर रोगांसारखा एक रोग आहे, या सत्यावर सर्वसाधारण लोकांचा विश्वास बसणार नाही. खाजगी डॉक्टर जर आपल्या दवाखान्यात कुष्ठरोगांवर उपचार करू लागले, तर आज जे असंख्य रोगी सामाजिक बहिष्काराच्या भीतीने रोग लपवून ठेवतात व स्वतःचे नुकसान करून घेऊन समाजात पण रोग पसरविण्यास कारणीभूत होतात, असे प्रारंभिक अवस्थेतील रोगी निर्भयपणे खाजगी डॉक्टरकडून रोगनिदान व उपचार करून घेतील. याशिवाय स्वतःला रोग असल्याचे ज्यांना अजून माहीत नाही, असे हजारो रोगी, खाजगी डॉक्टरांकडून हुडकले जाऊन विकृती येण्यापूर्वी रोगमुक्त होतील. संपूर्ण देशातून कुष्ठरोगनिर्मूलन करण्यासाठी खाजगी डॉक्टरांचे सक्रिय सहकार्य लाभणे फारच आवश्यक आहे, या जाणिवेने फाउंडेशनने खाजगी डॉक्टरांसाठी एक छोटा अभ्यासक्रम आखला आहे व कुष्ठ-निर्मूलनकार्यात या कार्यक्रमाचे " मूले कुठारः" स्वरूप लक्षात घेता गांधीशताब्दी वर्षात या कार्यक्रमास सुरवात केली आहे.

कुष्ठशिक्षणाच्या दृष्टीने कुष्ठप्रश्नाच्या विविध अंगांवर व समाजातील निरनिराळ्या वर्गांसाठी लहान-मोठ्या शंभरावर पुस्तिका फाउंडेशनने प्रकाशित केल्या आहेत व त्यांची भाषांतरे पण केली आहेत. याशिवाय डॉक्टरवर्गासाठी एक व सर्वसाधारण जनतेसाठी एक असे दोन शैक्षणिक बोलपट फाउंडेशनने काढले आहेत.

कुष्ठपुनर्वसनाच्या क्षेत्रात फाउंडेशनने प्रत्यक्ष कार्य केले नसले, तरी



गां. गौ. २५

या प्रश्नाच्या सोडवणुकीची योग्य दिशा दाखविली आहे. समाजातून होणारी रोग्यांच्या निर्वसनाची प्रक्रिया यापुढे थांबविणे, हे पुनर्वसनाच्या उपक्रमाचे पहिले आवश्यक अंग आहे. तसेच समाजाबाहेर कुष्ठरोग्यांच्या आजीवन वसाहती स्थापन करणे म्हणजे पुनर्वसन नसून, निर्वासित झालेल्या रोग्यांना उपयुक्त उद्योगधंदा शिकवून त्यांना समाजात परत पाठविणे, ही पुनर्वसनाची व्याख्या फाउंडेशनने दिली आहे.

वर्धा येथे या संस्थेचे केंद्रीय कार्यालय असून तेथे एक आधुनिक दवाखाना चालविण्यात येतो व विकृती दुरुस्त करण्यासाठी शस्त्रक्रियेची तेथे सोय आहे. याशिवाय भारतात एकमेव असे सर्वसाधारण लोकांना, कुष्ठकार्यकर्त्यांना व डॉक्टरवर्गाला उपयुक्त असे कुष्ठ-संग्रहालय तेथे तयार केले जात आहे. भारतातील केंद्रीय सरकार, राज्य-सरकारे व विविध कुष्ठसंस्था यांच्याशी फार सलोख्याचे संबंध असलेली ही संस्था, आपल्या परीने सीमित परंतु मूलभूत प्रश्नांचा अभ्यास करून देशातील कुष्ठ-निर्मूलनाच्या कार्यास हातभार लावीत आहे. फाउंडेशनने दाखविलेल्या मार्गाने देशात कुष्ठनिर्मूलन झाल्यास महात्माजींचे अपुरे कार्य बऱ्याच अंशी पूर्ण होण्याला मदत होईल.

५१

# गांधीजींचें रामराज्य

## मनोहर दिवाण

महारोग-निवारणाचे कार्य गांधीजींच्या प्रत्यक्ष सान्निध्यात करणारे प्रस्तुत लेखाचे लेखक यांनी गांधीजींच्या रामराज्याची कल्पना पुढील लेखात विशद केली आहे. वर्गविहीन व सत्ताविहीन समाजाची गांधीजींची कल्पना स्पष्ट रीतीने येथे मांडलेली आहे.

गांधीजी हे स्वभावतःच देवमाणूस होते. सत्य हाच त्यांचा ईश्वर होता. त्याचाच त्यांना सारखा ध्यास लागलेला होता. निरपेक्ष सत्याचा प्रत्यक्ष साक्षात्कार व्हावा, यासाठीच त्यांचे संपूर्ण जीवन वाहिलेले होते. त्याचेच प्रयोग ते नित्य करीत. त्यांचे वैशिष्टचच हे होते की, He lived truth. त्यांचे हे वर्णन यथार्थ आहे.

सत्याचा हा शोध अत्यंत नम्र वनल्याशिवाय होणार नाही हे त्यांनी जाणले होते. स्वतःइतकेच इतरांचेही म्हणणे सत्य असू शकते, म्हणून सर्वांच्याच विचारांचा, भावनांचा, दृष्टिकोणांचा ते आदर करीत. सर्वांचीच विनम्र सेवा सर्वदा करण्यास ते तत्पर असत. इतर कोणाही मानवाला आपल्याप्रमाणेच लेखीत व सर्वांच्या खालची जागा घेण्यास ते नेहमी आनंदाने तयार असत. प्रेम आणि मानवसेवा यावाचून सत्याचे दर्शन शक्य नाही, ही निष्ठा जीवनाच्या सुरवातीलाच त्यांच्या ठायी वाणली होती. अशा प्रकारे सत्य व अहिंसा वा प्रेम त्यांना अविभाज्य वाटत होते. त्यांच्या जीवनाचे ते ध्रुवबिंदू वनले होते. ते त्यांनी कधीच दृष्टीआड होऊ दिले नाहीत.

परंतु जोपर्यंत शरीराचे बंधन आहे, वासना सतावत आहे, तोपर्यंत पूर्ण सत्याचे दर्शन होणार नाही, हा निश्चयही त्यांचा फार लवकर झाला होता. विषय-वासनेतून मुक्त होण्यासाठी ब्रह्मचर्य व वस्तूंच्या मोहातून सुटण्यासाठी अपरिग्रह, अस्तेय ओघानेच आले. शरीराच्या आसक्तीमुळेच मनुष्य शरीराचे चोचले करतो व शरीर-परिश्रम टाळतो. त्यामुळेच मृत्यूची त्याला भीती वाटू लागते. म्हणून सत्यनिष्ठे-इतकाच शरीरश्रमाचा व अस्वादाचा धर्म व निर्भयतेचा गुण त्यांना अपरिहार्य वाटू लागला. सत्य जिकडे घेऊन जाईल तिकडे जाण्यास व त्यासाठी वाटेल ती किंमत देण्यास त्यांचे मन नेहमी तयार होई. साधे जीवन, कठोर परिश्रम, इंद्रियनिग्रह व सामाजिक प्रतिष्ठेचा त्याग ही क्रमानेच आली व त्यांच्या जीवनाची अंगे बनली. वैज्ञानिकांच्या शास्त्रीय पद्धतीनेच त्यांची ही धर्मदृष्टी बनत गेली. त्यात श्रद्धा व प्रयोग यांचा योग्य समन्वय होता. जुन्याचा आदर करण्याची तत्परता होती व सत्यात नवे-जुने असा भेद नसतो, हे ओळखण्याची सार-ग्राहकता होती. त्यांच्या विशाल दृष्टीतून कोणताच मानव जसा सुटू शकत नव्हता, तशा कोठूनही व कोणाजवळूनही सत्य स्वीकारण्याला सांप्रदायिक धर्मकल्पना आड येऊ शकत नव्हत्या. त्यामुळे सर्व धर्मांतील सत्याचा ते सारखाच आदर करीत. मानवसेवेत जसे श्रीमंत-गरीब, शिक्षित-अशिक्षित, उच्च-नीच हे भेद मानणे त्यांना संमत नव्हते, तसाच एखादा विशिष्ट धर्म इतरांपेक्षा कमीअधिक लेखणे त्यांच्या सत्यनिष्ठेत बसण्यासारखे नव्हते. सर्व मानव बंधू व सर्व धर्म एका मानवधर्माच्या शाखा, हे त्यांचे सूत्र होते.

याचबरोबर वैयक्तिक मोक्ष किंवा गूढवाद त्यांना आकर्षू शकण्यासारखा नव्हता सर्वांना जे मिळू शकत नाही, सर्वांबरोबर संविभागाने वाटून जे उपभोगिता येत नाही, मग तो मोक्ष असो अगर संपत्ती असो, ते पूर्ण सत्याकडे नेण्याला कसे समर्थ होणार ? — असा त्यांचा रोकडा सवाल असे. वैयक्तिक परिपूर्णता व आदर्श समाजरचना यातील विसंगती त्यांना खपत नव्हती. ते ध्येयवादी असले तरी वास्तवता त्यांना कधीच सोडीत नसे. Practical Idealist असे ते स्वत: व इतरही त्यांचे वर्णन करीत. बारीकसारीक सुधारणांपासून त्यांचे पाऊल पडायचे. एकाकी काम करीत राहणे, थोडक्यात समाधान मानणे, अगदी सामान्य बाबीत मोठा आशय पाहणे, अखंड सतत प्रयत्नशील राहणे, व्यक्ती किंवा समाज कोणाचीच अवगणना न करणे, पै पैचा हिशेब ठेवणे, ही व्यवहारकुशलता हा त्यांचा जन्मजात गुण होता. त्यात सेवेची भावना व सत्यमय जीवनाचा ध्यास यांची भर पडली होती. साधे, शुद्ध, सहज जीवन म्हणजे आध्यात्मिक जीवन अशी त्यांची मान्यता होती. याशीं जुळणारी व सामान्य माणसालाही आकलन होणारी त्यांची जीवनविषयक विचारसरणी होती. स्वत:च्या व जवळच्यांच्या जीवनात ती तावून-सुलाखून निघाली होती. आजपर्यंत होऊन गेलेल्या धर्मपुरुषांच्या अनुभवाचा व शिकवणुकीचा सार-

भूत, मंगलमय, सर्वहितकारी असा तो गाभा होता.

गांधीजींची धर्मदृष्टी जीवनाच्या विभिन्न घटनांतून कशी बनत गेली व त्यातून समन्वयावर आधारलेले अद्‌भुत रसायन कसे आविष्कृत झाले, हा उद्‌बोधक व दिव्य वातावरणात नेणारा आणि एका स्वतंत्र ग्रंथाला पुरणारा विषय आहे. त्यांच्या धर्म-दृष्टीप्रमाणेच त्यांचा आदर्श समाज सत्य-अहिंसेवर आधारलेला, राज्यविहीन, वर्ग-विहीन, जातिविहीन समाज होता. यालाच ते 'रामराज्य' म्हणून संबोधितात. नावावरून ते हिंदू राज्य होईल का अशी कोणाला शंका आल्यास 'खुदाई राज्य' किंवा Kingdom of God म्हणायची त्यांची तयारी असे. जिवाचे रान करून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, अनेक तरुणांना कष्ट सोसायला, जेलमध्ये जायला त्यांनी प्रवृत्त केले. तेव्हा स्वराज्याच्या, ग्रामराज्याच्या स्वरूपाचा काही परिचय करून द्या, असा प्रश्न करण्यात येई. त्याची सामान्य रूपरेषा जरी ते देत, तरी त्याचे स्वरूप त्यांनी नेहमी लवचिकच ठेवले. ते म्हणायचे—The content of swaraj will evolve as it comes in our perview. जसे आपण असू, तसा आपला आदर्श समाज बनणार, हे ते पक्के जाणून होते. म्हणून आपला वैयक्तिक विकास साधण्यावर ते सर्व शक्ती केंद्रित करीत असत. स्वतःला सोडून नुसत्या समाजाच्या मागेच आपण लागू, तर हाती काहीच येणार नाही. अध्यात्माला जसे Humanism मानवतावाद किंवा Socialism समाजवाद यापासून घेण्यासारखे आहे, तसेच या दोहोंना अध्यात्मा-पासून प्रेरणा घ्यावयास हवी. गरिबांची सेवा व समाजहित साधायची तळमळ असेल, तर आत्मशुद्धीची व आत्मसंयमाची तितकीच तळमळ लागली पाहिजे, असे कार्यकर्त्यांना त्यांचे आग्रहाचे सांगणे असे. राजकारणाला Spiritualise करण्याची ही त्यांची अहिंसक प्रक्रिया असे. समाजसुधारणा, राजकारण, अर्थकारण या सर्वांसाठी जी शक्ती लागते ती आतून निर्माण व्हावी लागते. ती बाहेरच्या परिस्थितीवर अगर परक्यांवर अवलंबून मिळणार नाही. म्हणून ही शक्ती अगर Sanction प्रथम मिळविण्यावर त्यांचा जोर असे. रामराज्य अगर दैवी राज्य आसुरी शक्तीवर अव-लंबून येईल का ?— असा त्यांचा खडा सवाल असे. धर्मासाठी शरीर टिकविणे व त्यासाठी झिजविणे आवश्यक आहे, नव्हे तो धर्म आहे. पण देहपरायण होणे व भौतिक सुखवाद हेच ध्येय बनविणे परवडणार नाही. रामराज्य आणावयाचे असेल व टिकवावयाचे असेल, तर कोणत्या शक्तीच्या द्वारे ते शक्य आहे, हे ओळखता आले पाहिजे. त्या शक्तीची जोपासना केली पाहिजे. यावर त्यांचा विशेष कटाक्ष असे. यातूनच त्यांना सत्याग्रहाचे दर्शन झाले व त्यांचे अमोघत्व अनुभवास आले. खरा एकटा सत्याग्रहीदेखील संपूर्ण जग हालवून सोडण्यास पुरून उरेल हे ज्या आत्मविश्वासाने ते सांगत, ते त्यांच्या तोंडूनच ऐकावे ! तो त्यांचा दुर्दम्य विश्वास होता. संख्येची त्यांना कधी भीती वाटली नाही, पर्वा केली नाही.

रामराज्य म्हटले की पावन व सर्वहितकारी समाजाच्या अत्युच्च अवस्थेची कल्पना आपल्यापुढे उभी राहते. त्याला दैवी राज्य अगर सत्ययुग म्हणायलाही ते कचरत नसत. हे रामराज्य धर्म्य असले तरी कोणत्याच विशिष्ट रूढ धर्मांच्या चौकटीने ते मर्यादित होणारे नाही. सर्व धर्म समान भावाने व आनंदाने यांत अविरोधाने नांदू शकतात. या राज्याला भौगोलिक मर्यादाही नाही. मानवता हीच त्याच्या नागरिकत्वाची कसोटी. सर्व मानव जेथे बंधू म्हणून समान अधिकाराने सर्वत्र वावरू शकतात व सर्वांच्या सेवेसाठी उत्सुक असतात, असे हे नैतिक शक्तीवर आधारलेले सर्व सत्ता असलेले राज्य आहे. कारण येथे असला तर प्रत्येक सत्ताधारी आहे, नाही तर नियंताच नाही. म्हणून राज्य ह्या संज्ञेला पात्र होणारी व्यवस्थाही नाही.

एकदा रामराज्याची व्याख्या करा, असा फार आग्रह करण्यात आला. त्यांनी उत्तर दिले.--

Ram-rajya is sovereignty of the pcople based on pure moral authority.

'काही बोध होत नाही; समजेल असे सांगा,' अशी तक्रार होऊ लागली. तेव्हां त्यांनी गंभीरपणे स्पष्टीकरण केले, तें त्यांच्याच शब्दांत ऐकलेले बरे!

Political powar means capacity to regulate national life through national representatives. If national life becomes so prefect as to become self-regulated no representation becomes necessary. There is then a state of enlightened anarchy. In such a state every one is his own ruler. He rules himself in such a manner that he is never a hindrance to his neighbour. In that ideal state there is no political power, because there is no state.

राजकीय सत्ता म्हणजे राजकीय प्रतिनिधींच्या द्वारे राष्ट्रीय जीवन नियमित करण्याची क्षमता. राष्ट्रीय जीवन जेव्हा इतक्या परिपूर्णतेला येईल की, ते स्वतः-कडूनच नियमित होऊ लागेल, तेव्हा राष्ट्रीय प्रतिनिधींची जरूरच राहणार नाही. अशा स्थितीत ते सदाचारशील, सुसंस्कृत अराजक होईल. या अवस्थेत प्रत्येक जण आपला आपणच शासक बनेल. तो स्वतःचे असे नियंत्रण करील की, त्याच्या शेजाऱ्याला त्याच्यापासून कोणताच उपद्रव होणार नाही. या आदर्श स्थितीत राज्यसत्ताच संपुष्टात येते, कारण राज्यच राहत नाही.

राज्यविहीन समाजाची ही अशी त्यांची भूमिका आहे. वर्गविहीन समाजाचा आशयही त्याने स्पष्ट होऊ लागतो. सामाजिक समतेशिवाय व्यक्ति-स्वातंत्र्याला अर्थ राहत नाही. आदर्श समाजात जेथे उच्चनीच हा भाव नाही, सर्व व्यवसाय समान व म्हणून सर्वांचा मोबदला पण समान, तेथे व्यक्तिगत संपत्ती जमेल कशी? जमलीच तर सर्वांच्या हितासाठी वापरली जाईल. इतरांना

जो उपभोग मिळत नाही, तो आपल्याला शोभत नाही, अशी जेथे वृत्ती असत, तेथे ईर्षा, असूया यांना थारा मिळत नाही. न्यायाधीश, वकील, प्राध्यापक, शेतकरी, न्हावी, भंगी यांचे वेतन समान राहील, यात घावरण्यासारखे काय आहे ? अशा समाजात धंद्याची निवड, स्वत:ला मोठेपण मिळण्याच्या हेतूने किंवा सुखोपभोगाच्या लोभाने न होता, आपल्यातील ईश्वरदत्त गुणांचा समाजाला जास्तीत जास्त लाभ मिळाला पाहिजे, या तळमळीतून होत जाईल. व्यक्तीचा व त्याचबरोबर समाजाचा जास्तीत जास्त विकास होण्यासाठी प्रत्येक प्रवृत्ती झाली पाहिजे. असा कटाक्ष असल्याशिवाय समाज आदर्श कसा बनू शकेल ? अशा समाजात चढाओढ राहणार नाही–सहकारी वृत्तीच वाढेल. प्रत्येक व्यक्ती आपल्या भौतिक निर्वाहा–साठी शरीरश्रम करण्याचा धर्म पाळील. त्यामुळे सर्वांना फुरसत मिळेल. त्यायोगे व्यक्तिगत आवडीप्रमाणे समाजहित होईल व सांस्कृतिक विकासाचा मार्ग सर्वांना खुला राहील. याचा अर्थ सर्वांना समान संधी उपलब्ध होतील. शरीरपरिश्रम करणारे व छोट्या आटोपशीर उद्योगधंद्यांत विभागलेले मानवसमूह बनतील. शेतीवर सामूहिक किंवा सहकारी तत्त्वाने प्रत्येक रहिवासी काम करील. जमीन राष्ट्राच्या उत्पादनाचे सर्वात मोठे साधन, म्हणून जास्तीत जास्त पीक काढण्यास सर्व झगडतील. अशा समाजात जातपात राहणार नाही. मानव समान राहील समाज मात्र संपन्न होईल. स्वदेशीधर्माप्रमाणे जवळच्याचीच प्रथम सेवा होत राहील. मुले, म्हातारे, अपंग यांची चिंता सर्वांनाच वाटेल. कारण मानवप्रेम हेच अशा समाजात प्रेरक शक्ती राहील. व्यक्तिगत स्वातंत्र्याची गळचेपी होण्याचा प्रसंग येणार नाही. स्वावलंबन व परास्परावलंबन यांचा योग्य मेळ साधण्यात येईल. त्यामुळे व्यक्ती विरुद्ध समाज किंवा राष्ट्रीय विरुद्ध आंतरराष्ट्रीय असे वाद अगर झगडे निर्माण होणार नाहीत. राज्यासाठी जो कोणताच श्रम करणार नाही, त्याला मताधिकार राहणार नाही. या राम-राज्यांत लखोपती व्यापाऱ्याने किंवा बुध्दिजीवी मनुष्याने मजुरी करणे अपरिहार्य राहील काय ? असा प्रश्न विचार-ण्यात आला. उत्तर मिळाले –"होय. श्रम अवश्य करावा लागेल. मजूरवर्ग नसेल, पण श्रम सर्वच करतील. श्रमाने सर्वच पावन होतील. यामुळे त्यांची प्रतिष्ठा वाढेल व ते खरे राष्ट्रहितकर्ते बनतील. आजच्यासारखा त्यांचा द्वेष होणार नाही. खऱ्या सन्मानास ते पात्र होतील. त्यांना संपत्तीची चिंता उरणार नाही. आपल्या बांधवांचे आशीर्वाद मात्र त्यांना मिळतील. असलेली संपत्ती समाजाच्या स्वाधीन करावयाची. होईल तितका श्रम देह आहे तोवर करीत राहावयाचा, हीच तर व्यक्तीपेक्षा समाज श्रेष्ठ मानण्याची कसोटी आहे. यावरून तुम्ही व्यक्तिनिष्ठ की समाजनिष्ठ हे ठरणार आहे. '' असे गांधीजींनी बिनदिक्कत उत्तर दिले. विचारणारा आश्चर्य–चकित झाला. पुन्हा विचारू लागला–"रवींद्रनाथ

टागोरांसारखे विश्वविख्यात कवी किंवा रमण महर्षींसारखे सिद्ध पुरुष यांनाही या जीवननिर्वाहार्थ श्रमांतून सूट राहणार नाही का ?''उत्तर– "आदर्श समाजातील हा universal proposition आहे असे मी मानतो. देहधारी असणाऱ्या सर्वांनाच तो नियम लागू आहे, असावयास पाहिजे. श्रमाने बुद्धी तेजस्वी होते, असा टॉलस्टॉय यांचा अनुभव आहे. इतरांनाही तसा अनुभव येईल. कणखर मनगट, दमदार अंत:प्रेरणा व मुक्त प्रतिभा प्राप्त होईल.''

अशा समाजात यंत्रे राहतील. मानव आपल्या कल्पनेने जितकी यंत्रे मानवांच्या हितासाठी निर्मू शकतो व आपल्या कह्यात राखू शकतो, तितक्या सर्वांचा वापर होत राहील. यंत्रावद्दल नावड असण्याचे कारण नाही. मानवहितपोषक अशा कोणत्याच अंगाची उपेक्षा होऊ दिली जाणार नाही.

या समाजात जीवनमान फार निकृष्ट तर होणार नाही ?– अशा शंका काहींनी व्यक्त केल्या. त्यांनी उत्तर दिले–श्रम केल्याने जीवनमर्यादा वाढेल, दीर्घ जीवन लाभेल, रोग कमी होतील, शोषण गेल्याने क्लेश–कुरापती कमी होतील, इतरांना उपेक्षून एकट्याचीच चिंता करण्याच्या सवयीतून मुक्त झालेले अंत:-करण उदार बनेल, चोरीची जरूरी भासणार नाही, संग्रह करण्याची वृत्ती जाईल व त्यावरोबर कृपणताही जाईल. आजच्या जीवनातील दैन्यावस्था जावयाची असेल, तर आजच्या अनिष्ट रूढी व समजुती जाव्या लागतील. जीवनमूल्ये बदलावी लागतील. विचारक्रांती होईल ती अहिंसक मार्गाने होईल, कोणाला बोचणार नाही. कारण दुसरा कोणी विचार लादणार नाही–स्वप्रेरणेने व स्वनिर्णयाने होईल. समाजवाद किंवा साम्यवाद जसा देहपूजक व भोगपरायण आहे, तसा हा समाज राहणार नाही. साधनांच्या युक्तायुक्ततेचा विचार तो सोडणार नाही. भौतिक सुखवाद ही त्याची इतिकर्तव्यता होणार नाही. एका व्यक्तीलादेखील आपल्यासारखीच सुखसोय व समान संधी लाभत नाही, तोपर्यंत या समाजाचा घटक स्वस्थ बसू शकणार नाही. 'आत्मवत् सर्वभूतेषु ' हा अशा समाजात नुसता धर्मच राहणार नाही, स्वभावही बनेल.

असा समाज बनेल तो खेड्यांत वा गावांत साध्या घरांत राहील, मोठ्या शहरांत, महालांत राहणार नाही, हे उघड आहे. माझ्या आदर्श खेड्यात जे मानव राहतील ते बुद्धिमान व कर्तबगार राहतील, ते घाणीत अगर अज्ञानात जनावरां-प्रमाणे लोळणार नाहीत. स्त्री व पुरुष स्वतंत्र व्यक्ती या नात्याने वागतील–जगातील कोणाहीपुढे दीन होऊन वागणार नाहीत. तेथे कोणी आळशी आढळणार नाहीत. ऐषआरामात लोळणार नाहीत. ( My ideal village will contain intelligent human beings. They will not live in dirt and darkness like animals. Men and women will be free and able to hold their own against any one in the world. )

रामराज्याच्या आदर्शाचा बोध होण्याला एवढा तपशील पुरेसा आहे.

रामराज्यासाठी आवश्यक ती शक्ती राष्ट्रात निर्माण करणे, त्यासाठी अहर्निश झटणे म्हणजेच रामराज्य, असेही ते सांगत. स्वराज्यापेक्षा ते मिळविण्याच्या अखंड प्रयत्नांत अधिक आनंद व पुरुषार्थ असतो. रामराज्यालाही तोच न्याय लागू आहे. गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाची अपूर्वता यात होती की, त्यामुळे या रामराज्याचे Sanction किंवा खरी आधारशक्ती राष्ट्रात निर्माण होई. निराळ्या अर्थाने ते राम-राज्याच्या आदर्शाकडे टाकलेले पहिले पाऊल म्हणता येईल. अशा दोन्ही रीतींनी तो साधासा निरुपद्रवी कार्यक्रम सर्वतोभद्र होता. सत्याग्रहाइतकाच तो प्रभावी आहे हा विश्वास अजून राष्ट्रात बाणलेला नाही. साध्याइतकीच साधनाची काळजी राखणारा गांधीजींसारखा मार्गदर्शक क्वचितच दाखविता येईल.

तत्त्वज्ञाप्रमाणे ते आपला आदर्श स्पष्ट करीत व इतर कोणत्याही कारणासाठी तो खाली आणू देत नसत. त्याचबरोबर कुशल सेनानीप्रमाणे त्याचे जवळचे उद्दिष्टही (Immediate objective) सांगत. ते हवेत लोंबकळत राहू देत नसत. उदाहरणार्थ, अपरिग्रही व दीनदु:खी जनतेबद्दल कळवळा असलेल्या व्यक्तीला व्यक्तिगत संपत्ती कशी संग्रहित करता येईल ? हा प्रश्न घ्या. त्याच्याजवळून जबरदस्तीने हिसकावून किंवा लुबाडून घेऊन आदर्श समतेवर उभारलेला अहिंसक समाज तर या रीतीने निर्माण होणार नाही. मग त्यातून मार्ग कसा काढावयाचा ? ध्येयावरील दृष्टी अढळ ठेवून क्रमाक्रमाने एक एक पाऊल टाकीत ध्येयाकडील वाटचाल ते कायम ठेवीत. समन्वय व समझौता, त्याग व सहनशीलता, आत्मक्लेश व समाधान यांचा आश्रय घेत घेतच सत्याग्रहाचा मार्ग प्रगती करीत असतो. तेव्हा व्यक्तिगत संपत्तीचा संपूर्ण त्याग पहिल्याच खेपेस होत नसेल, तर ती खुशाल जवळ असू द्या. मात्र जे गरीबांना उपभोगायला मिळणार नाही, त्याचा स्वत: उपभोग घेण्यात आनंद मानू नका. स्वत: उपभोगून राहिलेल्या संपत्तीचे स्वत:स मालक न मानता ट्रस्टी किंवा संरक्षक माना; समाजात गरीबांच्या किंवा समाजाच्या कल्याणाकरिता खर्च करण्यासाठी आपल्याजवळ ती ठेव आहे म्हणून नीट संभाळा, असे ते सांगत. आदर्श व व्यवहार यांची सांगड घालण्याची किमया त्यांना कशी साधली होती, याचे हे उत्कृष्ट उदाहरण होय.

याचप्रमाणे आदर्श समाजाच्या प्रत्येक अंगाचा, असा तपशिलात शिरून, विचार करावा लागेल. अहिंसक समाजात सैन्य, पोलीस, कर, सामाजिक व राज-कीय समता, वैयक्तिक स्वातंत्र्य, संपत्तीची न्याय्य व सम वाटणी, छोटेमोठे उद्योग, शिक्षण, नागरी व ग्रामीण जीवन, महिलांचे समाजातील स्थान, परचक्र व अहिंसा— अशा अनेक बाबींचा विचार करावा लागेल. व्यक्तीच्या किंवा समाजाच्या जीवना-तील अशी एक बाब दाखविता येणार नाही की, जिचा गांधीजींनी अगदी

मुळाशी जाऊन विचार केलेला नाहीं. जीवनातील कोणतीच बाब त्यांना क्षुद्र वाटत नसे. जे करायचे ते विचारपूर्वक करायचे, हा त्यांचा दंडकच होता. ते प्रत्येक शब्द तोलून– जोखून उच्चारीत किंवा लिहीत. त्यामुळे त्यांचे विचार म्हणजे एक जीवन-दर्शनच झाले आहे.

इमारतीचा जसा Blue print किंवा नकाशा असतो, तसा आदर्श समाजाचा सांगाडा वा आराखडा जनतेपुढे मांडण्याऐवजी त्याच्या स्वरूपाला मूर्त रूप देण्याची शक्ती समाजात निर्माण करण्यातच त्यांना सर्व जीवन खर्च करावे लागले. कोण्या बाबीला किती महत्त्व द्यायचे व कशाला प्राथमिकता द्यायची, याचे त्यांना अचूक भान असे. जरी साचेबंद योजना त्यांनी उपस्थित केली नाही, तरी त्याचे स्पष्ट दर्शन होण्याजोगा विस्तार व क्रम त्यांच्या लिखाणात मार्गदर्शनाकरिता उपलब्ध आहे.

आजची मुख्य गरज, त्या मार्गाने जायचे किंवा नाही, हे ठरविण्याची आहे. गांधीजींचा दृष्टिकोण स्वीकारून आपण जावयाचे आहे काय ? अहिंसक जीवन स्वत:चे व्हावे ही तळमळ आपणाला का वाटत नाही ? वाटून त्यासाठी जी किंमत द्यावी लागेल, ती देण्याची आपली तयारी का होत नाही ? हा खरा सवाल आहे. त्याचे उत्तर मूकपणे शरीरश्रमाद्वारा रंजल्यागांजलेल्यांची अल्पस्वल्प सेवा असलेल्या परिस्थितीत रोज करू लागल्याने मिळणार आहे. सत्याग्रहाचे लहानमोठे प्रसंग प्रत्येकाच्या जीवनात अहर्निश येत असतात. तिकडे आम्ही लक्ष देऊ तर रामराज्य दूर शोधण्याची जरूरी नाही. अनपेक्षितपणे एखाद्या अनोळखी व्यक्तीशी थोड्या सौजन्याने सहज वागल्यास काय परिणाम होतो, याचा अनुभव तर घेऊन पाहू या ! आपण जर बुद्धी शाबूत ठेवणार नाही व हातपाय हालविणार नाही, तर देवही रामराज्य आणू शकणार नाही. खिस्त म्हणत असे– If people realise the spirit of God in themselves and live by it, then they enter the Kingdom of Heaven. तेच येथे लागू आहे.

गांधीजींचे असे वर्णन करतात की, जेथे ते वसत तेथे पावन मंदिर होई व जेथे ते चालत ते तीर्थ होई. त्यांची उमटलेली पावले थोडी पुसट झाली असली, तरी अजून ओळखू येण्यासारखी आहेत. त्यांवरील आमची दृष्टी ढळू न देण्याची आम्ही खबरदारी घेणार ना ?

५२

# ख्रिस्ती मिशनरी व गांधीजी

## प्राचार्य जे. डब्ल्यू. आयरन

येशू ख्रिस्त व त्यांचे 'गिरि-प्रवचन' यांचा प्रभाव गांधीजींच्या चित्तावर व कार्यावर फार पडलेला होता. ख्रिस्ती मिशनऱ्यांशी तर त्यांचा संबंध पुष्कळच आलेला होता. त्या मिशनऱ्यांच्या कार्यपद्धतीचे वैशिष्ट्य कोणते, हे पुढील लेखात सांगितलेले आहे.

प्रथमत: 'ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य' ह्या मथळ्यातील तिन्ही शब्दांचा साधक-बाधक विचार करू. 'मिशनरी' ह्या शब्दाचा अर्थ 'पाठविलेला' असा आहे. ह्या प्रथेला ख्रिस्ती धर्मापूर्वी बुद्धधर्मात चालना मिळाली. एखाद्या व्यक्तीला एखादा विशेष संदेश देऊन पाठवणे हा या प्रथे-मागील प्रमुख उद्देश होय. येशू ख्रिस्ताने आपल्या सर्व शिष्यांना शेवटी एक विशेष आज्ञा दिली होती : "तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांना शिष्य करा, तुम्ही जगात जाऊन सर्व उत्पत्तीला शुभवर्तमान गाजवा." परंतु तार्सस येथील शौल नावाच्या एका यहूदी धर्मपुढाऱ्याचा शुभवर्तमान सांगणाऱ्यावर रोष झाला. शुभवर्तमान सांगणाऱ्या ह्या लहान गटाचा त्याने समूळ नाश करण्याचे योजिले. परंतु त्याचा नाश करण्याची खटपट करीत असता खुद्द त्याचा स्वत:चाच हृदयपालट झाला आणि तोच ह्या गटाचा प्रमुख झाला. रोम, यरूशलेम इ. ठिकाणी जाऊन छळ, मारहाण इ. सोसून त्याने तेच शुभवर्तमान सर्वांना सांगितले. संत पौल ह्या नावाने तो पुढे इतिहासात प्रसिद्ध झाला. इ. स. १ च्या मध्यावरची ही घटना होय. ह्याच सुमारास शुभवर्तमानावर

विश्वास ठेवणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. खिरस्ताने केलेला आत्मत्याग, गरजूंवर दाखवलेले प्रेम, शेवटी केलेले दु:खसहन या सर्व गोष्टींची व खिरस्ताने उल्लेखिलेल्या देवाच्या राज्याची सतत स्मृती बाळगून आपले कार्य करीत रहाणे हा या नव्या समाजाचा स्थायीभाव बनला.

त्या वेळच्या रोमन सत्तेवर ह्याचा परिणाम होऊ लागला. यहुदीधर्मीय ह्या नव्या समाजाला पाखंडी समजू लागले. परिणामी रोमन व यहुदी लोक ह्या नव्या समाजातील लोकांचा छळ करू लागले. ह्या लोकांना 'खिरस्ती' असे प्रथमत: ह्याच वेळेपासून संबोधण्यात येऊ लागले. खिरस्तीधर्मीयांना जिवंत जाळणे, भुकेल्या सिंहापुढे टाकणे असे प्रकार सर्रास होऊ लागले. त्यामुळे काही थोड्याफार खिरस्ती लोकांनी ह्या नव्या धर्माचा त्याग केला असेल. परंतु हा छळ सोसत असतानाच त्यांची संख्या झपाट्याने वाढू लागली. 'शुभवर्तमान' सांगण्याच्या कार्याचा मोठ्या प्रमाणात फैलाव झाला. ह्या ठिकाणी 'शुभवर्तमान' ह्या शब्दाचा अर्थ अधिक विशद करणे योग्य ठरेल. एका वाक्यात ह्या शब्दाचा अर्थ सांगायचा असेल तर योहान नावाच्या येशू ख्रिस्ताच्या शिष्याच्या शब्दात सांगता येईल. ते वाक्य म्हणजे 'देवाने जगावर एव्हढी प्रीति केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला; यासाठी की, जो कोणी त्याजवर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालीन जीवन मिळावे.' (योहान ३:१६) या ठिकाणी पुत्र म्हणजे येशू खिरस्त, हेच ते 'शुभ' वर्तमान. आपले घरदार, आपला देश सोडून हा संदेश देण्यासाठी बाहेर पडणाऱ्याला 'खिरस्ती मिशनरी' म्हणत. येशू खिरस्ताविषयीची माहिती इतरांना सांगणे, येशू खिरस्ताचा संदेश त्यांच्याप्रत पोहोचवणे हे खिरस्ती मिशनऱ्यांचे कार्य होय. हे कार्य करीत असता गरजू लोकांशी जसजसा त्यांचा संबंध येत गेला, तसतसा त्यांच्या अनेक गरजा भागविण्यासाठी खटपट करण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला. अशा रीतीने शाळा व दवाखाना चालविण्याचा समावेश त्यांच्या कार्यात झाला. केवळ परक्या राष्ट्रातच खिरस्ती मिशनऱ्यांना विरोध झाला असे नाही, तर खुद्द खिरस्ती राष्ट्रांतही त्यांना विरोध झाला. हे एक ऐतिहासिक सत्य आहे. आणि म्हणूनच खिरस्ती मिशनऱ्यांचे कार्य समजून घेत असता त्यांच्या कार्याविषयी जी प्रतिक्रिया होते, ती प्रथम समजावून घेऊन गांधीजींचे त्यांच्याविषयी काय मत होते, ते पहाणे योग्य ठरेल.

देवाने माणसाला आपल्या स्वत:च्या प्रतिमेसारखे निर्माण केले होते आणि त्यामुळे देव व मानव ह्यांच्यात एक विशिष्ट प्रकारचे सख्य होते; मैत्री होती. त्याचबरोबर परमेश्वराने मानवाला स्वतंत्र विचारशक्तीही दिली होती, असा आपला मूलभूत विश्वास आहे. ह्या देणगीचा योग्य-अयोग्य, बरे-वाईट ओळखण्यासाठी मानवाने उपयोग करावा, असा परमेश्वराचा हेतू होता. ह्यातच मानवाच्या बौद्धिक वाढीचे बीज आहे. ह्या गोष्टीचा परमेश्वराला केवळ आनंदच नसून आभिमानही

वाटत असे, अशी भाविकांची प्रथमपासूनची कल्पना आहे. कालांतराने मानवाच्या ह्या दैवी प्रतिमेला तडा गेला. ह्या प्रतिमेला पूर्वस्वरूप प्राप्त करून देण्यासाठी परमेश्वराने धर्मपुढारी निर्माण केले. शेवटी जेव्हा ह्या धर्मपुढाऱ्यांच्या सेवेचाही प्रभाव पडेना, तेव्हा स्वतःच मानव होऊन मानवी इतिहासाला वेगळे वळण देण्याचे त्याने ठरविले, अशीही भाविकांची श्रद्धा आहे.

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी ही गोष्ट प्रत्यक्षात आली, आणि येशूच्या रूपाने परमेश्वर ह्या जगात आला! त्याने आपल्या सेवेला सुरुवात केली. सेवेचा हा कालावधी केवळ २–३ वर्षांचाच होता. ह्या एवढ्याशाच कालात त्याने परमेश्वराचे सत्य-स्वरूप साकार केले. देवाची प्रीती, मानवाची सेवा व इतरांच्या चुकीबद्दल स्वतः शिक्षा भोगणे ह्याचे माहात्म्य त्याने उक्तीने व कृतीने पटवून दिले. शेवटी ज्या लोकांत त्याचा जन्म झाला होता त्यांनीच त्याचा परकीयांच्या हस्ते शेवट केला परंतु ख्रिस्ताने मृत्यूवर विजय मिळविला आणि ज्या चळवळीला पालेस्ताईनमध्येसुद्धा पाठिंबा नव्हता. ती चळवळ काही थोड्या वर्षांच्या अवधीतच सर्व जगभर पसरली. ह्या चळवळीचा फैलाव होत असता तिची दोन अंगे सहज स्पष्ट झाली : (१) येशू ख्रिस्ताच्या जन्माचे कारण, त्याने केलेली मानव-बांधवांची सेवा, त्याचा झालेला छळ, त्याचा वध आणि मृत्यूवरील त्याने प्राप्त केलेला विजय यांचा एकसारखा घोष करीत रहाणे; (२) ज्या ठिकाणी अडी-अडचणी असतील, इतर मानव–बांधव पीडाग्रस्त असतील, त्या ठिकाणी स्वार्थ-त्यागपूर्वक व प्रसंगी स्वतःचा जीवही धोक्यात घालून त्या अडचणी निवारणे, त्यांची सेवा करणे व ही सेवा म्हणजे प्रत्यक्ष ख्रिस्ताचीच सेवा होय असे मानणे, हे ह्या चळवळीचे दृश्य अंग होय.

ह्या चळवळीचे अदृश्य अंग म्हणजे, ख्रिस्त अद्याप जिवंत आहे व उपरि-निर्दिष्ट कार्य करीत असता त्याचा आपल्यावर वरदहस्त असतो हा विश्वास. आणि म्हणूनच कार्यप्रेरणा प्रथम व नंतर पैशाचा विचार, हा ख्रिस्ती सेवेचा एक महत्त्वाचा गुण आहे.

तात्त्विक दृष्ट्या विचार केला तर हा विश्वास बराच खोल जाऊ शकतो. संत पौलाचे असे म्हणणे आहे की, येशू ख्रिस्त वधस्तंभावर असताना मानवाचा देवाशी समेट घडवून आणीत होता, ह्याचाच अर्थ, जणू काय, मानवाची तडा गेलेली प्रतिमा परत सांधू पहात होता—तिला पूर्वस्वरूप प्राप्त करून देत होता. ख्रिस्ती शुभवर्तमानाचा तात्त्विक गाभा तो हाच. ह्याच शुभवर्तमानाचा प्रसार करण्यासाठी काही ख्रिस्ती भाविकजन मिशनरी म्हणून सेवेसाठी बाहेर पडतात. काही स्वतःच्याच देशात सेवा करतात. त्यांना Home मिशनरी म्हणतात. काही जण ही सेवा करण्या-साठी परदेशी जातात. त्यांना पूर्वी Foreign मिशनरी म्हणत. आता त्यांना

Overseas मिशनरी म्हणतात. वर दिलेल्या कसोटीला सर्वच मिशनरी संपूर्णपणे उतरतील असे म्हणणे मुळातच चूक आहे आणि म्हणूनच त्यांचा विचार ह्या लेखात आपणास प्रस्तुत नाही.

अगदी उच्च भावनेने एक विशेष प्रकारची ख्रिस्ताची सेवा करण्यास बाहेर पडणारे मिशनरी केव्हा केव्हा स्वतःच्या देशाला विसरण्याचा प्रयत्न करतात. ते ज्या देशात जातात, त्यालाच आपला देश मानतात. त्या देशाच्या संस्कृतीतील अत्युत्तम, ते आत्मसात करण्याचा प्रयत्न करतात. पुष्कळांना तर असे वाटत असते की, ह्या नव्या स्वीकरणीय (adoptive) देशातच आपल्याला मृत्यू यावा.

मिशनऱ्यांची ही पार्श्वभूमी गांधीजींना पूर्णपणे माहीत होती. मिशनऱ्यांचा विश्वास व त्यांचे सत्कार्य ह्यांच्याविषयी गांधीजींनी नेहमीच प्रशंसोद्गार काढले आहेत. त्यांच्या अगदी निकटवर्तीय मित्रांपैकी काही जण मिशनरी होते. गांधीजींच्या वाचनात 'नवा करार' (पवित्र शास्त्राचा दुसरा भाग) नेहमी असे. त्यांच्या डोळ्यांपुढे वधस्तंभावर लटकलेल्या खिरस्ताची प्रतिमा सतत असे. परंतु धर्मांतर ह्या एका विशिष्ट गोष्टीवर त्यांचा विश्वास नव्हता.

धर्मांतराचा विचार करताना नुसती तात्त्विक बाजूच लक्षात घेऊन चालत नाही. एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या धर्मापेक्षा दुसरा धर्म चांगला आहे असे म्हणून स्वधर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारला, तर तो मनुष्य चांगला झाला, हे म्हणणे केव्हा केव्हा अतिशयोक्तीचे ठरते. ज्यांच्या चरित्रात धर्मांतरामुळे काही विशेष फरक पडला नाही असे अनेक हिंदी खिरस्ती लोक गांधीजींना ज्ञात असतील. हिन्दी खिरस्ती लोकांत असलेल्या जातिभेदाविषयी त्यांनी आपल्या लिखाणात पुष्कळदा खेद व्यक्त केला आहे. त्याप्रमाणे खिरस्ती झाल्यानंतर लोकांच्या भाषेत व वेश-भूषेत पडणाऱ्या बदलाविषयी त्यांना फार आश्चर्य वाटत असे. ज्या काळात त्यांनी हे आश्चर्य व्यक्त केले तो कालही आपण लक्षात घ्यायला हवा. गांधीजींनी केलेले हे निरीक्षण लक्षात घेता धर्मांतराची विशेष अशी काय उपयुक्तता आहे, हा प्रश्न आपण आजही विचारू शकतो. परंतु आपल्या समाज–शास्त्रज्ञांनी या संदर्भात एका विशेष गोष्टीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अस्पृश्य वर्गातून जे खिरस्ती झाले व खिरस्ती झाल्यानंतर मिशनऱ्यांनी ज्यांना एका नवीन वातावरणात आणले, त्यांच्यात झालेली सुधारणा व त्यांना प्राप्त झालेला विशाल दृष्टिकोन उच्चविद्याविभूषित अस्पृश्य बांधवांस प्राप्त झालेला दिसतो काय ? ह्यांच्यात झालेले हे फरक केवळ धर्मांतरामुळे झाले की त्यामुळे त्यांचे जे स्थलांतर झाले आणि त्याचबरोबर माणूस म्हणून असणारे त्यांचे महत्त्व त्यांना मिळाले म्हणून झाले ?

हा प्रश्न हातावेगळा केल्यानंतर धर्मांतर करणे ह्याला मुळातच विरोध असू शकेल का ? हा प्रश्न विचारात घेऊ. शिक्षणाचे एक मोठे ध्येय म्हणजे

माणसाचे परिवर्तन साधणे. योग्य शिक्षण प्राप्त झालेला मनुष्य हा ‘ नवा मनुष्य होतो. आजचा काल हा झपाट्याने बदलणारा काल आहे. ह्या बदलत्या काळाचे परिणाम आपल्या संस्कृतिबद्ध देशावर मोठ्या प्रमाणावर होत आहेत. एक नवीन समाज निर्माण होत आहे, असे आपण म्हणत असतो. राजकीय क्षेत्रातही ही गोष्ट आम्हाला आढळून येते. ‘ मी कम्युनिस्टही आहे व काँग्रेसवादीही आहे.’ असे काँग्रेस पक्षाचाही माणूस म्हणू शकत नाही. जी तत्त्वे आपण मान्य करतो, ज्या पद्धती आपणाला आवडतात, जी संस्कृती आपल्याला पटते, तिचा उघडपणे पुरस्कार करणे हे सर्वदृष्टया योग्य आहे. एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या धर्माची तत्त्वे आणि पद्धती मान्य असतील आणि त्यामुळे आपल्या आयुष्याची पूर्तता होईल असे त्याला वाटत असेल, तर त्याने तसे जाहीरपणे निवेदन केल्यास त्यात अनुचित काही ठरणार नाही, असे मला वाटते.

धर्मामुळे राजकीय परिस्थिती बिघडत असेल किंवा देशाचे काही अहित होत असेल तर ती बाब वेगळी. ह्या बाबतीतील अंतिम निर्णय जर धर्मांतराच्या विरुद्ध असेल तर इतिहास जागच्या जागीच स्थगित होईल. गांधीजींना जसे धार्मिक व सामाजिक कार्य करायचे होते, तसेच त्यांना राजकीय धुराही वहायची होती. हिंदुस्थान परकीय सत्तेखाली असता गांधीजी हे हिंदी जनतेचे अनभिषिक्त राजे होते आणि हिंदी जनतेत सर्वच धर्मीयांचा समावेश होता.

सारांश, गांधीजींना मिशनऱ्यांच्या कार्यपद्धतीबद्दल काही शंका होत्या. तरी त्यांचे सत्कार्य त्यांना आवडले होते आणि ख्रिस्ती धर्माबद्दल त्यांना आदर होता, आपुलकी होती. माझ्या मते ते हृदय-परिवर्तनाच्या बाजूचे होते व त्याबाबत ते अधिक आशावादी होते. ते तसे नसते तर ब्रिटिश राजसत्तेला आपल्या विचारपद्धतीकडे वळविण्याच्या व हिंसेकडे वळणाऱ्या राष्ट्रवाद्यांना अहिंसावादी बनविण्याच्या प्रयत्नाला ते लागले नसते. किंबहुना सर्वोदयाची चळवळ सुरू करण्याचे धैर्यही त्यांना झाले नसते. कारण सर्वोदयाची चळवळ ही वास्तविक मिशनरी चळवळ आहे आणि तिचे यशही हृदय-परिवर्तनाच्या तत्त्वावर अवलंबून आहे.

५३

# "ईश्वर अल्ला तेरे नाम"

भाई धोत्रे

गांधीजींच्या व्रतांमध्ये सर्वधर्मसमभाव हे एक आहे. त्याचा आशय काय, हे पुढील लेखात सांगितले आहे. त्याच्या अनुषंगाने गांधीजींच्या आश्रमाचे स्वरूपही लेखकाने निवेदन केले आहे.

'ईश्वर अल्ला तेरे नाम' हे महात्मा गांधींनी प्रचलित केलेल्या भजनाचे एक कडवे आहे. ईश्वर आणि अल्ला हे शब्द जरी दोन असले, भिन्न भाषांतील असले, तरी एकाच भगवंताची ती नावे आहेत, असा ह्या कडव्याचा साधा–सरळ अर्थ आहे.

जगाच्या प्रारंभापासून ऋषीमुनी, तत्त्वज्ञानी, कवी, साधुसंत, हीच गोष्ट नाना परींनी समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आले आहेत. ही दिसायला अत्यंत साधी सरळ गोष्ट न समजल्यामुळे किती अनर्थ ओढवले, देशचे देश कसे धुळीस मिळाले, रक्ताच्या नद्या वाहविल्या गेल्या, ह्याची साक्ष इतिहास देत आहे. दूरच्या काळातील इतिहास धुंडाळण्याचीही जरूर नाही. आमच्या डोळ्यांसमोर घडलेला, ज्याचे परिणाम आज आम्ही भोगीत आहोत आणि पुढेही अनिश्चित कालापर्यंत आम्हाला भोगावे लागणार आहेत, तो आमच्या देशाच्या विभाजनाचा ताजा इतिहास, ह्याच गोष्टींचा साक्षी आहे. इतकेच नव्हे तर "ईश्वर अल्ला तेरे नाम" हे कडवे आणि ज्या भजनात हे कडवे आहे ते सारे भजन, ह्या नितांत करुण घटनांनी, व्यथित आणि व्याकुळ झालेल्या, राष्ट्रपुरुष महात्मा गांधींच्या हृदयाला फोडून निघालेला आर्तनाद आहे.

नोआखलीतील अत्याचारपीडित प्रदेशातून पायी फिरत असता, देव आणि धर्म यांच्या नावाने घडलेले अनन्वित प्रकार त्यांच्या दृष्टीस पडले. यथार्थ धर्माचरणाने मनुष्य देवकोटीला पोहोचू शकतो, किंवहुना मनुष्याला देवकोटी-प्रत नेणे हेच धर्माचे एकमात्र प्रयोजन आहे. परंतु मूढ धर्मांधतेने मनुष्य पशू-पेक्षाही हीनकोटीला कसा पोचू शकतो, ह्याचे त्यांना नोआखलीत प्रत्यक्ष दर्शन झाले. ही स्थिती सुधारण्यास मानवी प्रयत्नाला ईश्वरी कृपेचे छत्र मागण्यासाठी " रघुपति राघव राजाराम, पतीतपावन सीताराम । ईश्वर अल्ला तेरे नाम, सबको सन्मति दे भगवान ।। ' हे भजन त्यांनी आपल्या सामुदायिक प्रार्थनेतून सुरू केले आणि थोडयाच अवधीत ह्या भजनाने सर्व देश दुमदुमून गेला. "ईश्वर अल्ला तेरे नाम'' ह्या कडव्याचे सहचारी भाव हे असे कडू व करुण आहेत.

महात्मा गांधी भारतवर्षाचे राजकीय नेते होते. त्यांच्या नेतृत्वाखाली दशाने आपले गेलेले राजकीय स्वातंत्र्य फारच अल्प काळात परत मिळविले ही गोष्ट खरी असली, तरी मूलतः व प्रथमतः ते फार थोर धार्मिक वृत्तीचे पुरुष होते. त्यांच्या हिंदुस्थानातील राजकीय कार्याच्या अगदी प्रारंभीच्या कालातच, "धर्मविरुद्ध मार्गांनी आधी स्वराज्य मिळणेच अशक्य आहे आणि धर्मविरुद्ध मार्गाने, समजा, स्वराज्य मिळालेच तरी मला ते नको आहे, '' असे आपले मत त्यांनी प्रकट केले होते. परंतु त्यांच्या धर्माला व्यवहाराचे वावडे नव्हते. धर्माला जीवनाच्या सर्व व्यवहारात निर्भयपणे वावरता आले पाहिजे, असा त्यांचा विश्वास होता. साबरमतीला त्यांनी जो सत्याग्रहाश्रम स्थापन केला त्यात धर्म आणि व्यवहार ह्यांची सांगड घालण्याचा त्यांचा प्रयत्न होता. ह्या आश्रमाचा उद्देश प्रथमदर्शनी अगदी व्यावहारिक असा भासणारा होता. देशसेवेचे शिक्षण घेणे व देणे असा आश्रमाचा उद्देश जाहीर करण्यात आला होता. हा उद्देश साध्य करण्यासाठी सत्य-अहिंसा-ब्रह्मचर्य-अस्वाद इत्यादि एकादश व्रतांचे पालन अवश्य आहे, असा आश्रमाच्या चालकांचा विश्वास व्यक्त करण्यात आला होता. ही एकादश व्रते पुढे विनोबाजींनी आपल्या विशिष्ट पद्धतीने "अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य-असंग्रह । शरीरश्रम-अस्वाद-सर्वत्र-भयवर्जनम् । सर्वधर्मीं समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना । ही एकादश सेवावीं, नम्रत्वें व्रत-निश्चयें ।।'' ह्याप्रमाणे श्लोकबद्ध केली. सर्व देशभर हा श्लोक सामुदायिक प्रार्थनेतून आज म्हटला जात आहे– व्यक्तिगत प्रार्थनेतूनही म्हटला जात असतो.

आश्रमात जातिभेद, धर्मभेद अजीबात पाळला जात नसे. सामुदायिक शरीर-श्रम, सामुदायिक भोजन व सामुदायिक प्रार्थना हा आश्रमजीवनाचा गाभा समजला जात असे. जशा तऱ्हेचे राष्ट्र निर्माण व्हावे अशी महात्माजींची कल्पना होती,

तशा तऱ्हेचे मानस, तशा तऱ्हेचा आचार, सामुदायिक जीवनाने सिद्ध करण्याचा तो प्रयत्न होता.

गांधीजींचा राजकीय व्याप वाढतच गेला. त्याच्या परिणामी आश्रमातही अनेक परिवर्तने होत गेली. शेवटी १९३३ मधे आश्रमाचे विसर्जनही झाले. पण आश्रमाच्या जीवनाची जी मूलभूत दृष्टी होती, तिचा विकासच होत गेला. राजकीय कार्यामुळे गांधीजी स्वतः फार अल्पकाळ आश्रमात राहू शकत. पण त्यांचा सर्व जीव, ते कोठेही असले तरी, आश्रमाकडे गुंतलेला असे. ते जेथे जेथे जात, तेथे तेथे आपल्या सभोवार आश्रमाचे वातावरण उभे करीत.

आश्रमाची जी अकरा व्रते वर सांगितली आहेत, त्यांतील प्रत्येक व्रताचे स्वरूप स्पष्ट समजावून सांगण्यासाठी, गांधीजींनी १९३० साली येरवडा जेलमधे असताना, आश्रमवासीयांना लिहिलेली पत्रे 'मंगल प्रभात' ह्या नावाने प्रकाशित केली गेली आहेत. हे छोटेसे पुस्तक, म. गांधींचे विचार समजून घेण्याची इच्छा असणाऱ्याने मननपूर्वक अभ्यासिले पाहिजे. पैकी "ईश्वर अल्ला तेरे नाम" या कडव्याशी संबंधित "सहिष्णुता" अथवा "सर्वधर्मसमभाव" याविषयींचे गांधीजींचे विचार थोडक्यात मांडण्याचा मी प्रयत्न करतो.

गांधीजींच्या मते, आपल्याला माहीत असलेल्या जगातील सर्व प्रचलित धर्मांचे मूलभूत सिद्धांत एकच आहेत; सत्य व्यक्त करणारे आहेत. परंतु हे धर्म अपूर्ण मनुष्याच्या द्वारे व्यक्त झालेले असल्याने, अपूर्ण व असत्यमिश्रित आहेत. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे, आपल्या धर्माविषयी आपल्याला जितका आदर वाटतो, तितकाच अन्य धर्माविषयीही आपल्याला वाटला पाहिजे. जेथे असा आदर असेल, तेथे मग एक-दुसऱ्याच्या धर्माचा विरोध करील हे संभवत नाही— दुसऱ्या धर्मातून आपल्या धर्मात आणण्याचा प्रयत्नही संभवत नाही. 'सर्व धर्मांतील दोष दूर होवोत हीच एक प्रार्थना संभवते— आणि याच भावनेचा परिपोष करणे योग्य आहे. गांधीजींची धर्मविषयक विचारसरणी ही अशी होती.

गांधीजींच्या विचारसरणीत धर्मांतराला स्थान नाही. 'समभावा'त धर्मांतर कसे बसणार? सन १९२८ मधे 'इंटरनॅशनल फेलोशिप' पुढे केलेल्या भाषणात, गांधीजींनी ह्यासंबंधी आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली होती. खऱ्या धार्मिक पुरुषाला, दुसऱ्याने स्वतःचा धर्म सोडून आपल्या धर्मात यावे, असे कधीच वाटणे शक्य नाही, वाटू नये, असे त्यांनी प्रतिपादले होते. जर मी चांगला हिंदुधर्मी असेन तर त्याचा स्वाभाविक परिणाम, माझा मुसलमान मित्र अधिक चांगला मुसलमान होण्यात, माझा खिरस्ती मित्र अधिक चांगला खिरस्ती होण्यात दिसून यायला पाहिजे. मी जर चांगला इस्लामधर्मी असेन, तर त्याचा परिणाम माझे हिंदू व खिरस्ती मित्र अधिक चांगले हिंदू व खिरस्ती होण्यात दिसून यावयास पाहिजे.

माझी प्रार्थना, " हे प्रभो, जो प्रकाश तू मला दिला आहेस, तोच माझ्या मित्राला दे '' अशी असता कामा नये. पण " माझ्या मित्राच्या सर्वोत्तम विकासासाठी, जे सत्य-दर्शन आणि जो प्रकाश आवश्यक असेल तो संपूर्ण त्याला दे, '' अशी असावयास पाहिजे, असे गांधीजींनी सांगितले होते.

सर्वधर्मसमभावाचा विकास गांधीजींच्या जीवनात व आश्रमाच्या जीवनात कसा होत गेला, त्याची हकीकत फारच मनोज्ञ आहे.

म. गांधीजींच्या आश्रमीय जीवनाला दक्षिण आफ्रिकेपासूनच प्रारंभ झाला होता. दक्षिण आफ्रिकेतील फिनिक्सच्या आश्रमांतही नियमितपणे सामुदायिक प्रार्थना होत असे. प्रार्थनेला हिंदू, खिरस्ती, मुसलमान, पार्शी इ. सर्व धर्मांचे लोक असत. गांधीजींचे परम स्नेही श्री. रुस्तमजी सेठ आणि त्यांच्या घरची मंडळीही असत. प्रार्थनेतील " मने वहालूं रे वहालूं, दादा रामजीनु नाम '' हे भजन श्री. रुस्तुम सेठजींना फार आवडायचे. एकदा भक्तिरसात रंगून ते सहज म्हणून गेले, " दादा रामजी ''च्या ऐवजी " होर मझद '' म्हणा ना ? भजन म्हणणाऱ्याने लगेच तसे केले. इतरांनीही त्यांना साथ दिली. हा क्रम श्री. रुस्तुम सेठजींच्या गैरहजेरीत पण चालत असे. गांधीजींचे दुसरे स्नेही, श्री. दाऊदशेठ ह्यांचे चिरंजीव हुसेन, पुष्कळदा आश्रमात येऊन रहात, पेटी वाजवीत. पेटीची साथ स्वत:च करून " ये वहारे वाग दुनिया चंद रोज '' हे पद ते फारच वहारदार रीतीने म्हणत. त्यांच्या स्मरणार्थ हे पदही 'आश्रमभजनावली 'त दाखल केले गेले. एक खिरस्ती मित्र श्री. जोसेफ रायपेन हे आश्रमात नेहमी येत-जात असत. त्यांना " वैष्णव जन तो तेणे कहिये,'' हे पद फार आवडे. ते स्वत: चांगले गाणारे होते. त्यांनी एकदा रंगांत येऊन " वैष्णव जन तो'' च्या ऐवजी " खिरश्चन जन तो तेणे कहिये'' अशी सुरुवात केली. इतरांनीही त्यांना साथ दिली. श्री. जोसेफ रायपेन खुश होऊन गेले. अशा प्रकारे आश्रमप्रार्थनेचा निरंतर विकासच होत गेला. पुढे त्यांच्यात बौद्ध प्रार्थना व जरथोस्त्री प्रार्थना (पारशी प्रार्थना) तसेच कुराणातीलही प्रार्थना आली. गांधीजी मूलत: व स्वभावत: धार्मिक पुरुष असल्याने, त्यांच्या जीवनात ईशप्रार्थनेला, सर्वधर्मसमभावाला, आद्य स्थान होते. " अन्नाशिवाय मी एक वेळ काळ कंठू शकेन, पण प्रार्थनेशिवाय नाही, '' असे ते म्हणत असत.

पण हे सर्व जरी खरे असले तरी, प्रारंभी म्हटल्याप्रमाणे, ज्या नितांत करुण घटनेतून " ईश्वर अल्ला तेरे नाम '' हा आर्तनाद निघाला, त्या घटनेचा अर्थ काय ? भारतवर्षासारखी धर्मभूमी, महात्मा गांधींसारखा धर्मपरायण नेता, सुधारणेच्या कळसाला पोहचू पहाणारे इसवी सनाचे विसावे शतक, असे असताना देवाच्या नावाने, धर्माच्या नावाने रानटी युगालाही लाजवील असे प्रकार कसे घडून आले ? कसे घडून येतात ?

एकदा 'सर्व–धर्म–सम–भाव' ह्या विषयासंबंधी चर्चा चालू असता, आचार्य विनोबा भावे ह्यांनी असे सांगितले की, "मुळात धर्मभावना असेल तर तिच्यातून, सर्वधर्मसमभावाचा विकास करणे शक्य आहे. पण आज जगात सगळ्यात भयंकर गोष्ट कोणती असेल तर ती, सर्व–धर्म–सम–अभाव. धर्माचा अभाव वाढत आहे, नास्तिकता वाढत आहे.'' म्हणजे धर्मात शिरलेली थोडीफार अशुद्धता काढून टाकून, धर्माला अधिक शुद्ध करण्याचा प्रश्न आमच्यापुढे नसून, मुळात धर्माचीच संस्थापना करण्याचा प्रश्न आमच्यापुढे उभा आहे, असे म्हणावे लागते. सबंध महाभारत ग्रंथ लिहिल्यावर, महर्षी व्यासांनाही असे म्हणण्याची पाळी आली की, " अरे बाबांनो, धर्माचे पालन करा. धर्मानेच अर्थ व काम सिद्ध होणार आहेत, असे बाहू उभारून, आक्रोश करून मी सांगतो आहे, पण माझे कोणी ऐकतच नाही.'' धर्माचा प्रसार करीत खिरस्त क्रूसावर चढला. आधुनिक काळात आपल्या देखत महात्मा गांधींचा वध झाला. असे हे निराश जनक चित्र दृष्टीस पडते. पण ह्याला दुसरी बाजूही आहे. महात्मे आपल्या जीवनाने जो संदेश देऊन गेले, ज्या धार्मिक पुरुषांनी आपल्या तपश्चर्येच्या अमृताने पृथ्वी-तलावर धर्मवृक्षाची आजपर्यन्त जोपासना केली, त्यांची परंपरा खंडित होणार नाही. हाही इतिहासाचाच संदेश आहे.

आमच्यापुढे ही परंपरा टिकविण्याचे प्रचंड कार्य उभे आहे. त्यासाठी फारच प्रचंड प्रयत्नांची जरूरी आहे. महात्म्यांनी जो संदेश आपल्या जीवनाहुती देऊन दिला आहे, तो मनात सतत वाढवून आपण ईश्वराची प्रार्थना करू या.

## ५४

# गांधीजी आणि सामाजिक धर्मबुध्दी

वि.स. खांडेकर

मानवी मनात जसे अमंगल आहे, तसेच मंगलहि आहे. तो मांगल्याचा अग्नि-कण फुलविण्यावरच गांधीजींनी आपले लक्ष केंद्रित केले होते. सामाजिक धर्मबुद्धी जागृत करण्याचा प्रयत्न त्यांनी जन्मभर केला. करुणेची मंदाकिनी दग्ध सागरपुत्रापर्यंत – दीनदलितापर्यंत – पोचविण्यासाठी त्यांनी आपले सर्व जीवन कसे वाहिले, हे पुढील लेखात विवेचिले आहे.

लोकमान्य टिळक एकदा म्हणाले होते, "मी स्वराज्यात जन्माला आलो असतो, तर राजकारणाच्या भानगडीत मुळीच पडलो नसतो. मी गणिताचा प्राध्यापक झालो असतो किंवा संशोधनात रमून गेलो असतो." टिळकांचा हा सहजस्फूर्त उद्गार त्यांच्या अंतरीची ओढ दर्शविणारा, त्यांच्या आत्म्याची भूक कोणती होती यावर जाता जाता प्रकाश टाकणारा आहे.

गांधीजींच्या बाबतीत हाच प्रश्न केला तर त्याचे उत्तर काय येईल ? त्यांचा जन्म स्वराज्यात झाला असता, तर जीवनकार्य म्हणून त्यांनी कोणत्या क्षेत्राची निवड केली असती ? त्यांच्यातल्या संताने समाजाकडे पाठ फिरवून अध्यात्मसाधनेसाठी हिमालयाची वाट धरली असती ? त्यांच्यातल्या कवीने स्वराज्य-संपादन करणाऱ्या महाभागांवर महाकाव्य लिहिले असते, की रामराज्याचे स्वप्न

चित्रित करण्याकरिता आपली प्रतिभा खर्ची घातली असती ? राष्ट्ररक्षण करणाऱ्या सेनापतीची भूमिका घेऊन त्यांच्यातल्या वीरपुरुषाचे समाधान झाले असते काय ? त्यांच्यातल्या सत्यशोधकाला प्रयोगशाळेच्या चार भिंतींत स्वतःला कोंडून घेण्यात आणि पदार्थविज्ञान अथवा रसायन यांतला एखादा शोध लावण्यात आनंद वाटला असता ? की तो संशोधक त्या चार भिंतींच्या बाहेर पडून, चार दिशांमधे सामावलेल्या मानवाच्या अंतरंगाचा शोध घेऊ लागला असता ?

या सर्व प्रश्नांचे उत्तर, गांधीजी यांपैकी कोणत्याही मार्गाने वाटचाल करीत राहिले नसते हेच आहे. मानवी जीवन– रस्त्याच्या कडेला जखमांना चिंध्या बांधून बसलेल्या महारोग्यापासून राजवाड्यातल्या महालात रेशमी वस्त्रांनी लपेट-लेल्या महाराणीपर्यंत पसरलेले विचित्र, विशाल, विरोधपूर्ण जीवन–हेच गांधीजींचे अध्यात्म होते. त्यांचे महाकाव्य, त्यांची समरभूमी, त्यांची प्रयोगशाळा–सारे सारे काही मानवी जीवनाच्या रोगनिदानात, उपचारात आणि सेवाधर्मात समाविष्ट झाले होते.

गांधीजींच्या आत्म्याची भूक पैशाने, प्रतिष्ठेने, पांडित्याने, पराक्रमाने किंवा दुसऱ्या कोणत्याही लौकिक पुरुषार्थाने क्षणभरही शांत होणारी नव्हती. या सर्व गोष्टींचे दैनंदिन व्यवहारातील महत्त्व त्यांना मान्य होते. पण त्यांच्या अंतरीच्या ओढीचे अगदी जवळचे नाते होते, ते बुद्धाच्या आणि ख्रिस्ताच्या आत्म्याच्या भुकेशी. दुःख, दैन्य आणि दारिद्र्य यांनी ग्रासलेला माणूस– मुख्यतः भारतीय माणूस– हा त्यांच्या चिंतेचा, चिंतनाचा आणि कर्तृत्वाचा केंद्रबिंदू होता. गांधी-जींच्या जीवनाचे हे सूत्र लक्षात घेतले म्हणजे वाटते, ते स्वराज्यात जन्मले असते, तर त्यांनी लोकशिक्षण, लोकजागृती आणि लोकपरिवर्तन या कार्यक्रमालाच स्वतःला वाहून घेतले असते. "बुडती हे जन, देखवेना डोळां" हा त्यांच्या आत्म्याचा आक्रोश होता. मृत्यूपूर्वी काही दिवस आधी, वयाच्या ७९ व्या वर्षी, काँग्रेस पक्षाचे रूपांतर "लोकसेवक संघात" व्हावे, ही आपली इच्छा त्यांनी स्पष्टपणे प्रगट केली होती. त्यांची ही अंतिम इच्छा दुसरे काय दर्शविते ?

एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाच्या संगमावर गांधीजींना जाणतेपणी जगाचे जे दर्शन घडले ते अत्यंत दुःखप्रद होते. एखाद्या उत्पाती पोरट्याने अति-शय सुंदर असे चित्र शाईने वरबटून टाकावे, तशी मानवी जीवनाची स्थिती झाली आहे, असे त्यांना आढळून आले. दारिद्र्यापासून युद्धापर्यंत जीवनाच्या जखमा सर्वत्र चिघळल्या होत्या. आशिया आणि आफ्रिका खंडांत तर अशा जखमांवर माशा घोंगावत होत्या. "नरेच केला हीन किती नर !" ही उक्ती पावलोपावली प्रतीत होत होती. ज्ञान-विज्ञानाचे आणि सत्ता-संपत्तीचे पलिते हाती घेऊन राक्षसी स्वार्थ निश्चेष्ट मानवतेपुढे नंगा नाच घालीत होता. गांधींनी हे सारे सारे पाहिले–

अनुभविले— भूकंपाची नोंद करणाऱ्या यंत्राच्या सूक्ष्मतेलाही लाजविणाऱ्या हळुवार हृदयाने अनुभविले. प्रथम आफ्रिकेतल्या काळ्या-गोऱ्यांमधल्या अमानुष भेदभावांच्या रूपाने; नंतर भारतात जित-जेते, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, खेडे-शहर, स्पृश्य-अस्पृश्य, अशिक्षित-सुशिक्षित, कामगार आणि मालक, शेतकरी व जमीनदार इत्यादिकांमध्ये पसरलेल्या खोल-खोल अक्राळविक्राळ दऱ्यांच्या रूपाने ! अन्याय, जुलूम, विषमता, गुलामगिरी, पिळवणूक यांच्या सर्वत्र माजलेल्या या विषारी रानात, संस्कृतीने फुलविलेल्या विविध फुलांचा सुवास कुठल्या कुठे नाहीसा होऊन जात होता. तो सामान्य माणसापर्यंत पोचावा म्हणून बाह्य जीवनाची आमूलाग्र पुनर्रचना करणे जेवढे आवश्यक होते, तेवढीच मनुष्याच्या मनाची जडण-घडणही बदलणे जरूर होते. केवळ एक जुनाट चौकट बदलून तिच्या जागी नवी चौकट घालण्याने हे काम भागणार नव्हते. चौकटीप्रमाणे चित्रही बदलणे अपरिहार्य होते.

विद्यार्थी-दशेपासून कठोर आत्मपरीक्षणाच्या साहाय्याने गांधीजी स्वतःच्या जीवनाला इष्ट वळण लावीत आले होते. समाज— आणि त्याचा सर्वात महत्त्वाचा घटक असलेला सामान्य मनुष्य— यांच्यामधेही असाच बदल घडवून आणला पाहिजे, तरच जगाला सुखासमाधानाचा मार्ग सापडेल, या श्रद्धेने त्यांनी आपल्या जीवन-कार्याला सुरुवात केली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे सेनानी म्हणून वर्षानुवर्ष प्रबळ परकीय सत्तेशी झुंजत असतानाच भारतीय माणूस दारिद्र्याच्या पकडीतून सुटावा, अन्यायाच्या चिडीप्रमाणे न्यायाची चाडही त्याच्या ठिकाणी निर्माण व्हावी, वैयक्तिक उत्कर्षाची स्वप्ने पाहत असताना त्याची सामाजिक जिम्मेदारीची जाणीव जागृत राहावी आणि माणुसकीला काळिमा लावणाऱ्या ज्या ज्या गोष्टी सभोवताली घडत असतील त्यांच्याविरुद्ध त्याने निर्भयपणाने उभे राहावे, याविषयी ते सतत प्रयत्न करीत राहिले. विचार, उच्चार, आचार आणि प्रचार यांच्या द्वारे त्यांनी लोकजागृती घडविली; लोकशिक्षणाचा पाया घातला; या कठिण मार्गावरील वाटचाल सोपी व्हावी म्हणून चळवळी केल्या; संघटना बांधल्या, नवनव्या प्रेरणा दिल्या.

राजकीय स्वातंत्र्य मिळविणे आणि भौतिक समृद्धीचा मार्ग चोखाळणे या गोष्टीपेक्षा जडभरत झालेल्या समाज-मनात परिवर्तन घडवून आणणे हे फार अवघड काम आहे. मनुष्य दुसऱ्याकडून दयेची अपेक्षा करतो, त्याने आपल्याला न्याय द्यावा म्हणून टाहो फोडतो ! पण दुसऱ्यावर दया करण्याची वेळ आली म्हणजे या साऱ्या गोष्टी तो सोयीस्करपणे विसरतो. न्याय मागायला तो एका पायावर तयार असतो; परंतु न्याय द्यायची वेळ आली म्हणजे तो आपला हात आखडता घेतो—एवढेच नव्हे तर दोन्ही डोळे मिटून मौनव्रत धारण करतो! स्वार्थाचा प्रश्न आला—मग तो स्वार्थ कितीही क्षुद्र असो—की मनुष्य चटकन पशूच्या पातळी-

वर उतरतो. आपल्या स्वार्थबुद्धीवर धर्माचे, शास्त्राचे, कायद्याचे, परंपरेचे, ऐहिक किंवा पारलौकिक शिक्षेचे अथवा असेच दुसरे कुठले तरी शिक्कामोर्तब करवून घेतो. साहजिकच तो एका बाजूने आत्मवंचक आणि दुसऱ्या बाजूने परपीडक बनतो. जगातल्या निम्म्या दुःखांचा उगम माणसाच्या या आत्मवंचनेच्या पोटी झाला आहे. " मनुष्यातला पशू त्याच्या मनाच्या गुहेत कुठे तरी आत आत दडून बसलेला असतो, असे पूर्वी आम्हाला वाटत असे. पण वस्तुस्थिती तशी नाही. तो त्या गुहेच्या तोंडाशीच दबा धरून बसलेला असतो.''(The brute in man lics nearer to the surface than we used to think ) असे बर्ट्रांड रसेलने म्हटले आहे, ते याच दृष्टीने.

विसाव्या शतकातल्या तथाकथित सुसंस्कृत मनुष्याचे हे अमानुष रूप गांधींना अपरिचित नव्हते. पण माणसातल्या पशुत्वाच्या वर्चस्वाइतकीच त्याच्या ठिकाणी असलेली देवत्वाची ओढही सत्य आहे, असे त्यांचा अनुभव त्यांना सांगत होता. जग सुधारायचे असेल, मानवी जीवन सुखी व्हायचे असेल, तर मनुष्याच्या मनातल्या अमंगलाच्या दर्शनाने हताश होऊन चालणार नाही, या राखेच्या ढिगात मंगलाचा जो जिवंत अग्निकण आढळेल तो फुलविण्यावरच आपण आपले लक्ष केन्द्रित केले पाहिजे, असे गांधीजींचे तत्त्वज्ञान होते. राजकीय स्वातंत्र्य, ज्ञान-विज्ञानाचा प्रसार, उद्योगधंद्यांची वाढ, उत्पादनातली प्रगती आणि सर्व प्रकारच्या विषमतेविरुद्ध केले जाणारे कायदे या सर्व गोष्टी केव्हाही स्वागतार्ह आहेत. पण जगाची विस्कटलेली घडी नीट बसविण्याच्या कामी त्यांची शक्ती नेहमीच तोकडी पडत आली आहे. या सर्व गोष्टींना सामाजिक धर्मबुद्धीचे अधिष्ठान अवश्य हवे, हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे सार होते. तात्कालिक ज्वलंत प्रश्न सोडवितानाही जीवनाला आधारभूत असलेल्या चिरंतन मूल्यांचा त्यांनी सदैव हिरिरीने पुरस्कार केला, याचे कारण हेच आहे. मूल्यविचार हा माणुसकीचा आत्मा आहे. तो जीवनात सदैव जागता ठेवला पाहिजे, हे त्यांचे आवडते सूत्र होते.

माणसाच्या मनातल्या मांगल्याच्या अग्निकणाविषयी गांधीजी निःशंक होते. ज्याला लोकपरिवर्तन करावयाचे आहे, त्याने तो कण विझून जाऊं नये याची दक्षता घेतली पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होती. या संदर्भात त्यांनी दिलेले एक उदाहरण मननीय आहे. ते म्हणतात, " माझ्या बाळपणी राजकोटमधे दोन आंधळे कलावंत होते. त्यांतला एक होता वादक. तो आपल्या वाद्याच्या तारांवरून अशी सहज आणि अचूक बोटे फिरवी की, लोक ते मधुर सूर ऐकून मंत्रमुग्ध होऊन जात. प्रत्येक माणसाच्या हृदयातही अशा तारा असतात. त्यातली योग्य तार कशी छेडायची, हे ज्याला कळेल, तो मानवी अंतःकरणातील संगीत सहज आविष्कृत करू शकेल. ''

गांधीजींना अभिप्रेत असलेली सामाजिक धर्मबुद्धी हा या हृदयसंगीताचा गाभा आहे. 'सामाजिक धर्मबुद्धी' तील धर्म या शब्दाने पुरोगामी मंडळींनी बिचकण्याचे किंवा सनातनी मंडळींनी परंपरागत धार्मिकतेशी त्याचा संबंध जोडण्याचे काही कारण नाही. गांधीजी आस्तिक होते, पण भारतीय मनाला प्रिय असलेल्या भोळचाभावडचा भाविकतेचा लवलेशदेखील त्यांच्या ठिकाणी नव्हता. "ईश्वराला देवाज्ञा झाली आहे." (God is dead) हे जाहीर करणाऱ्या नित्झेला काय किंवा त्याच्या पावलावर पाऊल टाकून जाणाऱ्या अन्य पाश्चात्य प्रतिभावंतांना काय, गांधीजींच्या सृष्टीत स्थान नव्हते. माणसातल्या ईश्वरी अंशावरली त्यांची श्रद्धा कधीच विचलित झाली नाही. एके ठिकाणी ते म्हणतात, "माणसामधे उदात्त म्हणून जे काही असेल त्याचा आविष्कार करवून घेण्याची युक्ती मला साधली आहे. ईश्वर आणि मनुष्य या दोहोवरली माझी श्रद्धा त्यामुळेच अढळ राहिली आहे."

गांधीजींना अभिप्रेत असलेली 'सामाजिक धर्मबुद्धी' सर्वस्वी नवी होती असे नाही. भारतीय संस्कृतीला आधारभूत असलेल्या तत्त्वज्ञानात तिचा आढळ पदोपदी होतो, "ईशावास्यमिदं सर्वम्" पासून "जे का रंजले गांजले" पर्यंत मनुष्यातल्या मांगल्याची उच्च शिखरे गाठणाऱ्या ऋषींच्या आणि संतांच्या या वाणीचे दुर्दैव असे की, तिला करणीची पुरेपूर जोड कधीच मिळाली नाही! आकाशात काळचाकुट्ट ढगांनी गर्दी करावी, पर्जन्यराजाच्या स्वागतार्थ नगारे झडू लागावेत, विजेची तोरणे क्षणाक्षणाला फडफडत राहावीत, पण खालची उन्हाने भाजून काढलेली आणि तहानेने व्याकुळ झालेली धरणी मात्र कोरडी राहावी, तसे आपल्या सामाजिक इतिहासात घडले. करुणेची ही मंदाकिनी दग्ध सगरपुत्रांपर्यंत कधीच पोचली नाही.

ही गंगा पाताळापर्यंत गेली पाहिजे, तिथल्या दीन-दलितांना तिने संजीवन दिले पाहिजे, सामाजिक विचार आणि आचार यांच्यात एकरूपता असली पाहिजे, हा हट्ट गांधींनीच धरला. जनमनात तो रुजावा म्हणून अट्टाहास केला. ते केवळ राजकारणी पुरुष असते, तर राष्ट्रवादी भूमिका स्वीकारून त्यांचे समाधान झाले असते. पण ते मूलतः मानवतावादी होते. सामाजिक करुणेच्या भोवती जड पावलांनी प्रदक्षिणा घालीत असलेल्या भारतातल्या मानवतावादाला त्यांनी सामाजिक न्यायाच्या वरच्या पातळीवर सुप्रतिष्ठित केले. शतकानुशतके खंडित झालेले समाजजीवन वाहते व्हावे आणि वाहता वाहता त्याला निर्मळपणा प्राप्त व्हावा, याची त्यांनी आमरण चिंता वाहिली.

देवालयाच्या चार भिंतींत शृंखलाबद्ध होऊन पडलेल्या धर्मबुद्धीला गांधीजींनी मुक्त केले– भंगीवस्तीपर्यंत तिला नेले. कर्मकांडात कोंडल्या गेलेल्या सामाजिक

मनाने गांधीजींच्या प्रेरणेने बंडाचा झेंडा उभारला– कर्मकांडाची जागा कर्मयोगाने घेतली. पोथ्या-पुराणांच्या पर्वतप्राय राशीखाली अर्धमेल्या होऊन पडलेल्या माणुसकी-ला गांधीजींनी त्या अवाढव्य ढिगाऱ्याखालून बाहेर काढले आणि खेड्यापाड्या-तल्या हरिजनांच्या अंगणात आनंदाने नाचायला लावले. सर्व लहानमोठ्या सामाजिक व्यवहारांना ममता आणि समता यांच्यावर आधारलेल्या क्रियाशील धर्मबुद्धीचे अधिष्ठान असले पाहिजे, याची जाणीव गांधींच्या इतकी विविध मार्गांनी पूर्वी दुसऱ्या कोणीही करून दिली नसेल.

प्राचीन धर्मांनी मनुष्याला 'माणूस' बनविण्याचा प्रयत्न केला आकाशाकडे दृष्टी लावून. गांधींनी ती दृष्टी धरित्रीकडे वळविली. मनुष्याची स्वार्थबुद्धी स्वाभा-विक असली तरी या बंदिस्त घराला सामाजिक धर्मबुद्धीच्या रूपाने खिडक्या-दारे हवीत, तरच हवा आणि प्रकाश आत येतील, हे सामान्य माणसाला त्यांनी पुनः पुनः पटविले. भारताच्या भावी पिढ्यांना त्यांनी दिलेली ही सर्वात मोठी देणगी आहे. त्यांचा संदेश एकच आहे– "अंतरिचा प्रेमदिवा मालवू नको रे!" गांधी-जींनी दिलेला हा प्रकाशच आजच्या दाटलेल्या अंधारातून भारतीय मनाला आणि जीवनाला सुखशांतीचा मार्ग दाखवील.

५५

# खादी - एक नवी जीवन-पद्धति

**— कमलनयन बजाज**

गांधींची खादी हे केवळ अर्थशास्त्रीय तत्त्व नव्हते; त्यात मानवतेला मुख्य स्थान होते. स्वातंत्र्यानंतरच्या वीस वर्षांत खादीकार्याला ओहोटी का लागली आणि यापुढे तिचे भवितव्य कसे घडविता येईल याचे विवेचन पुढील लेखात केलेले आहे.

खादी हे केवळ कापडही नव्हे वा पोशाखही नव्हे. त्यामागे काही निश्चित विचारांची बैठक व तत्त्वज्ञान आहे. मानवी जीवनात धार्मिक, नैतिक, राजकीय, सामाजिक, त्याचप्रमाणे आर्थिक अशी विविध विषमता आढळून येते. तिला तोंड देऊन उत्तम रीतीने कसे जगावे यावर खादी हा एक पर्यायी तोडगा आहे. महात्मा गांधींना मानवतेची सेवा करताना जे अनुभव आले त्याचे सार म्हणजेच खादी. खादी हे केवळ जीवनाचे शास्त्रच नाही, तर भारताचे आपले स्वतःचे असे अर्थशास्त्रही आहे.

अर्थशास्त्रातील तज्ज्ञ व प्रगाढ पंडित तसेच सरकारी शासक यांच्या मते, आर्थिक दृष्ट्या खादी ही कुचकामी ठरते. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या कार्यातील एक कार्यक्रम व त्या चळवळीच्या कार्यक्रमातील कार्यकर्त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी दिलेले एक वस्त्र, यापेक्षा अधिक महत्त्व ते खादीला देण्यास तयार नाहीत. स्वातंत्र्यप्राप्तीबरोबरच खादीचे महत्त्व संपले, अशी त्यांची धारणा आहे.

त्यांच्या मते, महात्मा गांधींमुळेच खादीबाबतची आस्था व लोकप्रियता अजून टिकून आहे. म्हणून खादीला सध्या जे अनुदान मिळते, ते राजकीय लाचारीचे द्योतक असून त्यामागे दयाबुद्धी छिपलेली आहे. श्रीमंत व गरीब यांच्या अंतःकरणाची सांगड घालणारी प्रतिष्ठा, स्वाभिमान व स्वावलंबन यांची द्योतक अशी खादीची ख्याती होती. आज तिला भीक मागणाऱ्यांच्या पंक्तीला नेऊन बसविण्यात येत आहे. स्पर्धाद्वेषादीला बळी पडून तिच्याबाबत बेजबाबदारपणे बोलले जाते व द्वेषमूलक भावनेला खतपाणी घातले जात आहे. आज देशात सर्वत्र बेकारी आहे. एका बाजूला, ज्यांच्याजवळ शिक्षण व कला यांचे पाठबळ आहे, अशा लोकांना नोकऱ्या अगर काम मिळत नाही; तर दुसऱ्या बाजूला, अशिक्षित, दुःखी, भुकेने पिडलेले व अंगभर वस्त्र नसलेले व भाकरीच्या तुकड्यालाही मौताद असलेले असे चहू बाजूंनी गरीबीने ग्रासलेले लोक आहेत. त्यांना कामधंदा नाही. या उभय प्रकारच्या बेकार लोकांना केवळ खादीच आसरा किंवा सहारा देऊ शकेल. खादीमुळे संपूर्ण उदर-निर्वाह होऊ शकणार नाही. तथापि, याचा अर्थ असा नव्हे की, ज्यांना आज काहीच मिळत नाही त्यांच्यासाठी खादीचा असलेला आसरा कायमचा बंद करून टाकावा.

**बेकारीवर तोडगा**

बेकारी म्हणजे देशाचे एक प्रकारचे आजारपण होय. त्या आजारपणावरील एक उपचार म्हणजेच खादी. हा उपचार स्वावलंबी होऊ शकत नाही. तो तसा नाही म्हणून त्याची उपेक्षा करणे हे केवळ अव्यावहारिकच नव्हे तर माणुसकीला सोडून होईल. ज्या इस्पितळात उपचार केले जातात ती स्वावलंबी असावीत असे आपण मानीत नाही, त्याचप्रमाणे खादीचेही आहे. समाजातील अगदी खालच्या थरात जे लोक आहेत, त्यांच्या जीवनातील आशेला प्रकाश दाखविण्याचे काम खादी करते. खालच्या थरातील लोकांना वर आणण्याचे काम खादी करते. त्यांना संपूर्ण भाकरी देण्याचे सामर्थ्य कदाचित तिच्यात नसेल; परंतु ज्याला कित्येक लोक आज वंचित आहेत तो भाकरीचा तुकडा, ती सहज देऊ शकते. आर्थिक दृष्ट्या स्वस्त असा खादीशिवाय दुसरा कोणताही उत्पादन-मार्ग आज उपलब्ध नाही. देणाऱ्याची व घेणाऱ्याची प्रतिष्ठा व स्वाभिमान याला धक्का बसणार नाही, अशी किमया फक्त खादीतच आहे.

**अर्थशास्त्राचा पाया कोणता ?**

मानवाचे कल्याण कसे होईल याचा काडीमात्र विचार न करता, रुपये-पैसे यांच्या जंजाळातून जे बाहेर पडत नाही, अशा अर्थशास्त्राचा उपयोग काय ? त्यामुळे अनर्थच ओढवायचा. गांधीजींचे अर्थशास्त्र मानव-कल्याणाच्या पायावर आधारलेले आहे. तो त्याचा पाया आहे आणि हीच भारतीय परंपरा आहे. याच

तत्त्वावर आमची संस्कृती डवरली व फोफावली. मानव व त्याचे कल्याण यांच्याशी सुतराम् संबंध नसलेले अर्थशास्त्र भौतिकवादाला व राक्षसी वृत्तीला पोषक ठरेल. शेवटी पैसा मोठा की मानव मोठा, याचा आपल्याला निर्णय करावा लागेल.

रावणाची लंका सोन्याची होती. रावण विद्वान व गाढा पंडित होता. ऐश्वर्य व भोगविलासाची सर्व साधने त्याच्या पायाशी लोळण घेत होती. त्याच्या राज्यात नैतिकताही काही कमी नव्हती. सामाजिक बंधनांनाही तो मानीत असे. राज्याच्या कायदेकानूंचे पालनही तो करीत असे. परंतु रावणात आध्यत्मिक वृत्तीची उणीव होती. भौतिकवादावर भिस्त ठेवणारे किंवा असणारे आजचे अर्थशास्त्र व रावणाची लंका यांच्यामध्ये फारसा फरक दिसून येत नाही. अशा तऱ्हेच्या अर्थशास्त्रामुळे भोगविलासाची सर्व साधने उपलब्ध होऊनही प्रजेला संपूर्ण सुख व शांती मिळू शकत नाही.

बडे व छोटे उद्योगधंदे, ग्रामोद्योग, इतर घरगुती उद्योगधंदे आदी जे जे म्हणून उद्योगधंदे आपल्या देशात आहेत, त्यांचे बारकाईने परीक्षण केल्यास व त्यामध्ये उपयोगात आणलेली साधन-सामग्री, संपत्ती व त्यांच्या व्यवस्थापनेतील खर्च यांची जर गोळाबेरीज केली, तर आपल्याला हे आढळून येईल की, झोपडी-मध्ये रहाणाऱ्या गोरगरिबांच्या ते आवाक्याबाहेरचेच नव्हे, तर कुवतीबाहेरचेही आहेत. खादीच केवळ त्यांच्या झेपेच्या पल्ल्यांत बसू शकते. आपल्या देशाच्या लोकसंख्येकडे पहाता अधिकाधिक लोकांना शेतीच्या कामात गुंतून राहावे लागणार आहे. त्या कामातून ज्यांना थोडाफार वेळ मिळतो किंवा शेतीत ज्यांना पूर्ण वेळ काम मिळत नाही किंवा ज्यांच्याजवळ उपजीविकेचे काडीमात्र साधन नाही, त्यांना आपण कोणते व कशा रीतीने काम देणार ? आजचे अर्थशास्त्रज्ञ, शासक व मंत्री यांनी याचा कधी विचार तरी केला आहे काय ? स्वातंत्र्य मिळून २० वर्षांवर काळ लोटला आहे. या बेकार लोकांना रोजगार वा कामधंदा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सरकारने काही मार्ग शोधून काढला आहे काय ?

**मानव्याचा विचार**

'अशोक मेहता समिती 'ने खादी व ग्रामोद्योग याबाबत सादर केलेला अहवाल हा दोन विभिन्न मतप्रणालींमधील एक तडजोड आहे. अहवालातील भाषेचा पसारा व शब्दावडंबर खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. या समितीत जे अर्थशास्त्रतज्ज्ञ, विद्वान व खादीवर विश्वास बाळगणारे कार्यकर्ते होते, त्यांच्या विचारसरणीत स्पष्टपणे विरोध दिसून येतो. त्यांच्या विचारसरणीत रोग्याचा विचारच नाही. आहे केवळ त्याच्यावरील उपचाराची भारी चिकित्सा आणि तीही सुंदर, मनमोहक व दिलखेच शब्दांच्या कोंदणात बसवलेली व भाषामाधुर्याने नटलेली. रोगी तर मरणोन्मुख होऊन अंथरुणाला

खिळलेला, आणि त्याच्यावरील उपचारासाठी निसर्गोपचारवाले व आधुनिक डॉक्टर यांना एके ठिकाणी आणलेले आहे. कोणाजवळच रोगावरील मात्रा नाही. परंतु या दोन्ही पद्धतींचा समन्वय करून त्याच्यासाठी उपाययोजना मात्र मुक्रर केली गेली आहे. रोग्याचे पुढे काय होणार, हे फक्त परमेश्वरालाच माहीत ! आणि जरी तो मेला तरी त्याला स्वाभाविक रीतीनेच मृत्यू आला, बेजबाबदारपणे औषधोपचार केल्याने अगर काही उणीव राहिल्याने हा मृत्यू ओढवलेला नाही, असा, डांगोरा पिटायलाही हे वैद्यक-व्यवसायी कमी करणार नाहीत. खादी ही केवळ भावनात्मक दृष्टीने पाहण्याची बाब नव्हे, तथापि या भावनेबद्दलही मला आदर आहे. यामागे स्वातंत्र्य-आंदोलनाचा एक संपूर्ण इतिहास आहे. माणसासंबंधी प्रेम व्यक्त करण्याचे ते एक साधन आहे. संपूर्ण मानवी जीवनाच्या विकासाचा एक क्रांति-कारक, शांततामय, अहिंसात्मक, प्रेम व प्रतिष्ठा यांनी भरलेला, असा हा उपचार आहे.

**संस्थेतील कार्यकर्त्यांची श्रद्धा**

'अशोक मेहता समिती ''ने खादी व ग्रामोद्योग आयोगाचे नाव बदलून ते "ग्रामीण उद्योग आयोग ' हे नाव ठेवण्याची शिफारस केली आहे. खादीचा जरी या आयोगात समावेश असला, तरी तिचे नाव काढून टाकण्याची समितीने शिफारस केली आहे. औषध जितक्या वेळा घोटावे किंवा पिसावे, तितकी त्याची शक्ती वाढते असे म्हणतात. होमिओपथीमध्ये अशा रीतीने ओषधाची शक्ती वाढविली जाते. भक्तिपूर्वक केलेले नामस्मरण अखेर मंत्र बनतो. खादी शब्दामागे जी भावना व प्रेरणा आहे, ती तो शब्द काढून टाकल्याने पुसली जाणार नाही. जर दुसऱ्या काही उद्योगधंद्यांना भरभराटीस आणावयाचे असेल तर भले ग्रामो-द्योगाच्या नावाखाली ते चालवावेत व ऊर्जितावस्थेला आणावेत. त्याला कुणाची हरकत असण्याचे कारण नाही. त्यामध्ये ज्याला जितके यश मिळेल, त्याबद्दल आम्ही धन्यवाद देऊ—इतकेच नव्हे तर अंत:करणपूर्वक आम्ही त्यास सुयशच चिंतू. खादीचे कार्य ग्रामोद्योगापासून अलग करण्याची इच्छा असेल तर त्याला माझा विरोध नाही. पण खादीच्या नावाचाही काही महिमा आहे. मला फक्त एकच भीती वाटते की, ते नाव काढून टाकल्याने तिच्यामागील भावनेचा व प्रेरणेचाही अंत होईल.

" खादीसंबंधीची आस्था आता बरीच कमी झाली आहे. तिच्याबाबतच्या भावनेला आता उतरती कळा येऊ लागली आहे. तिच्या प्रतिष्ठेलाही मोठा धक्का बसला आहे, ' असे लोक का म्हणतात ? याच्या मुळाशी आपल्याला गेले पाहिजे. सेवाभावी त्यागी लोक स्वातंत्र्यपूर्व काळात खादीचे काम करीत असत. ' खादी ग्रामोद्योग आयोगा 'ची स्थापना सरकारतर्फेच झाल्याने त्याच्या कामाबाबतची

चौकशी सरकारतर्फे व्हावी यात काहीच गैर नाही. परंतु आयोगाच्या सरकारी निर्मितीमुळे त्याला सरकारी नियमांच्या बंधनांच्या कक्षेतच काम करावे लागले, किंवा नोकरभरती सरकारी नियमानुसार झाली तर ते सरळ होय. नोकरीवर घेताना त्यांची शैक्षणिक लायकी तपासली गेली, परंतु खरोखरच या नोकरांना खादीबाबत आस्था आहे का, तिच्यावर त्यांची श्रद्धा आहे का, हे लक्षात घेतले गेले नाही. शैक्षणिक पात्रता नसलेल्या पण खादीवर श्रद्धा असलेल्या लोकांना त्यांच्या योग्यतेनुसार काम दिले गेले नाही. त्यांच्या सेवेचे व त्यागाचे चीज झाले नाही. खादी-आयोगांतील कर्मचारी काम सुरू करण्यापूर्वी अंगावर खादीचे कपडे चढवितात व काम संपताच हे कपडे उतरून ठेवून आपले दुसरे कपडे अंगावर चढवून घरोघरी निघून जातात ! फक्त पोटासाठी काम करणाऱ्या नोकरवर्गा-कडून खादीबावतची श्रद्धा व भावना कशी अपेक्षिता येणार ? सेवा व त्याग यांच्या पायावर खादीचा प्रसार झाला, परंतु संकुचित व स्वार्थवृत्तीच्या डबक्यात पडल्याने तिचा ऱ्हास होणार !

याशिवाय खादीचा काँग्रेसशी असलेला संबंध हा स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचा आहे. काँग्रेसमध्ये असलेला माणूस खादी वापरीत असे व खादी वापरणाऱ्याला काँग्रेसचा राष्ट्रीय कार्यकर्ता म्हणून ओळखले जात असे. स्वातंत्र्यानंतर काँग्रेस-मधील बऱ्याच लोकांत वाईट गोष्टी घुसल्या, भ्रष्टाचार व अनीती वाढली, त्याची झळ खादीलाही लागली; तिच्याबद्दल असणारी आदराची व मोठेपणाची भावना ढासळली. सरकारी सहाय्याने व पोटभरू लोकांच्या तडाख्यात ती गेल्याने तिची भरभराट तर सोडाच, परंतु अस्तित्वही कठीण होऊन बसले. आज खादीचे जे स्वरूप व अस्तित्व आहे, ते मिटले तर भले मिटो. पण त्यातही नुकसानच आहे. तिचे स्वरूप फक्त कपड्याची गरज पुरी करणारे व तेही पूर्णार्थाने नव्हे, असे राहिले तर, अशा कमकुवत खादीमुळे देशाचा निर्वाह होणे अशक्य. आम्हाला अशी खादी पाहिजे की, जी गांधीजींनी आम्हाला दिलेली होती. जिच्यात मानव-हृदय जोडण्याची, तोडण्याची नव्हे, किमया आहे. केवळ जीवनाच्या निर्वाहाचेच नव्हे, तर जीवन संपन्न करण्याचे सामर्थ्य जिच्यात आहे, अशी खादी आज आम्हाला हवी आहे.

### गिरणीतील कामाचे स्वरूप

कापडगिरणीत अधिक मजुरी मिळते. परंतु त्याचबरोबर असाही विचार करणे जरूर आहे की, गिरणीत काम करणाऱ्या माणसाला आपल्या कुटुंबियांना सोडून दूर शहरात, घाणेरड्या जागेत व झोपडपट्टीत जीवन कंठणे भाग पडते. त्याला नाटक, सिनेमा पहाण्याची चटक लागते व चहा, तंबाखू किंवा दारू आदी व्यसनांच्या आहारी तो जातो. त्याचे आरोग्य चांगले रहात नाही. मनाची

प्रसन्नता तो गमावून बसतो. दूषित जीवन-चक्रात गुरफटल्याने व निरनिराळ्या मोहजालात सापडल्याने तो आपले सुख हरवून बसतो व त्याची कुटुंबीय मंडळीही सुखाला पारखी होतात. याउलट त्याला त्याच्या गावात, घरी राहून, शहरात मिळणाऱ्या मजुरीचा चौथा हिस्सा जरी मिळाला, तरी तो वाईट सवयींपासून व अनाठायी खर्चापासून वचावला जातो. शुद्ध वातावरणात तो सुखासमाधानाने राहू शकतो. मोठ्या शहरात राहून २०० रु. मिळविण्यापेक्षा आपल्या गावात राहून ५० रु. मिळवणे आर्थिक दृष्टीनेही त्याला अधिक हितकर असते. चरखा घराघरात जाऊ शकतो. घरातील सर्वांना आपापल्या फुरसतीच्या वेळी तो चालविणे शक्य आहे. चरख्याचा आधार व्यक्ती नव्हे. याचा अर्थ चरखा एका व्यक्तीशी संबंधित राहत नाही. गिरणीत व्यक्तीला मजुरी दिली जाते. या मजुरीचा त्या व्यक्तीच्या कुटुंबियांशी काहीही संबंध असत नाही. चरख्याच्या अर्थव्यवहाराचे परिणाम निराळे होतात. ज्या वातावरणात व ज्या लोकांत त्याची मजुरी वाटली जाते, त्या सर्व गोष्टींकडे पाहिल्यास असे आढळून येईल की, खादीमुळे त्यांच्या जीवनात संयम व काही निर्बंध आपोआप येतात. त्यामुळे खादी म्हणजेच माणुसकी, असे खऱ्या अर्थाने म्हणणे उचित होईल. तिच्यामध्ये प्रेरणा देण्याची व जीवन समृद्ध करण्याची जी शक्ती आहे, त्याचेच हे द्योतक होय. गिरण्यांच्या ज्या वातावरणात मजुरी वाटली जाते, त्यामुळे समाज-विरोधी वातावरणाला चालना मिळते व ती मानवतेला पारखी ठरते. तिच्यातून अत्याचार व हिंसेचाच जन्म होतो.

**सरकारला सवाल व सूचना**

मी विश्वविद्यालयाच्या चार भिंतींच्या आत राहून शिक्षण घेतलेले नाही. मी कोणी अर्थशास्त्रज्ञही नाही किंवा त्यातील जाणकारही नाही. अर्थशास्त्र-विषयक जे सिद्धान्त आहेत ते मी मानतो. परंतु त्यामुळे घावरून जाणारा किंवा त्याच्या दवावाखाली येणारा मी नव्हे. मी जीवनातील अनुभवातून अर्थशास्त्र जाणून घेतले व त्यातून काही ज्ञानही संपादिले. देशातील उद्योग चालविण्या-मध्ये लहानसा का होईना, माझा वाटा आहे व तशी जबाबदारी मी पत्करली आहे. जे गोरगरीब आज अन्नालाही मोताद आहेत, त्यांच्या वतीने अर्थशास्त्रज्ञ व सरकारी शासक यांना, आव्हानपूर्वक नव्हे तर, विनंतीपूर्वक मी असे विचारू इच्छितो की, अगदी कमी खर्चात त्यांच्या तोंडांत भाकरीचा तुकडा टाकण्याची किमया असलेला खादीशिवाय दुसरा एखादा उद्योग आपण सुचवू शकता काय ?

खादीमध्ये सरकार घुसल्याने तिच्यासाठी जी संघटना निर्माण झाली, तिच्यात व्यवस्थापनाचा खर्च फार मोठा आहे. या व्यवस्थापनाच्या कामात वाजवीपेक्षा अधिक लोकांचा भरणा आहे. त्याचा बोजा खादीवर पडतो. याशिवाय, खादी-कार्याचा पसारा इतका वाढला आहे की, कित्येक ठिकाणी

तिच्यात दोष, भ्रष्टाचारही शिरले आहेत. हे सारे दोष तसेच व्यवस्थापकीय व अधिकारी-वर्गावरील खर्चासाठी सरकारकडून जे अनुदान मिळते ते विचारात घेता, आपल्याला हे कबूल करावे लागेल की, खादीमुळे मजुरी अशा गोरगरिबांना मिळते की, ज्यांना उपजीविकेसाठी दुसरा काही आधार नाही. त्यामुळे खादीचे कार्य आर्थिक दृष्टीने प्रशंसनीय आहे व तिची जागा दुसरा कोणताही उद्योग घेऊ शकत नाही.

खादीसाठी जे अनुदान दिले जाते, त्यावर ५ कोटी रुपयांची मर्यादा घालण्यात आली आहे. हे ५ कोटी रुपये सरकारने दिले नाहीत, तरी त्याबद्दल मला खंत वाटणार नाही, परंतु त्याचे वाटप नीट रीतीने न झाल्यास मला अधिक दु:ख होईल. खरी आवश्यकता जर कोणती असेल, तर अनुदानाची रक्कम, खादीमुळे ज्या बेकार लोकांना मजुरी मिळते, त्यांच्या संख्येशी संबंधित असावी. खादीवर उपजीविका करणाऱ्या प्रत्येक मजुराशी ही अनुदानाची रक्कम निश्चित करून, जितक्या अधिक लोकांना मजुरी दिली जाईल तितक्या प्रमाणात अनुदानाची रक्कम वाढविण्यात येईल, असे सरकारने सांगावयास हवे. या भुकेकंगाल लोकांची जबाबदारी समाजावर व सरकारवर नाही काय ? आणि जर असेल तर ती पुरी करण्याचा दुसरा कोणता मार्ग त्यांच्याजवळ आहे ?

**खादीचा व गादीचा – झगडा**

'अशोक मेहता समिती'च्या अहवालावर खादी– बोर्डाच्या सभेत बोलताना मी म्हटले होते की, खादीला फाशीची शिक्षा देण्याच्याऐवजी तिचा गळा दावला जात आहे. तिच्या जीवनाला आवश्यक असणाऱ्या ऑक्सिजनवर मर्यादा घालावयाची- व अशा रीतीने गळा दाबून तिचा प्राण घ्यायचा की ती स्वत:च्या मरणाने मेली, तिचा तो स्वाभाविक अंत होता, असे म्हटले जाईल. आज ज्या स्वरूपात खादी आहे, ती नष्ट होणे शक्य आहे. परंतु गांधींनी ज्या खादीला जन्म दिला ती कदापीही मरणे शक्य नाही. कारण ती अमर आहे. विनोबांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास, आज खादीचा व गादीचा (सत्तेचा) झगडा आहे. भोगवादी श्रीमंती प्रवृत्तीशी तिचा मेळ बसणे शक्य नाही. तिची आज जरी भरभराट झाली नाही व त्यासाठी आमच्यातील शक्ती जरी कमी पडली, तरी तिची उन्नती करणारा पुरुषसिंह जन्माला येणारच. खादीचे काम वाढणारच. कारण तो एक विचार आहे. पूर्णार्थाने जीवन जगण्याची ती एक कला आहे. गरीब-श्रीमंतांची हृदये जोडण्याचा तो एक दुवा आहे. पाश्चात्यांच्या भौतिकवादाला कंटाळून त्याच्या मगरमिठीतून आपण जेव्हा मुक्त होऊ व या भौतिकवादामुळे मानवाचे किती नुकसान झाले आहे याची ज्या वेळी आपल्याला जाणीव होईल, त्या वेळी खादी हीच संजीवनी ठरेल.

**स्वतंत्र व्यवस्था करा**

सरकारने ग्रामोद्योगापासून खादीला अलग केले पाहिजे. चरखा संघाच्या धर्तीवर तिच्यासाठी नवीन व्यवस्था निर्माण करावी. तिला जे अनुदान द्यायचे ते नवीन संघटनेमार्फत दिले जावे. सरकारने तिची तपासणी करावी, मात्र या संघटनेवर कोणतीही सरकारी बंधने नसावीत. पांच वर्षांच्या अवधीत हे काम किती, कोणत्या पद्धतीने केले जात आहे व त्याची कशी वाढ होत आहे हे समजून येईल. अशा रीतीने तयार होणाऱ्या खादीचा उपयोग सरकारला ज्या ज्या प्रकारे करता येईल तसा त्याने करण्याचा प्रयत्न करावा. त्याचबरोबर खादीमध्येच जे विशिष्ट प्रकारचे कापड निघू शकते, असे खास प्रकारचे कापड गिरण्यांत तयार न करण्यासाठी गिरण्यांवर निर्बंध घालावेत. त्यामुळे अशा प्रकारच्या खादी-कापडाच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होणार नाही. आवश्यकतेनुसार त्याचे उत्पादनही वाढविता येईल. कापड-गिरण्यांवर एखादा कर बसवून जी रक्कम जमा होईल, तिच्यातून खादी-उत्पादनासाठी अनुदानही देता येईल. या बाबतीत स्वतंत्र रीतीने विचार करण्याची आवश्यकता आहे. परंतु 'खादी' हा एक विचार आहे; विविध मार्गांनी तिला जवळ करण्याइतकी तिच्यावर श्रद्धा असेल तरच हे शक्य आहे.

'मेहता समिती 'च्या अहवालात फक्त खादीचे नावच गाळण्याची शिफारस नाही, तर ग्रामोद्योग मंडळावर शासन, अर्थशास्त्रज्ञ यांची संख्या अधिक असावी, असे सुचविले आहे. खादी काम करणाऱ्यांचे प्रतिनिधी या मंडळावर असावेत, पण त्यांची संख्या कमी असावी, असे सुचविण्यात आले आहे. ही शिफारस ज्या वेळी मी पाहिली, त्या वेळी मला अत्यंत दुःख झाले. याचा अर्थ खादीवरील सरकारचा विश्वास ढळला, एवढेच नव्हे तर खादीचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यां-वरील त्याचा विश्वास नाहीसा झाला, असे मला वाटते. खादी बोर्डाच्या सभेत ज्या वेळी हा अहवाल विचारार्थ ठेवला गेला, त्या वेळी या बोर्डावर काम करण्यास मला आनंद वाटणार नाही, इतकेच नव्हे तर ते माझ्या स्वाभिमानाला सोडून आहे, असे मला वाटू लागले. खादीवर विश्वास अगर श्रद्धा असणारे लोक या मंडळावर अधिक नसावेत असे जर सरकारचे धोरण आहे, तर या मंडळावर आम्ही कसे राहू शकतो ? तथापी माझी इच्छा व स्वाभिमान यांना जरी अधिक महत्त्व देत असलो, तरी त्यापेक्षा भुकेलेल्या लोकांच्या तोंडात भाकरीचा घास देणे हे अधिक महत्त्वाचे आहे. आणि त्या दृष्टीने खादी-कार्यकर्त्यांनी मंडळावर राहणे आमच्या स्वाभिमानापेक्षा व आवडीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे आणि केवळ याच दृष्टिकोनातून या मंडळावरून माघार घेणे बरोबर ठरणार नाही.

**संशोधन हवे**

गेल्या वीस वर्षांत खादीच्या तंत्रात बरेच शोध लागले. विज्ञानाचाही उपयोग तिच्यात करण्यात आला. एका परीने ही चांगली गोष्ट आहे. परंतु खादीसाठी जशा प्रकारे विचार करण्याची आवश्यकता होती, तसा तो गेल्या वीस वर्षांत झाला नाही. खादीचे काम सरकारी पद्धतीनेही चालत नाही किंवा विनोबांच्या विचारसरणीप्रमाणेही तिचे काम होत नाही. या दोन्हींच्यामध्ये ती घुटमळत आहे. गोरगरिबांच्या झोपडीत वीज पोहोचावी, विजेचा उपयोग त्यांच्या विकासासाठी व्हावा, जेथे वीज आहे, तेथे त्यांच्यावर जाण्याची सक्ती होऊ नये. तो तिकडेच खेचला जात आहे. मागे वळूनही तो पहात नाही किंवा थांबतही नाही. तो गोंधळात सापडलेला आहे. त्याची परिस्थिती विचित्र झाली आहे. तो मरणाच्या पंथाला लागला आहे. खादीचे उत्थान झाले तरच त्याला सावरणे शक्य होईल. ती वेळ आता येऊन ठेपली आहे. खादी-कार्यकर्त्यांनी त्या दृष्टीने आता विचार केला पाहिजे. आपली कर्तव्यबुद्धी जागृत करून आपल्यावरील जबाबदारीला स्मरून, काळाची पावले ओळखून त्यांनी खादीला व गोरगरिबांना सांभाळले पाहिजे. खादीमध्ये अबोलपणे काम करणारा मजूर कसा पुढे येईल, याची त्यांनी काळजी घेतली पाहिजे. हे प्रातिनिधिक काम खऱ्या अर्थाने करण्याचे धारिष्ट किंवा तळमळ आमच्यात आज दिसून येत नाही. ही भावना आमच्यात कशी येईल, ते धारिष्ट कोण दाखवील, हाच खरा आजचा सवाल आहे.

…ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.' स्थळप्रत.
अनुक्रम.......................... दि: ....................
क्रमांक .......................... नों: दि: ..................
५६

# प्रेमाने जिंकण्याचा महान प्रयोग

## नारायणराव कुलकर्णी

नोआखालीची शांति-यात्रा म्हणजे गांधीजींच्या जीवनाचा कळसाध्याय. त्या यात्रेत काही काळ राहिलेल्या लेखकाने पुढील लेखात काही हृदयस्पर्शी आठवणी दिल्या आहेत.

"महात्मा गांधींनी केलेल्या सर्व प्रयोगांत त्यांनी नौखालीत केलेला प्रयोग सर्वांत श्रेष्ठ होय. कारण या ठिकाणी त्यांनी जगाला स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले की, प्रेमाचा मार्ग अनुसरावा, सूडबुद्धीने वागू नये. त्यांनी या ठिकाणी केलेल्या प्रयत्नांना बऱ्याच प्रमाणात यश आले. नौखालीत गांधींची महात्मता परमोच्च कोटीला जाऊन पोचली. त्यांनी नौखालीत केलेले कार्य म्हणजे त्यांच्या आतापर्यंतच्या कार्याचा कळस होय, असे म्हणण्यास हरकत नाही. प्रेमाने जिंकता येते व द्वेषाने आपत्ती ओढवतात, या तत्त्वासाठी ते जगले.'' —— या शब्दांत श्री. राजगोपालाचारी यांनी महात्माजींच्या ह्या महान प्रयोगाचे वर्णन केले होते.

राजाजींचे हे उद्‌गार वृत्तपत्रात वाचून गांधीजींची ही अपूर्व शांतियात्रा व नौखालीचा तो उद्‌ध्वस्त प्रदेश प्रत्यक्ष पाहण्याची मला तीव्र इच्छा झाली आणि मी तिकडे जाण्याचे ठरविले. माझ्या आयुष्यातील ह्या मोठ्या सफरीची तयारी करण्यास लागलीच सुरवात केली व बरोबर काही कपडे व मुख्य म्हणजे कॅमेरा घेतला.

दिल्लीच्या काही मित्रांच्या व हितचिंतकांच्या साहाय्याने मी बंगाल काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी काही ओळखपत्रे मिळवली व कलकत्त्याला कूच केले. तेथे 'शांतियात्रा '–दलातील कार्यकर्त्यांना भेटलो, पण त्यांनी नौखालीला न जाण्याचाच मला सल्ला दिला. नौखालीला जाणे जितके कष्टाचे व त्रासदायक आहे तितकेच धोक्याचे आहे, इतकेच नव्हे तर वाटेत हिंस्त्र पशूंची वस्ती आहे, तरी तिकडे न जाता परत विजापूरला जा, असे मला त्यांनी कळकळीने सांगितले. शिवाय, गांधीजींनी असा स्पष्ट आदेश देऊन ठेवला होता की, या पदयात्रेत त्यांना भेटण्यास कोणीही येऊ नये. या महान प्रयोगाच्या काळात गांधीजींनी फक्त सहाच जणांना आपल्याबरोबर येण्याची परवानगी दिली होती. त्यांत गांधीजींची नात मनू गांधी व त्यांचे चिटणीस प्रा. निर्मलकुमार बोस यांचा समावेश होता. गांधीजींची सेवा करण्यासाठी मनू त्यांच्याबरोबर आली होती. याशिवाय फक्त सहा वृत्तपत्रप्रतिनिधी व प्रेसफोटोग्राफर यांना या शांतियात्रेत सामील होण्याची खास परवानगी मिळाली होती.

गांधीजींचे हे १२ जणांचे पथक अनवाणी चालणाऱ्या महात्म्याच्या मागे खेडोपाडी हिंडत होते. गांधींची ही ऐतिहासिक पदयात्रा ता. ७ नोव्हेंबर १९४६ रोजी श्रीरामपूरहून सुरू झाली व ती ४ फेब्रुवारी १९४७ रोजी साधुरकलीला संपली. लगेच दुसरी पदयात्रा ५ फेब्रुवारीला श्रीनगरहून चालू झाली आणि या दुसऱ्या महान यात्रेत सामील होण्यासाठी मी ता. ३ फेब्रुवारीला रेल्वेने कलकत्त्याहून निघालो. पुढे गोलंडा घाटापासून आगबोटीने चांदपूरला दाखल झालो. तेथून पुन्हा रेल्वेगाडीत बसून चौमोहिनीला पोचलो. येथूनच मला दत्तपाडा या नौखालीतील पहिल्या सहाय्य-केंद्राला पोचावयाचे होते. श्रीमती सुचेता कृपालानी या केंद्राच्या संचालिका होत्या. चौमोहिनी रेल्वे स्टेशनपासून १८ मैलांवर हे ठिकाण होते. त्या स्टेशनवर मला काही खायला मिळाले नव्हते. वाटेत एके ठिकाणी फक्त शहाळ्याचे पाणी प्यावयास मिळाले होते. माझे सुदैव म्हणून काही लोक दत्तपाड्याला निघाले होते, त्यांची सोबत मला मिळाली. त्यांच्याबरोबर मी तेथे दुपारी ११ वाजता पोचलो. पण पुढे लगेच मला श्रीनगर गाठावयाचे होते. तेथे महात्मा गांधींचा मुक्काम होता.

हा आठ मैलांचा प्रवास मी मोठ्या कष्टाने व भीतिदायक वातावरणात केला. रस्त्याने मला विळे, कोयते घेतलेले, भात कापणारे शेतकरी भेटले. ते हिंदू होते की मुसलमान होते, हे मला त्यांच्या वेषावरून समजत नव्हते. त्यांना पाहून मला भीतीच वाटली. त्यांनी माझ्यावर हल्ला केला तर ? माझ्या अंगावर शहारे आले ! पण सुदैवाने वाटेत काहीही न होता मी श्रीनगरला सुखरूप पोहोचलो. त्या वेळी तीन वाजले होते. मी एका झाडाखाली बसून राहिलो. चार वाजता

मला प्रा. निर्मलकुमार बोस भेटले व त्यांनी माझी चौकशी केली. मी त्यांना माझा उद्दिष्ट सांगताच ते म्हणाले, "छे छे, गांधीजींच्या आदेशाप्रमाणे तुम्हाला शांति-यात्रेबरोबर येता येणार नाही. इतकेच नव्हे तर, गांधीजींचा मुक्काम ज्या गावी असेल त्या गावीसुद्धा तुम्हाला रहाता येणार नाही. गांधीजींना भेटण्यासाठी दूरदूरहून पुष्कळ लोक आले होते. पण गांधीजींनी त्यांना बरोबर येण्यास नकार दिला. त्यामुळे ते निराश होऊन परत गेले. तरीहि मी गांधीजींना तुमच्याबद्दल बोलून पहातो." असे म्हणून ते गांधीजींना भेटण्यासाठी गेले. थोड्या वेळाने ते परत आले व गांधीजींचा स्पष्ट नकार त्यांनी मला कळविला. मी बंगालचे मुख्यमंत्री सुरावर्दी यांची परवानगी घेऊन आलो आहे काय व बरोबर आपली शिधा-सामुग्री आणली आहे की काय, असे गांधीजींनी विचारल्याचे मला प्रा. बोस यांनी सांगितले. प्रा. बोस म्हणाले, "तुम्ही विजापूरहून इतके पैसे खर्चून आला ते पैसे इकडे पाठविले असते तर त्यांचा उपयोग तरी झाला असता, असे गांधीजींच्या म्हणण्यात आले. तुमच्या येण्याने त्यांना फार दुःख झाले आहे. तरी तुम्ही येथे राहू नका. तावडतोब निघून जा." प्रा. बोस यांनी आणलेल्या या निरोपामुळे मी मोठ्या चिंतेत पडलो. काय करावे, हे मला सुचेना. मी ईश्वराची प्रार्थना करू लागलो "ईश्वराने गांधीजींच्या मनात प्रेरणा करावी की, इतरांच्याप्रमाणे मला परत पाठविण्याची शिक्षा त्यांनी करू नये." मी इतके पैसे खर्च करून व चार हजार मैलांचा प्रवास करून, अनेक संकटे सोसून येथवर आलो तो तसाच परत जाण्यासाठी काय? मी विचार करू लागलो. पाच वाजता निर्मलकुमार बोस यांनी मला बोलावणे पाठविले व गांधीजींच्या प्रार्थनेस हजर रहाण्याची परवानगी दिली. मात्र प्रार्थना झाल्यावर मी श्रीनगरला रहाता कामा नये, असे त्यांनी मला बजावले.

गांधींची ही प्रार्थना सार्वजनिक स्वरूपाची होती व जवळपासच्या खेड्यांतील अनेक स्त्रीपुरुष तेथे जमले होते. गांधीजी एका उच्चासनावर बसले होते. मनूकडून जपमाळ घेऊन ते डोळे मिटून बसले व मनूने गीतेतील स्थितप्रज्ञाचे श्लोक म्हणावयास सुरवात केली. प्रार्थना चालू असता मध्ये उठण्यास व फोटो घेण्यास बंदी होती. गांधीजी डोळे मिटून ध्यानस्थ बुद्धाप्रमाणे बसले होते. मला ते दृश्य इतके अपूर्व व आकर्षक वाटले की, गांधीजींच्या त्या अवस्थेतला फोटो घेण्याचा मोह मला आवरेना. मी बसल्या बसल्या गांधींचा फोटो घेतला आणि तो अतिशय उत्कृष्ट निघाला. नौखालीतील शांतियात्रेची चिरंतन स्मृती म्हणून मी हा फोटो माझ्या संग्रही अत्यंत निष्ठेने जपून ठेवला आहे.

प्रार्थना झाल्यावर जमलेल्या लोकांना उद्देशून गांधींनी हिंदीत भाषण केले. प्रा. बोस यांनी त्याचे बंगाली भाषांतर करून सांगितले. लोकांनी काही प्रश्न विचारले

व गांधीजींनी उत्तरे दिली. गांधीजी शेवटी म्हणाले, " मी सध्या हाती घेतलेले कार्य माझ्या आयुष्यातले अत्यंत विकट व दुर्घट असे कार्य आहे. माझ्या जीवनात इतका अंधकार पसरल्याचा मला कधी अनुभव आला नाही. मी या ठिकाणी प्रचारासाठी आलो नाही, तर तुमच्यातलाच एक म्हणून येथे रहावयास आलो आहे. मी स्वत:शी अशी शपथ वाहिली आहे की, जोपर्यंत जातिद्वेष नष्ट झाला नाही व जोपर्यंत एखाद्या हिंदू मुलीला मुसलमानी मोहल्ल्यात मोकळेपणाने हिंडण्यास भीती वाटणार नाही, तोपर्यंत मी येथे राहीन आणि जरूर पडल्यास मृत्यूही पत्करीन. तुमच्याकडून मला एकच गोष्ट पाहिजे. तुम्ही आपल्या हृदयातून भीती काढून टाका. संकटाला तोंड देण्यापेक्षा संकटापासून दूर पळणे म्हणजे आपली ईश्वरावरील श्रद्धा व माणसावरील विश्वास नष्ट झाला आहे, असे समजावे. मी या ठिकाणी ज्या कार्यासाठी आलो आहे ते कदाचित माझ्या आयुष्यातले अखेरचेच कार्य असेल. या ठिकाणी माझ्या अहिंसेची कसोटी आहे. ' करा किंवा मरा ' या तत्त्वाची येथे खरी परीक्षा आहे. हिंदू व मुसलमान यांनी शांततेने व एकदिलाने एकत्र राहण्यास शिकावे, हे माझे येथील मुख्य कार्य आहे. ते जर सफल झाले नाही तर मृत्यूशिवाय मला दुसरा तरणोपाय नाही." सभा संपल्यावर गांधींनी गावातल्या उद्ध्वस्त झालेल्या घरांना भेट दिली व दु:खितांचे सांत्वन केले.

ता. ५ फेब्रुवारीच्या रात्री नऊ वाजता सभा संपल्यावर मला श्रीनगर सोडून दुसऱ्या गावाला जाणे भाग होते. कारण मी शांतिदलाचा सभासद नव्हतो आणि त्या गावी रहाण्यास मला शांतिदूताची परवानगी नव्हती. सुदैवाने सभेला आलेले काही लोक शेजारच्या गावी परत जाणार होते. त्यांच्याबरोवर मी जाण्याचे ठरविले. पण त्यांपैकी कोणालाही बंगालीशिवाय हिंदी किंवा इंग्रजी येत नव्हते. आणि मला तर बंगालीचा गंध नव्हता. अखेर गांधी–टोपी घातलेला एक बिहारी सज्जन भेटला व त्याच्यावरोबर तीन मैल चालत गेलो. रात्रीचे अकरा वाजले होते आणि माझ्या पोटात अन्नाचा कण नव्हता. सबंध दिवस मी उपाशी होतो. गांधींनी मला येथले अन्न खाण्याची बंदी केली होती. रात्री एका झोपडीत कशीबशी राहण्याची व्यवस्था झाली.

ही झोपडी उंच खांबावर बांधली होती. कारण नौखालीचा हा प्रदेश हजारो मैल पसरलेल्या गंगेच्या परिसरात आहे. पावसाळ्यात हा सर्व प्रदेश गंगेच्या पाण्याखाली बुडून जातो. या प्रदेशात गंगेला हजारो फाटे फुटल्यामुळे तिला ' सहस्रफणि ' असे नाव मिळाले आहे. अशा प्रदेशातल्या एका उंचावरच्या झोपडीत माझी झोपण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे मला रात्रभर झोप आली नाही.

पहाटे चार वाजता मी उठलो. प्रा. बोस यांनी सहा वाजता श्रीनगरला येण्यास व गांधीजींच्या शांतियात्रेत सामील होण्यास मला सांगितले होते. गांधीजींचे नियम जरी कडक व कठोर होते, तरी प्रा. बोस यांना माझ्याबद्दल सहानुभूती वाटत

होती. पहाटे चार वाजता श्रीनगरला जाणे म्हणजे एक दिव्यच वाटत होते. मुसलमानांची वस्ती होती. एकटया-दुकटयाला गाठून गुंड केव्हा मारतील व लुटतील याची शाश्वती नव्हती. शिवाय जंगली जनावरे व मोठमोठे साप त्या भागात वावरत होते. कसेवसे पाणी मिळवून मी तोंड धुतले व आंघोळ केली आणि निघालो. मी दत्तपाडयाहून घेतलेला ओझेवाला माझ्यावरोवर होता. सबंध प्रदेश भीतिग्रस्त होता. पण ईश्वराचे नाव घेऊन मी चालण्यास सुरवात केली. सकाळी वरोवर सहा वाजता मी श्रीनगरला पोचलो.

तेथे पोचताच प्रा. बोस यांनी माझे स्वागत केले व गावातल्या उद्ध्वस्त घरांचे, भंगलेल्या मूर्तींचे, मोडतोड झालेल्या देवळांचे व घरांचे फोटो घेण्यास मला सांगितले. वरोवर ७ वाजता गांधीजी आपल्या झोपडीतून वाहेर आले. त्यांच्या उजव्या हातात उंच काठी होती, अंगावर उपरणे होते व कमरेला घडयाळ लटकत होते. त्या शांतिदूताची ती धीरगंभीर मूर्ती पाहून मी स्तंभित झालो. ती मूर्ती जणू माझ्या हृदयावर कोरली गेली. वापू वाहेर येताच त्यांनी ' कर्नाटकी फोटोग्राफर 'ची—म्हणजे माझी—चौकशी केली मी त्यांच्यासमोर जाऊन त्यांना नम्रपणे अभिवादन केले. तुम्ही नौखालीला का आला ? इतके पैसे खर्च करून इकडे येण्याचे काय अडले होते ? असे त्यांनी मला प्रश्न विचारले. मी त्यांना अर्थातच योग्य उत्तरे देऊ शकलो नाही. मी त्यावद्दल त्यांची माफी मागितली व आपल्या आशीर्वादासाठी येथे आलो, असे सांगितले.

गांधीजींची पदयात्रा सुरू झाली. त्यांना श्रीनगरहून धरमपूरला जावयाचे होते. तेथे पुढचा मुक्काम होणार होता. हे तीन मैलांचे अंतर ९० मिनिटांत तोडून आम्ही पावणे नऊ वाजता धरमपूरला येऊन दाखल झालो. वाटेत ठिकठिकाणी पानाफुलांच्या कमानी उभारल्या होत्या व ' वापूजी स्वागतम् ' ' वंदे मातरम्,' ' जयहिंद,' ' हिंदू-मुस्लीम एक होने' असे फलक बंगाली भाषेत लावलेले होते. धरमपूर या गावात मुख्यतः मुसलमानांची वस्ती होती. गांधींनी गावात आल्यावरोवर काही हिंदू-मुसलमानांच्या घरांना भेटी दिल्या.

गांधीजी एका झोपडीत गेले आणि मी वाहेर झाडाखाली वसून राहिलो. ११ वाजता प्रा. निर्मलकुमार बोस यांनी मला आत बोलावून घेतले व गांधीजींनी मला भोजन करण्यास परवानगी दिल्याचे सांगितले. मी दोन दिवसांचा उपाशी होतो, याची गांधीजींना जाणीव होती. हातपाय धुऊन येताच मला गांधींच्या शेजारच्या खोलीत नेण्यात आले व मनू गांधीने माझ्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. गांधीजींच्यासाठी जे अन्न शिजविण्यात आले होते तेच अन्न मला वाढण्यात आले होते, म्हणून मी एका दृष्टीने मोठा सुदैवी होतो. गांधींचे हे अन्न रेशनमध्ये येणारे नव्हते. या जेवणात जे पदार्थ होते त्यात गहू, तांदूळ किंवा कोणतेच धान्य नव्हते. दोन कच्ची केळी, कसलासा कंद व थोडासा जंगली घेवडा हे पदार्थ शिजवून माझ्यापुढे ठेवण्यात आले

होते. पण नंतर मला खास म्हणून दूध व गूळ वाढण्यात आला. मनू गांधी व प्रा. बोस यांना माझ्याबद्दल आपुलकी वाटू लागली होती. नौखालीच्या यात्रेत गांधीजींच्या बरोबर रहाण्याचे व त्यांच्या भोजनाचा हविर्भाग मिळण्याचे भाग्य मला लाभल्यामुळे त्यांनी आनंद व्यक्त केला.

मी धरमपूर खेड्यात हिंडलो व तेथील उद्ध्वस्त अवशेषांचे अनेक फोटो घेतले. तेथील घरेदारे जाळण्यात आली होती, देवळांचा विध्वंस करण्यात आला होता, इतकेच नव्हे तर आकाशाला भिडणारी उंच उंच सुपारीची झाडे बेगुमानपणे तोडून टाकण्यात आली होती. या सर्वांची मी भरपूर छायाचित्रे घेतली.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे पुन्हा प्रार्थना झाली. भगवद्गीतेच्या पाठाबरोबर भजन झाले. प्रार्थनोत्तर केलेल्या भाषणात गांधीजींनी पुन्हा एकदा लोकांना विनंती केली की, त्यांनी नौखालीला येऊ नये, ह्या शांतियात्रेत भाग घेऊ नये व शांततेचे वातावरण बिघडवू नये. सभा संपल्यानंतर निर्मलकुमार बोस व मनू गांधी माझ्याकडे आले व मी दुसऱ्या दिवशी गांधीजींचा निरोप घेऊन येथला मुक्काम हलवावा व घरी जावे, असे सुचविले.

त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मी विजापूरला परत जाण्याचे ठरले. जाण्यापूर्वी रात्री गांधीजींची भेट घेण्याची मला संधी मिळाली. ते आपल्या झोपडीत चटईवर बसले होते व त्यांच्यासमोर रॉकेलचा कंदील व काही पुस्तके होती. तेल जास्त जळू नये म्हणून कंदील बारीक करण्यात आला होता. मी झोपडीत शिरताच गांधीजींनी दिवा मोठा केला व मला बसण्यास सांगितले. त्या वेळी त्यांच्या झोपडीत मी एकटाच होतो. त्यांनी प्रेमळपणे माझी चौकशी केली व निघताना बजावून सांगितले की, या शांतियात्रेत मला भेटावयास कोणीही येऊ नये. हाच त्यांनी मला संदेश दिला. मी त्यांना प्रणाम करून त्यांचा निरोप घेणार, तोच त्यांनी मला जवळ बोलावले व माझ्याबद्दल व कर्नाटकाबद्दल चौकसपणे माहिती विचारली. त्याच वेळी कै. महादेव देसाई यांच्याकडून ता. १६-६-४२ रोजी मला आलेले पत्र मी त्यांच्यापुढे ठेवले. ते पत्र पहाताच बापूजींना गहिवरून आले. त्यांनी मला त्या पत्राचा इतिहास विचारला. मी गांधींना पाठविलेल्या एका पत्राला ते उत्तर होते. महादेवभाईंचे हस्ताक्षर पाहून जणू त्यांचे हृदय भरून आले. या पत्रावर मी त्यांची सही मागितली व त्यांच्यापुढे पाच रुपये ठेवले. मी त्यांना इंग्रजी सही करण्याची विनंती केली, कारण मूळ पत्र इंग्रजीत होते. अनेक आढेवेढे घेऊन अखेर त्यांनी इंग्रजी सही केली. मग मी त्यांना कानडी सही करण्याची विनंती केली व त्यांच्यापुढे आणखी पाच रुपये दक्षिणा ठेवली. गांधीजींनी आपल्याजवळच्या पेटीतून एक वही काढली व ती पाहून त्यांनी कानडी सही केली. त्यांच्या त्या संग्रहात निरनिराळ्या प्रांतिक

भाषांतल्या सह्यांचे नमुने होते. गांधीजींची ही कानडी सही म्हणजे मला मिळालेला एक अमोल ठेवा होता. सुमारे एक तासभर मी गांधींच्या सान्निध्यात होतो. त्यांच्यासारख्या दैवी प्रकृतीच्या थोर व्यक्तीबरोबर मला इतका वेळ जो सहवास लाभला, तो अविस्मरणीय होता. माझे काम झाल्यावर मी उठलो व गांधीजींच्या पायांवर डोके ठेवून त्यांचा निरोप घेतला. जणू काय गांधीजींचे मी अखेरचेच दर्शन घेत होतो, या भावनेने माझे हृदय भरून आले–आणि दुर्दैवाने ते अखेरचेच दर्शन ठरले! मी त्याच रात्री धरमपूरहून निघालो आणि दुसऱ्या दिवशी नौखालीतून प्रयाण केले. परतीच्या प्रवासात वीणा दास या सुप्रसिद्ध समाजसेविकेची व माझी ओळख झाली. नौखाली– विभागात ही कार्यकर्ती एक सहाय्य-केंद्र चालवीत होती. ती एके काळी क्रांतिकारक होती. पदवीदान–समारंभाच्या वेळी बंगालच्या गव्हर्नरावर गोळी झाडल्याबद्दल तिला जन्मठेपेची शिक्षा झाली होती. सुटल्यानंतर तिने समाजसेवेला वाहून घेतले व गांधीजींच्या शांतियात्रेत ती सामील झाली. तिच्याप्रमाणेच आणखी अनेक कार्यकर्त्यांच्या सहाय्याने मी नौखाली सोडली व विजापूरला परत आलो. माझ्या आयुष्यातील एका अत्यंत संस्मरणीय पर्वाची समाप्ती झाली.

५७

# गांधीजींचे अर्थशास्त्र

रा. कृ. पाटील

स्वावलंबी व स्वयंपूर्ण जीवनाकडे गांधीजींनी समाजाचे लक्ष वेधले. त्यांचा यंत्रशक्तीला विरोध का व कोठवर होता, याचे विवेचन पुढील लेखात केले आहे. गांधीजींच्या अर्थशास्त्राची मूलगामी मीमांसा या लेखात वाचावयास सापडते.

गांधीजींच्या अर्थशास्त्रविषयक विचारांवर त्यांच्या जीवनदृष्टीचा प्रभाव पडलेला होता. जीवनाचे उद्दिष्ट आत्मज्ञान संपादन करणे हे आहे आणि ते मिळविण्याचा मार्ग म्हणजे सत्य आणि प्रेम– अगर अहिंसा– यांवर आधारलेले जीवन जगणे हा आहे.

'विद्युत्शक्ती व सुधारलेली यंत्रसामुग्री यांच्या सहाय्याने जास्तीत जास्त उत्पादन वाढविणे हे आधुनिक सुधारणेचे साध्य आहे आणि या सुधारणेमुळे माणसाच्या आयुष्याचे ध्येय शरीरोपभोग हे झाले आहे आणि त्यामुळे तो स्वतःचा नाश करून घेईल.' ('हिंद स्वराज्य') 'माणसाचे मन हे उडत्या पक्ष्याप्रमाणे आहे, हे आपण पहातो. त्याला कितीही मिळाले तरी आणखी हवे असते आणि त्याची कधीही तृप्ती होत नाही. हे लक्षात घेऊनच आपल्या सुज्ञ पूर्वजांनी आपल्याला सुखोपभोग व ऐषाराम यांपासून परावृत्त केले.'

'हजारो वर्षांपूर्वी आपण जो नांगर वापरीत होतो तोच आजही वापरीत आहो. आपल्या झोपड्या अजून तमोयुगातल्याच आहेत. नवीन यंत्रे बनविण्याची

कला आपल्याला अज्ञात किंवा असाध्य होती असे नव्हे, पण आपल्या पूर्वजांना हे पक्के ठाऊक होते की, आपण जर असल्या गोष्टींवर आपले लक्ष केंद्रित केले, तर आपण त्यांचे गुलाम होऊ व आपले नैतिक सामर्थ्य नष्ट होईल. म्हणून त्यांनी पूर्ण विचारांती असे ठरविले की, आपल्याला जे काम करावयाचे असेल ते आपण आपल्या हातांनी व पायांनी करावे.' ('हिंद स्वराज्य')

याप्रमाणे गांधीजी स्वावलंबी व स्वयंपूर्ण जीवनाकडे आकृष्ट झाले. दुसऱ्याच्या श्रमांवर कमीत कमी अवलंबून रहाणे म्हणजे श्रेष्ठ दर्जाचे नैतिक जीवन जगणे आहे, हे तत्त्व श्रमविभागणीच्या मूळ तत्त्वाविरुद्ध आहे. त्रेतायुगातील पुरातन समाजसंस्था ह्या बहुतांशी स्वयंपूर्ण कुटुंबाच्या बनलेल्या असत. ही कुटुंबे स्वतः सर्पण गोळा करीत, आपले धान्य स्वतः दळीत, आपले पाणी स्वतः भरीत, स्वतः सूत कातून आपले कपडे विणीत, स्वतःचे अन्न स्वतः शिजवीत आणि जरूर त्या वस्तू स्वतः तयार करीत. स्वावलंबन हे या जीवनपद्धतीचे उद्दिष्ट असल्यामुळे त्याचा दर्जाही अत्यंत कनिष्ठ प्रतीचा असे, पण गांधीजींच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे हे आदर्श जीवन आहे. 'केवळ ध्येयवादाचा तात्त्विक विचार केला, तर मी सर्व यंत्रे त्याज्य ठरवीन. तसेच माझे हे शरीर जर मोक्ष मिळविण्याला उपयुक्त ठरत नसेल तर मी त्याचाही त्याग करीन आणि आत्म्याच्या मुक्ततेसाठी पराकाष्ठेचा प्रयत्न करीन. पण आपल्या शरीराप्रमाणे जगात यंत्रे रहातीलच. ती अपरिहार्य आहेत. आपले शरीर हे नाजुक यंत्र आहे. याची मला जाणीव असल्यामुळे मी यंत्रांना कसा विरोध करीन ? माझा मुख्य आक्षेप यंत्राविषयीच्या लालसेबद्दल आणि कामगारांची जागा घेऊन त्यांना बेकार करणाऱ्या यंत्राबद्दल आहे. कामगारांची संख्या जितकी कमी करता येईल, तितकी करण्याचा प्रयत्न केला जातो आणि त्याचा परिणाम हजारोंच्या बेकारीत होतो आणि काही जणांवर तर उपासमारीने मरण्याची पाळी येते. मला लोकांचे श्रम व वेळ वाचवायचा आहे. मात्र काही विशिष्ट लोकांचा नव्हे, तर सर्वांचाच. आज परिस्थिती अशी आहे की, यंत्रांच्या जोरावर काही मूठभर भांडवलवाले लाखो लोकांच्या पाठीवर स्वार झाले आहेत. यामागील हेतू श्रमशक्ती वाचविण्याचे औदार्य नसून धनलोभ आहे. म्हणून लोभाच्या जागी प्रेमाची स्थापना करा म्हणजे चांगली गोष्ट होईल.' ('हिंद स्वराज्य')

वरील उताऱ्यावरून गांधीजींचा विशिष्ट दृष्टिकोन कळून येईल. वर-वर पाहिले तर यंत्रे अनिवार्य आहेत असे ते समजत; पण त्यांचा असा आग्रह असे की, पिळवणुकीसाठी त्यांचा उपयोग करता कामा नये आणि बेकारीला ती कारणीभूत होऊ नयेत. आता हे कबूल केले पाहिजे की, ज्या ठिकाणी खाजगी उद्योगधंदे वाढविण्याला प्रोत्साहन दिले जाते, त्या ठिकाणी नफ्याच्या उद्देशानेच

यंत्रे बसविली जातात. नफा हाच मुख्य व एकमेव हेतू असतो. खरोखर पाहिले तर कामगारांच्या बाबतीतली काटकसर व नफा या गोष्टी परस्परपूरक आहेत. अशा प्रकारे कामगारांची काटकसर केली, तर त्याचे दुष्परिणाम झाल्यावाचून रहाणार नाहीत. ज्या कामगारांना काम मिळत नाही, त्यांच्यावर बेकारीची पाळी येते. उद्योगीकरणाच्या प्राथमिक अवस्थेत अशा अनेक समस्या उभ्या रहातात व कामगारांना यातना व दुःखे सहन करणे भाग पडते.

औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंड-अमेरिकेत अनिर्वाच्य आपत्ती उद्‌भवल्या. एकोणिसाव्या शतकाच्या आधी शंभर वर्षे म्हणजे अठराव्या शतकात इंग्लंडमधील सर्वसामान्य जनता कमी सुखी होती, असे अर्थशास्त्राचा कोणताही विद्यार्थी म्हणू शकेल, असे मला वाटत नाही. आणि त्याचे एकमेव कारण म्हणजे एकोणिसाव्या शतकात लागलेले शास्त्रीय शोध. प्रथम आपण कापूस घेऊ. उद्योगीकरणाच्या प्रारंभीच्या काळात कापूस हेच एकमेव साधन होते. लँकेशायरच्या कापडाच्या गिरण्यांत लहान मुले दररोज बारा ते सोळा तास राबत होती. वयाच्या सहाव्या किंवा सातव्या वर्षापासून मुलांना कामाला जुंपण्यात येत असे. मुले काम करतांना पेंगू नयेत म्हणून त्यांना झोडपण्यात येत असे. इतकेही करून ज्या मुलांना जाग येत नसेल ती यंत्रात सापडत व त्यांचे हातपाय जायबंदी होत, कधी कधी त्यांना मृत्यूही येई. मुलांचे पालक या बाबतीत काही करू शकत नव्हते. मुलांचे होणारे हे राक्षसी हाल सहन करण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हते. यंत्रामुळे हस्तकलेवर जगणाऱ्या लोकांच्या नशिबी बेकारी आली होती. इंग्लंडमधे अशा प्रकारे यंत्रयुगाचे पहिले परिणाम दिसू लागले.

इंग्लंडमध्ये जर ही स्थिती तर इतर देशांची स्थिती पहावयास नको. यंत्रांच्या क्षेत्रात प्रथम पदार्पण करण्याची संधी इंग्लंडला मिळाली होती. इंग्लंडच्या पाठीशी जगाची बाजारपेठ होती आणि वसाहतीतून मिळालेली लूट, भांडवल म्हणून, हवी तेवढी उपलब्ध होती. इतर देशांना अनेक अडचणींना व आपत्तींना तोंड द्यावे लागत होते. जनतेचे रहाणीमान उंचावण्याच्या दृष्टीने उद्योगीकरणाचे कितीही कायम स्वरूपाचे फायदे असले, तरी ते करताना अनेक वेळा विचार झाला पाहिजे. कारण ते तितकेच खर्चाचे आहे. काही असले तरी आता समाजात जागृती झाली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इंग्लंडमध्ये जे घडून आले तसे पुन्हा घडता कामा नये, असे समाजाला वाटू लागले. गांधींनाही तसेच वाटल्यामुळे ते यंत्राचे कट्टे दुष्मन बनले आणि यंत्रावर आधारलेली आधुनिक संस्कृती त्यांनी त्याज्य ठरविली. यंत्रांच्या उपयोगामुळे समाजाला इतकी अपरिमित दुःखे व संकटे सोसावी लागतील की, त्यातून होणाऱ्या फायद्याचा विचारही करता येणार नाही, असे त्यांना वाटत होते.

तथापि, यंत्रांत आणि यांत्रिक वस्तूंत काही तरी विलक्षण आकर्षण आहे, यात



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्व.

शंका नाही. त्यामुळेच सर्वसामान्य जनता पाण्याचा नळ, पिठाची गिरणी, यंत्रमाग व सुताची गिरणी यांकडे धाव घेते. एखादा गरीब माणूस घरी आल्यावर धान्य दळण्याऐवजी गिरणीतून दळून आणण्यासाठी दोन मैल चालत जाण्यास का तयार होतो ? नळाच्या पाण्याला पैसे पडत असले तरी लोक नळाचे पाणी वापरतील, पण फुकट मिळणारे विहिरीचे पाणी काढण्यास तयार होणार नाहीत. पूर्वी जेव्हा सूत कातण्याचे यंत्र निघाले नव्हते तेव्हां घरोघर जसे चरख्यावर सूत काढले जात असे, तसे आता कोणी काढील काय ? ती प्रथा सार्वजनिक होईल असे कोणाच्या मनात सुद्धा येणार नाही. त्याचे कारण म्हणजे नव्या सुधारणांमुळे मनुष्याचे काबाडकष्ट वाचतात आणि शिवाय सोय होते. जेव्हा दुसरा पर्यायच नसेल तेव्हांची गोष्ट वेगळी होती. पूर्वी लोकांना जेव्हा दुसरी पद्धतच माहीत नव्हती तेव्हा त्यांना आपल्या काबाड-कष्टाचे काही वाटत नव्हते. पण एकदा का, त्यांना नवीन पद्धत कळून आली तेव्हापासून त्यांनी तिचाच स्वीकार केला. कोणतेही तत्त्वज्ञान त्यांना ह्या पद्धतीपासून परावृत्त करूं शकत नव्हते. हस्तव्यवसायाच्या पक्षपात्यांकडून पुष्कळदा या गोष्टीची उपेक्षा केली जाते. कारण त्यांना असे वाटते की, विशिष्ट यंत्रांना कायद्याने बंदी केली म्हणजे लोक ती मानतील.

तेव्हा, मुख्य प्रश्न असा आहे की, आधुनिक यंत्रांमुळे मनुष्याच्या धनलोभाची जागा प्रेम घेईल काय आणि काम नाही म्हणून हजारो लोक बेकार होण्याचे व उपासमारीने मृत्यू पावण्याचे बंद होईल काय ? या ठिकाणी स्वतः काम करणे व कामगार म्हणून मजुरीवर काम करणे या दोन गोष्टींतला फरक स्पष्ट करणे उपयुक्त होईल. माझे स्वतःचे धान्य दळताना आणि माझ्या स्वतःच्या कपड्यांसाठी सूत काढताना मला कसलीही मजुरी मिळत नाही. मी फक्त माझे पैसे वाचविले एवढाच याचा अर्थ आहे. नाही तरी या कामासाठी मला दुसऱ्या कोणाला तरी पैसे द्यावे लागले असते. म्हणून ज्या ठिकाणी लोक स्वतः आपल्या हाताने काम करतात, त्या ठिकाणी विजेवर किंवा तेलावर चालणारी एखादी पिठाची चक्की वसवली किंवा लहानसे यंत्र चालू केले तर त्याला तात्त्विक आक्षेप घेण्याचे कारण नाही. खरोखर पहाता, ह्या स्वावलंबी लोकांनी यंत्रांविरुद्ध तक्रार करण्याचेही कारण नाही. त्यांनी आपले घरचे हातमाग सोडून यंत्रांकडे जावे, अशी कोणी त्यांच्यावर सक्ती करीत नाही. त्यांनी वाटल्यास पिठाच्या गिरणीत जावे व योग्य मजुरी देऊन आपले धान्य दळून आणावे आणि आपले काबाडकष्ट वाचवावे. पण ते त्यांच्या इच्छेवर अवलंबून आहे. नव्या सुधारणा सुरू करू नयेत असे जो म्हणतो, त्याला मनुष्यस्वभाव कळलाच नाही, असे म्हणावे लागेल. सार्वजनिक वर्गणीने व सार्वजनिक रीतीने खेड्यापाड्यां-तून जर ही यंत्रे वसविली, तर त्यात कोणा एकट्याला फायदा मिळणार नाही व सर्वां-चीच सोय होईल.

हस्तव्यवसायाच्या धंद्यात जर कामगार मजुरीवर ठेवावयाचे झाले, तर त्या प्रश्नाचा वेगळ्या रीतीने विचार होईल. अशा वेळी विजेवर चालणाऱ्या यंत्रांमुळे प्रत्यक्षपणे बेकारी उत्पन्न होण्याची शक्यता आहे. नाही तर कामगारांची तावडतोब दुसरीकडे सोय केली पाहिजे. हे नेहमीच कठीण असते. कारण पुष्कळदा या कामगारांना अर्धवेळच कामावर ठेवलेले असते. जगाच्या आर्थिक विकासाचा इतिहास पाहिला तर बेकार कामगारांना कोठे ना कोठे तरी काम मिळणे शक्य असते. मोठ्या प्रमाणात उत्पादनाची वाढ झाली असली तरी इतर देश आपल्या बेकार कामगारांसाठी विविध प्रकारचे उद्योगधंदे शोधून त्यांची कोठे ना कोठे सोय करू शकतात. आणि इतकेही करून हातसडीचे तांदूळ, जात्यावर दळलेले पीठ उत्पादन करण्याचे धंदे नाहीसे झाले आहेत. हिंदुस्थानापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या देशांची ही स्थिती आहे. भारताला जर जगातल्या पुढारलेल्या देशांची बरोबरी करून त्यांच्यात सामील व्हावयाचे असेल, तर भारताला त्याच मार्गाचा अवलंब करावा लागेल. पण त्या अवस्थेपर्यंत पोचण्यास बराच काळ लागेल आणि अनेक प्रकारच्या घडामोडींना तोंड द्यावे लागेल.

म्हणून मला असे वाटते की, गांधींचे अर्थशास्त्र हे आधुनिक औद्योगिक देशांच्या अर्थशास्त्रापेक्षा वेगळ्या प्रकारचे आहे, असे समजणे चूक ठरेल. पण गांधींच्या पद्धतीत मूलगामी स्वरूपाचा फरक दिसून येईल. स्थानिक जनतेने मागणी केल्याशिवाय काबाडकष्ट वाचविणारी यांत्रिक साधने आणली जाता कामा नये आणि तीसुद्धा सर्वसामान्य जनतेच्या मालकीची असली पाहिजेत, आणि ही यंत्रे बसविताना अशी काळजी घेण्यात आली पाहिजे की, या यंत्रांचा परिणाम बेकारीत होऊ नये. ही पद्धत मंदगतीची असली तरी ती खरीखुरी लोकशाही स्वरूपाची असेल व त्यायोगे जनतेला हालअपेष्टा सोसाव्या लागणार नाहीत. शहरातील भांडवलशाही उद्योगधंद्यांचे नफा मिळविण्याचे उद्दिष्ट या पद्धतीच्या मुळाशी नसून खेड्यातील जनतेने परस्पर- सहकार्याने केलेल्या सहजीवनात आहे.

१८३९८

# गुरूने केलेली प्रशस्ती

"या पृथ्वीच्या पाठीवर गांधीजींहून अधिक निर्मल, अधिक उदात्त, अधिक निर्भय आणि अधिक उन्नत जीव कधीच वावरला नाही.... माझ्या आयुष्यात मी अशा तीन लोकांना भेटलो की, ज्यांनी माझ्यावर एक प्रकारची मोहिनी घातली आणि आध्यात्मिक छाप पाडली. त्यांच्या सान्निध्यात, माझ्या मनात हीन विचार येऊ शकत नसे– कोणतीही हीन योजना माझ्या कल्पनेत येत नसे. ते लोक म्हणजे दादाभाई नौरोजी, माझे गुरू रानडे व गांधी .... गांधीजीसारखा सत्याग्रही पाशवी बलाविरुद्ध आत्म-बल उभे करतो; मानवांतील पशूविरुद्ध मानवातील देव उभा करतो, जुलुमाविरुद्ध आत्म–क्लेशाने लढतो; शरीर–सामर्थ्याशी विवेक-शक्तीने सामना देतो आणि अन्यायाशी न्यायाने लढतो."

—— ना. गोखले यांनी गांधीजींचे वर्णन १९०९ सालच्या कॉंग्रेसमध्ये वरील शब्दांनी केले. म. गांधी ना. गोखले यांना आपले "राजकीय गुरु" समजत.

# लेखकांचा परिचय

**श्री. विनायक नरहर भावे** – (जन्म–१८७५) गागोदे.

बडोदे, काशी, वाई येथें शिक्षण. गांधीजींच्या सत्याग्रह–आश्रमांत प्रवेश (१९१७) वर्धा येथें आश्रम स्थापला (१९२१) कारावास (१९२३, १९३२, १९४०, १९४२) भू-दान-आंदोलनास प्रारंभ (१९५१) येलवालची परिषद (१९५७) ग्रामदान-आंदोलनासाठीं भारतभर पदयात्रा. गीताई गीता-प्रवचनें, स्थितप्रज्ञ-दर्शन, उपनिषदांचा अभ्यास, कुराण-सार, ज्ञानदेवांची भजनें इत्यादी पुस्तकें प्रसिद्ध.

**श्री. दत्तात्रय बाळकृष्ण उर्फ काकासाहेब कालेलकर** (जन्म-१८८५) सातारा.

पद्म-विभूषण. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये असताना क्रांतिकारकांच्या पंथात. बेळगावचे गणेश विद्यालय व बडोद्याचे गंगनाथ विद्यालय यांचे प्रमुख. मुंबईच्या "राष्ट्रमत" या दैनिकाच्या संपादक–वर्गात. १९११ नंतर ३ वर्षे हिमालयात २५०० मैल पायी प्रवास, डॉ. टागोरांच्या शांतिनिकेतनात असताना १९१५ साली गांधीजींची प्रथम भेट. साबरमती आश्रमाच्या स्थापनेपासून गांधीजींचे अंतेवासी व सहकारी, त्यांच्या "यंग इंडिया" व "नवजीवन" या पत्रांचे १९२२ ते १९२४ मध्ये संपादक. ५ वेळा स्वातंत्र्य-आंदोलनात तुरुंगवास. प्रवासवर्णनें, आणि गीता-गीतांजली यावरील भाष्ये इ. ५० वर ग्रंथ. जपान व पूर्व आफ्रिका यांमध्ये दौरे व त्यावर पुस्तके, सध्या "मंगल-प्रभात" हे हिंदी पाक्षिक चालवितात. गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू.

**श्री. मोरारजी रणछोडजी देसाई** (जन्म–१८९६)

भारताचे उपपंतप्रधान आणि अर्थमंत्री (१९६७–६९). गुजरात प्रांतिक काँग्रेस कमिटीचे चिटणीस (१९३१ ते १९३७, व १९३९ ते १९४६). मुंबई राज्याचे मंत्री (१९३७ ते १९३९ व १९४६ ते १९५२), भारत सरकारचे व्यापार-मंत्री. (१९५६ ते १९५८), अर्थमंत्री (१९५८ ते १९६३), गुजरात विद्यापीठाचे कुलपती, गांधी–स्मारक–निधीचे व कस्तुरबा–निधीचे विश्वस्त. स्वातंत्र्यआंदोलनात अनेक वेळा कारावास.

**श्री. रंगनाथ रामचंद्र दिवाकर.** (जन्म–१८९४) धारवाड.

गांधी–स्मारक–निधीचे अध्यक्ष (१९५७ पासून). बिहारचे राज्यपाल (१९५२ ते १९५७). स्वातंत्र्य-आंदोलनात अनेक वेळा कारावास. कर्नाटक

प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस, व नंतर अध्यक्ष. भारत सरकारच्या नभोवाणी-खात्याचे मंत्री (१९४८ ते १९५२). 'कर्मवीरचे' संपादक "संयुक्त कर्नाटक" या दैनिकाचे व "कस्तुरी" या मासिकाचे संपादक सत्याग्रह, उपनिषदे, महायोगी अरविंद घोष, श्रीरामकृष्ण परमहंस, इ. विषयांवरील पुस्तकांचे लेखक.

**श्री. भवानीशंकर नियोगी** (जन्म–१८८६) नागपूर

एम्. ए., एल्‌एल्. बी., एल्‌एल्. एम्., एल्‌एल्. डी.

हायकोर्टाचे न्यायाधीश (१९३० ते ४६), के. टी. (१९४४), सी. आय. ई. (१९३६), नागपूर–नगरपालिकेचे अध्यक्ष (१९२५–२८), मध्यप्रांत पब्लिक सर्व्हिस कमिशनचे अध्यक्ष (१९४६–५६), ख्रिश्चन मिशनरी चौकशी, दारूबंदी चौकशी, इ. आयोगांचे अध्यक्ष. भूदान-यज्ञ मंडळाचे अध्यक्ष (१९५६–६३), नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू (१९३२–३३ व १९३४–३५).

**श्री. शंकर त्र्यंबक ऊर्फ दादा धर्माधिकारी** ( जन्म १८९९ ) मूलतापी.

असहकाराच्या आंदोलनात कॉलेज सोडले. नागपूरच्या टिळक विद्यालयात अध्यापक ( १९३१ ते १९५५ ). वर्धा येथील बजाजवाडीत विधायक कार्य ( १९३५–४६ ). गांधी–सेवा–संघाचे सदस्य. त्या संघाचे हिन्दी मुखपत्र 'सर्वोदया'चे संपादक ( १९३८–४२ ). प्रांतिक विधी मंडळाचे सभासद (१९४६–४७.) घटनासमितीचे सदस्य. सध्या भूदान व सर्वोदय यांच्या आंदोलनात सहभागी. कालडी येथील सर्वोदय–संमेलनाचे अध्यक्ष (१९५७). १९३०, १९३२ व १९४२ या सालच्या स्वातंत्र्य-आंदोलनात तुरुंगवास. सर्वोदय–दर्शन, मानवीय क्रांती, स्त्रीपुरुष–सहजीवन, लोकनीति–विचार, साम्ययोगाच्या मार्गावर, क्रांतिनिष्ठा, आपल्या गणराज्याची ,घडण, स्नेहाचे झरे, अंतरीचे उमाळे, इ. मराठी व हिंदी पुस्तके प्रसिद्ध तेलगू, मल्याळम् इत्यादी भाषांमध्ये भाषांतरे.

**श्री. शंकरराव देव** ( जन्म–१८९५. ) भोर.

मधुकरी मागून विद्यार्जन. बडोद्यास आचार्य विनोबांबरोबर कॉलेज-मध्ये शिक्षण. मुंबईच्या कॉलेजातून बी. ए., बिहारमध्ये चंपारण्यात स्वयं-सेवक, मुळशी सत्याग्रहात कारावास (१९२०-१९२२), स्वातंत्र्य–संग्रामात कारावास (१९२७ त २ वर्षे, १९३० त १ वर्ष, १९३२ त २ वर्षे, १९४० त १ वर्ष व १९४२ त २ वर्षे ९ महिने). अ. भा. कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस (१९४६–५०). फैजपूर येथे १९३६ साली भरलेल्या कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष. भूदान व सर्वोदय या आंदोलनातील नेते. भगवान बुद्ध, उपनिषदातील गोष्टी इत्यादी पुस्तके. "नवभारत" मासिकाचे व "समाज-प्रबोधन" संस्थेचे संस्थापक.

**श्री. उछरंगराय नवलशंकर ढेबर** (जन्म – १९०५) गंगाजल (सौराष्ट्र)

खादी व ग्रामोद्योग मंडळाचे १९६३ पासून अध्यक्ष. कॉंग्रेसचे अध्यक्ष

तीनदां (१९५५–५९) काठेवाड राजकीय परिषदेचे चिटणीस (१९३७–४८). गुजरात प्रांतिक काँग्रेस कमिटीचे चिटणीस (१९४५–४७), सौराष्ट्राचे मुख्य मंत्री (१९४८–५४). राजकोट सत्याग्रहात (१९३८–३९) तीनदा तुरुंगवास. १९४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात व १९४२ च्या "चले जाव" चळवळीत कारावास. संसद–सदस्य (१९६२–६३).

**श्रीमन् नारायण**

गुजरातचे राज्यपाल, नियोजन मंडळाचे माजी सभासद. वर्धा येथील वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य. गांधीजींच्या दृष्टिकोनांतून आर्थिक नियोजनांवर इंग्रजीत ग्रंथ, "रोटीका राग", हे काव्याचे पुस्तक. ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस, नेपाळ राज्यांत भारताचे वकील.

**श्री. पु. ल. देशपांडे** (जन्म – १९१९) मुंबई. एम्. ए., एल्एल्. बी.

पद्मश्री, विनोदी लेखक व नाटककार, मुंबई व बेळगाव येथे प्राध्यापक, महाराष्ट्र नाटयसंमेलनाचे अध्यक्ष, दिल्लीच्या आकाशवाणीवर व दूरदर्शनावर अधिकारी, एकपात्री प्रयोग करणारे, मराठी चित्रपटाचे नट, लेखक व संगीत-दिग्दर्शक. अपूर्वाई, पूर्वरंग, व्यक्ती व वल्ली, गणगोत, तुझे आहे तुजपाशी, तुका झालासे कळस, इ. पुस्तकांचे लेखक. गांधीजींच्या आत्मकथेचे मुंबई आकाशवाणीवर क्रमशः वाचन केले. परदेशांत प्रवास.

**डॉ. रा. ना. दांडेकर** (जन्म– १९०९). सातारा,

जर्मनीत शिक्षण घेऊन एम्. ए., पीएच्. डी; पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक (१९३२–५०), पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागाचे प्रमुख व डीन (१९५९ ते ६५), १९६१ साली काही काळ पुणे विद्यापीठाचे कुलगुरू. युरोप, अमेरिका, रशिया, जपान इत्यादी देशांत भाषाविषयक परिषदांसाठी प्रवास. पॅरीस येथे १९५८ साली भरलेल्या पौरस्त्य काँग्रेसला उपस्थित; भारत सरकारने नेमलेल्या संस्कृत कमिशनचे चिटणीस ( १९५६–५७ ). महाभारताच्या संशोधित आवृत्तीचे संपादक, त्यासाठी रौप्यपदक. भांडारकर इन्स्टिटयूटच्या सुवर्ण-महोत्सवप्रसंगी सन्मानाचे ताम्रपत्र (१९६८). "पद्मभूषण" (१९६२). भांडारकर इन्स्टिटयूटचे कार्यवाह (१९३९ पासून).

**कन्हयालाल माणेकलाल मुन्शी** ( जन्म – १८८७ ) भडोच, एल्एल्. बी, डी. लिट्, एल्एल्. डी.

संयुक्त प्रदेशाचे राज्यपाल, ( १९५२ ते १९५७ ), मुंबई राज्याचे गृहमंत्री ( १९३७ ते १९३९ ). हैद्राबाद संस्थानातील भारत सरकारचे राजदूत, केंद्रीय अन्नमंत्री (१९५० ते १९५२). स्वातंत्र्य-आंदोलनात अनेकदा कारागृहवास. 'भारतीय विद्या भवनचे' संस्थापक. नाटके, कांदबऱ्या इत्यादी ५० वर पुस्तके.

**श्री. के. के. शहा.** (जन्म—१९०८) गोरेगाव (कुलाबा जिल्हा)

भारताचे आरोग्य-मंत्री व नभोवाणी-मंत्री १९६७ पासून. मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस. राज्यसभेचे सभासद ( १९६० ते १९६६. ) स्वातंत्र्य-आंदोलनात अनेकदा कारावास.

**श्री. यशवंतराव चव्हाण** (जन्म—१९१३) देवराष्ट्रे (जि. सांगली)

भारत सरकारचे गृहमंत्री. कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिक्षण वक्तृत्वात पारितोषिक-विजेते. १९३० साली पहिला तुरुंगवास. १९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला. नंतर १९३४ साली मॅट्रिक, १९४१ साली एल्. एल्. बी. कराड येथे वकिली सुरू केली. १९४२च्या "चलेजाव' चळवळीत भूमिगत होऊन कार्य केले. १९४४ साली अटक. महाराष्ट्र प्रां. काँ. कमिटीचे कार्यवाह. १९४६ सालीं मुंबई विधिमंडळाचे सदस्य; १९५२-पासून मुंबई राज्याचे मंत्री, १९५६—६२ पर्यंत मुंबई राज्याचे मुख्य मंत्री. १९६२—६६ केंद्र—सरकारचे संरक्षण—मंत्री; इंग्लंड, अमेरिका, रशिया इत्यादी देशांना भेटी. "प्रकाश" व "लोकक्रांती" ही साप्ताहिके चालविली.

**श्री. स्वामी रामानंदतीर्थ**

असहकारितेच्या आंदोलनात सरकारी कॉलेजावर बहिष्कार टाकून पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रवेश केला, आणि अखेरपर्यंतचे शिक्षण तेथे घेऊन "पारंगत". हिप्परगा येथील राष्ट्रीय शाळेचे मुख्याध्यापक म्हणून आठ वर्षे काम आणि तेथेच ब्रह्मचर्याश्रमातून संन्यासाश्रमात प्रवेश केला. पुण्याच्या "सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी"त दोन वर्षे काम केल्यावर ते हैद्राबादकडे गेले. हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष होते. तेथील तुरुंगात दोन वेळा तुरुंगवास. दिल्लीच्या संसदेचे सभासद दहा वर्षे. भू-दान-ग्रामदानाच्या आंदोलनात भाग घेत आहेत. हैद्राबाद खादी समितीचे अध्यक्ष.

**श्री. दत्तो वामन पोतदार**— (जन्म—१८९०) बीरवाडी (जि. कुलाबा)

सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक, महामहोपाध्याय १९४६, विद्यावाचस्पती, पद्मभूषण १९६७, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु, शिक्षण—प्रसारक—मंडळीचे अध्यक्ष, टिळक विद्यापीठाचे कुलगुरु, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचें अध्यक्ष, "मराठी गद्याचा इंग्रजी अवतार" इ. पुस्तकांचे लेखक.

**श्री. पां. वा. गाडगीळ** (जन्म – १८९९) कुरुंदवाड.

पद्मश्री, पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून वाङमय विशारद झाल्यावर वृत्तपत्रांच्या क्षेत्रात प्रवेश केला. केसरी, मराठा, लोकशक्ती नवयुग, लोकमान्य, गावकरी व नवशक्ती – या वृत्तपत्रांच्या संपादनामध्ये ३७ वर्षे सेवा केली. मार्क्सच्या "कॅपिटल"चा सारग्रंथ त्यांनी लिहून प्रसिद्ध केला आणि "वादविवेचन" मालेमध्ये समाजवाद, अराज्यवाद वगैरे विषयांवर पुस्तके लिहिली. रशियन राज्यक्रांती, गीतातत्त्वांजली इ. त्यांचे

ग्रंथ प्रसिद्ध आहेत. "शांतिदूत नेहरू" या त्याच्या पुस्तकास रशियन सरकारचे पारितोषिक मिळाले. मुळशीच्या सत्याग्रहांत देहदंड. इंग्लंड (१९५०), रशिया (१९६७) या देशांत दौरा केला. महाराष्ट्र विधान–सभा–परिषदेचे सभासद होते. आता पंचवार्षिक योजनेवर त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध होत आहे.

**श्री. ना. ग. गोरे** (जन्म–१९०७.) रत्नागिरी

प्रजा–समाजवादी–पक्षाचे अध्यक्ष, स्वातंत्र्य–आंदोलनात चार वेळा कारावास, १९५५ मध्ये गोवा-मुक्ति-संग्रामात पहिल्या तुकडीचें नेतृत्व— १० वर्षे शिक्षा, पण २ वर्षांत मुक्तता, लोकसभेचे सभासद (१९५७–६२), पुणे शहराचे महापौर (१९६८), पंडित नेहरूंच्या आत्मकथेचा मराठी अनुवाद. अमेरिकेचा इतिहास, कारागृहाच्या भिंती, सीतेचे पोहे, करवंदे इ. पुस्तके प्रसिद्ध. जपान, इंग्लंड इत्यादी देशांत प्रवास.

**श्री. दि. ब. केरूर** (जन्म–१९२३) केरूर

एम. ए., पीएच. डी. पुणे येथील स. प. महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि प्राध्यापक. पुणे विद्यापीठामध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक. लंडनच्या रॉयल इकॉनॉमिक सोसायटीचे सदस्य. द्वितीय पंचवार्षिक योजना, अर्थशास्त्र-विचार, भारतीय शासन-व्यवस्था इ. ग्रंथ प्रकाशित. श्रीगुळवणी-महाराजांच्या, अनुग्रहाने सहज योगाचा अभ्यास.

**श्री. बाळकोबा भावे** (जन्म–१८९९) हुबळी.

बडोद्याच्या "कला-भवन" मध्ये चित्रकलेचे ३ वर्षे शिक्षण. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टसची ३ री परीक्षा १९१८ साली उत्तीर्ण. ६ वर्षे संगीत-कलेचे शिक्षण. गांधीजींच्या साबरमती आश्रमात (१९१९ ते १९३१) ३ वर्षे विणकाम-विभागाचे व्यवस्थापक. ध्यानचिंतनासाठी ११ वेळा एकांत-वासात (१९२४–३१). १९३१ साली क्षयग्रस्त. गांधीजींच्या उपचारामुळे क्षयमुक्त. उरुळीकांचन येथील निसर्गोपचार–आश्रमात (१९४६-६१). आश्रमासाठी निधी गोळा करण्याकरिता आफ्रिकेत प्रवास. पवनार येथील ब्रह्म-विद्यामंदिरात ब्रह्मसूत्र-शांकर भाष्याचे अध्यापन ८ वर्षे चालू आहे. ब्रह्मसूत्र शांकर-भाष्याचा तीन खंडांत हिन्दी अनुवाद. मराठीत "स्थितप्रज्ञ–लक्षण", पथदीप इ. पुस्तके.

**श्री. बाळूभाई मेहता** (जन्म–१८८९) नंदुरबार. एम. ए., एलएल. बी.

धुळे जिल्ह्यात काँग्रेस-खादी, ग्रामोद्योग, भूदान कार्य केले (१९२०–६०). कासारे गावी ग्रामसेवा (१९३४–३९). सर्वोदय केंद्राचे संचालक (१९४९-–५५). १९३१, १९४२ व १९४४ साली तुरुंगवास. खादी-मीमांसा, ख्रिस्त-चरित्र, राष्ट्रसंवर्धक कार्यक्रम, वैभवशाली हिन्दुस्थान, आहारमीमांसा, ग्राम-


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि ........
........ ........

सफाई, इ. पुस्तके. तसेच "Hindu View of life", "Why the Village Movement", "Economy of Permanance" इ. इंग्रजी पुस्तकांचा अनुवाद.

**श्री. मामा क्षीरसागर** (जन्म–१९०३) रोहा.

श्रीमसूरकर महाराजांचे थोर कार्यकर्ते, गोमंतकात शुद्धीकरणाचे कार्य, १९२१ सालापासून राष्ट्रीय आंदोलनात सहभागी, त्यामुळे तुरुंगवास. अमरावतीजवळील दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाचे संस्थापक, भू-दान–कार्यात मग्न.

**श्री. बाबा आमटे**– (जन्म–१९१४) हिंगणघाट.

बी. ए., एल्‌एल्. बी. आनंदवन, वरोरा. (जि. चांदा.) येथे कुष्ठरोग–निवारणाचे स्वावलंबी कार्य. श्रमिकांचे विद्यापीठ स्थापण्याची योजना. सोमनाथच्या जंगलात देशातील तरुणांची शिबिरे. "ज्वाला आणि फुले" (महाराष्ट्र शासनातर्फे पुरस्कार), माती जागवील त्याला मत, इ पुस्तके

**श्री. दि. के. बेडेकर** (जन्म १९१०) सातारा.

एम्. ए. साहित्य-समीक्षक, संयुक्त महाराष्ट्र, सुमित्रानंदन पंत यांचे काव्य, साहित्य–निर्मिती व समीक्षा, हेगेल–चरित्र व तत्त्वज्ञान, साहित्य-विचार, 'केशवसुतांची काव्यदृष्टी' इ. ग्रंथांचे लेखक. हेगेल चरित्रग्रंथाला "ललित पारितोषिक".

**श्री. अच्युतभाई देशपांडे** (जन्म–१९१२) रांजणी.

मराठी, ऊर्दू, इंग्रजी, हिंदी, संस्कृत, गुजराती, अरबी, फारसी, बंगाली, तेलगू, असामी या भाषांचे ज्ञान. माणुसकीच्या ज्योती, कुराणाचे भाषांतर व त्याचा शब्दकोश प्रसिद्ध. स्वातंत्र्य-आंदोलनात ५ वेळा मिळून २॥ वर्षे आणि हैद्राबाद राज्यात ४ वेळा मिळून ४॥ वर्षे तुरुंगवास. श्रमाधारित व पक्ष-मुक्त सेवा करीत असतात. १९५३ पासून भूदान-ग्रामदान-कार्यात रममाण.

**श्री. नरेंद्र तिडके** (जन्म १९२०) बी. ए, एल्‌एल्. बी.

महाराष्ट्र राज्याचे कामगार–मंत्री, मध्यप्रदेश विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष, विदर्भ युवक काँग्रेसचे नियंत्रक. १९४२ च्या स्वातंत्र्य-आंदोलनात तुरुंगवास, नागपूरच्या राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे अध्यक्ष. १९५६ साली जीनिव्हा येथे भरलेल्या मजूर परिषदेत भाग घेतला. रशिया, इंग्लंड, जर्मनी, डेन्मार्क इत्यादी देशांतील मजुरांची स्थिती पहाण्यासाठी दौरे केले.

**श्रीमती इंदु टिकेकर** (जन्म–१९३४) कोल्हापूर.

एम्. ए. "सर्वोदय" विषयावर प्रबंध लिहून बनारस हिंदु विद्यापीठाची पीएच्. डी. पदवी मिळविली. त्यापूर्वी कोल्हापूर येथील कॉलेजात प्राध्यापिका. सोमनाथ येथे महारोग्यांची सेवा.

**श्री. द. का. उर्फ नानासाहेब कुंटे :–** ( जन्म–१९१३ ) अलिबाग, बी. ए. एलएल. बी.

स्वातंत्र्य–आंदोलनांत अनेक वेळा कारावास. मुंबईच्या विधान सभेचे सभापती. दिल्लीच्या लोकसभेचे लोकनियुक्त सभासद. भारतीय क्रांतिदलाचे कार्यवाह. " टाइम्स ऑफ इंडिया " पत्राचे सरकारने नेमलेले माजी प्रशासक, लेखक, वक्ते, कार्यकर्ते, संघटक.

**ग. स. अळतेकर** ( सन १८९५ ) हयाकवें ( कोल्हापूर संस्थान ) एम. ए. एलएल. बी.

डेक्कन कॉलेजमध्यें दक्षिणा फेलो (१९१७–१९१९), मुंबई विद्यापीठाचे मंडलिक सुवर्ण-पदक. (१९१८), कराड येथील विविध शिक्षण-संस्थांचे संस्थापक व अध्यक्ष. स्वातंत्र्यलढयांत कारावास (१९३०, १९३२, १९४२) लोकसभेचें लोकनियुक्त सभासद ( १९५२–१९५७ ) " सीता-दर्शन " व " हनुमान–दर्शन " ही पुस्तकें प्रसिद्धीच्या मार्गावर.

**श्रीमती प्रेमा कंटक–** ( जन्म १९०६ ) मुंबई.

गांधीजींच्या आश्रमात वास्तव्य केलेलें. सत्याग्रही महाराष्ट्र, पुण्य-धाम सेवाग्राम, काम आणि कामिनी ( हिन्दी व गुजराती ) इ. पुस्तके. स्वातंत्र्य-आंदोलनात १९३३ साली ६।६ महिने दोनदा कारावास. १९४० साली वैयक्तिक कायदेभंगाच्या चळवळीत ३–३ महिन्यांचा चार वेळा कारावास, १९४२ साली १॥ वर्ष कारावास.

**श्री. वि. स. पागे–** ( जन्म १९१० ) बागनी, जि. सातारा.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती ( सन १९६० पासून ). १९३६ साली एल्एल्. बी., वयाच्या दहाव्या वर्षी दारूच्या गुत्त्यावर निरोधन, १९३० व १९४० साली स्वातंत्र्य-आंदोलनात कारागृहवास. १९४२ च्या " चले जाव " चळवळीत तासगावच्या मामलेदार–कचेरीवर राष्ट्रध्वज फडकविला. ता. २५ ऑक्टोबर १९४२ ते १६ सप्टेंबर १९४४ पर्यंत तुरुंगात स्थानबद्ध. मुंबई विधानपरिषदेचे सभापती. ( १९५२–१९६० ). महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष. खेडयांच्या सुधारणेसाठी " पागे योजना " बनविली व अमलात आणली. अध्यात्म-विषयाचे व्यासंगी व प्रवक्ते.

**श्री. दा. न. शिखरे–** ( जन्म १९०३, ) उंब्रज, जि. सातारा.

एम्. ए., गांधी-चरित्रादी १०० वर पुस्तकांचे लेखक. 'महात्मा' मासिक गेली २२ वर्षे चालवीत आहेत. संचालक, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे ४.

**श्री. ए. रा. धोंगडे–** ( जन्म १९११ ) सोलापूर.

बी. ए. ( मुंबई ), बी. कॉम. ( लंडन ) मुंबई येथील सिडेनहॅम

वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक. पुणे येथे महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण-खात्याचे संचालक.

**श्री. ग. वि. अकोलकर** – ( जन्म १९०९ ) नाशिक, एम्. ए., एल्एल्. बी., बी. टी.

प्राचार्य–कॉलेज ऑफ एज्युकेशन, नाशिक, महाराष्ट्र माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष ( १९६३ ), जळगाव येथे भरलेल्या मुख्याध्यापक संघाच्या अधिवेशनाचे अध्यक्ष ( १९६३ ). नाशिकचे लोकहितवादी मंडळ, सानेगुरुजी कथामाला, रोटरी क्लब, इ. संस्थांचे अध्यक्ष. "गांधी–विचारदर्शनांतील शिक्षणविचार' या खंडाचे लेखक. 'नव्या महाराष्ट्रातील शिक्षण' या ग्रंथास महाराष्ट्र सरकारचा विशेष पुरस्कार. व्यास-कुसुमे, अमृत-तुषार, भागवत-कथासार, मादाम क्युरीचे चरित्र आणि माध्यमिक शिक्षण, व्यक्तिमत्त्वाचा इतिहास, इ. शिक्षणविषयक ग्रंथांचे लेखक.

**श्रीमती प्रेमलीला विठ्ठलदास ठाकरसी** ( जन्म १८९४ ) राजकोट.

बनारस हिंदु विद्यापीठाने आणि नाथीबाई ठाकरसी विद्यापीठाने डी.लिट पदवी दिली. कस्तुरबा गांधी स्मारक समितीच्या अध्यक्ष (गेली १२ वर्षे), नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू गेली (१५ वर्षे), भारत व सिलोन यांच्या आंतरविद्यापीठ बोर्डाच्या अध्यक्ष. मुंबई व सुरत येथील "वनिता–विश्राम "च्या अध्यक्ष. त्यांच्या "पर्णकुटीत" गांधीजींनी अनेक वेळा वास्तव्य केले आणि १९३३ चा हरिजनांसाठी उपवास तेथेच केला.

**श्री. गो. प. नेने** ( जन्म– १९१३ ) वाराणशी. एम्. ए., बनारस हिंदु विद्यापीठाचे पदवीधर.

"राष्ट्रवाणी" व "हमारी बात" ह्या दोन हिंदी मासिकांचे अनुक्रमे गेली २२ व १५ वर्षे संपादक. सुमारे वीस हिन्दी पुस्तकांचे संपादन, हिन्दी आणि मराठी १५ पुस्तकांचे लेखक. तीस वर्षे "महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभे"तर्फे हिन्दी प्रसाराचे कार्य. त्याच संस्थेचे हल्ली प्रशासन–मंत्री. अखिल भारतीय हिन्दी संस्था संघाचे गेली सहा वर्षे प्रमुख कार्यवाह. महाराष्ट्र सरकारच्या हिन्दी प्रचार चौकशी समितीचे अध्यक्ष.

**श्री. द. कृ. गोसावी** ( जन्म १८९४ ) ब्रह्मनाळ.

बी. ए. एल्एल्. बी. "ग्रामसेवक संघ" व "लोकसेवक संघ", सातारा या दोन संस्थांचे दहा वर्षे चिटणीस, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, या संस्थेचे प्रथम चिटणीस व नंतर कार्याध्यक्ष, भारतीय तत्त्वज्ञान मंडळाचे कार्यकर्ते. आनंदमूर्तींचे चरित्रकार, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे हंगामी अध्यक्ष, स्वातंत्र्य-आंदोलनात ३ वेळा तुरुंगवास.

**श्री. चिं. ग. काशीकर** ( जन्म–१९१० ) सातारा.

टि. म. विद्यापीठाचे 'वाङ्मय पारंगत' ( १९३४ ), पुणे विद्यापीठाचे डी. लिट्. ( १९६६ ). टिळक विद्यापीठाचे कार्यवाह ( १९४२––४६, १९५३–५६ ). वैदिक संशोधन मंडळाचे कार्यवाह ( १९३३ ते ६७ ). टिळक आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राध्यापक ( १९४१ पासून ). ऋग्वेदातील सांस्कृतिक इतिहास, इ. मराठी, इंग्रजी, संस्कृत भाषांमध्ये ग्रंथरचना.

**श्री. अप्पासाहेब बाळासाहेब पंत** ( जन्म १९१२ ) औंध.

औंधचे युवराज, बॅरिस्टर, पद्मश्री ( १९५४ ), औंधमधील स्वराज्याची घटना गांधीजींच्या सल्ल्याप्रमाणे करणारे आणि ४ वर्षे औंध संस्थानचे मुख्य मंत्री मध्य आफ्रिका, सिक्कीम, भूतान, इंडोनेशिया, नॉर्वे, अरब संयुक्त संघ, इंग्लंड यांमध्ये भारत सरकारचे राजप्रतिनिधी.

**श्री. प्रभाकर रामकृष्ण दामले** (जन्म–१९०६) पेण.

एम्. ए., एल् एल्. बी. अंमळनेरच्या तत्त्वज्ञान–मंदिरात फेलो. धारवाडच्या कर्नाटक कॉलेजात प्राध्यापक. पुण्याच्या वाडिया कॉलेजात १९३४ पासून प्राध्यापक. त्या कॉलेजचे प्राचार्य (१९५८ ते ६५). सीलोन येथे भरलेल्या अ. भा. तत्त्वज्ञान परिषदेचे विभागीय अध्यक्ष. १९५५ साली ऑक्सफर्ड विद्यापीठात अभ्यास. ब्रुसेल्स येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय प्राध्यापक परिषदेचे प्रतिनिधी (१९५८). तत्त्वज्ञानावर इंग्रजीत ग्रंथरचना. मराठीत "पाच थोर नेते" हे पुस्तक.

**श्री. त्र्यं. वि. पर्वते–** (जन्म– १९०१) उद्वद रामेश्वर.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे वाङ्मय-विशारद. रानडे, टिळक, गोखले. इ. ची इंग्रजी चरित्रे; 'अर्घ्यप्रदान', 'मी घेतलेल्या मुलाखती' इ. मराठी पुस्तके. टाइम्स, क्रॉनिकल, मराठा इ. पत्रांच्या संपादक-वर्गात, पूना डेली न्यूज, लोकसत्ता, नवहिन्द टाइम्स व गोमंतक या दैनिकांचे संस्थापक व संपादक. टिळक-चरित्रास 'अ. भा. टिळक जन्म-शताब्दी स्मारक समिती 'ने पारितोषिक दिले.

**श्री. रिषभदास रांका.** (जन्म–१९०३) फत्तेपूर.

खादी, गोसेवा, ग्रामसेवा, इ. विधायक कार्ये. स्वातंत्र्य-आदोलनात १९३० साली ६ महिने, १९३२ साली १६ महिने व १९४२ साली १४ महिने, असा तुरुंगवास सोसला. महावीरांचे तत्त्वज्ञान, शेती, इ. विषयांवर हिन्दी पुस्तके. 'जीवन-जोहरी' हा चरित्रात्मक ग्रंथ. "जैन जगत्"चे १२ वर्षे संपादक. अ. भा. अणुव्रत समितीचे उपाध्यक्ष. धर्मातीत भूमिकेवरून सेवा करणाऱ्या "मुंबई जैन उद्योग-गृहा"चे अध्यक्ष, राजस्थानच्या दुष्काळ-निवारणात दीर्घकाळ सेवा.

**श्री. सखाराम जगन्नाथ भागवत** (जन्म–१९०३) महाड.

शिक्षण मुंबई येथील विल्सन कॉलेजात प्रिव्हिअसपर्यंत. १९२१ जानेवारी-मध्ये असहकारामुळे कॉलेजवर बहिष्कार. नंतर महाड येथील राष्ट्रीय शाळेत अध्यापन. टिळक विद्यापीठाचे वाङ्मयविशारद. जीवन आणि साहित्य, चौफुला, जीवन-शिक्षण, जीवन-चिंतन इत्यादीं ग्रंथांचे कर्ते. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, नवभारत (मासिक) यांचे संपादक. स्वातंत्र्य-संग्रामात १९३०–३१ साली १ वर्ष, १९३२ साली २ वर्षे व १९४२ साली १५ महिने तुरुंगवास. टिळक महाविद्यालय, पुणे (१९२७ ते १९३५) व सासवड आश्रम (१९३५ ते १९४२) यांत कार्य. "आंतरभारती"ची स्थापना व प्रचार. गारगोटी येथील श्रीमौनी विद्यापीठाचे कुलपती (१९५३–१९६०).

**श्री. दीनदयाळ गुप्ता** (जन्म–१९०६) नागपूर.

१९३०च्या चळवळीत व १९४० च्या व्यक्तिगत सत्याग्रहात भाग घेतला. विद्यार्थी-संघटन, अस्पृश्यता-निवारण, राष्ट्रभाषा-प्रचार ही विधायक कामे केली. १९४० ते १९५२ पर्यंत नागपूर काँग्रेस संघटनेचे प्रमुख; १९३०, १९४०, १९४२ साली तुरुंगवास. जुन्या मध्यप्रदेशात अन्नमंत्री (१९५२ ते १९५६). मुंबई राज्यात मजूर-मंत्री (१९५६–५७). महाराष्ट्र विधानसभेचें उपाध्यक्ष (१९५७ ते १९६२) व राज्य ग्रामोद्योग मंडळाचें अध्यक्ष. नागपूरच्या भजनी मंडळाचे व तालमी संघाचे संघटन घडवून आणले. भणसाळी ग्राम सेवामंडळ संस्थेतर्फे आदिवासी क्षेत्रात शैक्षणिक कामे केली.

**सौ. सावित्रीबाई मदन** (जन्म–१९१३) गुजरावाला (पंजाब)

बनारस हिंदू विद्यापीठाच्या पदवीधर. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळात १९४६ पासून. त्या मंडळाच्या सदस्य–सचिव (१९५२–१९६५). कस्तुरबा स्मारक ट्रस्टच्या सभासद.

**श्री. डॉ. रा. वि. साठचे** (जन्म–१९०५) अहमदाबाद

एम्. डी. (मुंबई), एफ. आर. सी. पी. (लंडन)

मुंबई येथील जे. जे. हॉस्पिटल, ग्रॅण्ट मेडिकल कॉलेज, भाटिया हॉस्पिटल, इ. संस्यांमध्ये वैद्यकीय व्यवसाय व अध्यापन. इंडियन मेडिकल असोसिएशनचे कुलगुरू (१९५२–५३). वर्ल्ड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष (१९६२–६३) मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१९६३–६६), मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, वगैरे देशांत पर्यटन.

**श्रीमती शरयू धोत्रे** (जन्म–१९१०) भुसावळ.

श्री. अण्णासाहेब दास्ताने यांच्या कन्या. विधायक कार्यात भाग घेतला.

**श्री. डॉ. रा. वि. वारदेकर.** (जन्म–१९१४) पुणे.

बी. एस्‌सी., एम्. डी., गांधी मेमोरियल लेप्रसी फौंडेशनचे १९५२ पासून

मंत्री. जागतिक स्वास्थ्य संघटनेचे सल्लागार म्हणून अनेक देशांना भेटी. कुष्ठरोगावर चार इंग्रजी पुस्तके लिहिलेली आहेत.

**श्री. मनोहर दिवाण** (जन्म–१९०१) बुलढाणा.

पद्मश्री, १९२० साली असहयोगाच्या आंदोलनात कॉलेज सोडले. खामगावच्या टिळक राष्ट्रीय विद्यालयात प्राध्यापक. मॅट्रिकमध्ये पहिल्या वर्गात उत्तीर्ण. 'महारोग' हा कुष्ठरोगावर ग्रंथ. त्याचा हिन्दी अनुवाद प्रकाशित झाला आहे. पवनारचे परंधाम, विनयांजली, ताओ-उपनिषद, इ. ग्रंथरचना. १९२६ पासून वर्धा आश्रमात. १९३६ ते १९५९ पर्यंत महारोगी-सेवा मंडळ स्थापून दत्तपूरच्या कुष्ठधामचे संचालन केले. १९५९ पासून ब्रह्मविद्या-मंदिरात कार्य.

**श्री. जे. डब्ल्यू. आयरन** (जन्म–१९०७) केडगाव.

एम्. एस्सी., पीएच. डी. मुंबईच्या विल्सन कॉलेजमधील प्राध्यापक. "गांधी–सेवक–समाजा"चे चिटणीस-शिक्षण शास्त्रावर इंग्रजीत ग्रंथरचना.

**श्री. र. श्री. भाई धोत्रे** (जन्म–१८९७) बडोदे. (मृत्यु–१९६६)

आचार्य विनोबांचे सहाध्यायी. १९२० साली असहकाराच्या आंदोलनात कॉलेज सोडले व गांधीजींच्या सत्याग्रहाश्रमांत सामील झाले. खादी-कामात निष्णात, गांधी-सेवा–संघाचे कार्यवाह व नंतर अध्यक्ष. १९२३ व १९४२ साली तुरुंगवास. अ. भा. काँग्रेस कमिटीच्या विधायक कार्याचे प्रमुख. सर्वोदय समाजाचे एक संस्थापक. गांधी स्मारक निधीचे कार्यवाह.

**श्री. वि. स. खांडेकर** (जन्म १८९८) सांगली

कोकणातील शिरोडे येथील माध्यमिक शाळेचे प्रमुख. २५ कादंबऱ्या, ६ नाटके, १०० लघुनिबंध, ५० रूपककथा, ३०० टीकालेख इ. सोज्वळ कलात्मक साहित्य लिहिले. 'महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष'(१९४१). 'ययाती' कादंबरीला भारत सरकारच्या अकादमीचे पारितोषिक.

**श्री. कमलनयन बजाज** (जन्म १९१५) वर्धा

म. गांधी व आचार्य विनोबा यांचे संस्कार साबरमतीआश्रम व सत्याग्रह-आश्रम येथे मिळाले. नंतर इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठांत त्यांनी अर्थशास्त्राचा ट्राय-पास घेतला. हिंदी-साहित्य-संमेलनाचे विशारद आहेत. वयाच्या १७ व्या वर्षी दांडीयात्रेत भाग घेतला व ७॥ महिन्यांची शिक्षा भोगली. १९४२ साली अष्टी-चिमूरच्या खटल्यातील शेकडो लोकांना कायद्याची मदत केली. काँग्रेसच्या १९४८ च्या जयपूर अधिवेशनाचे खजिनदार. संस्थानी चळवळीत भाग घेतला. १९५७ पासून दिल्लीच्या लोकसभेचे लोक-नियुक्त सभासद. गांधी-स्मारक-निधीचे विश्वस्त. युरोप, अमेरिका,

आफ्रिका व आशिया या चारी खंडांत प्रवास केलेला. सरहद्द गांधींना भेटण्यासाठी अफगाणिस्तानात गेले होते.

**श्री नारायणराव कुलकर्णी** (जन्म – १९०३) बिदरकुंडी.

फोटोग्राफर, बंगलोरच्या काँग्रेस–अधिवेशनांत उत्तम छायाचित्रांबद्दल सुवर्णपदक मिळाले. १९४७ साली नोआखलीमध्ये गांधीजीबरोबर. प्राचीन वस्तूंच्या संग्रहाची व प्रवासाची हौस.

**श्री. रा. कृ. पाटील** —(जन्म–१९०७)

महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष व भूदान-ग्रामदान-आंदोलनांचे एक प्रमुख नेते. आय. सी. एस. ची नोकरी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं सोडली. पुढे मध्यप्रदेशचे मंत्री, केंद्रीय सरकारचे फूड-कमिशनर व नियोजन–मंडळाचे सदस्य होते. १९५६ साली चीनला गेलेल्या शिष्टमंडळाचे नेते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

REFBK-0017314

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. ९५५२

नोंद क्रं - ६०६१९
दि - २२।११।६९
निबंध
९६०६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ६०६१९ निबंध
९६०६२ २२।११।६९

# गांधी
## गौरव ग्रंथ

காந்தி கௌரவ் கிரந்த்

گاندھی گورو گرنتھ

ગાંધી ગૌરવ ગ્રંથ

गांधी गौरव ग्रंथ।

ಗಾಂಧೀ ಗೌರವ ಗ್ರಂಥ

ഗാന്ധി ഗൗരവ ഗ്രന്ഥം

గాంధీ గౌరవ గ్రంథము

گانڌي گورو گرنٿ

ਗਾਂਧੀ ਗੌਰਵ ਗ੍ਰੰਥ

গান্ধী গৌরব গ্রন্থ

गांधी गौ ंथ